# श्रीगुरुजी

चं. प. भिशीकर

भारतीय विचार साधना पुणे प्रकाशन

# प्रस्तावना

‘तरुण भारत, पुणे’ चे भूतपूर्व संपादक, सिद्धहस्त लेखक व संघाचे निष्ठावान स्वयंसेवक श्री चं.प. भिशीकर – उपाख्य श्री बापुराव भिशीकर – यांनी स्व.प.पू. श्री गुरुजींचे चरित्र लिहून चरित्रग्रंथात मोलाची भर घातली आहे. यापूर्वी त्यांनी आद्यसरसंघचालक प.पू.डॉ.हेडगेवार यांचे ‘केशवः संघनिर्माता’ या पुस्तकाद्वारे मनोज्ञ दर्शन?डविले आहे. त्याच पद्धतीने हे नवीन पुस्तकही लिहिण्यात आले आहे.

स्व.प.पू. श्री गुरुजींचे जीवन विविधांगांनी समृद्ध होते. त्यांच्या बुद्धीची झेप प्रचंड होती. ज्ञान-विज्ञानाचे कोणतेही क्षेत्र त्यांना अगम्य नव्हते असे म्हणता येऊ शकेल, इतका त्यांच्या ज्ञानाचा आवाका समृद्ध, सखोल व विस्तृत होता. त्याचबरोबर त्यांचा आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारही त्या क्षेत्रातील अनेक श्रेष्ठ पुरुषांना मान्य होता. त्यांच्या जीवनातील काही भाग तर अज्ञातही आहेत. दीर्घकाल सातत्याने परिश्रम केल्याने त्यांच्या जीवनातील सर्व पैलूंवर प्रकाश पडेल असे चरित्र लिहिता येईल. तोपर्यंत उपलब्ध साहित्याच्या आधारे त्यांच्या जीवनातील संघकार्याशी संलग्न असलेल्या कालखंडाच्या संदर्भातच चरित्र लिहिणे शक्य झाले आहे. स्व. श्री. नाना पालकर यांनी श्री गुरुजींच्या १९५६ पर्यंतच्या जीवनाकालाच्या अनुषंगाने ‘श्रीगुरुजी, व्यक्ती व कार्य’ हे पुस्तक लिहिले. तसेच श्री. ह.वि. उपाख्य बापूराव दात्ये यांनी ‘तेजाची आरती’तून त्यांच्या संपूर्ण जीवनातील प्रमुख घटनांचा आलेख काढला आहे. घटनांच्या संदर्भात चपखल बसेल त्या त्या स्थानी संघाचा विचार व श्रीगुरुजींचे त्या त्या संदर्भात मार्गदर्शन हे दोन्ही पुस्तकांत अंतर्भूत केल्याचे दिसेल. दोन्ही पुस्तकांतून प्रामूख्याने लेखकांच्या अनुभूतींच्या आधारावर श्रीगुरुजींच्या जीवनातील घटनांचे विवरण केले गेले आहे, व ते स्वाभाविकही आहे. या दोन्ही चरित्रग्रंथांपेक्षा श्री भिशीकरांनी लिहिलेल्या पुस्तकाचे स्वरुप थोडे वेगळे आहे.

श्रीगुरुजी विविध गुणांनी संपन्न, अलौकिक व्यक्तिमत्व लाभलेले द्रष्टे महापुरुष होते. परंतु त्यांनी आपले जीवन संपूर्णपणे संघकार्यात विलिन केले होते. संघाहून वेगळा असा जीवनाचा कोणताही भाग प्रकट होऊ नये हा त्यांनी कटाक्षाने प्रयत्न केला. आजच्या समस्याग्रस्त, संघर्षपूर्ण व संभ्रमित विश्वाचे कल्याण ‘हिंदूत्वा’च्या आधारावर होऊ शकते ही त्यांची दृढ श्रद्धा होती. ‘हिंदूत्वा’ची संकल्पना अनुभवसिद्ध, तर्काधिष्ठित, सार्वकालिक, सर्वस्पर्शी, विज्ञानाधिष्ठित, वैश्विक आहे, हे त्यांनी आपल्या

सरसंघचालकत्वाच्या काळात विविध माध्यमांतून अतिशय प्रभावीपणे प्रतिपादन केले. आपल्या देशातील काही मनिषींनीही हिंदूत्वा’चे हे पैलू दाखविले होते. परंतु विचाराला सर्वांच्या अनुभवाला येणारे आलंबन उपलब्ध केल्याशिवाय तो विचार जनमानसात रुजत नाही हे स्पष्ट आहे. ‘हिंदूत्वा’च्या विचाराचे आलंबन म्हणजे सुसंघटित व सामर्थ्यसंपन्न हिंदूसमाज. रा.स्व.संघाचे अशा हिंदूसमाजनिर्मितीचे उद्दिष्ट आहे. श्रीगुरुजींची विशेषता ही की, संघविचाराचे प्रतिपादन व प्रवर्तन करताना त्यांनी हिंदूत्वा’च्या व्यापक स्वरुपाचे दर्शन तर घडविलेच, परंतु हे करीत असताना संघकार्याचा गाभा असलेल्या ‘शाखा’- पद्धतीवरुन कोणाचेही लक्ष यत्किंचितही ढळणार नाही ही दक्षता बाळगली. शाखापद्धतीतून असा ‘हिंदू’ घडू शकतो हे त्यांनी लोकांच्या अनुभवाला आणून दिले.

श्री भिशीकरांनी श्रीगुरुजींचे जीवन रेखाटताना प्रामुख्याने संघविचारांचे समग्र व सम्यक दर्शन घडविणाऱ्या घटनांचा ऊहापोह केला आहे. संपूर्ण चरित्र वाचल्यानंतर श्रीगुरुजींच्या श्रेष्ठ व्यक्तिमत्वाचे दर्शन तर घडतेच, त्याचबरोबर मानवकल्याणाची आधारशिला म्हणून ‘हिंदू’ विचाराची सघनता, सर्वंकशता व स्थलकालनिरपेक्षता यांविषयी दृढ विश्वास उत्पन्न होऊन ‘हिंदू’ विचारांचे वाहन असलेल्या संघकार्याची व्यापकता, श्रेष्ठता व अपरिहार्यता यांचा अंतःकरणावर खोल ठसा उमटतो. श्री बापूराव भिशीकरांचा पिंड आध्यात्मिक व श्रीगुरुजींविषयी त्यांच्या मनात नितांत श्रद्धा आहे. परंतु श्रीगुरुजींचे चरित्रलेखन करताना त्यांनी भावविवशतेला थारा दिला नाही. तर्क व प्रमाण यांचे अवधान सुट्र न देता ‘मने मवाळे’ श्रीगुरुजींच्या विशाल जीवनातील ‘अमृतकण’ वेचले आहेत, हे विशेष. हे पुस्तक संघाच्या स्वयंसेवकांनाच नव्हे तर समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात निरपेक्षपणे, निरलसतेने व चिकाटीने नियोजित

कामे करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना समाजपुरुषाची सेवारूप पूजा करण्याची प्रेरणा देईल असा विश्वास वाटतो. असे एक उत्तम पुस्तक लिहिल्याबद्दल मी श्री. बापुराव भिशीकरांचे अभिनंदन करतो.

**- म.द.देवरस**

# ऋणनिर्देश

हे पुस्तक लिहिताना कै. नाना पालकर लिखित 'श्री मा.स.गोळवलकर : व्यक्ति व कार्य' या ग्रंथाचा तसेच 'समग्र श्रीगुरुजी : खंड १ ते ७' याही संकलनाचा मला मोठा आधार लाभला. नागपुरच्या 'तरूण भारत' दैनिकाचे संपादक प्रा. मा.गो. वैद्य यांचे लेखनात बहुमोल साह्य झाले. विशेषतः ठाणे येथील ऐतिहासिक बैठकीचा गोषवारा तयार करून देण्यासाठी त्यांनी जे कष्ट घेतले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

बार्शी येथील श्री विष्णुपंत बंडेवार आणि त्यांचा परिवार यांचेही मोठे ऋण मजवर आहे. कारण त्यांनी सर्व सुखसोयी उपलब्ध करून देऊन हे रेंगाळलेले काम पूर्णतेला नेण्याचा लकडाच माझ्या मागे लावला. बंडेवार परिवारातील सुखद निवासाचे ते दिवस खरोखरच अविस्मरणीय आहेत.

आणखीही अनेकांनी अनेक प्रकारे सहकार्य दिले. त्या सर्वांची नामावली देणे त्यांना रूचावयाचे नाही. परंतु त्यांच्यासंबंधी कृतज्ञता व्यक्त केल्यावाचून राहावत नाही.

**- चं.प.भिशीकर**

## अनुक्रमणिका

१. भूमिका ................................................................................................३
२. शिक्षण आणि संस्कार ................................................................................६
३. काशीतील वास्तव्य ................................................................................ १०
४. सारगाछीच्या आश्रमात ...........................................................................१७
५. जीवनकार्याचा अंगीकार ........................................................................ २५
६. सरसंघचालकपदाचा स्वीकार ...................................................................३३
७. रक्तरंजित फाळणी .................................................................................३९
८. गांधीहत्येनंतरची वावटळ ....................................................................... ५५
९. सत्याग्रह-पर्वाची यशस्वी सांगता ...............................................................६६
१०. सत्कार पर्व ......................................................................................... ७२
११. सेवाकार्यांच्या आघाडीवर ..................................................................... ७८
१२. गोहत्याविरोधी अभियान ..........................................................................८३
१३. सावध राष्ट्रनेता .....................................................................................९४
१४. व्यक्तीपेक्षा कार्य मोठे ...........................................................................१०७
१५. युध्दकाळातील विचारमंथन .................................................................... ११५
१६. हिंदूसाठी जागतिक व्यासपीठ ...................................................................१२७
१७. कर्करोगाच्या अशुभ छायेत .....................................................................१४८
१९. महाप्रयाण ...........................................................................................१६७
२०. कृतज्ञ राष्ट्राची श्रध्दांजली ....................................................................... १७१
२१. स्नेहसूत्री गुंफिले ...................................................................................१८१

## १. भूमिका

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक आणि आद्य सरसंघचालक कै. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी सतत पंधरा वर्षे अविश्रांत परिश्रम करून अखिल भारतीय स्वरूपात संघाचे बीजारोपण केले. १९४० साली नागपूरला संघ शिक्षावर्गासाठी आलेल्या कार्यकर्त्यांपुढे अखेरचे भाषण करताना, "मी येथे हिंदू राष्ट्राचे छोटे स्वरूप पाहत आहे" असे उद्-गार डॉक्टरांनी काढले होते. नंतर २१ जून १९४० रोजी डॉक्टरांनी इहलोकीची यात्रा संपविली, ती श्री. माधव सदाशिव गोळवलकर तथा श्रीगुरूजी यांच्या खांद्यावर संघाची सारी जबाबदारी टाकून.

श्रीगुरूजी हे संघाचे द्वितीय सरसंघचालक. हे दायित्व त्यांनी १९७३ च्या ५ जूनपर्यंत म्हणजे सुमारे ३३ वर्षे सांभाळले. ही ३३ वर्षे संघाच्या व आपल्या राष्ट्राच्या जीवनातही अत्यंत महत्त्वाची. १९४२ चे 'भारत छोडो' आंदोलन, १९४७ ची फाळणी व खंडित भारताला राजकीय स्वातंत्र्याचा लाभ, फाळणीपूर्वी व फाळणीनंतर झालेला भयानक रक्तपात, हिंदू विस्थापितांचे भारतात आलेले प्रचंड लोंढे, पाकिस्तानचे काश्मीरवरील आक्रमण, १९४८ च्या ३० जानेवारीला झालेली गांधी हत्या, त्यानंतरची वावटळ आणि संघावर आलेली बंदी, भारताच्या राज्यघटनेची सिध्दता, स्वतंत्र भारताच्या शासकीय धोरणाची स्वरूपनिश्चिती, भाषावार प्रांतरचनेचा अंमल, १९६२ मधील चिनी आक्रमण, पं. नेहरूंचा मृत्यु, १९६५ भारत-पाक युध्द, १९७१ मधील दुसरे भारत-पाक युध्द व बांगला देशाचा जन्म, हिंदूंच्या अहिंदूकरणाचा उद्योग व राष्ट्रीय जीवनातील वैचारिक मंथन अशा अनेकविध घटनांनी व्याप्त असा हा कालखंड. या काळात संघाचे पोषण आणि संवर्धन श्रीगुरुजींनी केले. भारतभर अखंड भ्रमण करून त्यांनी सर्वत्र कामाला गती दिली व ठायी ठायी माणसे जोडून संघाला भक्कम अखिल भारतीय आकार दिला. डॉक्टरांनी संघाची विचारप्रणाली सूत्ररूपाने सांगितली होती. तिचे समग्र स्वरूप श्रीगुरूजींनी समर्थपणे उलगडून दाखविले. अफाट वाचन व सखोल चिंतन, आध्यात्मिक साधना व गुरूकृपा, मातृभूमीसाठी नि:स्वार्थ समर्पणशीलता, समाजासंबंधीची अथांग आत्मीयता, माणसे जोडण्याचे अनुपम कौशल्य इत्यादी गुणांमुळे संघटना तर यांनी सर्वत्र पुष्ट केलीच, पण सर्व क्षेत्रांत देशाचे परिपक्व वैचारिक मार्गदर्शनही केले. भारताचे राष्ट्रस्वरूप, त्याचे नियत जीवनकार्य आणि आधुनिक काळी त्यांच्या पुनरूत्थानाची वास्तविक दिशा यासंबंधीचे त्यांचे कसदार विचार म्हणजे देशाचे थोर विचारधन ठरले आहे.

असे हे एक अलौकिक आणि ऋषितुल्य जीवन. आध्यात्मिक दृष्टीने योगारूढ पण समष्टिरूप भगवंताच्या पावन अर्चनेसाठी लौकिकात वावरलेले. एकांतप्रिय व मुक्त, पण विहित कर्तव्याच्या वेधाने लोकांतात सक्रिय झालेले. विलक्षण प्रतिभाशाली राष्ट्रजीवनाच्या अंगोपांगांचा आदर्शवादी वेध घेणारे. संघाच्या विशुध्द आणि प्रेरक राष्ट्रविचारांचे लोण राष्ट्रजीवनाच्या अंगोपांगात पोहोचविल्याविना समर्थ, आत्मविश्वाससंपन्न आणि नियत जीवनकार्य पार पाडण्याची क्षमता असलेला भारतवर्ष उभा व्हावयाचा नाही, या तळमळीने त्यांनी कितीतरी कार्यक्षेत्रे प्रेरित केली. विश्व हिंदू परिषद, विवेकानंद शिला स्मारक, अ.भा. विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, वनवासी कल्याणाश्रम, शिशुमंदिरे आणि विविध सेवासंस्था यांमागे प्रेरणा श्रीगुरूजींचीच. राजकीय क्षेत्रातही डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना पं.दीनदयाळजींसारखे अनमोल रत्न त्यांनी दिले. तात्कालिक आपत्तींच्या निवारणार्थ त्या त्या वेळी निरनिराळया समित्या स्थापून त्यांनी काम करवून घेतले. स्वत:ला कोणत्याही असक्तीचा किंवा ईर्षेचा

कधी स्पर्श होऊ दिला नाही. त्यामुळे श्रीगुरूजींच्या वैचारिक मार्गदर्शनाचा एक व्यापक ठसा आपल्या राष्ट्रजीवनावर उमटला आहे. राष्ट्रविचार जीवनदृष्टी आणि जीवननिष्ठा यांचे उपकारक वरदान ज्यांनी श्रीगुरूजींच्या कार्यकालात ग्रहण केले अशी सहस्रावधी माणसे आज देशभर उभी आहेत. अराष्ट्रीय व सदोष विचारपध्दतीच्या गाजावाजाने पूर्वी प्रभावित झालेली माणसेही भ्रमनिरास होऊन संघाच्या विचारधारेकडे वळताना दिसत आहेत. संघाला करण्यात येत असलेले गलिप्रदान व उच्चतम शासकीय पातळीवरून देखील संघाविरूध्द हेतुपुरस्सर करण्यात येणारा अपप्रचार वांघोटा, किंबहुना अशा अपप्रचारकांवरच उलटणारा ठरत आहे. श्रीगुरूजींनी आपले जे अतिप्राचीन सांस्कृतिक राष्ट्रस्वरूप विरोधाची तमा न बाळगता निर्भयपणे व छातीठोकपणे सतत सांगितले, त्याचाच हा परिणाम होय. श्रीगुरूजी केवळ बोलले नाहीत तर विशुध्द राष्ट्रनिष्ठेची माणसे त्यांनी उभी केली, हा त्यांचा विशेष. अपप्रचारामुळे श्रीगुरूजी अनेकदा वादविषय बनले. त्यांच्या अनेक मतांचे विकृतीकरण करून राजकीय भांडवल पैदा करण्याचा हितसंबंधी लोकांनी प्रयत्न केला. पण 'घृष्टं घृष्टं पुनरपि पुनः चंदनं चारूगन्धम्' या न्यायाने त्या विचारांचा सुगंध अधिकाधिक प्रमाणात दरवळत आहे. टीकेमुळे श्रीगुरूजी कधी विचलित वा प्रक्षुब्ध झाले नाहीत. पातळी त्यांनी कधी सोडली नाही. द्वेषभावनेचा उदय त्यांच्या विमल चित्तात कधी झाला नाही. कोणाचे वाईट त्यांनी कधी चिंतले नाही. हिंदू जीवनविचार आणि त्या विचारांचे मूर्त प्रतीक असलेल्या हिंदूराष्ट्राच्या पुनरूत्थानाचे उद्दिष्ट यांपासून ते कधी ढळले नाहीत. व्यवहारात अतिशय स्नेहशील असलेले श्रीगुरूजी तत्वाच्या बाबतीत विलक्षण आग्रही होते. आत्मविस्मृतीकडे व आत्मावमानाकडे नेणारी किंवा राष्ट्रीय श्रेयात बाधा आणणारी तडजोड त्यांना कधीच मान्य झाली नाही.

अशा व्यक्तिमत्वासंबंधी वाढती जिज्ञासा लोकांत निर्माण व्हावी, हे स्वाभाविकच होय. श्रीगुरूजींनी कर्करोगाने पोखरून टाकलेल्या आपल्या कुडीचा त्याग केला, त्याला आता चोवीस वर्षे उलटली आहेत. समस्त संघस्वयंसेवकांच्या अत:करणात तर श्रीगुरूजींची प्रेरक स्मृती टवटवीत आहेच, पण देशातही अशी परिस्थिती निर्माण होत आहे की श्रीगुरूजींनी त्या त्या वेळी द्रष्टेपणाने केलेल्या मतप्रदर्शनाचे उत्कटतेने स्मरण व्हावे. त्या त्या देशातील राष्ट्रीय समाज व त्याची गुणवत्ता हा राष्ट्रीय गौरवाचा आधार असतो. केवळ शासनसत्तेतील बदलाने ही गुणवत्ता निर्माण होत नाही. सातत्याने चरित्र्यगुणांचे संस्कार करणारी व्यवस्था देशात आवश्यक असते, हा विचार श्रीगुरूजी आग्रहपूर्वक मांडीत असत. त्याचे प्रत्यंतर आणीबाणीनंतरच्या कालखंडात आपण घेतले. सर्व कामे व इष्ट परिवर्तन यांचा कैंद्रबिंदू 'माणूस' हा आहे. माणूस धड नसेल तर चांगल्या योजना व व्यवस्था यांचाही तो चुथडा करून टाकतो. भारतीय राज्यघटनेसंबंधी जो वाद सुरू आहे, त्याच्या संदर्भात श्रीगुरूजींचा मानवी गुणवत्तेवरील भर विलक्षण अर्थगर्भ वाटतो. डॉ. हेडगेवार आणि श्रीगुरूजी या दोन कर्तुत्ववान व ध्येयसमर्पित महापुरूषांचा वारसा घेऊनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला तृतीय सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांनी विकासाच्या किंवा संपूर्ण समाजाशी एकरूप करण्याच्या नव्या टप्प्यावर नेले आहे. या तिघांत वैचारिक दृष्टया काही अंतर असल्याचे भासविण्याचा प्रयत्न अनेकांनी करून पाहिला. या भ्रामक प्रचाराचा निरास खुद्द श्री. बाळासाहेबांनीच अनेकवार केलेला आहे. श्रीगुरूजींची निवड डॉक्टरांनी केली होती व माझी निवड श्रीगुरूजींनी केलेली आहे, यातच सर्व काही आले, असे त्यांनी सांगितलेले आहे.

श्रीगुरूजींचे समग्र चरित्र लिहावयाचे म्हणजे मोठाच ग्रंथ होईल. श्रीगुरूजींच्या जीवनाचा आणि विचारांचा स्थूल आराखडा संक्षेपाने जिज्ञासूंना सादर करावा, एवढयाच मर्यादित उद्देशाने हा अल्पसा प्रयत्न आहे. तसा विचार केला, तर वैयक्तिक वा खासगी असे श्रीगुरूजींच्या संघजीवनात काही नव्हतेच. डॉक्टरांनी जसा व्यक्तिगत प्रपंच किंवा संसार उभा केला नाही, तसाच तो गुरूजींनीही केला नव्हता. संघाचा आणि पर्यायाने राष्ट्राचा संसार त्यांनी आपला मानला. विराट समाजपुरूष हाच त्यांच्या ईश्वरनिष्ठ जीवनात भगवंतस्वरूप बनला. त्याचीच निष्काम सेवा त्यांनी जीवनभर भक्तिभावाने केली. गीतेतील कर्मयोग ते जगले. संघविचार व मातृभूमीला गौरव प्राप्त करून देण्यासाठी पौरूष प्रयत्नांची शर्थ याच गोष्टींशी त्यांचे ६७ वर्षांचे आयुष्य निगडित आहे. ज्या देहाकडून ही सेवा घडू शकत नाही, त्या देहाचा मोह त्यांच्या चित्ताला कधी स्पर्श करू शकला नाही. "कर्करोग आपले काम करतो आहे. मला माझे अंगीकृत कार्य केलेच पाहिजे." असे ते हसून म्हणत. विरागी पण कर्तव्यप्रवण असे श्रीगुरूजींचे कृतार्थ जीवन. त्याची केवळ धावती ओळख आगामी पृष्ठांत करून द्यावयाची आहे. विस्ताराने त्यांच्यासंबंधी लिहिण्यासाठी एखादी समर्थ लेखणी कधी उचलली जाईल ती जावो.

## २. शिक्षण आणि संस्कार

धनवंत आणि कीर्तिमंत कुटुंबात जन्म झाल्यामुळे कित्येकांना मोठेपणाचे वलय जन्मत:च लाभते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कोणत्याही सरसंघचालकाला घराण्याच्या मोठेपणाची ही पार्श्वभूमी लाभली नाही. श्रीगुरूजींचा जन्म एका अत्यंत सामान्य अवस्थेतील कुटुंबात झाला. मुळात श्रीगुरूजींचे घराणे कोकणातील 'गोळवली' गावच्या पाध्यांचे. देशावर आलेल्या पाध्यांपैकी आधी पैठणला व नंतर नागपूरला आले ते श्रीगुरूजींचे आजोबा श्री. बाळकृष्णपंत. या स्थानांतरात 'पाध्येपण' लोपले व तो व्यवसाय सुटल्यामुळे आडनाव 'गोळवलकर पाध्ये' असे होते, ते केवळ गोळवलकर' असे उरले. श्रीगुरूजींचे वडील श्री. सदाशिवराव यांना लहानपणीच पितृवियोग घडला. शिक्षण अर्धवट सोडून उपजीविकेसाठी नोकरी करणे भाग पडले. दारिद्र्यातील कष्ट व प्रपंचायतील यातना यांना अनेक वर्षेपर्यंत तोंड द्यावे लागले. नागपूरजवळच कामठी येथे तार व टपाल खात्यात श्रीगुरूजींच्या वडिलांची नोकरी होती. श्रीगुरूजींचे मातुल घराणे नागपूरच्याच रायकरांचे. आईचे नाव लक्ष्मीबाई. व्यवहारात श्रीगुरूजींच्या वडिलांना भाऊजी व मातोश्रींना ताई म्हणत. ताई-भाऊजी दांपत्याला एकूण चार पुत्ररत्नांचा लाभ झाला.पण पहिले दोन पुत्र एकेक वर्षाचे होताच काळाने त्यांना हिरावून नेले. आधीच कष्टमय असलेल्या प्रपंचात तेही सुख परमेश्वराने ठेवले नाही. तिसऱ्या पुत्राचे नाव 'अमृत' ठेवले. हा मुलगा पूर्वीच्या दोन मुलांइतका अल्पायु झाला नाही. वयाच्या पंधराव्या वर्षी सन्निपाताच्या दुखण्यात त्याचा मृत्यु झाला.

अमृतच्या पाठीवर श्रीगुरूजींचा जन्म माघ कृष्ण एकादशी (विजया एकादशी) शके १८२७ ला (विक्रम संवत् १९६२) झाला. इंग्रजी दिनांक १९ फेब्रुवारी १९०६. वेळ पहाटे साडेचारची. घर नागपुर येथील श्री. रायकरांचे. अमृतच्या या धाकटया भावाचे नाव माधव असे ठेवण्यात आले. पण घरातील मंडळी प्रमाने त्याला 'मधू' म्हणत व श्रीगुरूजी लहान असताना तेच नाव प्रचलित होते. भाऊजी-ताई यांच्या नऊ अपत्यांपैकी मधूच तेवढा शिलक राहिला आणि मातापित्यांच्या भावी आशांचे केंद्र बनला. मधू अगदी लहान म्हणजे दोन वर्षाचा असतांनाच श्री. भाऊजींनी डाक-तार विभागातील नोकरी सोडली व आवडीच्या शिक्षकी पेशात ते शिरले. पण ही नोकरी मध्यप्रदेशच्या महाकोशल विभागात अगदी अंतर्भागामध्ये सरायपली येथील शाळेत होती. सरायपलीपासुन रायपूर व रायगढ ही दोन्ही शहरे दूर. एक ९० मैलांवर, तर दुसरे ६० मैलांवर. जायचे म्हणजे पायवाटेने चालत वा घोडयावर स्वार होऊन. आजच्या परिभाषेत आपण ज्याला अतिशय मागासलेला व आधुनिक सुधारणांपासून तुटलेला भाग म्हणू, अशा भागात लहानगा मधू येऊन पडला. पण एखादे जीवन उत्तम घडवायचेच असेल तर प्रतिकूलतेवर मात करणाऱ्या काही अनुकूलता परमेश्वर देतो. त्याचा लाभ घेण्याची धारणा मात्र हवी. ही धारणा शैशवावस्थेतही मधूच्या ठायी दिसली हे विशेष. मातापित्यांनी जे जे चांगले दिले, ते त्याने तत्परतेने ग्रहण केले. भाऊजी हे ताठ कण्याचे, ज्ञानदानाची आस्था असलेले, सच्चरित्र शिक्षक होते, तर ताई या अत्यंत धर्मपरायण सुगृहिणी आणि सुमाता होत्या. मधू दोन वर्षांचा असतानाच त्याचे पाठांतर सुरू झाले. भाऊजींनी शिकवावे आणि मधूने ते सहज कंठस्थ करावे. ताईंचे शालेय शिक्षण झालेले नव्हते. पण संस्कारक्षम कथांचे भांडार त्यांच्याजवळ विपुल होते. ते सारे भांडार उत्कृष्ट स्मरणशक्ती असलेल्या मधूला लाभले. लहानपणी आपल्यावर कशा प्रकारे संस्कार झाले, याचा उलेख उत्तरायुष्यात श्रीगुरूजींनीच पुणे येथील एका भाषणात केला होता. ते म्हणाले होते, "माझे बालपण

डोळयांपुढे आले म्हणजे हळुवार आणि मधुर स्मृतींनी माझे मन भरून येते. पहाटे मला झोपेतून उठविण्यात येई. त्यावेळी माझी आई एकीकडे हाताने घरातील कामकाज करता करता तोंडाने एखादे स्त्रोत्र म्हणत असे वा देवाचे नाव घेत असे. ते मंजुळ स्वर माझ्या कानांवर पडत. सकाळच्या शांत, प्रसन्न वेळी कानांवर येणाऱ्या त्या मधुर स्वरांनी माझ्या बालमनावर किती खोल आणि पवित्र ठसा उमटविला असेल?"

कुशाग्र बुध्दी, ज्ञानाची भूक, असाधारण स्मरणशक्ती, इतरांची दु:खे व अडचणी दूर करण्यासाठी स्वत: झिजण्याची प्रवृत्ती, पराकाष्ठेचा सोशिकपणा, निरहंकारिता आणि चित्ताची निर्मलता अशा अनेकविध गुणांचा प्रकर्ष 'माधवा' च्या बाल्यकाळातील विविध घटनांवरून प्रत्ययास येतो. कित्येक गुण उपचत असले तरी योग्य दिशेने त्यांचा विकास करण्याची ओढही असावी लागते. अशी ओढ माधवाच्या ठायी होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दायित्व श्रीगुरूजींवर येऊन पडले, त्यानंतर त्यांच्या गुणसमृध्दतेची ओळख लोकांना मोठया प्रमाणावर झाली. पण या बहुतेक गुणविशेषांचे संवर्धन त्यांच्या विद्यार्थिदशेतच झालेले होते हे त्यांच्या चरित्रावरून दिसते. उदाहरणार्थ, अफाट वाचन, स्तिमित करून सोडणारे पाठांतर आणि हिंदी व इंग्रजी भाषांवरील प्रभुत्व हे कोणाच्याही ध्यानात येणारे गुण घ्या. त्यांच्या वाचनाच्या कक्षा प्राथमिक शाळेत ते शिकत होते, तेव्हापासुनच विस्तारलेल्या होत्या. नाना प्रकारची पुस्तके वाचण्याचा त्यांचा झपाटा दांडगा होता. माध्यमिक शाळेत असतांनाच आंग्ल नाटककार शेक्सपिअर याची सारी नाटके त्यांनी वाचली होती. या नाटकांच्या कथा रोचकपणे ते आपल्या सहाध्यायांना सांगत असते. वर्गात एकीकडे शिक्षक पाठयपुस्तके शिकवीत असता अवांतर पुस्तकांचे त्यांचे वाचन चालू असे. पण वर्गात काय चालले आहे, याकडेही ते त्याच वेळी अवधान ठेवती असत. वर्गात बसल्या बसल्या माधव अवांतर पुस्तकाचे वाचन करतो याचा अर्थ अभ्यासाकडे त्याचे लक्ष नाही, असा त्यांच्या शिक्षकांनी केला. एकदा त्याची कानउघाडणी करण्याची संधी मिळावी म्हणून शिक्षकांनी दुसऱ्या विद्यार्थ्याचे पाठयपुस्तकातील धडयाचे वाचन चालू असतानाच त्याला थांबवून माधवला पुढे वाचण्यास सांगितले. माधवने शांतपणे पुस्तक हाती घेतले व आपल्या वर्गबंधूने जेथे वाचन थांबविले होते त्या नेमक्या वाक्यापासून पुढे वाचावयास प्रारंभ केला. शिक्षक थक्क झाले व आपल्या या शिष्योत्तमाची हजेरी घेण्याची संधी काही त्यांना लाभली नाही ! प्राथमिक शाळेत असतानाच भाऊजींनी माधवला इंग्रजीचे पाठ देण्यास प्रारंभ केला होता. माधवची प्रगती एवढी झाली की प्राथमिक चौथ्या इयत्तेत असताना तो नागपूरला आपल्या मामांना इंग्रजीत पत्रे लिहीत असे. वडिलांची नोकरी हिंदीभाषी प्रदेशात होती व वारंवार बदल्या होत गेल्यामुळे रायपूर, दुर्ग, खांडवा वगैरे अनेक ठिकाणचे पाणी माधवला चाखावयास मिळाले. या अवधीत हिंदी भाषेशी त्याचा चांगला परिचय झाला. मातृभाषा म्हणून मराठीचे ज्ञान होतेच. अनेक ठिकाणी वावरल्याचा आणखी एक परिणाम असा झाला की, भिन्न भिन्न भाषा बोलणाऱ्या लोकांच्या संपर्कात ते आले. मनाचा संकुचितपणा राहिला नाही व सर्व भारतीय भाषा आपल्याच मानण्याची बैठक सिध्द झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक म्हणून अगणित भाषणे श्रीगुरूजींना आयुष्यभर करावी लागली. त्यांचे वक्तृत्व अत्यंत ओजस्वी, स्फूर्तिप्रद आणि कसदार होते. या वक्तृत्वगुणाची जोपासनाही शालेय जीवनातच झाली. विषयाची परिश्रमपूर्वक तयारी करून वक्तृत्वस्पर्धेत पहिल्या क्रमांकाचे बक्षीस पटकावण्याचा विक्रम त्यांनी बालवयातच केला होता. खूप खेळावे, घरी आपल्या वाटयाला येणारी सारी कामे आनंदाने करावीत, इतरांच्या सुखदु:खांशी सहजपणे समरस व्हावे, असा हा शालेय जीवनाचा काल त्यांनी सार्थकी लावला. भावी कर्तृत्वसंपन्न जीवनाची पायाभरणी याच काळात झाली.

पुढे एकदा श्रीगुरूजींच्या वडिलांनी असे उद्-गार काढले की, "माधव कोणी तरी मोठा व कर्तबगार माणूस होणार हे त्याच्या शालेय जीवनात दिसलेल्या गुणवत्तेवरून वाटत होते. पण तो एवढा मोठा होईल, याची कल्पना मात्र त्यावेळी आली नाही. नऊ अपत्यांपैकी एकटा माधवच उरला याचेही आता दु:ख नाही. कारण संघस्वयंसेवकांच्या रूपाने हजारो मुलेच जणू देशभर आम्हाला लाभली आहेत." हे बोलताना श्री. भाऊजींच्या मुखावर आपल्या अलौकिक पुत्रासंबंधीचा अभिमान प्रकटला होता व धन्यतेच्या भावनेचे पाणी त्यांच्या नेत्रांत तरारले होते. पण हेही ध्यानात ठेवले पाहिजे की, करारीपणा, नि:स्पृहपणा, कर्तव्यनिष्ठा, धर्मनिष्ठा परिश्रमशीलता आणि ज्ञानोपासनेची आवड हे जे गुण श्रीगुरूजींच्या जीवनात प्रकटले, ते मातापित्यांच्या जिवंत आदर्शामुळे. या थोर आदर्शाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख श्रीगुरूजींनी अनेकवार केलेला आहे. श्री. भाऊजींची चिकाटी व निर्धार यांची कल्पना एकाच गोष्टीवरून येऊन जाईल. शिक्षकी पेशा पत्करला तेव्हा भाऊजी केवळ मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालेले होते. मध्ये बराच काळ गेलेला होता. पण त्यांनी पदवीधर व्हावयाचे ठरविले. मॅट्रिकनंतर वीस वर्षांनी इंटरमीजिएट परीक्षा ते उत्तीर्ण झाले व पदवीधर होण्यास त्यांना आणखी सात वर्षे लागली. नोकरी त्यांनी चोख बजावली, पण अवांतर वेळात ज्ञानदानाचे कार्य अविरतपणे केले. मातु:श्री ताईंची जिद्द तर एवढी की १९३४ साली त्यांनी श्रीबाबाजी महाराज नामक सत्पुरूषाबरोबर प्रयाग ते आळंदी अशी हजार मैलांची पदयात्रा केली व संगमाच्या पवित्र गंगाजलाने ज्ञानेश्वरांच्या समाधीला स्नान घातले. या प्रवासात एका अपघातात सारी पाठा भाजून निघाली असताही सारी वेदना शांतपणे पचवून त्या चालत राहिल्या होत्या.

वडिलांच्या जसजशा बदल्या होत तसतशा शाळा बदलत. माधवरावांनी १९२२ साली चांदा (आता चंद्रपूर) येथील ज्युबिली हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. श्री. भाऊजींची इच्छा माधवरावांनी मेडिकल कॉलेजात प्रविष्ट होऊन डॉक्टर बनावे अशी होती. म्हणून पराकाष्ठेचा आर्थिक ताण सोसण्याची तयारी ठेवून त्यांनी माधवरावांना पुण्याच्या ख्यातनाम फर्गुसन महाविद्याल्यात विज्ञानशाखेत प्रवेश घ्यावयास लावला. इंटर झाल्यानंतर मेडिकल कॉलेजात प्रवेश मिळण्यासारखा होता. पण याच सुमारास मुंबई सरकारने एक फतवा काढून केवळ मुंबई राज्यातील स्थायी रहिवाश्यांपुरताच कॉलेज-प्रवेश मर्यादित केला. मध्यप्रांत आणि वऱ्हाड हा त्यावेळी मुंबई राज्यात मोडत नसल्यामुळे केवळ तीन महिन्यांतच माधवरावांना पुणे सोडून नागपूरला परतावे लागले. माधवरावांना डॉक्टर बनविण्याचे श्री. भाऊजींचे स्वप्न साकार होऊ शकले नाही. नागपूरला परतल्यावर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालविलेल्या हिस्लॉप कॉलेजात विज्ञानशाखेमध्ये त्यांनी प्रवेश घेतला आणि १९२४ मध्ये इंटरची परीक्षा त्यांनी विशेष प्राविण्य दाखवून उत्तीर्ण केली. विज्ञानाचे विद्यार्थी असूनसुध्दा इंग्रजी या विषयात त्यांनी पारितोषिक पटकाविले. कॉलेज जीवनाच्या या पहिल्या दोन वर्षांत उत्कृष्ट खेळाडू आणि व्यासंगी व बुध्दिमान विद्यार्थी म्हणून लौकिक त्यांनी मिळविला. या काळातील एक घटना अशी की, प्राचार्य गार्डिनर यांनी शिकविण्याच्या ओघात बायबलमधील काही संदर्भ दिला. हे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी  चालविलेले कॉलेज असल्यामुळे बायबलचे अध्ययन तेथे आवश्यक मानले जात असे. त्यासाठी स्वतंत्र वेळ राखून ठेवला जात असे. माधवरावजींनी बायबल मनापासून व लक्षपूर्वक वाचले होते. त्यांची स्मरणशक्ती फार तलख होती. सरसंघचालक झाल्यावरही त्यांच्या भाषणात आणि चर्चेत बायबलमधील अनेक संदर्भ येत. येशू ख्रिस्ताच्या जीवनातील अनेक घटना व त्यांची अनेक वचने ते उद्-घृत करीत आधुनिक ख्रिस्तानुयायी म्हणविणारा समाज ख्रिस्ताच्या मूळ शिकवणुकीपासून किती दूर गेला आहे यावर ते नेमके बोट ठेवीत. येशू ख्रिस्तासंबंधी अनादराचा एक

शब्दही त्यांच्या तोंडून कधी बाहेर पडला नाही. फसवून वा प्रलोभनाने लोकांना ख्रिस्ती बनविणाऱ्या, राष्ट्रधर्मापासून अशा धर्मांतरितांना दूर नेणाऱ्या व भारतीयांत नाना कलहबीजे पेरणाऱ्या ख्रिस्ती धर्मप्रचारकांवर मात्र ते कोरडे ओढीत. असो. प्राचार्य गार्डिनर यांनी दिलेला संदर्भ चुकीचा आहे असे माधवरावजींना वाटले व त्यांनी उभे राहून तसे स्पष्टपणे सांगितले. जो उतारा या संदर्भात अभिप्रेत होता तो घडाघडा म्हणून दाखविला. प्राचार्य महाशय चमकले, पण आपल्यापेक्षा या विद्यार्थ्याचा बायबलचा अभ्यास अधिक चांगला आहे हे त्यांना एकदम कसे मान्य व्हावे त्यांनी लगेचच बायबलची प्रत मागविली व मुळातून सगळा संदर्भ पाहिला. माधवरावांनी घेतलेला आक्षेप बरोबर होता आणि आपलीच गफलत झाली होती, हे त्यांना पटले तेव्हा त्यांनी खिलाडूपणाने माधवरावांना शाबासकी दिली. या दोन वर्षांच्या काळात, प्रसंगी कॉलेजमधील तासांना दांडी मारूनही, माधवरावांनी चौफेर वाचन चालूच ठेवले होते. शाळेत काय, किंवा कॉलेजात काय, केवळ परिक्षेतील यशासाठी अध्ययन करावे, ही त्यांची वृत्तीच नव्हती. ज्ञानार्जनाची तीव्र भूक शमविण्यासाठी ते वाचत असत. वाचनाच्या छंदापायी अभ्यासाची उपेक्षा मात्र त्यांनी कधी होऊ दिली नाही. सुप्रसिध्द अंध बासरीवादक श्री. सावळाराम यांच्याबरोबर जुळलेल्या मैत्रीमुळे बासरीवादनाचा छंदही त्यांना याच काळात जडला.

इंटरमीजिएटची परीक्षा झाल्यावर माधवरावजींच्या जीवनातील एका नव्या आणि दूरपरिणामी अध्यायाला प्रारंभ झाला. या अध्यायाचा प्रारंभ होतो, बनारसच्या हिंदू विश्वविद्याल्यात त्यांनी घेतलेल्या प्रवेशापासून.

## ३. काशीतील वास्तव्य

बनारस येथे महामना पं. मदन मोहन मालवीय यांनी स्थापन केलेले आणि अनुपम कर्तृत्वाने उभारलेले हिंदू विश्वविद्यालय म्हणजे त्या काळी देशभरातील युवकांना आकर्षून घेणारा आगळा वेगळा प्रकल्प. १९१६ साली हे विश्वविद्यालय स्थापन झाले व ज्ञानार्जनाच्या भावनेने सर्व प्रांतांचे आणि भाषांचे विद्यार्थी हजारोंच्या संख्येने तेथे दाखल झाले. मालवीयजींनी प्राचीन गुरूकुलाच्या धर्तीवर हा एक आधुनिक आश्रमच उभा केला होता, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. मालवीयजींचा उद्देशच मुळी हिंदू तत्त्वज्ञान, विद्या आणि कला यांची ज्योत पुन्हा प्रकाशमान करण्याचा आणि हा वारसा नवनवीन पिढयांना देण्याचा होता. सर्व अंगांनी हे विद्यापीठ परिपूर्ण व्हावे यासाठी मालवीयजींनी फार परिश्रम घेतले. या विद्यापीठात माधवराव गोळवलकर हे बी.एस्सी. चे विद्यार्थी म्हणुन प्रविष्ट झाले. एक लक्ष ग्रंथ असलेले ग्रंथालय, रम्य वृक्षराजी, गंगेचा रमणीय किनारा, वातावरणाची निर्मलता व आरोग्यप्रदता, सुसज्ज प्रयोगशाळा, विशाल क्रीडांगणे, उत्कृष्ट व्यायामशाळा वगैरेंमुळे हा परिसर माधवरावांना खूपच आवडला. १९२६ साली त्यांनी बी.एस्सी.ची व १९२८ साली प्राणिशास्त्र विषय घेऊन एम्.एस्सी. ची परीक्षा उत्तमप्रकारेउत्तीर्ण केली. कॉलेजमधील ही चार वर्षे त्यांनी कशाप्रकारे घालविली याचे एका वाक्यात उत्तर द्यावयाचे तर असे म्हणावे लागेल की मन:पूर्वक अध्ययन तर त्यांनी केलेच, पण आपल्या अंत:प्रवृत्तीनुसार आध्यात्मिक जीवनाकडे ते अधिक केले. विद्यापीठाच्या ग्रंथाल्याचा उपयोग माधवरावांएवढा अन्य कोणी या काळात केला असेल किंवा नाही याची शंकाच आहे. संस्कृत महाकाव्ये, पाश्चात्य तत्त्वज्ञान, श्रीरामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांचे ओजस्वी विचारधन, भिन्नभिन्न उपसानापंथांचे प्रमुख ग्रंथ, तसेच शास्त्रीय विषयांवरील नानाविध पुस्तके यांचे वाचन त्यांनी आस्थापूर्वक केले. वेळ कधी वाया घालविला नाही. त्यांचे हे वाचनाचे व्यसन एवढे जबरदस्त होते की, बी.एस्सी.च्या वर्गात असतांना झालेल्या प्रदीर्घ दुखण्यातही त्यांच्या हातातील पुस्तक कधी सुटले नाही. एकीकडे ताप अंगात फणफणत असतानाच दुसरीकडे कण्हण्याकुंथण्याऐवजी त्यांचे वाचन चालू असावयाचे. वाचनाचे वेग अतिशय जलद असावयाचा. मोठे मोठे ग्रंथदेखील एकेका दिवसात वाचून ते हातवेगळे करीत. वाचनासाठी जाग्रण करण्याचे तर त्यांच्या अगदी अंगवळणीच पडून गेले होते. अनेकदा सायंकाळी खेळाच्या मैदानावर जाऊन आल्यावर खाणे-पिणे आटोपून ते जे वाचावयास बसावयाचे ते अगदी पहाट होईपर्यंत. मग थोडीशी झोप घेऊन पुन्हा उत्साहाने आणि प्रसन्न मुद्रेने दिवसभराच्या साऱ्या कामासाठी सिध्द ! त्यांच्या खोलीत जाणाराला सगळीकडे पुस्तकेच पुस्तके विखुरलेली दिसावयाची. आध्यात्मिकतेकडे त्यांचा ओढा होता व नागपूरला हिस्लॉप कॉलेजमध्ये असतांनाच सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. मुळे यांच्याकडे हिंदू शास्त्रग्रंथांच्या अभ्यासार्थ ते जात. काशीला अध्यात्मचर्चा, वेदांत ग्रंथांचे वाचन, चिंतन, मनन व मालवीयजींचा सहवास, याचा दृश्य परिणाम माधवरावांच्या जीवनावर झाला. थोडीफार ध्यानधारणा, आसन, प्राणायाम, व्यक्तिगत ऐहिक जीवनासंबंधी उदासीनता, समष्टीच्या सुखदु:खांचा आत्मीयतापूर्ण विचार इत्यादी स्वरूपात हा परिणाम दिसू लागला. स्वत:च्या भावी जीवनासंबंधीचे विचार याच काळात त्यांच्या मनात येऊ लागले असतील, अशीही शक्यता आहे. विद्यार्थिदशेची ही चार वर्षे आर्थिक अडचणीतच त्यांना काढावी लागली. पण भौतिक अडचणीमुळे त्यांच्या ठायी व्यग्रता आल्याचे कधी कोणी पाहिले नाही.

श्रीगुरूजींच्या संघमय उत्तरायुष्याचीच केवळ ओळख ज्यांना आहे, त्यांना त्यांच्या पूर्वायुष्यातील काही गोष्ट मोठया अंचब्याच्या वाटतील. मोठेपणी श्रीगुरूजींचा आहार अत्यंत अल्प होता हे सगळयांना ठाऊक आहे. आहार कमी म्हणजे किती कमी असावा? कलकत्त्याचा प्रसंग आहे. तिथे एका प्रसिध्द डॉक्टरांकडून श्रीगुरूजींची वैद्यकीय तपासणी करून घेण्यात आली. डॉक्टरांना आढळले की, सामान्यत: प्रकृती बरी असली तरी रक्तदाब फार कमी होता. म्हणून डॉक्टरांनी आहाराबद्दल पृच्छा केली. तपशील कळल्यावर त्यांनी कॅलरीजचा हिशोब केला. श्रीगुरूजी किती परिश्रम करतात याचाही अंदाज घेतला आणि आश्चर्याचा धक्का बसल्याप्रमाणे ते उद्-गारले, "हे कसे शक्य आहे? एवढया थोडया कॅलरीजवर तुम्ही कसे जिवंत राहू शकता? I can't believe you are alive!" यावर श्रीगुरूजींसह सारेच जण हसू लागले. श्रीगुरूजी मिश्किलपणे म्हणाले, "पण मी आहे हे तर सत्य आहे ना?" त्यांच्या या मिताहाराचे मर्म त्यांच्या अंत:करणातील अथांग करूणेत होते. कोटयावधी देशबांधव अन्नाला मोताद असता आपण खाद्यपदार्थांवर ताव मारीत बसणे त्यांना मुळीत रूचत नसे. जगण्यासाठी आवश्यक तेवढेच ते खात. खर्चिक आहार व औषधोपचार त्यांनाही ते नकार देत. अगदी सामान्य जनांप्रमाणे साधेपणाने राहत.

पण किशोरावस्थेत व तारूण्यात श्रीगुरूजींनी भरपूर व्यायाम केलेला होता. त्यांचा आहारही चांगला असे. काशीला असताना पोहून गंगा पार करणे हा त्यांचा आवडीचा छंद होता. व्यायामशाळेत जाऊन लाठी-काठी, दंड-बैठक वगैरे व्यायाम ते घेत. मल्लखांबावरील कसरती ते शिकले होते आणि त्यांत प्रवीण्य झाले होते. एकदा व्यायामशाळेत एक बंगाली मुलगा मल्लखांबाकडे पाहत उभा असलेला त्यांना दिसला. गुरूजींनी त्याला विचारले, "काय पाहतोस? शिकायचा आहे का मल्लखांब?" आणि त्याला लंगोट कसावयास लावून मल्लखांबाचे धडे दिले. कॉलेजात शिकविणाऱ्या शिक्षकाचे हे कसब पाहून तो मुलगा आ   चर्यचकित होऊन गेला. व्यायामाने श्रीगुरूजींचे शरीर काटक बनले होते. पुढे संघकार्यनिमित्त जे अनियमित आयुष्य त्यांना जगावे लागले त्यात पूर्वायुष्यतील या अभ्यासाचा व नंतरच्या योगसाधनेचा त्यांना कार्यक्षम राहण्यासाठी फार उपयोग झाला.

कोणाला सांगितले तर विश्वास बसावयाचा नाही की एकेकाळी त्यांचा आहारर भरपूर होता व कधी कधी ते अगदी पैज लावून जेवत. एकदा पोटभर जवेल्यावर पुन्हा तेवढेच जेवण्याची किमयाही ते करीत. नागपूरनजीकच्या काटोल या गावची गोष्ट आहे. तिथे एका मित्राकडे श्रीगुरूजी गेले होते. जेवणखाण आटोपूनच ते बाहेर पडले होते. पण या मित्राकडे मात्र जेवणाचीच वेळ होती. मित्राने व त्याच्या पत्नीने फार आग्रह केला जवेणाचा. तेव्हा श्रीगुरूजी पानावर बसले आणि सगळा स्वयंपाक फस्त केला ! मित्र-पत्नी आणखी पोळया करण्यासाठी कणीक भिजवू लागली तेव्हा मात्र नको म्हणून हात धुण्यास उठले. काशी हिंदू विश्वविद्याल्यात शिकत असताना श्रीगुरूजींनी केलेल्या अनेक लिला ऐकावयास मिळतात.

श्रीगुरूजी ज्ञानाचे भोक्ते होते. विद्यार्थ्यांनी किंवा शिक्षकांनी गाईडसचा उपयोग करणे त्यांना आवडत नसे. एकदा एका शिक्षकाने गाईडचा वापर करून शिकविले. चुकीचा अर्थ सांगितला. हे उठून उभे झाले व अर्थ चुकीचा सांगितला गेल्याचे त्यांनी शिक्षकांच्या निदर्शनाला आणून दिले. शिक्षकांनी गाईडचा आधार दिला. पण श्रीगुरूजींनी ठणकावून सांगितले की, "असे असेल तर गाईडमध्ये देण्यात आलेला अर्थही चूकच म्हणावा लागेल." एवढे म्हणूनच ते थांबले नाहीत, तर पुढे म्हणाले, "गाईडवरून चुकीचे शिकवणाऱ्या शिक्षकाच्या हाताखाली शिकण्याची माझी मुळीच इच्छा नाही !" हे प्रकरण

मुख्याध्यापकांकडे गेले. अर्थ चुकला असल्याचे त्यांच्या ध्यानात आले. त्यांनी त्या शिक्षकाकडून तो विषय काढून घेतला. श्रीगुरूजींना त्यांनी सांगितले, "अरे, शिक्षकाचा वर्गात असा अपमान करू नये."

एम्.एस्सी.ची परीक्षा उत्तीर्ण केल्यावर त्यांनी संशोधनपर प्रबंध लिहिण्यासाठी मत्स्य-जवन हा विषय निवडला व या विषयाच्या खास अध्ययनासाठी ते मद्रासच्या मत्स्यालयात जाऊन राहिले. पण त्यांचे हे संशोधनकार्य पूर्ण होऊ शकले नाही. कारण याचवेळी त्यांचे वडील श्री. भाऊजी हे नोकरीतून निवृत्त झाले. पुत्राला मद्रासमधील वास्तव्यासाठी पैसा पाठविणे त्यांना अशक्य होऊन गेले. त्यामुळे मद्रासमधील अभ्यास अर्धवट सोडून त्यांना एका वर्षातच नागपूरला परतावे लागले. परंतु अभ्यासाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी माधवरावांच्या मनात यावेळी जे वादळ घोंघावत होते त्याचे स्वरूप मद्रासच्या वास्तव्यात त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारातून कळून येते. काशीतील चार वर्षांच्या वास्तव्याचा संस्कार, देशात घडणाऱ्या घटनांचे तरूण मनात उमटणारे स्वाभाविक पडसाद, जीवनाच्या सार्थकतेसाठी नेमका कोणता मार्ग स्वीकारावा यासंबंधी चित्तात चाललेला संघर्ष इत्यादींना या पत्रव्यवहारातून वाचा फुटली आहे. माधवरावांच्या जीवनातील हा टप्पा महत्वाचा आहे. यावेळेचे त्यांच्या अंतर्मनातील वादळ त्यांच्या जीवनाला पुढे मिळालेली दिशा आकलन होण्याच्या दृष्टीने समजून घ्यावयास पाहिजे. यात मूलभूत महत्त्वाची गोष्ट ही की विशिष्ट संशोधनकार्यात गुंतलेल्या, शिक्षणोत्तर व्यावहारिक जीवनाच्या उंबरठयावर उभ्या असलेल्या या युवकाच्या मनात व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेची किंवा सुखासीन आयुष्यक्रमाच्या आकांक्षेची एक लहर देखील कधी उठली नाही. सामान्यत: हे वय भावी नोकरी, पैसा, प्रपंचाची स्वप्ने इत्यादींत रमण्याचे मानले जाते. पण माधवरावांनी मित्रांना जी विस्तृत पत्रे या काळात लिहिली (चौदा-पंधरा पानांची ही पत्रे असत) त्यांत स्वत:च्या ऐहिक आशाआकांक्षांसंबंधी अवाक्षरही नसे. मुख्य भर तत्त्वविचार आणि जीवनाच्या सार्थकतेचा योग्य मार्ग या संबंधीच्या मनात उठणाऱ्या उलटसुलट तरंगांचे विश्लेषण करण्यावरच असे. या पत्रातील काही अंश माधवरावजींच्या मनातील संघर्ष व विचारांची दिशा कळण्यासाठी येथे उद्धृत करणे उचित होईल.

भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांनी लाहोरच्या अत्याचारी सँडर्स्टचा वध केला या वार्तेसंबंधी प्रतिक्रिया व्यक्त करताना माधवराव लिहितात : "लाहोरचा स्फोट ऐकला. अपरंपार धन्यता वाटली. अंशत: का होईना, उन्मत्त परकीय शासकांनी केलेल्या राष्ट्रीय अपमानाचे परिमार्जन झाले, याबद्दल समाधान वाटले. मी तुमच्याबरोबर अनेकदा विश्वबंधुत्व, समता, शांती, इत्यादी विषयांवर चर्चा केली आहे. मारहाण, दांडगाई, सूडबुध्दी, विद्वेष यांचा निषेध करून आपणास दूषण दिले आहे. आपणाशी भांडलो आहे. तोच मी हे पत्र लिहीत आहे याचे आपणास नवल वाटेल.... पण बाजूला सूडाची कामना आणि तारूण्य यांची जोरदार उर्मी, तर दुसऱ्या बाजूला वेदांताचा शांत पण अचल कडा. या दोहांत त्या वेळी असा तुमुल संघर्ष उसळला की मी खूपच गोंधळात पडलो. चित्ताला सारखे हेलकावे बसत होते. याच अवस्थेत पुष्कळसे दिवस गेल्यामुळे दोन-तीनदा ताप चढला. खोकल्याने जोर केला, अशक्त झालो, डोळे ओढल्यासरखे दिसू लागले. माझ्या प्रकृतीतील हा बिघाड इतका दिसून येणारा होता की मत्स्यालयाच्या निरीक्षकांनी बळेबळेच मला डॉक्टरांकडे नेले. काळजी न घेतल्यास दुखणे विकोपास जाईल अशा इशारा डॉक्टरांनी दिला. मी घाबरलो जरी नाही तरी इंजेक्शन्स वगैरे उपचार लगेच सुरू केले."

हे दुखणे दोन महिने पुरले. पण त्यातून बाहेर पडतेवेळी माधवरांवाच्या चित्तातील वादळ शांत झालेले होते. जीवनकार्याचा सुस्पष्ट बोध त्यांना आता झाला होता. त्यांनीच नंतर एका पत्रात लिहिले आहे : "लोकांत राष्ट्रीय चैतन्य जागवावयाचे आहे. हिंदू व मुसलमान यांचे वास्तविक संबंध काय आहेत, हे दाखवून द्यावयाचे आहे. ब्राह्मण-ब्राम्हणोत्तर वादाची इतिश्री करावयाची आहे.मी कोणी मोठा पुढारी किंवा कार्यकर्ता आहे अशातली गोष्ट नाही. पण प्रत्येकाने या कामी सहकार्य द्यावयास पाहिजे." राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संपर्क येण्यापूर्वी माधवराव गोळवलकरांच्या विचारांना स्वतंत्रपणे लाभलेली ही दिशा आहे. परिस्थितीचे निरीक्षण आणि चिंतन यांतून एका नि:स्वार्थ व निरपेक्ष, जिज्ञासू आणि व्यासंगी, निर्मळ आणि अध्यात्मप्रवण, आधुनिक आणि प्राचीन यांचा तुलनात्क अभ्यास खंडोगणती ग्रंथांच्या वाचनाने करून चुकलेल्या व जेमतेम विद्यापीठीय उंबरठयाबाहेर पाऊल टाकलेल्या एका जागृत युवकाला झालेला का कर्तव्यबोध आहे. या वादळानंतर सुमारे ११ वर्षांनी याच युवकाने डॉक्टर हेडगेवार यांच्या राष्ट्रीय चैतन्य जागविण्याच्या कार्याची धुरा खांद्यावर घेऊन ती तेहतीस वर्षे समर्थपणे पेलली, याचे नवल का वाटावे?

परंतु वादळ तात्पुरतेच शमले असे आगामी सहा-सात वर्षांतील घटनांवरून म्हणावे लागते. शांत आणि अविचल हिमाल्याचे आकर्षण पुन:पुन्हा प्रबळ होऊन समस्याग्रस्त समाजजीवनापासून दूर एकांतात जाण्याची व मोक्षसाधनेतच रत होऊन राहण्याची ओढ लावीत होते. विवाहबध्द होऊन चारचौघांसारखे प्रापंचिक जीवन जगण्याची कल्पनाही त्यांना स्पर्श करू शकत नव्हती. प्रश्न लोकांत की एकांत एवढाच होता. आपल्या अंतरीच्या परस्परविरोधी भासणाऱ्या वृत्तींचा खेळ माधवराव एखाद्या संशोधकाच्या अलिप्त भूमिकेवरून पाहू शकत होते. त्याचे विश्लेषण करू शकत होते. त्यांचा विवेक पूर्णपणे जागृत होता. मित्राला त्यांनी लिहिले आहे."जड मानवी जीवनाच्या तारेबरोबर आपलीही तार जुळविण्याची मला मुळीसुध्दा इच्छा नाही. त्याहून अधिक शुध्द स्वराशी मिलाफ साधण्यासाठी जीवनाची तार आवश्यक तेवढी ताणण्याची माझी इच्छा आहे. ताण तर सोसावाच लागेल. याचा अर्थ हा आहे की, सर्वसाधारण जगापासून अलग व्हावे लागले तरी हरकत नाही. पण जीवनाच्या तारांचा त्या स्वर्गीय संगीतापेक्षा वेगळा बदसूर निघू नये." हा मार्ग अवघड, निसरडा आणि कंटकाकीर्ण असला तरी त्या मार्गाने जाण्यास कचरून धोपटमार्गाचा यात्रिक होण्याची त्यांची तयारी नव्हती. याच पत्रात ते लिहितात, "या अनिश्चित आणि धोक्याच्या मार्गाविना अन्य मार्गच नाही. रंभेचा मोह ठोकरून एखादा विजयी शुक ब्रह्मपद प्राप्त करून घेतो, तर त्याच मार्गाने जाणारा एखादा विश्वामित्र मेनकेच्या शृंगारचेष्टांपुढे पराजित होऊन अध:पतित बनतो. हा मामला असाच आहे. पण कवेळ एवढयासाठीच हा मार्ग सोडून सामान्य मार्गाने जाण्याचे पत्करणे म्हणजे भीरूता ठरेल. अंतिम सुखाची साधना करताना त्याबरोबरच अपरिहार्यपणे आपल्या वाटयाला येणाऱ्या दु:खांना धैर्याने तोंड देण्याची व त्यांच्यावर मात करण्याची तयारी ठेवावीच लागेल. याहून कमी धोक्याचा दुसरा मार्ग नाही."

या प्रबळ ऊर्मीला आवर घालणारा दुसराही विचार त्यांच्या मनात येत राही. अपार करूणा, इतरांच्या दु:खदैन्याने व्याकुळ होऊन जाण्याचा स्वाभाविक भाव त्यांच्या ठायी होता. एकटयाच्या शाश्वत सुखप्राप्तीसाठी हिमाल्यात जाण्याची ओढ वाढली की या दुसऱ्या भावनेचा चाप तिला बसत असे. याही संघर्षाचा हळूहळू निरास झाला. २८ फेब्रुवारी १९२९ च्या एका पत्रात माधवरावांनी चित्त कसे शांत झाले याचे सुरेख शब्दांकन केले आहे. ते लिहितात, "मी संन्यासदीक्षा तर घेतलीच आहे. पण ती अद्याप पूर्ण झालेली नाही. हिमाल्यात निघून जाण्याचा माझा पूर्वीचा विचार तितकासा निर्दोष नसावा. लौकिक

जीवनात राहून, जगरहाटीचा सारा व्याप सहन करून, तसेच सर्व कर्तव्ये ठीक प्रकारे पार पाडीत आपल्या रोमरोमांत संन्यस्त वृत्ती बाणविण्याचा प्रयत्न मी आता करीत आहे. मी आता हिमाल्यात जाणार नाही. हिमालय स्वत:च माझ्याकडे येईल. त्याची शांत नीरवता माझ्याच अंतरात राहील. ती नीरव शांतता मिळविण्यासाठी अन्यत्र कोठे जाण्याची गरज नाही."

हे जे निश्चित वळण त्यांच्या जीवनविषयक विचारांनी घेतले, तदनुसारच त्यांचे संपूर्ण संघजीवन व्यतीत झाले. अंतर्गत संघर्षाचे काही प्रसंग पुन्हा आलेच नाहीत, असे नव्हे. पण जो मार्ग अंगीकारला त्यापासून ते कधीही ढळले नाहीत. मद्रासमधील संशोधन परिस्थितिवशात् अर्धवट सोडून ते नागपूरला आले आणि योगायोग असा की ज्या काशी हिंदू विश्वविद्याल्यात त्यांनी चार वर्षे शिक्षण घेतले तिथेच प्राणिशास्त्राचे प्राध्यापक म्हणून लवकरच त्यांना बोलावणे आले. १९३० मध्ये श्री. माधवराव गोळवलकर पुन्हा आपल्या आवडत्या विश्वविद्याल्यात प्राध्यापक या नात्याने दाखल झाले. येथील उणापुरा तीन वर्षांचा काल माधवरावांच्या जीवनात अतीव महत्त्वाचा आणि त्यांच्या भवितव्याचे निर्धारण करणारा मानावा लागतो. पहिली उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ज्या 'गुरूजी' या नावाने ते पुढे जन्मभर ओळखले गेले, ते नाव अथवा उपाधी त्यांना प्राध्यापक म्हणून काशीला आल्यानंतरच त्यांच्या विद्यार्थ्यांनी प्रथम बहाल केली. तरूण माधवराव प्राणिशास्त्राचे प्राध्यापक असले तरी दांडगे वाचन आणि विविध विषयांचा अभ्यास यांमुळे गणित, इंग्रजी, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान अशा कोणत्याही शाखेच्या विद्यार्थ्यांना ते सहज मार्गदर्शन करू शकत. आवश्यकता पडल्यास स्वत: अभ्यास करून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या अडचणी निवारण्यास कंटाळत नसत. त्यांना मिळणारा पगारही गरजू विद्यार्थ्यांना साहाय्य करणे, ग्रंथ विकत घेणे व सत्कार्याला उत्तेजन देणे यांत केव्हाच उडून जाई. पण या मनमिळाऊ, साहाय्यतत्पर वृत्तीमुळे मित्र व छात्र या दोघांतही ते अतिशय प्रिय झाले. त्यांच्यासंबंधी आदर निर्माण झाला. या स्नेहादरापोटीच काही विद्यार्थी त्यांना 'गुरूजी' म्हणू लागले. माधवराव गोळवलकर यांचे 'गुरूज' हेच नाव पुढे तेसंघात आल्यावर रूढ झाले, देशभर मान्यता पावले, त्यांची दाढी आणि जटा यांची कहाणी वेगळी व नंतरची आहे. 'गुरूजी' या त्यांच्या उपाधीशी 'बुवा' या कल्पनेचा दुरान्वयानेही संबंध नाही. त्यांचा कधी मठ नव्हता की संप्रदाय नव्हता. त्यांना ही उपाधी लाभली ती काशी विद्यापीठात त्यांनी जो स्नेहादर आपल्या अध्ययन-अध्यापन क्षेत्रातील गुणवत्तेने संपादन केला, त्याचे प्रतीक म्हणून.

दुसरी गोष्ट म्हणजे याच तीन वर्षांच्या काळात माधवरावांचा आता त्यांना आपणही श्रीगुरूजी म्हणावयास प्रत्यवाय नाही - राष्ट्रीय  स्वयंसेवक संघाशी प्रत्यक्ष परिचय झाला व संघाच्या स्वयंसेवकांनी त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. १९२८ च्या सुमारास नागपुरहून काशीला शिक्षणार्थ गेलेल्या श्री. भय्याजी दाणी प्रभृती युवकांनी तेथे लवकरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा सुरू केली. प्राध्यापक या नात्याने श्री. माधवराव गोळवलकर काशीला आले तेव्हा त्यांच्या गुणांचा लाभ करून घेण्यासाठी श्री. भय्याजी दाणी यांनी विशेष प्रयत्न केला व संघशाखेवर श्रीगुरूजी अधूनमधून येऊ लागले. ही मंडळी अभ्यासात माधवरावांची मदत मोकळेपणाने घेत, सहलीत त्यांची भाषणे योजीत आणि ते जणू काशी विद्यापीठातील संघशाखेचे पालक व चालक असल्याप्रमाणे त्यांच्यासंबंधी आदर दाखवीत. श्री. भय्याजींशी श्रीगुरूजींचे फार निकटचे संबंध जडले. आणि भय्याजी विद्यापीठातील शिक्षण पूर्ण करू शकले, याचे पुष्कळसे श्रेय श्रीगुरूजींकडेच जाते. श्री. माधवराव गोळवलकर यांचे 'श्रीगुरूजी' हे नाव रूढ करण्यात भय्याजी दाणी काही काळ संघाचे सरकार्यवाह होते. काशीला

संघकार्याशी श्रीगुरूजींची केवळ ओझरती ओळख झाली. पण स्वयंसेवकांची ध्येयनिष्ठा व चिकाटी योच त्यांना कौतुक वाटे. संघातील शिस्तीनेही ते प्रभावित झाले. महामना पं. मालवीय यांचा गुरूजींवर फार लोभ. गुरूजी स्वयंसेवकांना कित्येकदा मालवीयजींच्या भेटीस घेऊन जात. त्यांचे आशीर्वाद स्वयंसेवकांना लाभत. संघकार्यासंबंधी सद्-भावना मालवीयजींच्या मनात निर्माण झाल्यामुळे त्यांनी शाखेसाठी जागा व कार्यालयासाठी एक खोली आनंदाने दिली होती. श्रीगुरूजी काशी प्राध्यापक असतानात १९३२ साली त्यांना आणि अन्य एक संघप्रेमी प्राध्यापक श्री. सद्-गोपालजी यांना, डॉक्टर हेडगेवार यांनी नागपूर संघशाखेचा विजयादशमी महोत्सव पाहण्यासाठी निमंत्रित केले होते. या पाहुण्यांना हार घालून त्यांचे स्वागत केले होते व नागपूरजवळच्या अन्य काही संघशाखा त्यांना दाखविण्याची व्यवस्था केली होती. या मुक्कामात संघासंबंधी सगळी माहिती स्वाभाविकपणेच श्रीगुरूजींना प्रत्यक्ष डॉक्टरांकडूनच मिळू शकली. काशीला परतल्यावर तेथील संघशाखेकडे ते अधिक आस्थापूर्वक लक्ष देऊ लागले.

काशी विद्यापीठात अध्यापनाचे काम करीत असताना श्रीगुरूजींचा संघकार्याशी प्राथमिक परिचय झाला व हिंदू संघटनेच्या कार्यासंबंधी आस्था त्यांच्या मनात निर्माण झाली हे जसे खरे, तसेच त्यांची जोड संघकार्याला मिळाल्यास एक श्रेष्ठ गुणवत्तेचा सहकारी लाभल्यासारखे होईल असे संघाच्या गोटात सगळयांना वाटू लागले हेही खरे. विद्वत्ता आणि चौफेर अध्ययन यासाठी तर ते ख्यातनाम होतेच, पण संघटना बांधण्यासाठी चारित्र्य, नि:स्वार्थीपणा, माणसांना राजी राखण्याची शैली, सोशिकपणा, मनाचा निर्मळपणा, इतरांच्या सुखदु:खाशी समरस होण्याची प्रवृत्ती, तत्त्वनिष्ठेचा प्रखरपणा, मूलगामी चिंतन इत्यादी नानाविध गुण लागतात. त्यांचाही आविष्कार गुरूजींच्या दैनंदिन जीवनात प्रत्ययास येत होता. अध्यात्मचिंतन, ध्यानधारणा, व्यक्तिगत सुखसाधनांसबंधी उदासीनता व राहणीचा सोधपणा हे त्यांच्या नित्याच्या जीवनाचे विशेष पैलू होते. हाती घेतलेल्या कामावर चित्त एकाग्र करण्यास तर ते विद्यार्थिदशेतच शिकले होते. काशी हिंदू विश्वविद्यालयातील अशी घटना सांगतात की, अभ्यास करीत असताना एकदा त्यांच्या पायाला विंचू चावला. त्यांनी शांतपणे विंचू चावलेल्या जागी चिरा दिला व रक्त वाहू दिले. नंतर पोटॅशियम परमँगनेटच्या पाण्यात पाय ठेवून ते अभ्यासात गढून गेले. मित्रांनी विचारले की, अशा अवस्थेत तुम्ही अभ्यास कसा करू शकता? यावर गुरूजी थट्टेने म्हणाले, "विंचू पायाला चावला आहे. डोक्याला नव्हे. मगअभ्यासात व्यत्यय येण्याचे कारण कोणते?" कधी कधी मनात आले म्हणजे ते कित्येक दिवस अन्नाला स्पर्शदेखील करीत नसत. पण त्यांच्या नित्यक्रमात त्यामुळे कधीही फरक पडत नसे. जाग्रणाचाही परिणाम त्यांच्यावर झालेला दिसत नसे. एकप्रकारे इंद्रियविचयच त्यांनी संपादन केला होता. पुढे संघाचे सरसंघचालक झाल्यावर अंगात ताप असतानाही त्यांनी अनेक कार्यक्रम पार पाडले. तेही कण्हत कुंथत नव्हे, तर प्रसन्नपणे आणि सहजपणे. इतरांना गुरूजींच्या प्रकृतिअस्वास्थ्याची कल्पनादेखील येऊ नये, एवढया उत्साहाने. ही तितिक्षा आत्मबलाच्या अभ्यासपूर्वक केलेल्या विकासातूनच त्यांनी मिळविली होती. शरीराचे अनाठायी कोडकौतुक त्यांनी कधीच केले नाही. आत्मानात्मविचाराच्या बैठकीतून व्यवहार ते सहजपणे करीत. शरीराची त्यांनी उपेक्षा केली असा मात्र याचा अर्थ नव्हे. शरीराकडून इष्ट ते कार्य करवून घेण्यात त्यांनी कधी कुचराई केली नाही व इंद्रियांचे गुलाम न बनता त्यांचा स्वामी बनण्याचे जे तत्त्व आहे ते त्यांनी प्रत्यक्ष आचरून दाखविले. डॉक्टर हेडगेवार यांनीही याच सूत्रानुसार आपली भीमकाया झिजविली होती. काशी विद्यापीठामध्ये घालविलेल्या कालखंडात स्वाभाविकपणेच विशाल मित्रपरिवार त्यांनी मिळविला व एकाही मित्राचे विस्मरण त्यांना नंतर कधी झाले नाही.

संघकार्यानिमित्त्य त्यांनी वारंवार केलेल्या भारतभ्रमणात कोणीही जुना परिचित भेटला की गुरूजी जुन्या आठवणींची उजळणी करीत. त्यांच्या स्मरणशक्तीचे, सौजन्याचे व स्नेहाचे भेटणारालाच नवल वाटे. नियमपालन व शिस्त या संबंधीचा त्यांचा निर्भय आग्रहदेखील त्यांच्यासंबंधीच्या आदरात भरच घालत असे. ते मद्रासला असताना एक दिवस निजामाची स्वारी मत्स्यालयाला भेट देण्यासाठी आली होती व नियमाप्रमाणे प्रवेशशुल्क दिल्याविना त्यांना आत सोडण्याचे श्रीगुरूजींनी नाकारले होते. काशीलाही एका कार्यक्रमात नियमभंग करून भलत्याच दाराने आत शिरणाऱ्या अहंमन्य प्राध्यापकास अडविणाऱ्या स्वयंसेवकांची त्यांनी हिरीरीने पाठराखण केली होती. हे सगळेच गुण संघकार्यात अत्यंत उपकारक ठरणारे होते. श्रीगुरूजींकडे डॉक्टर हेडगेवार यांचे लक्ष वेधले व गुरुजींनी संघकार्याच्या वाढत्या जबाबदाऱ्या पत्कराव्या असा प्रयत्न त्यांनी जाणीवपूर्वक केला तो माणूस पारखूनच.

श्रीगुरूजींच्या प्राध्यापकपदाची मूदत केवळ तीन वर्षांची होती. ही महत्त्वाची तीन वर्षे पाहता पाहता उलटली आणि काशीचा परिसर सोडून ते १९३३ मध्ये पुन्हा नागपूरला येऊन दाखल झाले.

## ४. सारगाछीच्या आश्रमात

प्रो. माधवराव गोळवलकर तथा श्रीगुरुजी बनारसहून नागपूरला परतल्यानंतरच्या त्यांच्या जीवनातील पाच वर्षांचा काळ म्हणजे दोन जबरदस्त व्यक्तिमत्वांच्या कधी परस्पर अनुकूलतेचा, तर कधी विरोधी दिशांनी ताणल्या जाणाऱ्या त्यांच्या इच्छाशक्तीचा, चित्त दंग करुन टाकणारा चढउतारांचा एक विलक्षण खेळ. एक व्यक्तिमत्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अंतर्बाह्य संघरुप होऊन गेलेले जनक डॉक्टर हेडगेवार यांचे, तर दुसरे प्रकांडपंडित, अध्यात्मप्रवण, काहीसे स्वमताग्रही आणि आपल्या स्वतंत्र बुध्दीनुसार जगण्या-वावरण्याची प्रबल प्रवृत्ती असलेले श्रीगुरुजी यांचे. डॉक्टर आणि गुरुजी यांचा परिचय होऊन आता दोन वर्षे उलटली होती. अनेक असामान्य गुणांचा ठेवा असलेल्या श्रीगुरुजींची पारख डॉक्टरांनी केलेली होती आणि गुरुजींना आपल्याप्रमाणेच संघरुप झालेले पाहण्यासाठी डॉक्टर आतुर होऊन गेलेले होते. एक स्वच्छंद, खळाळता आणि निर्मळ जीवनप्रवाह पात्राच्या मर्यादेत सुनिश्चित दिशेने मार्गस्थ करण्याचाच हा महाप्रयास होता. श्रीगुरुजींच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे, "मी त्या महापुरुषापेढे शरणागत झालो. विद्वत्तेचा कोठलाही डौल नसलेली त्यांची राष्ट्रकारणाची तळमळ व नि:शेष समर्पणशीलता यांनी मला नमविले. ही शरणागती सुखद होती." या प्रक्रियेचाच मागोवा आता घ्यावयाचा आहे.

श्रीगुरूजी नागपूरला आल्यानंतर आपले मामा श्री. रायकर यांच्याकडेच राहिले. ताई-भाऊंचा मुक्काम नागपूरपासून सुमारे २५ मैल दूर रामटेक येथे असे. निवृत्तीनंतर भाऊजींनी तेथेच एक घर विकत घेतले होते. रामटेकला गुरूजींचे वारंवार जाणे-येणे असे. घरची आर्थिकपरिस्थिती जेमतेमच. तेव्हा थोडयाफार आर्थिक स्वावलंबनासाठी गुरूजींनी श्री. रायकर यांच्या कोचिंग क्लासमध्ये काही वेळ शिकविणेसुरू केले. त्याच वेळी त्यांनी वकिलीची परीक्षा देण्याचे ठरवून लॉ कॉलेजमध्ये नाव दाखल केले. डॉक्टरांचा प्रयत्न गुरूजींवरकामाची जबाबदारी टाकून त्यांना संघाच्या अधिक निकट आणण्याचा होता. नागपुराततुळशीबाग नामक स्थानी त्यावेळी संघाची प्रमुख शाखा भरत असे. १९३४ साली या शाखेवर कार्यवाह म्हणून गुरूजींची नियुक्ती झाली. याच वर्षी काही दिवस संघाच्या प्रचारासाठी डॉक्टरांनी गुरूजींना मुंबईला पाठविले होते आणि विदर्भातील अकोला येथे भरलेल्या संघ शिक्षावर्गाचे सर्वाधिकारी म्हणून ही जबाबदारी त्यांनी उत्तमप्रकारे पार पाडली होती. नागपूरला डॉक्टरांकडे ते जावयाचे आणि बैठकीत भाग घ्यावयाचे. १९३५ मध्ये त्यांनी वकिलीची परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण केली आणि काही दिवस त्यांच्या नावाची वकील म्हणून पाटीही झळकली.

या दोन वर्षांच्या काळात ताई-भाऊजींनी आपल्या या एकुलत्या एक पुत्राला विवाहासाठी गळ घालून पाहिली. हा प्रश्न विचारला की प्रथम गुरूजी तो हसण्यावारी उडवून लावीत. पण एक दिवस भाऊजींना स्पष्टच सांगून टाकले की "विवाह करण्याची माझी इच्छा नाही. प्रपंचात मला सुख लाभेल असे वाटत नाही. एवढयाउपरही आपली आज्ञाच असेल तर मी लग्नाला उभा राहीन." तशी बळजबरी सुविद्य व पुत्राचे मन जाणणाऱ्या भाऊजींनी केली नाही. ताईंची मन:स्थिती स्वाभाविकपणे अधिक नाजूक बनली होती. कारण 'मधू' च्या विवाहावर वंशसातत्य अवलंबुन होते. वंश खुंटू नये असे त्यांना वाटत होते.ताईंनी खूप आग्रह धरला तेव्हा अखेर एक दिवस त्यांनी स्पष्ट शब्दांत आपले मनोगत सांगनू तो विषय तोडून टाकला. मातेला एकुलत्या एक वंशदीपाने दिलेले हे उत्तर मोठे संस्मरणीय आहे. त्यांनी सांगितले, "आई, वंशवेल खुंटण्याची भाषा माझ्याशी बोलू नकोस. जर माझ्यासारख्या अनेकांचे

वंश नष्ट होऊन होऊन समाजाचे थोडेफार कल्याण होणार असेल तर आजच्या परिस्थितीती ते आवश्यक आहे. वंश नष्ट होईल याची मला मुळीस खंत वाटत नाही." यावर ती पुत्रवत्सल माउली काय बोलणार? पुत्राचा निर्धार कळल्यावर माता पित्यांनी पुन्हा विवाहासाठी गुरूजींना गळ घातली नाही.

याच काळात गुरूजींच्या जीवनाला काहीसे वेगळे वळण मिळत होते आणि त्याची परिणती सगळयांना हादरा देणारी ठरणार होती. डॉक्टरांशी संपर्क होता, संघकार्यात सहभाग होता, तरी संघात गुरुजी पूर्णपणे समरस मात्र झालेलले नव्हते. त्यांचा विशेष ओढा नागपूरच्या धंतोली भागातील रामकृष्ण आश्रमाकडे होता. आश्रमाचे श्री. भास्करेश्वरानंद म्हणून स्वामी होते. त्यांच्याशी गुरूजींची फार जवळीक निर्माण झाली. अगदी आवश्यक ती कर्तव्यकर्मे उरकल्यानंतर उरलेला सारा वेळ ते आश्रमात घालवू लागले. अध्यात्मचिंतन, ध्यानधारणा यांकडे कल विशेष झुकला. आत्मसाक्षात्काराची ओढ प्रबल झाली. डॉक्टरांनाही ते दिसत होते. त्यांना चिंता वाटत होती. राष्ट्रीय मोक्षप्राप्तीचे आव्हान पुढे असताना व सगळा समाज दुरवस्थेत पिचत असताना या मेधावी तरूणाचे व्यक्तिगत मोक्षसुखाच्या मागे लागणे डॉक्टरांना कसे रूचावे? त्यांनी स्वत: सारे जीवन मातृभूमीसाठी वाहून टाकले होते. या धारणेचे बुध्दिमान व कर्तबगार तरूण त्यांना हवे होते. आपला जिवंत आदर्श त्यांनी तरूणांपुढे ठेवला होता. पण या वेळी तरी ते गुरूजींना थोपवू शकले नाहीत. या संबंधात एवढेच म्हणता येईल की, विशिष्ट लोकोत्तर व्यक्तीच्या जीवनातील उलथापालथीतही नियतीचे काही सूत्र असावे. भारतीय ॠषिमुनींनी, रामकृष्ण विवेकानंदांसारख्या आधुनिक द्रष्टयांनी, महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संत परंपरेने किंवा अरविंद आणि रमणमहर्षी यांसारख्या सिध्दपुरूषांनी परमोच्च सुखप्राप्तीची एक अवस्था सांगितली आहे. चित्तातील सगळी अशांततला, ओढाताण, "किं कर्म किमकर्मेति" हा संदेह त्या अवस्थेत कायमचा दूर होतो व कोणत्याही बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसलेल्या शाश्वत, स्वयंपूर्ण सुखाचा अमृतमय अखंड आनंद माणसाला घेता येतो असे स्वानुभवाचे कथन केले आहे. सगळी तळमळ शांत करणारी ती दिव्य अवस्था असते. त्या अनुभूतीचे किंवा आत्मसाक्षात्काराचे धनी होऊन नंतर श्रीगुरूजींचे योगारूढ व्यक्तिमत्व संघकार्यात पूर्णांशाने समर्पित व्हावे. अशीही नियतीची योजना असावी.

एवढे खरे की, अनुभूतीसंपन्न सद्-गुरूंच्या चरणाशी जाऊन बसण्याची, त्यांच्या सान्निध्यात व सेवेत त्या आनंदमय आत्मदर्शनासाठी एकाग्र साधन करण्याची श्रीगुरूजींची ओढ दुर्निवार झाली. एक दिवस आई-वडिल, मामांचा परिवार, मित्रगण, डॉक्टर व संघ कार्यकर्ते, नागपुरातील वकिलीचा व्यवसाय इत्यादी सगळयांना निर्धारपूर्वक रामराम ठोकून ते सद्-गुरूंचा कृपाप्रसाद मिळविण्यासाठी मार्गस्थझाले. १९३६ सालच्या ग्रीष्म ऋतूतील ही घटना.

श्रीगुरूजींनी ज्यांच्याकडे प्रस्थान केले त्या सत्पुरूषाचे नाव स्वामी अखंडानंद. श्रीरामकृष्ण परमहंस यांनी ज्या मोजक्याच तरूणांना हाताशी धरून कठोर साधना त्यांच्याकडून करवून घेतली व एका महान जीवनकार्याचा जिवंत बोध त्यांना करवून दिला, त्यांपैकी स्वामी अखंडानंद हे एक. या संन्याशांचे अध्वर्यू स्वामी विवेकानंद. भारताच्या आध्यात्मिक जीवनादर्शाची पुन:प्रस्थापना आणि सभोवार पसरलेल्या दरिद्रीनारायणाची भौतिक क्षेत्रात सेवावृत्तीने उपासना हे त्यांचे अंगीकृत कार्य. भारतीय राष्ट्रस्वरूपाच्या आणि भारताच्या नियत जीवनकार्याच्या साक्षात्काराची या भगीरथ उद्योगाला भक्कम बैठक. स्वामी अखंडानंद यांचा आश्रम बंगालमध्ये सारगाछी येथे होता. असे सांगतात की, स्वामी अखंडानंद हे हिमाल्याच्या यात्रेला निघाले असता मुर्शिदाबाद जिल्ह्यातील लोकांची दुष्काळाने

झालेली दुर्दशा पाहून त्यांच्या चित्तात अपार करूणा दाटून आली. त्यांचे पाऊल मग पुढेच पडेना. त्यांनी सारगाछीला तळ ठोकला. सेवाकार्य सुरू केले. त्यातून या आश्रमाची निर्मिती झाली. सारगाछी या शब्दशः अर्थ होतो वृक्षराजी. ते नाव सार्थ करणारे हे स्थान. आश्रमाच्या परिसरातही वृक्षराजी व देखणे निसर्गसौंदर्य. येथेच हळूहळू आश्रमाचा विस्तार झाला व स्वामी अखंडानंदांनी ते आपले कायमचे वास्तव्याचे केंद्र बनविले. तिथे 'विनोदकुटी' उभी राहिली. उपासनेची व्यवस्था झाली आणि गोरगरीब लोकांची चिंता वाहणारे ते एक सेवाकेंद्र बनले. अशा प्रकारे भगवंतस्वरूप समाजबांधवांची सेवा करण्याच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या या आश्रमात श्रीगुरूजी गेले. नागपूरला कोणाला 'दीक्षा' किंवा 'अनुग्रह' देण्यास स्वामीजी अनुकूल नव्हते. साधकांनी सारगाछीला यावे, असा सल्ला त्यांनी दिला होता.

मग त्यांनी नागपूरच्या आश्रमवासीयांचा विचार घेतला. स्वामी अमूर्तानंद तथा अभिताभ महाराज नामक एक संन्यासी आश्रमात होते.गुरूजींच्या व्यक्तिमत्वांचे आगळेपण त्यांना जाणवले होते. या 'अग्निगोलकावर' जी थोडीफार राख जमली ती निघून जावी व त्याचे तेज फाकावे अशी भावना स्वामी अमिताभ यांच्या मनात निर्माण झाली. भास्करेश्वरानंद यांनीही सारगाछीला जाण्यास अनुकूलता दर्शविली. स्वामी अखंडानंदाशीं पत्रव्यवहार होऊन त्यांची संमती घेण्यात आली. आणि एक दिवस केवळ चार दोन निकटच्या मित्रांचा अपवाद वगळता सगळयांना अंधारात ठेवून, श्रीगुरूजी आत्मसाक्षात्काराच्या दैवी ओढीने सारगाछीला निघून गेले. श्री. माधवराव गोळवलकर, एम्.एस्सी., एल.एल.बी. हे येत आहेत, अशी सूचना तत्पूर्वी सारगाछीला रवाना झालीच होती. गुरूजी कोठे निघून गेले, याची चर्चा नागपुरात सुरू झाली. डॉक्टर हेडगेवार यांना धक्का जाणवणे स्वाभाविकच होते. कारण गुरूजी व संघ यांचे काही नाते त्यांनी मनोमन जुळवून ठेवलेले होते. श्रीगुरूजी आपले मित्र श्री. दत्तोपंत देशपांडे यांच्याबरोबर वकिली करी व दत्तोपत्तांनाच गुरूजींच्या प्रयाणाची सगळी माहिती होती. आई-वडिलांना एक सविस्तर पत्रही दत्तोपंतांच्या द्वारेच पोचते करण्याची व्यवस्था गुरूजींनी केली होती. तेव्हा गुरूजी सारगाछीला गेल्याचे गुपित लवकरच बाहेर पडले. पण ते निघून गेलेले होते व पुढे कार्य मार्ग ते स्वीकारतात याची प्रतीक्षा करण्याखेरजी दुसरे काहीच कोणाच्या हाती नव्हते. डॉक्टर देखीत दत्तोपंत भेटले की विचारायचे : 'काय म्हणतात तुमचे मित्र? केव्हा परतणार सारगाछीवरून?' असे दिसते की श्रीगुरूजी नागपूरला परतल्याशिवाय राहणार नाहीत, असे डॉक्टरांचे मन त्यांना सांगत असावे. आपली आशाअपेक्षा अद्यापही सफल होईल, अशी त्यांची ठाम भावना असावी. त्यांच्या घरी नित्य चालणाऱ्या बैठकींमधून अधूनमधून श्रीगुरूजींचा विषय निघत असे. पण गुरूजीसबंधी उपहासाचा वा टीकेचा एक शब्दही कधी त्यांच्या मुखातून बाहेर पडला नाही. श्रीगुरूजींच्या ठायी असलेल्या गुणवत्तेचे कौतुक ते उंदड करीत.

तिकडे श्रीगुरूजींनी आश्रमात पदार्पण केले आणि बाहेरचे सारे जग ते विसरले. गुरूसेवा आणि एकाग्र साधना हेच त्यांचे जीवन बनले. भारताच्या आध्यात्मिक परंपरेतील गुरू-शिष्य नाते मोठे विलक्षण आहे. सगळया संतांनी सद्-गुरूमहिमा वारंवार अमर्याद भावभक्तीने वर्णन केला आहे. ज्ञानेश्वरीत याची हृदयंगम प्रचीती कोणीही घ्यावी. श्रीगुरूजींनी तनमनाने गुरूसेवा आरंभिली. आश्रमाची झाडझूड करण्यापासून ते भांडी घासण्यापर्यंत कोणतेही काम कमी लेखले नाही. माणसाच्या ठायी अहंकार असल्यास तो या सेवेने निघतो. गुरूकृपा झाली की, जीवनाचे सार्थक होऊन जाते. गुरूही शिष्याची मुमुक्षा, चिकाटी, निष्ठा, परिश्रमशीलता, विशुध्दता इत्यादी गुण पारखून पाहत असतात.

आश्रमातील निवासाच्या काळात सगळया कसोटयांतून गुरूजी पुरेपूर उतरले. हा गुरूजींच्या जीवनातील जेवढा आकस्मिक तेवढाच रहस्यमय अध्याय. संघकार्याशी पुढे श्रीगुरूजी एकरूप होऊन गेल्यानंतर आपली गुरूसेवा, साधन आणि आत्मानुभूती यासंबंधी कधी बोले नाहीत. त्या गोष्टीचे अवडंबर त्यांनी कधी माजविले नाही. व्यक्तिगत जीवनाचा हा कप्पा चारचौघांसमक्ष त्यांनी कधी उघडलाच नाही. स्वामी अमिताभ हेच या अध्यायाचे प्रत्यक्ष साक्षी.

स्वामी अमिताभ हे श्रीगुरूजींचे गुरूबंधू. त्यांना एकदा म्हैसूर येथील रामकृष्ण आश्रमाता श्रीगुरूजींसंबंधी बोलण्याची संधी मिळाली. आश्रम आणि विद्यामंदिर यांना श्रीगुरूजींनी भेट दिली. त्यानिमित्त स्वागताचा कार्यक्रम होता. या प्रसंगी स्वामी अमिताभ म्हणाले, "सारगाछीच्या आश्रमात राहून गुरूजींनी अत्यंत परिश्रमपूर्वक व धैर्यपूर्वक साधना केली होती. त्यानिमित्त त्यांचा जो काही सहवास मला लाभला त्या आधारे मी म्हणून शकतो की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला गुरूजींच्या रूपाने एक नरेंद्रच नेतृत्वपदी लाभला आहे." ब्रह्मलीन श्रीस्वामीजी मध्यप्रदेशात नर्मदाकिनारी एक आश्रम स्थापनू वनवासी बांधवांची सेवा करीत असत. एक चांगली संघशाखा तेथे चालते. श्रीगुरूजींशी त्यांचे जिव्हाळयाचे संबंध अखेरपर्यंत टिकून राहिले व उभयतांत पत्रव्यवहार चालू असे. स्वामीजींना गुरूजींनी लिहिलेल्या पत्रांची भाषा, त्यांतील सुरू आणि भाव यांवर काही एक आगळीच छाया जाणवते. दि. ३० सप्टेंबर १९६० रोजी स्वामी अमिताभ यांना लिहिलेल्या पत्रातील ह्या पंक्ती पहा : "काल रात्री बोलता बोलता सारगाछी येथील अमृतमय निवासकाळातील स्मृती जाग्या झाल्या. मनाची कशी अवस्था होऊन गेली काय सांगू? ते असीम भाग्य मला आपल्यामुळेच लाभले हे स्मरते, आणि कृतज्ञतेने अंत:करण भरून येते. पण शुष्क शब्दांनी व्यक्त करण्याचा हा विषय नसल्याने काही लिहू शकत नाही." या शब्दांमागे केवढे भावविश्व असले पाहिजे, याची केवळ कल्पनाच आपण करावी.

उपलब्ध माहितीवरून एवढे कळते की, सारगाछीला पोचल्यानंतर गुरूसेवेत श्रीगुरूजींनी स्वत:ला झोकून दिले. जास्तीत जास्त वेळ ते स्वामीजींजवळ राहत व त्यांची सर्व प्रकारे सेवा करीत. यात कपडे धुणे, आंघोळ घालणे, चहा करून देणे, अंथरूण घालणे, जेवणाची व्यवस्था ठेवणे वगैरे सर्व कामांचा समावेश असे. स्वामीजी वयोवृध्द झालेले होते व या कर्तव्यदक्ष शिष्याच्या निरलस सेवेवर ते मोठे प्रसन्न असत. सेवा करताकरताच आध्यात्मिक विषयांवर बोलणे होई आणि गुरूमुखातून ज्ञान ग्रहण करण्याची किंवा त्यांचे अनुभव श्रवण करण्याची संधी मिळे. गुरूदेवांना बरे नसल्यास रात्ररात्र त्यांच्या अंथरूणाशी बसून राहावे लागे व या प्रिय शिष्याशी स्वामींचा मोकळेपणाने संवाद चाले. आश्रमात गुरूजींनी दाढी वाढविली होती व डोक्यावरील केसही कापले नव्हते. त्यांना दाढी आणि जटा शोभून दिसत. एकदा ते स्वामीजींजवळ बसले असता त्यांच्या वाढलेल्या केसांवरून प्रेमाने हात फिरवीत स्वामीजी म्हणाले, "हे केस तुला फार शोभून दिसतात. ते कधीच कापू नकोस." आपल्या गुरूच्या या इच्छेचे श्रीगुरूजींनी जन्मभर पालन केले. त्यांच्या दाढीचे व केसांचे रहस्य त्यांची सारगाछीच्या वास्तव्यात गवसते. असे पाच सहा महिने निघून गेले. ज्या गुरूकृपेच्या आनंदमय क्षणाची श्रीगुरूजी वाट पाहत असत, तो क्षण मात्र यावयाचाच होता. स्वामीजींचे स्वास्थ्य दिवसेंदिवस बिघडत होते.

याच सुमारास स्वामी अखंडानंदांनी स्वामी अमिताभ यांना पत्र लिहून नागपूरहून सारगाछीला बोलावून घेतले. स्वामी अमिताभ व श्रीगुरूजी यांनी गुरूसेवेत एकत्र व्यतीत केलेले यानंतरचे काही दिवस म्हणजे उभयतांच्या जीवनातील संस्मरणीय काळ. गुरूजींची तळमळ स्वामी अमिताभ यांना

जाणवत होती. स्वामी अखंडानंदजी तर 'मी आता फार दिवसांचा सोबती नाही" असे म्हणू लागले होते. अखेर एक दिवस सद्-गुरूंचे पाय चेपता चेपता अमिताभजींनी विषय काढलाच. 'गोळवलकरांचे आईवडील थकले आहेत. वकिलीचा व्यवसाय पुढे चालविण्यासाठी गोळवलकरांनी नागपूरला लवकर परतणे योग्य ठरेल. त्यांना दिक्षा देऊन लवकर मोकळे करावे." असा अमिताभजींनी आग्रह धरला. यावर स्वामी अखंडानंदजींनी उत्तरादाखल उच्चारलेले एक वाक्य त्यांच्या द्रष्टेपणाचे निदर्शक आहे. ते म्हणाले, "त्यांना दीक्षा तर देऊन टाकू. पण ते वकिली करतीलच याचा भरवसा कोणी द्यावा?" खरोखरच श्रीगुरूजी पुन्हा वकिलीकडे कधी वळले नाहीत व त्यांच्या जीवनाला सर्वस्वी निराळीच दिशा लाभली. पण सारगाछीच्या मुक्कामातील अनुभवांनीच त्यांचे जीवन समृध्द केले, यात शंका नाही. गुरूसेवेच्या आणिसाधनेच्या या काळात त्यांनी ध्यान, समाधी, इत्यादींचे प्रात्यक्षिक स्वामी अखंडानंदांच्या जीवनात पाहिले. आश्रमात येणाऱ्या देशी-विदेशी पाहुण्यांची सरबराई करताना विविध प्रतिक्रिया त्यांना अनुभवता आल्या. वेदांतदर्शनाचे अनेकविध पैलू अधिकारी पुरूषांच्या मुखाने ऐकता आले. स्वत:देखील वाचन आणि चिंतन करता आले. या शांत तितिक्षेचे फल म्हणूनच की काय, गुरूकृपेचा क्षणही येऊन ठेपला.

एक दिवस स्वामी अमिताभ गुरूदेवांना म्हणाले, "मला आता नागपूरला परतण्याची अनुज्ञा मिळावी." तेव्हा स्वामी अखंडानंदांनी मोडता घातला. "मी फार दिवसांचा सोबती नाही. तुम्ही येथेच थांबा." असे उत्तर त्यांनी दिले. अमिताभजींचे मन चरकले. गुरूजींचे स्मरण त्यांना झाले. भीतभीतच त्यांनी सुचविले. "आता गोळवलकरांना दीक्षा देऊन टाका ना." अखंडानंद म्हणाले "ठीक आहे. ठाकुरजींना विचारतो." (ठाकुरजी म्हणजे श्रीरामकृष्ण परमहंस. श्रीगुरूजींच्या अमिताभजींना लिहिलेल्या पत्रातही श्रीरामकृष्णांचा उल्लेख ठाकुरजी असाच असे.) या संभाषणानंतर तीनच दिवसांनी स्वामी अखंडानंद आपणहून म्हणाले, "उद्या गोळवलकरांना दीक्षा दिली जाईल." ठरल्याप्रमाणे हा दीक्षाविधी विनोदकुटीत पार पडला. ज्या तळमळीने श्रीगुरूजी नागपूरहून सारगाछी आश्रमात आले, ती तळमळ सद्-गुरूंच्या अनुग्रहाने शांत झाली. दीक्षा लाभली. अपार प्रसन्नता चित्तात ओसंडली. दीक्षा ग्रहण करून आश्रमाच्या पध्दतीनुसार गुरूजी मंदिरात देवदर्शनासाठी आले तेव्हा अमिताभजी तेथेच होते. त्यांनी नंतर सांगितले, "त्या वेळी श्रीगुरूजी एखाद्या प्रशांत महासागरासारखे शांत आणि गंभीर दिसत होते."

दीक्षा प्राप्त झाल्यानंतर आपल्या मनात उचंबळणाऱ्या भावऊर्मींचे श्रीगुरूजींनी पुढील शब्दात वर्णन केले आहे : "सुवर्णाक्षरांनी नोंद करून ठेवावा असा माझ्या आयुष्यातील संस्मरणीय दिवस. कारण अगणित जन्मांनंतर प्राप्त होणारे भाग्य त्या दिवशी माझ्यावर प्रसन्न झाले नव्हते काय? आणि सद्-गुरूंची असीम कृपा त्या दिवशी माझ्यावरर झाली नव्हती काय? खरोखर, त्या दिवशीचे अनुभव अत्यंत पवित्र आहेत. इतके पवित्र की ते शब्दांनी व्यक्त करता यावयाचे नाहीत. सद्-गुरूंचा तो स्पर्श, त्यांचे ते प्रेम, आपला परमेश्वरी प्रसाद मला देत असतानाचा त्यांचा सारा आविर्भाव यांपैकी कशाचेही मला विस्मरण होणे शक्यच नाही. माझी सारी गात्रे कशी थरथरत होती. मला जाणवले की मी संपूर्णपणे बदलून गेलो आहे. एका मिनिटापूर्वी मी जो होतो, तो आता राहिलेलो नाही." ("Red letter day for me to be noted down in words of gold ! For, did not the fortune of countless millions of births smile upon me and confer upon me, the bliss of being graced by the Master? Indeed the experiences of that day are very sacred, to acred for words. I can never forget the touch, the love, the whole bearing of the Master as he

conferred upon me this favour of the blessedness and in every limbs I trembled. I feel changed. I am not what I was a minute ago !")

दीक्षेचा हा दिवस होता १३ जानेवारी १९३७ चा, मकर संक्रांतीच्या शुभपर्वाचा. नंतर २४ जानेवारीला संध्याकाळी पू. बाबांनी सफरचंद मागविले व याविषयी सूचना देऊ लागले. पण मध्येच एकदम थांबून उद्‌-गारले, "तुझे सर्वप्रकारे कल्याण होवो. तुला आत्मदर्शन होवो हीच माझी श्रीगुरूमहाराजांना प्रार्थना आहे. माझ्यात जे चांगले आहे ते सर्व मी तुला देत आहे. तुझ्यातील वाईटपणा मला दे. मला सुखाची इच्छा नाही. मला दु:ख हवे. मला तुझा कधिच विसर पडू नये, हीच माझी भगवंताला प्रार्थना आहे. माझा तुला आशीर्वाद आहे. आजच्या संध्याकाळचे सदैव स्मरण करीत राहा. सुख म्हणजे काय? बघ, आपल्यासाठी भगवानाने किती कष्ट सहन केले. श्रीकृष्णाचा जन्म झाला तोच आईचे दूध न पिता. त्यांना आईला सोडून गवळयाच्या घरी राहावे लागले. तेथे ते वाढले. परंतु, तेथेही त्यांना सुख मिळाले नाही. सतत असुरांद्वारे आलेली संकटे झेलावी लागली. त्यांच्या दु:खासमोर आपले दु:ख काय आहे? म्हणून मी दु:खाची इच्छा करतो." व्यक्तिगत सुखाची यत्किंचितही अपेक्षा न करता आणि संकटांनी खचून न जाता ईश्वरशरणेतेने जीवन जगण्याचा हा जो बोध पू. बाबांनी उत्स्फूर्तपणे दिला, त्याचे श्रीगुरूजींना कधी विस्मरण झाले नाही.

दीक्षा लाभली तरी श्रीगुरूजींनी सारगाछी आश्रमातच आपला गुरूसेवेचा नित्यक्रम चालू ठेवला होता. या जीवनात ते अगदी समरस होऊन गेले होते. स्वत:च्या सोयी-गैरसोयी, अडीअडचणी यांचा विचारही कधी त्यांना स्पर्श झाला नव्हता.

योगायोगानेच श्रीगुरूजींच्या सारगाछी आश्रमातील काळासंबंधी दोन आठवणी कलकत्याचे संघ-कार्यकर्ते डॉ. सुजित धर यांना उपलब्ध झाल्या. त्याचे असे झाले की, कलकत्याला अ.भा.विद्यार्क्षी परिषदेचा एक कार्यक्रम होता त्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित राहावे म्हणून विनंती करण्यासाठी डॉ. धर स्वामी निरामयानंद यांच्या आश्रमात गेले. त्यांच्या बोलण्यात सहज येउन गेले की, ते सारगाछी आश्रमात होते. तेव्हा डॉ. धर म्हणाले, "अहो, आमचे गुरूजीही काही काळ तिथे होते."

"कोण गुरूजी?"

"आमच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक"

. ते गोळवलकर? कुठं असतात ते सध्या? मी ऐकलं आहे की, कधी कधी ते कलकत्याला येतात. त्यांना सांगा की, त्यांना वेळ असेल तेव्हा मी भेटीला येईन."

पुढे प्रवासात श्रीगुरूजी कलकत्याला आले तेव्हा डॉ. धर यांनी स्वामी निरामयानंदांची इच्छा त्यांच्या कानावर घातली. श्रीगुरूजी आपल्या गुरूबंधूबद्दल ऐकताना एकदम पुलकित झाले. आणि म्हणाले, "त्यांना कळवा की, त्यांनी येण्याचे कष्ट करू नयेत. मीच त्यांच्या दर्शनार्थ आश्रमात येतो आहे." डॉ. धर यांनी त्याप्रमाणे कळविले व श्रीगुरूजी लगबगीने तयार झाले. जणू गुरूबंधूंच्या भेटीची दुर्निवार ओढ त्यांना लागली होती.

आम्ही आश्रमाकडे निघालो. आश्रमाकडे जाणारा बोळ जरा चिंचोळा असल्याने मोटार मोठया रस्त्यावरच थांबविली आणि पायीच आश्रमद्वाराकडे चालू लागलो. स्वामी निरामयानंद दाराबाहेर स्वागतासाठी उभे होते. त्यांना पाहताच गुरूजी अक्षरश: त्यांच्या दिशेने धावू लागले. दुसऱ्या बाजूने

स्वामीजीही धावले. दोघांचीही भेट झाली व त्यांनी एकमेकांना कडकडून आलिंगन दिले. सर्वजण आश्रमात गले. दोघेही गुरूबंधू भावविभोर होऊन एकमेकांशी बोलत होते. 'बाबां'च्या आठवणी काढत होते.

स्वामीजी : आठवतं तुम्हाला? (एका ठिकाणाकडे बोट दाखवून) इथं बाबा (श्री सद्-गुरू स्वामी अखंडानंदजी) पहुडले होते. त्यांचं डोकं माझ्या मांडीवर होतं.

"बाबांचं सारं सामान कुठं आहे? घडयाळ, कमंडलु....."

गुरूजी : सर्व काही आहे.

स्वामीजी : बाबांचा विसर तर नाही ना पडला? आज तुम्ही जे आहांत ते केवळ बाबांमुळे.

गरूजी : होय, आज मी जो आहे तो केवळ बाबांमुळेच.

श्रीस्वामीजी : तुम्हा बाबांकडून होतं नव्हतं ते सार घेतलंत !

डॉ. धर स्तिमित होऊन सारा रहस्यमय संवाद ऐकत होते. जी गोष्ट श्रीगुरूजींनी कधी विचारू दिली नाही, प्रकाशात येऊ दिली नाही, तिच्यावर थोडासा प्रकाश पडत होता. अगदी आकस्मिकपणे.

मग दुसऱ्या मजल्यावर सर्वजण जाऊन बसले. स्वामीजी म्हणाले, "बाबांची जन्मशताब्दी येते आहे. त्यावेही बाबांचे जीवन आणि कार्य यासंबंधी माहिती देणारे तीन खंड प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे. त्यांत तुमचा एक सविस्तर लेख असायलाच हवा. तसेच काही पैशांचही तरतूद करायला हवी. बेलूर मठ पैसे देण्यास तयार नाही." पुढे डॉ. धर यांना कळले की, त्या ग्रंथासाठी श्रीगुरूजींनी छापील १६ पानांचा एक विस्तृत लेख लिहून दिला. डॉ. धर यांनी तो शोधण्याचा प्रयत्न केला. पण श्रीगुरूजींचे नाव कुठेही नव्हते. चौकशी केली असता स्वामीजी म्हणाले, "ही हॅज केप्ट हिज वर्ड, यापेक्षा अधिक काही सांगितले तर, ते माझ्या टाळक्यात काठीच घालतील!"

स्वामीजी पुढे म्हणाले, "बाबा रागावलेले असले म्हणजे त्यांच्यापुढे जाण्याची आमची कोणाची हिंमत होत नसे. गुरूजी मात्र ते धैर्य करीत व बाबा शांत होत. तुमच्या गुरूजींनी बाबांवर जणू जादू केली होती!"

श्रीगुरूजी यांच्या सारगाछी येतील वास्तव्यात स्वामी अखंडानंदांनी त्यांच्यासंबंधी एकदा काढलेले उद्-गार तर एखाद्या भविष्यवाणीसारखेच वाटतात. एक आश्रमवासी बाबांजवळ म्हणाला, "तो जो नवा एम्.स्सी. झालेला शिष्य आला आहे ना, त्याने सगळी पितळेची भांडी कशी काही चकाचक घासली आहेत की, ती सोन्याच्या भांडयाप्रमाणे वाटतात."

बाबा उद्-गारले, "होय, पण लक्षात ठेवा. तो ज्या कामाला हात घालेल त्याचे सोनेच होऊन जाईल !"

बाबांची गुरजींनी जी सेवा केली तिच्याबद्दल बोलतांना स्वामीजी म्हणाले, "बाबा झोपण्यापूर्वी त्यांचे पाय चेपावे लागत. हे काम गुरूजी नित्यनेमाने करायचे. बाबांना चांगली झोप लागली म्हणजेच जागेवरून उठत. बाबा पटाटे ४ वाजता उठायचे. तत्पूर्वीच गुरूजी उठलेले असत. बाबांच्या खडावा ते बाबांच्या पायांशी ठेवीत. आम्हाला नवल वाटे, हा माणूस झोपतो की नाही?"

स्वामी अखंडानंद यांचे स्वास्थ मात्र यानंतर झपाटयाने ढासळत गेले. त्यांना मधुमेह व हृदविकार या दोहोंनीही ग्रासले होते आणि मग एक दिवस रात्री साडेतीन वाजेपर्यंत स्वामीजी अध्यात्माचे सारे रहस्य आपल्या उभय शिष्यांना ऐकवीत राहिले. यावेळी ते म्हणाले, "शेवट आता समीप आला आहे. यापुढे माझी वाणी कदाचित तुम्ही श्रवण करू शकणार नाही." दुखणे दिन-प्रतिदिन विकोपलाच जात राहिले. या दुखण्यात श्रीगुरूजींनी स्वामीजींची जी सेवा भूक, तहान, झोप, विश्रांती सारे काही विसरून गेली, तिचे वर्णन काय करावे? पुढे श्रीगुरूजी डॉक्टर हेडगेवार यांच्याबरोबर असताना डॉक्टर नाशिकनजीक देवळाली येथे डबल न्युमोनियाच्या जबर दुखण्याने ग्रासले गेले होते. त्यावेळीही श्रीगुरूजींनी अशीच जीव ओतून सेवाशुश्रुषा केली होती. संघ शिक्षावर्गात अगदी सामान्य संघ स्वयंसेवकांसाठीही त्यांनी रात्री जागून काढल्याचे प्रसंग घडले आहेत. या विलक्षण सेवाशीलतेचा परिणाम म्हणून त्यांच्यासंबंधीचा आदर दुणावत असे. झिजणे म्हणजे काय, याचा अर्थ साक्षात् उदाहरणाने कळत असे. पण प्रिय शिष्यांनी केलेल्या सेवाशुश्रूषेचा किंवा डॉक्टरी उपायांचा उपयोग स्वामी अखंडानंदाजी प्रकृती सुधारण्यासाठी होण्यासारखा नव्हता. स्वामीजींना मोठया कष्टाने कलकत्ता येथे आणण्यात आले. अखेर दि. १७ फेब्रुवारी १९३७ रोजी श्रीगुरूजींचे कृपासिंधू श्रीगुरूदेव देहाची खोळ टाकून देऊन स्वस्वरूपी विलीन झाले.

स्वामी अखंडानंदांच्यासहवासात गुरूजींनी सुमारे आठ महिने एका आध्यात्मिक ओढीने घालविले होते. तो महापुरूष आता अंतर्धात पावला होता. त्याने गुरूजींच्या जीवनाला एक स्थायी आध्यात्मिक अधिष्ठान दिले होते. श्रीगुरूजींचे व्यक्तिमत्व सखोल, संतुलित आणि प्रभावी बनविण्यास सारगाछीला घालविलेले हे आठ महिने नि:संशय अतोनात उपकारक ठरले. अखंडानंदजींच्या महानिर्वाणाने श्रीगुरूजींची मन:स्थिती मोठी विकल होऊन गेली. आता पुढचा मार्ग त्यांना शोधायचा होता. व्यक्तिगत प्रापंचिक जीवनाचा मार्ग विचारबाह्य ठरविला तरी जीवनाचे करणार काय? या प्रश्नाचे निश्चित उत्तर अद्याप दृष्टीपुढे नव्हते. पण एवढे खरे की, नगाधिराज हिमाल्यातील एकांताकडे धाव न घेता किंवा आश्रमात न राहता कर्मभूमी नागपूरला ते परतले, १९३७ च्या मार्च महिन्यात.

## ५. जीवनकार्याचा अंगीकार

सारगाछीहून श्रीगुरूजी नागपूरला परतले ते मनाच्या उदास अवस्थेतच. नागपूरला परतावेसे त्यांना का वाटले आणि सर्वार्थाने विरक्त संन्यासी बनून केवळ आत्मसुखाच्याच मागे ते का लागले नाहीत, याची मीमांसा कल्पनेनेच करावी लागते. त्यांच्या जीवनाला नागपूर येथे परतल्यानंतर जी दिशा लाभत गेली, तिच्याशी त्यांच्या पुनरागमनाची संगती लावावी गलाते. स्वामी अखंडानंद यांच्या देहत्यागानंतर काही दिवस ते कलकत्त्याच होते. त्या अवधीत त्यांच्या मनाची कोणती ओढाताण झाली, हे कळावयास मार्ग नाही. असे म्हणतात की, तुझे कार्यक्षेत्र नागपूरलाच आहे, असे त्यांच्या गुरूदेवांनी त्यांना एकदा सूचित करून ठेवले होते. श्रीअमिताभ महाराज यांच्या निवेदनानुसार, डॉ. हेडगेवार यांच्याबरोबर श्रीगुरूजींनी काम करावे असाच सद्-गुरूंचा आदेश होता. हिमाल्याची वाट स्वामीजींनीच बंद करून टाकली होती.

आपले कार्यक्षेत्र आणि कार्य यासंबंधी त्यांच्या प्रगल्भ विचारांची वावटळ यावेळी निर्माण झाली असेल, यात तर शंकाच नाही. डॉ. हेडगेवार यांच्याशी त्यांचा संपर्क १९३१ सालापासूनच आलेला होता. संघाचे काम त्यांनी जवळून पाहिलेले होते. डॉक्टरांशी त्यांच्याचर्चा झालेल्या होत्या. आपला देश, आपला समाज, राष्ट्रापुढील समस्या व त्यांचा निरास करण्याचा मार्ग यासंबंधी काही दिशा त्यांच्या विचारांना लाभलेली होती. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर डॉक्टर त्यांच्या विलक्षण, तर्ककठोर व अभ्यासजड अंत:करणात बोधपणे झिरपले होते. शिवाय गुरूजी तर्ककठोर आणि विलक्षण असले तरी "मऊ मेणाहून आम्ही विष्णूदास" या संतोक्तीनुसार सामाजिक दु:खांनी द्रवित होणारे अंत:करण त्यांना लाभले होते. रामकृष्ण, विवेकानंद, अखंडानंद आणि रामकृष्ण आश्रम यांची परंपरा माणसाला केवळ व्यक्तिगत मोक्षसाधनेतच गुंतून पडण्यास शिकविणारी नव्हती. या शिकवणुकीचा जिवंत ठसा गुरूजींच्या अंत:करणावर उमटलेला होता. समाजातील दीनदु:खी, दलित, पीडित यंनाच नारायण मानून त्यांच्या सेवेत जीवनाचा यज्ञ करण्यासाठी तळमळीची हाक स्वामी विवेकानंदांनी दिलेली होती. तेवढयासाठीच तो सारगाछीचा आश्रम अखंडानंदांनी स्थापन केला होता. हा संस्कार गुरूजींना समाजापासून तुटू न देण्यास, कर्ममय जीवनाची प्रत्यक्ष प्रेरणा देण्यास कारणीभूत ठरला असावा. सत्तेच्या राजकारणात गुरूजींना कधीच रस नव्हता. आध्यात्मिक अधिष्ठान सांभाळून आणि पुष्ट करून आपल्या मातृभूमीला जगात पुनश्च गौरवशाली बनविण्याचे जे सूत्र स्वामी विवेकानंदांनी सांगितले त्याकडे त्यांचा स्वाभाविक कल होता. या सूत्राशी संगती राखणारे, समाजसंघटनेचे व संस्कारप्रवण असे काम संघाच्या रूपाने उभे होत असलेले त्यांना दिसत होते. या कार्यात डॉक्टर हेडगेवारांचे जीवन चंदनासारखे झिजत असल्याचे त्यांनी अवलोकन केले होते.

डॉक्टर हेडगेवार, त्यांनी स्थापन केलेला आणि सर्वस्व ओतून सुमारे बारा वर्षे वाढविलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे खरोखरच देशाच्या कायापालटाचे एक भव्य दिव्य कार्य. १९२५ साली त्यांनी संघाची स्थापना केली ती परिपूर्ण विचारांती. तत्पूर्वी लोकजागृतीच्या आणि राष्ट्रविमोचनाच्या साऱ्या प्रचलित कामांचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतलेला होता. लहानपणापासूनच देशभक्तिची त्यांची भावना अत्यंत प्रखर. आपला देश ब्रिटिशांचा गुलाम आहे या वस्तुस्थितीची त्यांच्या अंत:करणाला अखंड बोच. देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटण्याकडे सगळी धाव. कधी ती शाळेतील 'वंदे मातरम्' घोषाच्या द्वारे तर कधी सीताबर्डीच्या किल्ल्ल्यावरील युनियन जॅक काढून तिथे भगवा ध्वज

फडकविण्याच्या विलक्षण कल्पनेच्या द्वारे अभिव्यक्त झाली. थोडी जाण येताच निरनिराळया आंदोलनांत ते सहभागी झाले. त्यांच्या उग्र प्रकृतीनुसार प्रारंभी ते आकृष्ट झाले शस्त्राचारी क्रांतिकारक चळवळीकडे. वंगभंगाच्या आंदोलनामुळे निर्माण झालेल्या वातावरणाचा असा परिणाम झालेले तरूण त्या काळी पुष्कळ होते. टिळकांचा 'केसरी' किवां शिवरामपंत परांजप्यांचा 'काळ' ही या तरूणांची स्फूर्तिस्थाने. डॉक्टर हेडगेवार कलकत्त्याच्या नॅशनल मेडिकल कॉलेजात दाखल झाले ते बंगालमधील क्रांतिकारक गोटात प्रत्यक्ष काम करावयास मिळावे या ओढीनेच. नि:स्वार्थपणे, अंग मोडून व सावध राहून देशासाठी काम करणे हा डॉक्टरांचा स्थायीभाव होता. पहिल्या महायुध्दाची समाप्ती होईपर्यंत सशस्त्र क्रांतीसाठी ते सतत धडपड करीत राहिले. पण प्रदिर्घ अनुभवांती त्यांची खात्री पटली की, मूठभर लोकांच्या गुप्त संघटनेने, साहसाने किंवा हौतात्म्याने गुलामीच्या शृंखला तोडता यावयाच्या नाहीत. स्वातंत्र्यप्राप्तीची आकांक्षा व प्रखर देशभक्तीची भावना सगळया समाजातच व्यापक प्रमाणावर जागृत करावी लागेल. क्रांतिकारक चळवळीचा दाहक मार्ग समाजशक्ती जागी करण्यास उपयुक्त ठरण्यासारखा नाही. क्रांतिकारक आंदोलनाचे जीवनातील हे पर्व डॉक्टरांनी संपविले आणि ते काँग्रेसच्या चळवळीत शिरले. त्यावेळी टिळकपक्षाच्या बाजूने ते उभे राहिले. विदर्भात टिळकपक्षाचे जे पुढारी होते त्यांचा जोमाने पाठपुरावा त्यांनी केला. वृत्तपत्रे चालविली, दौरे केले, जहाल भाषणे दिली. परिचयाचे क्षेत्र वाढविले. लोकसंग्रहाचे धोरण ठेवले. डॉक्टरकीची परीक्षा उत्तीर्ण होऊनही व्यक्तिगतप्रपंच त्यांनी थाटला नाही की व्यवसायाचा व्याप त्यांनी उभारला नाही.

१९२० ची नागपूर काँग्रेस आणि नंतर महात्माजींच्या नेतृत्वाने झालेले असहकारचे आंदोलन हा डॉक्टरांच्या जीवनात घडून येणाऱ्या संक्रमणातील एक महत्त्वाचा टप्पा. १९२० च्या नागपूर काँग्रेसचे अध्यक्षपद लोकमान्यांनी भूषवावे अशी जय्यत तयारी विदर्भात झालेली होती. पण टिळकांच्या आकस्मिक मृत्यूने सगळी परिस्थिती बदलून टाकली. अरविंदबाबूंचे मन काँग्रेसचे अध्यक्ष बनण्यासाठी वळविण्याचा एक प्रयत्न डॉक्टर मुंजे आणि डॉक्टर हेडगेवार यांनी करून पाहिला. पण त्याला अरविंदाबाबूंच्याच नकारामुळे यश प्राप्त झाले नाही. तरीही डॉक्टरांनी अधिवेशनात उत्साहाने भाग घेतला, स्वयंसेवक दलाचे दायित्व त्यांनी उत्तम प्रकारे सांभाळले. एवढेच नव्हे तर खिलाफत चळवळीची अनिष्टता जाणवत असतानाही असहकार-आंदोलनात ते आघाडीवर राहिले. न्यायाल्यात ओजस्वी वक्तव्य त्यांनी दिले आणि राजद्रोही भाषण केल्याबद्दल तुरूंगवास पत्करला. स्वराज्याची चळवळ मतभेद बाजूला ठेवूनही पुढे न्यावी हीच त्यांची प्रांजळ भूमिका होती. डॉक्टर तुरूंगातून मुक्त झाल्यावर त्यांना दिसले की, खिलाफत-आंदोलन काँग्रसेने दत्तक घेतल्याचा परिणाम मुस्लिम जातीयवाद अधक कट्टर होण्यात झालेला आहे. हिंदू समाजावरील आक्रमणे वाढली आहेत. काँग्रेसची मुस्लिम अनुनयाची नीती आत्मघातकीपणाची ठरली आहे. आंदोलनातून प्रत्यक्षपणे काहीच निष्पन्न न झाल्यामुळे व हिंसाचाराच्या कारणास्तव ते आकस्मिकपणे मागे घेतले गेल्यामुळे लोकांत वैफल्य पसरलेले आहे. पुन्हा जो तो राष्ट्रासाठी त्यागाची भावाना विसरून स्वार्थसाधनात मग्न होऊ लागला आहे.

आंदोलनाचे हे जे विविध अनुभव डॉक्टर हेडगेवारांना आले, राजकीय नेत्यांची जी वरवरचा विचार करण्याची पध्दती त्यांनी अवलोकन केली, आणि राष्ट्रासंबंधीच्या सखोल आणि सर्वांगीण चिंतनाचा जो विदारक अभाव त्यांना जाणवला, त्यातून काही ठाम निष्कर्ष त्यांनी काढले. त्या आधारावर एका नव्याच पध्दतीने राष्ट्रव्यापी संघटना उभी करण्याचा अवघड संकल्प त्यांनी केवळ

स्वत:च्या निर्धारशक्तीवर विसंबून सोडला. त्यांचे निष्कर्ष स्पष्ट आणि इतिहासावर व अनुभवावर आधारलेले होते. यापैकी पहिला निष्कर्ष असा की, भारताच्या पारतंत्र्यासाठी इतरांना दूषण देत न बसता आपल्याच अवगुणांमुळे आपला घात झाला, हे मान्य केले पाहिजे. राष्ट्रीय चरित्र्याचा अभाव दूर करून उत्कट देशभक्तीचा संस्कार समाजावर घडविणे ही मूलभूत राष्ट्रीय आवश्यकता आहे. त्यांचा दुसरा निष्कर्ष होता : इंग्रजी सत्तेचा केवळ विरोध म्हणजे देशभक्ती नव्हे. या राष्ट्राच्या स्वरूपाची भावात्मक (पॉझिटिव्ह) कल्पना लोकांच्या मनावर ठासविली पाहिजे. इंग्रज गेल्यानंतर देशात बेशिस्त, स्वाथीपणा व शुद्र कलह निर्माण होण्याचा संभव अशा भावात्मक आदर्शवादाने उरावयाचा नाही आणि तिसरा महत्वाचा विचार अतिशय छातीठोकपणे त्यांनी दिला तो हा की, हिंदू संस्कृती हाच ज्याचा आत्मा आहे असे आपले इतिहाससिध्द हिंदू राष्ट्र आहे. या राष्ट्रात हिंदू समाजाला निर्भयपणे, गौरवाने आणि त्याच्या सांस्कृतिक आदर्शांना अनुसरून राहता आले पाहिजे. हिंदू समाजाकडे कोणी वाकडा डोळा करू शकणार नाही, एवढे आपण समर्थ झाले पाहिजे. हे सामर्थ्य राष्ट्रभक्तीने रसरसलेल्या ध्येयवादी संघटनेतूनच प्राप्त होईल. अशी संघटना उभारण्यासाठी निव्वळ व्याख्यानबाजीचा किंवा सभांचा आणि ठरावांचा उपयोग नाही, हे तर अनुभवास आलेच होते. म्हणून दैनंदिन संस्कार करणारी शाखात्मक कार्यपध्दती त्यांनी संघात प्रचलित केली. ही पध्दती म्हणजे डॉक्टर हेडगेवारांच्या प्रतिभेने देशाला दिलेली अमोल देणगीच होय. शाखात्मक कार्यविना संघ उभा होणे अशक्य ठरले असते. एखदा खूप विचारमंथनानंतर 'संघकार्य हेच जीवनकार्य' असा निर्णय होताच डॉक्टरांनी त्यावर लक्ष केंद्रित केले. जीवनाचा क्षण-न्-क्षण व शक्तीचा कण-न्-कण त्यासाठी वेचला.

थोडक्यात, संघाच्या जन्माची व वाढीची ही पार्श्वभूमी आहे. यात प्रेरणा देणारे व संघटनात्मक कार्यात जिवंत आदर्श म्हणून दृष्टीपुढे असलेले व्यक्तिमत्व डॉक्टरांचेच होत. श्रीगुरूजी सारगाछीवरून नागपरूला आले, त्यानंतर कोणा एका व्यक्तीने त्यांना त्यांच्या जीवनकार्याचा साक्षात्कार घडविला असेल, तर ती व्यक्ती म्हणजे डॉक्टरच. डॉक्टरांच्या निर्मण आणि ध्येयसमर्पित जीवनाशी तारा जुळत गेल्या आणि अखेर दोन्ही जीवने एकरूप होऊन गेली. कोणीही स्तिमित होऊन जावे असा हा दूरपरिणामामी चमत्कार उण्यापुऱ्या तीन वर्षांच्या अवधीत घडून गेला. गुरूजी परत आले डॉक्टरांना अत्यानंद झाला. गुरूजींनी सारगाछीला जे काही आत्मिक बल सततच्या ध्यानधारणादी साधनेने व सद्-गुरूंच्या दीक्षाप्रसादाने मिळविले, त्याचे महत्त्व डॉक्टरांच्या दृष्टीनेही उपेक्षणीय नव्हते. त्यांची इच्छा एकच होती की गुरूजींची सारी गुणसंपदा, त्यांचे सारे तपोबल, त्योचे सारे भौतिक आणि आध्यात्मिक ज्ञान यांची जोड संघाच्या कामाला आणि पर्यायाने राष्ट्राच्या सेवेला मिळावी. संघाचे कार्य हे एकमेव जीवनकार्य म्हणून श्रीगुरूजींनी अंगीकारावे. गुरूजी नागपूरला आल्यानंतर त्यांच्या आणि डॉक्टरांच्या भेटीगाठी सुरू झाल्या. आध्यात्मिक जीवनाचा अनुभव घेतलेल्या ज्ञानी माणसाने केवळ व्यक्तिगत सुखानुभूतीत डुंबून न जाता समाज व राष्ट्र यांच्या उत्थानार्थ सगळे सामर्थ्य पणाला लावावे, ही भूमिका डॉक्टरांनी परत एकदा श्रीगुरूजींपुढे मांडली व आता गुरूजींच्या अंत:करणाला ती अधिक भिडली. डॉक्टरांचे स्वत:चे जीवन ते पाहातच होते. संकुचित 'मी' चा लोप होऊन समष्टिरूप बनलेले ते एक विरागी आणि कर्मयोगी जीवन होते. डॉक्टरांना स्वत:साठी काही नको होते. तरीही काही दिवस गुरूजींचा स्वच्छंदपणा कायम राहिला. कधी रामकृष्ण आश्रमता जात, कधी बासरीवादनात रंगत, कधी मित्रांच्या मैफिलीत वेळ घालवीत. कधी पुस्तकांच्या ढिगाऱ्यात हरपून जात, तर कधी एकांतात ध्यान लावून बसत. याही परिस्थितीत संघाशी त्यांची जवळीक वाढतच होती. याच काळात स्वामी भास्करेश्वरानंदांच्या इच्छेनुसार त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेतील

भाषणांचा मराठी अनुवाद त्यांनी तडकाफडकी करून लिहून पूर्ण दिला होता. 'वुई फॉर अवर नेशनहुड डिफाइन्ड' हा प्रबंधही त्यांनी यापूर्वी असाच लिहून पूर्ण केला होता. त्यांचा कामाचा झपाटा विलक्षण असे. बाबाराव सावरकरांचे 'राष्ट्रमीमांसा' हे मराठी पुस्तक त्यांनी एका रात्रीत इंग्रजीत अनुवादित करून नागपूरचे विख्यात वकील व हिंदूत्ववादी कार्यकर्ते श्री. विश्वनाथराव केळकर यांच्यापुढे ठेवले होते व सगळयांना थक्क करून सोडले होते. गुरूजींना हळूहळू कामात गुंतवीत डॉक्टरांनी १९३८ च्या संघ शिक्षावर्गाच्या वेळी नागपूरला सर्वाधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती केली.

श्रीगुरूजींचा कौल संघकार्याच्या बाजूने का पडला यावर त्यांनी अगदीच प्रकाश टाकला नाही असे नाही. 'वुई ऑर अवर नेशनहुड डिफाइन्ड' या पुस्तकासंबंधी, १९३९ मध्ये, गेल्या पिढीतील सुप्रसिध्द मराठी लेखक व दै.'तरूण भारत' चे संपादक कै. ग. त्र्यं. तथा भाऊसाहेब माडखोलकर यांच्याशी श्रीगुरूजींची प्रदीर्घ चर्चा झाली. या प्रसंगी डॉ. हेडगेवार स्वत: उपस्थित होते. ग्रंथावरील चर्चा आटोपल्यानंतर, श्रीगुरूजींच्या अनुमतीने, भाऊसाहेबांनी श्रीगुरूजींना एक व्यक्तिगत प्रश्न विचारला. श्रीगुरूजींच्या महानिर्वाणानंतर नागपूरच्या दै. 'तरूण भारत' मध्ये (दि. १६.६.७३) 'त्रिवेणी संगम' या मथळयाचा एक विस्तृत लेख भाऊसाहेबांनी लिहिला. त्यात व्या व्यक्तिगत प्रश्नाचा व त्यावर श्रीगुरूजींनी दिलेल्या उत्तराचा उल्लेख आहे. तो महत्त्वाचा असल्याने मूळ लेखातून येथे जसाचा तसा उद्-घृत करीत आहे.

माडखोलकर लिहितात, मी विचारले, "आपण मध्यंतरी संघाचे इथले काम सोडून देऊन बंगालमध्ये रामकृष्ण आश्रमात गेला होतात, असे मी ऐकले. तेथे आपण स्वामी विवेकानंदांच्या गुरूबंधूंकडून दीक्षाही घेतली, असे मला समजले. पण मग आपण रामकृष्ण आश्रम सोडून, परत संघात येऊन कसे दाखल झालात? आश्रमाच्या भूमिकेपेक्षा संघाची भूमिका अगदी भिन्न आहे. असे आपल्याला वाटत नाही का?" माझा हा प्रश्न ऐकताच श्रीगुरूजी एकदम स्तब्ध होऊन गेले. त्यांनी काही क्षण अर्धोन्मीलित दृष्टीने विचारही केला. जणू ते उन्मनीत गेलेले होते. नंतर काही वेळाने त्यांनी संथपणे बोलायला सुरूवात केली.

ते म्हणाले, "आपण अगदी नेमका प्रश्न विचारलात हा. पण आश्रम आणि संघ यांच्या भूमिकांत फरक आहे की नाही, हे माझ्यापेक्षा डॉक्टरसाहेबच अधिक अधिकाराने सांगू शकतील. कारण क्रांतिकारक चळवळीच्या काळातच मुळी ते कलकत्त्यात राहत होते. आणि त्यांचे क्रांतिकारकांशी घनिष्ठ संबंधही होते. आपण भगिनी निवेदिता यांचे 'आक्रमक हिंदूधर्म' - Aggressive Hinduism हे पुस्तक वाचलेच असेल. त्याचप्रमाणे क्रांतिकारकांशी त्यांचा किती निकटचा संबंध होता हेही आपणाला माहिती असेल, असे मी समजतो. माझा ओढा, अध्यात्माइतकाच राष्ट्रसंघटनेच्या कार्याकडेही प्रथमपासूनच आहे. ते कार्य संघात राहून जास्त परिणामकारकपणे मी करू शकेन, असा अनुभव बनारस, नागपूर आणि कलकत्ता येथे असताना मला आला. म्हणून मी संघकार्याला स्वत:ला वाहून घेतले. स्वामी विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाशी, उपदेशाशी किंवा कार्यपध्दतीशी माझे हे वर्तन सुसंगत आहे असे मला वाटते. माझ्यावर त्यांच्याइतका प्रभाव दुसऱ्या कोणत्याच विभूतीच्या जीवनाचा किंवा उपदेशाचा पडलेला नाही. संघात राहून त्यांचेच कार्य मी पुढे चालवीन असा विश्वास मला वाटतो." अशी रीतीने आपले धोरण विशद करीत असताना, श्रीगुरूजींच्या डोळयांत जी आत्मप्रत्ययाची लकाकी त्यावेळी खेळत होती ती मी कधी विसरणार नाही. डॉक्टरसाहेबही अगदी गंभीर होऊन गेले होते.

श्रीगुरूजींच्या भिन्न दिशांनी ओढ घेणाऱ्या जीवनातील हा निर्णाय संक्रमणकाळ होता. संक्रमणाचे अंतिम स्वरूप १९३८ मधील या संघ शिक्षावर्गाने निश्चित करून टाकले असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. गुरूजींची सारी संघानुकूल गुणसंपदा या वर्गाच्या निमित्त्याने स्वयंसेवकांसंबंधीचे वात्सल्य, अनुपम सेवाशीलता, असीम कार्यक्षमता, चित्तवृत्तीची अखंड प्रसन्नता, अमोघ वत्कृत्व, सखोल अध्ययनाची व चिंतनाची त्या वत्कृत्वाला असलेली बैठक, चर्चापाटव इत्यादी किती तरी गुणांचे दर्शन सर्वांनाच त्या काळात घडून गेले. डॉक्टरांच्या अपेक्षेनुसार ते घडले. मुख्य म्हणजे डॉक्टरांचा अखंड सहवास त्यांना लाभत गेला. आपल्या नेत्याचे जीवन ते जवळून पाहात गेले आणि स्वत:चे कानेकोपरे घासत गेले. जाणतेपणाने स्वत:त आवश्यक आणि इष्ट परिवर्तन करीत गेले. याचे कारण हेच की, जीवनात कोणता मार्ग अनुसरावयाचा यासंबंधी त्यांच्या मनातील अनिश्चितता संपली होती. डॉक्टरांच्या जीवनाचा कित्ता त्यांनी दृष्टीपूढे ठेवला होता. भारताच्या सर्व भौतिक आणि आमिक प्र नांचे उत्तर संघकार्यातच आहे ही श्रध्दा सुस्थिर झाली होती. मार्ग निश्चित झाल्यावर त्यावरून पुढे पुढेच जाण्याची गुरूजींची विलक्षण ताकद निर्विवाद होती. विद्यार्थिदशा, प्राध्यापकीय सेवा, सारगाछीची साधना अशा प्रत्येक टप्प्यात त्यांची ही अंगभूत ताकद पुन:पुन्हा प्रत्ययास येऊन गेलेली होती. आजवर प्रश्न होता तो मार्गाच्या निवडीचा. एकदा तो प्रश्न कायमचा निकालात निघाला व फार थोडया अवधीत 'डॉक्टरानंतर कोण?' या प्रश्नाचे उत्तरही मनोमन संगळयांना कळून चुकले.

याची पहिली प्रचिती आली १९३९ च्या फेब्रुवारी महिन्यात वर्धा जिल्ह्यातील सिंदी येथे डॉक्टरांनी भरविलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीच्या निमित्त्याने. ही बैठक सतत दहा दिवस चालू होती आणि डॉक्टरांचे प्रमुख प्रौढ आणि तरूण सहकारी तिला उपस्थित होते. संघाच्या कार्याची प्रगती, संघशाखेवरील कार्यपध्दती, आज्ञा आणि प्रार्थना इ. अनेक गोष्टींवर मनमोकळी चर्चा व्हावीं आणि सर्वानुमते आवध्यकत ते निर्णय करावे, असा या बैठकीचा उद्देश होता. डॉक्टरांचे उजवे हात समजले जाणारे श्री. अप्पाजी जोशी आणि श्री. बाळासाहेब देवरस (भूतपूर्व सरसंघचालक) हे दोघेही सिंदीच्या विचारविनिमयात सामील होते. डॉक्टरांचे त्यातल्या त्यात नवे सहकारी श्रीगुरूजी यांनाही निमंत्रित करण्यात आले होते. बैठकीपुढे एकेक विषय क्रमाक्रमाने येत गेला व त्यावर दिलखुलास चर्चा होत गेली. ज्याला जे विचार मांडावयाचे असतील ते त्याने मोकळेपणाने मांडावेत आणि डॉक्टरांनी त्या विषयाचा समारोप करून ग्राह्य काय, अग्राह्य काय यासंबंधी निर्णय द्यावा, अशी रोज सुमारे आठ तास चालणाऱ्या या बैठकीच्या कामकाजाची पध्दती होती. या बैठकीच्या कामकाजात गुरूजींनी मनापासून भाग घेतला. न पटणाऱ्या विचारांवरील त्यांचे हल्ले आवेशपूर्ण आणि धारदार असत. पण एकदा डॉक्टरांनी समालोचन करून निर्णय दिला की ते शांत वृत्तीने अगदी मनापासून तो निर्णय स्वीकारीत.

या बैठकीचा विषय निघाला असता एकदा मा. अप्पाजी जोशी म्हणाले, 'संघस्थानावर स्वयंसेवकांनी ध्वजाला प्रमाण केल्यानंतर कोणाला प्रणाम करावा यासंबंधी पध्दती ठरविण्याचे काम सुरू होते. काही बाबतीत माझे मत व गुरूजींचे मत एकमेकांशी जुळत नव्हते. गुरूजींनी त्यांचे मत हिरीरीने व घटनात्मक संकेतांचा आधार देऊन मांडले. संघाच्या कौटुंबिक पध्दतीच्या रचनेनुसार कोणती पध्दत योग्य हे मी प्रतिपादन केले. अखेर डॉक्टरांनी निर्णय दिला तो मला अनुकूल होता. गुरूजींचे मत अग्राह्य ठरले होते. मी गुरूजींच्या चेहऱ्याकडे अतिशय बारकाईने पाहत होतो. त्यांच्या चेहऱ्यावर नाराजाची एक छटाही मला दिसली नाही. पुढे बोलताना कटुता लेशमात्र डोकावली नाही. असा संयम, चित्ताचा समतोलपणा आणि नेत्यावरील विश्वास हा फार मोलचा गुण आहे. सिंदीच्या याच

मुक्कामात डॉक्टरांनी मला विचारले, "गुरूजी भावी सरसंघचालक म्हणून कसे वाटतात अप्पाजी?" मी चर्चेतील माझ्या निरिक्षणाचा निष्कर्ष सांगितला आणि 'अगदी उत्तम' असे मत देऊन टाकले."

भावी सरसंघचालक कोण हा विचार या वेळी डॉक्टरांच्या मनात येण्याचे कारण उघडच होते. संघाच्या स्थापनेपासून केलेया अविश्रांत परिश्रमांनी ते थकले होते. १९३२ सालापासून दुखण्यांनी त्यांची पाठ जवळजवळ सोडलेली नव्हतीच. केवळ दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर ते ठरलेले कार्यक्रम पार पाडीत होते. कार्यवाढीचा अहोरात्र प्रयत्न करीत होते. बैठकीत कोणाला काही जाणवू देत नव्हते आणि प्रसन्न चेहऱ्याने वावरत होते. पण शरीराची झालेली अवस्था त्यांना कळत होती. पुढची काहीतरी योजना करण्याची निकड ते उपेक्षू शकत नव्हते.परिश्रमपूर्वक उभारलेली संघटना वाढवावयाची असेल तर समर्पित त्याचप्रमाणे गुणसमृध्द नेतृत्वाची परंपरा आवश्यक असते. माणसे कामे उभी करतात पण ती ध्येयदृष्टीने पुढे चालविणारी माणसे नसल्याने त्यांची वाताहत होऊन जाते, हे डॉक्टर ठिकठिकाणी पाहत होते. गुरूजींनी १९३८ नंतर संघकार्य हे आपले मानले आणि सदैव डॉक्टरांबरोबर राहून केवळ संघकार्यावरच लक्ष केंद्रित केले, तेव्हा डॉक्टरांची चिंता संपली.  सिंदीला त्यांच्या संकल्पित योजनेवार अप्पाजींसारख्या अनुभवी व संघाशी तन्मय होऊन गेलेल्या ज्येष्ठ सहकाऱ्याच्या पसंतीचे शिक्कामोर्तबही झाले. संघाच्या दैनंदिन शाखांवरील कामकाजाचे स्वरूप यथार्थाने अखिल भारतीय करण्याच्या दृष्टीने अगदी प्रार्थनेपासून तो कार्यक्रमातील आदेशवाचक शब्दप्रयोगापर्यंत सर्व गोष्टीत योग्य बदल करण्यात आला. आजची संघाची संस्कृत प्रार्थना सिंदीलाच स्विकारण्यात आली. हे जसे सिंदींचे दूरगामी महत्त्व तसेच संघाच्या भावी सरसंघचालकांची निवड डॉक्टरांनी सिंदीलाच मनोमन पक्की केली, ही सिंदीची आणखी एक महत्त्वपूर्ण देणगी.

सिंदीची बैठक आटोपल्यानंतर डॉक्टरांनी गुरूजींना बंगालमध्ये संघकार्य सुरू करण्यासाठी कलकत्ता येथे पाठविले. श्रीगुरूजींनी सुमारे एक महिना कलकत्तात अखंड भ्रमंती केली. वाहनखर्चासाठी संघाजवळील तुटपुंजा पैसा खर्च होऊ नये म्हणून रोज वीसपंचवीस मैलांची भटकंती ते पायीच करीत. अखंर १९३९ च्या पाडव्याला कलकत्ता येथे संघाची पहिली शाखा सुरू करण्यात गुरूजींनी यश मिळविले. पण फार दिवस त्यांना कलकत्त्यात राहता आले नाही. उन्हाळयातील वार्षिक संघ शिक्षावर्गाचे वेध लागले आणि एप्रिलमध्ये डॉक्टरांनी त्यांना नागपूरला परत बोलावून घेतले. संघ शिक्षावर्गात या वर्षीही सर्वाधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली.१९३५ साली पुणे येथील संघ शिक्षावर्ग सुरू झाल्यापासून डॉक्टरांनी अशी प्रथा ठेवलेली होती की पुणच्या वर्गाचे पहिले पंधरा दिवस तेथे राहावयाचे आणि नंतर नागपूरच्या वर्गात तो वर्ग संपेपर्यंत थांबावयाचे. त्यांची प्रकृती नीट नव्हती आणि विश्रांतीची फार गरज होती. पण नागपूरचा वर्ग संपताच पूण्याला 'भगवा झेंडा' या चित्रपटाच्या उद्-घाटनासाठी येण्याचे त्यांनी मान्य केलले होते. अखेर असे ठरले की, उद्-घाटनाच्या कार्यक्रमांनंतर पुण्याहून परतताना नासिकनजीक देवळाली येथे काही दिवस डॉक्टरांनी विश्रांती घ्यावयाची. या प्रवासात गुरूजी डॉक्टरांच्या सोबतीला होते. पुण्याचा कार्यक्रम उत्तमप्रकारे पार पडला. पुणे सोडतेवेळी कार्यकर्त्यांची एक बैठक डॉक्टरांना निरोप देण्यासाठी झाली. या बैठकीत डॉक्टरांनी गुरजींनाच हिंदीतून दोन कहाण्या ऐकविण्यास संगितले. ठरल्याप्रमाणे विश्रांती घेण्याच्या उद्देशाने गुरूजींसह डॉक्टर देवळालीला गेले.

पण विश्रांतीसाठी देवळालीस गेलेल्या डॉक्टरांना ताप येऊ लागला. तापाची तीव्रता वाढतच गेली. नासिकच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी केली. औषधोपचार नेटाने केला जात होता. डॉक्टर

मंडळींना प्रकृतीची चिंता वाटू लागली. आशा सोडण्याकडे त्यांचा कल झुकू लागला. गुरूजी मात्र विचलित न होता खंबीरपणे आपल्या नेत्याची सुश्रूषा आणि औषधपाणी करीत होते. सेवेत त्यांनी कोणतीही उणीव राहू दिली नाही. ज्वर खूप चढून डॉक्टरांची शुध्द हरपे. वातात करावी तशी बडबड ते करती. गुरूजी सारखे त्यांच्या उशापायथ्याशी असत. आपल्या मोक्षगुरूंची अशीच एकाग्र सेवा त्यांनी दोन अडीच वर्षीपूर्वी सारगाछीला व कलकत्त्याला केली होती. स्वामी अखंडानंद या जीवघेण्या दुखण्यातून सावरू शकले नाहीत. यावेही मात्र गुरूजींचे परिश्रम फळास आले. औषधांचा परिणाम म्हणून असेल, गुरूजींना आणखी सुमारे एक वर्ष डॉक्टरांचे संस्कारी साहचर्य लाभावयाचे होते म्हणून असेल, नाशिक-देवळालीच्या हजारो स्वयंसेवकांच्या संकलित इच्छाशक्तीचा प्रभाव म्हणून असेल वा खुद्द डॉक्टरांच्या आयुष्याची दोरी बळकट होती म्हणून असेल, पण तापाला उतार पडू लागला. धोका टळला. डॉक्टरांवर असीम प्रेम करणाऱ्या स्वयंसेवकांच्या चेहऱ्यावरील चिंतेची अभ्रे दुर झाली व तेथे आंनद पसला. समाधानाचा नि:श्वास सगळयांनी टाकला.

श्रीगुरूजींच्या रूग्णसेवेसंबंधात आणखीही एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. नागपूरला धंतोली भागातील श्री. वामनराव वाडेगावकर या अंध गृहस्थांशी श्रीगुरूजींचे अतिशय निकटचे संबंध होते. इतके की त्यांना सायकलच्या सीटपुढील दांडयावर बसून नागपुरात ठिकठिकाणी नेण्यास श्रीगुरूजी सदैव तत्पर असत. वाडेगावकरांनी एक अंधशाळा सुरू केली होती. १९३४-३५ च्या सुमारास वामनरावांवर एक फार मोठी शस्त्रक्रिया करवून घेण्याची पाळी आली. ते स्वत: आंधळे, परावलंबी, आता एवढी मोठी शस्त्रक्रिया झाल्यावर आणखी शुश्रूषा कोण करणार याची चिंता त्यांना निर्माण झाली. अगदी निकटचा मित्र म्हणून त्यांनी श्रीगुरूजींना शस्त्रक्रियेसंबंधी सांगितले. मित्रप्रेमापोटी शस्त्रक्रियेपूर्वीच श्रीगुरूजी वामनरावांकडे राहावयास गेले. मुंबईच्या शस्त्रक्रियेच्या वेळी त्यांच्याजवळच रात्रंदिवस राहिले. वामनाव गहिवरून सांगत, "आहे, या एम्.एस्सी. झालेल्या महापंडिताने माझी सगळी सेवाशुश्रृषा इतकी हळुवारपणे केली की मी जन्मभर ती विसरू शकणार नाही. विशेषत: ते मलमूत्राच्या कामी मला साहाय्य करू लागले की मला अगदी मेल्याहून मेल्यासारखे होई. प्रत्येक वेळी मी त्याना की म्हणू लागलो की त्यांचे ठराविक उत्तर असे. 'त्यात काय झाले? मी नाही का माझ्या देहाची साफसाफाई करत? तुमचा देह आणि माझा देह यांत काय अंतर आहे ' ही आठवण सांगताना वामनरावांच्या डोळयांच्या खाचांतून अश्रूंचा ओघळ निघायचा आणि कंठ भरून यायचा. तसे वामनरावांना संघासंबंधी मुळीच प्रेम नव्हते. पण श्रीगुरूजी सरसंघचालक झाले तेव्हापासून 'आमचा संघ' असा शब्दप्रयोग आपोआप त्यांच्या तोंडून ऐकू येऊ लागला ! श्रीगुरूजींच्या ठायी प्रथमपासूनच सेवावृत्ती कशी बाणलेली होती, हे निदर्शनास आणून देण्यासाठीच हा प्रसंग येथे निवेदन केला आहे. कितीतरी अगदी सामान्य स्वयंसेवकांना व कार्यकर्त्यांनाही त्यांच्या या अंगभूत सेवावृत्तीचा अनुभव आलेला आहे.

गुरूजींच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे डॉक्टरांच्या या गंभीर आजाराने त्यांना डॉक्टरांचे एक नवे आणि ध्येयसमर्पिततेच्या अंतिम कसोटीला उतरवणारे दर्शन आकस्मिकपणे घडविले. गुरूजींनीच स्वत: डॉक्टरांचे आगळेपण वर्णन करतांना हे सांगितले आहे. तापात शुध्द हरपली व माणूस बडबड करू लागला की तो काय बोलेल याचा नेम नसतो. पुष्कळदा, दडलेले विकारविचार अशा बोलण्यात प्रकट होतात. त्यावेळी डॉक्टरांचे असे बेशुध्दीतील बडबडणे देखील संघकार्यासंबंधी असे. त्यांच्या खोल अंतर्मनात देखील संघाविना व राष्ट्राविना अन्य कोणत्याही गोष्टीला स्थान नव्हते. अशा संघमय

जीवनाचे ते निर्णायक प्रत्यंतर होते. डॉक्टरांचे हे दर्शन गुरूजींना असामान्य वाटले. या महापुरूषाविषयीच्या श्रध्देने त्यांचे मन ओतप्रोत होऊन गेले. आता संघ, डॉक्टर आणि गुरूजी यांचे तादात्म्य झाले आणि कामाच्या जबाबदारीचा जेवढा वाटा उचलता येईल तेवढा उचलण्यास गुरूजी निर्धाराने, संपूर्णत: समर्पित भावनेने सिध्द झाले.

हा कार्यभार रीतसर त्यांच्या खांद्यावर येऊन पडावयाचाच होता. दुखण्याला उतार पडला व जरा बरे वाटू लागले तेव्हा डॉक्टर नाशिक-देवळालीच्या समस्त कार्यकर्त्यांचा निरोप घेऊन नागपूरला निघाले. ७ ऑगस्टला ते नागपरूला पोहोचले तेव्हा गुरूजीवंर अधिक कार्यभार सोपविण्याचे डॉक्टरांनी ठरविलेले होतेच. नागपूरला येताच त्यांच्या त्या दिशेने हालचारी सुरू झाल्या. कार्यकर्त्यांच्या बैठकीत सुचक उद्-गार डॉक्टर काढू लागले. आणि अखेर गुरूपोर्णिमा महोत्सवात गुरूजींची संघाचे सरकार्यवाह म्हणून नियुक्ती त्यांनी घोषित केली. डॉक्टरांची क्षीणता, प्रकृतिमानाची अस्थिरता व कामाचा ताण सहन करण्याची त्यांची असमर्थता ध्यानात घेता यापुढे सरकार्यवाह गुरूजी यांनाच प्राय: सारे काम पाहावे लागणार हे स्पष्टपणे दिसत होते.

## ६. सरसंघचालकपदाचा स्वीकार

सरकार्यवाह या नात्याने गुरूजींचा कार्यकाल तसा अल्पच. उणेपुरे दहा महिने. यावेळीही कार्य प्रगतिपथावर होते. मध्यप्रांत आणि महाराष्ट्र यांत तर शाखा विस्तारल्या होत्याच, पण पंजाब, दिल्ली, कराची, पाटणा, कलकत्ता, लखनौ इत्यादी दूरच्या ठिकाणी तरूण कार्यकर्ते या ना त्या निमित्ताने पोहोचले होते. त्यांनी कामाला प्रारंभ केला होता. संघाला यथार्थाने अखिल भारतीय स्वरूप प्राप्त होऊ लागले होते. स्वयंसेवकांची संख्या लाखाच्या घरात पोहोचली होती. कार्य योग्य मार्गावर ठेवणे, अधिक ठिकाणी पोहोचविणे व कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणे यासाठी डॉक्टरांचा सर्वत्र संचार होण्याची आवश्यकता होती. पण प्रकृतीने डॉक्टरांचा नाइलाज करून सोडला होता. वरकरणी ते काही दाखवित नव्हते. पण निकटवर्तीयांपासून त्यांच्या व्यथा लपून राहण्यासारख्या नव्हत्या. फारसा प्रवास ते करू शकत नव्हते. एकीकडे डॉक्टरांच्या प्रकृतीची चिंता तर दुसरीकडे कार्यविस्ताराची व चालू असलेल्या कामाच्या दृढीकरणाची चिंता. ही परिस्थिती गुरूजींना दिसत होती. शक्य तेवढा कार्यभार ते उचलीतच होते. कार्यकर्त्यांशी त्यांचा प्रत्यक्ष संपर्क वाढला होता. डॉक्टर ही केवढी प्रेरक शक्ती आहे याचे अधिकाधिक आकलन या वाढत्या संपर्कातून त्यांना होत होते. एकेक महिना उलटत होता आणि डॉक्टरांच्या दुखण्यावर उपाय मात्र गवसत नव्हता.

अखेर बिहारातील राजगीर येथे काही दिवस वास्तव्य करून तेथील झऱ्यातील रोगनिवारक गरम पाण्याचा उपचार करून पाहावा, अशी गळ अनेक मित्रांनी घातली. त्याप्रमाणे डॉक्टर राजगीरला गेले. गुरूजींनी सोबत यावे अशी त्यांची फार इच्छा होती. पण नागपुरात काम सांभाळण्यासाठी गुरूजींनी थांबणे आवश्यक होते. वर्धा जिल्हा संघचालक व डॉक्टरांचे सर्वात जुने सहकारी मा. अप्पाजी जोशी त्यांच्याबरोबर गेले. राजगीरच्या उपचाराचा विशेष लाभ मात्र झाला नाही. यावेळी दुसरे जागतिक महायुध्द सुरू झालेले होते. आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी तळमळणाऱ्या डॉक्टरांची आंतरिक अस्वस्थता विलक्षण वाढली होती. झोप येईनाशी झाली होती. तीन वर्षांच्या काळात शहरी भागात तीन टक्के व ग्रामीण भागात एक टक्का गणवेषधारी तरूण उभे करण्याचा कालबध्द कार्यक्रम याच राजगीरच्या मुक्कामात पत्राद्वारे डॉक्टरांनी समस्त कार्यकर्त्यांना दिला. कोणते आराखडे त्यांनी नेमके मनाशी बांधले होते. हे कळावयास मार्ग नाही. पण पुढे १९४२ साली जी परिस्थिती देशात निर्माण झाली ती लक्षात घेता या प्रचंड युवाशक्तीकडून स्वातंत्र्यलढयाच्या इतिहासातील अंतिम सोनेरी पृष्ठ त्यांनी अवश्य लिहून घेतले असते, असा विचार मनात डोकावून जातो.

डॉक्टरांनी कार्यवाढीच्या लक्ष्यासंबंधी राजगीरहून जे पत्र लिहिले त्याला निमित्य झाले होते. चंद्रपुर (विदर्भ) येथे भरलेल्या प्रौढ स्वयंसेवकांच्या शिबिराचे. अशा शिबिरांत डॉक्टरांनी स्वत: उपस्थित राहून मार्गदर्शन करण्याची प्रथा होती. पण या शिबिरांत उपस्थित राहणे डॉक्टरांना अशक्य होते. म्हणून तेथील अधिकाऱ्यांना पत्राद्वारे आपली असमर्थता कळविणारे पत्र त्यांनी लिहिले. "यावेळी मी उपस्थित राहू शकत नाही, याचे वाईट वाटते. आपण सर्व कार्य जोमाने वाढवीत असालच, पण या बैठकीत संकल्प करावा की, आपल्या प्रांतात खेडे विभागांत एक टक्का आणि शहरांत तीन टक्के स्वयंसेवक उभे राहतील." हे लक्ष्य तीन वर्षांतपूर्ण व्हावे अशी ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. संघाच्या कार्यवाढीची ही कल्पना स्पष्ट करून सांगताना श्रीगुरूजी खुलासा करीत की, एक टक्का आणि तीन टक्के यांत मोडणारा प्रत्येक स्वयंसेवक नेतृत्व करण्यास सक्षम असावा, अशी अपेक्षा आहे. ६०-

७० लोकांना आपल्या सोबत घेऊन जाऊ शकेल, त्यांचा मित्र आणि मार्गदर्शक म्हणून पूर्ण विश्वास संपादन करू शकेल, अशा गुणवत्तेचा तो असावा. म्हणजे संघाच्या योजनेनुसार काम करणारे फार मोठे संघटित सामर्थ्य व्यवहारात: उभे होईल. आपल्या हाती सर्व सूत्रे ठेवू लोकमोक्षाला, जनतेतील स्वातंत्र्याकांक्षेला सुनिश्चित दिशेने वळविता येईल. १९४२ पर्यंत हे होऊ शकले असते तर १९४२ साली काही निर्णायक पाऊल संघ विश्वासपूर्वक उचलू शकला असता, असे म्हणावेसे वाटते, ते यामुळेच, अशी कोणतीच शक्ती नसल्यामुळे दुसऱ्या महायुध्दाच्या महत्त्वपूर्ण कालखंडातही परकीय सत्तेवर निर्णायक प्रहार करण्याचे पाऊल सरसंघचालकांना उचलता आले नाही. कार्यवाढीसाठी संपूर्ण वेळ कार्यकर्त्यांची फार मोठी 'प्रचारक योजना' मात्र यावेळी अमलात आली.

डॉक्टरांनी दिलेला कार्यवाढीचा कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी श्रीगुरूजी व डॉक्टरांचे तरूण सहकारी कटिबध्द झाले होते. पण नियतीच्या योजना काही वेगळयाच होत्या. १९४० चा एप्रिल महिना आला व डॉक्टरांना संघ शिक्षावर्गाचे वेध लागले. प्रतिवर्षाप्रमाणे पुण्याच्या वर्गास त्यांनी पंधरा दिवस जावे, नागपूरचा वर्ग श्रीगुरूजींनी सांभाळावा, असे ठरले. डॉक्टर पुण्याला गेले व तेथे सगळे कार्यक्रम त्यांनी व्यवस्थित पार पाडले. स्वयंसेवकांचा त्यांनी भावपूर्ण निरोप घेतला. पण नागपूरला परतले त्याच दिवशी त्यांना सपाटून ताप चढला. उपचार सुरू झाले. ताप हटेना, प्रकृतीला उतार पडेना. गुरूजी वर्गाची सारी व्यवस्था सांभाळून शिवाय डॉक्टरांवरील औषधयोजनेकडे, त्यांच्या सेवाशुश्रूषेकडे लक्ष पुरवीत. एकेक दिवस विलक्षण मानसिक दडपणाखाली, जबाबदारी चिंता वाहत, ते घालवीत होते. वर्ग संपल्यावर सारे लक्ष त्यांनी उपचारावरच केंद्रित केले. पण यावेळी यश देण्याचे ईश्वराच्या मनात नव्हते. डॉक्टरांना आधी 'मेयो हॉस्पिटल' मध्ये आणि नंतर नागपूर संघचालक श्री. बाबासाहेब घटाटे यांच्या सिव्हिल लाईन्समधील बंगल्यावर हलविण्यात आले. तापाची तीव्रता कायम होती. पाठीचे दुखणे दु:सह होते. अखेर २० जून रोजी डॉक्टर मंडळींनी हताशपणे सांगितले की, लंबर पंक्चर करावे लागेल. यावेळी ताप खूप असला तरी डॉक्टर सावध होते. अंतिम घडी आलेली आहे हे त्यांनी जाणले. आपल्या पश्चात संघाची धुरा सरसंघचालक या नात्याने कोणी साभाळावयाची हे त्यांनी सर्वांच्या देखत सांगून टाकले. त्यांनी संगळयांच्या समक्ष श्रीगुरूजींना जवळ बोलावले व म्हणाले, " यापुढे हे संघाचे कार्य तुम्ही सांभाळा. ही जबाबदारी पत्करा व मग माझ्या देहाचे काय करावयाचे ते करा." गुरूजी दु:खित स्वरात म्हणाले, "डॉक्टर असे काही बोलू नका. आपण या दुखण्यातून लवकर बरे व्हाल." त्यावर डॉक्टरांनी पुन्हा बजावले, "मी सांगितले आहे विसरू नका." त्या काही इतिहासगर्भ क्षणांत संघाचा वारसा डॉक्टरांकडून गुरूजींकडे संक्रांत झाला. लंबर पंक्चर झाले. डॉक्टरांचा ताप वाढला, रक्तदाब वाढला. यातनांनी त्यांची शुध्द गेली. परत ते शुध्दीवर आलेच नाहीत. दि. २१ जुन १९४० रोजी सकाळी त्यांचा आत्मा व्याधिजर्जर कुडीचा त्याग करून अनंतात विलिन झाला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दृष्टीने हा हादरा जबरदस्त होता. संघाचे कार्य महाराष्ट्र व मध्यप्रांत यांबाहेर दुरवर पसरू लागले होते. वातावरण उमेदीचे होते. १९४० च्या संघ शिक्षावर्गाला आलेले भिन्न भिन्न भाषा भाषी स्वयंसेवक पाहून डॉक्टरांनी आपल्या ९ जूनच्या अंतिम हृदयस्पर्शी भाषणात असे उद्-गार काढले होते की, "हिंदू राष्ट्राचे छोटेसे स्वरूप मी येथे पाहत आहे." याच भाषणात त्यांनी हृदय पिळवटून काढणाऱ्या शब्दांत सांगितले होते : "आपल्यापैकी प्रत्येकाने संघकार्य हेच जीवनातील प्रमुख कार्य मानले पाहिजे. आपला हिंदू समाज एवढा समर्थ बनविला पाहिजे की, जगात त्याच्याकडे डोळा वर करून पाहण्याची कोणाची हिंमत होणार नाही. याच निर्धाराने आपआपल्या स्थानी परत जा.

प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे मी आपली सेवा करू शकलो नाही, याबद्दल मला क्षमा करा." हे अविस्मरणीय भाषण हृदयावर अंकित करून घेऊन कार्यकर्ते आपआपल्या स्थानी परतले होते आणि नंतर केवळ दहा दिवसांतच डॉक्टरांच्या चिरवियोगचा प्रसंग ! वज्राघातासारखी येऊन आदळलेली डॉक्टरांच्या महाप्रयाणाची ती वार्ता !

आपल्या रक्ताचे खतपाणी घालून सतत पंधरा वर्षे डॉक्टरांनी जोपासलेल्या, तळहातावरील फोडाप्रमाणे वाढविलेल्या या ध्येयनिष्ठ संघटनेचे दायित्व येऊन पडले होते गुरूजींवर. डॉक्टरांनी अत्यंत विश्वासने कार्यभार सोपविला तरी हे संक्रमण सुरळीतपणे पार पाडणे व संघनिर्मात्यांच्या निधनाने बसलेल्या धक्क्क्यातून सावरून कार्य प्रगतिपथावर अग्रेसर करणे सोपे नव्हते. कारण डॉक्टरांच्या जीवनाची पार्श्वभूमी आणि गुरूजींच्या जीवनाची पार्श्वभूमी यांत फार अंतर होते. डॉक्टरांचे उभे जीवनचे सार्वजनिक व राजकीय कार्यात गेले होते. त्यांचे चाहते व मित्र संघाबाहेरही मोठया प्रमाणात होते. राजकीय क्षेत्रात संघासंबंधी थोडीफार असूया दिसू लागली होती. ही संघटना आपल्या तंत्राने चालली पाहिजे अशी इच्छा हिंदूत्वावादी पण सत्तेच्या राजकारणात गुंतलेल्या अनेकांच्या मनात होतीच. गुरूजी तसे संघात नवीनच. त्यांचा पिंड आध्यात्मिक. राजकारण वा सार्वजनिक कार्य यांच्याशी त्यांचा फारसा संबंधही कधी आला नाही. संघाबाहेरच्या क्षेत्रात ते अगदी अपरिचित. तेव्हा संघाची पुढील व्यवस्था काय, यासंबंधी अनाहूत सल्लागार मंडळ नेमावे ही सूचना तर संघाचे हितचिंतक म्हणविणाऱ्या अनेकांनी आग्रहपूर्वक केली. गुरूजींना संघातील प्रमुख कार्यकर्त्यांनी डवलावे यासाठी कोणत्या मर्यादेपर्यंत प्रयत्न झाले, याचा एक प्रत्यक्ष अनुभव मा. श्री. अप्पाजी जोशी सांगत असत. डॉक्टरांच्या अत्यंत स्नेहातील एक ज्येष्ठ हिंदूत्ववादी वकील महाशय अप्पांजींकडे आले. डॉक्टरांच्या मृत्यूबद्दल दु:ख व्यक्त करून संघाच्या भावी व्यवस्थेचा विषय त्यांनी काढला. ते म्हणाले, 'अप्पाजी, तुम्ही डॉक्टरांचे उजवे हात. आता तुम्हीच संघाची धुरा खांद्यावर घेणे योग्य. गुरूजींना हे काम जमायचे नाही." अप्पाजींनी जे उत्तर दिले त्यावरून अप्पाजींच्या अंत:करणाची विशालता तर दिसून येतेच, पण कशी प्रकारची संघटना डॉक्टरांनी बांधली होती यावरही उत्कृष्ट प्रकाश पडतो. अप्पाजींनी सांगितले, "मी जर डॉक्टरांचा उजवा हात असेन तर गुरूजी हे त्यांचे हृदय आहेत. डॉक्टरांनी केलेली निवड सर्वस्वी योग्य आहे. यासाठी माझा विचार त्यांनी घेतलेला होता." डॉक्टरांच्या मृत्युनंतर दहा बार दिवसांत श्रीगुरूजींची नियुक्ती वादग्रस्त बनविण्याचा असा जो प्रयत्न झाला, त्याची डाळ मात्र अजिबात शिजली नाही. डॉक्टरांच्या मृत्यूचा तेरावा दिवस जवळ आला व नव्या सरसंघचालकांचा अधिकृतपणे प्रकट स्वीकार आवश्यक वाटला, तेव्हा अकोला (विदर्भ) येथे पाच संघचालकांची एक बैठक झाली. वर्ध्याचे श्री. अप्पाजी जोशी, विदर्भाचे श्री. बापूसाहेब सोहनी, नागपूरचे श्री. बाबासाहेब पाध्ये, महाराष्ट्राचे श्री. का. भा. लिमये आणि अकोल्याचे गोपाळराव चितळे ही मंडळी बैठकीत होती. परिस्थितीचा अंदाज घेण्यात आला. डॉक्टरांनी जे ठरविलेले आहे ते प्रमाण मानले पाहिजे, असाच स्वाभाविक निष्कर्ष निघाला. सर्वजण गुरूजींच्या मागे एकदिलाने एकवटले.

आणि मग डॉक्टरांच्या रेशीमबागेवरील पवित्र समाधीच्या साक्षीने तो नव्या सरसंघचालकांच्या नावाची प्रकट घोषणा करण्याचा आणि दिवंगत सरसंघचालकांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा ऐतिहासिक कार्यक्रम पार पडला. नागपूर प्रांताचे संघचालक व ज्येष्ठ विधिज्ञ श्री. बाबासाहेब पाध्ये यांचे नव्या सरसंघचालकांच्या नियुक्तीची घोषणा करणारे पहिले भाषण झाले. संघातील एकचालकानुवर्तित्वाची पध्दती आणि दि. २० जून रोजी डॉक्टरांनी सांगितलेली व्यवस्था यांची

माहिती त्यांनी दिली व शेवटी ते म्हणाले, "आपल्या आद्य सरसंघचालकांच्या अंतिम इच्छेनुसार माननीय माधवरावजी गोळवलकर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक झाले आहेत. आता ते आपणा सर्वांसाठी डॉक्टर हेडगेवारांच्या जागी आहेत. आपल्या नव्या सरसंघचालकानां मी माझा पहिला प्रणाम समर्पित करतो." डॉक्टरांचे वयोवृध्द काका श्री. आबाजी हेडगेवार यांनी अतिशय प्रेरक व भावपूर्ण भाषणाच्या अंती सांगितले, "आपले डॉक्टर आपल्याला सोडून गेलेले नाहीत. आज आपण त्यांना माधवरावजी गोळवलकर यांच्या स्वरूपात पाहू शकतो. त्यांचा प्रत्येक आदेश हा डॉक्टरांचाच आदेश आहे, असे मानून आपण त्यांच्या आदेशाचे पालन केले पाहिजे."

अर्थात नवे सरसंघचालक या नात्याने श्रीगुरूजींचेही भाषण झाले. हे भाषण गुरूजींचा आत्मविश्वास, नम्रता आणि डॉक्टरांवरील त्यांची सखोल श्रध्दा यांची आश्वासक प्रचिती देऊन गेले. सरसंघचालक या नात्याने त्यांचे हे पहिलेच भाषण. दायित्वाचा नम्रपणे स्वीकार करून ते म्हणाले, डॉक्टरांसारख्या महापुरूषापुढे जो नतमस्तक होऊ शकत नाही, तो जीवनात काहिच करू शकणार नाही. त्यांची पूजा करण्यात मला अतिशय अभिमान वाटतो. गंधफुलादिकांनी पूजा करणे हा तुलनेने कमी प्रतीचा मार्ग. ज्याची पूजा करतो त्याच्याप्रमाणे गुणसंपन्न बनणे हीच खरी पूजा. 'शिवो भूत्वा शिवं यजेत्' ही आमच्या धर्माची विशेषता आहे. डॉक्टरांनी मोठी अवघड जबाबदारी माझ्यावर टाकली आहे. हे तर विक्रमादित्याचे सिंहासन आहे. या सिंहासनावर गुराख्याचे पोर बसविले तरी ते योग्य तोच न्याय करील. आज या सिंहासनावर आरूढ होण्याचा प्रसंग माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीवर आला आहे. पण डॉक्टर माझ्यासारख्या व्यक्तीच्या तोंडूनही योग्य तेच वदवतील. आपल्या थोर नेत्याच्या पुण्याईने माझ्या हातून उचित गोष्टीच घडतील. आता आपण परिपूर्ण विश्वासाने आपल्या कार्यावर चित्त एकाग्र करावे आणि पूर्वीच्यच निष्ठेने पण दुप्पट उत्साहाने कार्य वाढवावे."

हा कोरडा उपदेश नव्हता. डॉक्टरांच्या मृत्यूनंतर सार्वजनिक नेत्यांचे जे शोकसंदेश आले, संघाच्या स्वयंसवेकांची शोक आणि चिंता व्यक्त करणारी जी पत्रे आली. त्या सर्वांना उत्तरे देताना गुरूजींनी मनाचा अतिशय खंबीरपणा दाखविला. त्यांच्या पत्रांचा सूर हाच होता की, रडत बसण्यासाठी वेळ नाही. डॉक्टरांचे अपुरे कार्य पूर्ण करण्यासाठी दु:ख गिळून कामाला लागले पाहिजे. संघाच्या हितशत्रूंचे मनसुबे श्रीगुरूजी जाणून होते. म्हणून त्यांनी ३ जुलैच्याच भाषणात इशारा देऊन टाकला की, "मतभेदांत गडप होऊन जाणारी लेचीपेची संघटना डॉक्टरांनी आमच्या स्वाधीन केलेली नाही. आमची संघटना म्हणजे एक अभेद्य किल्ला आहे. या किल्ल्याच्या भिंतीशी टक्कर देणारेच जायबंदी होतील." यानंतर दि. २१ जुलै रोजी डॉक्टरांच्या मासिक श्राध्ददिनानिमित्तही श्रीगुरूजींचे ओजस्वी भाषण झाले. संघावर व्यक्तिपूजक आणि प्रतिगामी असल्याचा आरोप करणारांना ठणकावून उत्तर या भाषणात गुरूजींनी देऊन टाकले, ते म्हणाले, "काही लोक संघावर व्यक्तिपूजेचा आरोप करतात. या आरोपाचे आम्हाला दु:ख नाही. पण डॉक्टरांच्या पश्चात सगळे स्वयंसेवक पूर्वीप्रमाणे संघाचे काम करीत आहेत. यावरून हे सिध्द होत नाही काय, की डॉक्टरांनी आम्हाला अधंश्रध्दा शिकविली नाही. आमच्यावर जेवढया जोराने आघात होतील तेवढयाच जोराने रबरी चेंडूप्रमाणे आम्ही वर उसळी घेऊ. आमची शक्ती अडथळयांना न जुमानता वाढतच राहील आणि एक दिवस ती साऱ्या राष्ट्राला व्याप्त करील."

असा हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आद्य सरसंघचालकांच्या महाप्रयाणाचा व त्यांचा वसा श्रीगुरूजींनी स्वीकारल्याचा अध्याय. भारतातील कोणत्याही संघटनेच्या इतिहासात अगदी अनोखा

ठरणारा हा घटनाक्रम. या वेळी कागदोपत्री संघाची घटना नव्हती व संघाच्या नव्या सरसंघचालकांची निवड होण्याची काही पध्दती रूढ झालेली नव्हती. पण डॉक्टर जे करतील ते योग्य आणि संघटनेच्या अंतिम साफल्याला पोषकच असेल हा दृढ विश्वास होता. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा व अहंकार, मतमतांतरे किंवा सामान्यत: संघटनेच्या ऐक्याला सुरूंग लावणाऱ्या हीन प्रवृत्ती यांना अजिबात थारा न देणाऱ्या ध्येयवादी कार्यकर्त्यांची मजबूत फळी डॉक्टरांनी केवळ पंधरा वर्षात उभी केली होती. याचे विस्मयजनक प्रत्यंतर शांतपणे झालेल्या या संक्रमणाने सगळयांना आणून दिले होते. अशी संघटना वर्धमान आणि प्रभावशाली बनविण्याचे दायित्व श्रीगुरूजीवंर येऊन पडले होते. डॉक्टरांची निवड किती योग्य होती आणि १९४० सालानंरत देशातील प्रवाही परिस्थितीत संघाचे तारू योग्य दिशेने नेण्याची केवढी अंगभूत क्षमता श्रीगुरूजींच्या ठायी होती, हे तेहतीस वर्षांच्या त्यांच्या कार्यकालानेच क्रमाक्रमाने निर्णायकपणे सिध्द होऊन गेले. सरसंघचालक बनतेवेळी श्रीगुरूजींच्या ठायी काही स्वभावदोष नसतील किंवा व्यावहारिकदृष्टया त्यांच्यातील व डॉक्टरांतील अंतर कोणत्याच प्रकारे जाणवले नसेल, असे म्हणता यावयाचे नाही. पण गुरूजींची थोरवी यात आहे की, डॉक्टरांच्या आदर्शांचे सतत चिंतन त्यांनी केले. त्या आदर्शानुरूप स्वत:तील उणीवांचे परिमार्जन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. उदाहरणादाखल असे म्हणता येईल की, प्रारंभी गुरूजींच्या वागण्याबोलण्यात काहीसा खडबडीतपणा होता. त्यांच्या जिभेला काहीशी धार होती. त्यांच्या शब्दात प्रसंगविशेषी कठोरपणा यायचा. इतरांचे दोष, अकार्यक्षमता किंवा कामातील मंदपणा सहन करणे त्यांना अवघड जाई. पण हळूहळू त्या जागी विलक्षण मार्दव आले. शब्द अतिमधूर बनले. अधूनमधून दिसणारी उग्रता लोप पावून स्नेहार्द्रता व सोशिकता आली. स्वार्थ त्यांच्या ठायी कधी नव्हताच.पण नि:स्वार्थीपणाबरोबर सगळया संघटनानुकूल गुणांचीही आवश्यकता त्यांनी जाणली होती. डॉक्टरांचा स्वत:चा स्वभावही मुळात उग्र होता. पण संघकार्य हेच जीवनकार्य मानल्यावर त्यांनी अलौकिक मनोबलाने स्वत:च्या स्वभावात संघटनेसाठी आवश्यक असेलले सारे परिवर्तन घडवून आणले. संघमय जीवनाचा चालताबोलता आदर्श उभा केला. असेच परिवर्तन श्रीगुरूजींच्या जीवनातही आपल्याला दिसते. हळूहळू श्रीगुरूजी हे राष्ट्रकल्याणासाठी सगळयांना त्यांच्या गुणदोषांसह सामावून घेणारा स्नेहाचा सागर बनले. कार्यकर्त्यांना अधिकारवाणीने सांगू शकले की, ''मी आहे तसा माझा अंगीकार करा' (टेक मी ॲज आय ॲम्) असे कोणी म्हणून ये दोष निपटून काढले पाहिजेत. आणि समाजाला कवेत घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांची मूस कार्यकर्त्याने बनले पाहिजे. बोलणे, वागणे आणि चालणे वेगळे असा प्रकार त्यांनी राहूच दिला नाही.

डॉक्टरांप्रमाणे तत्त्वांच्या बाबतीत गुरूजी कोणतीही तडजोड स्वीकारीत नसत. आपले हे हिंदूराष्ट्र आहे ही डॉक्टरांची छातीठोक घोषणा. संघविचारांचे व कार्यपध्दतीचे ते हृदय. त्याची जपणूक डॉक्टरांनी अत्यंत सावधपणे केली. न दबता आणि न नमता. पुढे श्रीगुरूजींच्या कार्यकाळात या स्वयंसिध्द सत्याचा राजकीय स्वार्थ, जातीय हितसंबंध, आक्रमक अराष्ट्रीयता, विद्वेष, असूया आणि भोंगळ मानवतावाद यापायी अनेकांनी विपर्यास करून पाहिला. त्याची लक्तरे लोंबविण्याचा प्रयत्न केला. पण गुरूजींनी निर्भयपणे देशभर हिंदू राष्ट्राचा उद्-घोष केला. परम वैभवशाली राष्ट्र उभारणीला पायाभूत असलेल्या या सत्याचे आव्हानप्रद समर्थन प्रत्येक व्यासपीठावरून केले. रूढार्थाने हिंदू नसलेल्यांशी बोलताना व त्यांचे समाधान करताना देखील संघविचारांचे सूत्र त्यांनी अबाधित राखले. विविध कार्यक्षेत्रांत गेलेल्या स्वयंसेवकांची हिंदू राष्ट्रस्वरूपातील श्रध्दा अतूट असली पाहिजे व ती प्रखर झाली पाहिज हा आग्रह त्यांनी सदैव धरला. एवढेच नव्हे तर 'हिंदू' जीवनविचार त्याच्या सर्व अंगोपांगासह

स्पष्ट करण्याची थोर कामगिरी त्यांनी समर्थपणे पार पाडली. काळाची गती आणि आवश्यकता यांचे अवधान त्यांनी ठेवले. आणि परिस्थितीनुसार कधी आक्रमक तर कधी हळूवार भाषेत 'स्व' त्यांनी स्पष्ट व पुष्ट केला. हे सारे ध्यानात घेतले म्हणजे आगामी काळाची चाहूल लागनूच गुरूजींसारखा अध्यात्मप्रवण, भाषाप्रभू, विद्वान आणि वयाने तरूण वारस डॉक्टरांनी निवडला नसेल ना, असा विचार मनाला स्पर्श करून जातो.

श्रीगुरूजींच्या असामान्य वैचारिक व संघटनात्मक नेतृत्वाखाली संघाची वाटचाल १९४० च्या जून महिन्यात सुरू झाली. त्या वाटचालीचा मागोवा आता गुरूजींचे व्यक्तिमत्व, संघकार्याची प्रगती व देशातील परिस्थिती यांच्या अनुषंगाने घ्यावयाचा आहे.

## ७. रक्तरंजित फाळणी

डॉक्टर हेडगेवार यांचा मृत्यू झाला व कार्यभार श्रीगुरूजींवर येऊन पडला, त्यावेळी भारताच्या आणि जगाच्याही इतिहासातील एक दूरपरिणामी दशक सुरू झालेले होते. १९३९ साली दुसऱ्या महायुध्दाचा प्रारंभ होऊन गेलेला होता आणि युध्दाचा प्रारंभीचा हा काळ नाझी हुकूमशहा ऍडॉल्फ हिटलर याच्या चौफेर सरशीचा होता. ब्रिटिश साम्राज्यशाहीवरील हे जीवघेणे संकट म्हणजे भारतासारख्या गुलामीच्या शृंखलात बध्द झालेल्या देशाला त्या शृंखला तोडून फेकण्याची दुर्लभ संधी, हे तर सहज कोणालाही कळण्यासारखे होते. आयुष्याच्या अखेरच्या काही महिन्यांत डॉक्टरांच्या देखील मनात परिस्थितीचा लाभ कसा घ्यावा या संबंधीचे विचार घोळत होते. संघाची शक्ती देशव्यापी आणि अमोघ करण्याची उत्कट तळमळ त्यांना लागून राहिली होती. देशात मोठे विचारमंथन चालू होते. इंग्लंडच्या अडचणींचा लाभ कशाप्रकारे घ्यावा, यासंबंधी मात्र मतमतांतरे होती. गांधी, नेहरू, सुभाष या सगळयांचे विचार निरनिराळे होते. इंग्लंडचे नाक दाबण्याची ही उत्कृष्ट संधी आहे हे सगळयांना मान्य असले तरी मार्गासंबंधी एकमत दिसत नव्हते.सुभाषबाबूंनी या काळा डॉक्टरांची भेट घेण्याचा दोनदा प्रयत्न केला, हे प्रसिध्दच आहे. डॉक्टरांच्या प्रकृतिअस्वास्थामुळे भेट मात्र प्रत्यक्षात होऊ शकली नाही. ही दुर्दैवाची गोष्ट, अशा प्रकारच्या परिस्थितीचा निर्णायक लाभ घेण्यासाठी जेवढी बलशाली व राष्ट्रव्यापी संघटना पाहिजे तेवढी संघाजवळ नाही, याची जाण डॉक्टरांना होती. नव्या सरसंघचालकांनाही होती.

संघाचा प्रसार यावेळी महाराष्ट्राबाहेर काही प्रदेशांत झाला असला तरी देशाच्या फार मोठया भागात अद्याप संघविचार पोहोचला नव्हता, कार्यकर्ते पाठविता आले नव्हते आणि संघशाखाही अर्थातच उभ्या राहिल्या नव्हत्या. संघकार्याच्या विस्ताराची डॉक्टरांना जी विलक्षण तळमळ लागून राहिली होती आणि दुखणाईत अवस्थेत राजगीरवरून कार्यवाढीचा जो बालबध्द कार्यक्रम त्यांनी दिला होता, त्याला आंतरराष्ट्रीय परिस्थितीचाही संदर्भ अवश्य असावा. तेव्हा नवे सरसंघचालक श्रीगुरूजी यांच्यापुढे निकडीचे काम संघविस्ताराचे व संघटनेच्या दृढीकरणाचे होते. ब्रिटिश साम्राज्यसत्तेची थोडीफार वक्रदृष्टी यावेळी संघाकडे वळलेली होती. त्यामुळे संघाचा गणवेश, कवायती वगैरेत बदल करणे अपरिहार्य झाले. परिस्थितीचे नीट आकलन करून श्रीगुरूजींनी कार्यविस्ताराला जोराने चालना दिली. शासनाने घालेलेले कार्याच्या बाह्य स्वरूपावरील निर्बंध पाळण्याचे नाकारून त्यांनी संघर्ष ओढवून घेतला नाही. निर्बंध निरर्थक करून सोडण्याचे लवचिक धोरण त्यांनी अंगीकारके. संघाच्या आजवरच्या समतेच्या गणवेशात आणि आज्ञांत बदल झाला तो याच वेळी. खाकी हाफपँट, पांढरा सदरा, काळी टोपी आणि साधा पदवेश यांनी ब्रिटिशांना आक्षेपार्ह वाटलेल्या जुन्या जामनिम्याची जागा घेतली. पूर्वी समतेकरिता इंग्रजी आज्ञा संघात वापरल्या जात त्याऐवजी संस्कृत आज्ञा आल्या. स्वयंसेवकांच्या रचनांचे गण, वाहिनी, अनिकिनी असे नवे नामरकण झाले. 'बँड' चा घोष झाला. त्याला नवा सूर गवसला. एकप्रकारे समता आणि संचलन या कार्यक्रमांचे 'भारतीयीकरण' या संधीचा लाभ घेऊन गुरूजींनी करून टाकले. निर्बंध सरकारी कागदावर राहिले आणि संघकार्यावर त्याचा कोणताही परिणाम होऊ शकला नाही. गुरूजींनी कार्यभार स्वीकारल्यावर उण्यापुऱ्या दोन महिन्यांतच त्यांच्या नेतृत्वाची ही पहिली कसोटी ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या कृपेने लागून गेली.

सरसंघचालक श्रीगुरूजींना असल्या वरवरच्या अडचणींची चिंता वाटत नव्हती. त्यांच्या दृष्टीने मुख्य आव्हान होते ते द्रुतगतीने कामाचा विस्तार करण्याचे. यासाठी देशभर प्रवास तर त्यांनी सुरू केलाच, पण एकटयाने हिंडून त्या त्या भागात कार्य कसे रूजणार? दैनंदिन शाखा कशा चालणार? नित्य कार्य करणारी माणसे ठिकठिकाणी पाठविणे व त्यांच्या द्वारे स्थानिक लोकांतून कार्यकर्ते उभे करणे आवश्यक होते. म्हणून विचारपूर्वक कार्यवाढीची योजना आखण्यात आली. या योजनेचा गाभा होता मोठया प्रमाणावर संघाचे 'प्रचारक' देशात सर्वत्र पाठविणे हा. यापूर्वीही संघाच्या कामासाठी कार्यकर्ते बाहेर पडले होते. कार्यविस्तार त्यांनी केला होता. पण हे कार्यकर्ते कुठे विद्यार्थी म्हणून, कुठे शिक्षक म्हणून, तर कुठे अन्य काही निमित्ताने गेलेले असत. श्री. बाबासाहेब आपटे किंवा श्री. दादाराव परमार्थ याच्यासारखी मोजकी माणसेच पूर्ण वेळ काम करणारी होती. आता जी योजना पुढे आली ती केवळ संघकार्याला पूर्ण वेळ वाहून घेतलेली माणसे पाठविण्याची होती. तरूण स्वयंसेवकांच्या अंत:करणाला जाऊन भिडणारी व साहस आणि त्यागबुध्दी यांना आवाहन करणारी अत्यंत भावनोत्कट भाषणे श्रीगुरूजींनी १९४१ च्या सुमारास ठिकठिकाणी केली. फावल्या वेळी करून होणारे हे काम नव्हे, हे स्वयंसेवकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न ते जीवन ओतून करीत होते. १९४२ मध्ये वर्षप्रतिपेदच्या दिवशी केलेल्या भाषणातील त्यांच्या उद्-गारांवरून त्यांची त्यावेळची तळमळ ध्यानात येण्यासारखी आहे. या प्रसंगीचे त्यांचे आवाहन संघाच्या इतिहासात महत्त्वाचे असल्याने त्यांच्या भाषणातील काही भाग येथे उद्-धृत करणे आवश्यक वाटते. श्रीगुरूजी म्हणाले :

"आजच्यासारख्या संकटपूर्ण परिस्थितीत आपण जन्मलो हे आपले थोर सद्-भाग्य आहे. संकटकाळ ही आपण एक पर्वणीच मानावयास पाहिजे. राष्ट्राच्या इतिहासात शतका-शतकांतून येणारा सुवर्णअवसर आज आपल्याकडे चालून येत आहे. यावेळी आपण झोपलेले राहू तर आपल्यासारखे करंटेआपणच. जो संकटकाळी काही करून दाखवितो त्याचाच चिरकाल जगात गौरव होतो. म्हणून उल्हसित आणि निर्भय होऊन संकटांना तोंड द्यावे लागेल. आपल्या अंगी असलेली श्रेष्ठ गुणवत्ता दाखवून देण्याची ही संधी आहे.

पतित राष्ट्राचे पुनरूत्थान जास्तीत जास्त एकाच पिढीत होउन जावयास पाहिजे. पण आपली अवस्था काय आहे? १७ वर्षींच्या परिश्रमानंतरही आपल्या कामाचे स्वरूप आज अत्यंत छोटे आहे. अंगीकृत कार्य पूर्ण केल्याविना संघ राहणार नाही, कारण संघ सत्यवचनी आहे. जी प्रतिज्ञा केली ती तो पार पाडणारच. त्या कामी आमचे व्यक्तिगत जीवन नष्ट होऊन गेले तरी आम्हाला त्याची चिंता नाही. एक वर्षासाठी आपण आपल्या व्यक्तिगत जीवनाचे सारे विचार बाजूस ठेवा. हे असिधाराव्रत स्वीकारून एक वर्षासाठी संन्यासी बना. स्वत:च्या बाबतीत जेवढे कठोर बनावे लागेल तेवढे बनण्यासाठी तयार राहा. यावेळी धनदौलत किंवा घरदार यांची चिंता नको, आपल्याला आपला सारा वेळ, सारे लक्ष, सारी शक्ती संघाच्याच कामावर केंद्रित करावयाची आहे. अन्य सगळया व्यक्तिगत गोष्टी विसरून जा. त्यांना बिलकुल थार देऊ नका. या निर्धाराने आपल्याला सर्वांना अपूर्व परिश्रम ओतून काम करण्यासाठी तयार राहावे लागेल."

सरसंघचालक श्रीगुरूजींचे हे आवाहन स्वयंसेवकांच्या अंत:करणास जाऊन भिडले. याचवेळी श्री. बाळासाहेब देवरस यांनीही संघाचे पूर्णवेळ प्रचारक काढण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. आता नाही तर केव्हाच नाही, (नाऊ आर नेव्हर) ही त्यांची घोषणा होती. परिणामस्वरूप ठिकठिकाणी शेकडो तरूण कार्यकर्ते आपला सगळा वेळ संघाच्या कार्याला देण्यासाठी पुढे आले. राष्ट्रासाठी त्याग

करण्याच्या भावनेचा एक दिव्य अविष्कार पाहावयास मिळाला. अनेकांनी नोकऱ्या, विवाह, आप्तेष्ट यांचा मोह सोडून कार्यक्षेत्रात उडी घेतली. कित्येकांनी सांराला, बायकोमुलांना तात्पुरता रामराम ठोकला व ते संघसेवेला सादर झाले. मध्य भारतात प्रचारक म्हणून गेलेले श्री. भय्याजी दाणी अशा गृहस्थांपैकीच एक. १९४२ च्या जून महिन्यापासून या प्रचारकांची पाठवणी निरनिराळया प्रांतांत झाली आणि कामाने चांगलीच गती घेतली. याच सुमारास देशात ज्या घटना घडत होत्या, त्यांच्याकडे गुरूजींचे लक्ष होतेच. ब्रिटिश साम्राज्यावरील संकट अतिशय गडद झालेले होते. युरोपात जर्मनीने व पूर्वेकडे जपानने ब्रिटनला जबरदस्त तडाखा हाणला होता. याच संकटमय परिस्थितीत ब्रिटिश सरकारने सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स यांना भारतात पाठवले होते. भारताला अधिक स्वायत्तता देण्याची योजना त्यांनी राजकीय नेत्यांपुढे ठेवली होती. ही योजना काँग्रेसला मान्य झाली नाही आणि देशातील वातावरण स्वातंत्र्यासाठी आंदोलन छेडण्याच्या दिशेने तापतच गेले. नेताची सुभाषचंद्र बोस यांनी भारताबाहेर रंगून-सिंगापूर येथे स्वातंत्र्याचा पुकारा केला, आझाद हिंद फौज उभी केली आणि 'चलो दिल्ली' ही घोषणा दिली. भारतात गांधीजींनी ब्रिटिशांना 'भारत छोडो' असा इशारा दिला व या मागणीच्या पूर्ततेसाठी आंदोलनाचा पवित्रा घेतला. स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी करावयाच्या निर्णायक प्रयत्नाचे वारे यावेळी देशात घोंघावत होते.

पण अशा सुसंधीचा लाभ घेण्यासाठी जी काही किमान संघटित ताकद लागते, ती राष्ट्रव्यापी स्वरूपात असावी लागते. अशी शक्ती देशात कुठे होती? काँग्रेसने गांधीजींच्या नेतृत्वाखाली आंदोलनाचा पुकारा केला, पण कार्यक्रमाची व्यवहार्य, योजनाबध्द आखणी मात्र कोठल्याच प्रकारे केली नाही. देशात विखुरलेल्या ज्या भिन्न भिन्न शक्ती होत्या त्यांना एका सुत्रात गुंफून राष्ट्रीय आंदोलनात सहभागी करून घेण्याचाही प्रयत्न झाला नाही. असे म्हणतात की, दि. ९ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेसच्या नेत्यांनी आंदोलनाचा विचार करण्यासाठी एकत्र यावे एवढीच गांधीजींची कल्पना होती. किमान सहा महिन्यांचा अवधी आंदोलनाच्या प्रत्यक्ष सिध्दतेसाठी देण्याचे त्यांच्या मनात होते. पण ब्रिटिश सरकारने तो अवसर गांधीजींना मिळू दिला नाही. अ. भा. काँग्रेसचे प्रमुख नेते मुंबईल एकत्र येताच त्यांना अटक करण्यात आली. तुरूगांच्या गजाआड बंदिस्त करण्यात आले. सरकारच्या या कृत्यामुळे प्रक्षुब्ध झालेल्या जनतेतून आंदोलनाचा स्वयंस्फूर्त स्फोट झाला. पण नेते तुरूंगात होते व आंदोलनाला एकमुखी नेतृत्व नव्हते. स्फोट होतो, हादरा बसतो, त्या स्फोटाचे पडसाद अल्पकाळ वातावरणात उठतात आणि मग भेसूर शांतता पसरते, तसाच प्रकार या आंदोलनाचा झाला. या आंदोलनात उडी घ्यावी की घेऊ नये, यासंबंधीची साधकबाधक विचार त्यावेळी श्रीगुरूजींनी केला होता यात शंका नाही. संघाची अगदीच अपुरी शक्ती, आंदोलकांची योजनाविहीनता व दिशाशून्यता, आंदोलनातील एकसुत्रीपणाचा अभाव आणि प्रदीर्घ व चिवट राष्ट्रव्यापी संघर्षाची असंभवनीयता अशा अनेक पैलूंचा विचार तर अपरिहार्यच होता. वर्धिष्णु संघटना केवळ भावनावेगात काही तरी करून उद्ध्वस्त होऊ देणे दूरदृष्टीचे ठरले नसते. संघ या नात्याने आंदोलनात उडी न घेण्याचा जो निर्णय त्यावेळी करण्यात आला, त्याबद्दल दुषणे अनेकांनी दिली आहेत. उपहासही केला आहे. पण गुरूजींनी संघटनेचे सर्वश्रेष्ठ नेते या नात्याने केलेला निर्णय योग्य असल्याचेच आगामी घटनांनी दाखवून दिले. शिवाय, डॉक्टरांच्याच धोरणाचे सूत्र पुढे चालवून व्यक्तिश: आंदोलनात सहभागी होण्यास मोकळीक ठेवण्यात आली आणि भूमिगत कार्यकर्त्यांची आवश्यकतेनुसार काळजी घेण्याचे दायित्वही जागोजाग संघातील जबाबदार लोकांनी उत्तम प्रकारे पार पाडले. आंदोलनाचा संघाने तेजोभंग केला, पाय मागे ओढले, सहानुभूती ठेवली नाही, असे कोठे घडले नाही. चिमूर प्रकरणात आघाडीवर असलेले व

फाशीची शिक्षा ठोठावण्यात आलेले क्रांतिवीर संघाच्या स्वयंसेवकांच्याच पैकी होते. ज्या अनेक भूमिगत कार्यकर्त्यांना सुरक्षित राखण्यास संघाच्या कार्यकर्त्यांनी साहाय्य केले त्यांत क्रांतिसिंह नाना पाटील, किसन वीर, साने गुरूजी, अरूणा असफअल्ली, अच्युतराव पटवर्धन इत्यादी आंदोलनाचे अनेक अग्रणी समाविष्ट असल्याचे सगळयांना ठाऊक आहे. ही मंडळी संघ-विचाराची नव्हती व १९४२ नंतर देखील संघविरोधकांतच त्यांची गणना होई. पण मतभेदांचा विचार त्यावेळी संघाच्या कार्यकर्त्यांनी चित्ताला स्पर्शू दिला नाही. संघटनात्मक शक्ती वाढविणे व त्यासाठी संघशाखांचे जाळे सर्वत्र विणणे हे कार्य संघाला महत्त्वाचे वाटले व त्यावरच सारे लक्ष केंद्रित करण्यात आले, यात मात्र शंका नाही. परिस्थितीचे मोजमाप करून फार जबाबदारीने निर्णय विशिष्ट ध्येयासाठी काम करणाऱ्या संघासारख्या संघटनेच्या नेत्यांना त्या त्या वेळी करावे लागतात. त्यांच्या देशभक्तीची प्रखरता, साहसाची व त्यागाची सिध्दता यासंबंधी शंका उपस्थित करीत राहणे अप्रस्तुत आणि निरर्थक होय. संघाच्या कार्यात अहोरात्र झटणारे हजारो युवक ज्वलंत देशभक्तीच्या भावनेने व पराकाष्ठेच्या त्यागबुध्दीने काम करीत होते. विशिष्ट आंदोलनात संघाने उतरणे किंवा न उतरणे हा त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार संघनेत्यांनी करावयाच्या निर्णयाचा प्रश्न आहे. संघाला लोकशक्तीची जागृती आणि अनुशासनबध्दता हवी ती राष्ट्राचा गौरव वाढविण्यासाठीच.

१९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाचे वातावरण देशात पसरू लागले त्यावेही अनेक संघ स्वयंसेवकांच्या मनातही प्रश्न निर्माण झाला होता की संघ या आंदोलनात उडी घेणार का? या चळवळीच्या वेळी संघाचे आजचे एक ज्येष्ठ नेते आणि थोर विचारवंत मा. दत्तोपंत ठेंगडी हे केरळात संघाचे काम करीत होते. त्यांना प्रश्न विचारून लोकांनी भंडावनू सोडले. तेव्हा प्रत्यक्ष श्रीगुरूजींनाच हा प्रश्न विचारून खुलासा करवून घेण्याचे त्यांनी ठरविले. श्रीगुरूजींच्या भेटीची दत्तोपत्तांनी सांगितलेली माहिती पुढीलप्रमाणे -

१९४२ सालच्या सप्टेंबरच्या शेवटी मंगलोरहून कार्यक्रम आटोपून गुरूजी मद्रासला जाणार होते. १९४२ च्या आंदोलनामुळे स्वयंसेवकांच्या व प्रचारकांच्याही मनात खळबळ माजली होती. अशा आणीबाणीच्या वेळी संघ निष्क्रिय राहणार असेल तर आतापर्यंत कमावलेल्या शक्तीचा उपयोग तरी काय? हा प्रश्न सर्वांच्या मनात होता. या मंडळींनी मला मुद्दाम मंगलोरला पाठविले होते व श्रीगुरूजींसमोर आपले विचार मांडण्याचे काम दिले होते.

मी गुरूजींना हे विचार सांगितले. गुरूजींनी पुढीलप्रमाणे उत्तरे दिली.

१) संघाचे प्रारंभापासून काही पथ्ये पाळण्याचे ठरविले आहे. त्यामुळेच डॉक्टर सत्याग्रहात भाग घेण्याकरिता निघाले तेव्हा त्यांनी स्वयंसवेकांना आदेश दिला की त्यांनी बाहेर राहून संघ शाखेचे काम नियमितपणे चालवावे. संघाला त्यांनी चळवळीच्या बाहेर ठेवले.

२) तरी पण आजच्या आणीबाणीच्या काळात आपण हे पथ्य मोडल्याने स्वातंत्र्यप्राप्ती जवळ येणार असेल तर हे पथ्य मोडायलाही हरकत नाही. कारण संघकार्य व ही सर्व पथ्ये ध्येयाकरिताच आहेत व स्वराज्य हे आपले जवळचे लक्ष्य आहे.

३) कॉंग्रेसने ही चळवळ सुरू करण्यापूर्वी संघ किंवा इतर संघटनांना विश्वासात घेतले असते तर बरे झाले असते. पण तसे त्यांनी केले नाही, परंतु त्यामुळे रूसण्याचे कारण नाही. ही चळवळ ज्या

स्वातंत्र्यासाठी आहे ते केवळ काँग्रेसवाल्यांना मिळणार आहे असे नाही. ते सर्वांचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे या बाबतीत संस्थागत अहंकार बाळगण्याचे कारण नाही.

४) परंतु काँग्रेस पुढाऱ्यांनी चळवळीचा आदेश देण्यापूर्वी स्वत:च्या दृष्टीनेही जी तयारी करावयाला पाहिजे होती ती केली नाही ही चिंतेची गोष्ट आहे. त्यामुळे अन्प्रिपेअर्ड अवस्थेतच जनतेला सरकारसमोर जावे लागले. कोणतीही सुव्यव्यवस्थित  योजना नव्हती. क्रांतीच्या काळात सर्व घटना अगदी पूर्वी ठरल्याप्रमाणे होतात असे नाही. तरी पण काही निश्चित योजना असावी लागते व तिच्यात बदल करण्याची पाळी आली तरी तसे करण्याचा इनिशिएटिव्ह पुढाऱ्यांच्या हाती असावा लागतो. आज तसा इनिशिएटिव्ह नेतृत्वाच्या हाती राहिला नाही. त्यामुळे परिस्थिती व चळवळ यांना जी कलाटणी लोकांच्या स्वयंस्फूर्तीने मिळेल तिला मुरड घालण्याची शक्ती नेतृत्वात राहिली नाही. क्रांतीची चळवळ इतकी योजनाविहीन असणे आत्मघातकी आहे.

५) असे असले तरी संघाने या प्रसंगी चळवळीत उडी घ्यावयाचे ठरविल्यामुळे ध्येयप्राप्ती होणार असेल तर तसे करण्यास हरकत असू नये. परंतु या बाबतीत बारकाईने निरिक्षण केल्यानंतर माझ्या असे ध्यानात आले की, आपण पूर्ण शक्तीनिशी भाग घेऊनही ध्येयाच्या जवळ पोहोचू शकणार नाही.

६) संघाच्या वर्तमान शक्तीविषयी काही लोकांच्या मनात अतिशयोक्त कल्पना आहेत. विशेषत: ज्या भागात संघाचे काम चांगले आहे, त्या भागतील लोकांना असे वाटते की देशाच्या उरलेल्या भागातही संघकार्याची स्थिती तितकीच चांगली असेल. परंतु तसे नाही. या चळवळीत यश यायचे असेल तर आपल्या शक्तीबरोबरच इतरही काही अनुकूल फॅक्टर्सची आवश्यकता आहे. जसे, सर्वसाधारण जनतेची सक्रिय सहानुभूती, पोलिस, सैन्य आदि महत्वाच्या विभागात सरकारविषयी असंतोष इत्यादि. प्रत्यक्ष क्रियेची वेळ आली तर या बाबतीत संबंधित लोकांची प्रतिक्रिया काय राहील हे सांगता येत नाही. तरी पण क्रांतीकरिता आवश्यक असे सर्व फॅक्टर्स आपल्याला अनुकूल राहतील असे गृहीत धरूनही माझा असा अंदाज आहे की आपण सर्व शक्ती पणाला लावून उठाव केला असता हा उठाव एका मर्यादित भागातच यशस्वी होऊ शकला असता. व ते क्षेत्र म्हणजे बेळगाव ते गोंदिया. परंतु इतके करूनही आपण ध्येयाच्या जवळ जाऊ शकणार नाही. जरी वर सांगितलेल्या फॅक्टर्सची अनुकूलता व आपली शक्ती पुरेशी आहे असे समजले तरी अर्थात तसे करण्यात काही धोका आहे. परंतु आजची स्थिती इतकी क्रिटिकल आहे की एक राष्ट्रीय शक्ती या नात्याने हा धोका पत्करायला हरकत वाटू नये हा धोका पत्करल्याने इष्टसिध्दी होणार असेल तर तसे करण्याकरिता मलाही हरकत वाटत नाही.

आपले प्रभावक्षेत्र बेळगाव ते गोंदिया न राहता काश्मीर किंवा आसामसारख्या सरहद्दीवरच्या प्रदेशात राहिले असते, तर हा धोका पत्करायला मी तयार राहिलो असतो. कारण चळवळीचे क्षेत्र देशाच्या एका टोकाला असेल तर आपल्या प्रभावाखालील भाग मुक्त केल्यानंतर शत्रूच्या सैन्यापासून बचाव करण्याकरिता आपल्या भागाला देशाच्या इतर भागाशी जोडणारी दळणवळणाची साधने उद्ध्वस्त करून आपला भाग बराच काळपर्यंत मुक्त ठेवता येतो. रेल्वे पुल पाडणे, रस्ते उडवणे वगैरे गोष्टी यांत येतात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की आपले प्रभावक्षेत्र देशाच्या मध्यभागी आहे. क्रांती यशस्वी झाल्यानंतर जो भाग स्वतंत्र होईल, त्या भागावर सर्व बाजूंनी सेना पाठविणे शत्रूला शक्य होईल व अशा स्थितीत सरकारचे सैन्य आत घुसले तर सर्वसाधारण जनतेमध्ये त्यांच्या अत्यांचारांमुळे डीमॉरलायझेशन भीषण प्रमाणात वाढेल. इच्छिलेल्या परिणामांहून अगदी विपरीत

परिणाम होईल. स्वतंत्र होणारा भाग सीमेवरचा असला म्हणजे एक बाजू तरी निर्धास्त असू शकते व शत्रूसेनेच्या प्रतिकाराला पुष्कळ वेळ मिळू शकतो.

या स्थितीत संघाने चळवळीत उतरणे यापासून लाभ होणार नही असे मला वाटते. एक संस्था या नात्याने आपण सुरक्षित असावे ही भावना माझ्या मनात नाही, परंतु रणनीतीचा विचार केल्यास यावेळी उठाव केल्याने जनतेच्या डीमॉरलायझेशनशिवाय काहीही पदरात पडणार नाही.

या बोलण्यात श्रीगुरूजींनी त्यावेळी नुकत्याच प्रचलित झालेल्या 'जिओ पॉलिटिक्स' या संकल्पनेचा उच्चार केला होता. या संकल्पनेचा अभ्यास मी करावा असा आग्रह करून मला काही पुस्तके सुचविली होती.

श्रीगुरूजींनी हे सांगितले त्याचा पूर्ण अर्थ मी समजू शकलो नाही. त्यानंतरच्या काही वर्षांनी घडलेल्या दोन घटनांमुळे त्यांच्या विचारांचा अन्वयार्थ ध्यानात आला. १५ सप्टेंबर १९४७ च्या पूर्वीच निझाम राज्याच्या एका भागात कम्युनिस्टांनी आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले होते. त्यांनी बाकी भागापासून आपला दळणवळणाचा संबंध तोडून टाकला होता. निझामाचे प्रशासन दुर्बल असल्यामुळे त्यांच्या सीमित क्षेत्रात त्यांचे राज्य अबाधितपणे काही महिने चालले होते. निझामाचा पराभव झाल्यानंतर सरदार पटेलांनी त्यांच्या (कम्युनिस्टांच्या) प्रभावक्षेत्रावर सर्व बाजूंनी सेना पाठवली व त्यांचे राज्य उडवून लावले. त्यामुळे कम्युनिस्टांच्या पुढील योजनांना धक्का बसला. आपल्या या पराभवाविषयी बोलताना कम्युनिस्ट पुढारी म्हणत, "Because our's was an island surrounded by ocean of capitalism" या उदाहरणावरून देशाच्या मध्यभागी स्वतंत्र राज्य स्थापन करण्याने पूर्ण कार्यसिध्दी होऊ शकत नाही हे स्पष्ट झाले.

असेच उदाहरण चीनच्या इतिहासातही आहे. माओ त्से तुंगने आपले स्वतंत्र कम्युनिस्ट राज्य स्थापन केले ते चीनच्या मध्यभागी होते. चांग काई शेक यांची सेना तरी अव्यवस्थितच होत. तरी पण त्या सेनेने या कम्युनिस्ट राज्यावर सर्व बाजूंनी हल्ले चढवले व त्यावरून देशाच्या मध्यभागी स्वतंत्र राज्य स्थापन करणे रणनीतीच्या दृष्टीने अयोग्य आहे हे माओच्या ध्यानात आले. त्यामुळेच त्याने जगाच्या इतिहासातील, एक अभूतपुर्व, आठ हजार महिलांचा लाँग मार्च, आपल्या सर्व प्रजाजनांसह काढला. कम्युनिस्ट रशियाच्या सरहद्दीवरील चेनान प्रांतात आपले केंद्र बनविले व तेथून चांग काई शेकच्या विरूध्द युध्द चालु केले. चेनान प्रांत अगदी सरहद्दीवर असल्यामुळे दळणवळणाची साधने तोडणे शक्य झाले, शिवाय पाठीशी असलेल्या कम्युनिस्ट रशियाची मदतही सहजपणे प्राप्त होत गेली.

या दोन्ही घटना १९४२ च्या नंतरच्या आहेत. केवळ बेळगाव ते गोंदिया हे प्रभावक्षेत्र असल्यामुळे व ते देशाच्या मध्यभागी असल्यामुळे त्याचे परिणाम पुढे काय होऊ शकतील याचा श्रीगुरूजींनी घेतलेला अंदाज किती अचूक होता हे यावरून दिसते.

(येथे हे नमूद करणे अप्रासंगिक होणार नाही की, प्रारंभापासून गुरूजींचा हा आग्रह असे की राष्ट्रनिर्माणाचा विचार करणाऱ्या कार्यकर्त्यांनी Geo-Politics हा विषय आग्रहपूर्वक वाचावा व या दृष्टीने ते 'हॅरिंगटन' या लेखकाचा उल्लेख करीत असत.)

१९४२ मधील आंदोलनासंबंधी आणखी एका गोष्टीचा उल्लेख आवश्यक ठरतो. श्रीगुरूजींच्या अगदी निकटवर्तीयांकडून मिळालेली माहिती अशी की, श्रीगुरूजींचा सरकारी यंत्रणेतील अनेकांशी चांगला संपर्क होता व शासकीय गोटात काय शिजते आहे, याची विश्वसनीय माहिती त्यांना मिळत

असे. त्यांना असे समजले होते की, 'भारत छोडो' आंदोलनाला अनुलक्षून काँग्रेस नेत्यांत काय विचार होत आहे, याची अगदी खडा न् खडा माहिती नित्य सरकारला मिळत असे. हे आंदोलन ताबडतोब दडपून टाकण्याची कारवाई सरकार करील, असे श्रीगुरूजींना सांगण्यात आले होते. काँग्रेस गोटातील माहिती काँग्रेसचेच लोक सरकारला पुरवीत होते. श्रीगुरूजींना जे कळले तसेच घडले. ९ ऑगस्टच्या आदल्या रात्रीच काँग्रेसचे सर्व पुढारी पकडले गेले. शासकीय दडपशाहीचा वरवंटा फिर लागला. फार थोडया अवधीत नेतृत्वविहीन व दिशाविहीन आंदोलन शांत होऊन गेले. काही दिवस कुठेकुठे तुरळक छोटेमोठे उद्रेक होत राहिले एवढेच.

१९४२ चे आंदोलन खळबळ निर्माण करून गेले. भारतीय जनतेच्या तीव्र स्वातंत्र्याकांक्षेची नवी जाण ब्रिटिश शासनाला देऊन गेले. पण आंदोलन थंडावलेले, नेते तुरूंगात, समोर प्रत्यक्षपणे काही कार्यक्रम नाही, अशा स्थितीत वैफल्याची भावना लोकांत पसरली तर ते स्वाभाविकच म्हटले पाहिजे. शिवाय यावेळी हळूहळू युध्दाचा रागरंगही बदलू लागला होता. दोस्त राष्ट्रांचे पारडे जड होऊ लागले होते. सुभाषबाबूंना आपल्या सेनेसह भारतात प्रवेश करणे व दिल्लीच्या रोखाने मुसंडी मारणे अशक्य ठरले होते. या परिस्थितीत लोकांना उत्साहित करण्यासाठी व अधिकाधिक सामर्थ्य संघाच्या माध्यमाने एकटवण्यासाठी श्रीगुरूजींच्या नेतृत्वाखाली संघाचा भगीरथ प्रयत्न चालु होता. त्याला प्रतिसादही चांगला मिळत होता. १९४२ नंतरच्या काळात प्रांतोप्रांती संघशाखांची वाढ झपाटयाने झाली. जागोजाग नवे तोलामोलाचे कार्यकर्ते श्रीगुरूजींनी संघासाठी मिळविले. सर्वत्र संघशाखा भरदार दिसू लागल्या. प. बंगाल, आसाम, ओरिसा, तामिळनाडू असे काही अपवाद वगळता सर्वत्र आणि विशेषत: उत्तर भारतात संघाचे सामर्थ्य जाणवण्याइतपत निर्माण झाले. पण याचवेळी स्वातंत्र्यप्राप्तीच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला फाटे फुटण्याची लक्षणे दिसू लागली.

१९४० सालापासुन मुस्लिम लीगने भारतात हिंदू आणि मुसलमान ही दोन वेगळे राष्ट्रे असल्याचे प्रतिपादन करून मुसलमानांसाठी वेगळया पाकिस्तान नामक राज्याची मागणी सुरू केली होती. काँग्रेस ही हिंदूंची संस्था आहे व देशातील कोटयावधी मुसलमानांच्या वतीने बोलण्याचा तिला मुळीच अधिकार नाही, अशी तडजोडीपलीकडची भूमिका लीगचे नेते बॅ. महंमद अली जीना यांनी घेतली होती. १९४५ साली युध्द संपले व दोस्त राष्ट्रांचा विजय झाला तरी ब्रिटिशांना हिंदूस्थानावरील आपली सत्ता कायम ठेवणे अशक्यप्राय वाटत होते. काँग्रेसचे नेते पाकिस्तानच्या मागणीला मुळीच अनुकूल नव्हते. या मुद्दयावर राजाजींसारख्या प्रमुख नेत्याने काँग्रेसला राम राम ठोकला, तरी पाकिस्तानविरोधी भूमिका सोडण्याची काँग्रेसची तयारी नव्हती. युध्दाच्या समाप्तीनंतर काँग्रेस नेत्यांची तुरूंगातून मुक्तता झाली व ब्रिटिशांनी वाटाघाटीचे सत्र पुढे सुरू केले. ब्रिटिशसत्ता, काँग्रेस आणि लीग म्हणजे हिंदू आणि मुसलमान यांचे मतैक्य होत नसल्याने स्वातंत्र्याचे हक्क भारतीय जनतेला देण्याच्या प्रश्नाचा निर्णय अवघड होऊन बसला. अर्थात यामागे ब्रिटिशांचीच भारताचे विभाजन घडवुन आणण्याची दीर्घसुत्री आणि कुटिल नीती होती.

राष्ट्रीय भवितव्याच्या या ओढाताणीत श्रीगुरूजींनी घेतलेली भूमिका अगदी स्पष्ट आणि सडेतोड होती. मातृभूमी अखंड राहिली पाहिजे. हा सौदेबाजीचा विषय होऊच शकत नाही, असे श्रीगुरूजी आपल्या भाषणात सांगत. १९४५-४६ च्या या काळात श्रीगुरूजींची भाषणे ऐकण्यास येणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली होती. शाखांचे जाळेही झपाटयाने उभे राहत होते. प्रथम पाकिस्तानच्या निर्मितीचा प्रश्न थट्टेवारी उडवून लावण्याची प्रवृत्ती बहुतेक राजकीय पुढाऱ्यांत होती. पण नंतर ब्रिटिश

साम्राज्यसत्ता आणि जात्यंध मुस्लिम लीग यांचे संगनमत होऊन फाळणीचे संकट खरोखरच ओढवणार तर नाही ना, असा प्रश्न देशात गंभीरपणे विचारला जाऊ लागला होता.

या वेळपर्यंत श्रीगुरूजींच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने तसेच हजारो कार्यकर्त्यांच्या जिवापाड प्रयत्नांमुळे देशात संघशाखा बहरल्या होत्या. तरूण वर्ग फार मोठया संख्येने संघात आला होता. संघाच्या या ऐतिहासिक प्रगतीचे श्रेय कित्येकजण देशातील अस्थिर आणि अशांत परिस्थितीला देतात. काही थोडया प्रमाणात ते खरेही आहे असे मानता येईल. पण मग प्रश्न असा पडतो की बंगालमध्ये संघाचे काम पंजाबप्रमाणे का वाढले नाही? सीमावर्ती प्रदेशात जाणवणारा तणाव विदर्भ आणि महाराष्ट्र या भागात मुळीच नव्हता. तेथे संघाला प्रचंड प्रतिसाद का मिळाला? वस्तुस्थिती अशी दिसते की, भारताचे अखंड राष्ट्रस्वरूप त्याच्या नैसर्गिक वैशिष्टयांसह कायम राखून स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट प्राप्त करू शकणारी आणि नंतरही देशाला सुयोग्य मार्गावर ठेवण्यास समर्थ अशी सुसंघटित शक्ती या नात्याने लोक संघाकडे पाहू लागले होते. मुस्लिम दहशतवादाला निर्णायक उत्तर राष्ट्रीय भावनेचे जागरण व प्रबल संघटन हेच असू शकते, अनुनय किंवा तात्पुरती तडजोड यांतून काही साध्य होऊ शकत नाही, हे राष्ट्रीय हिंदू समाजाच्या मनावर बिंबविण्यात श्रीगुरूजींच्या सुस्पष्ट, सडेतोड आणि भावोत्कट प्रतिपादनाने अपूर्व यश संपादन केले होते. ध्येयवाद आणि प्रयत्नवाद यांचे वारे सर्वत्र निर्माण झाले होते. पण अनेक वर्षांच्या कारावासातून मुक्त होऊन आता वाटाघाटींच्या घोळात पडलेले, संघर्षाची उमेद गमावलेले थकलेले राजकीय नेते येनकेनप्रकारेण सत्तासंक्रमण घडवून आणण्यास अधीर झालेले होते. तरी काँग्रेस अधिवेशनाने विभाजनाची कल्पनाच फेटाळून लावली होती. देशाचे अखंडत्व राखण्यासाठी प्रसंगी देह अर्पण करण्याची आश्वासक भाषा गांधीजींनी उच्चारली होती. या शब्दांवर लोकांचा विश्वास होता. त्यावर अविश्वास दाखविण्याचे श्रीगुरूजींना किंवा संघालाही काही कारण नव्हते.

म्हणून आपल्या देशव्यापी भरारीत यावेळी श्रीगुरूजी सांगत होते की दहशतवाद, गुंडगिरी, छोटेमोठे अत्याचार, दंगली माजविण्याचा प्रयत्न यामुळे कोणी विचलित होऊ नये. आत्मसंरक्षणाचा अधिकार कायद्यानेच प्रत्येकाला दिलेला आहे. १९४६ साली नागपूर येथे विजयादशमी महोत्सवात श्रीगुरूजींनी जे भाषण केले, त्यात सभोवारच्या संघर्षमय परिस्थितीचे पडसाद स्पष्टपणे उमटले होते. त्यांनी सांगितले, 'प्रतिकार न करण्याची भाषा पराक्रमी वृत्तीची निदर्शक आहे असे मला वाटत नाही. आजच्या संघर्षमय काळात प्रतिकार न केल्याने काय देशाचे भले होईल? मला तर संघर्ष अनिवार्य दिसतो. आपण भलेही प्रतिकार न करा, पण तेवढयामुळे आक्रमक प्रवृत्तीचे लोक आपल्या कृष्णकृत्यापासून थोडेच परावृत्त होणार आहेत? निमूटपणे बळी जाणारा बकरा आपल्याला बनावयाचे नाही. आत्मसंरक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा आणि समाजाचा नैसर्गिक अधिकार आहे. संरक्षणाचे काम सरकारचे आहे. तेव्हा कोणीही प्रतिकारार्थ बोट उचलू नये, हा उपदेश अवैध आहे."

या प्रकारच्या प्रेरणेचे परिणाम म्हणून अत्यांचारांना तोंड देण्याची मानसिक सिध्दता समाजात वाढली होती. विभाजनवादी शक्तीही ब्रिटिशांची फूस लाभल्यामुळे यावेळी इरेला पटेल्या होत्या. इंग्लंडमध्ये युदधतील विजयानंतर सत्तेमध्ये बदल झालेला होता. भारताला स्वातंत्र्य प्रदान करण्यास अनुकूल असलेला ब्रिटिश मजूर पक्ष श्री. ऍटली यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आला होता. १९४६ मधील निवडणुकीची घोषणा झाली होती. काँग्रेसने या निवडणुका अखंड भारताच्या कैवाराने तर मुस्लिम लीगने पाकिस्तान निर्मितीच्या प्र   नावर लढविल्या. त्यावेळी मुसलमानांसाठी राखीव जागा असत. या बहुसंख्य जागा मुस्लिम लीगने जिंकल्या. देशभरातील मुसलमानांनी पाकिस्तानच्या

मागणीला समर्थन दिले. हिंदू मतदार एकजात काँग्रेसच्या मागे उभे राहिले. यात अपवाद केवळ वायव्य सरहद्द प्रांताचा. पाकिस्तानचे अतिशय प्रचंड समर्थन भारताच्या अगदी अंतर्गत भागातील मुसलमानांनी देखील केले हे ध्यानात घेण्यासारखे आहे. ज्या प्रदेशांचा पाकिस्तानात समावेश करावा अशी लीगची मागणी होती त्यात उत्तर प्रदेश, बिहार, केरळ किंवा मद्रास यांचा समावेश नव्हता. परंतु या प्रदेशात मुस्लिम मतदारांनी सर्रास लीगला पाठिंबा दिला. ब्रिटनमध्ये सत्तारूढ असलेल्या मजूर सरकारने स्वातंत्र्यदानाचा कार्यक्रम ठरविण्यासाठी कॅबिनेट मिशन भारतात पाठवले. पण भारत अखंड राखून स्वातंत्र्य देण्याची कोणतीच योजना जिनांना मान्य होईना. केंद्रशासनात लीगने काँग्रेसची अडवणूक मांडली. सरकारचीही इच्छा भारताचा सगळा भूभाग एकसंघ ठेवून स्वातंत्र्याचे उदक सोडण्याची नव्हतीच.

बॅ. जिनांनी पाकिस्तानच्या निर्मितीसाठी दडपण वाढविण्याच्या व फाळणीच्या विरोधकांना घाबरवून सोडण्याच्या उद्देशाने दि. १६ ऑगस्ट १९४६ हा प्रत्यक्ष प्रतिकाराचा (डायरेक्ट ॲक्शन) दिवस म्हणून घोषित केला. या दिवशी दंगलीचा डोंब उसळवून देण्यात आला. बंगालमध्ये कलकत्ता, डाक्का, नौखाली, इत्यादी ठिकाणी या प्रत्यक्ष कृतीच्या निमित्ताने जे नृशंस प्रकार घडले, त्यामुळे कोठे घबराट, तर कोठे प्रक्षोभ अशा प्रतिक्रिया निर्माण झाल्या. बिहारातील प्रक्षोभ काँग्रेसच्या नेत्यांकडून बलप्रयोगाने दडपून टाकण्यात आला. मोठे खळबळीचे वातावरण निर्माण झाले आणि यादवी व रक्तपात ओढवून घेण्यापेक्षा पाकिस्तान देऊन टाकावे आणि कटकटीतून सुटावे, असा विचार काँग्रेसमधील पुढाऱ्यांच्या मनात बळावू लागला. मुसलमानांची बहुसंख्या असेलल्या प्रदेशात हिंदूंवरील आक्रमणे प्रतिदिन वाढत गेली. सुदैवाने यावेळी पंजाब भागात संघाची शक्ती चांगली होती. श्रीगुरूजी पाकिस्तान निर्मितीच्या योजनेविरूध्द केवळ बोलतच नव्हते तर उपद्रवग्रस्त भागात संचार करून लोकांना धीरही देत होते. या खळबळीच्या काळात पंजाब आणि संध प्रांतात त्यांनी वारंवार दौरे केले. या दौऱ्यात त्यांच्या सभा अतिशय प्रचंड होत. पाकिस्तान होऊ नये व हिंदूंनी घाबरून आपआपल्या ठिकाणाहून पळ काढू नये असा त्यांचा प्रयत्न होता. अद्याप पावेतो, गांधीजींनी विभाजनाला संमती दिलेली नव्हती. काँग्रेस नेत्यांना श्रीगुरूजींचा सल्ला असा होता की, विभाजन मुळीस मान्य करू नये. मुस्लिम गुंडगिरीला तोंड देण्यास हिंदू समर्थ आहेत. थोडी कळ सोसावी लागेल. पण विभाजनाचे संकट नक्की टाळता येईल. गांधीजी आपला शब्द बदलणार नाहीत, ही अशा तर अगणित लोकांच्या मनात होती. विभाजनाची प्रत्यक्ष घोषणा दि. ३ जून १९४७ ला झाली. तत्पूर्वी काही दिवस पंजाबातील एका भाषणात श्रीगुरूजी म्हणाले होते, "आम्ही पाकिस्तानला जाणत नाही, पाकिस्तान आम्हाला मान्य नाही. संघटितपणे व आत्मविश्वासपूर्वक संघर्ष करीत आपल्याला आपआपल्या ठिकाणी पाय रोवून उभे राहिले पाहिजे. जर आपण संघर्षाला भिऊन आपल्या मातृभूमीचा त्याग करू तर या लोकांना विभाजनाचे, आपल्या प्रियतम मातृभूमीच्या विच्छेदनाचे काहीच दु:ख झाले नाही अशी आपल्याला सर्वस्वी लांच्छनास्पद नोंद इतिहास करील. या लोकांनी आपले प्राण मातृभूमी आणि उज्जवल परंपरा यापेक्षा अधिक प्रिय मानले, असा आपला दुर्लौकिक होईल. आपल्या समाजात नेहमीसाठी एक प्रकारची मानसिक दुर्बलता घर करून बसेल. म्हणून प्राणपणाने प्रतिकार करीत अखेरपर्यंत आपण आपआपल्या स्थानीच घट्ट राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे."

गुरूजींनी संघाच्या हजारो स्वयंसेवकांची ढाल करून सगळयांना सुरक्षिततेची भावना व हिंमत देण्याचा जो प्रयत्न केला, त्याचा परिणाम समाजाचे मनौधैर्य वाढण्यात जरूर झाला. पण मुस्लिम

लीगच्या हटवादीपणाने, गुंडगिरीने व अडवणुकीने संत्रस्त होऊन गेलेल्या नेहरू - पटेलांना धीर धरवला नाही. तलवारीशी तलवार भिडेल, अशी रणमर्द घोषणा करणारे सदरदारही हताश होऊन गेले. या राजीकय शिष्योत्तमांचा सल्ला गांधीजींनीही मानला व आभाळ कोसळले. लॉर्ड वेव्हेल आणि लॉड मौंडबॅटन यांनी 'फोडा व झोडा' नीतीचा अवलंब केला आणि लीगला पाठीशी घालुन विभाजन स्वीकारण्यासाठी काँग्रेसच्या पुढाऱ्यांवर दडपण आणले. ते दिवस असे होते की, विभाजन स्वीकारल्यास खंडित भारताला मिळणारे स्वातंत्र्य अगदी दृष्टिपथात आले होते. विभाजन नाकारल्यास आणखी किती काळ संघर्ष करावा लागेल, याचा भरवसा नव्हता. हिंमत हारलेल्या नेत्यांनी संघर्ष टाळून विभाजनाचा पर्याया स्वीकारला, तेव्हा गुरूजींना पराकाष्ठेचे दु:ख झाले. विभाजन करतांना लोकसंख्येची अदलाबदल करावी ही बॅ. जीनांची सूचना नेहरूंनी फेटाळून लावली. हिंदू लोक पाकिस्तानात सुरक्षितपणे राहू शकतील असा आभास निर्माण करण्यात आला. विभाजनाच्या घोषणेपूर्वीच रावळपिंडी, अमृतसर, लाहोर वगैरे ठिकाणी मार्च महिन्यात हिंदूंवरील अत्याचारांनी उग्र रूप धारण केलेले होते. पण हा आघात हिंदूंनी धैर्याने सोसला आणि उलटविला. संघाच्या नेतत्वाखाली गावोगाव संरक्षण फळया उभ्या झाल्या होत्या. जिथे केवळ वीस वा तीन टक्के हिंदू लोकवस्ती होती, तिथेही तेजस्वीपणा व पराक्रम प्रकट झाला.

या सगळया धामधुमीतही पंजाब विभागात संगरूर व फगवाडा येथे जुलै १९४७ मध्ये ठरल्याप्रमाणे संघ शिक्षावर्ग सुरू झाले. श्रीगुरूजी दोन्ही वर्गात गेले. परिस्थितीची चर्चा त्यांनी केली. समयोचित मार्गदर्शन कार्यकर्त्यांना केले. या दोन्ही शिबिरांत मिळून ३,७०० कार्यकर्ते त्यावेळी एकत्र आले होते. शिबिर चालू असताना अत्याचारांच्या आणि संघर्षाच्या वार्ता येतच होत्या. पण खरा धक्का दिला लाहोरचा समावेश पाकिस्तानात करण्याचे ठरले या वार्तेने. या वार्तेमागोमाग लाहोरात अत्याचारांचा डोंब उसळल्याच्याही वार्ता आल्या. तेव्हा लगेच शिबिरांचा समारोप करण्यात आला व योग्य मार्गदर्शनानंतर कार्येकर्ते आपआपल्या स्थानी परत निघाले. या कार्यकर्त्यांपैकी कित्येक जण नंतर कोणाच्याच कधी दृष्टीस पडले नाहीत. आपल्या समाजाच्या रक्षणासाठी त्यांनी वीरमरण पत्करले. त्या घोर संकटकाळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक संरक्षणाचे एकमेव आशास्थान बनले होते, अशी स्तुतिस्तोत्रे विभाजनाच्या कालखंडावर लेखन करणाऱ्या अनेक ग्रंथकारांनी गायिली आहेत. या कामी आपला आणि परका असा भेद स्वयंसेवकांनी केला नाही. काँग्रेस पक्षाच्या अनेक नेत्यांनी संघाच्याच छत्राखाली सुरक्षितपणे भारतीय सीमा गाठली. हे जे अद्‌भुत पराक्रमपर्व घडले, त्यासंबंधी तपशीलवार विवेचन श्रीगुरूजींनी कधीही केले नाही. संघाकडे काही विशेष श्रेय घेण्याचाही प्रयत्न त्यांनी केला नाही. तो सगळा इतिहास आपल्याला अज्ञातच आहे. या सर्व उपद्रवग्रस्त क्षेत्रांशी श्रीगुरूजी सतत संपर्क राखून होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी फाळणी अंमलात आली. त्यापूर्वी त्यांनी सिंधचा तीन दिवस (५ ते ८ ऑगस्ट) प्रवास केला होता. पंजाबात ते फिरून आले होते.पंजाबमधील त्यावेळच्या विलक्षण आंतकित, असुरक्षित आणि अस्थिर वातावरणात अमृतसरपासून अंबाल्यापर्यंत सर्व जिल्ह्यांत श्रीगुरूजींनी कसा प्रवास केला असेल, याची कल्पनाच अंगावर शहारे आणणारी आहे. एकच उदाहरण इथे सांगितले तरी स्वत:चा जीवन धोक्यात घालून ते ठिकठिकाणी कसे गेले, आपल्या आपद्‌ग्रस्त बांधवांच्या भेटीची केवढी जबरदस्त ओढ त्यांच्या हृदयात असली पाहिजे, हे ध्यानात येऊ शकेल. हा प्रवास त्यांनी पाण्यापावसाने उद्‌ध्वस्त झालेल्या रस्त्यांवरून व रेल्वे मार्गावरून केला. कधी इंजिनमध्ये बसावे लागले तर कधी मालगाडीच्या गार्डच्या सोबतीने पल्ला पार करावा लागला. एक चेहडू नामक पूल प्रवासाच्या मार्गात होता. तिथे पोहोचल्यावर पलीकडचा प्रवास अशक्य असल्याचे

दिसले. कारण नदीला पूर लोटलेला होता. पूल तुटला होता. रेल्वेचे रूळ खाली लोंबकळत होते. पुलाखाली पुराचे पाणी खळाळत वाहत होते. पुलाजवळ येताच  श्रीगुरूजींसोबत असलेल्या कार्यकर्त्यांपुढे प्रश्नचिन्ह उभे झाले. पुल ओलांडण्याचा धोका पत्करू नये, असा सूर व्यक्त झाला. पण क्षणाचाही विचार न करता श्रीगुरूजींनी रूळावर पाय ठेवला व सरसर चालत त्यांनी पूल पाहता पाहता पार केला. नाईलाजाने इतर कार्यकर्त्यांनाही जिवाचा धडा करून हे दिव्य पार पाडावे लागले. श्रीगुरूजींना ध्यास होता पुढे जाणयाचा. अडचणी जणू त्यांच्या खिजगणतीतच नव्हत्या. त्या प्रवासीची आठवण आली की अद्यापही अंग शहराते, असे श्रीगुरूजींचे स्वीय सहायक डॉ. आबाजी थत्ते एकदा म्हणाले.

या प्रवासानंतर श्रीगुरूजी काश्मीरातही जाऊन आले व मोठया आस्थेने त्यांनी श्री. शंकराचार्य यांनी स्थापलेल्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. परत आल्यावर पंतप्रधान पं. नेहरूंची भेट घेऊन काश्मिर भेटीचा वृत्तांत कथन केला. सरदार पटेलांनाही ते भेटले.

स्वयंसेवकांचे बलिदान म्हणजे समाजासाठी पार पाडलेले आवश्यक कर्तव्य एवढीच श्रीगुरूजींची विनम्र भूमिका राहिली. संघाच्या प्रेरणेने पंजाब रिलीफ कमिटी स्थापन झाली व तिने हिंदू विस्थापितांची सर्व प्रकारे चिंता वाहिली, एवढेच मोघमपणे म्हणता येते. हे सगळे भीषण पर्व आटोपल्यानंतर एकदा दिल्लीत पत्रकारांनी खोदून खोदून विचारले असता श्रीगुरूजींनी उत्तर दिले ते फार बोलके वाटते. "संघाने काय केले याची जाहिरात आम्हाला करावयाची नाही. कारण आपल्या मातृभूमीची आणि आपल्या बांधवांची जी सेवा केली तिची जाहिरात ती काय करावयाची? पण जर त्या सगळया घटना लोकांना सांगितल्या तर सगळयांच्या रोमरोमांतून संघाच्या जयजयकाराविना अन्य ध्वनी ऐकू यावयाचा नाही." हे श्रीगुरूजींचे शब्द !

या कालखंडासंबंधी श्रीगुरूजींनी १९६० साली इंदूर येथे झालेल्या संघ कार्यकर्त्यांच्या अखिल भारतीय शिबिरात ओझरता उल्लेख केलेला आढळतो. संघाचे नित्य कार्य किती महत्वाचे आहे व तातपुरत्या समस्या किंवा संघर्ष यामुळे मनात चलबिचल होणे कसे अनिष्ट आहे, या संदर्भात श्रीगुरूजी बोलत असता हा उल्लेख आलेला आहे. त्यातील काही भाग उद्-घृत केल्यास श्रीगुरूजींच्या विचारांची दिशा स्पष्ट होईल. ९ मार्च १९६० च्या या भाषणात श्रीगुरूजी म्हणाले, देशात वेळोवेळी निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनात चलबिचल होत असते. १९४२ मध्ये अशी चलबिचल झाली होती. १९४२ मध्ये अनेकांच्या मनात तीव्र आंदोलने होते. त्यावेळीही संघाचे नित्यकार्य सुरूच होते. प्रत्यक्षपणे संघाने काहीही करावयाचे नाही, असा संकल्प केला होता. परंतु संघाच्या स्वयंसेवकांचय मनात चलबिचल सुरूच होती. संघ अकर्मण्य लोकांची संस्था आहे, त्याच्या बोलण्यात काहीही अर्थ नाही, असे केवळ बाहेरचे लोक म्हणत होते असे नव्हे तर आपल्याही अनेक स्वयंसेवकांनी म्हटले होते. ते खूप नाराज झाले होते.

"यानंतर संपूर्ण देशात पुन्हा एकदा अस्थिर परिस्थितीचा लोकांना अनुभव येऊ लागला. मुसलमानांनी मारामाऱ्या आणि दंगेधोपे सुरू करून दिले होते. फाळणीच्या पूर्वरंगाची कृष्णछाया पसरू लागली होती. या परिस्थितीचा खंबीरपणे सामना करण्याचा विचार आपल्या लोकांच्या मनात आला व पुन्हा ते कार्यविस्तारास लागून गेले होते. परंतु खुप उशीर होऊन गेला होता. जेव्हा नाकातोंडात पाणी जाऊ लागते  तेव्हा पोहणे शिकण्याचा विचार मनात येऊन काय लाभ? आपल्या समाजाला काय झाले आहे हे कळत नाही. तहान लागल्यावरच विहीर खणावयाची ही वाईट सवय कशी काय जडली कळत

नाही. त्यावेळी लोक म्हणावयाला लागले की, संघटना असावयाला हवी होती. याचा परिणाम असा झाला की, पंजाबातील संघशाखांत पूर लोटला. मला आठवते की, मी त्यावेळी असे म्हणालो होतो की, माणसाला पंडुरोग झाला म्हणजे तो फुगतो. परंतु त्याच्या स्थूल शरीराचा बोजा हे मृत्युचे पूर्वचिन्ह असते. त्याच्या मुखावरील गौरवर्ण हा विवर्ण असतो. अशा पुष्ट दिसणाऱ्या शरीराकडुन महत्कार्य होत नाही. त्यावेळी ते तसे झालेही नाही. काही अल्पसे कार्य झाले आणि संकटाचा यथाशक्ती प्रतिकारही करण्यात आला. त्या संकटाच्या कृष्ण स्वरूपाचा अनुभव आल्यावर स्वयंसेवक आणि कार्यकर्ते यांच्या अंत:करणात एक चलबिचल निर्माण झाली."

१९४७ साली झालेल्या फाळणीच्या संदर्भात अनेकांनी अनेक प्रकारचे प्रश्न नंतरच्या काळात उपस्थित केले. मातृभूमीची अखंडता जर संघाला प्राणाहून प्रिय होती तर सर्वस्व ओतून देशभर या फाळणीविरूध्द चळवळीचा उठाव संघाने का केला नाही, अशी पृच्छा करण्यात आली. या प्रश्नाचे अप्रत्यक्षपणे उत्तर श्रीगुरूजींच्या इंदूरच्या वरील भाषणात आहेच. अधिक स्पष्टपणे सांगावयाचे तर असे म्हणाले लागेल की, फाळणी टाळण्याचा शक्य तेवढा प्रयत्न संघाने अवश्य केला. काँग्रेसनेते व गांधीजी यांनी फाळणी मान्य करून देशाच्या वतीने ब्रिटिश सरकार व मुस्लिम लीग यांच्याबरोबर करार केला नसता, तर समाजाला बरोबर घेऊन संघ यशस्वीपणे झुंजू शकला असता. पण फाळणी सरकारी पातळीवर स्वीकारली गेली. ब्रिटिशांची हमी फाळणीला होती. पाकिस्तानी लष्कर हिंदूंवर तुटून पडले असते. भारत सरकारनेही पाशवी बळ वापरून चळवळ दडपलीच असती, फाळणीविरोधी लढा म्हणजे देशात यादवी युध्द व राष्ट्रीय शक्तीचे खच्चीकरण आणि परक्यांना नव्या आक्रमक साहसासाठी निमंत्रण असे चित्र दिसू लागले तेव्हा हिंदूची हानी शक्य तेवढी टाळण्यापलीकडे करण्यासारखे काही राहिलेच नव्हते. फाळणीच्या वेदनेपेक्षा राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद काँग्रेसला अधिक झाला, हे तर पंधरा ऑगस्टच्या धडाकेबाज सोहळयाने दाखवूनच दिले. या शिखरनीतीला नियंत्रित करू शकणारी प्रखर मातृभक्त लोकशक्ती परिपक्व झालीच नव्हती. हीच सरसंघचालक श्रीगुरूजींची मोठी व्यथा होती. अशी लोकशक्ती संघाच्या नित्य कार्यातूनच आणि ध्येयवादातूनच आज ना उद्या साकार करण्याची तळमळ त्यांना लागून राहिली होती. फाळणीसंबंधी बोलतांना त्यांचे हे भाव वारंवार व्यक्त होत. फाळणी ही वस्तुस्थिती बनली, पण श्रीगुरूजींनी ती 'अंतीम' कधीच मानली नाही. अखंड मातृभूमी हेच त्यांचे सदैव उपास्य दैवत होते, मातृभूमीची भंगलेली मूर्ती पुन्हा अखंड करण्याचे स्वप्न प्रत्येक देशभक्ताने हृदयात वागविले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शक्ती १९४७ पर्यंत बरीच वाढलेली असतानाही संघाने फाळणीला प्रतिकार का केला नाही, केवळ पळणाऱ्या हिंदूंचे रक्षण व विस्थापितांची सेवा यावरच संघाने समाधान का मानले, असा प्रश्न एकदा संघाचे दक्षिणांचल प्रचारक श्री. यादवराव जोशी यांना विचारण्यात आला. या प्रश्नांच्या उत्तरात श्री. यादवरावांनी मान्य केले की श्रीगुरूजींच्या मनात नेमके काय होते हे त्यांनाच ठाऊक. पण तत्कालीन ज्येष्ठ कार्यकर्ते (मा. बाळासाहेब देवरस, भाऊराव देवरस, माधवराव मुळे, वसंतराव ओक, इत्यादी) आणि श्रीगुरूजी यांच्यात फाळणीला प्रतिकार करण्याच्या विषयावर काहीही चर्चा झाली नाही एवढे खरे. पण त्यावेळच्या परिस्थितीचे जे निरिक्षण आणि आकलन श्रीगुरूजींनी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी केले असेल, त्यावरून प्रतिकाररचे रणशिंग न फुंकता हिंदू समाज व हिंदू राष्ट्र यांच्या भल्यासाठी जे काय करता येईल तेवढे करीत राहणे हा एकच पर्याय संघापुढे मोकळा होता, असे वाटते. त्यावेळच्या परिस्थितीचे पुढील पैलू श्री. यादवरावांनी पुढे मांडले.

१) विभाजन थांबविण्याच्या दृष्टीने संघाची शक्ती, लोकांतील जागृती व संघटना अत्यंत अपुरी होती.

२) संघ ही विभाजनविरोधी लोकमत देशभर व्यापक प्रमाणावर जागृत करणारी एकमेव शक्ती त्यावेळी होती. आणि ब्रिटिशांनी १९४८ साली विभाजन आणि सत्तांतर करण्याची योजना जर बदलली नसती तर विभाजन कदाचित होऊच शकले नसते. कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी सहा महिने दम धरला असता तरी विभाजन अळू शकले असते. पण प्रारंभी विभाजनाला आवेशपूर्ण विरोध करणारे नेहरू, पटेल आदि पुढारी व शेवटी खुद्द गांधीजीही विभाजन मान्य करण्यास तयार झाले. तरीही विभाजनविरोधी प्रचार श्रीगुरूजींनी चालविलाच होता. कॉंग्रेस व संघ यांची शक्ती एकत्रित झाली असती तर चित्र एकदम बदललेले दिसले असते. दुर्देवाने, संघाला आपला राजकीय प्रतिस्पर्धी मानून त्याची शक्ती खच्ची करण्याचेच धोरण कॉंग्रेसने अवलंबिले.

३) सगळया संघविरोधी शक्तींना वाटत होते की संघ फाळणीविरोधात बंडाचा बावटा उभारील व ही प्रखर राष्ट्रवादी शक्ती नष्ट करण्याची संधी आपल्याला लाभेल. जर प्रतिकार केला असता तर यादवी आणि हौतात्म्य याखेरीज काहीही पदरात पडले नसते. कॉंग्रेसचा प्रचार असा होता की शेकडो वर्षांनंतर खंडित स्वरूपात का होईना, स्वातंत्र्य प्राप्त होत आहे. शिवाय, फाळणी झाली तरी ती कायमची थोडीच टिकणार? ही तात्पुरती गोष्ट आहे व पुन्हा देश एक होईल, तेव्हा आज फाळणीला विरोध करणारे पर्यायाने स्वातंत्र्यप्राप्तीलाच विरोध करणारे आहेत. संघाने प्रतिकार केलाच असता तर संघ स्वातंत्र्याचा विरोधक ठरूवन त्याला नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न सरकारने व कॉंग्रेसवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांनाही हिरीरीने केला असता. स्वातंत्र्यप्राप्तीचे आकर्षण फार मोठे होते. संघाचा विरोध स्वातंत्र्याला नाही तर विभाजनाला आहे हा आवाज फार क्षीण ठरला असता. संघ हा हिंदूराष्ट्राच्या विचाराचा अंतिम विजय इच्छिणारा व त्यासाठी काम करणार आहे. फाळणी स्वीकारणारांचे पितळ उघडे पाडण्याची कामगिरी संघाला चालू ठेवता येणे आवश्यक होते. प्रत्यक्ष सक्रिय विरोध करता आला नाही, तरी फाळणीविरोधी भूमिका पुष्ट करण्याचा प्रयास श्रीगुरूजींनी अविरतपणे चालूच ठेवला होता. संघटना शाबूत राखणे व तिची शक्ती वाढविणे हाच मार्ग श्रीगुरूजींना राष्ट्रहिताच्या दृष्टीने स्वीकारर्ह हिंदू-हिंदूतील उग्र कलहाचा प्रसंगही यामुळे टळला. फाळणीची वेदना मात्र व्हावयाची ती झालीच. त्यावेळी फाळणी रोखण्यासाठी काही करता आले नाही, हे शल्य देखील कायमचे राहणारच आहे.

४) फाळणीच्या काळात व नंतरही संघाचा प्रभाव एकसारखा वाढतच होता. श्रीगुरूजींच्या कार्यक्रमांना लोकांची अलोट गर्दी लोटतच होती. कॉंग्रेसच्या मुस्लीम अनुनयवादाविरूध्द जनमत संघटित होत होते. हिंदूत्व विचाराला अनुकूलता झपाटयाने वाढत होते. हे चित्र एकदम बदलले ते महात्माजींच्या झालेल्या अत्यंत दुर्देवी आणि अकल्पित हत्येमुळे !

श्री. यादवरावजींचे हे वि   लेषण मुद्दामच थोडे विस्ताराने येथे दिले आहे. त्यावरून फाळणी संदर्भातील संघाच्या म्हणजेच श्रीगुरूजींच्या धोरणाचा साधकबाधक विचार कोणालाही करता येईल. संघासारख्या संघटनेच्या नेत्याला शांतपणे व देशाच्या हितावर लक्ष ठेवून दूरदृष्टीने काही निर्णय करावे लागतात. सर्वांनाच ते त्या त्या वेळी आवडतील असे नाही.

याच संदर्भात श्री. दत्तोपंत ठेंगडी यांचा अभिप्राय असा : "फाळणीच्या वेळी संघाने प्रकट विरोध करायाला हवा होता, असे काही रोमॅन्टिक मंडळींना वाटत होते. त्यांना तत्कालीन परिस्थितीची पूर्ण जाणीव नव्हती. फाळणीला विरोध हे शब्द उच्चरताना त्यांच्या मनात असे दृश्य असे की, ज्याप्रमाणे पानिपतच्या तृतीय युध्दाच्या वेळी एकीकडे अहमदशहा अब्दालीची सेना व दुसरीकडे भाऊसाहेब

पेशव्यांचे सैन्य परस्पर विरोधात उभे होते. त्याचप्रमाणे फाळणीला विरोध म्हणजे एकीकडे बॅ. जिनांची मुसलमान सेना व दुसरीकडे गोळवलकरांची हिंदू सेना असे दृश्य निर्माण होइल व यावेळी संघ जर निष्क्रिय राहिला तर त्याचा अर्थ एवढाच घेता येईल की बॅ. जिनांच्या फौजेशी लढण्याच्या बाबतीत गोळवलकरांनी कचखाऊ धोरण स्वीकारले.

हे मानसिक दृश्य ज्या रोमॅन्टिक लोकांच्या मनात होते ते ही वस्तुस्थिती ध्यानात घेत नव्हते की त्यावेळी देशात पं. जवाहरलाल नेहरूंचे अंतरिम सरकार होते, देशाची सेना, पोलीस आदि शक्ती या अंतरिम सरकारच्या हाती होत्या व संघाने विरोध करण्याचा निश्चय केला असता तर, संघाची सेना व बॅ. जिनांची सेना यांची गाठभेट कुठेही झाली नसती. विरोध करणाऱ्यांना दडपून टाकण्याकरिता पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारताची सेना पुढे आली असती व दृश्य असे उपस्थित झाले असते की एकीकडे भारतीय सेना व दुसरीकडे संघाचे लोक, बॅ. जिनांच्या सेनेची तोंडभेट सुध्दा झाली नसती. रामजन्मभूमीच्या लढयात विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांची सैय्यद शहाबुद्दीनच्या कार्यकर्त्यांशी लढाई झाली नाही. शहाबुद्दीनचे लोक संघर्षाच्या स्थानावर उपस्थितही नव्हते. लढाई झाली ती मुलायमसिंह यादवच्या पोलिसदलाशी. या लढाईत दोन्हीकडे हिंदूच होते."

फाळणीची योजना अमलात आली. नेत्यांवर विसंबून असलेल्या लक्षावधी लोकांना अनन्वित अत्याचार सोसावे लागले. चितोडच्या जोहाराला फिके पाडणारे बलिदान घडले. जन्मभूमीचा त्याग लक्षावधींना करावा लागला. त्यांचे आक्रंदन हृदयविदारक होते. त्यांना देता येईल तेवढा सक्रिय दिलासा संघाने दिला. श्रीगुरूजी म्हणजे हिंदू समाजाचे तारणहार अशी श्रध्दा व्यापक स्वरूपात निर्माण झाली, पण याचवेळी नियती घटनाचक्र काही वेगळयाच दिशेने फिरवू लागली होती.

त्या घटनांकडे वळण्यापूर्वी भारत सरकारद्वारे श्रीगुरूजींनी करवून घेतेल्या एका महत्वाच्या कामासांबंधी थोडे सांगणे आवश्यक आहे. कारण फाळणीनंतर सिंधमध्ये उद्-भवलेल्या अशांत परिस्थितीशी संबंधित असे त्या कामाचे स्वरूप आहे. सामान्यत: ऑगस्ट महिन्यात सिंधमध्ये विशेष गडबड झाली नाही. पण सप्टेंबर महिन्यात भारतातील मुसलमानांचे लोंढे पंजाबात आणि सिंधमध्ये आले. भारतात मुसलमानांवर भयानक अत्याचार होत असल्याच्या अतिरंजित कहाण्या त्यांनी प्रसृत केल्या. परिणामत: सप्टेंबर महिन्यात मुसलमानांनी हिंदूवर अत्याचार करण्यास प्रारंभ केला.

याच दंगलीच्या काळात दि. १० सप्टेंबर रोजी कराचीच्या शिकारपूर कॉलनीत एक बॉम्बस्फोट झाला. हे निमित्त करून पाकिस्तान शासनाने हिंदूच्या धरकपडीचे सत्र सुरू केले. याच वेळी म्हणजे दि. १२ सप्टेंबर दिल्लीच्या भंगी कॉलनीत महात्मा गांधी यांच्याशी श्रीगुरुजींची भेट झाली होती. स्वयंसेवकांच्या मेळाव्यात गांधीजींचे भाषणही झाले होते. बॉम्बस्फोट आणि ही गांधी - गुरूजी भेट या दोन्ही घटनांचे भडक आणि चिथावणीखोर वृत्त कराचीच्या 'डॉन' या वृत्तपत्राने मोठमोठे मथळे देऊन एकत्र छापले होते. "कराचीत बॉम्बस्फोट : पाकिस्तान नष्ट करण्याचा भारताचा प्रयत्न" आणि "महात्मा गांधींचे संघाच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन : जर पाकिस्तान आपले हेच धोरण कायम ठेवील तर भारत-पाक संघर्ष होईल." असे मथळे या बातम्यांना 'डॉन' ने दिले होते.

बॉम्बस्फोटानंतर ऍड. खानचंद गोपालदासजी आणि अन्य १९ संघ स्वयंसेवक यांना अटक करण्यात आली. या संघ कार्यकर्त्यांची मुक्तता कशी घडवुन आणावयाची हा प्रश्न उपस्थित झाला. भारत सरकार व पाकिस्तान सरकार यांच्यातील सामंजस्यानेच स्वयंसेवकांची मुक्ता शक्य आहे आणि बिगर शासकीय पातळीवर काहीही करणे शक्य नाही हे उघड होते. श्रीगुरूजींनी भारत सरकाररातील मंत्री

आणि अधिकारी यांच्याशी संपर्क साधून जो सल्ला दिला त्यामुळे अखेर  ही अवघड कामगिरी यशस्वीपणे तडीला जाऊ शकली. सरदार पटेल हे गृहमंत्री होते. आणि गृहमंत्राल्यातील काही प्रमुख अधिकाराही श्रीगुरूजींसंबंधी सद्-भावना ठेवणारे होते. कारण हिंदू विस्थापितांताना संघ कार्यकर्त्याऐनी केवढया शर्थीने सुखरूप भारतात आणले, हे त्यांना ठाऊक होते. भारतात आलेल्या विस्थापितांची जी विविध प्रकारे सेवा संघाने केली, तिचीही कृतज्ञ जाण त्यांना होती. दोन सरकारे एकमेकांच्या देशांतील राजकीय कैद्यांची अदलाबदल (exchange of political prisoners) करू शकतात. या प्रथेच्या आधारे, पाकिस्तानातील हिंदू कैदी आणि भारतातील मुसलमान कैदी यांची अदलाबदल घडवून आणण्याची योजना श्रीगुरूजींनी सुचविली आणि ती गृहमंत्राल्याने मान्य केली. अदलाबदलीचा दिवस ठरला आणि फिरोजपूर हे अदलाबदलीचे स्थानही ठरले.

असे वाटले होते की, बॅ. खानचंद गोपालदासजी यांच्यासह इतर १९ जणांनाही फिरोजपुर येथे आणण्यात आले असेल. पण वार्ता मिळाली की, केवळ बॅ. खानचंद यांनाच आणण्यात आले आहे. कारण त्यावेळी श्री. कुरेशी नामक एकच पाकिस्तानी कैदी भारत सरकारकडे होता. एकाच्या बदल्यात एकालाच सोडण्याचे पाक सरकारने ठरविले होते. फाळणीच्या काळात हा कुरेशी मोठा कुविख्यात झाला होता आणि त्याची सुटका व्हावी अशी पाकिस्तान शासनाची फार इच्छा होती. फिरोजपूरला श्रीगुरूजींनी स्वत: मुक्त बंद्यांच्या स्वागतासाठी जावे अशी योजना संघाच्या कार्यकर्त्यांनी केली होती. इतर अनेक स्वयंसेवकही तिथे जाणार होते. मोठा भव्य कार्यक्रम व्हावयाचा होता.

पण ऐनवेळी पेच उभा राहिला. एकदा का कुरेशीच्या बदल्यात खानचंदजींची मुक्तता भारत सरकारने स्वीकारली की उरलेल्या १९ जणांची मुक्तता प्राय: अशक्य ठरेल. याची जाणीव श्रीगुरूजींना होती. म्हणून कुरेशीच्या बदल्यात खानचंदजींबरोबर इतर १९ जणांची मुक्तताही पाकने केली पाहिजे असा आदेश भारत सरकारच्या गृहमंत्राल्याकडुन येण्याची निकड होती. हाताशी वेळ अत्यंत थोडा होता. श्रीगुरूजी अत्यंत व्यथित झाले होते. स्वागतासाठी आलेल्या स्वयंसेवकांत श्री. लालकृष्ण अडवाणी हेही होते. निराशेने सर्वांची मने ग्रासली होती. पण श्रीगुरूजींच्या मनाला निराशेने स्पर्शही केलेला दिसला नाही. ते एकदम म्हणाले, "आम्ही सारे काही करू शकतो." आणि डॉ. आबाजी थत्ते यांच्याकडे वळून सांगितले, "आबा, काकासाहेब गाडगीळांना फोन लाव. मी त्यांच्याशी बोलतो."

त्यावेळी पंजाबात राष्ट्रपतींची राजवट होती. श्री. भिडे नामक चीफ सेक्रेटरी होते. सरदार पटेल कुठेतरी गेल्यामुळे काकासाहेब गाडगीळ तात्पुरते गृहमंत्रीपद सांभाळत होते. श्रीगुरूजी काकासाहेबांशी बोलले. त्यानंतर लगेच पाक शासनाला संदेश गेला की कुरेशीच्या बदल्यात खानचंदजींसह सर्व वीसही जणाचीं मुक्तता झाली तर कैद्यांची अदलाबदल होईल. अन्यथा होणार नाही. त्या दिवसापुरता अदलाबदलीचा कार्यक्रम स्थगित झाला. पण भारत सरकारच्या कडक धोरणाचा योग्य परिणाम झालाच. कुरेशीच्या मुक्ततेची पाक शासनाला उत्कट इच्छा होती. तेव्हा भारतसरकारच्या मागणीनुसार सर्व २० जणांना मुक्त करून कुरेशीची मुक्तता घडवुन आणण्याचे अखेर पाक शासनाने मान्य केले. या घालमेलीत सुमारे एक महिना गेला. पण बॅ. खानजंदजींसहित सारे स्वयंसेवक बंधू सुखरूप भारतात परतले. त्यांचे प्रचंड स्वागत करण्यात आले.

भारत सरकारचे सहकार्य संपादन करून या प्रकरणात श्रीगुरूजींनी फार महत्वाची भूमिका पार पाडली. सरदार पटेल, काकासाहेब गाडगीळ आणि श्री. भिडे यांच्याशी श्रीगुरूजींचा व्यक्तिगत स्नेहसंबंध, स्वयंसेवकांचय मुक्ततेची त्यांची विलक्षण तळमळ, योग्य वेळी कडक धोरण

स्वीकारण्याचा त्यांचा सल्ला व काम सफल होईलच हा त्यांचा संपूर्ण विश्वास आदि गुणांचे दर्शन या निमित्ताने घडले. श्री. लालकृष्ण आडवाणी तर म्हणाले की, "श्रीगुरूजींच्या योजकतेचा व निर्धाराचा आलेला हा अनुभव मनावर विलक्षण परिणाम करणारा आणि कधी न विसरता येण्याजोगा ठरला."

सिंधच्या संबंधातच श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी सांगितलेली एक प्रसंग उल्लेखनीय आहे. फाळणीपूर्वी दि. ५ ते ८ ऑगस्ट श्रीगुरजींचा सिंध प्रांतात प्रवास केला होता, हे यापूर्वी सांगितलेच आहे. या प्रवासाच्या वेळी कॉँग्रेसचे अध्यक्ष आचार्य कृपलानी हेही योगायोगाने कराचीत होते. कराचीचे संघचालक ऍड. खानचंद गोपालदासजी यांची आचार्य कृपलानी यांच्याशी चांगली मैत्री होती. श्रीगुरूजींची इच्छा असल्यास कृपलानींशी त्यांची भेट सहज घडवून आणता येण्यासारखी आहे अशी सूचना त्यांनी केली. श्रीगुरूजींची या सूचनेवरील प्रतिक्रिया अत्यंत तिखट होती. ते म्हणाले, "आचार्यांना सांगा की सिंध तर तुम्ही पाकिस्तानला देऊन टाकलाच आहे. आता भेटून काय करावयाचे !" हे बोलत असताना त्यांच्या अंत:करणाची व्यथा आणि कॉँग्रेस पुढाऱ्यांनी विभाजन स्वीकारल्याबद्दलचा क्षोभ प्रत्येक शब्दातून प्रतिबिंबित होत होता. त्यांच्याशी आणखी काही बोलण्याचे धैर्य कोणाला झाले नाही व अर्थातच भेटही घडून आली नाही !

## ८. गांधीहत्येनंतरची  वावटळ

समाजाचे सहकार्य संपादन करून विस्थापित बांधवांची सेवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते मोठया जिवाभावाने करीत होते. यासाठी श्रीगुरूजींनी लकडा लाविला होता. कार्यकर्त्यांना ते प्रेरणा देत होते व प्रकट निवेदनाद्वारे त्यांनी समाजाला साहाय्याचे आवाहन केले होते. 'पंजाब रिलीफ कमिटी' व 'वास्तुहारा सहायता समिती' (बंगाल) यांच्या द्वारे शेकडो शिबिरे चालविण्यात येत होती. दशसहस्रावधी बांधवांना त्यात आसरा लाभत होता. श्रीगुरूजींच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाचा एक अनन्यसाधारण पैलू या खळबळीच्या आणि तणावपूर्ण वातावरणात देशाने पाहिला. त्यांच्या अंत:करणाच्या विशालतेचे मोठे ह्रदय दर्शन राष्ट्राला घडले. प्रतिक्रियात्मक विकारांना रेसभरही थारा न देता भविष्यकालीन इतिहासाच्या निरामय घडणीसाठी केवढी विधायक स्नेहमयता त्यांनी संपादिली होती, त्याच प्रत्यय फाळणीनंतरच्या चारपाच महिन्यांतील त्यांच्या हालचालींनी आणि वक्तव्यांनी आणून दिला.

त्यांच्या एकाच भाषणाचा वानगीदाखल उल्लेख येथे केला तरी पुरेसा होईल. तो दिवस होता मकर संक्रमणाचा. १४ जानेवारी १९४८. श्रीगुरूजी मुंबईला होते. मुंबई शाखेने आयोजित कलेल्या उत्सवात ते बोलले. खंडित भारताचे राजकीय स्वातंत्र्य आणि सत्तांतर यांचे जे नवे पर्व देशात सुरू झाले होते, त्यातील  संघाच्या भूमिकेचे स्वरूपच जणू ते त्यावेळी विशद करीत होते. या त्यांच्या भाषणाला चारपाच महिन्यांतील अनुभवाची पार्श्वभूमी अर्थात होतीच. त्यांना दिसत होते की विस्थापितांत क्षोभ आहे. भीषण रक्तपातामुळे घाबरून गेलेल्या सत्ताधाऱ्यांत व सत्ताधारी पक्षात दंगलीसाठी संघाला जबाबदार धरण्याची प्रवृत्ती वाढत आहे. संघासंबंधी असूयेची भावना आहे. खुद्द पंतप्रधान पंडित नेहरूंच्या मनात संघासंबंधी सहानुभूती नाही, हे तर त्यांनी त्यांच्याबरेबर झालेल्या प्रत्यक्ष भेटीतच अनुभवले होते. संघाचे बळ खच्ची केले पाहिजे असा विचार सत्तारूढ पक्षात मूळ धरू लागला होता. काँग्रेस, मुस्लिम समाज व कम्युनिस्ट यांची संघविरोधी आघाडी अपप्रचाराच्या मोहिमेसाठी सरसावली होती. हे सारे जाणून श्रीगुरूजींनी मुंबईच्या भाषणात स्नेहमयता, राष्ट्रकल्याणासाठी सहकार्य, क्षमाशीलता आणि निर्वैरता यांचा आश्वासक सूर आळविला.

श्रीगुरूजी म्हणाले, "शांत चित्ताने विचार केल्यानंतर आपल्या ध्यानात येईल की, मनुष्याच्या जीवनात अनेक प्रकारचे प्रयोग होत असतात. त्यात सफलतेचे आणि विफलतेचे, सुखाचे आणि दु:खाचे, विजयाचे आणि पराभवाचे प्रसंग येणे स्वाभाविक आहे. प्रयोगाचे यशापयश सिध्द होण्यास काही कालावधी दिलाच पाहिजे. अन्यथा प्रयोग करणारांवार अन्याय होईल. जे घडते आहे ते उचित असो की अनुचित असो, आपण प्रक्षुब्ध होता कामा नये. समस्यांच्या मुळाशी जाऊन आपण विचार केला पाहिजे. अंत:करणात कसलीच अपकाराची वा सुडाची भावना न ठेवता, परस्पर वैमनस्य सोडून शांत चित्ताने प्रगतीचा मार्ग चोखाळला पाहिजे.

"सर्व प्रक्षोभक परिस्थिती पचवून आपण पुढे जाऊ, आमच्या ह्रदयातील भावनांत क्रोधाचे विष आम्ही मिसळू देणार नाही. जे लोक समोर दिसतात ते कसेही असोत, ते आपलेच आहेत. आपल्या राष्ट्राचे आहेत. आपल्या समाजाचे आहेत. त्यांची विचारप्रणाली कशीही असो, त्यांनी काही चांगली कामे केली आहेत. म्हणून आपण शांतपणे विचार केला पाहिजे. आपली स्नेहमय, आंतरिक उदारतेची भावना आपण त्यांच्यासाठी नाही तर आणखी कुणासाठी प्रकट करणार? कुणाच्या बोलण्याने वा

करणीने मनात निर्माण होणाऱ्या क्षोभाचे किल्मिष हृदयात अजिबात प्रविष्ट होऊ न देता; परत डोके वर काढु पाहणाऱ्या भेदांना मिटवून 'वयं पंचाधिकं शतं' च्या आत्मीय भावनेने एका सूत्रात बध्द अशा राष्ट्राच्या उभारणीत आपली सारी शक्ती आपण लावली पाहिजे. या प्रयत्नात आपले सारे जीवन बरबाद झाले तरी चिंता नाही."

या निर्वैय आणि अमृतमय भावनेनुसार एकटया श्रीगुरूजींचाच नव्हे, तर त्यांच्या चैतन्यपूर्ण नेतृत्वाखाली देशभर प्रबल स्वरूपात उभ्या झालेल्या सूत्रबध्द संघटनेचाही व्यवहार होता. सत्तांतराचा कालखंड म्हणजे राजधानी दिल्लीत भयशंकित वातावरणाचा काळ. या काळात जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी, किंबहुना काँग्रेसचे शासनदेखील सुरक्षित राखण्यासाठी, संघाने सर्व प्रकारचे सहकार्य दिले. भंगी कॉलनीतील गांधीजींच्या निवासस्थानी उपद्रव होऊ नये म्हणून पहाऱ्यासाठी माणसे त्याने पुरविली. गांधीजी संघ स्वयंसेवकांना संघस्थानी भेटून गेले व मोठे हृदयंगम भाषण त्यांनी केले. गांधीजींचे उपोषण सुटावे यासाठी दिल्ली प्रांताचे संघचालक लाला हंसराज गुप्ता यांनी संघातर्फे आनंदाने संयुक्त विज्ञप्तिपत्रावर स्वाक्षरी केली. संघामुळे शांतताभंग, प्रक्षोभ वा उत्पात घडल्याचे कुठेच दिसत नव्हते. पण परिस्थितीला लगाम घालण्यास असमर्थ असलेल्या आणि धास्तावलेल्या शासकांना कोणतरी 'बळीचा बकरा' हवा असतो. संघाचे प्रचंड कार्यक्रम आणि श्रीगुरजींचा अमृतमधुर संघटनामंत्र टिपण्यासाठी ठिकठिकाणी जमणारे लक्षावधी लोक यामुळे शासकीय गोटात काहीशी अशीही भावना पसरली की हे देशात काँग्रेसला मोठे आव्हानच उभे होत आहे. याची काही प्रत्यंतरे १९४७ च्या नोव्हेंबर महिन्यात येऊन गेली. पहिले प्रत्यंतर हे की पुण्यानजीक चिंचवड येथे १ व २ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या संघाच्या एक लक्ष स्वयंसेवकांच्या संकल्पित मेळाव्यावर ऐनवेळी बंदी घालण्यात आली. कैंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल हे या मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे या नात्याने येणार होते. सर्वत्र प्रचंड उत्साह पसरला होता. मुंबई शासनाने प्रतिबंधाची आज्ञा बजावली तेव्हा सगळयांचा अतोनात विरस झाला. या अनावश्यक आणि अन्याय्य अडवणुकीची अनेक कार्यकर्त्यांना चीडही आली असेल. पण शासकीय आज्ञा मोडून मोळावा घेण्याचा आग्रह श्रीगुरूजींनी वा कोणीही संघनेत्याने धरला नाही. पर्यायी योजना म्हणून महाराष्ट्रात तेरा ठिकाणी श्रीगुरूजींचे कार्यक्रम घेण्यात आले व उत्तमप्रकारे पार पडले. या तेरा भाषणांपैकी कोणत्याही भाषणात श्रीगुरूजींनी चिंचवड मेळाव्यावरील बंदीसंबधीं नाराजीचे, टीकेचे अवाक्षरही उच्चारले नाही. आपला समाज असंघटित असल्याने त्याच्यावर संकटे येत आहेत. समाज जर संघटित झाला नाही तर स्वतंत्र भारत देखील संकटग्रस्त होईल, हेच त्यांच्या भाषणाचे प्रमुख सूत्र राहिले. फाळणीसाठी हिंदू समाजाची असंघटित अवस्था व आत्मविस्मृती यांनाच त्यांनी जबाबदार धरले.

दुसरी घटना नोव्हेंबर अखेर दिल्ली येथे भरलेल्या मुख्यमंत्री परिषदेतील विचारविनिमयाची. या परिषदेत निरनिराळया राज्यांच्या मुख्यमंत्र्यांबरोबर त्या त्या राज्यांचे गृहमंत्रीही उपस्थित होते. या परिषदेपुढील चर्चेचा प्रमुख विषय जणू राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हाच होता. संघ 'हिंसात्मक' कारवाया करीत आहे व त्यांना पायबंद घालण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहे, असा सूर परिषदेत आळवला गेला. संघाच्या एकूण हालचालींवर बंदी घालण्याऐवजी अपराधी व्यक्तींवर केवळ करावाई करावी, असा निर्णय यावेळी झाला. संघाच्या कार्यावर बारीक लक्ष ठेवण्याचेही ठरले. असा काही विचारविनिमय झाला होता, याची माहिती राष्ट्राला पुढे ४ फेब्रुवारी १९४८ रोजी संघावर बंदी घालण्यात आली, त्याचवेळी सरकारी हुकमातील तपशीलावरून कळली. याच महिन्यातील तिसरी घटना म्हणजे मेरठ

येथे जे काँग्रेस अधिवेशन भरले होते, त्यात संघाचा विषय बराच प्राधान्य पावला. अनेकांच्या बोलण्यात संघावर बंदी घालावी असा सूर व्यक्त झाला. शासकीय विचारचक्राची दिशा सूचित करणारी आणखी एक घटना उल्लेखनीय आहे. दि. २९ जानेवारी रोजी पंतप्रधान पंडित नेहरूंनी अमृतसर येथील भाषणात, आम्ही संघाची पाळेमुळे उखडून टाकल्याखेरीज राहणार नाही, असे उद्-गार काढले हाते. या भाषणाचे वृत्त वाचल्यावर श्रीगुरूजींनी असे उद्-गार काढले की, "संघावर कितीही आघात करण्यात आले तरी आम्ही ते विफल ठरवू. हे काम कोणाच्याही कृपेने वाढलेले नाही. कोणाच्या वक्रदृष्टीने नाहीसे व्हावयाचे नाही. कागदी ठरावांच्या द्वारेही हे कार्य निर्माण झाले नाही. तेव्हा कागदी ठराव अथवा कागदी आदेश यामुळे ते नष्टही व्हावयाचे नाही." त्यांच्या या शब्दांची पारख करणारा प्रसंग अगदी उंबरठयावर उभा असल्याची कल्पनाही कोणी केलेली नव्हती. जातीय, प्रतिक्रियावादी, फॅसिस्ट वगैरे जे आरोप संघाचे विरोधक वृत्तपत्रांतून वा भाषणांतून करीत होते, त्यांची तमा संघात कोणी बाळगली नाही. कार्याची गती त्यामुळे मंदावली नाही. पण दि. ३० जानेवारी १९४८ रोजी जी अत्यंत दुर्दैवी घटना राजधानीत घडली तिचा पुरेपुर लाभ संघाच्या विरोधकांनी घेतला व संघाच्या सत्वपरिक्षेचा काल अकस्मात पुढे उभा ठाकला.

त्या दिवशी सायंकाळी मद्रास येथे संघातर्फे निमंत्रित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित नागरिकांच्या सभेत श्रीगुरूजी सहभागी झाले होते. गप्पागोष्टी सुरू होत्या. चहाचे कप सगळयांपुढे आलेले होते. श्रीगुरूजी कप तोंडाला लावणार तोच वार्ता आली की दिल्लीच्या बिर्लाभवनात प्रार्थनासभेच्या वेळी कोणीतरी गोळया घालून गांधीजींचा खून केला ! गुरूजींनी चहाचा कप तसा खाली ठेवला व काही क्षण ते चिंतामग्न अवस्थेत स्तब्ध बसून राहिले. मग त्यांच्या तोंडून व्यथित उद्-गार बाहेर पडले, "देशाचे दुर्भाग्य!" चहापानाचा कार्यक्रम तसाच सोडून श्रीगुरूजी त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी आले. त्यावेळी श्री. दादासाहेब आपटे हे संघप्रचारक त्यांच्यासोबत होते. त्यांनी श्रीगुरूजींशी त्यांच्याशी बोलताना अत्यंत विमनस्कपणे काढलेल्या उद्-गारांची नोंद त्यांच्या रोजनिशीत पुढीलप्रमाणे केली आहे : "या नीच कृत्याचे वर्णन करण्यास माझ्याजवळ शब्दच नाहीत. त्यांनी Most impolitic, most immoral, most harmful to the society and nation असे हे कृत्य आहे. सर्व देशाला काळिमा लागेल याने. विरोधी वृत्ती आणि व्यक्ती यावर विजय मिळविण्यात पुरूषार्थ आहे. घात करून विजय मिळत नाही. त्यातूनही जगत्-वंद्य अशा या महात्म्याची हत्या करून काय साधले? कलंक लावला सर्व हिंदू समाजाला !" त्यांनी पुढचा सारा प्रवास रद्द केला आणि लगेच विमानाने नागपूरला आले. मद्रास सोडण्यापूर्वीच तेथून त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल व श्री. देवदास गांधी यांना दु:ख प्रदर्शित करणाऱ्या तारा पाठविल्या होत्या. तसेच देशातील सर्व संघशाखा "आदरणीय महात्माजींच्या दु:खद मृत्यूनिमित्त शोक प्रकट करण्यासाठी" तेरा दिवसपर्यंत बंद ठेवाव्यात असा आदेशही गुरूजींनी रवाना केला होता. नागपूरला आल्यानंतर लगेचच त्यांनी पं. जवाहरलाल नेहरू व सरदार पटेल यांना आपल्या चित्तातील व्यथा प्रकट करणारी पत्रे लिहिली. पं. नेहरूंना लिहिलेल्या पत्रातील काही भाग असा :

"अशा महापुरूषाला मारणे ही केवळ त्या व्यक्तिशी केलेली कृतघ्नता नसून सगळया देशाशी केलेली कृतघ्नता आहे. आपण, अर्थात विद्यमान शासकीय अधिकारी, त्या देशद्रोह्याला योग्य ती शिक्षा देतीलच, हे नि:संशय. ती शिक्षा कितीही कडक असलीत तरी देशाची जी हानी झाली आहे, तिच्या तुलनेत ती फार सौम्यच ठरेल. त्याविषयी मला काही एक म्हणावयाचे नाही. पण आता आपला सर्वांचा

परीक्षाकाळ आला आहे. क्षोभहीन न्यायबुध्दीने, मधुर वाणीने आणि अनन्य राष्ट्रनिष्ठेने काळजीपूर्वक सर्व व्यवहार करून आजच्या वादळी वातावरणात देशाची नौका सुरक्षित पैलतीरी नेण्याचे उत्तरदायित्व आता आपणा सर्वांवर आले आहे. ह्याच सद्-गुणांची उपासना करण्याचे जिला बाळकडू मिळाले आहे, त्या संघटनेच्या वतीने, राष्ट्राच्या दु:खात तळमळणाऱ्या अंत:करणाने सहभागी होऊन, दिवंगत आत्म्याच्या पवित्र स्मृतीचे स्मरण करून, देशाच्या या संकटमय अवस्थेत मी त्या दयासागर सर्व शक्तिमान् प्रभूच्या चरणी प्रार्थना करतो की, त्याने आम्हा सर्वांवर कृपा करावी आणि आमच्या देशात खरेखुरे चिरंतन ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक ती प्रेरणा आणि बुध्दी त्याने आम्हाला द्यावी."

सरदार पटेलांना श्रीगुरूजींनी लिहिले, "त्या महान् ऐक्यनिर्मात्याच्या अवेळी परलोकगमनामुळे आपल्या खांद्यावर जे उत्तरदायित्व आले आहे ते आपण नीट सांभाळू या. परस्परांबद्दल वस्तुनिष्ठ भावना ठेवून, संयमित वाणीने बोलुन, बंधुप्रेम बाळगून आपण आपल्या सामर्थ्याचा अकारण क्षय होणार नाही याची काळजी घेऊ आणि आपले राष्ट्रजीवन चिरकाल एकसंघ राहील असा प्रयत्न करू."

या दोन्ही पत्रांतील भावना अत्यंत निर्मळ, दिवंगतासंबंधी परिपूर्ण आदर वा श्रध्दा व्यक्त करणाऱ्या आणि राष्ट्रीय संकटकालात सहकार्याचे मन:पूर्वक आश्वासन देणाऱ्या आहेत. संघाच्या स्वयंसेवकांनी नागपूरला व अन्यत्र ठिकठिकाणी सभा घेऊन शोकप्रस्ताव केले. गांधीजींना भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली. श्रीगुरूजींनी असोसिएटेड प्रेसला एक संदेश दिला. त्यातही राष्ट्रीय ऐक्याला, परस्पर स्नेहाला व सेवाभावनेला कोठे तडा जाऊ नये अशी भावना त्यांनी व्यक्त केली. पण या भीषण दुर्घनेनंतर अपप्रचाराला उधाण आले. वाटेल तशा अफवा पसरविण्यात आल्या आणि संघविरोधी क्षोभ सार्वत्रिक बनेल असा प्रयत्न व्यापक स्वरूपात झाला. श्रीगुरूजींच्या सद्-भावनेला प्रतिसाद तर मिळाला नाहीच, उलट संघाचा गांधीजींच्या खुनाशी संबंध जोडण्याची भूमिका शासनाने घेतली. श्रीगुरूजींनी मात्र आपल्या वक्तव्यात संघस्वयंसेवकांना सांगितले की, 'गैरसमजातून निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिस्थितीत सर्व स्वयंसेवकांनी आपला व्यवहार स्नेहमयच ठेवला पाहिजे. त्यांनी हे ध्यानात ठेवले पाहिजे की, अपसमजामुळे लोकांनी दिलेला त्रासही आपल्या मातृभूमीचे नाव जगात उज्वल करणाऱ्या महापुरूषासंबंधी देशातील अमर्याद प्रेम व आदर यांचेच निदर्शक आहे." दुर्दैव असे की, श्रीगुरूजींच्या या अत्यंत सात्विक निवेदनाला देखील अनेक वृत्तपत्रांत योग्य प्रसिध्दी त्यावेळी मिळू शकली नाही. संघाविरूध्द क्षोभ पसरवणे चालूच राहिले. महाराष्ट्रात या प्रकरणाला ब्राह्मण-अब्राह्मण वादाचीही जोड मिळाली. परिणामस्वरूप अगणित लोकांच्या घरादारांवर हल्ले झाले, जाळपोळ झाली. अमाप नुकसान झाले. हजारो कुटूंबे निराधार बनली. देशभर संघस्वयंसेवकांना आणि कार्यकर्त्यांना वर्णनातीत यातना सोसाव्या लागल्या. पण कोणी प्रतिकारासाठी बोट उचलले नाही किंवा कटु शब्दांचा वापर केला नाही. यात भीतीचा भाग नव्हता तर राष्ट्रहितासाठी संघाने दाखविलेला हा अपूर्व संयम होता. प्रतिकार न करण्याचा आदेश श्रीगुरूजींनी सर्वत्र पाठविला होता.

लोकक्षोभाच्या झळा प्रत्यक्ष श्रीगुरूजींपर्यंत पोहोचल्या. त्याप्रसंगी श्रीगुरूजींनी दाखविलेली धीरोदात्तता केवळ असामान्य आणि समष्टिरूप परमेश्वराची जी उपासना ते करीत होते त्या उपासनेची विशुध्दता दाखविणारी म्हणावी लागेल. प्रसंग असा घडला की, दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी श्रीगुरूजींच्या नागपूर येथील निवासस्थानापुढे हजारो लोकांचा जमाव गोळा झाला. घरावर दगड येऊ लागले. अर्वाच्य घोषणा सुरू झाल्या. प्रसंगाचे गांभीर्य जाणून श्रीगुरूजींच्या संरक्षणासाठी ठेवलेले

स्वयंसेवक श्रीगुरूजींच्या जवळ आले. नको तेथे आघात करण्यास प्रवृत्त झालेल्या हल्लेखोरांना पिटाळून लावण्याची अनुज्ञा त्यांनी मागितली. त्यावर श्रीगुरूजी निक्षून सांगते झाले, "माझ्या घरापुढे माझ्या संरक्षणासाठी आपल्याच बांधवाचे रक्त सांडलेले मला चालणार नाही. माझ्या संरक्षणासाठी येथे कोणीही थांबण्याची गरज नाही. सर्वांनी आपआपल्या घरी जाणे योग्य." याच सुमारास श्रीगुरूजींच्या निवासस्थानावर पोलिसपहारा बसविण्यात आला. पण तो सायांकाळनंतर काढून घेण्यात आला. नागपूरच्या चिटणीस पार्कातील जाहीर सभेत संघाविरोधी विषवमन ताळतंत्र सोडून झाले. तेव्हा पुन्हा उद्रेकाची चिंता स्वयंसेवकांना वाटू लागली. भलतेच काही घडू नये म्हणून काही कार्यकर्त्यांनी श्रीगुरूजींना सुरक्षित स्थळी चलण्याचा सल्ला दिला. यावर श्रीगुरूजींनी अत्यंत शांतपणे दिलेले उत्तर अंत:करणाचा ठाव घेणारे आहे. बाहेर एवढा प्रक्षोभ उसळला असता स्वत:च्या सुरक्षिततेचा यत्किंचितही विचार त्यांच्या चित्ताला स्पर्श करीत नव्हता. समाजपुरूषाच्या स्वाधीन त्यांनी आपले सर्वस्व केलेले होते. ते कार्यकर्त्यांना म्हणाले, "असे दिसते की, सभोवारची परिस्थिती आणि संकटे यामुळे तुम्ही गोंधळून गेला आहात. तुमचे मन क्षुब्ध झाले आहे. आपण सारेजण आता येथून जा आणि मला शांतिपूर्वक येथेच राहू द्या. माझी तुम्ही मुळीच चिंता करू नका. तुमचा आग्रह आहे की, मी अन्य ठिकाणी जावे. पण का? आजवर ज्या समाजासाठी मी काम करीत आलो आहे त्या समाजालाच मी नको असेन तर मी कुठे जाऊ आणि का जाऊ? जे व्हायचे असेल ते खुशाल होऊ द्या. आता माझी संध्येची वेळ झालेली आहे. आपण लोक जा पाहू." आणि श्रीगुरूजी खरोखरच संध्येसाठी उठले. सभेनंतर उपद्रव काहीच होऊ शकला नाही. कारण पूर्वी उठलेला पोलिसपहारा पुन्हा बसला होता आणि श्रीगुरूजींच्या घराकडे जाणे जमावाला अशक्य झाले होते. दुपारच्या वेळी रेशीमबागेतील डॉक्टर हेडगेवार यांच्या समाधीची मोडतोड मात्र काही अविवेकी लोकांनी करून टाकली होती. ज्या डॉक्टरांनी राष्ट्राच्या व हिंदू समाजाच्या अभ्युदयार्थ सारे जीवन हसत हसत होमून टाकले होते त्यांच्या समाधीवर त्यांच्या मृत्युनंतर आठ वर्षांनी काही असमंजस हिंदू समाज बांधवांनीच पाशवी आघात केला होता !

श्रीगुरूजींच्या घरावरील पोलिस पहाऱ्याचा अर्थ दि. १ फेब्रुवारी मध्यरात्रीनंतर स्पष्ट झाला. श्रीगुरूजी रात्रौ १२ वाजेपर्यंत जागे होते. कोठे काय घडले व कसे अत्याचार स्वयंसेकांवर झाले, त्यांच्या वार्ता त्यांच्या कानी येत होत्या. कदाचित् ते आणखी कोणत्यातरी घटनेची प्रतीक्षा विचरमग्न होऊन करीत असावेत. घडणाऱ्या घटनांची व्यथा त्यांना होत असणारच. मग उत्तररात्री पोलिसांची मोटार त्यांचा दारापाशी थांबली. अटकेचे वॉरंट बजावण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सरसंघचालकांना गांधीजींच्या खुनाचा आरोप ठेवून अटक करण्यात आली ! या आरोपाचे श्रीगुरूजींना स्वाभाविकपणे हसू आले. त्यांचा शांतपणा थोडादेखील ढळला नाही. ते पोलीस अधिकाऱ्याबरोबर कारागृहाकडे जाण्यास सिध्द झाले. घरी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांचा निरोप घेताना ते म्हणाले, "संशयाचे हे धुके विरून जाईल व निष्कलंक होऊन आपण बाहेर पडू. तोवर अनेक प्रकारचे अत्याचार होतील. ते सर्व आपण संयमपूर्वक सहन केले पाहिजेत. माझा विश्वास आहे की संघाचे स्वयंसेवक या अग्निदिव्यातून यशस्वीरीत्या बाहेर पडतील." मोटार सुरू झाली व भारतीय दंडसंहितेच्या ३०२ व १२० कलमाखाली अटक झालेले श्रीगुरूजी तुरूंगाच्या गजाआड बंदिस्त झाले ! सत्तास्वार्थ अनियंत्रित झाला, म्हणजे केवढी विवेकभ्रष्टता येऊ शकते व न्याय आणि देवत्व यांची पायमल्ली करण्याचा मोह कसा दुर्निवार बनतो याचे स्वातंत्र्यपर्वाच्या प्रारंभीचेच हे एक उदाहरण. श्रीगुरूजींना अटक झाल्याची वार्ता वाऱ्यासारखी पसरली. संघाच्या सरकार्यवाहांनी सर्व शाखांना तारा केल्या - गुरूजींना पकडण्यात आले आहे. काहीही झाले तरी शांत राहा. (गुरूजी इन्टर्न्ड, बी काम ऍट ऑल कॉस्ट.)

यानंतर क्रमाने सरकारने आणखी संघविरोधी पावले उचलली. दि. २ फेब्रुवारीला एक आज्ञापत्रक काढून सर्व केंद्रशासित प्रदेशात संघ अवैध ठरविण्यात आला. दि. २ फेब्रुवारीच्या या सरकारी पत्रकात संघावर सर्व प्रकारच्या हिंसामत्मक कारवायांचा आरोप करण्यात आला. "हिंसेच्या या उग्र आविष्काराचे दमन करण्यासाठी कडक उपाययोजना करणे हे शासन आपले कर्तव्य समजते. त्या कर्तव्यपूर्तीचे पहिले पाऊल म्हणुन संघाला बेकायदा घोषित केले जात आहे." असा उल्लेख या पत्रकात आहे. नंतर दि. ४ फेब्रुवारी रोजी देशाच्या सर्वच भागात संघावर प्रतिबंध लावल्याची अधिकृत घोषणा झाली. देशभर संघ कार्यकर्ते आणि स्वयंसेवक यांची धरपकड करण्यात आली. धरपकडीच्या या मोहिमेत सुमारे तीस हजारांना तुरूंगात डांबण्यात आले. संघविरोधी अफवा, विषवमन आणि संघ खतम करण्याची आक्रस्ताळी भाषा हे यावेळी देशभर पसरलेल्या वादळी वातावरणाचे विशेष म्हणून सांगावे लागतील. ओळखपरेडमध्ये मदनलाल नामक आरोपीने श्रीगुरूजींना ओळखले, येथवर अफवांची मजल गेली होती. संघावरील बंदीची वार्ता दि. ५ रोजी तुरूंगात श्रीगुरूजींना कळली. तेव्हा आपले वकील मित्र श्री. दत्तोपंत देशपांडे यांच्याजवळ त्यांनी संघाचे विसर्जन करण्यात येत असल्याचे निवेदन लिहून दिले. हे निवेदन असे, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रथमपासूनचे धोरण आहे की सरकारी नियमांचे पालन करून आपले कार्यक्रम करावे. यावेळी सरकारने संघावर कायदेशीर बंदी घातली आहे. तेव्ही मी ही बंदी दूर होईपर्यंत संघाचे विसर्जन करणेच योग्य समजतो. परंतु सरकारने संघावर जे आरोप केले आहेत ते मला पूर्णत: अमान्य आहेत." संघविसर्जनाचा हा आदेश कळविणाऱ्या तारा श्री. देशपांडे यांनी सर्वत्र पाठविल्या. पण नागपूरलाच या तारा अडवून ठेवण्यात आल्या. श्री. देशपांडे यांनी अन्य मार्गानेही संदेश पाठविण्याची व्यवस्था केल्याने तो सर्वत्र पोहोचला आणि संघ विसर्जनाची वार्ता वृत्तपत्रात झळकली. यात गंमत अशी की, संघाचे श्रीगुरूजींनी विसर्जन केल्याची वार्ता कराचीच्या 'डॉन' ने आधीच्या अंकात प्रसिध्द केली. भारतातील वृत्तपत्रांत ती नंतर प्रसिध्द झाली. यावेळी अनेकांना वाटले की, संघ संपला. एक राष्ट्रव्यापी संघटना धुळीस मिळविल्याचे क्षणिक समाधान संघाच्या हितशत्रुंनी कदाचित् अनुभवले असेल. पण श्रीगुरूजींना गांधी खून खटल्यात आरोपी म्हणून पकडण्यात कमालीचा मुर्खपणा आपण केला आहे, याची जाणीव केवळ सातच दिवसांत सरकारला झाली. खून आणि खुनाचा कट केल्याचा आरोप सरकारने दि. ७ फेब्रुवारीला अचानकपणे मागे घेतला व एक स्थानबध्द कैदी म्हणून त्यांना तुरूंगात ठेवले. सुरक्षा कायद्याखाली सहा महिन्यांचा नजरबंदीचा हा नवा आदेश होता.

तुरूंगातील एक स्थानबध्द या नात्याने जे दिवस श्रीगुरूजींनी घालविले, त्यात त्यांची वृत्ती अतिशय शांत होती. हे हवे आणि ते हवे हा भाव तर कधी दिसलाच नाही. त्यांच्या गरजा अत्यंत मर्यादित. स्थानबध्द या नात्याने आपले अधिकार काय आहेत व कोणत्या सवलती आपण मागू शकतो या गोष्टीचा विचारच त्यांनी कधी मनात येऊ दिला नाही. प्रथम कित्येक महिने त्यांना वृत्तपत्रे मिळत नसत. पुढे ती मिळू लागल. पण जेलमधील निवासात वृत्तपत्रांच्या वाचनाची ओढ त्यांच्या ठायी कधी दिसलीच नाही. तसेच प्रथम जेलमधील सतरंजी, चादर व कांबळे यांवरच अनेक दिवस त्यांनी काढले. अमुक गोष्ट मला पाहिजे, असे ते स्वत:हून कधी म्हणाले नाहीत. एकदा त्यांचा चष्मा नादुरूस्त झाला. चष्मा न लावता वाचायला त्रास व्हावयाचा. पण त्यांनी जेलच्या अधिकाऱ्यांना चष्मा काही दुरूस्त करून मागितला नाही. यामुळे डोकेदुखीचा त्रास होत असे. त्याबद्दलही त्यांनी कधी तक्रार केली नाही. राहण्याच्या जागेत स्वच्छता असावी, त्याबद्दल मात्र ते काटेकोर असत. त्यांच्या खोलीत एखादा कागदाचा कपटाही खाली इतस्तत: पडलेला कधी दिसावयाचा नाही. स्वच्छतेकडे ते जातीने लक्ष देत.

त्यांच्या दिमतीला एक कैदी देण्यात आला. तेव्हा आधी अगदी आंघोळीपासुन स्वच्छतेचे पाठ त्यांनी त्या कैद्याला दिले. त्याच्या कुटुंबियांची, परिस्थितीची आस्थेने चौकशी केली. तुरूंगातील एकांतवास गुरूजींना कधीच अवघड वाटला नाही. उलट पूर्वी सारगाछी येथे ध्यानधारणा, उपासना, अध्यात्मग्रंथांचे वाचन यांत काळ घालविला होता, तशीच संधी अकरा वर्षांनी सरकारच्या कृपेने त्यांना लाभली. तिचा त्यांनी उपयोग करून घेतला. पहाटे पाच वाजता उठावे, खोलीत फेऱ्या घालता घालता संपूर्ण अठरा अध्याय गीतेचा एक पाठ करावा व नंतर चित्ताला तृप्तता वाटेपर्यंत ध्यानधारणा करावी. वेळ उरल्यास ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध, तुलसीरामायण, वाल्मिकीरामायण, महाभारत वगैरे ग्रंथांचे वाचन-मनन करावे असा त्यांचा कार्यक्रम असे. योगासने ते स्वत: करीत एवढेच नव्हे तर इतरांनाही शिकवीत. मात्र त्यांचा खरा आनंद असे तो ध्यानात. पुढे एकदा बोलताना श्री. अप्पाजी जोशी यांनी सांगितले, "श्रीगुरूजी ध्यानमग्न अवस्थेत बसलेले मी स्वत: पाहिलेले आहेत. त्यावेळी त्यांची मुद्रा विलक्षण प्रसन्न व त्या समाधिसुखात जणू ते बुडाले आहेत, अशी दिसली. ईश्वरी साक्षात्कार त्यांना निश्चित झालेला होता. त्या सुखातच रममाण होण्याची ओढ टाळून राष्ट्र आणि समाज यांच्या सेवेस त्यांनी जीवन वाहिले ही डॉक्टरांची किमया. संघाचे ते थोर भाग्य." श्रीगुरूजी ध्यानाच्या वेळी जसे मांडीघालून बसत तसेच ते वाचन करतानाही बसलेले असत. आळसावून किंवा कुठेतरी रेलून वाचताना ते कधी दिसले नाहीत. अव्यवस्थितपणे बसलेल्या स्थितीतही त्यांना कोणीही पाहिलेले नाही. स्थानबध्दतेच्या या काळात गुरूजींचा एक छंद असे. त्यांनीच तो एका भाषणात सांगितला. छंद असा की, स्वयंसेवकांच्या भेटीची ओढ वाटली म्हणजे कल्पनेनेच एकेका गावी जायचे आणि तेथील स्वयंसेवकांत वावरावयाचे. एकेकाचा चेहरा दृष्टीपुढे आणावयाचा. तेथील कार्यक्रमांचा पुन:प्रत्यय घ्यावयाचा. यात किती वेळ निघून जाई याचे भानच उरावयाचे नाही. असा खूप 'प्रवास' गुरूजींनी तुरूंगाच्या कोठडीत बसल्या बसल्या केला. स्वयंसेवकांशी त्यांच्या झालेल्या विलक्षण तन्मयतेचेच हे प्रत्यंतर.

या दिवसांत श्रीगुरूजींचा आत्मविश्वास खंबीर होता. दि. १५ फेब्रुवारीनंतर श्री. अप्पाजी जोशी, श्री. बाबासाहेब घटाटे, श्री. बच्छराजजी व्यास, श्री. बापूसाहेब सोहोनी प्रभृती प्रमुख कार्यकर्त्यांना त्यांच्याबरोबर आणून ठेवले होते. एकदा कोणीतरी त्यांना विचारले, "संघाचे काम आपण प्रामाणिकपणे व शुध्द भावनेने करीत असता आपल्यावर हे संकट का आले?" यावर श्रीगुरूजी म्हणाले, "संघाच्या शक्तीमुळेच हे संकट आले आहे व शक्तीच्याच प्रभावाने ते नाहीसे होईल. या संकटाच्या कसोटीला जर संघ उतरला तर त्याचा अधिक उत्कर्ष होईल." त्यांच्या या अंत:स्थ विश्वासाचे दिग्दर्शन त्यांच्या आणखी एका उत्तरावरून होते. मध्यप्रदेशातील अनेक स्थानबध्दांनी उच्च न्यायाल्यात 'हेबियस कॉर्पस्' अर्ज केले. अटकेची कारणे बिनबुडाची आहेत व सरकारकडे या आरोपांना काहीच आधार नाही, म्हणून अर्ज करणाऱ्या बहुतेकांची मुक्तता झाली. तेव्हा श्रीगुरूजींनी मुक्ततेसाठी उच्च न्यायाल्यात जावे, अशी सूचना पुढे आली. पण गुरूजींनी स्वच्छ शब्दांत नकार दिला. ते म्हणाले, "ज्यांनी मला पकडले आहे, तेच त्यांना योग्य वाटेल तेव्हा मला सोडतील. आपल्या मुक्ततेसाठी अर्ज वगैरे मी काहीही करणार नाही." स्थानबध्दतेची मुदत सहा महिन्यांची होती आणि ती ८.८.४८ रोजी संपत होती.

फेब्रुवारी महिन्यात हजारो संघ कार्यकर्त्यांची धरपकड झाली तेव्हा अपेक्षा अशी होती की, सरकारची संघाबाबत संशयनिवृत्ती होण्यास फारतर दीड दोन महिन्यांचा काळ लागेल आणि मग

सगळयांना आपोआप मुक्त करण्यात येईल. पण तसे झाले नाही. आता सहा महिन्यांची मुदत संपल्यावर तरी श्रीगुरूजींना मुक्त करतात की, स्थानबध्दतेची मुदत वाढविली जाते, असा प्रश्न उद्भवला होता. मुदत वाढविण्यात आली नाही आणि ठरल्या दिवशी मुक्त होऊन श्रीगुरूजी नागपूरला आपल्या निवासस्थानी परत आले. सर्वत्र समाधानाची व आनंदाची लाट पसरली. संघावरील प्रतिबंध उठण्याच्या दिशेने पावले उचलली जाण्याची आशा वाटू लागली. पण हा आनंद व आशावाद अगदीच अल्पजीवी ठरला. कारण लगेचच श्रीगुरूजींच्या हालचालींवर कडक बंधने जारी करणारी आज्ञा बजावण्यात आली. या आज्ञेत पुढील चार अटी अंतर्भुत होत्या.

१. नागपूर नगरपालिकेच्या सीमेतच राहिले पाहिजे. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीविना शहर सोडून बाहेर जावू नये.

२. कोणत्याही सभेत भाषण करू नये.

३. कोणत्याही दैनिक, साप्ताहिक वा मासिक पत्रात जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीवाचून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने लिखाण करू नये.

४. प्रांतीय आणि केंद्रीय शासनाविषयी असंतोष उत्पन्न होईल अशी कोणतीही प्रत्यक्षाप्रत्यक्ष कृती करू नये. त्याचप्रमाणे असे करणाऱ्या कोणाही व्यक्तींशी संबंध ठेवू नये. विभिन्न समाजघटकांत द्वेष किंवा शत्रुता उत्पन्न करून शांतताभंग करू नये.

या आज्ञेसंबंधी श्रीगुरूजी म्हणाले, "माझ्या कारागृहातील कोठडीच्या भिंती अधिक विस्तारण्यात आल्या आहेत एवढेच." (Only my prison walls have been extended.) आज्ञेतील चौथ्या कलमाची मात्र त्यांनी भरपूर थट्टा केली. एवढेच नव्हे तर "सरकारसंबंधी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असंतोष निर्माण करणारांची यादी माझ्याकडे पाठवून द्या म्हणजे मी त्यांच्याशी संबंध ठेवणार नाही." अशा आशयाचे मिस्किल पत्रही त्यांनी शासनाकडे पाठविले असे म्हणतात. सरकारतर्फे लादण्यात आलेल्या अटींत पत्रव्यवहार करू नये अशी अट योगायोगाने नव्हती. शिवाय संघबंदीचा प्रश्न रेंगाळत पडू देण्याची श्रीगुरूजींनाही इच्छा नव्हती. गुन्हेगार व्यक्ती कोण हे पुरेसे स्पष्ट झाल्यावर सरकारनेच स्वत:हून खिलाडूपणे संघावरील प्रतिबंध रद्द करावयास हवा होता. तसे काहीच न घडल्यामुळे श्रीगुरूजींनी दि. ११ ऑगस्ट १९४८ रोजी पंतप्रधान पं. नेहरू आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटले यांना पत्रे लिहिली. सहा महिन्यांच्या माझ्या नजरबंदीच्या काळानंतर आता वस्तुत: मी आणि माझे कार्य कसे निर्दोष आहोत, आमच्यावर लादलेले गंभीर आरोप कसे खोटे आहेत, हे सिध्द करण्यास पुरेशा गोष्टी प्रकाशात आल्या आहेत, असा उल्लेख करून श्रीगुरूजींनी नेहरूंना लिहिले आहे, "माझे मन त्यावेळी कलुषित नव्हते आणि आजही नाही. माझे अंत:करण स्नेह, सौहार्द आणि आत्मीयता या भावनांनी परिपूर्ण आहे. प्रेमाचा हा संदेश मी सगळयांना सांगितला असता. बाबांनो, झालेले कष्ट आणि पीडा आठवून आपले अंत:करण मलीन होऊ देऊ नका, असे मी सर्वांना सांगितले असते. परंतु माझ्यावर लावलेल्या प्रतिबंधामुळे माझे कर्तव्य करण्यात बाधा उत्पन्न झाली आहे. ही अन्यायपूर्ण बंधने लादली जाण्याऐवजी मला जर आपली स्थिती स्पष्ट करण्याचा, या संकटसमयी शासनाबरोबर खऱ्या अर्थाने प्रेमपूर्वक सहकार्याची माझी भावना कशी आहे हे पटविण्याचा, अवसर दिला तर अजूनही आपण निकट येऊ शकतो, अशी मला आशा आहे. आपापल्या वेगळया मार्गावरून चालत असणारे आपण सर्व मातृभूमीसंबंधीच्या आपल्या अंत:करणात असलेल्या समान श्रध्देमुळे एकत्र येऊ शकतो.

सरदार पटेल यांना लिहिलेल्या पत्रातही अशीच स्नेहमय सहकार्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. परंतु ऑगस्ट महिना उलटून २४ सप्टेंबरचा दिवस उजाडला तरी ना नेहरूंचे पत्र ना पटेलांचे उत्तर. म्हणून दि. २४ रोजी दोघांनाही श्रीगुरूजींनी पुन्हा पत्रे लिहिले. या कालावधीत भारत सरकारने हैदराबादच्या प्रश्नाचा तुकडा पाडला होता. यशस्वीपणे त्या प्रश्नाची तड लावली होती. या घटनेचा पत्राच्या प्रारंभीचे गौरवपर उल्लेख करून न्यायाची सरळ मागणी श्रीगुरूजींनी पं. नेहरूंना पाठविलेल्या पत्रात केली आहे. "राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर केलेले सगळे आरोप तथ्यत: निराधार असल्याची आपली खात्री पटली असेल, असा माझा पक्का विश्वास आहे. म्हणून आता हे एक साधे न्यायदानाचे प्रकरण झाले आहे. ज्या शासनाला आम्ही नेहमी आमचे शासन म्हणून मानले आहे, त्याच्याकडून साधा न्याय मिळावा अशी अपेक्षा करण्याचा आमचा अधिकार आहे." अशा सरळ सौजन्यपूर्ण भाषेत ही मागणी करण्यात आली आहे. याच पत्रात कम्युनिस्टांची कुटिलता व त्यांच्या हिंसक आणि दहशतवादी कारवायांशी लढा देण्यात शासन व संघ यांचे सहकार्य होण्याची इष्टताही प्रतिपादन केली आहे. या सहकार्यासाठी "अकारण लादलेल्या कलंकापासून मुक्त झालेला आणि आपले नित्य कार्य करण्यासाठी कायद्याची आडकाठी नसलेला संघ मला हवा आहे." असे श्रीगुरूजींनी पत्राच्या अंती कळकळीने लिहिले आहे. सरदार पटेलांच्या पत्रातही कम्युनिस्ट संकटाचा उल्लेख आहेच. पटेलांना शेवटी श्रीगुरूजींनी लिहिले आहे की, "केवळ काळाची हाक ऐकून आपण निर्णय घ्यावा अशी विनंती आहे. सर्व परिस्थिती सुनियंत्रित होऊन आपली मातृभूमी अजेय व्हावी यासाठी मी आणि माझे सहकारी प्रारंभापासूनच आपल्याशी सहकार्य करण्यास प्रयत्नशील आहोत."

नेहरू व पटेल यांची उत्तरे आली. पटेलांचे पत्र ११ ऑगस्टच्या पत्राला उत्तरादाखल होते, तर नेहरूंचे पत्र २४ सप्टेंबरच्या पत्राचे उत्तर म्हणून आले. संघाने हिंदू समाजाची संकटकाळात जी सेवा केली ती मान्य करून सरदारांनी लिहिले, "माझा असा विश्वास आहे की, संघाचे लोक काँग्रेसमध्ये संमीलित होऊनच आपली देशप्रेमाची भावना सफल करू शकतील. प्रांतीय सरकारे प्रतिबंध उठवायला अनुकूल नाहीत." नेहरूंनी म्हटले होते की, "संघ सांप्रदायिक आहे. संघाचे पुढारी जे काही बोलतात, ते त्यांच्या आचरणात दिसत नाही." संघावरील आरोपांचा खोटेपणा व श्रीगुरूजींची न्यायाची मागणी यांना या पत्रात बगलच दिलेली आहे. संघावर झालेला अन्याय देशातील अनेक प्रमुख व विचारी लोकांना आता जाणवू लागला होता. संघविरोधी वादळाचा जोर ओसरला होता आणि संघाच्या निर्दोषत्वाबद्दल, देशभक्तीबद्दल, त्यागभावनेबद्दल चार चांगले शब्द उच्चारण्यास लोका आता पुढे येऊ लागले होते. प्रतिबंध उठवावा असा सल्ला सरकारला नि:पक्षपाती देशहितेच्छु माणसे देऊ लागली होती. संघबंदी उठविण्याची मागणी करणारी हजारो पत्रे दिल्लीला गेली होती. कोणत्याही का कारणाने असेना, ऑगस्ट महिन्यात श्रीगुरूजींच्या हालचालींवर घालण्यात आलेले निर्बंध सरकारने दि. १३ ऑक्टोबर रोजी काढून घेतले. नागपूरबाहेर प्रवास करण्यास श्रीगुरूजी मोकळे झाले. राजधानीत समक्ष जाऊनच भेटीगाठीद्वारे संघावरील अन्यायाचे निराकरण करून घेण्याचे त्यांनी ठरविले व दि. १७ ऑक्टोबर रोजी ते दिल्लीला दाखल झाले. यावेळी दिल्लीच्या हजारो नागरिकांनी त्यांचे स्थानकावर भावपूर्ण स्वागत केले. श्रीगुरूजींच्या आगमनाची वार्ता त्यावेळी कुठे प्रसिध्द झालेली नसतानाही हे उत्स्फूर्त स्वागत घडले. अपप्रचार व निंद्य आरोप यामुळे श्रीगुरूजींवरील लोकांचे प्रेम मुळीच कमी झाले नसल्याची साक्ष या दृश्याने पटवून दिली.

स्वाभाविकपणेच आता सगळयांचे डोळ दिल्लीला काय घडते, याकडे लागले. दिल्लीतील मुकामाच्या पहिल्याच दिवशी श्रीगुरूजींनी गृहमंत्री सरदार पटेलांची भेट घेतली. चर्चा अपुरी राहिल्याने दि. २३ ऑक्टोबर रोजी दुसरी भेट झाली. दोन्ही भेटींच्या वेळी सरदारांचा आग्रह एकच : काँग्रेसमध्ये संघाने विलीन व्हावे ! अर्थातच श्रीगुरूजींनी स्पष्ट शब्दांत नकार दिला. तेव्हा सरदारांनी प्रांतिक सरकारांशी विचारविनिमय करावा लागेल आणि त्यासाठी जरा वेळ लागेल अशी सबब पुढे केली. या भेटीनंतर सरदार पटेल मुंबईकडे दौऱ्यावर निघून गेले. पण मुलाखतीत श्रीगुरूजींनी नि:संदिग्ध रीतीने सांगितले होते की, संघावरील आरोप खोटे ठरले आहेत, तेव्हा एकतर बंदी तरी उठवावी किंवा संघाला न्यायाल्यात खेचून आरोप सिध्द तरी करावेत. उभयपक्षी ही भूमिका कायम राहिली व मूळ प्रश्नाची तड लागलीच नाही. श्रीगुरूजी न्याय मिळविण्यासाठी दिल्लीलाच ठाण मांडून बसले. त्यांच्या भेटीला दिल्ली, पंजाब, राजस्थान, उत्तरप्रदेश इत्यादी भागांतील संघस्वयंसेवक मोठया प्रमाणावर येऊ लागले. संघाबाहेरचीही बरीच मंडळी येऊन भेटून जात. संघ यापुढे काय करणार अशी पृच्छा पत्रकारही करीत. ३० ऑक्टोबरला सरदार पटेलांनी श्रीगुरूजींना तोंडी निरोप पाठविला की, अधिक विचारविनिमय होण्यासारखा नसल्याने श्रीगुरूजींनी दिल्लीला न थांबता नागपूरला परत जावे. या निरोपाचा अर्थ श्रीगुरूजींच्या ध्यानात आला. संघबंदीचा प्रश्न अधांतरीच ठेवण्याची नीती सरकारने अंगीकारलेली होती. तेव्हा सार्वजनिक रीत्या अधिक हालचाल करण्याची आवश्यकता निर्माण झाली. दिल्लीवरून हलण्यास गुरूजी मुळीच तयार नव्हते. त्यांनी एक पत्रकार परिषद दि. २ नोव्हेंबर रोजी निमंत्रित केली व संघावरील आरोपांचे निराकरण करणारी दोन विस्तृत पत्रके प्रसिध्दीला दिली. संघाचे राजकीय पक्षात रूपांतर करण्याची कल्पना त्यांनी साफ धुडकावून लावली. सांस्कृतिक क्षेत्रातील संघटनांना निर्वेधपणे काम करता आले पाहिजे. असा आग्रह त्यांनी व्यक्त केला होता. तूर्त, संघाच्या स्वयंसेवकांनी अन्य मार्गाने समाजसेवा चालू ठेवावी. बेकायदेशीर मार्गाने जाऊ नये, असे मार्गदर्शन श्रीगुरूजींच्या पत्रकात होते. अद्याप न्यायप्राप्तीची आशा त्यांनी सोडलेली नव्हती. दिल्ली सोडून जाण्याचा सरकारी सल्लाही त्यांनी फेटाळून लावला.

तीन नोव्हेंबर ते तेरा नोव्हेंबरपर्यंत दहा दिवस दिल्लीतच राहून सरकारी न्यायबुध्दी जागृत करण्याचा आटोकाट प्रयत्न श्रीगुरूजींनी केला. पंतप्रधान पंडित नेहरू व गृहमंत्री सरदार पटेल हे दिल्लीत परतले होते. त्यांच्याशी श्रीगुरूजींनी पत्रव्यवहार जारी ठेवला. दि. ३.११.४८ ला पं. नेहरूंना लिहिलेल्या पत्रात सरकारजवळ असलेल्या तथाकथित संघविरोधी पुराव्याला श्रीगुरूजींनी सडेतोड शब्दांत आव्हान दिले होते. भेटीसाठी दिवस आणि वेळ कळविण्याची विनंती केली होती. श्रीगुरूजींच्या शब्दांतील धार या पत्रात वाढलेली स्पष्टपणे जाणवते. नंतर दि. ५ रोजी सरदार पटेलांनाही श्रीगुरूजींनी एक विस्तृत पत्र लिहिले. बंदी उठविण्याच्या बाबतीत सरकारने चालविलेली अन्याय्य टोलवाटोलवी व संघस्वयंसवकांचा धीरोदात्त संयम यांचा उल्लेख तर या पत्रात आहेच, पण दारूण अपेक्षाभंगाची सखोल व्यथाही त्यात प्रतिबिंबित झाली आहे. हा उल्लेख अशासाठी महत्त्वाचा आहे की, खंडित मातृभूमीला स्वातंत्र्य लाभल्यानंतर देश भक्कम पायावर उभा करण्यासाठी अंत:करणाची केवढी विशालता त्यांनी देशप्रेमापोटी धारण केली होती, यावर त्यामुळे उत्कृष्ट प्रकाश पडतो. श्रीगुरूजींचे शब्द फार बोलके आहेत. ते शब्द असे :

"देशाची नाजुक अवस्था व उज्ज्वल भवितव्य निर्माण करण्यासाठी विघटन नाहीसे होण्याची आवश्यकता आहे. म्हणून मी सर्व स्वयंसेवकांना शांत राहण्यासाठी सूचना दिली आहे. आणि

शांततामय मार्गाने सलोखा व्हावा यासाठी प्रयत्नही केला आहे. राजकीय क्षेत्रात कार्यक्षम आणि वर्तमानकाली सत्तारूढ असलेली काँग्रेस आणि सांस्कृतिक क्षेत्रात असामान्य बंधुभाव, दृढ राष्ट्रप्रेम आणि नि:स्वार्थ वृत्ती निर्माण करण्यात यश मिळविणारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यात वैमनस्य नसावे. स्नेहच असावा. हे परस्परपूरक व्हावेत आणि यांचे कोठेतरी मीलन व्हावे, यासाठी मी आपल्या संपूर्ण शक्तीनिशी प्रयत्न केला. मी सहकार्याचा हा पुढे केला पण माझ्या सद्-भावनांची आपल्याकडून उपेक्षा झाली, असे मला अत्यंत खेदाने म्हणावे लागत आहे. दोन्ही प्रवाहांचा संयोग व्हावा ही माझ्या मनातील इच्छा अतृप्तच राहिली. कदाचित् असे असेल की, परम करूणामय परमात्मा, मी एखादा वेगळा रस्ता स्वीकारावा असा संकेत करीत असेल आणि कदाचित् त्यातच या देवभूमी भारतवर्षाच्या भाग्योदयाची बीजे साठविलेली असतील."

आता मागे वळून पाहिले असता असे वाटते की, हे मीलन त्यावेळी होऊ शकले असते तर? श्रीगुरूजींची अपेक्षा सफल झाली असती तर? पण केवळ कल्पना करून उपयोग नाही. गुरूजींचा 'वयं पंचाधिकम् शतम्' या भावनेने पुढे केलेला आत्मीयतापूर्ण सहकार्याचा हात नेहरू-पटेलांसारखे दिग्गज अत्युच्चस्थानी असलेल्या शासनाने अविचारीपणाने झिडकारला. 'वेगळा मार्ग' अंगीकारणे श्रीगुरूजींना भाग पाडले. हा वेगळा मार्ग स्वीकारताना एकदा दिलखुलास भेट व्हावी अशी इच्छा श्रीगुरूजींनी व्यक्त केली. पण ती देखील नेहरू-पटेलांना मान्य होऊ शकली नाही. दि. ८ व दि. १२ रोजी श्रीगुरूजींनी पंतप्रधानांना आणखी दोन पत्रे लिहिली. दि. १३ रोजी सरदार पटेलांना एक पत्र लिहिले. पण बंदी उठविणे शक्य नाही. नेत्यांच्या धोरणाविरूध्द स्वयंसेवकांचा व्यवहार आहे. भेट घेऊन काही उपयोग नाही. श्रीगुरूजींनी नागपूरला ताबडतोब परत जावे, हेच तुणतुणे भारत सरकार वाजवीत राहिले. दि. १२ रोजी निघालेल्या एका सरकारी प्रेसनोटमध्ये तर श्रीगुरूजी नागपूरला परत न गेल्यास त्यांना अटक करावी लागेल असा उल्लेख आहे.

सरकारच्या मनाचे दरवाजे प्राय: बंद झालेले आहेत व दिल्ली न सोडण्याचा आपल्या आग्रहामुळे आपल्याला केव्हाही अटक होऊ शकेल, हे या वेळपर्यंत श्रीगुरूजींनी ओळखले होते. वाटाघाटीचे पर्व संपले आहे व शांततामय मार्गाने, सरकारी बंदीआज्ञा मोडून, पुनश्च कार्यारंभ करणे भाग आहे, या संबंधीही त्यांना शंका राहिली नव्हती. तशी कल्पना त्यांनी कार्यकर्त्यांना दिली, एवढेच नव्हे तर स्वयंसेवकांसाठी एक प्रकट पत्र त्यांनी लिहून तयार केले. तसेच सर्वत्र प्रस्तृत करण्यासाठी एक संदेशही स्वहस्ते लिहिला. दि. १३ लाच रात्री पोलिस लाला हंसराज गुप्ता यांच्या घरी आले व त्यांनी श्रीगुरूजींना अटक केली. ज्या कायद्याला स्वातंत्र्य आंदोलनात 'काळा कायदा' म्हणत असत, त्या १८१८ च्या 'बंगाल स्टेट प्रिझनर्स ऍक्ट' चा आश्रय स्वतंत्र भारताच्या केंद्रीय शासनाने मातृभूमीच्या एका थोर उपासकाला अटक करण्यासाठी घेतला ! श्रीगुरूजींना विमानाने नागपूरला नेऊन तुरूंगात ठेवण्यात आले.

सरकारच्या या कृतीमुळे सामोपचार संपला आणि संघातर्फे बंदीविरोधी सत्याग्रहात्मक प्रतिकाराचे राष्ट्रव्यापी आंदोलन अटळ झाले.

## ९. सत्याग्रह-पर्वाची यशस्वी सांगता

दिल्लीतील वाटाघाटी अयशस्वी झाल्या. न्यायाची मागणी उपेक्षिली गेली. एवढेच नव्हे तर हेतुपूर्वक ती डावलण्यात आली आणि संघाला दूषणे देणे सत्ताधाऱ्यांनी चालूच ठेवले, तेव्हा सत्याचा आग्रह धरून पुढे जाण्याखेरीज संघापुढे पर्यायच उरला नाही. श्रीगुरूजींनी वाटाघाटीची सगळी पार्श्वभूमी स्वयंसेवकांना उद्देशून लिहिलेल्या एका विस्तृत पत्रात स्पष्ट केली. या पत्रात देखील संस्थागत अभिनिवेशाच्या किंवा व्यक्तिगत प्रतिष्ठेसाठी काही करीत असल्याच्या भावनेचा कोठे मागमूसही नाही. जो आहे तो देशाच्या भल्याचाच विचार. "कुविचारांचे हे दुष्ट चाळे आम्ही यापूढे चालू देणार नाही. कारण अंततोगत्वा त्यांचा अर्थ आहे आपले शासन ग्रासले जाऊ नये यासाठी, आज आपण दृढतेने उभे राहणे व एका लहानशा उठावाचे साहस करणे अत्यावश्यक आहे," असाच आपल्या सत्याग्रह अभियान निर्णयाचा खुलासा त्यांनी स्वयंसेवकांपुढे केला आहे. शांतताभंग टाळा व कुठेही कटुता निर्माण होऊ देऊ नका असे पथ्यही त्यांनी निक्षून सांगितले आहे. या पत्राबरोबरच प्रत्यक्ष आंदोलनाचा जो 'संदेश' श्रीगुरूजींनी दिला, तो रणशिंग-क्लॅरियन कॉल - या नावाने इतिहासात अंकित झाला आहे. त्या संदेशाच्या अंतिम भागातील आवाहनात्मक अंश येथे उद्-घृत केला तर त्याच्या एकूण स्वरूपाची कल्पना येऊन जाईल. तो स्फूर्तिपद, ओजस्वी आणि सगळयांचा विश्वास जागविणारा भाग असा :

"आपले कार्य श्रेष्ठ आहे, महान् आहे, ईश्वरी आहे. त्याची पुर्ति करणे हाच मानवतेचा उच्चतम आविष्कार आहे. हाच भगवंताचा साक्षात्कार आहे."

"म्हणून उठा आणि दहा महिन्यांपासुन स्थगित असलेले आपले कार्य पुन्हा प्रारंभ करा. दहा महिन्यांच्या अकर्मण्यतेची भरपाई करा. सत्य आपल्या बाजूला आहे. अन्याय सहन करीत झोपून राहणे म्हणजे त्यात भागीदार बनून पाप करणे आहे. आपण अन्यायाचे परिमार्जन करू या. अंत:करणात न्यायपूर्ण सत्याच्या अधिष्ठात्या श्रीपरमेश्वराला दृढ श्रध्देने धारण करून, संपूर्ण प्राणशक्तीनिशी भारतमातेचे ध्यान करून, तिच्या संतानांविषयीच्या प्रेमाने प्रेरित होऊन उठा. कार्यविस्तार करा आणि कोठेही न थांबता पुढे चालत राहा."

"हा धर्माचा अधर्माशी, न्यायाचा अन्यायाशी, विशालतेचा क्षुद्रतेशी आणि स्नेहाचा दुष्टतेशी लढा आहे. विजय निश्चित आहे. कारण जेथे धर्म असतो तेथे भगवंत असतात आणि जेथे भगवंत असतात तेथे विजय असतो. ऱ्यां

"तर मग हृदयाकाशापासून तो जगदाकाशापर्यंत भारतमातेचा जयजयकार निनादू द्या आणि कार्य पूर्ण करूनच उसंत घ्या."

आंदोलन सुरू होणार याची वार्ता सरकारला लागलीच होती. दि. ५ डिसेंबर रोजी ग्वाल्हेर येथील एका सभेत गृहमंत्री सरदार पटेल यांनी संघाच्या संकल्पित सत्याग्रहाचा उपहास केला. ते म्हणाले, "काही लोक म्हणतात की संघ सत्याग्रह करणार आहे. पण संघाचे लोक कधीही सत्याग्रह करू शकणार नाहीत. ज्यांची मने विकाराने ग्रस्त झालेली आहेत, त्यांचा सत्याग्रह कधी सफल होऊ शकत नाही. आम्ही त्यांना कॉंग्रेसमध्ये सामील होण्याचा सल्ला दिला व त्यांचे हृदपरिवर्तन करावे म्हणून प्रयत्न केला, पण त्यांनी आपली ताकद अजमाविण्याचा आणि देशद्रोहाचा मार्ग अवलंबिला आहे मी त्यांना इशारा देतो की अशा प्रकारचे आव्हान स्वीकारण्यास आम्ही सिध्द आहोत."

त्यावेळचे संघाचे सरकार्यवाह श्री. भय्याजी दाणी यांनी सगळयांच्या विचाराने दि. ९ डिसेंबर रोजी देशभर सत्याग्रहाचा ठाव करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आंदोलनाला प्रारंभ झाला. बंदी संघशाखा भरविण्यावर होती. त्या बंदी-आज्ञेचे उल्लंघन करून सर्वत्र संघशाखा सुरू करणे हे या आंदोलनाचे स्वरूप होते. "भारतमाता की जय" आणि 'संघ अमर रहे' अशा घोषणा देत स्वयंसेवकांच्या तुकडया मोकळया जागी शाखेचा कार्यक्रम नित्याच्या पध्दतीने सुरू करण्यास पुढे येत. पोलीस त्यांना अटक करीत. पोलिसांचा हस्तक्षेप होईपर्यंत कार्यक्रम चालू असे. अटक होत असताना प्रतिकार करावयाचा नाही व शांतता धोक्यात आणावयची नाही अशी शिस्त सगळेजण पाळीत. सत्याग्रह पाहण्यास हजारो नागरिक गोळा होत. पकडलेल्या स्वयंसेवकांना पोलीस व्हॅनमधुन तुरूंगात रवाना करण्यात येई. या सत्याग्रहामुळे संघबंदीचा विषय देशातील समस्त जनतेपुढे प्रामुख्याने आला. सर्वत्र 'संघविरोधी अन्याय दूर करा' अशा घोषणा दिसू लागल्या. त्याचबरोबर आरोपांचा खोटेपणा आणि संघाची विशुध्द राष्ट्रीय भुमिका यांची माहिती देणाऱ्या पत्रकांचा व पुस्तिकांचा प्रसार लोकांत केला जाऊ लागला. स्वयंसेवकांचा उत्साह विलक्षण होता. सत्याग्रहात भाग घेण्याच्या आड येणारी प्रत्येक अडचण स्वयंसेवकांनी निर्धाराने बाजूला सारली. नोकरी, शिक्षण, कौटुंबिक हालअपेष्टा, शरीरकष्ट, इत्यादींपैकी कशाचीही तमा त्यांनी बाळगली नाही. ९ डिसेंबरपासुन सुरू झालेले आंदोलन थांबण्याचे लक्षण दिसेना. लोकांची सहानुभूती वाढत्या प्रमाणात संघाकडे वळत होती आणि आंदोलन थांबविण्यासाठी तडजोडीचा मार्ग मोकळा केला पाहिले, असे काही ज्येष्ठ सत्प्रवृत्त नेत्यांना वाटू लागले होते.

सरकारला वाटत होते की अननुभवी तरूणांचे हे आंदोलन केवळ काही दिवसांतच बारगळून जाईल. सत्याग्रहींची संख्या चार-दोन हजारांच्या वर जाईल अशीही अपेक्षा नव्हती. सत्याग्रहाकडे खुद्द पंतप्रधान कोणत्या दृष्टीने पाहत होते हे पं. नेहरूनीं जयपूरच्या काँग्रेस मेळाव्यात काढलेल्या उद्-गारांवरून दिसुन येते. नेहरू म्हणाले, "ये संघ बच्चोंका दुराग्रह है" त्यांनी असेही सांगितले की शासन सर्व शक्ती वापरून आंदोलन दडपुन टाकील. संघाला परत डोके वर काढु देणार नाही. नेहरूंच्या धमकीला दाद देण्याच्या मन:स्थितीत स्वयंसेवक नव्हते आणि खुद्द शासनही सत्याग्रहाच्या जोरकसपणामुळे काहीसे चकित होऊन गेले होते. नेहरूंनी सत्याग्रहाचे वर्णन 'बच्चोंका' -मुलांचा केले ते मात्र खरे होते. कारण सत्याग्रहाचे सूत्रचालक विशी पंचविशीतले सामान्य तरूण होते. कोणी मोठे पुढारी वा सुप्रतिष्ठित राजकीय पक्ष यांचे आशीर्वाद या सत्याग्रहाला नव्हते. स्वत: श्रीगुरूजीदेखील यावेळी इतर नेत्यांच्या तुलनेने लहान वयाचेच. पण या 'मुलांनी' जी कल्पकता, शिस्तप्रियता, त्यागबुध्दी व देशभक्ती प्रकट केली, ती मात्र असामान्य. दंडुक्याच्या बळावर चळवळ दडपण्याचा प्रयत्न सरकारने अवश्य करून पाहिला. पंजाब आणि मद्रास या राज्यांत झालेले अत्याचार निर्घृण होते. छळवादाचे कितीतरी प्रकार सरकारने यावेळी उपयोगात आणून पाहिले. लाठीमार व स्वयंसेवकांची टाळकी सडकून काढण्याचे प्रकार मद्रास, हौरा, आग्रा, जोधपूर, बरेली, बक्सर, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणी घडले. तुरूंगात लाठीमार झाले. सरकारने कुठे अपेक्षिले होते की ऐंशी हजार सत्याग्रहींना तुरूंगात डांबावे लागेल? इतक्या सत्याग्रहींची नीट व्यवस्थाही अशक्य होऊन बसली. सगळे अत्याचार आणि अडचणी यांना स्वयंसेवकांनी प्रक्षुब्ध न होता, शांतपणे तोंड दिले. प्रसंगी अन्नसत्याग्रहासारख्या आत्मक्लेशात्मक मार्गाचा अवलंब केला. गांधीजींचे नाव घेण्याऱ्या लोकांनी कशी कल्पनाही केली नसेल, एवढया उत्तम प्रकारे सत्याग्रहतंत्राचा वापर स्वयंसेवकांनी करून दाखविला. स्वयंसेवक शांतपणे निर्बंधभंग करीत असता त्यांच्यावर मद्रास येथे जो निर्घृण लाठीहल्ला झाला, त्याचा निषेध लिबरल पक्षाचे श्री. टी. व्ही.

आर. वेंकटराम शास्त्री आणि खासदार स्वामी वेंकटचलम चेट्टी प्रकटपणे केला. श्री. टी.व्ही.आर. वेंकटराम शास्त्रीच पुढे संघावरील बंदी उठविण्याच्या संबंधात मध्यस्थी करण्यासाठी तयार झाले. जनतेची सहानुभूती संघाच्या बाजूने वाढतच गेली. 'बंदी उठवा' अशी मागणी करणारे मोठमोठे मोर्चे निघु लागले. जयप्रकाशजींसारखे पुढारीही म्हणू लागले की, "संघावर गांधीहत्येचा आरोप मी करू इच्छित नाही. संघाच्या स्वयंसेवकांची शिस्त, चारित्र्य, ध्येयनिष्ठा तसेच स्नेहभाव खरोखरीच प्रशंसनीय आहे. संघाने समाजाची पुरेशा प्रमाणात भरीव सेवा केली आहे व म्हणूनच तो अद्याप टिकाव धरून आहे. कायद्याचा बडगा उगारून संघाची इतिश्री करता येणार नाही." (काशी येथील सांप्रदायिकता विरोधी सप्ताहाच्या उद्-घाटन प्रसंगीचे भाषण)

सत्याग्रहींची रीघ खंडित होईना व स्वयंसेवकांचा उत्साह ओसरेना. अशा गुणसंपन्न युवकांना निष्कारण सोसाव्या लागणाऱ्या यातनांनी अनेक सत्प्रवृत्त पुढाऱ्यांची मने व्यथित झाली. काही तरी तडजोडीचा मार्ग शोधून काढला पाहिजे असे त्यांना वाटू लागले. गृहखात्याला पत्रे लिहून मध्यस्थीची तयारी त्यांनी दाखविली. पुण्याच्या 'केसरी' चे संपादक श्री. ग.वि. केतकर यांना श्रीगुरूजींची शिवनी येथील तुरूंगात भेट घेण्याची परवानगीही भारत सरकारने दिली. दिनांक १२ जानेवारी व १९ जानेवारी या दोन दिवशी श्री. केतकर यांनी श्रीगुरूजींची भेट घेऊन देशातील परिस्थितीची त्यांना कल्पना दिली. त्यांनी असेही मत व्यक्त केले की रा.स्व. संघाने सत्याग्रहाचे आंदोलन स्थगित केल्यास संघावरील बंदी दूर करण्याच्या दृष्टीने हालचाल करण्यास अनुकूलता निर्माण होईल. हा विचार श्रीगुरूजींनाही मान्य झाला व आंदोलन स्थगित करण्याचा आदेश त्यांनी लिहून श्री. केतकर यांच्याकडे दिला. आंदोलनाचे सूत्रसंचालन करणाऱ्या कार्यकर्त्यांपर्यंत तो पोचून अखेर दि. २२ जानेवारी १९४९ रोजी आंदोलन स्थगित करण्यात येत असल्याची अधिकृत घोषणा झाली. दि. ९ डिसेंबर रोजी सुरू झालेले देशव्यापी सत्याग्रहपर्व उज्वल यश पदरात घेऊन स्थगित झाले. संघाचा सहज चिरडून टाकण्याच्या वल्गना व्यर्थ आहेत आणि संघाने जी समंजसपणाची भूमिका घेतली आहे ती दुर्बलतेपोटी नसून देशप्रेमापोटी आहे, हे सगळयांच्याच ध्यानात आले. गांधीजींच्या सत्याग्रह-तंत्राचा, मी मी म्हणणाऱ्या गांधीवाद्यांनीही थक्क व्हावे, असा निष्कलंक वापर करून एक मोठाच नैतिक विजय संघाने संपादन केला होता. लोकमत त्यामुळे जागृत झाले होते. वृत्तपत्रातुन या भावनांचे पडसाद मुक्तपणे उमटले. अंबाल्याच्या 'ट्रिब्युन' ने 'आता खेळी सरकारची आहे' असे लिहून हा प्रश्न सलोख्याने मिटविण्याची इष्टता प्रतिपादन केली. 'स्टेट्समन'नेही फार मार्मिक अग्रलेख लिहनू देशाचा गौरव ठरू शकणारी युवाशक्ती कारागृहात सडत पाडू नका, असा सल्ला शासनाला दिला.

या ठिकाणी मुद्दाम नमूद करावयास हवे की मध्यस्थी करू इच्छिणाऱ्या पुढाऱ्यांची अडचण होऊ नये, या सद्-भावनेने केवळ सत्याग्रह स्थगित करण्यास लेखी अनुमती श्रीगुरूजींनी केतकरांजवळ दिली होती. हे एक प्रकारचे सौजन्य होते. आदरणीय पुरूषांच्या शब्दाला मान देण्यासाठी आपला आग्रह जरा बाजूला ठेवण्यास त्यांनी अनमान केले नाही. सत्याग्रह स्थगित करण्याच्या निर्णयामुळे मध्यस्थांचा मार्ग मोकळा झाला. केतकरांनंतर मद्रासचे उदारमतवादी नेते श्री. टी.व्ही.आर. वेकटराम शास्त्री यांनी मध्यस्थीसाठी पुढाकार घेतला. नि:पक्ष, नि:स्पृह, सेवाभावी आणि विद्वान कार्यकर्ते म्हणून 'टी.व्ही.आर.' यांची ख्याती होती. त्यांनी मार्च १९४९ मध्ये श्रीगुरूजींची कारागृहात दोनदा भेट घेतली. पहिल्या भेटीत असे ठरले की संघाची लिखित घटना लगेचच तयार करवून घ्यावयाची. ती तयार झाल्यानंतर भारत सरकारकडे पाठविण्याची अनुमती दुसऱ्या भेटीत श्रीगुरूजींनी

दिली. पण शास्त्रींच्या मध्यस्थीने पाठविली गेलेली घटना शासनाने स्वीकारली नाही. श्रीगुरूजींनी स्वत:च ती पाठवावी असे शासनाचे मत पडले. पत्रे पोचती करण्याच्या अत्यंत दिरंगाईच्या पध्दतीमुळे एप्रिल व मे हे दोन महिने काहीच न घडता वाया गेले. आपली मध्यस्थी शासनाला पसंत नसावी या कल्पनेने नंतर काही काळ श्री. शास्त्री स्वस्थ राहीले. दरम्यान, सरकारने संघाच्या घटनेवर आक्षेप घेण्यास व घोळ घालण्यास प्रारंभ केला, तेव्हा संघाची सरकारने चालविलेली नाहक अडवणूक आणि हजारो कार्यकर्त्यांचा न संपणारा कारावास यामुळे त्यांना काहीशी चीडच आली, सरकारी आक्षेपांना उत्तर देणारे श्रीगुरूजींचे पत्र जेव्हा सरकारने श्री. शास्त्रींकडे पाठवून दिले, तेव्हा सर्व सरकारी आक्षेपांचा परखड परामर्श घेणारे एक विस्तृत निवेदन शास्त्रीजींनी प्रसिध्द केले.

'श्री. टि.व्ही. आर.' यांचे वक्तव्य त्यांच्या नि:पक्षतेची आणि नि:स्पृहतेची साक्ष पटविणारे तर आहेत, पण स्वयंसेवी संघटना सरकारच्या गैरवाजवी हस्तक्षेपापासुन मुक्त राहिल्या पाहिजेत, हा लोकशाही बाणाही त्यात व्यक्त झाला आहे. सरसंघचालकांची नियुक्ती कोणत्या प्रकारे व्हावी हा संघटनेच्या सदस्यांनी ठरवावयाचा विषय आहे. त्यात सरकारने दखल घेता कामा नये, असे शास्त्रींनी स्पष्टपणे बजावले. विशिष्ट प्रकारे नियुक्ती झाली म्हणून संघटना 'फॅसिस्ट' झाली हा उथळ सरकारी युक्तिवादही त्यांनी खोडून काढला व संघासारख्या संघटनांना 'फॅसिस्ट' म्हणता येणार नाही, असे सडेतोडपणे प्रतिपादन केले. राजकीय पक्षात संघाचे रूपांतर करण्यात आले तरी त्यावर बंदी असू शकत नाही. संघटनेला तसे रूपांतर करण्याचा अधिकार आहे, येथवर शास्त्री स्पष्टपणे बोलले. परंतु मे महिन्यातील हे निवदेन सरकारने मनावर घेतले नाही. वेळकाढूपणाच ते करीत राहीले. संघावरील आक्षेपांना उत्तरे देणारे श्रीगुरूजी यांचे मूळ पत्र बरेच तिखट आणि आव्हानवजा आहे. (हे पत्र १७ मे चे असून 'श्रीगुरूजी समग्र दर्शन' या ग्रंथाच्या दसुऱ्या खंडात पृष्ट ५३ वर समग्रपणे उद्-घृत करण्यात आले आहे.)

याप्रमाणे पत्रव्यवहार चालू असतानाच श्रीगुरूजींना शिवनी कारागृहातून बैतूला येथील कारागृहात हलविण्यात आले. शिवनी येथे श्रीगुरूजींची व्यवस्था त्यांच्यासारख्या तोलमोलाच्या नेत्यास साजेशी होती असे मुळीच नाही. केवळ १०० रूपये महिन्याचा खर्च त्यांच्यासाठी होत असे. श्री. ग.वि. केतकर यांनी शिवनी तुरूंगातील श्रीगुरूजींच्या खोलीचे जे वर्णन केले आहे, त्यावरूनच राज्यकर्त्यांच्या संकुचित मनाची कल्पना येऊन जाते. बैतूलचा तुरूंग तर आणखी निकृष्ट प्रतीचा. शेवटचे मध्यस्थ श्री. मौलीचंद्र शर्मा त्यांना बैतूल कारागृहातच भेटले. श्रीगुरूजींच्या माता-पित्यांनी बैतूललाच त्यांची भेट घेतली. या भेटींची जी वृत्ते प्रकट झाली त्यामुळे श्रीगुरूजींची प्रकृती, त्यांना तुरूंगात मिळणारी वागणूक व संघासंबंधीची सरकारी आडमुठी भूमिका या सगळयांवरच प्रकाश पडला आणि हितचिंतकांच्या तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. व्यक्तिगत अडीअडचणींची तमा श्रीगुरूजी बाळगीत नसत. आपल्या 'अधिकारा' चा अभ्यास करून सुखसोयींच्या मागण्या त्यांनी कधीच केल्या नाहीत. त्यांची तळमळ एकच होती की, हिंदू समाज एकरस आणि सुसंघटित बनवून देशाला सामर्थ्य देण्याचे कार्य जे खंडित झाले होते ते परत सुरू व्हावे. संघकार्याला पर्याय नाही, हीच त्यांची ठाम धारणा होती. संघाच्या बाजूला सत्य आणि न्याय असतानाही सरकार आपला दुराग्रह सोडत नाही, याबद्दल चीड स्वयंसेवकांच्या मनात निर्माण झाली. सार्वजनिक कार्यकर्ते आणि नि:पक्ष वृत्तपत्रे संघाचा कैवार घेऊन सरकारच्या अन्यायपूर्ण भुमिकेचे निष्ठुरपणे वाभाडे काढु लागली होती. परदेशांतही भारत सरकारच्या 'फॅसिस्ट' धोरणावर प्रखर टीका यावेळी झाली. 'वर्ड' नामक पत्राने लिहिले होते : 'ज्या

ब्रिटिश राज्याची सर्व प्रकारे निंदा केली जात होती, त्या राज्यानेही, नेहरूंच्या या 'फॅसिस्ट' राज्याप्रमाणे कधी नागरिक स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचा प्रयत्न केल्याचे आम्हाला आठवत नाही." संघबंदीविरूध्द एखादी नवी चळवळ करावी, असा विचार सरकारी धोरणाची प्रतिक्रिया म्हणून बोलला जाऊ लागला. संघाचे रूपांतर राजकीय पक्षात करावे, असाही सल्ला नागपूरच्या 'हितवाद' चे संपादक श्री. ए.डी.मणी यांच्यासारखे हितचिंतक देऊ लागले होते.

वातावरणात याप्रमाणे नवा तणाव येत होता आणि संघासंबंधी सहानुभूती वाढत्या प्रमाणात दिसत होती. भारत सरकारला ही लोकमताने घेतलेली कलाटणी जाणवली असावी. म्हणून जुन महिना संपता संपता भारत सरकारने भारतीय जनाधिकार समितीचे अध्यक्ष पं. मौलीचंद्र शर्मा यांना श्रीगुरूजींची भेट घेऊन लेखी स्वरूपात काही मुद्यांची उत्तरे मिळविण्यास प्रवृत्त केले. श्री. शर्मा यांनी आधी गृहमंत्री सरदार पटेल, संघाचे सरकार्यवाह श्री. भय्याजी दाणी आणि श्री. बाळासाहेब देवरस यांची भेट घेतली. नंतर ते बैतूलला गेले व सरकारच्या दृष्टीने आक्षेपार्ह ठरणाऱ्या बाबींची पुन्हा उजळणी झाली. आता श्रीगुरूजी भारत सरकारला काहीही खुलासेवजा पत्र लिहिण्यास मुळीच तयार नव्हते. सरकारशी पत्रव्यवहार करावयाचा नाही, से त्यांनी ठरवून टाकले होते. पण परिस्थितीचे दडपण सरकारला जाणवत असल्यामुळे यावेळी सरकार पूर्वीप्रमाणे औपचारिकतेवर अडून बसले नाही. बंदी उठविण्याविना गत्यंतर नाही हे सरकारला कळून चुकले होते आणि त्याला नवे निमित्त केवळ हवे होते.

पं. मौलीचंद्र शर्मा यांच्या भेटीनंरत श्रीगुरूजींनी त्यांना (श्री. शर्मांना) एक व्यक्तिगत पत्र लिहिले. सरकारने उपस्थित केलेल्या निरनिराळया आक्षेपासंबंधी संघाची भूमिका या पत्रात पुन्हा एकवार स्पष्ट केली आहे. हे पत्र दि. १० जुलै १९४९ चे आहे. रा. स्व. संघ आणि भारतीय राज्यघटना व राज्यध्वज, हिंसाचाराचा व गुप्तते़चा आरोप, संघातील कार्यकारी मंडळाची निवडणुक, प्रतिज्ञा, बालस्वयंसेवकांचा प्रश्न, सरसंघचालकांची नियुक्ती, संघातील जातिवर्चस्व आणि हिशोब-व्यवस्था अशा आठ मुद्यांचा परामर्श या पत्रात घेण्यात आला. (मूळ सविस्तर पत्रासाठी श्रीगुरूजी समग्र दर्शन खंड २, पृष्ठ ६१ पहा) दि. १० जुलैच्या या व्यक्तिगत पत्राचा आधार घेऊन भारत सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरील सुमारे १८ महिन्यांची बंदी उठविली. येथे एक गोष्ट ध्यानात ठेवणे आवश्यक आहे की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची घटना लिखित स्वरूपात सादर करण्यास मान्यता देताना किवां घटनेवरील आक्षेपांचा परामर्श घेताना सरकारच्या 'अटी' अशा श्रीगुरूजींनी मान्य केलेल्या नाहीत. संघाने सरकारला काही 'वचने' दिली होती व नंतर ती मोडण्यात आली असा मतलबी प्रचार अनेकांनी करून पाहिला. आता तर श्रीगुरूजींनी सरकारला किंवा मध्यस्थांना लिहिलेली सारी पत्रे मूळ स्वरूपात प्रसिध्द झाली आहेत. तेव्हा, अटी आणि त्यांचा भंग केल्याचा आरोप यांना काहीच आधार नाही, हे अगदी स्पष्ट होऊन जाते. संघाचे कार्य अलिखित घटनेनुसार चालले होते. त्याच सगळया संकेतांना व पध्दतींना लिखित रूप देण्यात आले एवढेच. संघावरील बंदी उठताच गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी श्रीगुरूजींना एक पत्र लिहून आपला आनंद व्यक्त केला आणि शुभकामना कळविल्या. या पत्रातील काही अंश पुढीलप्रमाणे :

"..... आपण आपल्या सार्वजनिक वक्तव्यात म्हटल्याप्रमाणे, देशातील स्थिती अशी आहे की, आम्ही सर्वांनी भूतकाळातवर दृष्टी न ठेवता वर्तमान आणि भविष्याकडे ती लावली पाहिजे. संघ, काँग्रेस आणि शासन यांच्याविषयी आपण ही धारणा ठेवाल, अशी मला आशा आहे."

"संघावरील प्रतिबंध उठवितांना मला किती आनंद झाला हे तर माझ्या निकट असणारे लोकच सांगू शकतील. संघाविषयीचे जे माझे विचार एक वर्षापूर्वी जयपूर किंवा लखनौ येथे मी प्रकट केले होते, ते प्रत्यक्षात उतरविण्यासाठी मला पुन्हा प्रयत्न करता येईल. असा हा अवसर ईश्वराने अशा रीतीने दिला याचा मला विशेष आनंद आहे.

"आपले स्वास्थ ठीक असेल अशी मला आशा आहे. मी आपणाला माझ्या शुभकामना पाठवितो."

संघबंदी उठल्याची घोषणा आकाशवाणीवरून दिनांक १२ जुलैच्या सायंकाळी झाली आणि दिनांक १३ ला सकाळी श्रीगुरूजींना बैतूल कारागृहातून मुक्त करण्यात आले. श्रीगुरूजी नागपूर स्थानकावर पोहोचले तेव्हा ऐन दुपारी त्यांच्या स्वागतासाठी तीस हजार स्त्री-पुरूषांचा हर्षनिर्भर समाज जमलेला होता. भारतमातेचा गगनभेदी जयजयकार सगळयांनी केला. एका अग्निदिव्यातून तावून सुलाखून बाहेर पडलेल्या आपल्या पुत्राचे जेव्हा प्रत्यक्ष पित्यानेच पुष्पहार घालून स्वागत केले, तेव्हा अगणित नेत्रांत आनंदाश्रू तरळले. श्रीगुरूजी नागपूरला चारपाच दिवस थांबून मद्रासला श्री. टी.व्ही.आर. वेंकटराम शास्त्री यांच्या भेटीसाठी गेले. त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. 'शेवट गोड तर सगळेच गोड' असे वाक्य असलेली श्री. शास्त्रींची अभिनंदपर तार नागपूरलाच श्रीगुरूजींच्या हाती पडली होती. अभिनंदनपत्रे आणि तारा यांचा अक्षरशः वर्षाव चालू होता. मद्रास, पुणे आणि मुंबई असा प्रवास करून श्रीगुरूजी नागपूरला परतले. बंदीकालातील साहाय्यकर्त्यांना त्यांनी मुद्दाम भेटून धन्यवाद दिले. यात श्री. केतकरांचा समावेश अर्थात् होताच. या सर्व प्रवासात त्यांचे ठिकठिकाणच्या जनतेने अपूर्व स्वागत केले. भारतीय जनतेच्या श्रीगुरूजींवरील उत्कट प्रेमाचा हृदय हेलावून सोडणारा प्रत्यय ठायी ठायी आला.

# १०. सत्कार पर्व

तब्बल अठरा महिने श्रीगुरूजी आपल्या प्रिय स्वयंसेवकांपासून दूर होते. जनसंपर्क खंडित झालेला होता. स्वयंसेवकांना आणि जनतेलाही श्रीगुरूजींना पाहण्याची, बंदी उठल्यानंतर ते कोणते मार्गदर्शन करतात याची जिज्ञासा होती. तेव्हा देशव्यापी संचार आरंभ करणे अपरिहार्यच होते. सगळयांचा मनात प्रश्न होता, संघबंदीच्या अध्यायाचा बोध काय? श्रीगुरूजींच्या मनावर काँग्रेस शासनाच्या दंदडुकेशाहीची झालेली प्रतिक्रिया कशा स्वरूपाची आहे? राज्यकर्त्यांच्या बाबतीत बोलण्यासाठी श्रीगुरूजी कोणते शब्द आता वापरतील? अखेर या प्रश्नांची जी उत्तरे श्रीगुरूजींच्या भाषणातून निष्पन्न झाली, ती त्यांच्या अंत:करणाचा विशालपणा, औदार्य, त्यांची उत्कट देशभक्ती, निर्वैरता आणि हिंदू संस्कृतीच्या आदर्शानुसार वागण्याचा सहज स्वभाव यांची साक्षात् प्रचिती पटविणारी होती. 'धन्य, धन्य' असेच उद्-गार श्रीगुरूजींचे विचार ऐकून लक्षावधी मुखांतुन बाहेर पडले.

श्रीगुरूजींचे भारत-भ्रमण ऑगस्ट १९४९ मध्ये सुरू झाले, ते जानेवारी १९५० पर्यंत सुरू होते. या काळात ते जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांचा भव्य प्रमाणावर उत्स्फूर्त सत्कार झाला. २० ऑगस्ट रोजी उत्तर भारतातील प्रवासासाठी दिल्लीकडे प्रस्थान करण्यापूर्वी ते किंचित् सवड काढून मुंबईला सरदार पटेल यांना भेटून आले. कारण सरदारांची प्रकृती बरीच अस्वस्थ असल्याचे त्यांना कळले होते. भेट सुमारे तासभर झाली. तेव्हाचे सरकार्यवाह श्री. भय्याजी दाणी हेही या भेटीच्या वेळी श्रीगुरूजींच्या बरोबर होते. या भेटीत सरदारांनी त्या श्रांत अवस्थेतही देशातील परिस्थितीचे आणि संभाव्य संकटांचे चित्र पुढे ठेवले. या भेटीत ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हालचालींचाही उल्लेख सरदारांनी केला व हिंदू समाजाची 'पचनशक्ती' वाढविण्याची आवश्यकता प्रतिपादन केली हे उल्लेखनीय आहे. पाकिस्तानच्या निर्मितीमुळे निर्माण झालेल्या समस्यांचा पाढा त्यांनी अर्थात् वाचलाच. 'जे घडले ते विसरून जाऊ या, आणि देशाच्या भविष्याकडे लक्ष देऊ या,' असे आवाहनही सरदारांनी केले.

श्रीगुरूजींच्या सुमारे पाच महिन्यांच्या भारतभ्रमणात सर्वत्र त्यांचे जे स्वागत झाले त्याचे वर्णन कितीही रोचक असले तरी स्थलाभावास्तव येथे ते करता येत नाही. वानगीदाखल राजधानी दिल्लीतील सत्काराचे वृत्त सांगितले तरी पुरेसे आहे. राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, आंध्र, मद्रास, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात इत्यादी राज्यांतील प्रमुख शहरांच्या भेटीत दिल्लीचीच लहानमोठी आवृत्ती निघत गेली. दिल्लीच्या सत्काराचा स्वाभाविक परिणाम म्हणून श्रीगुरूजींच्या व्यक्तिमत्वाकडे सगळया जगाचे लक्ष आकृष्ट झाले. 'ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन' ने असा अभिप्राय व्यक्त केला की, "भारताच्या क्षितिजावर उगवलेल्या एखाद्या दैदिप्यमान ताऱ्याप्रमाणे श्रीगुरूजी आहेत. एवढा जनसमाज आकृष्ट करू शकणारी भारतात पं. नेहरू हीच केवळ आणखी एक व्यक्ती आहे." भारतीय वृत्तपत्रांतूनही दिल्लीच्या कार्यक्रमाचे विविध पडसाद उमटले. श्री ना.ह. पालकर यांचे, "श्रीगुरूजी : व्यक्ती आणि कार्य" नामक जे पुस्तक १९५६ साली प्रसिध्द झाले, त्यात दिल्लीच्या या सोहळयाचे वर्णन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

दिल्ली स्टेशनात तसेच स्टेशनच्या बाहेर दूरपर्यंत लोकांची एवढी प्रचंड गर्दी उसळली होती की जणू सगळी राजधानीच श्रीगुरूजींच्या दर्शनासाठी लोटल्याचा भास व्हावा. जयजयकाराने आकाश निनादून उठले, तर फुलांच्या सडयांनी रस्त्यांचे रूपच पालटून टाकले. सगळी नगरी स्वागतासाठी सजविण्यात आली होती. ठिकठिकाणी स्वागत-कमानी उभारण्यात आल्या होत्या. सायंकाळी

रामलीला मैदानावर सत्कार-सभा झाली. सुमारे पाच लाख स्त्री-पुरूष नागरिक या सभेसाठी जमले होते. व्यासपीठ खूपच भव्य होते. आणि कार्यक्रमाची आखणी फार नेटकी होती. गणवेशधारी स्वयंसेवक लोकांचे स्वागत करून त्यांना योग्य ठिकाणी बसवत होत. सभेची शिस्त पोलिसांच्या मदतीशिवाय स्वयंसेवकांनीच स्पृहणीय प्रकारे राखली होती. दि. २३ ऑगस्ट रोजी नागरिकांतर्फे श्रीगुरूजींना मानपत्र अर्पण करण्यात आले. मानपत्राला श्रीगुरूजींनी उत्तर दिले.

याच स्वरूपाचे जे स्वागत-कार्यक्रम ठिकठिकाणी झाले, त्यांत श्रीगुरूजींनी मानपत्रांना उत्तरे देताना कोणते विचार मांडले? सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे संघावर बंदी घालणाऱ्या, बिनबुडाचे आरोप करणाऱ्या, हजारो स्वयंसेवकांच्या हालअपेष्टांस कारणीभूत ठरलेल्या शासनासंबंधी किंवा स्वयंसेवकांवर आघात करणाऱ्या लोकांसंबंधी कोणतीही कटुता आपल्या अंत:करणात नाही, हे त्यांनी प्रकटपणे सर्वत्र घोषित केले. संघावरील बंदीच्या प्रकरणावर कायमचा पडदा टाकावा, झाले गेले विसरून जावे, असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या मनाची आभाळाएवढी विशालता प्रकट करणारे हे उद्-गार पहा : 'संघावरील प्रतिबंधांचे हे प्रकरण आता येथेच थांबवा. ज्यांनी आपल्यावर अन्याय को असे तुम्हाला वाटत असेल, त्यांच्यासंबंधी कटुतेचा अशंसुध्दा चित्तात आणू नका. एखाद्या वेळी आपल्याच दाताखाली आपली जीभ चावली जाते किंवा आपलेच पाय एकमेकांत अडखळतात, पण म्हणुन आपण दात उपटत नाही की पाय तोडत नाही. ज्यांनी आमच्यावर अन्याय केला ते देखील आपलेच आहेत हे लक्षात ठेवून, झाले गेले विसरून, आपण क्षमाशीलता प्रकट केली पाहिजे. पूर्ण झोप घेऊन ताजातवाना झालेला माणूस अधिक उत्साहाने कामाला लागतो. त्याचप्रमाणे समाजातील संकुचितपणा, भेदबुध्दी आणि तज्जन्य अन्य वाईट गोष्टी दूर करण्याच्या आपल्या पूर्वीच्या कामाला दुप्पट उत्साहाने भिडले पाहिजे. हे करीत असता आपल्या मनातील कोणासंबंधीही दुष्टबुध्दी उत्पन्न होऊ देऊ नये."

सगळा असाच सूर. आणि त्याबरोबरच देशातील चिंताजनक परिस्थितीचे चित्रण, तसेच संघाला जे कार्य करावयाचे आहे, त्याची सुस्पष्ट विधायक मांडणी. स्वयंसेवकांनी शांतपणे आघात सोसले याचे कारण आघात करणारे स्वकीय होते हे सांगताना एकदा ते म्हणाले, "हेच आघात जर परक्यांनी केले असते तर संघाच्या ताकदीची चुणूक त्यंना अवश्य दाखविली असती. आम्हीही आमच्या आईचे दूध प्यायलो आहोत, याचा प्रत्यय त्यांना आणून दिला असता." समाजाचे आणि राष्ट्राचे चित्र बदलून टाकावयाचे असेल, तर भारतीय संस्कृतीचे महान् गुण अंगी बाणविले पाहिजेत व संघटित झाले पाहिजे," हा संघाचा मूळ विचार श्रीगुरूजींनी पुन:पुन्हा प्रतिपादन केला. भारताच्या आध्यात्मिक प्रकृतीकडे लक्ष वेधले. त्यांच्या उद्-गारांतून स्पष्टपणे जाणवलेली गोष्ट म्हणजे होणारा सन्मान गोळवलकर या व्यक्तीचा आहे, हा भाव त्यांच्या मनात चुकूनही आला नाही. प्रवासाच्या ओघात पंजाबमध्ये सोनिपत येथे घडलेला एक प्रसंग उल्लेखनीय आहे. तिथे एका तरूण स्वयंसेवकांने भावनेच्या भरात 'श्रीगुरूजी अमर रहे' अशी घोषणा दिली. "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अमर रहे' अशीही एक घोषणा देण्यात आली. ही घोषणा ज्या स्वयंसेवकाने दिली त्याला श्रीगुरूजींनी थांबविले आणि आपली नापसंती व्यक्त केली. नंतर ते म्हणाले, "कोणीही व्यक्ती किंवा संघटना यांच्या संबंधात अशा प्रकारच्या घोषणा देत जाऊ नका कारण कोणतीही व्यक्ती अमर नसते किंवा संघटनाही अमर नसते. केवळ आपले राष्ट्रच चिरंजीव असू शकते. म्हणून 'भारतामाता की जय' हीच आपली एकमात्र घोषणा असावी." कोणा व्यक्तीची वा संस्थेची नव्हे तर राष्ट्राची भक्ती सर्वांनी उत्कटतेने करावी, हीच एक

आकांक्षा त्यांच्या ठायी होती. गीतेच्या तेराव्या अध्यायात भगवंतांनी ज्ञानलक्षणे सांगितली आहेत. त्यांतील पहिलेच लक्षण 'अमानित्व' हे आहे. त्याचेच दर्शन श्रीगुरूजींच्या जीवनात घडते. एकाद्या ठिकाणी व्यक्ती या नात्याने आपला विशेष मानसन्मान होते आहे असे दिल्यास ते अस्वस्थ होऊन जात. प्रसिध्दीच्या प्रकाशझोतापासून आजवर संघ दूर राहिला होता आणि या अबोल कार्याचा अर्थ मात्र चुकीचा लावण्यात आला होता. अबोल समाजकार्य म्हणजे गुप्त कार्य असे अजब समीकरण मांडण्यात आले होते ! म्हणून श्रीगुरूजींनी संघाच्या प्रसिध्दीपराङ्मुखतेची सांस्कृतिक भूमिका राजधानी दिल्लीत आणि अन्यत्रही लोकांना समजावून सांगितली. त्यांनी सत्कारासाठी गर्दी करणाऱ्या लक्षावधी लोकांना असेही सांगितले की प्रेमाचा वर्षाव होतो आहे तो संघावर. संघकार्याची ती महत्ता आहे. तेव्हा हे कार्य देशाचे चित्र बदलेल, या अपेक्षेने आता या प्रेमाचे रूपांतर सगळयांच्या सक्रिय सहकार्यात झाले पाहिजे. श्रीगुरूजींच्या प्रकट चिंतनातून यावेळी जनमानसातील एक वेगळा विचारही पुढे आला व त्याचे निर्मूलन करण्यासाठी संघाची सगळी विचारसरणीच त्यांना नव्या संदर्भात पुन्हा स्पष्टपणे मांडावी लागली.

श्रीगुरूजी तुरूंगात असतानाच त्यांच्याकडे एक पृच्छा करण्यात आली. पृच्छा अशी की, मुसलमानांना वेगळा प्रदेश तोडून देण्यात आल्यामुळे हिंदू-मुसलमान भांडणाची किंवा दंगलीची समस्याच मुळापासुन संपली आहे. तेव्हा संघाची आवश्यकता आता कोठे उरली? हा प्रश्न विपरीत खरा, पण संघाचे वास्तव स्वरूप समजावून सांगण्यास निमित्त म्हणून श्रीगुरूजींनी त्याचा योग्य उपयोग करून घेतला. संघ म्हणजे मुसलमानांचा द्वेष्टा व चढेलपणाला बाहुबलाने चोख उत्तर देण्यासाठी संघाचा आटापिटा असा अपसमजाचा सूर त्यावेळी तर व्यक्त झालाच, पण आजही अनेक बुध्दिमान आणि विचारवंत म्हणविणारी माणसे तो सूर कोणत्या ना कोणत्या कारणावरून काढतात. फाळणीनंतरच्या त्या खळबळीच्या काळातही श्रीगुरूजींनी या प्रश्नाचा अगदी शांत व समतोल परामर्श घेतला. श्रीगुरूजींनी दिलेले उत्तर अगदी स्वच्छ आणि मूलगामी असल्यामुळे ते येथे जरा विस्ताराने उद्-घृत करणे योग्य ठरले. श्रीगुरूजी म्हणाले :

"मी त्यांना सांगितले की तुमचा हा दृष्टिकोन संपूर्णपणे चुकीचा आहे. पहिली गोष्ट अशी की, संघ हा कुणाशी संघर्ष करण्यासाठी वा संघर्षाचा प्रतिकार करण्यासाठी उभा राहिलेला नाही. आणि दुसरी गोष्ट अशी की, राष्ट्रीय दानत वा चारित्र्य निर्माण करण्याच्या संघाच्या प्रमुख कार्याकडे आपले लक्ष गेलेले नाही. आपण म्हणता त्याप्रमाणे केवळ शारीरिक संघर्षाला तोंड देण्यासाठी काही सामर्थ्य उभे करण्याची गरज असेल, तर त्यासाठी ठिकठिकाणी आखाडे, तालमी, व्यायामशाळा अशा अनेक संस्था आहेत. त्यांच्याकडून ते कार्य होण्यासारखे आहे. त्यासाठी एखादी मोठी राष्ट्रव्यापी संघटना उभी करण्याची काही गरजच नव्हती. शिवाय आपल्या समाजाचे तेवढेच एक दु:ख आहे की? आपल्या समाजाचे नीटपणे निरीक्षण केल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव हेच समाजाला पोखरून टाकणारे एक फार मोठे भयानक दु:ख आहे. आणि म्हणूनच शीलवान आणि चारित्र्यसंपन्न नागरिक निर्माण करण्याची जबाबदारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने प्रथमपासूनच स्वीकारली आहे. हे काम कधीच संपत नाही. ते अखंड सुरूच असते.

"आमच्या पिढीला जशी त्याची गरज भासते तशीच ती उद्याचा, परवाच्या, आणि त्यापुढील सर्वकाळाच्या पिढयांनाही भासाणार आहे. भारतातील प्रत्येक माणूस आपल्या देशाकरिताच प्रयत्न करीत असलेला दिसावा ही स्थिती नेहमीच आवश्यक आहे. म्हणून संघाचे कार्य परिस्थितीनिरपेक्ष

आहे. हाती लाठया घेऊन गुंडाप्रमाणे इतस्तत: फिरणे किंवा जातीय दंगे माजविणे हे संघाचे कार्य मुळीच नाही."

"विश्वशांती हेही आमच्यासमोरचे उद्दिष्ट आहे. हे आमचे जीवितकार्य असून ते आम्हांस पुरे केले पाहिजे. आध्यात्मिक जीवनाच्या आधारावर विश्वाला शांतीचे धडे द्यावे आणि संपूर्ण मानवसमूहात एकतेचा भाव निर्माण करावा, हेच आमचे खरे कार्य आहे. पण हे केव्हा शक्य आहे? जेव्हा आपले सांस्कृतिक जीवनतत्त्वज्ञान आत्मसात करून चारित्र्य संपन्न झालेल्या अशा कोटयवधी लोकांना एका सूत्रात गुंफून, त्यांना उच्च ध्येयाच्या प्राप्तीसाठी कटिबध्द करण्यात आपण यशस्वी होऊ तेव्हाच हे शक्य आहे."

ब्रिटिश राजवटीचा अंत, देशाची फाळणी, तीनच वर्षांत स्वतंत्र भारताचे निष्पन्न झालेले चिंताजनक चित्र आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नव्या संदर्भातील भूमिका यासंबंधी बदलत्या परिस्थितीनुसार श्रीगुरूजींना पुढे पुष्कळच बोलावे लागले. कार्यकर्त्यांशी आणि समाजाशीही. त्या संवादाचा प्रारंभ आपल्याला या दौऱ्यांतील विविध भाषणांत दिसतो, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. महात्मा गांधींची हत्या, देशात या दुर्घटनेची झालेली प्रतिक्रिया, सरकारचा संघावरील अन्याय्य रोष, सर्वत्र वाढत असलेली आदर्शहीनता आणि राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गात त्यामुळे निर्माण होणारे अडथळे पाहून श्रीगुरूजींचे चित्त अत्यंत व्यथित झाले होते. व्यक्तिगत मानापमान अथवा गौरवसमारंभ यांत त्यांना मुळीच रूची नव्हती. मिळालेल्या संधीचा लाभ घेऊन विशुध्द राष्ट्रीय विचार लोकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न त्यांनी या भारत-भ्रमणात केला. सर्वत्र ते याच आंतरिक तळमळीने बोलले. संघाच्या मार्गानेच देश सुस्थिर, वैभवशाली आणि सुप्रतिष्ठित करता येईल, हा विश्वास त्यांच्या बोलण्यातून सर्वत्र दिसत होता.

उत्तरेकडील दौऱ्यात दि. ३० ऑगस्ट रोजी दिल्ली येथे मुक्काम असता त्यांनी पंतप्रधान पं. नेहरू यांची भेट घेतली. संघावरील बंदी उठल्यानंतर संघनेत्याची पंतप्रधानांशी ही पहिलीच भेट. स्वाभाविकपणे ती औपचारिक स्वरूपाची झाली. पण यानंतर पुन्हा दि. २३ सप्टेंबरला व २९ नोव्हेंबरला आणखी दोनदा श्रीगुरूजी नेहरूनां भेटले. या दोन्ही भेटी बराच वेळ चालल्या होत्या. देशातील परिस्थितीसंबंधी अभिप्राय दोघांनीही आपआपल्या परीने सांगितला. श्रीगुरूजींनी संस्कृती आणि राष्ट्रवाद, हिंदू नसलेल्यांचे राष्ट्रजीवनातील स्थान, संघकार्याचे स्वरूप आणि उद्देश, सहिष्णुता, हिंसा, अहिंसा इत्यादी विषयांवर मनमोकळेपणाने आपले विचार व्यक्त केले व नेहरूंच्या प्रश्नांना उत्तरे दिली. या भेटी जरी झाल्या, तरी पंतप्रधान नेहरूंचे मत संघासंबंधी कधीच पुरेसे स्वच्छ झाले नाही आणि संघ 'जातीय' (कम्युनल) असल्याचा आरोप ते सतत करीत राहिले, ही दुर्दैवाची गोष्ट होय. नेहरू व श्रीगुरूजी यांच्या भेटी होण्याचे योगही यापुढील काळात फारसे आले नाहीत. श्रीगुरूजींना भेटण्याची नेहरूंना फारशी इच्छाच नव्हती, असे म्हणणे प्राप्त आहे.

पं. नेहरूंचा संघ-विरोध व्यक्त करणारी एक घटना याच सुमारास घडली. संघ-काँग्रेस संबंधाच्या दृष्टीने ती दूरपरिणामीही ठरली. घटना अशी की, संघाच्या स्वयंसेवकांना, सरदार वल्लभभाई पटेल यांनी प्रकटपणे व्यक्त केलेल्या इच्छेनुसार, कॉग्रेसची दारे मोकळी करण्यासाठी हालचाल काँग्रेसमधील काही पुढाऱ्यांनी सुरू केली. या प्रश्नावर काँग्रेस पक्षात दोन तट पडले. राजर्षी टंडन आणि पं. द्वारकाप्रसाद मिश्र हे स्वयंसेवकांच्या काँग्रेसप्रवेशाचे उघड समर्थक होते. गुजरातचे श्री. औंकारप्रसाद ठाकुर यांनी तर टंडन यांच्या मताचे समर्थन करताना एका लेखात म्हटले, "संघाचे शिस्तबध्द स्वयंसेवक काँग्रेसमध्ये

आल्यास काँग्रेसमधील घाण स्वच्छ होऊन जाईल." ही चर्चा चालू असता पं. नेहरू परदेशात होते. ते परत आल्यावर काँग्रेसच्या कार्यकारिणीने एक ठराव संमत केला. या ठरावात म्हटले होते की, संघाच्या स्वयंसेवकांची इच्छा असल्यास ते काँग्रेसमध्ये प्रविष्ट होऊ शकतात. पण एकदा काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर काँग्रेस सेवादलाव्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वयंसेवक संघटनेत ते भाग घेऊ शकणार नाहीत." पं.नेहरूंच्या उपस्थितीत झालेल्या या ठरावाचा अर्थ स्पष्ट होता. अर्थ हाच की, संघाला बाधक न ठरणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षात काम करण्याची मोकळीक जरी संघाच्या घटनेने दिली असली, तरी काँग्रेस पक्षाचा आग्रह मात्र संघाला सोडचिठ्ठी दिल्याविना काँग्रेस पक्षात काम करता येणार नाही, असाच राहिला. पर्यायाने संघाच्या स्वयंसेवकांना काँग्रेस पक्षाची दारे बंद करण्यात आली.

या 'सत्कार-पर्वा'त उपद्रव निर्माण करण्याच्या प्रयत्न विद्वेषी बुध्दीच्या लोकांनी काही ठिकाणी केलाच. मिरज, कोल्हापूर, सांगली वगैरे भागातील दगडफेक, हुल्लडबाजी आणि श्रीगुरूजींना अपाय पोचविण्याचा प्रयत्न यांचा उल्लेख विशेषत्वाने करावा लागेल. कोल्हापूरला तर मोठाच भीषण प्रसंग टळला, यात शंका नाही. श्रीगुरूजी कोल्हापूरला पोचताच त्यांच्याविरूध्द नारेबाजी, पुतळे जाळणे, आक्रमक जमावाच्या वेढयात त्यांना अडकविण्याचा प्रयत्न करणे इत्यादी प्रकार विरोधकांनी केले. पण श्रीगुरूजींच्या जणू हे प्रकार ध्यानीमनीच नव्हते. त्या भीषणतेतही ते सर्वस्वी शांत होते, ठरलेला प्रत्येक कार्यक्रम तत्परतेने पार पाडत होते. देवीच्या दर्शनालाही ते जाऊन आले. नंतर कोल्हापूर ते सांगली असा प्रवास होता. शासनाने श्रीगुरूजीनां कोल्हापूरच्या सीमेपर्यंत लोखंडी जाळया बसविलेल्या गाडीतुन सुरक्षितपणे पोचवून दिले. या गाडीवर दगडफेक झाली व कित्येक मोठमोठ दगड येऊन आदळले.

कोल्हापूरपासून सांगलीपर्यंतचा प्रवास मा. भालजी पेंढारकर यांच्या गाडीतून करावयाचा होता. नित्याप्रमाणे श्रीगुरूजी समारेच्या जागी ड्रायव्हरशेजारी बसले हाते. मा. बाबा भिडेही मागच्या बाजूला होते. वाटेत मिरजेकडुन येणारा एक रस्ता कोल्हापूर-सांगली रस्त्याला येऊन मिळतो. तिथे काही स्वयंसेवक सायकलवर आले व त्यांनी वार्ता दिली की सांगली मार्गावर शेतांमध्ये बराच मोठा जमाव लपून बसलेला आहे व श्रीगुरूजींची गाडी अडविण्याचा व हल्ला करण्याचा त्यांचा इरादा आहे. या स्वयंसेवकांनी सुचविले की, श्रीगुरूजींची मोटार पुढे नसावी. कार्यकर्त्यांची एक बस आधी पुढे न्यावी अशी सूचना पुढे आली. पण श्रीगुरूजींनी ती मानली नाही. शांतपणे त्यांनी सांगितले, "मोटारच पुढे जाईल. तुम्ही काही चिंता करू नका." मोटार येताना पाहताच हल्लेखोर आडवे आले. गाडीचा वेग कमी होईल, ती थांबेल, असे स्वाभाविकपणेच त्यांना वाटले असावे. पण मा. बाबांची ड्रायव्हरला सक्त ताकीद होती की, कोणत्याही परिस्थितीत गाडी थांबवावयाची नाही. गर्दी पाहताच तर त्यांनी ड्रायव्हरला तुफान वेगाने गाडी पुढे नेण्यास सांगितले. अतिशय सुसाट वेगाने आलेल्या गाडीमुळे जिवाच्या भीतीने गर्दी दुतर्फा पांगली आणि क्षणात श्रीगुरूजींची मोटार वेगाने पुढे गेली. हल्लेखोरांना हल्ला करण्याची संधीच मिळाली नाही. श्रीगुरूजींच्या संरक्षणाची सर्व व्यवस्था सांगलीला होतीच. ते सुखरूप पोचलेले पाहून सर्व चिंतामग्न कार्यकर्त्यांचा जीव भांडयात पडला. सांगलीलाही दगडफेक, घोषणा वगैरे उपद्रव काही प्रमाणात झालाच. पण सर्व कार्यक्रम योजल्यानुसार पार पडला. भाषण करताना तर श्रीगुरूजींनी सभोवारच्या परिस्थितीची काही दखलच घेतली नाही. चिंतेची एक रेषाही त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेली नव्हती. सर्वत्र संघाचा विधायक विचार ते जसा मांडत असत, तसाच त्यांनी सांगलीच्या भाषणातही

मांडला. कार्यकर्त्यांना घडलेले श्रीगुरूजींच्या धीरोदात्ततेचे आणि निर्भयतेचे हे दर्शन विलक्षण परिणामकारक तसेच अविस्मरणीय होते.

या प्रकारांमुळे श्रीगुरूजी व्यथित अवश्य झाले, पण त्यांचा शांतपणा ढळला नाही. कोणासंबंधी क्रोधाची भावना त्यांनी मनात येऊ दिली नाही. कोणाला दुषणे दिली नाहीत. या घटनेसंबंधी नंतर 'पुरूषार्थ' मासिकात लिहिलेल्या एका लेखात त्यांनी म्हटले आहे : "आपला म्हणून ज्याला आग्रहाने कवटाळावयाचे, ज्याची सेवा करावयाची, तो हाच आपला समाज आहे. त्याने फुलांच्या माळा घातल्या काय किंवा जोडयांच्या माळा घातल्या काय, तसेच त्याने स्तुती केली काय, निंदा केली काय, शिव्या दिल्या काय, किंबहुना काहीही केले तरी तो आपलाच आहे. परीक्षा घेण्याकरिता म्हणून तो अनेकदा चांगले-वाईट करील, पण ती केवळ परीक्षाच. वास्तविक अंत:करणाने तो आपलाच आहे. आपल्याबरोबर तो येईल. इतकेच काय तो आपल्या अलौकिक निष्ठेमुळे आपला अनुयायी बनून सतत मागे येईल. समाज हा परमेश्वराचे स्वरूप आहे व परमेश्वराने सांगूनच ठेवले आहे की, मी भक्तांचा दास आहे. आपण खरे भक्त होण्याची आवश्यकता आहे."

आध्यात्मिक परंपरा असलेल्या हिंदूंतील भक्तिभावनेला सामाजिक कर्तव्यपूर्तीची दिशा देण्याचा असा अखंड प्रयास श्रीगुरूजींनी केला. त्यासाठी स्वत:च्या सेवामय जीवनाचा आदर्श लोकांपुढे ठेवला. संघबंदीच्या विपरीत काळात किंवा बंदी उठल्यानंतरच्या जल्लोषपूर्ण सत्कारपर्वात त्यांनी आपल्या चित्ताचे समत्व कधीच ढळू दिले नाही. या तात्पूरत्या गोष्टीत न गुरफटता संघाच्या खऱ्या जीवनकार्याकडे स्वयंसेवकांचे आणि समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न त्यांनी प्रत्येक उपलब्ध माध्यमातून केला.

सत्कार-समारंभांची धामधूम चालू असतांनाच दैनंदिन चालणाऱ्या शाखांची आणि स्वयंसेवकांवरील योग्य संस्कारांची व्यवस्था पुन्हा नीट निर्माण करण्याची निकड श्रीगुरूजींना जाणवत होती. अनेकांच्या मनात अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण झाले होते. सगळयांची संघविचार आणि संघाची कार्यपध्दती यांवरील श्रध्दा मजबूत करण्याची आवश्यकता त्यांना भासत होती. म्हणून १९४९ च्या ऑक्टोबर महिन्यात काही दिवस नागपूर येथे मुक्काम असता, कार्यकर्त्यांपुढे ओळीने पाच दिवस (दि. १८ ते २२) त्यांनी आपले मूलगामी विचार मांडले. या विचारमंथनाचे प्रयोजन सांगताना श्रीगुरूजी म्हणाले, "अनेकांच्या अंत:करणात अशी शंका उत्पन्न होत असावी की, आता आपल्या देशाची परिस्थिती बदललेली आहे व या बदललेल्या परिस्थितीत पूर्वीच्याच पध्दतीने काम करण्याची काही आवश्यकता आहे काय? या प्रश्नाचा आपण खरोखरीच विचार केला पाहिजे." या भाषणमालिकेत स्वयंसेवक आणि कार्यकर्ते यांच्या मनातील उलट-सुलट विचारांचा अचूक वेध श्रीगुरूजींनी घेतला. त्या विचारांचे सगळे पापुद्रे अत्यंत सहानुभूतिपूर्वक उलगडून पुढे ठेवले आणि संघकार्याला पर्याय नाही, हा ठाम निष्कर्ष सांगितला. बंदीकाळानंतर संघाची वैचारिक दृष्टया पुन्हा नीट घडी बसवून कार्यप्रेरणा प्रखर करण्याचे जे अवघड काम श्रीगुरूजींनी तुरूंगातून मुक्तता झाल्यानंतर द्रष्टेपणाने सुरू केले, त्याचा हा केवळ प्रारंभ होता. या कार्यासंबंधी पुढे अधिक विस्ताराने लिहावे लागणार असल्याने येथे अधिक तपशीलात शिरण्याचा मोह टाळणे इष्ट. एवढे मात्र अवश्य म्हणावयास हवे की, इंग्रजी सत्ता गेल्यामुळे परिस्थितीत झालेला बदल लक्षात घेऊन स्वातंत्र्याच्या संदर्भात संघाचा जो ध्येयवाद श्रीगुरूजींनी त्या काळात नि:संदिग्धपणे प्रतिपादन केला, त्याच आधारावर संघ आज उभा आहे. तोच जीवनरस घेऊन संघाचा वटवृक्ष विस्तार पावला आहे.

## ११. सेवाकार्यांच्या  आघाडीवर

इ.स. १९५० चा पूर्वार्ध. देशाचे विभाजन होऊन सुमारे तीन वर्षे उलटली होती. श्रीगुरूजींनी प. बंगाल राज्याचा दौरा केला होता आणि या दौऱ्यात जे पाहिले, ऐकले आणि अनुभवले, त्यामुळे त्यांच्या अंत:करणाचे पाणी पाणी होऊन गेले होते. पाकिस्तानच्या निर्मितचा करार करताना भारतीय नेत्यांनी त्या भागात अल्पसंख्येने असलेल्या आपल्या हिंदू बांधवांच्या भवितव्याचा काहीच विचार केला नाही. केवळ मोघम आशावादावर ते विसंबून राहिले. पश्चिम पाकिस्तानातून विस्थापित हिंदू बांधवांचे प्रचंड लोंढे आले आणि त्यांची व्यवस्था लावण्यात संघाने संपूर्ण सहकार्यही दिले. पूर्व पाकिस्तानात दीड कोटी हिंदू राहिले होते. त्यांचा छळवाद सुरूच होता. अखेर ही ससेहोलपट एवढी पराकोटीला गेली आणि हिंदूंचे जीवन एवढे असुरक्षित झाले की, लक्षावधी लोक प. बंगालमध्ये येऊन लोटू लागले. अनन्वित यातनांना तोंड देण्याची पाळी त्यांच्यावर आली. भारत सरकारच्या दृष्टीने ते 'विदेशी' निर्वासित! धर्मांतर, मृत्यू, वा भारताचा आश्रय याविना अन्य पर्याय उरला नाही तेव्हा धर्मत्याग न करता ते भारतात आले. पूर्व पाकिस्तानात त्यांना सुरक्षितता लाभावी म्हणून काही पाऊल भारत सरकार उचलीत नव्हते किंवा लोकसंख्येच्या अदलाबदलीची भाषाही बोलत नव्हते. ज्यांना अवाक्षराने न विचारता एका फटक्यासरशी मातृभूमीपासून तोडून टाकले, परदेशी बनविले, त्यांच्या जीवितवित्ताची, अब्रूची आणि स्वाभिमानाची काही चाडच बाळगावयास आपले नेते तयार नव्हते. समस्या एवढी प्रचंड आणि उग्र होती की सरकारी पातळीवरूनच तिचा निराश शक्य. पण हिंदू समाजासंबंधी जी सहज आणि उत्कट आत्मीयता श्रीगुरूजींच्या ठायी होती, ती त्यांना सरकारच्या तोंडाकडे पाहत स्वस्थ बसू देईना. भारतातील लोकांनी आपल्या विस्थापित बांधवांच्या साहाय्यार्थ अग्रेसर व्हावे, अशी हाक श्रीगुरूजींनी दिली. सेवेचे हे कार्य करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पुढाकाराने 'वास्तुहारा सहायता समिती' ची स्थापना करण्यात आली. संघाच्या समाजप्रेमाचा हा स्वाभाविक आविष्कार होता. फाळणीपूर्वी, फाळणीनंतर आणि प्रत्येक मोठया आपत्तीच्या वेळी तो आविष्कार आजतागायत सतत होत आलेला आहे.

पूर्व पाकिस्तानातील हिंदूंची भीषण अवस्था, तेथून येणाऱ्या लोकांची दुर्दशा व आपले कर्तव्य यासंबंधात एक निवेदन श्रीगुरूजींनी लगेच प्रकट केले. कलकत्त्यावरून दिल्लीला पोहोचल्यानंतर ७ मार्चला ते त्यांनी प्रसिध्दीस दिले. 'वास्तुहारा सहायता समिती' ची स्थापना दि. ८ फेब्रुवारीलाच झाली होती. समितीतील कार्यकर्त्यांना नि:स्वार्थ सेवेचा महामंत्र श्रीगुरूजींनी दिला होता. पण प. बंगाल, आसाम किंवा ओरिसा या भागांत संघाचे कार्य अत्यंत मर्यादित स्वरूपाचे होते. समस्या तर प्रचंड, राष्ट्रीय स्वरूपाची आणि सरकारी कारवाईची अपेक्षा करणारी होती. म्हणून दिल्लीहून केलेल्या आवाहनात सरकारने द्विधा मनोवृत्ती सोडून निर्णायक उपाययोजना करावी, असे त्यांनी आग्रहपूर्वक म्हटले होते. या आवाहनाचा काही भाग असा : "अनिश्चितता, द्विधा मनोवृत्ती आणि दुर्बलता याच गोष्टी जर वाढत राहिल्या तर दीड कोटी निष्पाप व निर्दोष भारतीयांच्या विनाशाचे पाप भारत सरकारच्या माथी बसेल आणि त्याची प्रतिष्ठा मातीमोल होईल. सांप्रदायिकतेच्या गर्तेत पडण्याचे भय न बाळगता, पोलिस कारवाई असो की पाकिस्तानमधल्या हिंदूंची समस्त भारतातील मुसलमानांच्या बरोबरीने केली जाणारी अदलाबदल असो, अशी काहीतरी निश्चित पावले त्वरित आणि तत्परतेने पडायला हवीत, की जेणेकरून आमचे जिवलग, आमच्या रक्तामांसाचे दीड कोटी बंधू वाचू शकतील आणि

भविष्यकाळात सन्मानपूर्वक सुखमय जीवन जगू शकतील. याबरोबरच मी आपल्या देशवासियांना विनंती करतो की, त्यांनी आपला उद्वेग संयमित रीतीने व्यक्त करावा. ज्यायोगे शांतताभंग होऊ शकेल किंवा आमच्या सरकारच्या मार्गात अडचणी उपस्थित होतील, असे काही करू नये."

या निवेदनाला वृत्तपत्रांनी चांगली प्रसिध्दी दिली. त्यानंतर दि. १४ मार्च रोजी नागपूरहून आणखी एक आवाहन श्रीगुरूजींनी प्रसिध्द केले. त्यात देशातील जनतेला विस्थापितांच्या साहाय्यासाठी मदतीचा हात पुढे करण्याची कळकळीची विनंती आहे. त्यांनी जनतेला जाणीव दिली की, "ही तर सरकारची जबाबदारी आहे असा विचार करून निष्क्रिय बसून राहणे भारतीयांना कधीही शोभा देणारे नाही. समाजाने देखील आपली सगळी शक्ती एकवटून सरकारचा कार्यभाग हलका केला पाहिजे." देशाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आणि लोकांची दु:खे दूर करण्यासाठी सरकार काही प्रयत्न करीत असेल, तर त्यात अडथळे उपस्थित करण्याची भूमिका श्रीगुरूजींनी कधीच अंगीकारली नाही. प्रश्न विस्थापितांचा असो, संघबंदीचा असो, राज्य पुनर्रचनेचा असो, नैसर्गिक आपत्तीचा असो की परकीय आक्रमणाच्या संकटाचा असो, सरकार विरोध हे श्रीगुरूजींच्या धोरणाचे सूत्र कधीच नव्हते. देशभक्ती, लोककल्याण आणि राष्ट्रीय एकात्मतेचे पोषण यांचा निकष वापरूनच ते योग्य मार्गदर्शन करीत. पूर्व पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांच्या कहाण्या आतडे पिळवटून टाकणाऱ्या होत्या आणि त्या ऐकताना चित्त प्रक्षुब्ध होणे अगदी स्वाभाविक होते. पण अतिरेकी प्रतिक्रियेला उत्तेजन श्रीगुरूजींनी कधी दिले नाही. सगळयांनी संयम राखून विधायक दृष्टीने या प्रश्नाची सोडवणूक करावी, असे त्यांनी पुन:पुन्हा सांगितले. सरकारी पातळीवरून योजावयाचे सर्व उपाय सरकारने निर्भयपणे योजावेत आणि जनतेनेही आपल्या बांधवांना संघाच्या माध्यमाने जास्तीत जास्त साहाय्य करावे, अशी रास्त भूमिका श्रीगुरूजींनी अंगीकारली. या सुमारास त्यांनी केलेल्या भाषणात आपल्या राष्ट्रनेत्यांनी पूर्व पाकिस्तानातील दीड कोटी निरपराध हिंदूंना तोंडघशी पाडले, याबद्दल प्रखर टीका आढळते. फाळणीचा निर्णय श्रीगुरूजींना नापसंत होता आणि ही नापसंती त्यांनी कधी लपवून ठेवली नाही. प्रथम प्रथम तर पाकिस्तानचा स्वतंत्र राष्ट्र या नात्याने उल्लेख करणेही त्यांच्या मातृभक्त अंत:करणाला जड जात असे.

रा. स्व. संघाची प्रत्यक्ष ताकद भारताच्या पूर्वेकडील या भागात कमी होती, तरी संघस्वयंसेवकांनी नि:स्वार्थ सेवाकार्याचा उत्कृष्ट आदर्श आपल्या अविश्रांत परिश्रमांतून लोकांपुढे ठेवला. श्रीगुरूजींच्या आवाहनाचा परिणाम म्हणून देशभरातन पैसा, वस्त्रे, अन्नधान्य, जीवनोपयोगी साहित्य यांचा ओघ वास्तुहारा साहाय्यता सामितीच्या दिशेने वाहिला. पूर्व पाकिस्तानातील उग्र अत्याचार सुमारे एक वर्षपर्यंत चालू होते. आणि विस्थापित हिंदू बांधवांचा लोंढा सतत प. बंगालच्या दिशेने लोटत होता. या विस्थापितांसाठी शिबिरे उभारणे, त्यांना अन्न-वस्त्र आणि भांडीकुंडी पुरविणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, उपजीविकेची साधने मिळवून देणे आणि मुलांसाठी शिक्षणसंस्था चालविणे वगैरे विविध प्रकारचे काम समितीने सतत चालू ठेवले होते. समितीच्या प. बंगाल आणि आसाममधील शिबिरांत ८० हजारांना आश्रय मिळाला, दीड लक्ष लोकांच्या कपडयांची तरतूद करण्यात आली आणि एक लाखाहून अधिक लोकांना धान्य, दूध आदींचा पुरवठा करण्यात आला, असे समितीच्या १९५१ मधील अहवालात म्हटले आहे. सुमारे पाच हजार संघस्वयंसेवक यासाठी अहर्निश राबत होते.

या काळातील एक उल्लेखनीय गोष्ट अशी की, संघबंदी उठल्यापासून गृहमंत्री सरदार पटेल श्रीगुरूजींना विश्वासात घेऊन देशाच्या परिस्थितीसंबंधी त्यांच्याशी बोलत असत. श्रीगुरूजीही विशेष

काही घडल्यास संघाची भूमिका सरदार पटेलांना कळवीत असत. पूर्व पाकिस्तानातून येणाऱ्या विस्थापितांचा प्रश्न उग्र आणि प्रक्षोभक बनला तेव्हा देशात त्याच्या प्रतिक्रिया उमटू लागला. श्रीगुरूजींनी दि. ५ एप्रिल रोजी सरदारांना पत्र लिहून संघाची भूमिका स्पष्ट केली. "आपल्या देशात कोणत्याही प्रकारे शांतता भंग होणे अनिष्ट आहे. परिस्थितीचा लाभ घेऊन सरकारविरूध्द भावना भडकावणेही अनुचित आहे. हेच आमचे धोरण आहे व या धोरणानुसार आम्ही शांततापूर्वक पीडितांची सेवा करीत आहोत." असे श्रीगुरूजींनी आपल्या पत्रात लिहिले होते. हे पत्र पाठविल्यानंतर श्रीगुरूजी स्वत: दिल्लीला गेले त्यावेळी, म्हणजे दि. १२ एप्रिलला, त्यांनी सरदारांची प्रत्यक्ष भेट घेऊन वास्तुहारा साहायता समितीच्या कार्याची माहिती त्यांना दिली. सरदारांनी या सेवाकार्याबद्दल समाधान व्यक्त केले, एवढेच नव्हे तर पुर्वेकडे संघकार्याचा अधिक विस्तार व्हावा अशी शुभेच्छा देखील व्यक्त केली. १९५० च्या एप्रिल महिन्यातच दि. ३० रोजी दिल्लीच्या आनंदपार्क मैदानावर एक हृद्य सोहळा होऊन दिल्लीतील संघप्रेमी नागरिकांनी संघकार्यासाठी श्रीगुरूजींना एक लक्ष, एक हजार एकशे एक रूपयांची थैली अर्पण केली. महाशय कृष्ण हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. "संघाला केवळ पैसा देऊन समाधान मानू नका, तर स्वत: संघमय बना" असे आवाहन या प्रसंगी संघाच्या हितचिंतकांना उद्देशून श्रीगुरूजींनी केले.

वास्तुहारा सहायता समितीचे काम करण्यात कार्यकर्ते गुंतलेले असतानाच, त्यांच्या सेवाशीलतेची कसोटी पाहणारा एक प्रसंग निसर्गाच्या अवकृपेने निर्माण झाला. आसामला दि. १५ ऑगस्ट रोजी भूकंपाचा जबरदस्त धक्का बसला आणि हजारो लोकांचे जीवन काही क्षणांतच उद्ध्वस्त होऊन गेले. भूकंपाचा परिणाम म्हणून ब्रह्मपुत्रा नदीने आपला प्रवाहच बदलल्याने आकांतात अधिकच भर पडली. घरे कोसळणे, जमिनीत दहाबारा फूट रूंदीच्या खोल भेगा पडले, नद्यांवरील पूल खचणे असे प्रकार सर्वत्र घडून आले. कोटयवधी रूपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले. या भूकंपपीडितांच्या साहाय्यासाठीही संघाचे स्वयंसेवक तत्परतेने धावून गेले. संघातर्फे "भूकंपपीडित सहायता समिती" स्थापन झाली. न्या. मू. कामाख्याराम बरूआ हे या समितीचे अध्यक्ष होते. श्रीगुरूजींनी पत्र लिहून संपूर्ण शक्तीनिशी सेवाकार्यात उतरा, असा उत्तेजनपर संदेश स्वयंसेवकांना पाठविला. थोडयाच दिवसांनी, म्हणजे सप्टेंबर महिन्यात श्रीगुरूजी या सहाय्यता कार्याचे निरीक्षण करण्यासाठी जातीने आसामात गेले. या प्रवासातही त्यांनी समाजापुढे स्वावलंबनाचा विचार प्रामुख्याने ठेवला. "समाज जर संघटित आणि अनुशासनयुक्त असेल, तर स्वत:च तो अनेक गंभीर संकटांना तोंड देऊ शकतो." ही श्रीगुरूजींच्या मार्गदर्शनाची दिशा होती. प्रत्येक वेळी सरकार किंवा बाहेरची मदत यावर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती श्रीगुरूजींना पसंत नव्हती. तसेच एक स्वयंसेवक दल म्हणून अलगपणे संघाने सेवेचे काम करावे, अशीही त्यांची कल्पना नव्हती. संघाच्या स्वयंसेवकांनी समाजाचे घटक या नात्याने आणि समाजातील लोकांच्या जास्तीत जास्त व्यापक सहकार्याने सेवेची कामे पार पाडावी, असे ते सांगत. भूकंपपीडित लोकांना देण्यात येणाऱ्या साहाय्याचे निरीक्षण केल्यानंतर एक प्रकट निवेदन करून स्वयंसेवकांच्या कामाचे त्यांनी कौतुक केले. स्वयंसेवकांनी आपला जीव धोक्यात घालून नद्या ओलांडल्या आणि पुराने वेढलेल्या खेडयांत अन्नवस्त्र आदींचा पुरवठा केला या गोष्टीचा विशेष उल्लेख श्रीगुरूजींच्या निवेदनात आहे. अलीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आंध्रातील चक्रीवादळ, मोरवीची धरणफूट, महाराष्ट्रातील दुष्काळ वगैरे अनेक आपत्तींत केलेले सेवाकार्य सगळयांना परिचित आहेच. सेवाकार्याची संघातील परंपरा नवी नाही हे ध्यानात यावे, एवढयापुरताच १९५० मधील प्रमुख सेवाकार्यांचा आणि त्यांत श्रीगुरूजींनी स्वत: जे लक्ष घातले त्याचा उल्लेख येथे केला आहे. १९५२ साली

बिहारमध्ये, आंध्रातील रायलसीमा भागात व महाराष्ट्रात जो भीषण दुष्काळ पडला, त्यावेळीही संघाने मोलाचे साहाय्यता कार्य केले होते. केव्हाही आपत्ती आली की, साहाय्यार्थ धावाधाव करण्याची पाळी यावी, याचे श्रीगुरूजींना वाईट वाटे. त्यांची भावना एप्रिल १९५० मध्ये लिहिलेया एका पत्रात व्यक्त झाली आहे. ते लिहितात : " काहीही घडले की मदतीसाठी आवाहन करण्याची आवश्यकता भासावी, अशी परिस्थिती नेहमीकरताच असणे ही दुर्देवाची गोष्ट आहे. आपल्या देशाला कलंकभूत अशी ही परिस्थिती आहे. अशी परिस्थिती निर्माण होऊच नये, यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे."

१९५० साल सरत आले असतानाच देशाच्या दृष्टीने एक अतिशय दु:खद घटना घडली. दि. १५ डिसेंबर रोजी गृहमंत्री सरदार पटेल यांचे देहावसान झाले. श्रीगुरूजी आणि संघ यांच्यासंबंधी केवढी आस्था सरदारांच्या मनात निर्माण झाली होती, याचा उल्लेख यापूर्वी केलाच आहे. योगायोग असा की संघाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाची बैठक नागपूर येथे चालू असतानाच  हे व्यथित करणारे वृत्त येऊन थडकले. बैठकीत लगेच दुखवटयाचा ठराव संमत करण्यात आला आणि बैठक स्थगित केली गेली. सरदारांचे राष्ट्रजीवनांतील स्थान आणि त्यांच्याशी असलेला स्नेहसंबंध लक्षात घेता, त्यांच्या अंत्यदर्शनासाठी मुंबईला जाण्याची उत्कट इच्छा श्रीगुरूजींना झाली. मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री श्री. रविशंकर शुक्ल यांच्या विमानातूनच ते मुंबईला गेले व संघाच्या वतीने त्यांना सरदारांच्या पार्थिव देहाला पुष्पहार समर्पित केला. सरदारांच्या मृत्यूनंतर प्रकट केलेल्या शोकसंदेशात श्रीगुरूजींनी म्हटले होते, "त्यांचा मृत्यू म्हणजे राष्ट्रावर एक भीषण आघात आहे. त्यांचे ज्यांच्यावर नितांत प्रेम होत व ज्यांच्यासाठी ते जगले त्या आपण सर्व लोकांचे कर्तव्य आहे की देशाला बलसंपन्न बनवून बाह्य आक्रमणे व अंतर्गत कलह यांपासून राष्ट्राचा बचाव करण्यासाठी कटिबध्द व्हावे. त्यांचे कार्य पूर्ण करावे. भारतमातेच्या या महान सुपुत्राला हीच खरी श्रध्दांजली ठरेल."

तुरूंगातून सुटल्यानंतरचा सुमारे दीड वर्षांचा काळ असाच गेला. कुठे सत्कार, कुठे दगडफेकीने स्वागत, कुठे विस्थापितांची व नैसर्गिक आपत्तींनी पीडिलेल्यांची निरपेक्ष सेवा, तर कुठे संघकार्याच्या भक्कम उभारणीसाठी वैचारिक तशीच कार्यक्रमात्मक प्रेरणा देण्यासाठी प्रयास. सगळया हालचालींत सूत्र मात्र एकच : आपले हे हिंदूराष्ट्र येथील सांस्कतिक आदर्शाच्या आधाराने बलशाली, गुणसमृध्द आणि परमवैभवसंपन्न बनवावयाचे आहे. दु:खितांच्या दु:खांचा परिहार करावयाचा आहे आणि स्नेहभावनेने राष्ट्रीय दायित्वाच्या पूर्ततेसाठी सगळयांना कार्यप्रवृत्त करावयाचे आहे. विविधतेतील एकता हा श्रीगुरूजींच्या प्रतिपादनातील एक महत्वाचा विषय असे. त्यांच्या कार्यमग्नतेसंबंधी म्हणता येईल की, नाना प्रकारच्या कामांत ते गुंतलेले असत, पण त्यांची प्रेरणा मात्र एकच असे. सगळी कामे विराट समाजपुरूषाच्या चरणीच समर्पित होत. तेच त्यांनी त्यांचे एकमेव उपास्य दैवत केले होते.

श्रीगुरूजींच्या या सर्व उद्योगात राजकीय सत्तेच्या स्पर्धेपासून संघाला अलिप्त ठेवण्याचा तसेच स्वत:देखील त्यापासून दूर राहण्याचा कटाक्ष त्यांनी बाळगला. भारताची राज्यघटना १९५० साली (२६ जानेवारी) अंमलात आली. आणि त्या घटनेनुसार स्वातंत्र्यातील पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५२ साली व्हावयाची होती. एकीकडे संघाचे सत्तानिरपेक्ष कार्य वाढविण्याचा आणि देशबांधवांची सेवा करण्याचा भगीरथ उद्योग श्रीगुरूजी अहर्निश करीत होते, तर दुसरीकडे राजकीय पक्ष निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी तयारीला लागले होते. प्रचाराचे वातावरण तापत होते. या प्रचाराची धामधूम, आरोप-प्रत्यारोप इत्यादी गोष्टी श्रीगुरूजींच्या चित्ताला व्यथा देणाऱ्या होत्या. या वातावरणात न गुरफटता, निवडणूक ज्वर नाहीसा होईपर्यंत, शांततेने काळ कंठण्यासाठी ते पुण्यानजीक सिंहगडावर

जाऊन राहिले. ज्या वास्तूत लोकमान्य टिळक अधूनमधून राहत असत त्याच वास्तूत श्रीगुरूजींचा मुक्काम होता. २५ डिसेंबर १९५१ ते १८ जानेवारी १९५२ असे २५ दिवस ते गडावर होते. या दिवसांचा उपयोग श्रीगुरूजींनी कशाप्रकारे केला, ते पाहण्यासारखे आहे. गीता, उपनिषदे आणि अन्य मौलिक ग्रंथांचे पुन्हा वाचन, मनन, चिंतन त्यांनी केले. सोबतच्या मंडळीसह ज्ञानेश्वरीच्या एका अध्यायाचे वाचन दररोज होत असे. सकाळ-सायंकाळ गडावर एक रपेट होई. ध्यानधारणेलाही पुरसो वेळ मिळत असे. श्रीगुरूजी अर्थातच भावी कार्यवाढीचा विचार करीत असत. पण त्यांचे चित्त अतिशय प्रसन्न होते आणि स्वत:साठी कशाचीही अपेक्षा नसल्याने आंतरिक आंनदानुभूतीने ते तृप्त होते. मकर-संक्रमणाच्या उत्सावात ते गडावरच असल्याने गडावर राहणाऱ्या सर्वांना त्यांनी मोठया प्रेमाने आपल्या निवासस्थानी निमंत्रित केले. त्यांना तिळगूळ दिला. त्यांची आत्मीय भावनेने चौकशी केली.

श्रीगुरूजी निवडणुकीच्या कोलाहलापासून दूर शांत वातावरणात जाऊन राहिले, तरी निवडणुकीत संघाची भूमिका काय, हा प्रश्न विचारला जात होताच. संघाचे वयात आलेले स्वयंसेवक हे दशाचे नागरिक आणि मतदार असल्यामुळे, त्यांना संपूर्ण अलिप्तता धारण करणे शक्यच नव्हते, तशी संघाची अपेक्षाही नव्हती. म्हणून यावेळी संघाची भूमिका सरकार्यवाह श्री. भय्याजी दाणी यांनी सांगितले की, "संघाचे स्वयंसेवक राष्ट्रीय संस्कारात वाढलेले आहेत म्हणून त्यांनी क्षुद्र, संकुचित आणि सांप्रदायिक संघर्ष निर्माण होऊ देऊ नये. तसेच केवळ द्वेषमूलक आणि विध्वंस करणारांचे सहाय्यक न होता नि:स्वार्थ आणि देशाचे खरे हित पाहणारांनाच निवडून द्यावे."

निवडणुकीने तप्त झालेले वातावरण निवळताच श्रीगुरूजींनी पुनश्च भारत-भ्रमणाला आणि संघाच्या स्नेहमूलक तसेच ऐक्यवर्धक विचार सर्वत्र पोचविण्याच्या आपल्या कार्याला पूर्ववत प्रारंभ केला.

## १२. गोहत्याविरोधी अभियान

१९५२ च्या सप्टेंबर महिन्यात नागपूर येथे रा. स्व. संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेची बैठक झाली आणि या बैठकीतील एका ठरावाने संघापुढे एक विशाल राष्ट्रव्यापी अभियान तडीस नेण्याचे काम उभे ठाकले. हा ठराव होता गोवधबंदीविषयक. त्यासंबंधी या प्रकरणात जरा विस्ताराने माहिती द्यावयाची आहे. पण तत्पूर्वी बैठकीतील आणखी एक ठराव आणि श्रीगुरूजींच्या महत्वपूर्ण सहभागाने संपन्न झालेला पुण्यातील एक ऐतिहासिक कार्यक्रम यासंबंधी थोडे लिहावयास हवे.

अ.भा. प्रतिनिधी सभेचा दुसरा प्रमुख ठराव 'स्वदेशी' संबंधी होता. परदेशी राज्यकर्ते देशातून निघून गेल्यानंतर सुमारे ५ वर्षांनी स्वदेशीसंबंधीचा ठराव संघाने करण्याचे कारण काय, असा प्रश्न अनेकांच्या मनात येणे स्वाभाविक आहे. त्यावेळीही हा प्रश्न उपस्थित झाला असावा. केवळ संघाचाच विचार केल्यास प्रथमपासून संघ स्वदेशीचा कडवा पुरस्कर्ता होता. काँग्रेस पक्षानेही महात्माजींच्या नेतृत्वाखाली स्वदेशीचे व्रत स्वीकारले होते. टिळक युगात तर स्वातंत्र्य आंदोलनाच्या चतु:सूत्रीत स्वदेशीला स्थान होते. डॉक्टर हेडगेवार यांनी संघाच्या विचारांपासून तो आचारापर्यंत स्वदेशी 'स्पिरिट' चाच आविष्कार केला होता. संघाचा राष्ट्रविचार स्वदेशी, ध्वज स्वदेशी, उत्सव स्वदेशी, संघाचे शारीरिक शिक्षण स्वदेशी, त्याची प्रार्थना स्वदेशी आणि त्याची माणसे जोडण्याची व संस्कारित करण्याची सगळी प्रणालीही स्वदेशीच. डॉक्टरांचा या बाबतीत फार कटाक्ष होता. परदेशी कापडाचे वस्त्र त्यांनी कधी परिधान केले नाही की आयात विचारप्रणालीच्या आहारी ते कधी गेले नाहीत. आपल्या कार्याला पोषक ठरणाऱ्या इंग्रजी पध्दतींचा स्वीकार तात्पुरता करण्यात ते कचरले नाहीत, पण त्यात न्यूनगंड वा मानसिक गुलामीचा अंशही कधी नव्हता. पुढे तर इंग्रजी आज्ञा, पाश्चात्य पध्दतीचा घोष-विभाग वगैरेंची जागाही स्वदेशी पध्दतींनीच घेतली. श्रीगुरूजींनी स्वदेशी विचारांचा संस्कार स्वतंत्र राष्ट्रजीवनाच्या संदर्भात अधिक ठोसपणे स्वयंसेवकांवर केला. पण सभोवारच्या वातावरणातून मात्र स्वदेशीचा आग्रह स्वातंत्र्यानंतर झपाटयाने लुप्त होत चालला होता. स्वदेशीचा अतिरेकी आणि विक्षिप्त भासणारा आग्रह नसावा हे श्रीगुरूजींनाही मान्य होते. वाळुचे घडयाळ गळयात बांधून हिंडणे अव्यवहार्य आहे, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. परंतु याचा अर्थ आपला पीळ सैल व्हावा असा नाही. स्वदेशीच्या ठरावाची भूमिका सांगताना श्रीगुरूजी म्हणाले, "स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी विदेशी शासकांसंबधी घृणा असल्यामुळे लोकांना स्वदेशी वस्तूचे सहज आकर्षण वाटत असे. पण इंग्रज गेल्यावर विदेशी वस्तूंचा वापर एकदम वाढला कारण पूर्वीची स्वदेशी भावना म्हणजे इंग्रज-विरोधाचेच एक स्वरूप होते. विशुध्द आणि भावात्मक राष्ट्रप्रेमाचा आधार त्या स्वदेशीच्या प्रेमाला नव्हता." संघाच्या ठरावात स्वयंसेवकांना जागृत राहून लोकांत स्वदेशीच्या भावनेचा प्रसार करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच स्वत: स्वदेशीचे दृढ व्रत घ्यावे आणि लोकांनाही तसे करण्यास प्रवृत्त करावे, असा आदेश स्वयंसेवकांना देण्यात आला आहे. स्वदेशीचे प्रेम हा राष्ट्राचा स्थायीभाव असला पाहिजे, असे श्रीगुरूजी म्हणत. लहानसहान गोष्टींतही हा भाव व्यक्त व्हावा अशी त्यांची अपेक्षा असे. विवाहसमारंभाचा परदेशी थाट त्यांना आवडत नसे. नवरा मुलगा जर भारतीय पोषाखात लग्नाला उभा न राहता सूट, बूट आणि टाय लावून उभा राहणारा असेल, तर ते अशा लग्नाला जाण्याचेही टाळत असत. एकदा तर लग्नमंडपातील सगळे नखशिखांत विदेशी वातावरण पाहून ते तसेच निघून गेल्याचेही उदाहरण घडले आहे. लग्नपत्रिका वा अभिनंदन संदेश यांतील इंग्रजीचा अनाठायी वापर देखील त्यांना रूचत नसे. मानसिक

गुलामीपायी होणाऱ्या अंधळया परानुकरणाची त्यांना चीड असे. परदेशातील स्त्री-सौदर्यांच्या स्पर्धांचे अनुकरण करून 'मिस-इंडिया' ची निवड होऊ लागली तेव्हा आपली नापसंती व्यक्त करताना ते म्हणाले होते. "We really miss India in this whole affair." सामाजिक जिवंतपणा, उत्साह, एकमेकांवरील विश्वास, प्रेम आणि आनंद इत्यादी गुणांचा परिपोष परदेशात काही काळ राहून परतणारांनी येथेही करावा. अशी मात्र त्यांची अपेक्षा असे.

श्रीगुरूजींना हिंदू समाजावर होणाऱ्या पाश्चात्य उपभोगवादी आणि वासनातृप्तीमागे धावण्यास शिकविणाऱ्या जीवनशैलीचे आक्रमण अगदी नकोसे वाटे. स्वत्व विसरून अशी मानसिक गुलामी हिंदूंनी स्वीकारू नये, अशी त्यांची भावना होती. म्हणून हिंदू जीवनपध्दतीचा आग्रह ते धरीत. खाणे-पिणे, सणसमारंभ, वेषभूषा, बोलणेचालणे इत्यादी सर्व बाबतीत स्वदेशी वळणाचा आग्रह त्यांनी कितीदा तरी व्यक्त केला. या आग्रहीपणावर आक्षेप घेणारांना त्यांची उत्तरेही बरेचदा अगदी तिखट असत. संघर्षाचा प्रसंग आल्यास धोतर सावरता सावरताच पुरेवाट होईल असा आक्षेप घेणारांना ते स्पष्टपणे सांगत, "हे पहा, आम्ही हिंदू शांतताप्रिय लोक आहोत. ऊठसुट भांडणे व मारामाऱ्या गृहीत धरून मग सोयीचा वेश आम्ही ठरविलेला नाही. पण संघर्षाची वेळ आलीच तर हिंदू माणुस कंबर कसून अनुपम शौर्य प्रकट करू शकतो, हे विसरू नका."

त्यांना मनापासुन वाटायचे की कपडयांची, चालीरीतींची, भाषेची गुलामी अशोभनीय व सर्वस्वी अनावश्यक मर्यादेपर्यंत वाढली आहे. मी स्वत: श्रीगुरूजींना फुलपँट घातलेल्या स्वरूपात कधी पाहिलेले नाही. पण असे सांगतात की बनारस हिंदू विद्यापीठात प्राध्यापक असताना ते फुलपँट वापरत असत. मात्र, फुलपँटमुळे बसण्या-उठण्याच्या काहीही मर्यादा ते पडू देत नसत. खुशाल कुठेही मांडी घालून बसत व इस्त्री अथवा धूळ यांची चिंता करीत नसत. जेवणाच्या एका प्रसंगाची डॉ. श्री. भा. वर्णेकर यांनी सांगितलेली आठवण तर त्यांच्या स्वदेशी आणि स्वाभिमानी वृत्तीवर उत्तम प्रकाश टाकणारी आहे. मद्रास येथे विश्व हिंदू परिषदेच्या विद्यमाने एक विद्वत्-परिषद भरली होती. अनेक विद्वान व साधुसंत या परिषदेसाठी एकत्र आले. समारोपाच्या दिवशी सर्वांचे एकत्र भोजन एक मंगल कार्यालयात आयोजित केले होते. भोजनाची तयारी नीट झालेली आहे की नाही हे पाहण्यासाठी श्रीगुरूजी जरा लवकरच कार्यालयात गेले. त्यांना दिसले की टेबले खुर्च्या मांडुन पाश्चात्य पध्दतीने जेवणाचा थाट केलेला आहे. श्रीगुरूजी अत्यंत नाराज झाले. त्यांनी कार्यालयाच्या व्यवस्थापकांना विचारले, "तुमच्याकडे पाट नाहीत काय?" व्यवस्थापक म्हणाले, "अहो, एका वेळी अनेक लग्नांच्या पंगती उठू शकतील इतके पाट आहे." श्रीगुरूजींनी सूचना दिली, "मग ही टेबलखुर्च्यांची अडगळ बाहेर टाका व पाट मांडून पंगतीची व्यवस्था करा." भराभर माणसे कामाला लागली बसायला पाट, ताटाखाली पाट, रांगोळया उदबत्या असा 'हिंदू' थाट सिध्द झाला. संतुष्ट होऊन श्रीगुरूजी म्हणाले, "आता शोभते खरी विद्वत्-परिषदेच्या भोजनाची तयारी!"

आपल्या भारतीय पोशाखामुळे आपली किंमत कमी होईल वा आपला उपहास होईल, असे म्हणणारांना त्यांचे उत्तर असे, "प्रतिष्ठा कपडयांवर अवलंबून नसते. ती तुमच्या गुणवत्तेवर आणि सामर्थ्यावर अवलंबून असते. आपण आपल्या पध्दतीचे अनुसरण केल्यास विदेशीयांत देखील आपल्याविषयी आदराचीच भावना निर्माण होते. परकीय वेश व चालीरीती यांमुळे प्रतिष्ठा मिळते ही भावना मानसिक गुलामीची आहे." या संदर्भात श्रीगुरूजींनी प्रथम एक उदाहरण स्वानुभवाचेच दिले. ते म्हणाले, "मी नागपुरला स्कॉटिश मिशनऱ्यांनी  चालविलेल्या एका कॉलेजात शिकत होतो. संपूर्णपणे

महाराष्ट्रीय पध्दतीच्या जेवणाचा बेत आम्ही विद्यार्थ्यांनी एकदा ठरविला. यासाठी प्राचार्य व इतर दोन युरोपीय प्राध्यापक यांना निमंत्रण दिले. धोतर नेसून उघडया अंगाने पाटावर जेवावयास बसावे लागेल, असे सांगितले. प्राचार्यांचा ख्रिस्तीपणाचा अहंकार आडवा आला आणि आमचे निमंत्रण त्यांनी नाकारले. पण इतर दोन वयोवृध्द प्राध्यापकांनी निमंत्रणाचा स्वीकार केला. एवढेच नव्हे तर प्राचार्यांना त्यांनी सांगितले, "आपले विद्यार्थी सद्हेतूने प्रेरित होऊन आपल्याला बोलावीत आहेत, तर जाण्यास कोणती अडचण आहे?" प्राचार्यही तयार झाले. या तीन  युरोपियांनी धोतर नेसून, उघडया अंगाने, महाराष्ट्रीय पध्दतीने, आपल्याप्रमाणेच हाताचा वापर करून जेवण केले. आपल्या पध्दतीचा योग्य अभिमान आणि आग्रह धरल्याने त्या दिवसांतही असा चांगला अनुभव येऊ शकला."

दुसरे उदाहरण श्रीगुरूजींनी सुप्रसिध्द बंगाली शिक्षणतज्ज्ञ पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे दिले. बंगाली पध्दतीचे धोतर आणि अंगावर पंचा असा त्यांचा वेश असे. थंडी असल्यास मात्र सदरा घालत. व्हाइसरॉयच्या सर्वोच्च शिक्षणविषयक समितीवर त्यांची नियुक्ती झाली. समितीच्या सभेला जाताना पाश्चात्य वेशात त्यांनी जावे असा आग्रह मित्रांनी धरला व त्यांच्यासाठी इंग्रजी पध्दतीचे कपडेही विशून घेतले. पण ईश्वरचंद्रजी आपल्या नेहमीच्या बंगाली वेशातच सभेला गेले. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे व्हाइसरॉयने त्यांना अतिशय आदराने वागविले. त्यांचे स्वागत करण्यास आणि त्यांना निरोप देण्यास व्हाइसरॉय स्वत: आसनावरून उठून पुढे झाले होते. जपानमध्ये बाहेर कामधाम आटोपून घरी आल्यावर अद्यापही जपानी माणसे आपला पारंपरिक 'किमोनो'च वापरतात. श्रीगुरूजींचा स्वदेशीच्या बाबतीतील हा व्यापक विचार खासगी चर्चा व बैठका यांतून नेहमी व्यक्त होत असे. एकदा दिल्लीला कॉलेज युवकांच्या एका बैठकीत अशीच राणीसंबंधी चर्चा उपस्थित झाली. सूट, बूट, नेकटाय, इत्यादी गोष्टी चर्चेत आल्या. शेवटी श्रीगुरूजी एकच वाक्य बोलून गेले. -

"All this must go root and branch" ("हे सारे परकीयांचे अनुकरण समूळ नष्ट झाले पाहिजे.") तरूण विद्यार्थ्यांत स्त्रैणता वाढत आहे हे विनाशाचे लक्षण आहे असे सांगून ते बजावीत, "जगाचा इतिहास साक्षी आहे की माणसाच्या आपल्या शरीराला कोमल ठेवण्याच्या प्रवृत्तीने राष्ट्राचा नाश होऊन जातो. फ्रान्स, रोम आणि कितीतरी राष्ट्रे यामुळेच नष्टभ्रष्ट झाली. शिवाजीचे साम्राज्य खेळ-तमाशे आणि नाच-गाणी यांमुळे नष्ट झाले. अशा गोष्टींत माणसे फसतात आणि पराक्रम विसरून जातात." संघशाखांचे 'स्वदेशीपण' हाही त्यांच्या बोलण्याचा एक विषयक असे.

स्वभाषा आणि सुसंस्कार हा स्वदेशी जीवनाचाच भाग. श्रीगुरूजी या दोन्ही बाबतीत फार संवदेनशील होते. सुस्थितीतील एका हिंदू गृहस्थाने आपल्या मुलाला इंग्रजी शिकविण्यासाठी एका इंग्रज स्त्रीची नेमणूक केली होती. मुलाला चांगले इंग्रजी बोलता यावे अशी त्या गृहस्थाची इच्छा होती. या प्रकाराबद्दल बोलताना श्रीगुरूजी म्हणाले, "इंग्रजीत बोलण्याची आणि नंतर इंग्रजीतच विचार करण्याची सवय लागली म्हणजे हा मुलगा कधीही खरा राष्ट्रभक्त होऊ शकणार नाही. अंत:करणापासून तो इंग्रजांचा गुलाम बनून राहील."

श्रीगुरूजी केरळात असताना एका शाखेवर बाल स्वयंसेवकांचा एक खेळ घेण्यात आला. श्रीगुरूजींनी एका बाल स्वयंसेवकाला नंतर विचारले, "या खेळाचे नाव काय?" तो म्हणाला, "दीप बुझाना." शाखेवरील खेळाचे नाव गुरूजींना रुचले नाही. त्यांनी वयस्कर स्वयंसेवकांना विचारले, याने नाव बरोबर सांगितले आहे ना?" होकारार्थी उत्तर येताच गुरूजी म्हणाले "खेळाचे या प्रकारचे नाव असू नये. आपल्या संस्कृतीत दीप विझविणे हे अशुभ मानण्यात आले आहे. आपल्याकडे म्हणतात,

'ज्ञानदीप प्रज्वलित करा.' तो कधी विझू नये. 'ज्ञानदीप मालवू नको रे' अशी संतवाणी आहे. खेळाचे का असेना, पण नाव सुसंस्कार करणारे पाहिजे." दुसऱ्या दिवशी खेळाचे नाव बदलनू 'आव्हान' असे करण्यात आले. अशी होती श्रीगुरूजींची स्वदेशी धारणा.

याच वर्षाच्या मे महिन्यात पुणे येथे 'अभिनव भारत' या क्रांतिकारकांच्या संस्थेचा सांगता समारंभ साजरा झाला. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रेरणेने सशस्त्र स्वातंत्र्य संग्राम करण्याच्या उद्देशाने ही संस्था चालू शतकाच्या प्रारंभी स्थापन झाली होती. स्वातंत्र्य मिळाल्यावर तिचे प्रयोजन उरले नाही, म्हणून हा सांगता समारंभ. स्वातंत्र्यवीर स्वत: कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कै. डॉ. हेडगेवार यांचा 'अभिनव भारता'शी आणि एकूण क्रांतिकारक चळवळीशी कित्येक वर्षे असलेला घनिष्ट संबंध ध्यानात घेऊन श्रीगुरूजींना या ऐतिहासिक प्रसंगी निमंत्रित करण्यात आले होते. सांगता सभेसाठी प्रचंड जनसमुदाय जमला होता. सेनापती बापट अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षांनी घालून दिलेल्या नेमक्या केवळ दहा मिनिटांच्या मर्यादेत श्रीगुरूजींनी आपले विचार व्यक्त केले. स्वातंत्र्यकाळातही क्रांतीची ज्योत हृदयात तेवत ठेवून दररोज काम करण्याची आवश्यकता आहे, असा विचार त्यांनी समर्थपणे पुढे मांडला. श्रीगुरूजी म्हणाले, "पागल आणि वाट चुकलेले असा शिक्का क्रांतिकारकांवर मारून आपल्या बुध्दिमत्तेचा डौल अनेकजण मिरवतात. पण वस्तुस्थिती ही असते की या लोकांना क्रांतिकारकांच्या देशभक्तीची उग्रता सहन होत नाही. क्रांतीची ज्वालाच तरूणांच्या अंत:करणात प्रदीप्त करण्याच्या कामी जीवनखर्ची घालणाऱ्या डॉ. हेडगेवारांनी दाखवलेल्या मार्गावरून वाटचाल करण्याचे भाग्य मला लाभले आहे. म्हणून क्रांतिकारकांना आदरपूर्वक अभिवादन करणे आणि त्यांना आपली श्रध्दांजली वाहणे हे मी माझे कर्तव्य समजतो. सुस्थिर क्रांतीसाठी रोज परिश्रम करणे आवश्यक असते. आपल्या अंत:करणात क्रांतीची ज्योत सदैव तेवती राहणेही जरूर असते. जनतेचे दीन, दु:खी जीवन समाप्त करावयाचे आहे, खऱ्या अर्थाने सुखी आणि समृध्द भारत निर्माण करावयाचा आहे आणि अराष्ट्रीय भावनांचे निर्मूलन करून भारताचे म्हणजेच हिंदू राष्ट्राचे जीवन परिपूर्ण करावयाचे आहे. म्हणून आजच्या समारंभात आपल्या अंत:करणात असा निर्धार जागृत करावा लागेल की, यावच्चंद्रदिवाकरौ या राष्ट्राचा भगवा ध्वज गौरवाने फडकत ठेवू."

श्रीगुरूजींचा हिंदुत्वाचा आग्रह प्रखर होता. नेहमीप्रमाणे त्यांनी या उन्हाळयात देशातील सगळया संघ शिक्षा वर्गांचा प्रवास केला. त्यांत सूत्ररूपाने त्यांनी असाच विचार मांडला की, हिंदुत्वापेक्षा छोटे आपल्याला काही नको आणि फार विशालतेच्या मागेही आजच लागण्यात अर्थ नाही. अव्याप्ती आणि अतिव्याप्ती ही दोन्ही टोके टाळून काम करणेच व्यावहारिकदृष्टया शहाणपणाचे ठरणार आहे. जगातील उन्मत्त शक्तींत देखील मानवता जागृत करण्याचे सामर्थ्य सुसंघटित आणि समर्थ हिंदू समाजच प्रकट करू शकेल, याबद्दल ते नि:शंक होते. म्हणून हिंदू संघटन मानवतावादाच्या निकषावर संकुचित ठरते, या विचाराला त्यांनी कधीच थारा दिला नाही.

आणखी एका व्यासपीठावर श्रीगुरूजींनी व्यक्त केलेल्या विचारांची येथे दखल घेतली पाहिजे. कारण, सुमारे दहा वर्षांनंतर त्यांनी ज्या एका महत्वपूर्ण योजनेला हात घातला, त्या योजनेची बीजे त्यांच्या या भाषणात आढळतात. प्रसंग होता सार्वभौम साधु-संमेलनाचा. १९५२ च्या ऑक्टोबर महिन्यात दि. २६ रोजी कानपूर येथे हे संमेलन भरले होते आणि त्यासाठी श्रीगुरूजींना आग्रहपूर्वक निमंत्रण करण्यात आले होते. ही संधी घेऊन साधुसंन्याशांपुढे श्रीगुरूजींनी आपली भावना स्पष्ट शब्दांत ठेवली. त्यांना वाटे की, आपल्या हिंदू समाजात असंख्य साधु-संन्याशी, मठ आणि मठाधिपती आहेत.

स्वत:च्या व्यक्तिगत उध्दारासाठी साधना स्वत: करावी किंवा इतरांना तत्संबंधी मार्गदर्शन करावे, एवढीच त्यांची दृष्टी आहे. हा समाज सुरक्षित कसा राहील, त्याची उत्तम धारणा कशी होईल, आपले कर्तृत्व समाजाच्या चरणी समर्पित करण्याची ओढ कशी वाढेल हा विचारच होत नाही. आत्मोध्दार आणि लोकोध्दार या दोन्हींचे भान एकाच वेळी ठेवण्याची नितांत गरज या संमेलनात श्रीगुरूजींनी कळकळीने प्रतिपादन केली. ते म्हणाले, "आपल्या संस्कृतीचे प्रतीक असलेल्या या भगव्या ध्वजाचा संदेश घरोघर पोचविणे हे आपणा सर्व साधुजनांचे व्रत असले पाहिजे. समाजात आपण अशी जागृती निर्माण केली पाहिजे की, आत्मगौरवाची अनुभूती पुनश्च त्याला लाभेल. त्याच्या सात्त्विक सामर्थ्यापुढे साऱ्या दुष्ट प्रवृत्ती हतबल होऊन जातील."

याच भाषणात श्रीगुरूजींनी सांगितले की या जगात मानवाला सुखशांतीच्या मार्गाने नेणारे विचारधन भारताजवळ आहे. ते जगाला देण्याची भारताची ईश्वरदत्त भूमिका युगानुयुगे राहिलेली आहे. हे कार्य साधुसंतच करू शकतील. ते त्यांनी अंगीकारले पाहिजे. या संदर्भात त्यांनी पाश्चिमात्य लोकतंत्र आणि रशियाचा साम्यवाद या उभय विचारप्रणालींचा उद्बोधक परामर्श घेतला. तसेच या दोहोंहून मुलत:च स्वतंत्र असलेल्या भारतीय जीवनप्रणालीचे विवेचन केले. विशेषत: इस्लाम व ख्रिस्ती मतांसबंधी बोलताना ते म्हणाले, "मानवकल्याणाचे आपलेच तत्त्वज्ञान श्रेष्ठ आहे, असे समजणारे दोन गट विश्वशांतीच्या गोष्टी तर अवश्य बोलतात, पण संपूर्ण जगावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी मानवसंहाराची साधने जमवीत असताना दिसतात. प्रसंगी अणुशक्तीचा वापर करूनही मानवसंहार करण्यास हे देश सिध्द झाले आहे. अमेरिकेने तर दुसऱ्या महायुध्दात जपानमध्ये अणुबॉम्बचा प्रत्यक्ष प्रयोग केलेला आहे. उलट, महाभारतातील अर्जुनाचा संयम पाहा. त्याच्याजवळ पाशुपतास्त्र होते. विलक्षण प्रभावी असे ब्रह्मास्त्र होते. पण या उभय अस्त्रांचा प्रयोग त्याने केला नाही. कारण मानवेतचा विनाश त्याला करावयाचा नव्हता. ब्रह्मास्त्राचा प्रयोग केल्यास आठ वर्षे दुष्काळ पडतो हे त्याला ठाऊक होते. म्हणून त्याने या अस्त्रांचा प्रयोग टाळला. शास्त्रीय जीवनप्रणालीचा हा आपला आदर्श आहे. म्हणून, मानवामानवात खास बंधुभाव ज्यायोगे निर्माण होऊ शकेल, ते तत्वज्ञान साधुसंतांनी अधिकारवाणीने सांगण्याची आवश्यकता आहे. हे संपूर्ण विश्वच माझे घर आहे अशी ज्यांची अनुभूती आहे, तेच विश्वात शांतीचा संदेश घुमवू शकतात. सुदैवाने, असे साधुसंत, संन्याशी आणि महात्मे आजही आपल्या भारतवर्षात आहेत."

माणसाची आईकडून जी अपेक्षा असते ती आमची सर्वसंगपरित्यागी साधुजनांकडून आहे, असे सांगून त्यांनी गुन्हेगारीत फसलेल्या एका मुलाचे उदाहरण सादर केले. या मुलाला आईने अति लाडावून ठेवलेले होते. तो लहान लहान चोऱ्या करू लागला तेव्हा आईने त्याला टोकले नाही. पुढे निर्ढावून तो डाकू बनला. आणि पकडला गेला व त्याला फाशीची शिक्षा झाली. आईला भेटण्याची आपली अंतिम इच्छा असल्याचे त्याने सांगितले. आई भेटावयास आली. तिच्या कानात काही तरी सांगण्याच्या मिषाने त्याने तोंड कानाजवळ नेले व आईच्या कानाचा कडकडून चावा घेतला. आरडाओरड झाली तेव्हा आपल्या कृत्याचे समर्थन करताना तो म्हणाला, मी डाकू झालो यासाठी माझी आईही दोषी आहे. आईने मला दुर्गुणाबद्दल वेळीच सावध करून सन्मार्गाला लावले असते तर आज फाशी जाण्याची पाळी माझ्यावर आली नसती. श्री गुरुजींनी ईशारा दिला कि विच्छिन्नता, फुटीरपणा आणि आपसातील द्वेषभाव याचे कारण साधुसंन्याशांची समाजजागृतीसंबंधीची उदासीनता, निष्क्रियता हेच आहे.

श्री गुरुजींना हे बोलण्याचा निःसंशय अधिकार होता. कारण भगवी वस्त्रे त्यांनी किंवा त्यापूर्वी कै. डॉक्टरांनी परिधान केली नसली तरी दोघांचीही वृत्ती संन्याशाचीच होती. श्री गुरुजींनी तर लोकजीवनापासून दूर राहून व्यक्तिगत मोक्षसाधनेच्या मागे लागण्याचा मोह आवरला होता आणि समष्टिरूप भगवंताची उपासना करण्याच्या कार्यात जीवन झोकून दिले होते. हिंदू धर्मपुरूषांनी समाजाच्या दुरवस्थेकडे आणि आपल्या ईश्वरदत्त कार्याकडे दृष्टी वळविली पाहिजे, या विचाराचा पुरस्कार श्री गुरुजी सतत करीत राहिले व त्यातूनच पुढे एक नवे व्यासपीठ 'विश्व हिंदू परिषद'या नावाने उभे झाले. त्यासंबंधीचे विवेचन यथाक्रम येईलच. साधुसंमेलनात श्री गुरुजीनी मांडलेल्या विचारांनाच पुढे व्यवहार्य रूप त्यांनी दिले. ही संगती ध्यानात यावी एवढयापुरताच हा उल्लेख येथे केला आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रतिनिधी सभेच्या सप्टेंबर १९५२ मधील अधिवेशनात गोहत्याबंदीच्या मागणीचा पुनरूच्चार करण्यात आला. एवढेच नव्हे तर या संबंधातील भारतीय जनतेची तीव्र भावना आपल्या लोकशाही शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी स्वयंसेवकांनी प्रचंड राष्ट्रव्यापी अभियान सुरू करावे, असाही आदेश देण्यात आला. श्री गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली प्रतिनिधी सभेने संमत केलेल्या ठरावात म्हटले आहे : "गोसंवर्धनाच्या बाबतीतील भारत सरकारच्या आस्थिर धोरणाबद्दल ही सभा असंतोष प्रकट करीत आहे. आपल्या देशात गोवंश-संवर्धनाचा विषय केवळ आर्थिक दृष्टीनेच महत्वाचा नाही, तर तो आमच्या सांस्कृतिक श्रद्धेचा आणि एकात्मतेचा प्रतिकही आहे. गेली पाच वर्षे होत असलेल्या गोहत्याबंदीच्या मागणीची जी उपेक्षा भारत सरकारने चालविली आहे, ती या सभेच्या मते अत्यंत अनुचित आहे.

देशभर लोकमत संघटित करून राज्यकर्त्यांना गोवंश-संवर्धनाच्या पवित्र कर्तव्याची पूर्तता करण्याचे स्मरण करून द्यावे, असा निर्धार ही सभा करीत आहे. म्हणून सर्व स्वयंसेवकांना असे आवाहन आहे कि सभा-मिरवणुकीद्वारा कोटी-कोटी भारतीय जनतेची भावना अशा दृढ इच्छा-शक्तीत परिणत करावी की भारताच्या लोकशाही शासनाला गोवंशाच्या विनाशावर कायदेशीर निर्बंध घालणे अपरिहार्य होउन जाईल." या ठरावात समस्त भारतीय जनता आणि निरनिराळे राजकीय पक्ष यांनाही सहकार्याचे आवाहन करण्यात आले होते.

या ठरावानुसार एक कार्यक्रम आखण्यात आला. त्याचा प्रमुख भाग असा होता कि गोहत्याबंदीची मागणी करणाऱ्या निवेदनावर लोकांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात याव्या आणि हा स्वाक्षरीसंग्रह शेवटी राष्ट्रपतींना सादर करण्यात यावा. स्वाक्षऱ्या घेण्याची मोहीम चालू असतानाच, सभा, मिरवणुका, प्रदर्शने, पोस्टर्स, पत्रके, लेख इत्यादी प्रचारमाध्यमांचा उपयोग लोक जागृतीसाठी करण्यास सुचविण्यात आले. संघाचे स्वयंसेवक निवेदनावर स्वाक्षऱ्या घेण्यासाठी घरोघर पोहोचतील, त्यांना सर्वांनी सहकार्य द्यावे, असे विनंती-पत्रकही श्री गुरुजीनी प्रसिद्ध केले. हे विनंती-पत्रक दि. १३ ऑक्टोबर १९५२ रोजी काढलेले आहे. प्रत्यक्ष अभियान गोपाष्टमीच्या दिवशी, म्हणजे दि. २६ ऑक्टोबरला सुरू करावे आणि २२ नोव्हेंबरला दिल्ली येथे त्याची समाप्ती व्हावी असेही ठरवण्यात आले. आंदोलन देशव्यापी स्वरूपात प्रभावी करण्यासाठी जो पैसा लागेल तो जनतेने उदार हाताने द्यावा, असेही श्री गुरुजीनी एका वक्तव्याद्वारे आवाहन केले. याशिवाय देशातील वृत्तपत्रे, मान्यवर पुढारी, लेखक, विद्वान लोक, धर्मगुरू, संतमहंत आणि सामाजिक कार्यकर्ते यांना स्वतंत्र पत्रे पाठवून श्री गुरुजीनी आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली व त्यांच्या सहकार्याची मागणी केली. स्वातंत्र्यवीर सावरकरांनाही श्री गुरुजीनी एक

व्यक्तिगत पत्र लिहिले. या पत्रातील काही वाक्ये मुद्दाम उद्-धृत करण्यायोग्य आहेत. कारण गोमाता आणि भारतमाता यांच्यावरील श्रद्धेचा विषय श्री गुरुजीना केवढा राष्ट्रीय जिव्हाळ्याचा वाटत होता व या प्रश्नावर श्री गुरुजीच्या भावना किती तीव्र होत्या, हे त्यावरून स्पष्ट होईल. श्री गुरुजीनी लिहिले आहे : आपल्या श्रद्धाकेन्द्रांसंबंधी अनादर, अनास्था आणि गोवंशासारख्या पवित्र श्रद्धास्थानाचा परक्यांकडून होत असलेला विनाश निर्लज्जपणे पाहत राहण्याची सवय यामुळेच लोकांनी भारतमातेचे विभाजन होऊ दिले. ते एक घृणास्पद पातक होते. ते पातक आजही कायम आहे. कुठेही असा स्वाभिमान दिसत नाही की, कलंक धुवून काढल्याखेरीज मनाला समाधान लाभणार नाही. एवढेच नाही, तर या कलंकभूत पापकृत्याचे समर्थन करण्यासाठीही मोठे मोठे महाभाग पुढे येतात. आपल्या परंपरेनुसार गोमाता आणि भारतमाता एकच. म्हणून गोमातेच्या हत्येला प्रोत्साहन देणारे अथवा त्याकडे दुर्लक्ष करणारे लोक भारतमातेचे खऱ्या अर्थाने भक्त वनू शकतील हे सर्वस्वी अशक्य आहे.

श्री गुरुजीची पत्रे, पत्रके,निवेदने इत्यादींना देशभरातून चांगला प्रतिसाद मिळाला. गोपाष्टमीच्या दिवशी सर्वत्र अभियानाला ठरल्याप्रमाणे प्रारंभ झाला. हजारो ठिकाणी मिरवणुका निघाल्या, सभा झाल्या आणि गोहत्याबंदीची मागणी करणारे ठराव संमत झाले. मुंबईतील मोहिमेच्या प्रारंभी जी प्रचंड सभा झाली, त्या सभेत गुरुजींनी गोहत्याबंदीच्या मागणीची राष्ट्रीय भूमिका विशद करणारे भाषण केले. या भाषणात ते म्हणाले, “गुलामीमुळे निर्माण झालेली प्रत्येक गोष्ट दूर करून परदेशी आक्रमणाची नावनिशाणीही पुसून टाकणे हे कोणत्याही स्वतंत्र राष्ट्राचे प्रथम कर्तव्य असावयास पाहिजे. याच दृष्टीने सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार ही अत्यंत उचित गोष्ट झाली आहे. जोपर्यंत राहणी, विचारपद्धती आणि जीवनाकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन यावर परक्यांची संपूर्ण छाप राहील, तोवर आपण स्वतंत्र झालो असे समजता येणार नाही. हजारो वर्षांच्या गुलामीमुळे निर्माण झालेले असे जेवढे प्रश्न असतील, ते सोडवून जगातील सर्व राष्ट्रांत आपले राष्ट्र अग्रेसर करण्याची उत्कट आकांक्षा प्रत्येक व्यक्तिच्या अंतःकरणात जागृत होणे हीच स्वातंत्र्याची खरी अनुभूती होय. आज भारताला आपले पालनपोषण करणारी मातृभूमी मानण्याचा श्रद्धाभाव आणि धर्मनिष्ठा या दोन्ही थोर गोष्टी सामान्य माणसाच्या अंतःकरणातून लुप्त झाल्या आहेत. जर इतिहासावरील आपली आंतरिक श्रद्धा आपण अशा प्रकारे ओसरू देऊ, तर काही काळाने आपल्याजवळ एकही श्रद्धास्थान उरणार नाही. असे जर झाले तर कोणत्या आधारावर राष्ट्रमंदिर गगनचुंबी बनविता येईल? तसेच आभाळाला गवसणी घालण्याची झेप आपण कशी घेऊ शकू? ”

“ज्या राष्ट्राची श्रद्धाच संपुष्टात येते, त्याच्या अभ्युदयाची आशा करणे व्यर्थ होय. आपण आपल्या राष्ट्राची उन्नती करू इच्छितो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, मतभेद, भिन्नभिन्न संप्रदाय, निरनिराळ्या प्रकारचे राजकारण यामुळे सगळीकडे विघटनाचेच दृश्य दिसते. म्हणून आम्ही विचार केला की, राष्ट्राचे एक सर्वमान्य श्रद्धाकेंद्र घेऊन सगळ्याना एकाच भूमिकेवर उभे करण्याचा प्रयत्न अत्यावश्यक आहे. हे सर्वमान्य श्रद्धाकेंद्र कोणते? आपल्या देशातील सर्व पंथोपपंथ, निरनिराळे राजकीय पक्ष वगैरे सगळ्यांच्या हृदयांत गोवंशाचे नांव घेताच श्रद्धेची अतुलनीय भावना सहजच जागृत होते. म्हणून ‘गाय’ आम्हा सर्वांना एकत्र आणू शकते. या गोष्टीवर सर्वांनी विचार करावा. आपल्या ठायी असलेली श्रद्धा जागृत करावी. राष्ट्रजीवनात तसेच आपआपल्या अंतःकरणात पराकाष्ठेची तेजस्विता निर्माण करावी. ”

मुसलमानांनी आणि ख्रिश्चनांनीही या आंदोलनात सहकार्य देण्याची आवश्यकता श्री गुरुजीनी या भाषणात प्रतिपादन केली. या समाजासंबंधी संघाची भूमिका काय, या प्रश्नाला पर्यायाने सुस्पष्ट उत्तरही त्यांनी देऊन टाकले. ते म्हणाले, "अशी कल्पना करा की येथे बसलेल्या कोणाला अमेरिकेचा नागरिक बनण्याची इच्छा आहे. तसा अधिकार त्याला लाभला आहे. तर अमेरिकेत जाऊन त्याने कोणत्या ध्वजाचा अभिमान ठेवणे योग्य होईल? भारताच्या चक्रांकित तिरंगी ध्वजाचा अभिमान बाळगून चालेल का? नाही. त्याला अमेरिकेच्या ध्वजाचा अभिमान बाळगावा लागेल. नंतर राष्ट्रपुरूष म्हणून कोणाचा गौरव त्याला करावा लागेल? जॉर्ज वॉशिंग्टन आणि अब्राहम लिंकन यांचा ! तिथे भगवान राम आणि कृष्ण यांची पूजा करण्यास आपल्याला मनाई नसेल, पण तेथील राष्ट्रीय श्रद्धाकेंद्रांचाही स्वीकार करावाच लागेल. त्याचप्रमाणे ख्रिस्ती आणि मुसलमान यांनाही भारताच्या जीवनाशी समरस होऊन येथील नागरिकत्वाच्या नियमांनुसारच राहावे लागेल. येथील राष्ट्रजीवनाचाच आदर्श पुढे ठेवून येथील राष्ट्रीय उत्सव हेच आपले राष्ट्रीय उत्सव मानून, तेथील राष्ट्रपुरूषांचा जयजयकार करावा लागेल. मी तर म्हणेन की त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार केलाच पाहिजे. अतिप्राचीन जीवनप्रवाहात समरस होऊन आणि श्रेष्ठ भारतीय विभूतिंपासून प्रेरणा घेऊन मग त्यांनी वाटल्यास उपासनेसाठी मशिदीत जावे आणि पैगंबराचे नाव घ्यावे किंवा चर्चमध्ये जाऊन बायबल वाचावे. त्यात आक्षेपार्ह काहीच ठरणार नाही. त्यांना आपल्या धर्माचे पालन व्यक्तिगत धर्म म्हणूनच करावे लागेल. सामूहिक दृष्टीने त्यांना तेथील प्राचीन जीवन-प्रवाहाचाच अंगीकार करावा लागेल. मला वाटते की, असा विचार केला तरच सुव्यवस्थित राज्य व प्रगतीशील राष्ट्रीय जीवन शक्य होईल. प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणात आपले राष्ट्र आणि राज्य यामची यथायोग्य उन्नती करण्याची प्रेरणा निर्माण होऊ शकेल." आर्थिक दृष्टयाही गोहत्याबंदीचे त्यांनी समर्थन केले आणि राष्ट्रीय श्रद्धास्थाने नष्ट करून डॉलर्स मिळवू पाहणारांची त्यांनी कठोर शब्दात निर्भत्सना केली. श्री गुरुजींनी जसे मुंबईत अभियानाच्या उद्-घाटनाचे भाषण केले, तसेच राजधानी दिल्लीत संघाचे सरकार्यवाह श्री भय्याजी दाणी यांनी केले.

दि.२३ नोव्हेंबरपर्यंत गोहत्याबंदीची मागणी करणाऱ्या पत्रकांवर लोकांच्या सह्या घेण्याचे काम स्वयंसेवक अत्यंत योजनाबद्ध रीतीने करीत होते. अविश्रांत परिश्रम एकेका नागरिकापर्यंत पोचण्यासाठी त्यांनी केले. या आंदोलनाला लोकांतून प्रायः कोणी विरोध केला नाही म्हटले तरी चालेल. पण पंतप्रधान पं. नेहरू मात्र गर्जून गेले कि हा संघाचा 'राजकीय स्टंट' आहे ! या त्याच्या विरोधी सुरानंतर ठिकठिकाणी अनेक काँग्रेसपक्षीय कार्यकर्ते आणि अल्पसंख्य समुदायातील (ख्रिस्ती आणि मुसलमान) लोक यांनी सह्या देण्याच्या बाबतीत हात आखडता घेतला. एवढेच नव्हे, तर काँग्रेसचे चिटणीस श्रीमन्नारायणजी यांनी एक फतवा काढून या आंदोलनाला सहकार्य देण्याची काँग्रेसजनांना मनाई केली ! पण तरीही व्यापक प्रमाणावर सर्व राजकीय पक्षांच्या अनुयायांच्या सह्या पत्रकांवर मिळू शकल्या. सुमारे ५४ हजार कार्यकर्त्यांनी ८५ हजार गावातून एकूण २ कोटींहून अधिक लोकांच्या सह्या मिळविल्या. हा स्वाक्षरी-संग्रह दिल्ली येथे पाठविण्यात आला व दि. ७ डिसेंबर रोजी एका प्रचंड मिरवणुकीच्या रूपाने तो प्रदर्शित करण्यात आला. ही मिरवणुक सुमारे १।। मैल लांबीची होती. मिरवणुकीनंतर रामलीला मैदानावर विराट सभा झाली. डॉ. शामाप्रसाद मुखर्जी या सभेत वक्ते म्हणून उपस्थित होते. श्री गुरुजीनी आपल्या भाषणात अभियानाला सहकार्य देणाऱ्या सर्वांचे आभार मानले. या आभाराच्या भाषणात, पंतप्रधान पं. नेहरू यांनी संघाच्या अभियानाची 'राजकीय स्टंट' म्हणून जी संभावना केली होती, तिला परखड शब्दांत उत्तर त्यानी दिले. श्री गुरुजीच्या शब्दांत चांगलीच धार होती. त्यांनी नेहरूंना प्रतिप्रश्न केला, "आचार्य विनोबा भावे म्हणतात की, 'सब भूमी गोपाल की !' पण मी

विचारतो की ही भूमी गोपालांची आहे की गोहत्या करणारांची? महर्षी दयानंद यांनीही हे कार्य अंगीकारले होते, त्यांनाही काय राजकीय स्टंटच करावयाचा होता? रांची येथे भगवान बुद्धांच्या दोन शिष्यांच्या अस्थी प्रतिष्ठित करण्याचा जो समारंभ काही दिवसांपूर्वी झाला, त्याला पं. नेहरू उत्साहाने उपस्थित होते. अणि तेथून ५ मैल दूर अंतरावर भेलसा येथे पोचताच मात्र त्यांनी गोहत्या जारी ठेवण्याची घोषणा केली ! भगवान बुद्धांच्या अहिंसेचा गौरव केल्यानंतर लगेचच गोहत्या चालू ठेवण्याची ही घोषणा त्यांनी केली! " सगळ्या जगाने विरोध केला तरी आपल्या मानबिंदूचे संरक्षण हिंदूंनी केले पाहिजे, असे उत्कट आवाहन त्यांनी अखेर केले.

दि. ८ डिसेंबर रोजी श्री गुरुजींनी श्री लाला हंसराजजी यांच्या समवेत राष्ट्रपतींची भेट घेतली व स्वाक्षरी-संग्रह त्यांना सादर केला. सरकारला लोकांच्या या मागणीवर सहानुभूतीपूर्वक विचार करावयास सांगेन, असे आश्वासन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी रीतीनुसीर दिले. वास्तविक स्वतः राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद या मागणीला सर्वस्वी अनुकुल होते. परंतु जगाच्या इतिहासात एखाद्या प्रश्नावर कधी करण्यात आला नसेल एवढा मोठा स्वाक्षरीसंग्रह करूनही, गोहत्याबंदीच्या मागणीची सरकारकडून उपेक्षाच झाली. लोकशाहीवादी म्हणविणाऱ्या शासनाने राष्ट्रकल्याण आणि लोकमत या दोहोंचीही पायमल्ली केवळ पक्षीय स्वार्थासाठी केली ! अर्थात हे अभियान परिणामाच्या दृष्टीने निष्फळ ठरले असे कोणाला वाटेल. पण तसे म्हणता यावयाचे नाही. अनेक प्रांतशासनांनी क्रमशः गोवधबंदीचे कायदे केले. मध्यवर्ती कायद्याची उणीव मात्र अद्यापपर्यंत कायम राहिली आहे. श्री गुरुजीनी अभियानाच्या समाप्तीनंतर हा प्रश्न अडगळीत मात्र पडू दिला नाही. १९५३ मध्ये २ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबरपर्यंत, म्हणजे राष्ट्रपतींना निवेदन सादर झाल्यानंतर सुमारे एक वर्षाने, पुन्हा एकदा लोकमताची जाण शासनाला करून देण्याचा प्रयत्न संघाच्या पुढाकाराने करण्यात आला. सभा, मिरवणुका, मेळावे वगैरे कार्यक्रम योजण्यात आले.

नंतर १९५४ साली माघ महिन्यात प्रयाग येथे कुंभमेळा भरला होता. त्यावेळी गोहत्या निरोध समितीच्या द्वारे एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम पार पडला. कार्यक्रम असा होता की, पं. नेहरु ज्या मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले होते, त्याच मतदारसंघातील जनतेच्या भावना एका स्वाक्षरीसंग्रहाच्या द्वारे सरकारच्या निदर्शनाला आणून द्यावयाच्या. गोहत्याबंदीची मागणी करणाऱ्या या निवेदनावर नेहरुंच्या मतदारसंघातील २,५७,५८० लोकांनी स्वाक्षऱ्या केल्या. पं. नेहरुंना निवडणुकीत जी मते मिळाली होती, त्यापेक्षा सुमारे दीड लक्ष अधिक लोकांनी गोवधबंदीचे निःसंदिग्ध समर्थन केले होते. या स्वाक्षरीसंग्रहासोबतच्या निवेदनात पंतप्रधानांना अशी विनंती करण्यात आली की, " गोवधबंदीचा प्रश्न जेव्हा संसदेत येईल तेव्हा आपण त्याचे समर्थन करावे. लोकशाही पद्धतीनुसार आमची ही मागणी आहे. गोहत्येला संमती देणारी व्यक्ती आमचे प्रतिनिधित्व करू शकत नाही. " आपल्या मतदारांच्या या इच्छेचा उचित आदर पंतप्रधानांनी केला नाही. कुंभमेळ्याच्या निमित्ताने जे गोहत्या विरोधी संमेलन भरले होते, त्यात श्री गुरुजी जातीने सहभागी झाले होते. संघाच्या स्वयंसेवकांनी स्वाक्षरीसंग्रहाचा व संमेलनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यात मनापासून सहकार्य दिले, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. पुढेही संधी मिळेल तेव्हा ते या प्रश्नाची निकड लोकांना व शासनाला सांगत राहिले. १९६६ साली पुरीच्या शंकराचार्यांनी गोहत्याबंदीच्या मागणीसाठी आमरण उपोषण केले, त्यावेळीही श्री गुरुजीनी सरकारच्या धोरणावर टीका केली. ही मागणी मान्य करण्याचा आग्रह केला. त्यांच्या कित्येक पत्रपरिषदा, लेख आणि भाषणे यांत या विषयाला पुनःपुन्हा स्पर्श केलेला दिसतो.

गोहत्या विरोधासाठी वेळोवेळी सरकारी पातळीवरील समिती किंवा आंदोलकांनी बनविलेली गोरक्षा महाअभियान समिती यांच्या कामकाजावर श्री गुरुजी अतिशय असंतुष्ट होते. सरकारी गोरक्षा समितीच्या बैठकींना जाणे त्यांना निरर्थक वाटत असे व तो वेळेचा अपव्यय आहे अशी त्यांची भावना झाली होती. "गोहत्या बंद करण्यास वास्तविक एक मिनिट पुरेसे आहे. सहा महिने चालणाऱ्या समितीची काय गरज आहे?" इतके ते वैतागून बोलत. महाअभियान समितीतील चर्चेविषयी ते एकदा म्हणाले, "तिथे अशी चर्चा चालते की जणू काही आपण बाजारात बसलो आहोत असेच वाटावे. "

सत्याग्रह वा अन्नसत्याग्रह अशा मार्गांनी गोहत्याविरोधी आंदोलन जावे असेही गुरुजींना वाटत नव्हते. पण १९६७ अखेर पुरीच्या शंकराचार्यांनी उपोषण सुरू केले व परिस्थिति अवघड झाली. १९६६ मध्ये राजधानीत प्रचंड निदर्शने झाली होती. आंदोलन पेटले होते. गोहत्याबंदीचा अध्यादेश राष्ट्रपती काढतील, अशा न्यायाल्याने आधीच दिलेल्या निवाडयात बाधा येईल, असे कारण राष्ट्रपतींनी दिले. सर्वोच्च न्यायाल्याचा निवाडा होता कि वृद्ध आणि शेतीला निरूपयोगी बैल कापण्यास हरकत नाही. अध्यादेश काढल्यास या बैलांच्या कत्तलीलाही विरोध होईल, असे राष्ट्रपतींना वाटले. ही वार्ता कळल्यावर श्री गुरुजी म्हणाले, "अखेर राष्ट्रपती असतात कशासाठी? त्यांचा शब्दच प्रमाण मानला जावयास पाहिजे. "

१९५२ साली सुरू झालेल्या या आंदोलनासंबंधात १९५४ साली ऑगस्ट महिन्यात श्री गुरुजीनी दिलेला इशारा अगदी खरा ठरला. या महिन्यात निरनिराळ्या ४० संस्थांच्या प्रतिनिधींची एक बैठक दिल्लीला भरविण्यात आली. मोठमोठी मंडळी उपस्थित होती. सत्याग्रह मोहिमेला विशेष अनुकुलता बैठकीत दिसली नाही. या बैठकीत श्री गुरुजी म्हणाले, "गोहत्याबंदीला आज जेवढे अनुकुल वातावरण निर्माण झाले आहे, तेवढे यापूर्वी कधीही निर्माण झालेले नव्हते. या वातावरणातही गोहत्याबंदीच्या दिशेने पावले उचलण्यास सरकारला प्रवृत्त करता आले नाही, तर येत्या ४-५ वर्षात गोहत्या बंद होणे शक्य नाही. कारण नंतर देशापुढे इतर अनेक प्रश्न उपस्थित होणार आहेत आणि त्यांच्यावरून लोकांचे व सरकारचे लक्ष हटवून ते गोरक्षणाच्या प्रश्नाकडे वळविणे अशक्य ठरणार आहे. "

हे भाकित अगदी खरे ठरले. या प्रश्नाला धार आणण्याचा प्रयत्न झाला नाही असे नव्हे. पण त्याला लोकमानसात व सरकारच्या दृष्टीनेही अग्रक्रम लाभला नाही. आंदोलने शांत होऊन गेली. १९६६ सालीही या प्रश्नाची अंतिम सोडवणूक दृष्टिपथात नाही. गोमांसाची निर्यात व शेतीला उपयुक्त जनावराची कत्तल हा मोठा गंभीर प्रश्न बनलेला आहे. सेक्युलॅरिझमचा डंका वाजविणारे या प्रश्नावर मुसलमान व ईसाई यांना नाराज करणारे एखादे पाऊल टाकतील, याची शक्यताच नाही. या अनिच्छेची मुळे नेहरूंच्याच धोरणात आहेत, हे श्री गुरुजींनी स्वच्छपणे व प्रकटपणे सांगितले होते. या संदर्भात, नेहरूंनी डॉ. जिनांना लिहिलेल्या एका पत्रातील काही विधानांचा उल्लेख ते करीत असत. गोहाटी येथे १९५५ साली प्रतिष्ठित नागरिकांच्या सभेत बोलतांना या पत्रातील वाक्येच त्यांनी उद्-घृत केली. ही वाक्ये अशी आहेत - "असे दिसते की गोहत्येच्या बाबतीत काँग्रेसविरूद्ध खोटा आणि ना बूड ना शेंडा असलेला प्रचार करण्यात येत आहे. काँग्रेस गोहत्येला कायद्याने बंदी घालणार असल्याचे हे काँग्रेसविरोधी प्रचारक सांगत असतात. मुसलमानांच्या एकाही सुप्रतिष्ठित अधिकारापासून त्यांना वंचित करण्याची काँग्रेसची इच्छा नाही. "

भारत सरकारने अद्यापही गोवंश-रक्षणासाठी मध्यवर्ती कायदा केलेला नाही. जिथे प्रांतिक कायदा आहे, तिथे त्याची कठोर अंमलबजावणी होत नाही. गोवंशाचा विनाश चालूच आहे. आचार्य विनोबा भावे यांचा

गोवंशाचे रक्षण हा अतिशय जिव्हाळ्याचा विषय होता. १९८२ च्या जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात त्यांनी गोहत्या-विरोधी आंदोलनाचा एक भाग म्हणून ठिकठिकाणी सौम्य सत्याग्रह घडवून आणला. पण अद्यापही सत्तारूढ राजकीय पक्षाला गोहत्याबंदीचा राष्ट्रव्यापी कायदा करण्याची व त्याची कडक अंमलबजावणी करून घेण्याची इच्छा होत नाही. मताच्या लालसेचा फार विपरीत परिणाम आपल्या राजकारणावर झालेला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात या प्रश्नाचे राष्ट्रीय महत्व राष्ट्राच्या लक्षात आणून देणारा व लोकांच्या अंतःकरणापर्यंत त्याची आच पोचविणारा पहिला राष्ट्रीय नेता म्हणून श्री गुरुजीचे स्मरण सगळ्यांना सदैव होत राहिल. स्वातंत्र्य-आंदोलनाच्या काळात गांधीजींनी गोरक्षण व गोपूजन हे आपल्या कार्याचे एक अविभाज्य अंग मानलेले होते, हिंदू संस्कृतीच्या थोरवीचे एक गमक म्हणून गोमातेसंबंधीच्या श्रद्धेचा उल्लेख ते निःसंकोचपणे करीत. स्वातंत्र्यकाळात त्या विचाराचा पाठपुरावा करण्याची सवड गांधीजींना लाभली नाही. ती उणीव श्री गुरुजींनी भरून काढली व गांधीजींची उत्कट इच्छा फलद्रूप करण्याचा प्रयत्न केला, असे म्हणता येईल.

## १३. सावध राष्ट्रनेता

देशात एखादे मुलगामी आणि सर्वस्पर्शी परिवर्तन घडले की चोहोबाजूंनी नव्या परिस्थितीचे मंथन होत राहते. जे घडले त्याचा अर्थ काय, ते का घडले, प्रगतीची दिशा कोणती, राष्ट्रजीवनात इष्ट काय आणि अनिष्ट काय, विविध क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था आणि माणसे यांची उपयुक्तता काय, वैचारिक अधिष्ठान कोणते अंगीकारावयाचे इत्यादी प्रश्नांवर प्रकट चिंतन होऊ लागते. नवा संदर्भ प्रत्येक विचाराला देण्याचा सहजच प्रयत्न होतो. १९४७ साली झालेली देशाची रक्तरंजित फाळणी आणि लाभलेले राजकीय स्वातंत्र्य, संस्थानांचे विलीनीकरण, महात्माजींची हत्या, नव्या राज्यघटनेचा अंगीकार व नंतर १९५२ मधील पहिली सार्वत्रिक निवडणूक अशा अनेकविध दूरपरिणामी घडामोडीची गर्दी १९४७ ते १९५२ या पाच वर्षात उडून गेली होती. स्वाभाविकपणेच सगळीकडून त्यासंबधीचे पडसाद उमटत होते. भिन्नभिन्न विचारांच्या लाटा लोकमानसावर आदळत होत्या.

रा. स्व. संघ या सगळया घटनांपासून अलिप्त राहणे शक्यच नव्हते. विभाजनकाळात संघाने हिंदू समाजाच्या संरक्षणासाठी प्राणपणाने काम केले आणि निर्दोष असतानाही गांधी - हत्येनंतरच्या प्रक्षोभात अकल्पितपणे त्याला होरपळून निघावे लागले. संघावरील बंदी उठली व संघकार्य पूर्ववत् सुरू झाले, तरी नव्या परिस्थितीत संघाची भूमिका काय, हा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाल्याविना राहिला नाही. स्वातंत्र्यसंपादन हे सहज कळणारे व अंत:करणाला जाऊन भिडणारे उद्दिष्ट दृष्टीपुढून नाहीसे झाले व स्वतंत्र भारताच्या संदर्भातील जडणघडणीचे नानाविध प्रश्नांनी आंदोलने निर्माण केली, हे नाकारण्यात अर्थ नाही. १९५२ मधील निवडणूकीचेच उदाहरण घेतले तरी ही गोष्ट स्पष्ट होईल. १९४७ च्या संकटकाळात जिवावर उदार होऊन ज्यांनी समाजबांधवांचा बचाव केला, अशा अनेकांचा निवडणूकीत फज्जा उडाला. ज्यांनी फाळणी स्वीकारली व 'परदेशी' बनविलेल्या बांधवांची ससेहोलपट थांबविण्यासाठी बोटही उचलले नाही, ती मंडळी दिमाखाने सत्तेच्या खुर्च्यांवर जाऊन बसली ! परिणामत: नैराश्य आणि वैफल्य यांची भाषा पंजाब - दिल्लीकडील भागांत अनेकांच्या तोंडून ऐकू येऊ लागली. काश्मीर, भाषावार प्रांतरचना, धर्मातील (सेक्युलर) राज्याचा आशय आणि स्वतंत्र भारताचे एकात्म राष्ट्रस्वरूप, हिंदू व्यतिरिक्त अन्य (उदा. ख्रिस्ती व इस्लामी) समाजाचे भारतातील स्थान असे कित्येक प्रश्नही असतानाही दिशाभूल होऊ न देता राष्ट्रीय व्यासपीठावर बोचकपणे उपस्थित झाले. या अनेक वादांची धूळ उडत असतानाही दिशाभूल होऊ न देता राष्ट्रजीवनाच्या मूलभूत समस्येवर संघाची दृष्टी केंद्रित करण्याचा व संघाबाहेरील जनतेला योग्य राष्ट्रीय भुमिकेची जाण देण्याचा जो प्रयत्न श्रीगुरूजींनी केला, त्याबद्दल आजच्या भारतवर्षाने खरोखर कृतज्ञ राहावयास पाहिजे. संघ मुळात डॉक्टर हेडगेवारांनी काढला तो हिंदूसमाज संघटित करण्यासाठी व पारतंत्र्याला कारणीभूत ठरलेले दोष दूर करून त्याला तेजस्वी स्वरूपात उभा करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन. स्वातंत्र्य हा या वाटचालीतील एक स्वाभाविक टप्पा. पण खंडित स्वातंत्र्य आकस्मिकपणे पदरात पडले. महायुध्दोत्तर आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि साम्राज्य सांभाळण्याची नष्ट झालेली कुवत यांमुळे ते दान नाइलाजास्तव देणे ब्रिटीशांना प्राप्त झाले, तरी त्यामुळे संघाचे मूळ प्रयोजन संपले काय? या प्रश्नाला श्रीगुरुजींनी नि:संदिग्धपणे 'नाही' असे उत्तर दिले. आणि स्वतंत्र भारतात संघाला करावयाच्या कार्याची विशुध्द मांडणी केली. डॉक्टरांच्या विचारांचे आणि कार्यपध्दतीचे सूत्र त्यांनी कोठेही बाधित होऊ दिले नाही.

उलट, ते विचार आणि ती कार्यपध्दती यांच्यावरील दृढ श्रध्दा पुनश्च सुस्थिर करण्यात ते यशस्वी झाले.

या दृष्टीने कार्यकर्त्यांतील खुल्या आणि प्रदीर्घ विचारमंथनाचा एक उपक्रम श्रीगुरूजींनी १९५४ च्या मार्चमध्ये केला. संघाच्या अखिल भारतातील सुमारे ३०० प्रमुख कार्यकर्त्यांचे एक शिबिर भरविण्यात आले. दिनांक ९ ते १६ मार्च असे आठ दिवस हे शिबिर चालले. शिबिराचे स्थान होते सिंदी. संघसंस्थापक डॉ. हेडगेवार यांनी १९३९ साली सिंदी येथेच तेव्हाच्या प्रमुख कार्यकर्त्यांचे एक शिबिर भरवून संघाची नवीन संस्कृत प्रार्थना स्वीकारली होती आणि संघाच्या कार्यपध्दतीला स्थायी स्वरूप दिले होते. आता १५ वर्षानंतर संघाचा विचार आणि कार्य यासंबंधी मूलभूत चिंतन, सर्वस्वी वेगळया परिस्थितीत, सिंदी येथेच घडले. सिंदीतील विचारमंथनाचा समारोप करताना दिनांक १६ मार्च १९५४ रोजी केलेल्या भाषणात श्रीगुरूजींनी १९३९ च्या बैठकीचे स्मरण देऊन म्हटले, "त्यावेळी आपण आपल्या अंत:करणात कार्यासंबधी विश्वास दृढ केला होता आणि निर्धार केला होता की रात्रंदिवस परिश्रम करून हे कार्य वाढवू. त्यानंतर सव्वा वर्षांच्या आतच डॉक्टर साहेबांचा देहांत झाला. पण एकाग्रपणे काम करून आपण संघ वाढविला. जर आज चोहोबाजूच्या परिस्थितीमुळे मनात काही शंका निर्माण झाल्या असतील तर पुन्हा निश्चय करू की आमच्यात कोणतेही दोष शिरकाव करणार नाहीत आणि संपूर्ण शक्ती पणाला लावून, दिवसरात्र काम करून आपआपल्या क्षेत्रात संघकार्य प्रभावी करू. इतके प्रभावी करू की, संघाच्या वातावरणाचा ज्याला संपर्क झाला नाही असा कोणी उरू नये. आपल्या इच्छामात्रेकरून राष्ट्रजीवनाची निरनिराळी क्षेत्रे कार्यप्रवण व्हावी आणि देशाची प्रगती व कल्याण साधावे."

सिंदी येथील चर्चासत्रांचा सगळाच तपशिल येथे निवेदन करण्याचे प्रयोजन नाही. पण या बैठकीत श्रीगुरूजींनी कार्यकर्त्यांनी केलेले आवाहन विलक्षण उत्कटतेने भरलेले होते. एवढी गोष्ट नमूद केलीच पाहिजे. १९५४ सालीच - स्वातंत्र्योत्तर वाढल्या समस्याग्रस्ततेच्या प्राथमिक काळात - त्यांनी तळमळीने सांगितले की, "आज देशापुढे ज्या समस्या आहेत, जी संकटे आहेत किंवा उद्या ज्या समस्यांना आणि संकटांना तोंड देण्याची पाळी देशावर येण्याचा संभव आहे, त्यातून देशाला पुढे सुखरूप नेण्याचे सामर्थ्य केवळ आपल्याच कार्यात आहे. अन्य कोठल्याही कार्यामुळे ते घडणार नाही." एवढेच सांगून ते थांबले नाहीत तर प्रचारकांनी स्वत:संबंधीचा व्यक्तिगत विचार अंत:करणातून पूर्णपणे हद्दपार करून, हातचे काहीही राखून न ठेवता, सर्वस्वार्पणपूर्वक हे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यकर्त्यांना त्याग व समर्पण यासाठी प्रवृत्त करण्याचे विलक्षण सामर्थ्य श्रीगुरूजींच्या विचारांत, आचारात आणि वाणीत होते, यात शंका नाही. राष्ट्रजीवनाच्या निरनिराळया क्षेत्रांत गेलेल्या संघकार्यकर्त्यांच्या हालचालींना १९५४ साली थोडाफार प्रारंभ झालेला होता. वृत्तपत्रे, शिक्षणसंस्था, विद्यार्थी व कामगार यांच्या संघटना, राजकीय पक्ष संघटना आदि क्षेत्रात कार्यकर्ते काम करू लागले होते. त्यांच्या भूमिकेचा उल्लेख श्रीगुरूजींनी केला, तत्संबंधी विवेचन पुढे येईलच. पण शाखात्मक कार्यावरच सिंदीला श्रीगुरूजींनी सर्वस्वी भर दिला. राष्ट्रपुरूषाच्या पूजनाचा मार्ग म्हणून त्यांनी संघाच्या कार्यपध्दतीचा उल्लेख केला. याच कार्यात एकाग्र होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. या मार्गदर्शनानुसार संघकार्याची व्याप्ती सर्वत्र वाढविण्याचा प्रयत्न देशभर झाल्याचे यानंतरच्या काळात दिसून येते. कार्यकर्त्यांच्या गुणवत्तेवर प्रारंभापासूनच श्रीगुरूजींचा विशेष कटाक्ष. त्या गुणवत्तेकडे सिंदीच्या अनेक भाषणांत त्यांनी पुन: पुन्हा लक्ष वेधले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला देशभर काम

करण्यासाठी त्यागी प्रचारक कसे उपलब्ध झाले व तपानुतपे हे प्रचारक आपआपल्या कार्यक्षेत्रात ठाण मांडून कसे बसले, असा प्रश्न अनेकांना पडतो. या प्रश्नाचे नेमके उत्तर श्रीगुरूजींनी वेळोवेळी कार्यकर्त्यांशी केलेल्या विचारविनिमयात शोधायला पाहिजे. तसेच, डॉक्टरांचे जीवन आणि श्रीगुरूजींची तेजस्वी ध्येयवादी आवाहने यांचा प्रभावही ध्यानात घ्यावयास पाहिजे. हिंदू जीवनमुल्ये, अध्यात्म आणि राष्ट्रपुरूषांची परंपरा यासंबंधी श्रीगुरूजींचे चिंतन सूक्ष्म, सखोल आणि मर्मग्राही असल्यामुळे संघाच्या कार्यकर्त्यांनी कशाप्रकारे जीवनाचा विचार करावा, याचे सोदाहरण आणि स्फूर्तिप्रद विवेचन ते सहज करीत.

अशाप्रकारे संघकार्याचा सांधा नव्या परिस्थितीशी जुळवीत असताना समस्यांची वीण मात्र वाढतच होती. आपल्या देशाचे मोठे दुर्दैव म्हणावे लागते की, द्रष्टया महापुरूषांनी दिलेले संकटाचे इशारे आपण मनावर घेत नाही, सवंगपणाने काहीतरी मार्ग अनुसरतो आणि विपरीत परिस्थिती निर्माण करून ठेवतो. स्वातंत्र्यानंतरच्या सुमारे दहा वर्षाच्या काळात श्रीगुरूजी संघकार्याची वाढ करीत असतानाही सभोवारच्या घटनांवर सूक्ष्म लक्ष ठेवून होते. चुकीच्या धोरणांसंबंधी जनतेला आणि शासनाला सावध करीत होते. या काळातील त्यांची ठिकठिकाणची भाषणे चाळल्यास राष्ट्रहितासंबंधीचा त्यांचा हा सावधपणा प्रत्ययास येतो. विशेषत : फुटीरतेला, विघटनेला पोषक व राष्ट्रीय एकात्मतेला मारक अशा अनेक घटनांचा व प्रवृत्तींचा उल्लेख त्यांनी वेळोवेळी केला आहे. देशभक्तीचा मक्ता आपल्यालाच दिला आहे व हिंदूराष्ट्राची भाषा बोलणारे श्रीगुरूजी 'जातीयवादी' आहेत, अशा अहंकारने व वैचारिक प्रदुषणाने ग्रासलेल्या नेतृत्वाने श्रीगुरूजींचा हितबोध मनावर घेतलाच नाही. उदाहरणादाखल काही प्रश्नांचा उल्लेख केल्यास हे स्पष्ट होईल.

१९५२ नंतर भाषावार प्रांतरचनेची मागणी देशात जोर धरू लागली. या प्रश्नांवर भावना भडकविण्यात येऊ लागल्या. आपल्या भारताची राज्यघटना संघराज्यात्मक (फेडरल) आहे. राज्यपुनर्रचना आयोगाची नेमणूक झाल्यामुळे तर मागण्या, उलटसुलट दावे, यांना ऊत आला. श्रीगुरूजींचे स्पष्ट मत होते की, राज्यघटना संघराज्यात्मक नसावी. ती 'युनिटरी' (एकच केंद्रशासन आणि बाकी सारे कारभाराच्या सोयीनुसार प्रांत) स्वरूपाची असावी. परस्परविरोधी दाव्यांमुळे भारतातील राज्ये म्हणजे जणू एकमेकांविरूध्द उभी ठाकलेली शत्रुराष्ट्रे असो आभास सर्वत्र होऊ लागला. रक्तपाताची आततायी भाषा वापरण्यापर्यंत अनेकांची मजल गेली. या आंदोलनात कम्युनिस्ट पक्षाने तेल तर ओतलेच पण त्याची भूमिका भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला तडे पाडण्याची होती. प्रत्येक भाषिक राज्य हे एक भिन्न 'राष्ट्रक' आहे व भारत म्हणजे या राष्ट्रकांचा समुह आहे, असा प्रचार त्याने केला. अशा प्रकारे, पूर्वीचे ब्रिटीश राज्यकर्ते, सवंग लोकप्रियतेमागे लागलेले सत्तालोलुप राजकारणी, देशाचे छोटे छोटे हिस्से पाडून व त्याला दुबळा बनवून तो रशियन महासत्तेच्या दावणीला बांधण्यास उद्युक्त झालेले साम्यवादी इत्यादी सगळयांचा एकच कोलाहल चालू असताना त्यातून श्रीगुरूजींनी कणखर व निश्चयात्मक स्वरात राष्ट्राला सांगण्याचा प्रयत्न केला की भाषिक अभिनिवेशाला बळी पडून राष्ट्रीय एकात्मतेचे पूर्वापार सांस्कृतिक अधिष्ठान भग्न करण्यात धोका आहे.

मुंबईला या सुमारास एक प्रांतीयता विरोधी परिषद झाली. तिचे अध्यक्षस्थान श्रीगुरूजींनी भूषविले होते. परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. जमनादास मेहेता हे होते तर उद्-घाटक मुंबईचे त्यावेळचे महापौर श्री. डाह्याभाई पटेल होते. या परिषदेत श्रीगुरूजींनी अध्यक्ष पदावरून केलेले भाषण अतिशय परखड आणि विचारप्रवर्तक होते. भाषणाच्या प्रारंभीच ते म्हणाले, "मी एक देश, एक राज्य यांचा

समर्थक आहे. एकीकडे सगळया जगाचे एक राज्य करण्याची भाषा बोलली जाते. दुसरीकडे संपूर्ण भारताचे एक राज्य बनविण्याच विचार कोणी मांडला म्हणजे मात्र भुवया उंचावल्या जातात ! भारतात एकच मध्यवर्ती शासन पाहिजे आणि शासनव्यवस्थेच्या दृष्टीने राज्ये नकोत, तर विभाग असले पाहिजेत. आजचे आपले पुढारीही महाराष्ट्रीय, गुजराती वगैरे भिन्न भिन्न संस्कृती असल्याचे बोलतात. आमची तर आसेतुहिमाचल एकच संस्कृती आहे व संस्कृती हा राष्ट्राचा आत्मा असतो. देशाची संस्कृती, परंपरा, राष्ट्रधर्म आणि कुलधर्म यांचे रक्षण करा. देशाची धर्मशाळा बनवून चालणार नाही. सौदेबाजीची भाषा थांबवून आपल्याला राष्ट्राचा विचार केला पाहिजे."

भाषावार प्रांतरचनेला विरोध करणारी भुमिका श्रीगुरूजींनी अंगीकारली व स्पष्ट शब्दांत ती व्यक्त केली, याबद्दल त्यावेळी महाराष्ट्रात बरीच टीका झाली. पण अभिनिविष्ट टीकेची चिंता श्रीगुरूजींनी कधीच केली नाही. कोणत्याही कारणास्तव आपला राष्ट्रीय विवेक कधी ढळू दिला नाही. त्यांच्या या विवेकशीलतेचे प्रत्यंतर संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातच पुढे दोन प्रसंगानी येऊन गेले. पंतप्रधान पं. नेहरूनी भाषावार प्रांतरचना समितीच्या शिफारशीनुसार देशभर भाषिक राज्ये निर्माण केली. तत्पूर्वीही उग्र आंदोलनाच्या दडपणाखाली त्यांनी आंध्रचे राज्य मान्य केले होते. पण महाराष्ट्र व गुजरात यांचे विशाल द्विभाषिक राज्य ठेवण्यात आले. या निर्णयाविरूध्द उभय राज्यांत आंदोलने झाली. ती पोलिसी दडपशाही व गोळीबार यांच्या आधाराने मोडून काढण्याचा प्रयत्न झाला. या सरकारी कारवाईचा तीव्र निषेध श्रीगुरूजींनी केला. "गुंडांच्या साहाय्याने सरकार सत्याग्रहाचे आंदोलन दडपू पाहत आहे. सरकारकडून प्रोत्साहीत गुंडगिरी असह्य आहे. या गुंडगिरीचा मी तीव्र निषेध केला नाही, तर आपल्या कर्तव्यापासून मी च्युत होईन" अशा स्वरूपाचे पत्रकही त्यांनी काढले. दुसरा प्रसंग पं. नेहरूच्या हस्ते प्रतागडावर श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाचे अनावरण करण्याचे ठरले तेव्हाचा. संयुक्त महाराष्ट्र समितीने अविवेकीपणे पं. नेहरूच्या आगमनाला व अनावरण कार्यक्रमाला विरोध करण्याचे ठरविले. निदर्शनांची ही कल्पना राष्ट्रीयदृष्टया सर्वस्वी अनुचित असल्याचे मतप्रदर्शन श्रीगुरूजींनी प्रकटपणे केले. काँग्रेस शासनाने पं. नेहरूंच्या हस्ते अनावरणाचा जो कार्यक्रम ठरविला, त्यामागे राजकीय उदिष्ट होते, यात शंकाच नाही. मराठी जनतेच्या अनुनयाचा हा एक प्रयत्न होता. पण कोणत्याही कारणाने का होईना, भारताचे पंतप्रधान शिवाजी महाराजांचा गौरव करण्यासाठी येत आहेत ही चांगलीच गोष्ट आहे व तिला कोणी विरोध करणे म्हणजे छत्रपतींना लहान करणे होय, अशी भूमिका श्रीगुरूजींनी अंगीकारली. यासंबंधात काढलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले होते, "छत्रपतींच्या पुतळयाचे अनावरण करण्यास मान्यता देतानाही पं. नेहरूंना झुकावे लागले आहे. आज संपूर्ण भारताच्या शासनाचे सुत्रधार पं. नेहरू हे विलंबाने का होईना, एका असामान्य राष्ट्रपुरूषासंबंधी आदर व्यक्त करण्यास येत आहेत.

शिवाजी महाराज फक्त महाराष्ट्राचे आहेत हा गैरसमज दूर करणारा व या युगपुरूषाचे यथार्थ मोठेपण साऱ्या जगाला सांगणारा हा प्रसंग आहे. हा एक अपूर्व योग प्राप्त झाला आहे. याला कोणीही अपशकुन करू नये. याला अपशकुन करणे म्हणजे शिव छत्रपतींविषयी अनादर व अश्रध्दा प्रकट करणे होय. म्हणून माझी सर्व बंधू भगिनी आणि मातांना अशी विनंती आहे की, त्यांनी आपली सद्सद्-विवेकबुध्दी जागृत ठेवून या कार्यक्रमात सर्व प्रकारे सहकार्य द्यावे." श्रीगुरूजींच्या या पत्रकावर उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. पण या पत्रकाने संयुक्त महाराष्ट्राच्या कट्टर समर्थकांनाही विचार करावयास लावले व परिस्थितीला वेगळे वळण मिळाले. यात शंका नाही.

पंजाबी सुभ्याचा वाद पुढे निर्माण झाला व त्यातून पंजाब आणि हरियाणा हे दोन शासकीय प्रांत तयार झाले, हे सगळयांना ठाऊक आहे. हा वाद ज्यावेळी शिगेला पोचला होता त्यावेळीही श्रीगुरूजींनी आपली राष्ट्रीय ऐक्याची व सर्व भारतीय भाषा या राष्ट्रीय भाषा असल्याची भुमिका कधी सोडली नाही. भारतीय जनसंघाच्या त्या भागातील कार्यकर्त्यांनाही न रूचणारी स्पष्ट व नि: संदिग्ध भूमिका त्यांनी अंगीकारली. त्यांनी असे मत व्यक्त केले की ज्याची मातृभाषा पंजाबी आहे. त्यांनी प्रामाणिकपणे व राजकारणाचा विचार बाजूला सारून पंजाबी ही आपली मातृभाषा असल्याचे नोंदविले पाहिजे. पंजाबी मातृभाषा असताना हिंदी ही मातृभाषा असल्याची नोंद करण्याचा सल्ला जे देतात, ते मोठी चुक करीत आहेत. या मतप्रदर्शनामुळे अनेक आर्यसमाजी मंडळी श्रीगुरूजींवर मोठी नाराज झाली. जनसंघाच्या लोकांनाही अडचणीत सापडल्यासारखे वाटले. पण श्रीगुरूजींनी दिलेला सल्लाच राष्ट्रहिताचा होता, हे काळाने सिध्द केले. पुढे पंजाबात अतिरेकी कारवायांना पाकिस्तानच्या साहाय्याने जोर संघाची भूमिका अत्यंत संयमीत राहिली. शीख हे हिंदूच आहेत व हिंदू हिंदूत भांडणे लावून गृहयुध्द पेटविण्याचे राष्ट्रदोही कारस्थान यशस्वी होऊ द्यायचे नाही, या भुमिकेवरून संघ कार्यरत राहिला. बदला घेण्याच्या विचाराला त्याने कधीच थारा दिला नाही. याच धोरणाचा पंजाब शांत होण्याच्या दृष्टीने मोठा उपकारक परिणाम घडला, यात शंका नाही.

दक्षिणेकडील भाषिक विवादालाही राष्ट्रीय ऐक्याच्या व सर्व भारतीय भाषांविषयीच्या समान प्रेमाच्या आधारेच बोथट करून सोडण्याचा यशस्वी प्रयत्न श्रीगुरूजींनी केला. 'अप्रिय सत्य' सांगण्याचे प्रसंग श्रीगुरूजींवर या काळात अनेक आले. महाराष्ट्र - कर्नाटक् सीमाविवाद तर फारच नाजुक. पण प्रत्येक वेळी संपूर्ण भारताची सांस्कृतिक एकात्मता, हिंदू समाजात परस्पर प्रेमाची जोपासना आणि राष्ट्रीय अखंडता ही सूत्रे न सोडता जे हितावह तेच श्रीगुरूजींनी सांगितले.

राष्ट्रहिताच्या बारीकसारीक गोष्टींतही श्रीगुरूजी किती सावध होते, याची वाटेल तेवढी उदाहरणे त्यांच्या अखंड भ्रमणातील ठिकठिकाणच्या भाषणांतून दाखविता येतील. काही ठळक गोष्टींचाच जर संक्षेपाने उल्लेख येथे केला आहे. त्यांच्या या सावधपणाचा विचार मनात येतो, तेव्हा मला केरळातील वास्तव्यात त्यांनी सहजपणे काढलेल्या उद्-गारांचे स्मरण होते. प्रसंग असा घडला की तैलस्नानाच्या उपचारासाठी ते १९५६ साली पट्टाम्बी येथे गेले होते. पहिल्या दिवशी तैलस्नान आणि नंतर एक तास तैलमर्दन होऊन गरम पाण्याच्या आंघोळीसाठी श्रीगुरूजींना स्नानगृहाकडे नेण्यात आले. एवढयात तेथील वैद्यराज म्हणाले, "जरा जपून पाऊल टाका. विशेषत: स्नानगृहात काळजी घ्या. अन्यथा पाऊल घसरण्याची भीती असते."

श्रीगुरूजी स्नानगृहाच्या दारापर्यत पोचले होते. मागे वळून पाहत वैद्यराजांना ते अगदी उत्स्फुर्तपणे म्हणाले, "तुमचा इशारा योग्यच आहे. पण गोळवलकराचा जन्म पाय घसरून पडण्यासाठी झालेलाच नाही. सावधपणे प्रत्येक पाऊल निर्धारपूर्वक पुढे टाकण्याचा त्याचा स्वभाव लहापणापसूनच बनलेला आहे." या उद्-गारातून श्रीगुरूजींच्या स्वभावैशिष्टयांवर त्यांच्याच मुखातून उत्तम प्रकाश पडलेला आहे. सावधपण सर्वे विषयी हा समर्थांनी सांगितलेला गुण अत्यंत वादळी परिस्थितीतही त्यांच्या प्रत्येक शब्दांतून व्यक्त झालेला दिसतो.

भाषिक प्रश्न काय किंवा राज्यपुनर्रचनेचा प्रश्न का, आंदोलने, हिंसाचार आणि लोकक्षोभ यांचा स्फोट झाल्यानंतर सरकार मागण्या मान्य करते याचा श्रीगुरूजींना खेद होई. भाषिक आंध्राची मागणी भारत सरकारने श्रीरामुलु यांच्या हौतात्म्यानंतर मान्य केली हे उदाहरण होतेच. एकाच भाषेच्या

लोकांची एकाहून अधिक राज्य असण्यास श्रीगुरूजींचा विरोध नव्हता. आंध्रात तेलंगणाचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या मागणीने खूप जोर धरला होता. १९७३ च्या प्रारंभीची ही गोष्ट. हिंसा, सर्वजनिक मालमत्तेचा मोठया प्रमाणावर विध्वंस इत्यादी इतर प्रकार घडत होते. या निमित्ताने केलेल्या मतप्रदर्शनात श्रीगुरूजींनी म्हटले की, "उग्र आंदोलन केल्याविना मागणी पदरात पडत नाही हा आंदोलनकर्त्यांचा ग्रह व उग्र आंदोलन झाले तरच एखाद्या मागणीकडे वा समस्येकडे लक्ष द्यावयाचे ही सरकारी रीती यांचा परिणाम म्हणून शांतता व सुव्यवस्था यांची परिस्थिती बिघडण्याचा संभव आहे. कारण अशा प्रकारांतून कायद्यविषयीचा आदरच नष्ट होऊन जातो. हिंसात्मक स्फोटाची वाट पाहण्याचे कारणच काय? जर मागणी न्याय्य व तर्कसंगत असेल तर ती मान्य करावी, हाच उत्तम मार्ग. जर आंध्र आणि तेलंगणा यांना वेगळी राज्ये हवी असतील, तर ती देता येऊ शकतात. एकाच भाषेची दोन राज्ये असण्यात गैर काहीही नाही. सीमेवरील आणि लष्करीदृष्टया महत्वाच्या प्रदेशांत मात्र नवी राज्ये निर्माण करताना अधिक सावध असावयास पाहिजे. आसमची राष्ट्रविरोधी शक्तींच्या दडपणाखाली सात राज्यांत विभागणी होऊ शकते तर आंध्राची सौहार्दपूर्ण वातावरणात दोन राज्ये का करता येणार नाहीत? वस्तुस्थिती ही आहे की केवळ भाषिक आधारावर राज्यांच्या पुनर्रचना करणे हेच चुकीचे पाऊल होते. अद्यापही, प्रशासकीय सोयीनुसार, केवळ भाषिक आधारावर नव्हे, राज्यांची पुनर्रचना केल्यास विघटनवादी प्रवृत्तींना आळा बसू शकेल. एकात्म (Unitary) राज्यपध्दती आपल्या देशाच्या प्रकृतीशी अधिक जुळणारी आहे, हे माझे मत कायमच आहे.

राष्ट्रीय संदर्भात आणखी दोन प्रश्नासंबंधी मतप्रदर्शन या काळात श्रीगुरूजींना करावे लागले. त्यांपैकी एक प्रश्न गोमंतकाचा. १९४७ साली ब्रिटीश सत्ता भारतातून नष्ट झाली तरी पोर्तुगीजांनी मात्र गोव्याची मुक्तता मनात देखील आणली नाही उलट, हा प्रदेश कायम पोर्तुगालकडे राहावा असा प्रयत्न त्यांनी सुरू ठेवला. गोवा ही वसाहत नसून पोर्तुगीज राष्ट्राचाच एक अविभाज्य भाग आहे अशी भूमिका पोर्तुगालने घेतली. या दुराग्रहाविरूध्द खुद्द गोव्यात व्यापक जन - आंदोलन घडविण्याची शक्यता नव्हती. कारण तिथे कायदा दंडुकेशाहीचा होता. म्हणून गोव्याबाहेरच्या भारतीयांनी गोवा मुक्तीसाठी आंदोलन सुरू करण्याचे ठरविले. या कार्यासाठी पुण्यात "गोवा विमोचन समिती" ची स्थापना करण्यात आली. या समितीत सर्व राजकीय पक्षांच्या व राजकीय पक्षाबाहेरीलही लोकांना स्थान होते. प्रथम भारत सरकारने कारवाई करून गोमंतकाची मुक्ती घडवून आणावी, अशी मागणी करण्यात आली आणि नंतर गोवामुक्तीसाठी सत्याग्रह आंदोलन सुरू करण्यात आले. १९५५ मधील या आंदोलनात संघाच्या अनेक कर्यकर्त्यांनी उत्साहाने भाग घेतला. एकाचा तर पोर्तुगीज सैनिकाच्या गोळयांनी बळीही घेतला. अमानुष अत्याचार सत्याग्रहींवर झाले. तेव्हा भारत सरकारने कारवाई करावी व गोव्याची मुक्तता घडवून आणावी अशी मागणी पुन्हा जोराने झाली. पण पोर्तुगीज वसाहतवादाविरूध्द कारवाई करण्याऐवजी सत्याग्रहींवरच आपल्या सरकारने निर्बंध लादले व आंदोलन चालू ठेवणे अशक्य करून सोडले. या आंदोलनाकडे आणि भारत सरकारच्या धोरणाकडे श्रीगुरूजींचे बारकाईने लक्ष होते. दि. २० ऑगस्ट १९५५ रोजी श्रीगुरूजींनी मुंबई येथे एक पत्रक प्रकाशित केले. त्यात त्यांनी म्हटले की, "गोव्यात पोलिस कारवाई करून गोवा मुक्त करण्याची ही उत्कृष्ट संधी आहे. यामुळे आमची प्रतिष्ठा वाढेल व शेजारची जी राष्ट्रे आम्हाला सतत धमकी देत असतात त्यांनाही वचक बसेल." श्रीगुरूजी असे म्हणत असत की पाश्चात्य राष्ट्रांच्या आणि विशेषत: इंग्लंडच्या दडपणामुळेच भारत सरकार गोव्याच्या प्रश्नावर निकराचे पाऊल उचलत नाही. इंग्लंडची इच्छा भारत सरकारला एवढी प्रमाण वाटत असेल तर मग आपल्याला मिळालेल्या राजकीय स्वातंत्र्याची काही किंमत उरत नाही, असे ते कोणाची भीड न

बाळगता सांगत. गोव्यात प्रश्न आहे, असे ते मानीत. स्वत: पं. नेहरूंनी नेतृत्व हाती घेऊन सत्याग्रहाचे आवाहन केले, तर तिरंगी ध्वजाखाली ते सांगतील तितक्या स्वयंसेवकांना सत्याग्रहासाठी पाठविण्याची माझी तयारी आहे, असे ते म्हणत. पण हा प्रश्न अशा प्रकारे राष्ट्रीय मानून सर्व राष्ट्रवादी शक्ति एकत्रित करण्याचा प्रयत्न काँग्रेस नेतृत्वाने केलाच नाही. विरोधी पक्ष आंदोलन करताहेत असेच त्याने मानले.

गोवा - मुक्तीच्या प्र नावर श्रीगुरूजींच्या भावना अतिशय तीव्र होत्या. आपल्या आसिन्धुसिन्धु मातृभूमीचा तो एक अविभाज्य भाग. गोमंतकाशी इतिहासातील किती तरी स्मृती निगडित झाल्या आहेत. भारत सरकार जर शस्त्रबलाचा उपयोग करून गोवा मुक्त करावयास पाऊल पुढे टाकत नसेल तर काय करावयाचे, हाच खरा प्रश्न होता. १९५५ मधील सत्याग्रहाचा अनुभव ध्यानात घेऊन काही 'कृति' भारतातील जनतेनेच केली, तर त्या गोष्टीला श्रीगुरूजी सर्वस्वी अनुकूल होते. संघाच्या काही तेजस्वी तरूणांनी सशस्त्र कारवाई करून दादर - नगरहवेलीची मुक्तता प्रत्यक्षात घडवून आणलेली होती. श्रीगुरूजींशी प्रत्यक्षपणे विचारविनिमय करून हा मुक्तिसंग्राम झाला नसला, तरी 'त्यांची संमती आम्ही गृहीत धरली होती' असे या लढयातील युवकांपैकी एक श्री. सुधीर फडके यांनी आपल्या आठवणीत नमूद केलेले आहे.

श्री. सुधीर फडके यांनी म्हटले आहे की, प्रत्यक्ष गोमंतकाची मुक्तता घडवून आणण्याची एक योजनाही १९६२ च्या सुमारास त्याच तरूण गटाने आकारास आणली होती. श्री. सुधीर फडके व ही तरूण मंडळी यांचा डॉ. पुंडलिक गायतोंडे, श्री. मोहन रानडे इत्यादी गोमंतकीय स्वातंत्र्यवीरांशीही जवळून संपर्क होता. डॉ. पुंडलिक गायतोंडे इंग्लंडहून भारतात परतले होते. व त्यांनाही गोवा - मुक्तीची तीव्र तळमळ होती. अखेर एक योजना निश्चित करण्यात आली. तिचा साररूप भाग हा होता की भारताच्या सीमेलगत असलेला काही भूभाग सशस्त्र संघर्षाच्या मार्गाने प्रथम मुक्त करावयाचा आणि तेथे डॉ. गायतोंडे यांचा प्रमुखत्वाखाली स्वतंत्र शासन प्रस्थापित करावयाचे. या योजनेला श्रीगुरूजींची संमती होती. मनुष्यबळ व द्रव्यबळ यांकडेही लक्ष देण्यास ते तयार होते. त्यांची तीनदा श्री. सुधीर फडके यांनी भेट घेतली. श्रीगुरूजींचा सावधपणा इथेही दिसून आला. डॉ. गायतोंडे व पंतप्रधान पं. जवाहरलालजी यांचे फार निकटचे संबध होते. पं. नेहरूंनी विरोध केला तरीही या कार्यात पुढाकार घेणार का, याचे नि:संदिग्ध उत्तर डॉ. गायतोंडे यांच्याकडे मागण्यास त्यांनी सुधीर फडके यांना सुचविले. त्याप्रमाणे होकारार्थी उत्तर आल्यानंतरच योजनेला हिरवा कंदील यांनी दाखविला. चढाई करणारे स्वयंसेवक गोवा हद्दीत प्रविष्ट होईपर्यत भारत सरकारकडून अडथळा तर होणार नाहीच, पण सर्व प्रकारे सहकार्य व मार्गदर्शन मिळेल, असेही आश्वासन लाभले. पण स्वयंसेवकांनी स्वत:च्या बळावर काही करण्याआधीच त्यांना कळले की भारतीय सेना गोव्याकडे निघाली आहे ! कृष्ण मेनन यांच्या निवडणूकीचा मुहूर्त (१९६२) त्यासाठी लाभला ! स्वयंसेवकांना आपला पराक्रम दाखविण्याची आणखी एक संधी मिळू शकली नाही हे खरे असले, तर भारत सरकारची कारवाई नि:संशय स्वागतार्ह होती. ती फार उशिरा झाली एवढेच! श्रीगुरूजींनी संघर्षाच्या या योजनेत लक्ष घालून त्यांना मार्गदर्शन केले, हेच त्यांच्या राष्ट्रनेतृत्वाच्या संदर्भात मुख्यत: ध्यानात घ्यावयास पाहिजे. 'संघ काही करणार नाही, संघाचे स्वयंसेवक करतील' या कटाक्षाने पाळल्या गेलेल्या धोरणाचे मर्मही श्री. सुधीर फडके यांच्या निवेदनावरून ध्यानात येऊ शकेल.

जगाने या कारवईविरूध्द अपेक्षित टीकाही केली.  परंतु हा प्रश्न सरकारने राष्ट्रीय भूमिकेवरून पूर्णत: निकालात काढला असे मात्र म्हणता येत नाही.  पंतप्रधान नेहरूपासून अनेक राजकीय धुरीणांनी गोव्याच्या वेगळया संस्कृतीचे जतन केले जाईल, अशी आश्वसने देण्यास प्रारंभ केला.  शेजारच्या राज्यात गोव्याचे विलनीकरण न करता त्याचे केंद्राच्या नियंत्रणाखालील प्रदेश म्हणून वेगळे अस्तित्व कायम ठेवले.  त्यामुळे 'अल्पसंख्य' ख्रिस्ती समाजाचे राजकीय हिसंबंध निर्माण झाले व राजकारण अस्थिर बनले.  ही वेगळया संस्कृतीची भाषा श्रीगुरूजींना मुळीच पसंत पडणारी नव्हती.  त्यांनी ठणकावून सांगितले, "वेगळी संस्कृती गोव्यात असेल तर ती पोर्तुगीजांची होय. गोव्याची वेगळी संस्कृती नाही. सगळया भारताची संस्कृती एकच आहे."  राष्ट्राच्या सांस्कृतिक एकात्मतेला तडा जाऊ नये व प्रादेशिक विविधता म्हणजे भिन्न संस्कृती नव्हे, या सत्याकडे मतलबी डोळेझाक होऊ नये, म्हणून श्रीगुरूजी फार सावध असत.  त्यांचा हा सावधपणा पदोपदी प्रत्ययास येत असे.

याचे प्रत्यंतर काश्मीर समस्येच्या बाबतीतही निरपवादपणे आले.  काश्मीरचे भारतात विलीनीकरण झाले.  त्यासाठी श्रीगुरूजींचे प्रयत्न प्रामुख्याने कारणीभूत झाले होते.  हे प्रयत्न, त्या अत्यंत संकटग्रस्त काळात, सरदार पटेल यांच्या इच्छेनुसारच श्रीगुरूजींनी यशस्वीपणे केले होते. तो १९४७ चा ऑक्टोंबर महिना होता.  काश्मीरचे महाराजे हरिसिंग यांची मन:स्थिती विलीनीकरणाच्या प्रश्नावर डळमळीत होती. काश्मीर गिळंकृत करण्याची नवनिर्मित पाकिस्तानला घाई झाली होती. काश्मीर महाराजांच्या लष्काराचा बीमोड करून श्रीनगरवर कब्जा करणे पाकिस्तानला सहजसुलभ होते. गृहमंत्री सरदार पटेल यांची इच्छा जम्मु - काश्मीर भारतात राहावा, अशी होती.  ऑक्टोबरमध्येच टोळीवाल्यांच्या नावावर पाकिस्तानी सैनिकांनी काश्मीर खोऱ्यात आक्रमण सुरू केले. दिनांक २० ऑक्टोंबरला श्रीनगरात पाकिस्तानी ध्वज फडकवून विजयोत्सव साजरा करण्याची त्यांची योजना होती.  महाराजांच्या सेनेतील मुसलमान सैनिक शत्रुला जाऊन मिळणार अशीही गुप्त वार्ता मिळालेली होती.

पंतप्रधान पं. नेहरू शेख अब्दुल्लांचा कैवार घेऊन अडून बसले होते.  विलीनीकरण करारावर सह्या झाल्याखेरीज काश्मीरात साहाय्य पाठवावयाचे नाही, हा त्यांचा पक्का निर्धार होता.  यात काश्मीर पाकच्या घशात जाण्याचा धोका अगदी उघड होता.  अशा पेचात सरदार पटेल सापडले असताना महाराजा हरिसिंग यांचे मन वळविण्यसाठी कोणालातरी पाठविण्याची योजना त्यांच्या मनात होती.  अखेर त्यांनी श्रीगुरूजींना दिल्लीला पाचारण केले व श्रीनगरला जाऊन कामगिरी यशस्वी करण्यासाठी गळ घातली.  जम्मू - काश्मीरचा प्रदेश भारतातच राहावा अशी श्रीगुरूजींचीही इच्छा होतीच.  मुख्य अडचण होती ती पं. नेहरूंनी शेख अब्दुल्ला यांच्या संबंधात घातलेल्या अटींची. नेहरूंच्या अटी मान्य करूनही विलीनीकरण पत्रावर सह्या करण्यासाठी महाराजांचे मन वळविण्याची कामगिरी गुरूजींवर येऊन पडली.  पटेलांनी काश्मीरचे तत्कालीन पंतप्रधान श्री. मेहेरचंद महाजन यांच्याकडून श्रीगुरूजींना भेटीचे निमंत्रण येईल अशी व्यवस्था केली.

पाकिस्तानी आक्रमण श्रीनगरच्या दिशेन झेपावत होते आणि काश्मीरच्या भवितव्याचा तो निर्णायक मागणी करण्यासाठी गेले होते.  प्रत्येक क्षण महत्वाचा होता. मेहेरचंद महाजन दिल्लीला साहाय्याची मागणी करण्यासाठी गेले होते.  तिथे पं. नेहरू अडून बसलेले होते.  काश्मीरचे महाराज हरसिंग आणि श्रीगुरूजी यांची भेट १७ ऑक्टोबर रोजी झाली.  महाराज आणि मेहेरेचंदजी यांच्या सर्व शंकांचे समाधान श्रीगुरूजींनी केले.  निष्कर्ष म्हणून पुढील काही गोष्टी सांगता येतील.

१. काश्मिरी प्रजेच्या मीठ, रॉकेल, खाद्यपदार्थ वगैरे गरजेच्या वस्तू रावळपिंडीमार्गे पाकिस्तानातून येतात. जम्मू - श्रीनगर मार्ग चांगला नाही. पाकिस्तानने हा मार्ग बंद केला तर काश्मिरी जनतेची उपासमार होईल.

यावर असे आश्वासन भारत सरकारच्या वतीने श्रीगुरूजींनी दिले की सर्व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा चालू ठेवण्याची संपूर्ण काळजी भारत सरकार घेईल. संघाचे स्वयंसेवक देखील या बाबतीत शक्य तो पुढाकार घेतील. परिस्थितीची उत्तम जाण सरदार पटेल यांना आहे.

२. शेख अब्दुल्ला यांच्या हाती सत्ता सोपविली तरी त्यांना भारतविरोधी कारवायांपासून रोखण्यास सरदार पटेल समर्थ आहेत. विलीनीकरणानंतर पुढच्या अनेक गोष्टी सरदार पटेलांवर सोपविणेच योग्य. त्यांच्यावर आज विश्वास ठेवावयास पाहिजे.

३. संस्थानाचे स्वातंत्र्य घोषित केल्यास भारतीय सेना साहाय्यार्थ येऊ शकणार नाही. लगेच रावळपिंडीहून आक्रमण होईल व स्वातंत्र्य संपुष्टात येईल. म्हणून ताबडतोब विलीनीकरण एवढाच पर्याय उरला आहे. त्या दृष्टीने ज्या औपचारिकता असतील त्या ताबडतोब पूर्ण कराव्यात.

महाराज हरिसिंग विलीनीकरणाला तयार झाले. सरदार पटेलांना तसे कळवावे व सगळया औपचारिकता विनाविलंब पूर्ण कराव्या असेही ठरले. २६ ऑक्टोबर रोजी करारावर सह्या झाल्या आणि दिनांक २७ रोजी सकाळपासून भारतीय सैनिक श्रीनगरच्या विमानपट्टीवर उतरू लागले.

या भेटीत व चर्चेत महाराज हरिसिंग यांनी सघाच्या स्वयंसेवकांची फार प्रशंसा केली ते म्हणाले, “सघाच्या स्वयंसेवकांनी आम्हाला वेळोवेळी अत्यंत महत्वाच्या वार्ता पुरविल्या आहेत. प्रथम तर त्या वार्तावर आमचा विश्वास बसत नव्हता. पण आता मात्र संघ - गोटातून मिळालेल्या वार्ता पूर्णत: विश्वसनीय वाटतात. पाकिस्तानी सेनेच्या हालचालीसंबंधी वार्ता मिळविताना संघाच्या स्वयंसेवकांनी जे साहस दाखविले, त्याची प्रशंसा करावी तेवढी थोडीच.”

भारतीय सेना श्रीनगरच्या विमानतळावर दिनांक २७ रोजी उतरू शकली, याचे श्रेयही संघाच्या स्वयंसेवकांकडेच जाते. तो विमानतळ चांगल्या स्थितीत नव्हता आणि शत्रूचा केव्हाही हल्ला होण्याचा धोका होता. पण सर्व अडचणीवर मात करून स्वयंसेवकांनी तळाची दुरूस्ती व साफसफाई केली. श्रीनगर येथील एका जबाबदार कार्यकर्त्यांच्या निवेदनानुसार, संघाच्या २०० स्वयंसेवकांनी झटपट शस्त्रात्रे चालविण्याचेही शिक्षण घेतले. सरकारकडून काही शस्त्रे त्यांनी मिळविली व विमानतळाचे संरक्षण केले. भारतीय लष्कराच्या तुकडया उतरल्यानंतरच त्यांनी जागा सोडल्या व सेनेचे जवान संरक्षणाच्या कामी खडे झाले. या सगळ्या धडपडीत काही स्वयंसेवकांना हौतात्म्यही पत्कारावे लागले.

श्रीगुरूजींची काश्मीरसंबंधांतील अपेक्षा मात्र पूर्णत: सफल झाली नही व याबद्दलची खंत त्यांनी नंतर वेळोवेळी व्यक्तही केली. भारतीय जवानांनी तथाकथित टोळीवाल्यांना काश्मीरच्या सीमेबाहेर पिटाळून लावण्याची मोहीम द्रुतगतीने आणि यशस्वीपणे चालविली होती. संपूर्ण जम्मू - काश्मीर आक्रमणयुक्त होणार असे वाटत होते. पण नेहरूंच्या धोरणासंबंधीची पाल गुरूजींच्या मनात चुकचुकत होतीच. नेहरूंनी अचानक एकतर्फी युध्दबंदी केली आणि काश्मीरच प्रश्न संयुक्त लष्करी कारवाई थांबवू नये, असे श्रीगुरूजीचे मत होते. काश्मीरच प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात नेण्यात आपण चूक केली आहे. असा अभिप्राय श्रीगुरूजींनी लगेचच व्यक्त केला. ‘युनो’ मोजक्याच शक्तिसंपन्न राष्ट्रांच्या हितसंबधी

डावपेचांचा आखाडा बनला आहे व भारताला तेथे न्याय मिळावयाचा नाही, हा गुरूजींचा इशारा काळानेच खरा ठरविला आहे. काश्मीरचा प्रश्न सोडविण्यासंबंधी श्रीगुरूजींच्या कल्पना अतिशय स्पष्ट होत्या. त्यांचे असे मत होते की, भारताने काश्मीर, इतर शेकडो संस्थानांप्रमाणेच, भारतात पूर्णत : विलीन कसे होईल, याचाच केवळ विचार करावयास पाहिजे. "इतर प्रांतांतील लोकांना तेथे वास्तव्य करण्यास पाठवून 'काश्मीरीपणा'चा बाऊ नाहीसा करावयास पाहिजे. ३७० वे कलम रद्द करण्यास सरकारचे मन वळविणे आवश्यक आहे. म्हणजे इतर प्रातांच्या पातळीवर जम्मू - काश्मीरला आणता येईल." असे मतप्रदर्शन त्यांनी केलेले आढळते. पण दुर्दैवाने शेख अब्दुल्लाच्या नेतृत्वाखालचे काश्मीरचे वेगळेपण कायम ठेवण्यात आले. काश्मीरचा वेगळा ध्वज व तेथील मुख्यमंत्र्याला वेगळी प्रतिष्ठा असा प्रकार सुरू झाला. पं. नेहरू काश्मीरचा प्रश्न  निकालात काढण्यासाठी सार्वमताचीही भाषा बोलू लागले. या धोरणाविरूध्द काश्मीरविरूध्द काश्मीरमध्ये आवाज उठविण्याचा प्रयत्न डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी केला. 'एक देश में दोन निशान, दो विधान, दो प्रधान नही चेलेंगे' ही त्यांची न्यायोचित घोषणा होती. घटनेती ३७० वे कलम रद्द करून काश्मीरचे संपूर्ण विलीनीकरण भारतात करावे ही त्यांची मागणी होती. डॉ. श्यामाप्रसादजींना काश्मीरात अटक झाली. तुरूंगात डांबण्यात आले व तेथेच त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला.

या घटनेने सगळा देश हादरला. श्रीगुरूजींना तर फारच मोठा धक्का बसला. ते सुन्न होऊन गेले. याचे कारण असे की, राजकीय क्षेत्रात निर्लेप राष्ट्रवादी भूमिका घेऊन उभी राहणारी शक्ती डॉ. श्यामाप्रसादांच्या नेतृत्वाखाली पृष्ट होईल, असे श्रीगुरूजींना वाटत होते. या कार्यासाठी काही चांगले सहकारी त्यांनी डॉ. श्यामाप्रसादांना दिले होते. डॉ. श्यामाप्रसादांच्या अनपेक्षित व अकाली अंताने ते आशास्थानच एकाएकी कोलमडून पडले. श्रीगुरूजींचे असे प्रामणिक मत हेते की, सत्याग्रहाचे नेतृत्व करण्यासाठी डॉ. श्यामाप्रसादांनी प्रारंभीच जातीनिशी तेथे जाण्याची आवश्यकता नाही. तो धोका त्यांनी पत्करू नये. पुढे एका भाषणात श्यामाप्रसादजींचे पुण्यस्मरण करताना त्यांनी ही माहिती सांगितली. 'तुम्ही जाऊ नका' असा निरोप श्रीगुरूजींनी मुद्दाम डॉ. श्यामाप्रसादांना पाठविला होता. पण तत्पूर्वीच सगळया कार्यक्रमाची घोषणा होऊन गेली होती आणि पाऊल मागे घेण्याची कल्पना त्या मानधन नेत्याला मानवली नाही. "त्यांचे निधन ही माझी वैयक्तिक हानी आहेच, पण त्याहीपेक्षा देशाचे फार मोठे नुकसान झाले आहे." असे उद्-गार त्यांनी श्यामाप्रसादजींच्या मृत्यूची वार्ता कळल्यानंतर काढले. डॉ. मुखर्जीसारखा मोहरा बळी गेला, पण काश्मीरचा प्रश्न सुटला नाही. आजही तो तितकाच उपद्रवकारक आहे. शेख अब्दुल्ला यांना १९५३ साली अटक झाली खरी, पण पुन्हा कालांतराने त्यांच्या हाती सत्तेची सूत्रे गेली. त्यांनी दोन्ही डगरींवर हात ठेवून तिथे घराणेशाही आणि मुस्लिमांचे प्राबल्य निर्माण करण्याचे धोरण बेदरकारपणे चालू ठेवले. सार्वमताची भाषा परिस्थितीच्या दडपणाखाली मागे पडली आहे. सार्वमताची कल्पना प्रथम पुढे आली तेव्हाच श्रीगुरूजींनी तिचे अराष्ट्रीय स्वरूप स्पष्ट केले होते. राष्ट्र हे एखाद्या सजीव शरीराप्रमाणे असते. एकेका अवयवाचा स्वतंत्र विचार करता येत नाही. सर्वामत घ्यावयाचेच झाल्यास ते संपूर्ण भारतात घेतले पाहिजे, केवळ काश्मिरात नव्हे, असे श्रीगुरूजींचे नि:संदिग्ध प्रतिपादन होते. 'काश्मीरच्या भवितव्याचा प्रश्न हा काश्मिरी लोकंचा आहे' या पं. नेहरूंच्या मताचा प्रतिवाद करताना श्रीगुरूजींनी म्हटले, "हिमाल्यापासून कन्याकुमारीपर्यंत संपूर्ण भारत एक आहे, या संपूर्ण प्रदेशावर भारतीयांचा हक्क आहे. काश्मीर काश्मिरी लोकांचा आहे, असे म्हणणे अगदी अनुचित आहे."

ईशान्य भारताचा प्रश्न आज अतिशय स्फोटक होऊन बसला आहे. मेघालय, मिझोराम व नागालँड ही तीन ख्रिस्ती वर्चस्वाची राज्ये निर्माण झाली आहेत,तर आसामात घुसखोरीने बहुसंख्य बनण्याचा प्रयत्न इस्लामपंथीय करीत आहेत. त्रिपुरा व मणिपूरही अशांत आहेत. अरूणाचलातील लोकांनाही प्रदेशाबाहेर प्रलोभने दाखवून त्यांचे ख्रिस्तीकरण मोठया प्रमाणावर करण्यात येत आहे. या सगळया परिस्थितीचा वेध घेऊन आवश्यक ती सावधगिरीची सूचना श्रीगुरूजी वारंवार देत असत. अगदी १९५१ साली त्यांनी स्वयंसेवकांपुढे व निमंत्रित नागरिकांपुढे मकरसंक्रमणानिमित्त केलेल्या भाषणात देखील प्रश्नाचा उल्लेख आढळतो. आसामातील घुसखोरीकडेही वारंवार लक्ष वेधत असत. ईशान्य सीमाप्रदेशात ख्रिस्ती मिशनरी कोणत्या राष्ट्रविरोधी कारवायात दंग आहेत व परंपरागत धर्मनिष्ठांना सुरूंग लावून हिदू समाज खिळखिळा करण्याचे प्रयत्न कसे चालू आहेत. याची समग्र माहिती प्रतिवर्षी त्यांच्या भारतभ्रमणात त्यांना उपलब्ध होत असे. नागपूरला संघकार्यालयात त्यांच्या बैठकीमध्ये जाऊन बसले तरी परिस्थितीचे ज्ञान होऊन जाई. पुढे विश्व हिंदू परिषदेच्या कार्यावर श्रीगुरूजींनी विशेष भर दिला व ईशान्येकडे अनेक संमेलने भरविली. त्याचा उद्देश जे वनवासी बंधू अद्याप हिंदू राहिले आहेत. त्यांना एकत्र आणणे व हिंदूत्वाची भावना त्यांच्या ठायी वाढविणे हाच होता. पण या समस्येचा मूलगामी विचार शासनाच्या धुरीणांनी योग्य वेळी आणि योग्यप्रकारे न केल्यामुळे ती जटिल होऊन बसली आहे. ‘नागालॅण्ड भारताचा अविभाज्य भाग आहे तर नागालॅण्डचा संबंध सरळ परराष्ट्रखात्याशी का? गृहखात्याशी का नाही?’असा सवाल ते करीत.

असे हे स्वतंत्र भारतापुढील समस्यांच्या बाबतीत श्रीगुरूजींचे शंभर टक्के राष्ट्रीय मार्गदर्शन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही जर राजकीय संघटना नाही, तर राजकीय धोरणांवर बरीवाईट टीका का करता, असा प्रश्न श्रीगुरूजींना वारंवार विचारला जाई. त्यावर ते स्पष्ट सांगत की, सत्ता संपादन करण्यात संघाला रूची नाही. पण ज्या धोरणांचा परिणाम राष्ट्राचे संरक्षण, त्याची सांस्कृतिक एकात्मता, त्याचा आत्मविश्वास आणि स्वाभिमान यांवर विपरीत होईल हे दिसत असते, तिथे मतप्रदर्शन करणे हे आमचे कर्तव्यच आहे. या कर्तव्याचा निर्वाह श्रीगुरूजींनी दक्षतापूर्वक केला. पुढे चिनी आक्रमणासंबंधात जनतेला अंधारात ठेवण्याचा जो आरोप शासनावर झाला, त्याला गुरूजींनी आधीच वेळोवेळी केलेल्या माहितीपूर्ण वक्तव्यांचा मोठा आधार लाभला होता, हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

देशातील परिस्थितीचे श्रीगुरूजींचे आकलन किती सूक्ष्म होते व काही योजना दूरदृष्टीने ते कशा प्रकारे करून ठेवत असत यासंबंधी भारतीय मजदूर संघ संस्थापक श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी सांगितलेले एक उदाहरण उद्बोधक आहे. श्री. दत्तोपंत ठेंगडी यांच्याच बाबतीतील ते उदाहरण आहे.

घटना अशी घडली की १९६४ च्या मार्च महिन्यात भारतीय जनसंघाचे नेते पं. दीनदयाळजी यांनी दत्तोपंतांना श्रीगुरूजींचा एक निरोप कळविला. निरोप होता. “ताबडतोब लखनौला जाऊन राज्यसभेकरिता उमेदवारी अर्ज दाखल करावा.” वास्तविक, भारतीय मजदूर संघाचा दैनंदिन राजकारण वा राजकीय पक्ष यांच्यांशी संबंध नसताना एकाएकी ही सूचना का यावी, याचा उलगडा दत्तोपंतांना होईना. पण लखनौला जाऊन त्यांनी अर्ज भरला. पुढे ते राज्यसभेवर निवडूनही आले. यानंतर जेव्हा दत्तोपंतांची श्रीगुरूजींशी नागपूर येथे भेट झाली तेव्हा स्वाभाविकपणेच हा खासदारकीचा विषय निघाला. त्यावेळी श्रीगुरूजींनी आपल्या मनातील हेतु श्री. दत्तोपंतांना स्पष्टपणे सांगितले, श्रीगुरूजींचे सांगणे श्री. दत्तोपंतांनी नमूद करून ठेवले आहे ते असे : “मला असे वाटते की या देशात

हुकूमशाही आणण्याचा मोह राज्यकर्त्यांना होईल. माझा असा अंदाज आहे की अशी बिकट परिस्थिती निर्माण होईल त्यावेळी देशात एकही विरोधी पक्ष स्वत: च्या एकटयाच्या बळावर प्रतिकार करण्याच्या स्थितीत राहणार नाही. दडपले जाण्याची भीती मात्र सर्वांच्या मनात राहील. अशा वेळी विवश होऊन विरोधी पक्षातील अनेक लोक असा विचार करू लागतील की हुकूमशाहीचा विरोध करण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र यावे. विरोधी पक्षांचेही आपसात तीव्र मतभेद आहेत हे खरे, पण परिस्थितीच्या रेटयामुळे सर्वांना वाटेल की एकदा सर्वांच्या सम्मीलित प्रयत्नाने त्या हुकूमशाहीला तर प्रथम नष्ट करू या. ते झाल्यावर नंतर आपसातल्या भांडणांचा विचार करता येईल. परंतू त्यावेळी सर्वांसमोर हा प्रश्न राहील की सर्वांना एका मंचावर आणणयाचे काम कोण करील? कारण सर्व आपआपल्या पक्षाचे कट्टर समर्थक म्हणून प्रसिध्दी पावलेले आहेत. कोणत्याही पक्षाच्या अशा कट्टर माणसावर दुसऱ्या पक्षाचा माणूस भरवसा ठेवू शकत नाही.

"माझी अशी इच्छा आहे की ही भूमिका पार पाडण्याचे काम आपल्यापैकी कुणीतरी करावे. आज आपले जे लोक राजकीय क्षेत्रात आहेत त्या सर्वांविषयी बाहेर स्वाभाविकपणे हीच धारणा असणार की हे लोक विशिष्ट पक्षाचे कैवारी आहेत. त्यामुळे त्यांच्यापैकी कुणालाही ही भूमिका निभविणे कठीण जाईल. तुम्ही आता एम्. पी. झाला आहात व कोणत्याही पक्षात तुम्ही नाही. आता वरिष्ठ गोटात तुमचा सहजासहजी परिचय होईल. सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांशी बरोबरीच्या नात्याने तुम्ही वागू शकला.

"मला अपेक्षित असे हे काम तुमच्या हातून पार पडायचे असेल तर ते आवश्यक आहे की तुमची प्रतिमा पक्षातील अशी असावी. तरच तुमचे विभिन्न पुढाऱ्यांशी व्यक्तिगत संबंध निर्माण होऊ शकतील व तुमच्या शब्दावर ते विश्वास ठेवतील. पण हे घडून यावयाचे असेल तर त्यासाठी तुम्हाला फार मोठी किंमत द्यावी लागेल. ती म्हणजे विवादास्पद, खळबळजनक राजकीय प्रश्नांवर बोलणे अजिबात टाळावे लागेल. इतर विषयांवर बोलण्याचे ठरवावे लागेल आणि हे विषय इतरांना मिळमिळीत वाटणारे असतील. त्यामुळे तुम्हाला प्रसिध्दी मिळणार नाही. व्यक्तिगतरीत्या आपले नाव चमकावे ही महत्वाकांक्षा तुमच्या ठायी उदय पावू शकते. तसे गुण तुमच्यात आहेत. तेव्हा ही इच्छा तुमच्यात निर्माण झाली तर मी तुम्हाला दूषण देणार नाही. दोन्ही मार्ग तुमच्यापुढे आहेत. कोणताही पर्याय स्वीकारण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य तुम्हाला आहे. मी त्या बाबतीत काहीही आदेश देऊ इच्छित नाही. केवळ पुढील परिस्थिती संबंधीचा माझा अंदाज तुमच्या ध्यानात यावा म्हणून हे सांगितले आहे."

श्री. दत्तोपंतांनी श्रीगुरूजींना अपेक्षित तोच मार्ग विनातक्रार स्वीकारला. यानंतर सुमारे ११ वर्षांनी देशात आणीबाणी लागू झाली व त्या काळात विरोधी पक्षांना प्रतिकारासाठी एकत्र आणण्याच्या कामी श्री. दत्तोपंतांनी अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडली. या प्रयत्नांतूनच जनता पक्ष आकारास आला व हुकूमशाही लादू पाहणारे काँग्रेस सत्तेवरून खाली खेचले गेले. या संभाव्य संकटाची १९६४ मध्येच कल्पना करून परिस्थितीला योग्य दिशा देऊ शकणाऱ्या व्यक्तीला त्या कार्याची पूर्वतयारी करण्यासाठी श्रीगुरूजींनी निवडले, हेच इतिहासाने दाखवून दिले आहे. व्यक्तिगत मोठेपणाची आकांक्षा बाजूला ठेवून श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी श्रीगुरूजींची इच्छा प्रमाण मानली, हेही श्रीगुरूजींनी केलेल्या निवडीच्या अचुकपणाचेच एक गमक समजावे लागेल. हे पर्यवसान पाहण्यास स्वत: श्रीगुरूजी मात्र नव्हते!

श्रीगुरूजींच्या व्यक्तिगत जीवनाशी संबंधित अशा एका दु:खद घटनेचा उल्लेख या कालखंडाचा धावता आढावा संपविण्यापूर्वी करणे आवश्यक आहे. ही दु: खद घटना म्हणजे श्रीगुरूजीचे वडील श्री. भाऊजी यांचा हृदयविकाराने झालेला आकस्मिक मृत्यू ! मृत्यूसमयी श्री. भाऊजीचे वय ८२ वर्षांचे होते. श्री. भाऊजींचा अंत दिनांक २० जुलै १९५४ च्या रात्री केव्हातरी अंथरूणातच झाला. त्यावेळी श्रीगुरूजी नागपुरात नव्हते. दिनांक १७ रोजीच ते मातापित्यांना नमस्कार करून आणि त्यांचा आशीर्वाद घेऊन महाकोशलच्या दौऱ्यावर गेलेले होते. वडिलांच्या मृत्यूची तार त्यांना दिनांक २१ ला भोपाळ येथे असताना मिळाली. तेव्हा पुढचा दौरा स्थगित करून ते नागपूरकडे परतले. पण दरम्यान त्यांनी अत्यंसंस्कार उरकून घेण्याची सूचना नागपूरला दिली. दिनांक २२ पर्यंत अंत्यसंस्कार थांबवून ठेवणे त्यांना प्रशस्त वाटले नाही. श्रीगुरूजींच्या अनुपस्थितीतच हजारो स्वयंसेवकांसमवेत नागपूरला अंत्ययात्रा पार पडली. दिनांक २२ ला पहाटे श्रीगुरूजी नागपूरला पोहोचले. 'नागोबाची गल्ली' या नावाने प्रसिध्द असलेल्या बोळात श्री. भाऊजी व ताई (श्रीगुरूजींच्या मातोश्रीचे परिचित नाव) राहत असत. श्रीगुरूजींचा दिवसाचा बहुतेक वेळ संघकार्यालयातच जात असे. पण ते जेवायला घरी येत. ताईशी गप्पासप्पा होत. हास्यविनोद होई. स्वयंसेवकांची वर्दळ असे. भाऊजी मात्र काहीसे एकांतप्रिय होते. श्रीगुरूजींच्या मनाला आपल्या आईचा शोक पाहून किती व्यथा झाल्या असतील ! भाऊजींनी जे थोर संस्कारधन लहानपणापासून दिले त्याच्याही आठवणी मनात उचंबळून आल्या असतील. पण नेहमीप्रमाणेच चित्ताचा समतोल त्यांनी कायम राखला. भेटीला येणाऱ्यांची गर्दी उसळली होती आणि शोकसंदेशाचा वर्षाव होत होता. पाच दिवस नागपुरात राहून भाऊजींची उत्तरक्रिया त्यांनी नाशिकला पार पाडली. तिथेही मोठया संख्येने स्वयंसेवक आणि ठिकठिकाणचे कार्यकर्ते आलेले होते. ७ ऑगस्ट रोजी श्रीगुरूजी नागपूरला परतले आणि नंतर १० ऑगस्टपासून नित्याप्रमाणे त्यांची भ्रमंती सुरू झाली. व्यक्तिगत हानीचा फार काळ विचार करीत बसण्यासाठी त्यांच्याजवळ सवड होतीच कुठे?

## १४. व्यक्तीपेक्षा कार्य मोठे

१९४० मध्ये श्रीगुरूजींच्या खांद्यावर संघासारख्या राष्ट्रव्यापी आणि थोर राष्ट्रीय ध्येयवादाने प्रेरित संघटनेची जबाबदारी येऊन पडली, त्यावेळी त्यांचे वय ३४ वर्षाचे होते. कार्यमग्न जीवनाची आणखी १६ वर्ष पाहता पाहता उलटली व श्रीगुरूजींचा ५१ वा वाढदिवस स्वयंसेवकांच्या दृष्टीपुढे येऊ लागला, वाढदिवस कसा साजरा करावा यासंबंधी कार्यकर्त्यांत विचारविनिमय सुरू झाला. भव्य सत्काराची कल्पना पुढे आली. पण आपला सत्कार करून घेण्यास श्रीगुरूजी मुळीच तयार नव्हते. व्यक्तिगत बडेजाव आणि मानसन्मान यांचे आकर्षण त्यांना कधीच वाटले नाही. स्वयंसेवकाने संघटनेत विलीन होऊन जावे, अहंकाराचा स्वत:ला वाराही लागू देऊ नये व स्तुतीप्रिय तर असूच नये, असे ते सांगत. याच मुशीत त्यांनी आपले स्वत: चे जीवन ओतले होते. फक्त कार्याचाच विचार त्यांचे चित्त व्यापून असे. कठोर कर्मयोग आचारण्याची सवय त्यांनी नित्य साधनेने लावून घेतली होती मग त्यांना वाढदिवसानिमित्त सत्काराचा कार्यक्रम कसा रूचणार? स्वयंसेवकांची आपल्या नेत्याचा ५१ वा वाढदिवस साजरा करण्याची इच्छा व श्रीगुरूजींचा करडा नकार अशी रस्सीखेच वाढदिवसापूर्वी काही महिने चालू होती. अखेर स्वयंसेवकांच्या प्रेममय आग्रहापुढे त्यांनी मान तुकविली. तीही या स्पष्ट आश्वासनानंतर की वाढदिवसाच्या संपूर्ण कार्यक्रमाचा उपयोग संघाचे उदिष्ट जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करण्यासाठी होईल आणि सत्कारनिधी गोळा होईल तोही संघकार्याच्या वृध्दीसाठीच असेल.

कार्यक्रम असा ठरला की, दिनांक १८ जानेवारी १९५६ पासून देशभरात सर्व स्वयंसेवकांनी समाजबांधवांच्या घरोघर जावयाचे आणि श्रीगुरूजी आणि संघकार्य यांची ओळख त्यांना करून द्यावयाची. तसेच श्रीगुरूजींना समर्पण करण्यासाठी निधीही देण्याची त्यांना विनंती करावयाची. संपूर्ण भारतात वयात आलेल्या लोकांची जी संख्या आहे तीपैकी किमान दोन टक्के लोकांशी तरी प्रत्यक्ष संपर्क यावा, असे लक्ष्य ठरविण्यात आले. अवधी ५१ दिवसांचा. १९५२ मधील गोहत्याविरोधी आंदोलनानंतर एवढया मोठया प्रमाणावर जनसंपर्क करण्याची ही पहिलीच मोहीम होती. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अर्थातच पत्रके, आवाहने, वृत्तपत्रीय लेख, विशेषांक पुस्तिका वगैर विपुल साहित्य प्रकाशित झाले. कै. नाना पालकर यांनी श्रीगुरूजींचे चरित्र लिहिले तेही या निमित्तानेच, या काळात श्रीगुरूजींचे नाव देशभर गाजे. सर्वांच्या ध्यानात आले की, सरसंघचालक श्रीगुरूजींच्या रूपाने लक्षावधी तरूण - प्रौढांसाठी एक प्रेरणास्थान निर्माण झाले आहे. संघात आणि संघाबाहेर सामाजिक जीवनातही एक आगळीच राजकारणनिरपेक्ष प्रतिष्ठा या नेत्याने संपादन केली आहे. मुख्य म्हणजे या आपल्या नेत्यावर लोकांचे विलक्षण प्रेम आहे. हाही एक साक्षात्कारच होता. स्वयंसेवकांनी नागरिकांच्या घरोघर जाऊन जमविलेला निधी २० लक्ष रूपयांहून अधिक जमला.

प्रत्यक्ष विजया एकादशीच्या दिवशी (श्रीगुरूजींचा जन्मदिन) मुख्य धार्मिक विधी सकाळच्या वेळी श्रीगुरूजींच्याच घरी पार पडला. पूजा - अर्चा, होमहवन इत्यादी कार्यक्रम रीतसर झाले. हा सोहळा पाहण्यास भाऊजी नव्हते, पण ताई होत्या. त्यांच्या वत्सल छत्राखालीच माणसे जमली, फोटो काढणारांनी ताईची अनुज्ञा घेऊन मनसोक्त फोटो काढले. सायंकाळी डॉ. हेडगेवार भवन (संघाचे केंद्रीय कार्यालय), श्रीगुरूजींचे निवासस्थान आणि रेशीमबागेवरील डॉक्टरांची समाधी यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. श्रीगुरूजींच्या प्रकट सत्काराचा भव्य कार्यक्रम त्याच दिवशी झाला. देशभर

ठिकठिकाणी सत्यनारायण महापूजा, होम-हवने, मंत्रजागर, अभिषेक, अनुष्ठाने इत्यादी कार्यक्रम आपआपल्या रूचीनुसार स्वयंसेवकांनी केले. नागरिकांना मोठया प्रमाणावर त्यात सहभागी करून घेले. अभिनंदनपर पत्रे व तारा यांचा ढीग पडला. देशात प्रत्येक प्रांतामध्ये सत्काराच्या कार्यासाठी प्रतिष्ठितांची एक खास समिती तयार करण्यात आली होती आणि ठिकठिकाणी समारंभासाठी श्रीगुरूजींना सत्कारमूर्ती या नात्याने प्रवास करावयाचा होता. एक महिन्याचा हा प्रवास होता. पहिला प्रकट सत्कार दिनांक ८ मार्च रोजी नागपूरला झाला आणि सत्कार-कार्यक्रमांची समाप्ती ८ एप्रिल रोजी दिल्ली येथे झाली. प्रत्येक राज्यातील कार्यक्रमात अध्यक्षस्थान भूषविण्यासाठी नामवंत व्यक्तींची योजना स्थानिक समितीने केली होती. निधी - समर्पण, श्रीगुरूजींचे अभीष्टचिंतन आणि सत्काराला श्रीगुरूजींचे उत्तर असा समारंभाचा स्थूलमानाने कार्यक्रम असे. नागपूरला अध्यक्षपद सुप्रसिध्द इतिहासकार आणि संसद - सदस्य डॉ. राधाकुमुद मुखर्जी यांनी स्वीकारले होते, तर दिल्लीचा कार्यक्रम भारताचे पाकिस्तानातील माजी राजदूल डॉ. सीताराम यांच्या अध्यक्षतेखाली झाला. अन्यत्र, डॉ. धोंडो केशव कर्वे, सोनोपंत दांडेकर यांच्यासारख्यांचे शुभाशीर्वाद गुरूजींना लाभले.

या सत्काराच्या निमित्ताने ठिकठिकाणी केलेल्या भाषणांत श्रीगुरूजींनी कोणता विचार त्यांच्यावर उत्कट प्रेम करणाऱ्या असंख्य श्रोत्यांपुढे मांडला? नागपूरच्या भाषणातील काही अंश येथे उद्-घृत केला तर श्रीगुरूजी या प्रवासात काय बोलले याची काहीशी कल्पना येईल. मुख्य म्हणजे स्वत:ला गौण लेखून आणि संघकार्याला प्राधान्य देऊन फार नम्रपणे ते प्रत्येक ठिकाणी बोलले. नागपूरच्या भाषणात ते म्हणाले, गेल्या काही दिवसांत माझ्यासंबधी वृत्तपत्रात जे स्तुतीपर लिहिले गेले. त्यामुळे मी चकित झालो. एवढया मोठया संघटनेचे श्रेय एकाच व्यक्तीचे कसे असेल? संघाच्या प्रगतीत असंख्य कार्यकर्त्यांचा वाटा आहे. आपण मला श्रेय देत आहात ते आपल्या माझ्यावरील प्रेमापोटी. पण मी ते श्रेय कसे घेऊ? तुमचे माझ्यावरील प्रेम आहे, तेही एका व्यक्तीवरील प्रेम नसून संघावरील प्रेम आहे असे मी समजतो. माझी आपणा सर्वांना अशी विनंती आहे की, असेच प्रेम आपण ठेवावे आणि संघकार्य हे आपल्या जीवनाचे एक अंग बनवावे. कारण संघाचा विचार हा राष्ट्राचा विचार आहे. भारतमातेच्या गौरवाचा विचार आहे. आपल्या मातृभूमीवरील प्रगाढ श्रध्देचे पुनर्जागरण आवश्यक आहे. प्रत्येकासमोर संपूर्ण भारतमातेचे, तिच्या पुत्ररूप हिंदू समाजाचे आणि त्याच्या अतिप्राचीन काळापासूनच्या सांस्कृतिक राष्ट्रीय जीवनाचे चित्र हवे. भारतमातेचा दिव्य अभिमान अंत:करणात असेल, तर त्या आधारावर निष्ठा आणि चरित्र्यगुण यांचा आपल्या जीवनात संचार होईल. या गुणांनी संपन्न असा माणूस तयार झाला की, राष्ट्रीय उत्थानाच्या आणि कल्याणाच्या सर्व योजना सफल होतील. अशा समर्पित, कर्तव्यपरायण आणि अनुशासनबध्द जीवनातूनच पवित्र राष्ट्रीय शक्ती निर्माण होते. ही शक्ती संघाला निर्माण करावाची आहे.

"आपली पवित्र मातृभूमी आज अखंड आणि एकात्म आहे काय, याचा आपण विचार करा, आपले राष्ट्रीय ऐक्य किती मजबूत आहे? आपले वास्तविक राष्ट्रस्वरूप कोणते? राष्ट्र म्हणजे एकमेकांपासून भिन्न घटकांचे कडबोळे असते काय? प्रत्येकच विचारी माणसाच्या मनात असे प्रश्न उद्-भवत असतात. या प्रश्नांची उत्तरे संघाने पूर्वीपासून दिली आहेत. संघाचे कार्य व्यक्ती, प्रांत, पंथ, भाषा, पक्ष, जात या सर्व भेदांच्या पलीकडचे आहे. मातृभूमीच्या भक्तीची समान भावना जागवून सगळयांना एका सूत्रात गुंफावयाचे आहे. म्हणून आपण सर्वांनी क्षुद्र भेदांच्या वर उठून संघाच्या समावेशक व्यवसपीठावर एकत्र यावे.

“कार्य व्यक्तीपेक्षा मोठे असते. ते माझ्यावर अवलंबून आहे, असा अहंकार कोणाला असेल तर तो निरर्थक होय. व्यक्ती येतात आणि जातात, पण कार्य मात्र राहते. आज अनेक अहंकारी व्यक्तींना आपल्यानंतर काय होईल या चिंतेने ग्रासले आहे. ब्रिटीश राज्यकर्त्यांनाही आपल्यानंतर भारतात गोंधळ होईल, असे वाटत होते, पण आपल्या समाजात श्रेष्ठ गुणवत्तेचे अनेक पुरूष आहेत. एखादी थोर व्यक्ती गेली, तर तिचे कार्य इतर अनेकजण पुढे चालू ठेवतील. डॉ. हेडगेवार यांच्या मृत्यूनंतर आम्ही सगळेजण मिळून त्यांचे कार्य पुढे चालवीत आहोत. म्हणून माझी आपणाला विनंती आहे की, व्यक्तीचा विचार करू नका, कार्याचा विचार करा.

“कार्यकर्त्यांनी आपल्याकडे येऊन सांगितले असेल की, हे श्रीगुरूजींचे विचार आहेत. पण माझा कसलाच विचार नाही. आपली भारतीय परंपरा म्हणजे ज्ञानाचा महासागर आहे. त्यातून एखादा थेंब मी उचलला असेल एवढेच. आपल्या भारतात तर खेडयात राहणारा साधा माणूसही तत्वज्ञानी असतो. पश्चिमेकडील मोठमोठया विचारवंतांनाही चकित करणारे विचारधन त्याला परंपरेने प्राप्त झालेले असते. संघाच्या मागे हजारो त्यागी आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांची तपश्चर्या आहे. मी जो बोलतो तो सामूहिक विचार आहे. संघ सतत राष्ट्राचाच विचार करतो आणि मी तो व्यक्त करतो. ग्रामोफोनपेक्षा अधिक श्रेय माझे नाही.

“संघाचा विचार एकांगी नाही. तो कोणत्याही राजकीय पक्षाचा विरोधक नाही. तो राष्ट्राचा आणि हिंदू समाजाचा भावात्मक विचार करतो. तुम्ही कोणत्याही राजकीय पक्षात असा, पण हिंदू समाजाचे घटक आणि भारतमातेचे सुपुत्र आहात. शंभर वर्षापूर्वी कॉंग्रेसचे अस्तित्व नव्हते. पण तेव्हाही आपले राष्ट्र होतेच. पक्ष येतात व जातात. विशिष्ट पक्षात कोणीच जन्म घेतलेला नसतो. पण प्रत्येकाचा जन्म समाजात अवश्य झालेला असतो. म्हणून आपले प्रथम कर्तव्य समाजाच्या आणि राष्ट्राच्या संबंधात असले पाहिजे. आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण या कर्तव्यभावनेने ओतप्रोत भरलेला असला पाहिजे. संघाचे काम देशात सामंजस्य, नि:स्वार्थ सेवावृत्ती आणि शील निर्माण करण्याचे आहे. जीवनभर पुरणारे हे कार्य आहे. या विचार - प्रणालीचे आपण स्वागत करावयास पाहिजे. कोण व्यक्ती सांगते वा बोलते ही गोष्ट तितकी महत्वाची नाही. भारतवर्षात अनुशासनबध्द राष्ट्रीय जीवन निर्माण करण्यासाठी आपले सर्वांचे सहाय्य आणि सहकार्य संघाला हवे आहे.”

असे सत्कारप्रसंगी, अभीषटचिंतनच स्वीकार करताना आणि विविध क्षेत्रांतील थोर थोर मंडळींनी उच्चारलेली स्तुतीपर भाषा ऐकताना, श्रीगुरूजींचे नम्र बोलणे हळुवार आणि विचारांना चालना देणारे, प्रेमाने अंत:करण जिंकणारे, कार्याची थोरवी वाढविणारे. श्रीगुरूजींच्या दृष्टीने असे ‘अभियाना’ चे कार्यक्रम केवळ नैमित्तिक स्वरूपाचे. त्यांचा आग्रह नित्य कार्यासंबंधी असे आणि नैमित्तिक कार्यातूनही नित्य कार्याची वाढ स्वयंसेवकांनी घडवून आणली पाहिजे अशी अपेक्षा ते बाळगीत. त्यांचे स्वत:चे लक्ष सदैव शाखाविस्तार व कार्यकर्त्यांशी संपर्क याकडेच असे. बाकी कार्यक्रम परिस्थितीची आणि कार्यविस्ताराची आवश्यकता म्हणूनच ते पार पाडीत. १९४९ मधील देशभरातील अभिनंदन सोहळा व १९५६ मधील वाढदिवस सोहळा यामुळे श्रीगुरूजी आणि संघ यांवर प्रसिध्दीचा प्रकाशझोत पुष्कळच पडला होता. लोकांच्या अपेक्षा वाढल्या होत्या. तेव्हा असे स्थूलमनाने म्हणता येईल की, १९६२ पर्यंतची सहा वर्षे एकाग्र होऊन ते केवळ संघविस्तार आणि संघटनेचे दृढीकरण या कामातच मग्न झाले होते. फार महत्त्वाच्या किंवा त्यांच्या जीवनपटात ठळकपणे अंतर्भूत कराव्या अशा घटना या कालखंडात घडलेल्या आढळत नाहीत.

१९५६ साली विजयदशमीला आपल्या सामाजिक इतिहासात एक घटना घडली ती दूरपरिणामी ठरली आणि त्यावेळही तिने पुरेशी खळबळ उडविली होती. ही घटना म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली लक्षावधी दलित वर्गीयांनी केलेला बौध्दधर्माचा स्वीकार. नव्यानेच बौध्दपंथीय बनणारांत महार बांधवांचा भरणा प्रामुख्याने होता. या विजयादशमीच्या दिवशी नागपूरला धंतोली भागातील पटवर्धन मैदानावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सीमोल्लंघन महोत्सव थाटाने साजरा होत होता तर तेथून सुमारे दोन मैलांवरील दीक्षा मैदानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाने महार बांधव बौध्दमताची दीक्षा घेत होते. याला 'धर्मचक्रप्रवर्तन' असे म्हणण्यात आले. बौध्दमताचा अंगीकार करणारी मंडळी हिंदू परंपरा आणि संस्कृती यांच्यापासून तुटली असे नाही. कारण बौध्द मतानुयायांचा समावेश व्यापक हिंदू समाजाताच होतो. ख्रिस्ती किंवा इस्लामी पंथांची मंडळी डॉ. बाबासाहेब व त्यांचे अनुयायी यांना आपआपल्या मार्गाकडे वळविण्यास प्रयत्नशील होती. पण त्यांना झिडाकारून डॉ. आंबेडकरांनी बौध्द मताचा अंगीकार केला, त्यात त्यांची राष्ट्रीय भूमिकाच दिसून येते. शेकडो वर्षे तथाकथित अस्पृश्यांना हिंदू समाजाने अत्यंत अपमानास्पद रीतीने वागविले आणि आंदोलने व संघर्ष, युक्तिवाद आणि आवाहने यांचा परिणाम होण्याचे काही लक्षण दिसेना. भारताच्या राज्यघटनेने अस्पृश्यता अवैध ठरविली, पण लोकव्यवहारातून ती नष्ट झाली नाही. या परिस्थितीची प्रतिक्रया म्हणून परंपरागत हिंदू धर्माचा त्याग करण्याचा निर्णय बाबासाहेबांनी केला. तो १९५६ साली विजयादशमीला अमलातही आणला. हिंदू समाजाला जबरदस्त धक्का या घटनेने बसावयास हवा होता आणि अस्पृश्यतेचा कलंक पुसून टाकण्याची निकड त्याच्या ध्यानात यावयास हवी होती. दुदैवाने तसे घडले नाही. १९८१ मध्ये मिनाक्षीपुरमच्या निमित्ताने जसे विचारमंथन घडले व दलितांची समस्या सोडविणे एकात्म हिंदू समाजाच्या घडणीसाठी अपरिहार्य असल्याची जागृती दिसली तशी लाट १९५६ साली आली नाही. त्याचवेळी समाज पुरेसा जागृत झाला असता तर कदाचित मीनाक्षीपुरम् घडलेही नसते!

या घटनेसंबधी श्रीगुरूजींची प्रतिक्रिया काय झाली? श्रीगुरूजी हे धर्मज्ञ असल्यामुळे सामूहिक धर्मांतरावर त्यांचा मुळीच विश्वास नव्हता. त्यांची पहिली प्रतिक्रिया स्वाभाविकपणेच या सामूहिक धर्मांतरासंबधी संशय व्यक्त करणारी होती. दिनांक १२ नोव्हेंबर १९५६ च्या 'पांचजन्य' साप्ताहिकातील लेखात श्रीगुरूजींनी पृच्छा केली आहे, "कोणत्याही खऱ्या धर्मात सामूहिक धर्मांतरासारखी गोष्ट असू शकते काय? धर्मांतरापूर्वी प्रत्येक व्यक्तीने पूर्वीचा धर्म आणि स्वीकारावयाचा नवा धर्म या दोघांच्याही आध्यात्मिक, नैतिक आणि व्यावहारिक क्षेत्रांतील आदर्शांचे विश्लेषण करणे आवश्यक असते. धर्मपरिवर्तन हे आमूलाग्र परिवर्तन असते. सामूहिक धर्मांतरात अशा प्रकारचे व्यापक आणि आमूलाग्र परिवर्तन शक्य आहे काय?"

धचक्रपरिवर्तनाच्या सोहळयानंतर लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मृत्यू झाला. आंबेडकरांच्या अनुयायांत अनेक तट पडले. वैचारिक आणि समाजिक मंथनाची डॉ. बाबासाहेबांनी सुरू केलेली प्रक्रिया जोम गमावून बसली. राजकीय गुंतागुंतही या प्रश्नात निर्माण होऊन शुध्द दृष्टीने तिचा उलगडा करणे अवघड होऊन बसले. अर्थात्, संघाने हिंदू माणसांत भेदभाव कधी मानला नाही आणि कालबाह्य रूढींचा आग्रह चुकूनही धरला नाही. उलट समतेचाच व्यवहार संघात राहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्या जीवनकाळात संघाशी अपरिचित नव्हते. पण आपल्यावर विसंबून असलेल्या आपल्या अनुयायांना अराष्ट्रीय किंवा राष्ट्रविरोधी शक्तींपासून कायमचे दूर ठेवण्यासाठी काही तरी पाऊल

तातडीने उचलणे त्यांना आवश्यक वाटत होते. भारताची सांस्कृतिक एकात्मता अभंग राखून त्यांनी बौध्दमत अंगीकारण्याचा निर्णय केला.

डॉ. आंबेडकरांच्या थोरवीची पूर्ण जाण श्रीगुरूजींना होती. त्यांनी बाबासाहेबांच्या धर्मचक्रप्रवर्तनानंतर सुमारे सात वर्षानी लिहिलेल्या एका लेखात ही जाण व आंबेडकरांच्या कार्याकडे पाहण्याची श्रीगुरूजींची भूमिका उत्तम रीतीने प्रतिबिंबित झाली आहे. श्रीगुरूजींनी लिहिले आहे. "भारताच्या दिव्य संदेशाच्या गर्जनेने ज्यांनी सर्व जगाला हलवून सोडले, त्या श्रीमत् स्वामी विवेकानंदांनी दीन, दुबळे, दरिद्री आणि अज्ञानग्रस्त भारतवासी हेच माझे ईश्वर आहेत, त्यांची सेवा करणे व त्यांच्यातील सुप्त चैतन्य जागवून त्यांचे ऐहिक जीवन सुखपूर्ण आणि उन्नत करणे हीच खरी ईश्वरसेवा होय, असे सांगून आपल्या सामाजातील 'शिवू नको' या अनिष्ट प्रवृत्तीवर व त्या प्रवृत्तीशी संलग्न अशा सर्व रूढींवर कठोर प्रहार केले. सर्व समाजाला पुन्हा नवी रचना करण्यास आवाहन केले. त्याच आवाहनाचा प्रत्यक्ष पुरस्कार अन्य शब्दांत, अन्य मार्गांनी राजकीय आणि सामाजिक अवगणनेने क्षुब्ध होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आवेशाने केला. अज्ञानात व दु: खात खितपत पडलेल्या आणि आपल्या समाजातील अपमानित अशा एका मोठया भागाला आत्मसन्मानपूर्वक उभे केले, ही त्यांची कामगिरी असामान्य आहे. आपल्या राष्ट्रावर अपार उपकार त्यांनी केले आहेत. त्यातून उतराई होणेही कठीण.

"श्रीमत शंकराचार्यांची कुशाग्रबुध्दी व भगवन बुध्दाचे परम कारूणिक विशाला ह्दय यांचा मेळ घालण्यानेच भारताचा खरा उध्दार होऊ शकेल, असे मार्गदर्शन स्वमी विवेकानंदानी केले आहे. बौध्द मताचा स्वीकार व पुरस्कार करून या मार्गदर्शनाचा एक महत्वाचा भाग पूर्ण करण्याच्या कार्यास डॉ. बाबासाहेबांनी मोठी चालना दिली, असे म्हटले पाहिजे. त्यांच्या विवेचक आणि कुशाग्र बुध्दीला तत्वज्ञानदृष्टया बौध्द मतातील उणिवा दिसत होत्या. त्यांचा त्यांनी उल्लेखही केला. पण व्यवहारातील समानता, शुचिता, परस्परासंबंधीची कारूण्यपूर्ण स्नेहमयता, या सर्व गुणांतून मिळणारी मानवसेवेची विशुध्द प्रेरणा हे बौध्दमताच्या श्रध्देतून उत्पन्न होणारे लाभ राष्ट्राच्या व मानवतेच्या कल्याणाकरता आवश्यक आहेत, हे जाणूनच त्यांनी या मताचा आग्रहाने पुरस्कार केलेला दिसतो. पूर्वी समाज सुधारण्यासाठी व धर्माचे स्वरूप विशुध्द करण्यासाठी भगवान बुध्दांनी तत्कालीन समाजधारणांवर टीका केली ती वेगळे होण्याकरिता नव्हे. आजच्या काळात डॉ. बाबासाहेबा आंबेडकरांनीही समाजाच्या भल्यास्तव, धर्माच्या हितास्तव, आपला चिरंजीव समाज निर्दोष व सुदृढ व्हावा म्हणून कार्य केले. समाजापासून फुटून वेगळा पंथ करण्याची त्यांची बुध्दी नव्हती अशी माझी श्रध्दा आहे. म्हणूनच या युगातील बुध्दांचे वारसदार या नात्याने मी त्यांच्या पवित्र स्मृतीला अंत: करणपूर्वक अभिवादन करीत आहे."

हिंदू जीवपरंपरेत बाबासाहेबांचे युगकार्य स्पष्ट करणारे श्रीगुरूजींचे हे भाष्य केवढे मार्मिक आहे! हिंदू समाजाने विघटित न होता काळाबरोबर बदलले पाहिजे व तशी क्षमता तो प्रकट करू शकतो. वेळोवेळी काळाची गरज पूर्ण करणारे महापुरूष या समाजात निर्माण झाले आहेत व होतील, ही गुरूजींची श्रध्दा होती. येथे श्रीगुरूजींनी आणि संघाने पुरस्कृत केलेल्या एका भूमिकेचा उल्लेख उचित ठरेल. समाज परिवर्तन घडवून आणण्याची आवश्यकता मान्य करूनही त्या प्रक्रियेच्या स्वरूपाचा काहीसा वेगळा विचार संघाने अवलंबिला. तो विचार असा की समाजाचा सतत तेजोभंग करून, सगळीच परंपरा त्याज्य आणि टाकाऊ ठरवून किंवा सतत भेदांवर भर देऊन सुधारणा होणार नाही.

कायद्यानेही ही समस्या सोडविता आली नाही. संघाचा मार्ग असा की, सारे हिंदूच आहेत, एकाच परंपरेतील आहेत, हा भाव जागृत करावयाचा, सगळयांना वागणूक समान द्यावयाची आणि उच्चनीचतेची भाषा उच्चरावयाचीच नाही. आत्मीयतेच्या या विशाला भूमीकेवरून श्रीगुरूजींनी स्वत: सगळा व्यवहार केला. पुण्याच्या संघ शिक्षावर्गात १९५० साली घडलेली गोष्ट आहे. जेवणाची पंगत बसली असता, वाढपाचे काम करण्यास नियुक्त केलेल्या स्वयंसेवकांपैकी एक जण वाढावयास पुढे येईचना. श्रीगुरूजींनी त्याला विचारले तर काही सांगेना. मग कळले की जातीने 'चर्मकार' असल्यामुळे तो संकोच करीत आहे. श्रीगुरूजींनी त्याला हात धरून उठविले. त्याच्या हातात वाढावयाच्या पदार्थांचे ताट दिले आणि प्रथम आपल्या स्वत:च्या पानावर त्याच्याकडून वाढून घेतले. समस्त हिंदू समाजासंबंधी आत्मीयतेचा व एकत्वाचा भाग जागविणे व त्या प्रेमौघात सगळे कथाकथीत भेद बुडवून टाकणे हा संघाचा मार्ग आहे. तो संघात तर यशस्वी ठरलाच पण आता व्यापक सामाजिक पातळीवरही त्याच्या यशाची लक्षणे दिसू लागली आहेत.

१९६० साली भारतीय जनसंघाचे नेते श्री. अटलबिहारी वाजपेयी यांना अमेरिका भेटीचे निमंत्रण आले व अटलजींनी जाण्याचे ठरविले. जॉन कॅनेडी आणि रिचर्ड निक्सन यांच्यात अध्यक्षपदासाठी व्हावयाच्या निवडणुकीचा तो काळ होता. अटलजी जसे भारतीय जनसंघाचे नेते तसे संघाचे जुने स्वयंसेवक व प्रचारकही होते. त्यांनी अमेरिकेला जाणार असल्याचे जेव्हा श्रीगुरूजींना सांगितले, तेव्हा त्यांच्याबरोबर अमेरिकन जनतेच्या नावाने एक संदेश पाठवावयाचे ठरले. एखाद्या मोठया प्रकट कार्यक्रमात अटजींनी तो नुसता वाचून दाखवावा, अशी कल्पना होती. आधुनिक जगात धर्माचे माहात्म्य सुप्रतिष्ठित करण्याच्या श्रीगुरूजींच्या प्रयत्नाचाच हा एक भाग होता. अटलजींनी सप्टेंबर १९६० मध्ये वॉशिंग्टन येथे झालेल्या एका भव्य समारंभात तो संदेश अमेरिकनांना वाचून दाखविला. या संदेशात श्रीगुरूजी म्हणतात :

"स्वामी विवेकानंदांनी आपले सद्-गुरू श्री रामकृष्ण यांच्या जीवनात प्रकट झालेल्या शाश्वत सत्याचा जाहीर उद्-घोष लोकतंत्र आणि मानवप्रतिष्ठा यांना मानणाऱ्या अमेरिका देशात केला, ही परमेश्वराचीच योजना असावी. जागतिक घटनाचक्राचा परिणाम म्हणून स्वतंत्र जगाचे नेतृत्व अमेरिकेकडे आले आहे. स्वामी विवेकानंदांच्या सद्विचारांचे स्मरण आणि त्यांना अनुरूप असे आचरण करून, अमेरिका ती जबाबदारी पार पडू शकते.

"आज सारे जग दोन गटांत विभागलेले आहे. वरवर पाहणारांना असे वाटते की, या गटांतील हा संघर्ष लोकशाही व साम्यवाद यांतील आहे. परंतू हे खरे नाही. युगानुयुगे निकृष्ट प्रतीचा भौतिकवाद आणि धर्म यांच्यात संघर्ष चालत आलेला आहे. तोच संघर्ष आजही चालू आहे. साम्यवाद भौतिकवादाचा कैवारी आहे. साम्यवादाचा प्रतिकार कामचलाऊ भौतिक व्यवस्था किंवा सांप्रदायिक मते यांच्याद्वारे होऊ शकला नाही. अद्वैताच्या निश्चल आणि शाश्वत अधिष्ठानावर उभ्या असलेल्या विश्वधर्माच्या द्वारेच साम्यवादाला यशस्वीपणे तोंड देता येते. जगातील सर्व धर्मांमध्ये सामंजस्य असणे आणि त्यांच्यात सुसंवाद निर्माण होणे यासाठी आवश्यक आहे. याचा अर्थ व्यक्तिगत निष्ठांना तिलांजली देणे असा होत नाही. उलट त्या त्या निष्ठांचे शाश्वत रूपांत उदात्तीकरण त्यांत अभिप्रेत आहे. ही सर्वांना सारखीच प्रिय ठरावी अशी वैश्विक विचारसरणी आहे.

"वर्तमानकालीन भारत अन्य अनेक देशांप्रमाणे भौतिक दृष्टया समृध्द नसेल, पण प्रदीर्घ जीवनकाळातील चढउतारांतही तो अद्वैताच्या शाश्वत सिध्दांतावर अढळ आहे. पुन्हा एकदा तो

आपल्या पायावर उभा आहे आणि जगाला ग्रासून टाकणाऱ्या वर्तमान संकटात, स्वतंत्र देशांना एक वैश्विक विचारप्रणाली देऊन, त्या संकटावर मात करण्यासाठी साहाय्यभूत होण्याचे त्याचे जे नियत जीवनकार्य आहे, त्याचा साक्षात्कार तो करू लागला आहे.

“माझी अशी इच्छा आहे की, अमेरिकन जनतेने स्वामी विवेकानंद यांच्या अमर संदेशाचे स्मरण करावे. भारताबरोबर अभेद्य मैत्रीच्या सूत्रात स्वत:ला बांधून घ्यावे. जगातील धर्मशक्ती विजयी होईल तर सतत चालणाऱ्या लष्करी संघर्षापासून जग मुक्त होईल. मानवाला शांती आणि समृध्दी लाभेल.”

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दृष्टीने एक महत्वाचा कार्यक्रम १९६० च्या मार्च महिन्यात मध्यप्रदेशातील इंदूर येथे आयोजित करण्यात आला. त्याचा उल्लेख करूनच मग १९६२ या अत्यंत खळबळजनक वर्षाकडे वळले पाहिजे. १९५४ साली वर्धा जिल्ह्यातील सिंदी येथे प्रामुख्याने प्रचारकांचे एक शिबिर भरवून संघकार्याचा मूलभूत विचार श्रीगुरूजींनी नि:संदिग्ध स्वरूपात पुढे मांडला होता. याचा उल्लेख यापूर्वी घेऊन गेलाच आहे. इंदूरचे शिबिर अधिक व्यापक स्वरूपाचे होते. संघाच्या कार्यकर्त्यांप्रमाणेच अन्यान्य क्षेत्रांत काम करणारे प्रमुख कार्यकर्तेही या शिबिराला उपस्थित होते. सहा वर्षातील संघाच्या कार्याचा आढावा घेणे, कार्यकर्त्यांपुढील प्रश्नाचा निरास करणे आणि संघकार्याच्या भावी विकासाचा विचार करणे असे या शिबिराचे उद्दिष्ट होते. संघाचे कार्य सुरू होऊन ३५ वर्षे उलटत असताना आणि अनेक भल्याबुऱ्या प्रसंगांतून संघाला जावे लागल्यानंतर ही कार्यकर्त्यांतील खुली चर्चा योजनण्यात आली होती. श्रीगुरूजी प्रारंभापासून अखेरपर्यंत या शिबिरांत उपस्थित राहिले व दररोज होणाऱ्या चर्चेच्या अनुषंगाने त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

अशा स्वरूपाच्या शिबिरांत अथवा अभ्यासवर्गात कार्यकर्त्यांशी ‘कार्या’ बाबत स्पष्टपणे आणि नि: संदिग्धपणे बोलण्याची श्रीगुरूजींची पध्दती होती. बाहेरची परिस्थिती विपरीत आणि संकटग्रस्त भासत असता देशासाठी आपण काय करावयास हवे, हे इंदूरला श्रीगुरूजींच्या सर्व भाषणांचे प्रमुख सूत्र होते. नित्य कर्म आणि नैमित्तिक कर्म असे कामाचे द्विविध स्वरूप पुढे ठेवून त्यांनी अतिशय आग्रहपूर्वक आणि निश्चयात्मक रीतीने सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत आपल्या नित्य शाखा - कार्यात शैथिल्य येता कामा नये. देशाला सर्व संकटांतून तारुन नेण्याचे तेच सर्वस्वी भरवशाचे साधन आहे. इंदूरच्या भाषणांचे आणखी ठळक वैशिष्टय असे की, हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृती यांच्या परंपरेनुसार आपले जीवन आपण बनविले पाहिजे, हिंदू संस्कारांच्या जागृतीविना कार्यसातत्य आणि राष्ट्रीय चैतन्याची अनुभूती अशक्य आहे, हे त्यांनी ठामपणे प्रतिपादन केले. एवढेच नव्हे तर या संस्कारांचे स्वरूपही विस्ताराने विशद केले.

हिंदू संस्कृतीचे पुनरूत्थान या शब्दप्रयोगाला खोडसाळपणे भलतेच अर्थ चिकटवीत बसण्याचा आणि अप्रचार करण्याचा प्रयत्न तथाकथित बुध्दिवाद मंडळी सतत करत असतात. या संबंधात दोन प्रश्न श्रीगुरूजींना विचारण्यात आले होते. पहिला प्रश्न हा की, हिंदू संस्कृतीच्या पुनरूज्जीवनात वर्णव्यवस्थेचे पुनरूज्जीवनही अभिप्रेत आहे का? आणि दुसरा प्रश्न, वर्णव्यवस्था हा हिंदू समाजजीवनाचा एक आवश्यक अपरिहार्य भाग समजावयाचा का? श्रीगुरूजींचे उत्तर नि:संदिग्ध होते. ते म्हणाले की, सांस्कृतिक पुनरूत्थानाशी वर्णव्यवस्थेचे पुनरूज्जीवन जोडलेले नाही. जातीचे आम्ही विरोधक नाही किंवा पक्षापातीही नाही. आम्हाला एवढेच ढाऊक आहे की समाजावरील गंभीर संकटाच्या काळात एक महत्वाची भूमिका त्या व्यवस्थेने पार पडली, आज जर समाजाला ती पध्दती

नको असेल तर ती नाहीशी होईल व त्यावरून कोणालाही दु:ख व्हावयाचे नाही. तसेच वर्णव्यवस्थेबद्दल असे म्हणावे लागेल की, ती समाजाची 'अवस्था' नसून केवळ एक व्यवस्था आहे. जर ती निरूपयोगी झाली असेल तर तिचा त्याग करण्यास कचरण्याचे मुळीच कारण नाही. व्यवस्था ही गरज व सोय यानुसार परिवर्तनीय असू शकते. उपयुक्ततेवर ते अवलंबून आहे.

संघाच्या स्वयंसेवकांकडून अपेक्षित असलेल्या 'अनुशासना'चे अनेक अंगांनी जे विवेचन त्यांनी इंदूरला केले, त्यात हिंदू संस्कृतीची कित्येक अन्य वैशिष्टये त्यांनी सहजपणे सांगून टाकली. त्यांच्या या सगळया विवेचनाला आध्यात्मिक बैठक होती व संघकार्याचे स्वरूप त्यांनी आध्यात्मिक परिभाषेतच कार्यकर्त्यांना समजावून दिले. शेवटी राष्ट्राच्या पुनरूत्थानासाठी असीम त्यागमय जीवनाच अंगीकार आपण आनंदाने करावयास हवा असे आवाहनही त्यांनी केले. ही सगळीच भाषणे कार्यकर्त्यांना अंतर्मुख होण्यास आणि स्वत: चे व्यक्तिगत गुणावगुण तपासून पाहण्यस प्रवृत्त करणारी होती.

१९६० साली खंडित राजकीय स्वातंत्र्य पदरात पडून पुरेपुर एक तप उलटलेले होते. चिनी आक्रमणाच्या संभाव्य संकटापासून तो अनेकविध संकटांचा आणि आपल्या सामाजिक पतनाच्या दृश्य लक्षणांचा दाखला श्रीगुरूजींनी या टप्प्यावर दिला. या संकटावर मात करण्याचे सामर्थ्य परंपरेने आपल्याला दिले आहे व भारताचे जागतिक 'मिशन' पूर्ण करण्यासाठी आपण झडझडून कामाला लागलो तर यशाबद्दल मुळीच संदेह नाही, असे विश्वासपूर्वक त्यांनी सांगितले. हा वर्ग संपला आणि दोन वर्षांनी चिनी आक्रमणाचा हिंस्र आघात देशावर झाला.

## १५. युध्दकाळातील विचारमंथन

नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांचा अत्यसंस्कार झाला आणि तिथे त्यांची एक समाधी बांधण्यात आली. पण कार्यकर्त्यांची अशी इच्छा होती की, या समाधीवर मंदिरासारखी एक वास्तू उभारावी आणि अखिल भारतातील स्वयंसेवकांसाठी डॉक्टरांचे स्मृतिमंदिर हे एक प्रेरणास्थान व्हावे. या कार्यासाठी 'डॉ. हेडगेवार स्मृति समिती' स्थापन करण्यात आली. श्रीगुरूजी या समितीचे अध्यक्ष होते. निधी उभा करण्यात आला आणि हळूहळू वास्तूचे काम पूर्ण झाले. स्वत: श्रीगुरूजींनी या कामात बारकाईने लक्ष घातले. या निमित्ताने त्यांचे भारतीय वास्तुशास्त्राचे सूक्ष्म ज्ञान, त्यांची सौंदर्यदृष्टी व अशा मदिरांकडे पाहण्याची त्यांची भूमिका याची प्रचिती वारंवार येऊन गेली. अभियंत्यापासून ते पाथरवटापर्यंत सगळ्यांना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन ते करू शकत. १९६२ साली वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर (१ एप्रिल) स्मृतिमंदिराचे उद्-घाटन करण्यात आले. वर्षप्रतिपदा हा डॉक्टरांचा जन्मदिन असल्यामुळे या तिथिनिश्चयात एक प्रकारचे औचित्यही होते. मंदिरासाठी निधी सगळया देशांतून आलेला होता व अखिल भारतीय पातळीवर उद्-घाटनाचा कार्यक्रमही करावयाचा असे ठरले होते. देशभरातून स्वयंसेवक नागपूरला आले आणि एक मोठे संमेलनच या निमित्ताने भरले. डॉक्टरांच्या मृत्यूनंतर सुमारे बावीस वर्षांनी हे स्मारक उभे झाले होते. जिथे त्यांनी काम केले आणि चिरविश्रांती घेतली, त्या भूमीवर हे स्मारक होते.

वर्षप्रतिपदेच्या दिवशी स्वयंसेवक मोठया संख्येने उद्-घाटनाच्या कार्यक्रमासाठी एकत्रित झाले. नागपुरातील नागरिकांनीही गर्दी केलेली होती. डॉक्टरांच्या जीवनकार्यावर आणि असमान्यत्वावर प्रकाश टाकणारे श्रीगुरूजींचे भाषण झाले. स्मृति मंदिर उभारणारा संघ व्यक्तिपुजक बनला अशी शंका कोणाच्या मनात उद्-भवली असल्यास तिचे निरसन करण्यासाठी श्रीगुरूजींनी भाषणाच्या प्रारंभीच संगून टाकले की, "स्मृति मंदिर निर्मितीचा व त्याच उद्-घाटनाचा अर्थ हा नव्हे की आम्ही व्यक्तिपुजक आहोत. संघकार्यात संघाचे निर्माते हे सर्वात आदरणीय व्यक्ती होते. पण आम्ही त्यांचा कधीच जयजयकार केला नाही. जयजयकार करावयाचा तो राष्ट्राचा, भंगवंताचा, मातृभूमीचा व्यक्तीचा नाही. नंतर स्मृति मंदिराचे प्रयोजन सांगताना ते म्हणाले. "सामान्य माणसाला तत्वचिंतनासाठीही काही तसेच स्फुर्तिदायक आलंबन लागते. तत्वरूप झालेल्या पार्थिव शरीराच्या चिंतनाने तत्वाचेच चिंतन होते. राष्ट्राला अमर करणारी असामान्य कार्यपध्दती डॉक्टरांनी आपल्याला दिली आणि राष्ट्रभक्तीच्या भावनेने परिपूर्ण, अंतर्बाह्य विशुध्द जीवनाचा आदर्श त्यांनी आपल्यापुढे ठेवला. हजारो तरूणांना त्यामुळे प्रेरणा मिळाली. अशा विशुध्द जीवनाचे स्मरण जागृत ठेवण्यासाठी व प्रेरणा ग्रहण करण्यासाठी हे मंदिर आहे."

दिनांक १० ला सकाळी स्वयंसेवकांसाठी श्रीगुरूजींचा बौध्दिक वर्ग झाला. या बौध्दिक वर्गात त्यांनी देशभरातील कार्यकर्त्यांना बजावले की, "हे मंदिर म्हणजे नुसते पूजेचे स्थान बनवू नका... आपण श्रध्दास्थानाच्या जितके जवळ जाऊ, त्याच्यासारखे बनण्याचा जितका प्रयत्न करू तितकी पूजा सफल होते, असे म्हणता येईल. पूजेचे हे असे वास्तविक स्वरूप ध्यानात घेऊन आम्ही आपल्या स्वत: च्या जीवनाचा विचार करावयास पाहिजे. डॉक्टरांनी दिलेले आदेश आपल्या अंत:करणात जागृत ठेवून तदनुसार आपले जीवन घडविण्याचा आपण प्रयत्न करावयास पाहिजे. एक पूजेचे स्थान निर्माण करून आपण महंतासारखे गादीवर बसून राहावे अशा भूमिकेतून हे स्मृतिमंदिर उभे करण्यात आले नाही.

विटा-दगड यांनी करण्यात येणाऱ्या बांधकामात माझी रूची नाही. हे पवित्र स्थान आम्हाला आमचे जीवन त्यांच्यासारखे पवित्र बनविण्याची प्रेरणा देवो, अशा श्रध्देच्या भावनेतून आम्हाला या स्मृतिमंदिराकडे पाहावयाचे आहे."

इथे एका गोष्टीचे उत्कटतेने स्मरण होते. डॉक्टरांच्या समाधीवर मंदिर उभारण्यात श्रीगुरूजींनी पुढाकार घेतला. उद्-घाटनासाठी अखिल भारतातून स्वयंसेवकांना निमंत्रित केले. पण स्वत:संबंधी विचार त्यांनी कसा केला? आपल्या तीन अंतिम पत्रांपैकी दुसऱ्या पत्रात त्यांनी म्हटले आहे : संघाचे ध्येय आणि त्या ध्येयाचे दर्शन घडविणारे संघसंस्थापक या व्यतिरिक्त आणखी कुणा व्यक्तीचे व्यक्ती या नात्याने महत्व वाढविणे, त्याचे स्मारक बनविणे आवश्यक नाही. "म्हणजे आपल्या देहावसानानंतर आपले स्मारक वगैरे उभारण्याच्या भानगडीत कोणी पडू नये, अशी स्पष्ट इच्छा त्यांनी व्यक्त करून ठेवली. स्मारके बांधण्याची परंपरा निर्माण होऊ नये, अशी कायमची व्यवस्था करून टाकली. आयुष्यभर डॉक्टरांच्या स्मृतीपुढे ते शरणागत तर राहिलेच, पण मृत्यूनंतरही रेशीमबागेवर दुसरे स्मृतिमंदिर उभे होणार नाही याची काळजी त्यांनी घेतली. अहंकारासकट सर्वस्वाचे त्यांनी डॉक्टरांच्याच चरणी केलेले समर्पण एवढे परिपूर्ण होते ! श्रीगुरूजींच्या यज्ञरूप जीवनाचे स्मरण करून देण्यासाठी एक स्मृतिचिन्ह या नात्याने यज्ञकुंड मात्र त्यांच्या समाधीवर पाहावयास मिळते.

श्रीगुरूजींचे व्यक्तिगत असे जीवन उरलेलेच नव्हते. एकच घरगुती जिव्हाळा होता व तो म्हणजे आईचा - ताईचा. भाऊजी १९५४ सालीच वारले होते. आणि यानंतर ताईच्या भावनासबंधी श्रीगुरूजी बरेच हळुवार झाले होते. ताई तडफदार होत्या व आपल्या एकुलत्या एक पुत्राने व्यक्तिगत संसार न थाटता संघाचा म्हणजेच राष्ट्राचा फार मोठा प्रपंच खांद्यावर घेतला आहे याची जाण त्यांना होती. संघाच्या स्वयंसेवकांवर त्या वात्सल्याचा वर्षाव करीत. घरातील ताईंच्या उपस्थितीने मोठा आनंद उसळत असे. श्रीगुरूजी नागपुरात नसले, तरी स्वयंसेवकांची भरपूर वर्दळ घरी असावयाची आणि ताई सगळयांची विचारपूस आस्थेने करावयाच्या.

श्रीगुरूजी नागपुरात असले म्हणजे त्यांचा कधी न चुकणारा एक नित्यक्रम असे. मोहिते संघस्थानावर प्रार्थना आटोपली की प्रमुख कार्यकर्ते, परगावचे कोणी पाहुणे असल्यास ते पाहुणे यांच्यासह चालतच ते 'नागोबाच्या गल्ली' तील घरी यायचे. खाली ओसरीवर ताई बसलेल्या असत. तेथेच सारे जण बसायचे. ताईंच्या जवळच श्रीगुरूजी बसत. मग ताईंच्या अध्यक्षतेखाली गप्पांची बैठक रंगायची. थट्टाविनोद व्हायचे. हास्याचा अधूनमधून कल्लोळ व्हावयाचा. श्रीगुरूजींची विनोदबुध्दी म्हणजे त्यांचे एक अनन्य वैशिष्टय. पण त्यांचे विनोद कोणाला दुखवणारे नसत तर काही शिकवून जाणारे असत.

या दृष्टीने एका प्रसंगाचा उल्लेख करावासा वाटतो. एक दिवस एक नवविवाहित स्वयंसेवक सपत्नीक श्रीगुरूजींना भेटावयास आला. त्याच दिवशी श्रीगुरूजी त्याच्या घरी जाऊन आले होते. हा स्वयंसेवक घरी नव्हता. तो सिनेमाला गेला आहे असे त्याच्या वडिलांनी सांगितले. गप्पांच्या ओघात आर्थिक ओढाताणीचा व गुरूदक्षिणेचा विषय निघाला. या नवविवाहित स्वयंसेवकाला श्रीगुरूजींनी विचारले. "आजकाल सिनेमाचे तिकीट किती असते? पत्नीला बरोबर न्यायचे म्हणजे अगदी शेवटच्या वर्गाचे तिकीट काढून कसे चालणार? शिवाय रिक्षाने येण्याजाण्याचा खर्च, चहा व थोडे खाणे साठीही काही खर्च होणारच. महिन्यातून एकदा म्हटले तरी वर्षात किती खर्च होतात? आणि मग

ओढगस्तीच्या नावाखाली कात्री बिचाऱ्या गुरूदक्षिणेला !" तो स्वयंसेवक काय समजायचे ते समजला. सर्वांनाच आपआपल्या खर्चाकडे पाहण्याची एक दृष्टी लाभली.

असेच कितीतरी प्रसंग, शाखा, स्वयंसेवकांचा व्यवहार, शाखेतील संस्कारांचा नित्याच्या जीवनातील अविष्कार असे नाना विषय निघत. कित्येकदा वाटायचे की ताईंच्या अध्यक्षतेखालील या तासाभराच्या गप्पा, चहापाणी, खाणेपिणे म्हणजे कार्यकर्त्यांना घडविण्याचे केवढे परिणामकारक माध्यम श्रीगुरूजींनी बनविले होते! श्रीगुरूजीबद्दल ताईंना वाटणारे प्रेम, कौतुक आणि अभिमान यांचे जसे दर्शन या बैठकीच्या प्रसंगी घडायचे तसेच श्रीगुरूजींच्या ताईविषयीच्या जिव्हाळयाचे आणि असीम पूज्यभावाचे दर्शनही सहज होऊन जावयाचे. असे हे मातृछत्र देखील १२ ऑग्स्ट १९६२ रोजी नाहीसे झाले. ताई वयोवृध्द झाल्या होत्या, थकल्या होत्या, हे तर खरेच, पण तरीही ते एक जिव्हाळ्याचे छत्र होते. ताईंच्या दुखण्यात प्रवासाला जाताना श्रीगुरूजी मुद्दाम त्यांची परवानगी घेत. प्रकृतीचे मान पाहत. ताईंना शेवटच्या दुखण्याच्या वेळी पक्षाघाताचा झटका आला होता. प्रकृती तोळामासा होती. श्रीगुरूजींना प्रवासावर निघायचे होते. त्यांनी ताईंना विचारले, "प्रवासाला जाऊ का?" त्यांनी "नको" म्हणून सांगितले. दुसऱ्या दिवशी मात्र किंचित् बरे वाटताच त्यांना जाण्यास परवानगी दिली. प्रवासात श्री. कृष्णराव मोहरीर पत्रे लिहून ताईंच्या प्रकृतीबद्दल कळवीत. श्रीगुरूजींचे ताईंना नेहमी आश्वासन असे की, 'मी नसता तू जाणार नाहीस.' ताईंची प्रकृती अत्यवस्थ झाली, तेव्हा श्रीगुरूजी नागपूरलाच थांबले. ते सकाळ सांयकाळ ताईंजवळ बसत, बोलत, धीर देत. ताई गेल्या आणि दररोज सायंकाळचे घराच्या ओसरीवरील हे 'संस्कारपीठ' बंद पडले. श्रीगुरूजी मग कार्यालयातच थांबत. तिथेच भेटणारे येत. रात्रीपर्यंत बैठक चाले. ताईं गेल्या तेव्हा अर्थातच त्यांच्या मनावर मोठाच आघात झाला. श्रीगुरूजींचे ज्येष्ठ गुरूबंधू श्रीअमिताभ महाराज हे या प्रसंगी नागपूरलाच होते. त्यांनी सांगितलेली हकीगत 'श्रीगुरूजी समग्र दर्शन, खंड १' मध्ये आठवणींच्या सदरात प्रसिध्दी झाली आहे. वाचकांच्या सोयीसाठी ती येथे उद्-घृत करीत आहे.

"मातु:श्री ताईंच्या देहावसानाने श्रीगुरूजींच्या हृदयात प्रखर विरक्तीची भावना उफाळून आली. आणि हिमाल्याच्या पवित्र परिसरात जाऊन एकांतवासात राहण्याची त्यांना तीव्र इच्छा झाली. श्रीबाबांनी सांगितलेल्या गोष्टीचे श्री अमिताभ महाराजांना स्मरण झाले. श्रीगुरूजींना परावृत्त करण्यासाठी ते म्हणाले, "अद्याप संघाचे काम अपूर्ण आहे. आपले हे कार्य करण्यासाठी कार्यालयातील आपल्या खोलीतच आपल्याला गेले पाहिजे. हिमाल्याच्या परिसरात जाण्यापेक्षा साधनेकरिता उर्वरित आयुष्यासाठी तेथे चला." श्रीमहाराजांच्या म्हणण्याप्रमाणे श्रीगुरूजी कार्यालयात गेले."

(या हकीगतीतील श्री बाबा म्हणजे श्रीगुरूजींचे सद्-गुरू श्रीस्वामी अखंडानंदजी, असे दिसते की त्यांनी श्री अमिताभ महाराजांना मृत्यूपूर्वी काही काळ श्रीगुरूजींच्या भविष्याकालीन जीवनासंबधी सावधगिरीची सूचना देऊन ठेवली होती. बाबा अमिताभ महाराजांना म्हणाले होते, "हा डॉ. हेडगेवार यांचे बरोबर कार्य करील असे वाटते. विशुध्द भावनेन समाजसेवेच्या कार्यात, जनताजनार्दनाच्या सेवाकार्यात अखंड कार्यरत असे कार्यमय जीवन हा व्यतीत करील, एखादे वेळी हिमाल्यात जाण्याची इच्छा अतिशय प्रबळ होईल, त्यावेळी तुझे लक्ष असू दे, बद्रिकाश्रम वगैरे ठिकाणी जाऊन देवातात्मा हिमाल्याचे दर्शन करण्यास प्रत्यवाय नाही. परंतू त्या क्षेत्रात एकांतवासात जाऊन राहण्यापासून त्याला परावृत्त करावे लागेल व हे काम तुलाच करावे लागेल." हा इशाराच अमिताभ महाराजांना यावेळी स्मरला व आपली कामगिरी महाराजांनी चोखपणे पार पाडली.)

योगायोगाने कामकोटी पीठाच्या श्रध्देय शंकराचर्याचा शोकसंदेशही श्रीगुरूजींना प्राप्त झाला. त्या पत्राचा श्रीगुयजींचे चित्त पुन:श्च स्थिर होण्यास आणि कामाकडे संपूर्ण लक्ष वळविण्याची इच्छा त्यांना होण्यास फार उपयोग झाला. कामकोटी पीठाचार्यांनी लिहिले होते, "आपल्या अस्थिचर्ममयी मातेचे देहावसान झाले. परंतू आपल्यासारख्या कोटयावधी सत्पुत्रांची व आजच केवळ नव्हे तर अनादिकाळापासून अनंतकाळापर्यंतची जन्मदात्री परममंगलमयी अशी ही भारतमाता आहे. सर्वस्वाचे समर्पण करून निरपेक्ष भावनेने भारतमातेच्या सेवेत आपण रत आहात. त्यामुळे आपणाला मातृवियोग होणे कधीही शक्य नाही.

१९६२ हे वर्ष सर्व भारतीयांच्या पक्के लक्षात राहिले आहे. ते त्या वर्षी ऑक्टोंबर महिन्यात झालेल्या चिनी आक्रमणामुळे अनेकांना चीनची ही लष्करी चढाई अकल्पित वाटली. पण चिनी संकटाचा इशारा श्रीगुरूजींनी सुमारे दहा वर्षापूर्वीच दिला होता आणि त्यानंतर अधूनमधून या इशाऱ्याचा पुनरूच्चारही नवनवीन घटनांच्या संदर्भात केला होता. या संबंधात शिमोगा (कर्नाटक) येथून श्रीगुरूजींनी एक पत्रक १९५१ साली काढले होते व ते वृत्तपत्रात प्रसिध्दही झाले होते, अशी आठवण श्री. जगन्नाथराव जोशी यांनी सांगितली आहे. (श्रीगुरूजी समग्र दर्शन, खंड ३, पान १५७) चीनची प्रकृती विस्तारवादी आहे व तो लवकरच भारतावर आक्रमण करण्याचा संभव आहे, असे या पत्रकात म्हटले होते. पत्रकाला निमित्त होते चीनच्या तिबेटमधील लष्करी कारवाईचे, भारताने तिबेट चीनला बहाल करून सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठाच धोका विकत घेतला आहे. ब्रिटीशांनी न केलेली चूक भारतीय शासनाने केली आहे, असे श्रीगुरूजी सांगत. विशेषत: चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती झालेली असल्यामुळे भारतातील पंचमस्तंभी आणि कम्युनिस्ट आक्रमक या दोघांपासूनही सावध राहण्याची गरज ते प्रतिपादन करीत. 'पांचजन्य' या साप्ताहिकात (दि. १८.५.५९) 'तिबेटचा ग्रास आणि कम्युनिस्टांचे मुक्तिकार्य' या मथळयाखाली श्रीगुरूजींचा एक उद्-बोधक लेख प्रसिध्द झाला होता. या लेखात केवळ भारतालाच संभाव्य आक्रमणाविरूध्द सावध करण्यात आलेले नाही, तर आपल्या या 'सरदारा' पासून (चीन यावेळी रशियाचा हस्तक होता.) सावध राहण्याचा सुस्पष्ट इशारा सेव्हिएट रशियालाही देण्यात आला आहे. श्रीगुरूजींनी भविष्यकाळात घडलेल्या घटनांचा घेतलेला वेध किती अचूक होता, हेच यावरून स्पष्ट होते. दिनांक २ एप्रिल १९६० रोजी महाराष्ट्रातील पत्रकारांना त्यांनी जी मुलाखत दिली, तिचा तर सगळा विषयच भारत - चीन संघर्ष हा होता. आपण शासनाला पुष्कळ सावध करून पाहिले, पण उपयोग झाला नाही, असे खेदपूर्ण उद्-गार श्रीगुरूजींनी दिल्लीच्या रामलीला मैदानावर प्रकट जनसभेत भाषण करताना दिनांक २३ डिसेंबर १९६२ रोजी काढले. ते म्हणाले, "जवळजवळ गेल्या दोन महिन्यांपासून चीनच्या सरकारने आपल्या देशावर आक्रमण सुरू केले आहे. 'सुरू केले आहे' असे मी याचसाठी म्हणतो की, हे 'आक्रमण' आहे कबूल करण्याची गेल्या दोन महिन्यांत आपल्या सरकारने तत्परता दाखविली आहे. तसे पाहिले तर चीनचे हे आक्रमण १०-१२ वर्षे जुने आहे. माझ्यासारख्या एका सामान्य माणसाने जवळ जवळ १० वर्षापूर्वी चीनचा भारतीय प्रदेशातील प्रवेश आणि भारतात स्वत:ची स्थिती मजबूत करण्यासाठी चीनकडून केले जाणारे प्रयत्न यांच उल्लेख केला होता. आणखी काही जाणकार लोकांनी यासंबंधात इशारे दिले होते. पण आपण आपल्या विश्वबंधुत्वाच्या भावनेत इतके काही बुडालो होतो की, त्याकडे लक्ष देण्याचा विचारही कधी मनात आला नाही. आपल्या बडया लोकांच्या बाबतीत हे म्हटले जाऊ शकते."

चीनचे आक्रमण हा पं. नेहरूंना एक जबरदस्त धक्का होता. त्यांनी या आक्रमणानंतर असे उद्-गार काढले की, "आपणच निर्माण केलेल्या स्वप्नभूमीतून चीनने आम्हाला वास्तव जगात आणून सोडले." पं. नेहरूंची ही 'पंचशीला' ची स्वप्नभूमी होती. चीनचे तुष्टीकरण केल्याने तो भारतावर प्रसन्न राहील या कल्पनेने त्याला सवलतीमागून सवलती भारताने दिल्या. तिबेटवरील चिनी बलात्काराचा प्रतिकार करण्याचा विचारही मनात आणता 'चीनची भूमी' म्हणून तिबेटची गणना करून त्या 'कील राष्ट्रा' चा विश्वासघात केला, लद्दाखमध्ये चीनचे आक्रमण झाले ते बराच काळ दडवून ठेवले आणि अखेर जेव्हा चीनने १२,००० चौरस मैलांचा भारतीय प्रदेश बळकाविल्याचे सत्य प्रकाशात आले, तेव्हा मातृभूमीचा तो भाग ओसाड आहे, गवताची काडीही तेथे उगवत नाही, अशी अनाकलनीय उपेक्षेची भाषा वापरली गेली. भाई - भाई म्हणून चीनी नेत्यांच्या गळयांत गळे घातले. या सगळया स्वप्नरंजनातून चिनी आक्रमणाने शासनाला जागे केले. पण नामुष्की टळली नाही. संरक्षणसिध्दतेची लक्तरे चव्हाटयावर आली. शासनयंत्रणेतील नीतीधैर्याचा दुष्काळ तेजपूरने चव्हाटयावर आणला. तो पराभवाचा लाजिरवाणा इतिहास सगळयांना ठाऊक आहेच. आक्रमणाने दिल्लीच्या शासनाची काही काळ घबराट उडवून देऊन चीनने एकतर्फी युध्दबंदी केली, ही घटनाही सगळयांना रहस्यमय वाटली.

या काळात चिनी आक्रमणाचा, भारत सरकारच्या आत्मघातकी धोरणाचा व राष्ट्रीय सामर्थ्याच्या उभारणीचा विषय श्रीगुरूजींच्या प्रवासातील बोलण्यात नित्य येत असे, आक्रमणाचा कणखर प्रतिकार झाला पाहिजे एवढेच नव्हे तर हिमालयीन संरक्षक तटबंदी सुरक्षित राखण्यासाठी तिबेटची मुक्तता घडवून आणली पाहिजे असे श्रीगुरूजी म्हणत, या वेळी केलेल्या भाषणात त्यांनी चीनमधील साम्यवादी राजवट, रशियाचा चीनकडे असलेला कल, भारतातील कम्युनिस्टांची दगाबाजी, चीन-पाक मैत्रीचा धोकादायक आशय, नेपाळप्रभृती राष्ट्रांशी निर्मळ मैत्रीसंबध राखण्याची आवश्यकता, आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वसामर्थ्याच्या विश्वासाने गटबाजीपासून अलिप्त राहण्यातील लाभ इत्यादी किती तरी गोष्टींचे विवेचन केले. राष्ट्रनेत्यांत साहस नसेल तर त्यांनी वीरवृत्तीच्या इतरांसाठी खुर्च्या मोकळया कराव्या येथवर परखडपणाने श्रीगुरूजी बोलले. प. बंगालमधील कम्युनिस्टांना अंतर्गत उठावाची योजना सिध्दीस नेता आली नाही म्हणून कलकत्त्यापर्यंत घुसण्याचा विचार रद्द करून चिन्यांनी एकतर्फी युध्दबंदी केली, अशी उपपत्ती श्रीगुरूजींनी सांगितली. परंतू हा टीकेचा भाग असला तरी, युध्दप्रयत्नांत शासनाला लोकांनी सर्व प्रकारे सहकार्य द्यावे असे आवाहन ते करीत. अशा आशयाचे एक प्रकट निवेदनही दिनांक २०.१०.६२ रोजी त्यांनी प्रसिध्द केले. त्यांचा खरा भर मात्र राष्ट्राची नित्यसिद्ध शक्ती परिश्रमपूर्वक उभी करण्यावर होता. देशभक्तीची भावना जागवून आणि भारतमातेच्या गौरवाचे उज्ज्वल ध्येय लोकांपुढे ठेवून त्यांना चरित्र्यसंपन्न व संघटित करण्याचे कार्य त्यांना सर्वश्रेष्ठ वाटे. क्षणिक उत्तेजना राष्ट्राला नेहमीसाठी सुरक्षितता देऊ शकत नाही, हे त्यांनी आवर्जून प्रतिपादन केले. 'नेहरूंचे हात बळकट करा' अशी घोषणा विशेषत: कम्युनिस्ट गोटातून होई. तिचा समाचार घेताना एकदा श्रीगुरूजी म्हणाले, "आधी नेहरूंचे हृदय बळकट करावयास पाहिजे मग हातांत आपोआप शक्ती येईल." एकतर्फी चांगुलपणाने वा शांतिसैनिकांच्या पाठवणीने चिनी आक्रमणाचा प्रश्न निकालात काढता येईल, ही कल्पना त्यांनी सपशेल फेटाळून लावली. त्यासाठी चीनचा इतिहास, स्वभाव आणि कम्युनिस्ट असहिष्णुतेची व निर्घृणतेची त्याला मिळालेली जोड यांचे फार परिणामकारक विश्लेषण त्यांनी केले.

१९६२ साली लढाई चीनने लगेचच थांबविली तरी भारतावर छुपे आक्रमण करून त्याने बळकावलेला प्रदेश अद्यापही त्यांच्याकडेच आहे. भारत व चीन यांच्या मैत्रीच्या वाटाघाटी व्हाव्यात असा प्रयत्न सुरू आहे. चिनी कब्जात असलेल्या भारतीय प्रदेशासंबंधीच्या धोरणाबद्दल आपले शासन दोलायमान आहे. तिबेटच्या मुक्ततेची तर आता कोणी भाषाही उच्चारीत नाही. दलाई लामाला भारताने राजकीय आश्रय जरूर दिला. पण तिबेटच्या मुक्ततेसाठी भारतातून हालचाली करण्याची मोकळीक त्यांना ठेवली नाही. अशा अवस्थेत आपला सीमासंकोच आपण सहन करीत आहोत. चीनला शह बसेल असे काहीच भारताला करता आले नाही. उलट, अण्वस्त्रधारी राष्ट्रांच्या मालिकेत चीनने स्थान मिळविले व रशियाहून स्वतंत्र आणि एक महासत्ता म्हणून चीनकडे जग पाहते. राष्ट्रीय सुरक्षितता, सन्मान आणि पौरूषसंपन्न राष्ट्रजीवन या बाबतीत श्रीगुरूजींना न्युनगंडाची भाषा मुळीच चालत नसे. विजयाच्या आत्मविश्वासाने राष्ट्राला उभे करण्यासाठी फार ओजस्वी आवाहन ते करीत. चीनच्या बाबतीत तरी अद्याप बाणेदारपणाचा कोणताही प्रत्यय भारतीय शासनाने आणून दिलेला नाही. जनशक्ती जागृत करण्याचा मार्ग श्रीगुरूजींनी सुचविला होता. त्याचीही उपेक्षाच झाली आहे. एकच गोष्ट चांगली झाली की आपल्या संरक्षण यंत्रणेचा तकलादूपणा प्रत्ययास आल्यामुळे व मेनन यांच्याविरूध्द खुद्द कॉंग्रेस पक्षातही काहूर उठल्यामुळे मेनन यांना राजीनामा देणे भाग पडले. आगामी दोन-तीन वर्षात सेनादलांच्या युध्दसज्जतेकडे काळजीपूर्वक लक्ष देण्यात आले. या सिध्दतेचा लाभ म्हणून आपल्याला १९६५ मधील पाकिस्तानी आक्रमकांना जबरदस्त तडाखा हाणता आला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघासंबंधी भारत सरकारचे धोरण कितीही असमंजसपणाचे व राजकीय स्वार्थासाठी व्यापक राष्ट्रहिताची दारूण उपेक्षा करणारे असले, तरी सरकारशी सहकार्य करून देशाचे कल्याण साधण्याचा प्रयत्न श्रीगुरूजी करीतच राहिले. सरदार पटेल यांच्या इच्छेनुसार काश्मीर नरेशांशी बोलणी करून काश्मीरच्या भारतातील विलीनीकरणाला त्यांची संमती मिळविण्याच्या बाबतीत केवढे महत्वाचे योगदान श्रीगुरूजींनी केले, हे यापूर्वी आपण पाहिलेच आहे. नेपाळ आणि भारत यांचे संबंध सामंजस्याचे आणि सहकार्याचे असणे श्रीगुरूजींना अत्यंत आवश्यक वाटत होते. कारण सांस्कृतिक दृष्टया नेपाळने आग्रहपूर्वक आपले हिंदुत्व टिकवून ठेवले आहे. ते हिंदू राष्ट्रच आहे. त्यामुळे नेपाळच्या मैत्रीची ओढ श्रीगुरूजींना वाटणे स्वाभाविक होते.

योगायोगाने, श्रीगुरूजी २६ फेब्रुवारी १९६३ रोजी शिवरात्रीच्या पावन दिनी भगवान पशुपतिनाथाच्या दर्शनासाठी काठमांडूला गेले होते. दर्शन वगैरे आटोपल्यावर श्रीगुरूजींनी नेपाळ नरेश महाराजधिराज महेन्द्र विक्रमशहा यांची भेट घ्यावी असे ठरले होते. भेटीची वेळही आधीच ठरविण्यात आली होती. त्याप्रमाणे श्रीगुरूजींनी राजेसाहेबांची भेट घेतली. या भेटीच्या प्रसंगी नेपाळचे तत्कालीन पंतप्रधान श्री. तुलसी गिरी हेही उपस्थित होते. डॉ. तुलसी गिरी यांच्यामुळेच ही भेट ठरविणे संघाच्या कार्यकर्त्यांना सोपे गेले होते. कारण डॉक्टरीच्या शिक्षणासाठी ते बिहारात दरभंगा येथे व नंतर कलकत्ता येथे असताना संघाच्या संपर्कात आले होते. नेपाळ नरेशांना धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यासाठी भारतात कुठेही जाण्यास आडकाठी नव्हती. म्हणून श्रीगुरूजींची इच्छा होती की, नेपाळ नरेशांनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यात सहभागी व्हावे. तसेच भारतात हिंदू संघटनेचे कार्य करीत असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी त्यांचा जवळून परिचय व्हावा. संघाचे कार्य त्यांनी पाहावे.

ही भेट अतिशय सौहार्दपूर्ण वातावरणात सुमारे तासभर झाली. या सुमारास नेपाळ आणि भारत यांच्या संबंधांत काहीसा दुरावा निर्माण झालेला होता. नेपाळ आणि चीन यांच्या सीमा

परस्परांना लागून असल्यामुळे १९६२ मधील चिनी आक्रमण व भारताचा दारूण पराभव यांचेही सावट भारत-नेपाळ संबंधांवर पडले होते. नेपाळचा कल चीनकडे अधिक झुकला होता. नेपाळात उपद्रव निर्माण करून उपद्रवी लोक भारतात आश्रय घेतात, अशीही तक्रार नेपाळची होतीच. नेहरूंच्या मनात या 'हिंदू राज्या' संबंधी अढी आहे. अशीही शंका नेपाळ नरेशांच्या मनात डोकावत असल्याचे जाणवत होते. सांस्कृतिक एकतेमुळे नेपाळ व भारत एकमेकांच्या अधिक निकट येतील, ही श्रीगुरूजींची भावना होती व ती त्यांनी नेपाळ नरेशांच्या कानी घातली. या भावनेला प्रतिसादही चांगला मिळाला. तेव्हा श्रीगुरूजींनी अशी इच्छा व्यक्त केली की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य नेपाळ नरेशांनी प्रत्यक्ष पाहावे. त्यासाठी एखाद्या कार्यक्रमास मुद्दाम उपस्थित राहावे. ही सुचना राजेसाहेबांना मान्य झाली. श्रीगुरूजींनी नेपाळ महाराजांच्या भावना दिल्लीतील श्रेष्ठींच्या कानी घालण्याचेही आश्वसन दिले. भारत सरकारचे गृहमंत्री श्री. लालबहादूर शास्त्री दिनांक १ मार्च १९६३ रोजी कांठमांडूला भेट देणार असल्याचे यापूर्वीच घोषित झाले होते. त्यांच्याशी मोकळेपणी बोलण्याची व मैत्रीचे संबंध दृढ करण्याची आग्रहपूर्वक विनंती श्रीगुरूजींनी राजेसाहेबांना केली. मोठया प्रसन्न वातावरणात ही भेट संपली.

काठमांडूवरून काशीला परतताच श्रीगुरूजींनी श्री. लालबहादूर शास्त्री यांना आणि पंतप्रधान पं. नेहरू यांना पत्रे लिहून नेपाळ नरेशांशी झालेल्या भेटीचा वृत्तांत तसेच आपले निष्कर्ष त्यांना कळविले. श्री. लालबहादुर शास्त्री यांना लिहिलेल्या पत्रात श्रीगुरूजींनी म्हटले होते, “आपल्याकडून होणाऱ्या व्यवहारात काही सुधारणा करून, उचित सहभाग देऊन सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित केल्याने, तसेच नेपाळच्या आर्थिक, शैक्षणिक इत्यादी गरजा ध्यानात घेऊन योग्य धोरणांच अवलंब केल्याने नेपाळ लवकरच एक समर्थ अभिन्नहृदय स्नेही, सीमा संरक्षक बंधू या नात्यानं सिध्द होऊ शकतो. भारत व नेपाळ यांचे हितसंबंध परस्परांशी निगडीत आहेत. म्हणून आपल्या संरक्षणाच्या दृष्टीनेही उभय देशांच्या संबंधात सुधारणा होणे आणि निष्कपट मैत्री प्रस्थापित होणे आवश्यक आहे.” श्रीगुरूजींनी असेही सुचविले की, “आजवर भारतीय अधिकाऱ्यांच्या रूक्ष, आत्मीयताशून्य व्यवहारामुळे निर्माण झालेली कटुता नष्ट करून आणि आवश्यकता असेल तर असा व्यवहार ज्यांची जाणूनबुजून वा अनवधानाने केला असेल, त्यांच्या जागी अधिक स्नेहभावपूर्ण व्यक्तींची नियुक्ती करावी. असा सारा विचार करून नेपाळचे भारताशी अतुट स्नेहाचे आणि परस्परपूरकतेचे संबंध निर्माण करण्यात आपण यशस्वी व्हाल असा माझा विश्वास आहे.”

पंतप्रधान पं. नेहरू यांना लिहीलेल्या पत्रातही वरीलप्रमाणेच भावना श्रीगुरूजींनी व्यक्त केल्या आहेत. शिवाय, चीन, कम्युनिस्ट विस्तारवादी आणि नेपाळ यांचा विशेष उल्लेख या पत्रात आहे. श्रीगुरूजींनी लिहिले होते, “मला असे वाटते की नेपाळ सरकारला चीनचे मोठेसे आकर्षण नाही. आंतरराष्ट्रीय साम्राज्यवादी साम्यवादाविषयी तर त्याला मुळीच प्रेम नाही. त्यामुळे चिनी विस्तारवादाच्या विरोधात एक प्रबळ शक्ती या नात्याने नेपाळ उभा होऊ शकतो. पण आपण भारतवासीयांनी नेपाळला अनेक प्रकारे साहाय्य करावयास हवे. आपले उद्देश व धोरणे यासंबधीही नेपाळच्या मनात विश्वास निर्माण करणे जरूरीचे आहे.” या पत्राचे लगेच दिनांक १ मार्च रोजी पं. नेहरूंकडून उत्तर आले व त्यात श्रीगुरूजींच्या विचारांशी बव्हंशी सहमती व्यक्त करण्यात आली होती. पं. नेहरू व श्रीगुरूजी यांच्यात तात्विक मतभेद अवश्य होते. पण राष्ट्रहिताच्या दृष्टीने एखाद्या राष्ट्रीय जिव्हाळयाच्या प्रश्नावर परस्परांची बूज राखून विचारांचे आदान-प्रदान करण्याएवढा मनाचा

मोठेपणाही होता. नेपाळविषयक पत्रव्यवहारावरून हे निदर्शनास येते म्हणून या प्रकरणाची थोडी विस्ताराने माहिती इथे दिली आहे.

पुढे १९६५च्या उत्तरार्धात श्री. अटलबिहारी वाजपेयी, श्री. लालबहादुर शास्त्रींना भेटले होते. त्यावेळी श्रीगुरूजींच्या नेपाळविषयक कामगिरीचे मोकळेपणी गुणग्रहण शास्त्रीजींनी केले होते. ते म्हणाले होते, “नेपाळ नरेशांशी बोलताना माझ्या ध्यानात आले की अनुकूल पार्श्वभूमी तयार करून नेपाळ - भारत मैत्री दृढ करण्याचे माझे तीन चतुर्थांश काम श्रीगुरूजींनी आधी करून टाकले आहे.”

पण नेपाळ नरेशांच्या श्रीगुरूजींशी झालेल्या भेटीचा विषय एवढयावर संपत नाही. त्याचा आणखी एक पैलू आहे व तो भारत सरकारला शोभा देणारा नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एखाद्या कार्यक्रमासाठी येण्यास नेपाळ नरेशांनी श्रीगुरूजींशी बोलताना अनुकूलता दर्शविली होती. म्हणून महाराजाधिराजांच्या सोयीनुसार त्यांना संघाच्या कार्यक्रमासाठी आणण्याचा प्रयत्न संघातर्फे सुरू झाला होता. १९६३ च्या ऑक्टोबर महिन्यात परदेश प्रवास आटोपून नेपाळ नरेश मुंबईला येणार होते त्यावेळी मुंबई येथे त्यांचा प्रकट सत्कार करण्याची योजना संघ कार्यकर्त्यांनी आखली. पण ती वेळ नरेशांना सोयीची नव्हती व अर्थातच हा विचार अमलात येऊ शकला नाही. नंतर १९६४ च्या मकर संक्रमण उत्सवाचे प्रमुख अतिथी म्हणून महाराजांनी यावे अशी विनंती त्यांना करण्यात आली. पण त्याचवेळी पं. नेहरूंची नेपाळ भेट ठरल्याने महाराजांना काठमांडूत राहणे भाग झाले.

अखेर १९६५ च्या चौदा जानेवारीला नागपूर येथील संघाच्या मकर संक्रमणोत्सवासाठी महाराजांनी यावे अशी विनंती करण्यात आली आणि महाराजांनी ती मान्य केली. डिसेंबर १९६४ च्या प्रारंभी ही मान्यता मिळताच श्रीगुरूजी दिल्लीला गेले. तिथे राष्ट्रपती व पंतप्रधान यांची भेट घेऊन सगळया कार्यक्रमासंबंधी चर्चा करण्याची त्यांची इच्छा होती. राष्ट्रपतींची भेट दिनांक ९ डिसेंबरला झाली. पण पंतप्रधानांची भेट झाली नाही. नंतर नेपाळ नरेशांनी त्यांच्या कार्यक्रमाचा तपशील नागपूरला कळविला तेव्हा श्रीगुरूजी पुन्हा दिल्लीला गेले. पण याही खेपेस पंतप्रधानांची भेट झाली नाही. म्हणून श्रीगुरूजींनी पंतप्रधानांच्या नावे पत्र लिहून नेपाळ नरेशांच्या कार्यक्रमाची संपूर्ण माहिती त्यांना कळविली. या पत्राची पोचही आली.

दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांची भेट घेऊन त्यांनाही सगळा कार्यक्रम श्रीगुरूजींनी सांगितला. सरकार कोणते सहकार्य देणार? अशी विचारणा केली. यावर, भारत सरकारकडून येणाऱ्या सूचनांनुसार सर्व व्यवस्था केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. एवढे झाल्यानंतरही जो प्रकार पुढे घडला तो दुर्दैवी होय. श्रीगुरूजी २९ डिसेंबर ते ५ जानेवारी बिहारमध्ये दौऱ्यावर असतानाच काही तथाकथित पुरोगामी किंवा डाव्या विचारांच्या हिंदूविरोधी वृत्तपत्रांतून नेपाळ नरेशांच्या संकल्पित भेटीसंबधी अगदी प्रतिकूल मजकूर प्रसिध्द झाला. शिवाय पंतप्रधानांचेही एक वक्तव्य प्रसिध्द झाले. त्यात नेपाळ नरेशांच्या भेटीसंबंधी आपल्याला काहीही ठाऊक नसल्याचे म्हटले होते!

राजे महेन्द्र यांनी संघाचे निमंत्रण स्वीकारणे व संघाच्या कार्यक्रमासाठी भारतात येणे काँग्रेसपक्षीय भारत सरकारला आवडले नाही, हे स्पष्टपणे दिसू लागले. इकडे श्रीगुरूजींनी तर नेपाळ नरेश मकरसंक्रमणाच्या कार्यक्रमासाठी नागपूरला येणार असे घोषित करून टाकले होते. आणि नागपुरात त्यामुळे एक प्रकारचे नवचैतन्य संचरले होते. स्वागताची परोपरीने तयारी सुरू झाली होती. त्या सर्व उत्साहावर विरजण पडले. कारण नेपाळ नरेश भारतात यावयाचे होते आणि भेटीसाठी भारत

सरकार प्रतिकूल असताना त्यांनी येणे आंतरराष्ट्रीय नीतीला धरून नव्हते. तेव्हा येण्याची असमर्थता त्यांनी स्वाभाविकपणेच व्यक्त केली. अखेरचा प्रयत्न म्हणून श्रीगुरूजींनी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांना एक तातडीचे पत्र लिहीले. या पत्रात म्हटले होते, “नेपाळबरोबर आपले संबध अधिक चांगले व अधिक चांगल्या आधारावर कायम करण्याची आवश्यकता जाणून आम्ही लोक हे कार्य करीत आहोत, त्यासंबंधी आपणास खात्री असावी. आपल्या अत्यंत महत्वाच्या उत्तर सीमेवरील नेपाळची स्थिती पाहता, प्राचीन कालापासून चालत आलेल्या या संबंधाना अधिक दृढ करणे आवश्यक आहे.” परंतू या पत्राचा काहीही उपयोग झाला नाही. भारत सरकारचा विरोध मावळला नाही. एका ऐतिहासिक प्रसंगाला केवळ नागपूरकरच नव्हते, तर आपला समस्त भारत देश मुकला.

आपली असमर्थता नागपूरला कळविणारे जे पत्र विशेष दूताच्या हस्ते नेपाळ नरेशानी नागपूरला पाठविले त्या पत्राबरोबरच आपले उत्सवातील संकल्पित भाषणही त्यांनी लिखित स्वरूपात पाठविले होते. ते भाषण उत्सवात प्रकटपणे वाचून दाखविण्यात आले. गुरूजींच्या भाषणातही वस्तुस्थितीचा खुलासा होताच. संघाच्या या उत्सवात नेपाळ नरेश आले असते तर भारत - नेपाळ सांस्कृतिक संबंध अधिक दृढ झाले असते. पण हा वस्तुनिष्ठ व राष्ट्रहिताचा विचार सोडून केवळ पक्षीय स्वार्थाचा विचार सत्तारूढ पक्षाने केला. अदूरदृष्टीच त्याने प्रकट केली, असा भाव श्रीगुरूजींच्या भाषणात व्यक्त झाला, शिवाय श्रीगुरूजींनी एक विस्तृत पत्रक प्रसिध्द करून सगळया घटनाक्रमाची माहिती स्वदेशबांधवांना दिली. या प्रकरणाचे पडसाद वृत्तपत्रांतून आणि चर्चेतून बरेच दिवस उमटत राहिले. अनेकांनी असे मत व्यक्त केले की, भारताचे नेपाळमधील तत्कालीन राजदूत श्री. श्रीमन्नारायणजी अग्रवाल यांच्या विरोधामुळेच कार्यक्रमात मुख्य बाधा निर्माण झाली.

१९६५ मध्ये पाकिस्तानने काश्मीरच्या छांब भागात सेना घुसवून युध्दाला प्रारंभ केला. तेव्हा पंतप्रधानपदी श्री. लालबहादूर शास्त्री होते. या युध्दात खुल्या दिलाने सर्वांचे सहकार्य संपादन करण्याची त्यांची भूमिका होती. श्रीगुरूजी हे कोणत्याही राजकीय पक्षाचे नेते नव्हते. पण त्यांनाही सर्वपक्षीय विचारविनियात संमीलित करून घेतले. दिल्लीतील ही बैठक ठरली त्या वेळी श्रीगुरूजी महाराष्ट्रात सांगली येथे नित्याच्या प्रवासात होते. त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला आणि शासकीय सहकार्यानेच विमानप्रवास करून ते दिल्लीला पोचले. या बैठकीत काय झाले आणि श्रीगुरूजींनी कोणती भुमिका मांडली, यांचा प्रकट उच्चार त्यांनी लगोलग कुठे केला नाही. पुढे ८ मार्च १९७० रोजी विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांपुढे बोलत असताना या बैठकीतील अनुभव त्यांनी कथन केला. तो त्यांच्याच शब्दांत उद्-घृत करणे योग्य होईल. श्रीगुरूजी म्हणाले,

“त्या बेठकीत एका गृहस्थांनी पंतप्रधानांना लढाईचे हेतू स्पष्ट करा (लेट अस डिफाईन अवर वॉर एम्स्) असे म्हटले. एक पुढारी तर वारंवार ‘युवर आर्मी’ असा शब्द प्रयोग करीत बोलू लागले. त्यांना मी प्रत्येक वेळी अडवून ‘अवर आर्मी’ (आपले सैन्य) म्हणा, असे सांगत असे. तिसऱ्या खेपेलाही त्यांनी जेव्हा दुरूस्ती केली नाही, तेव्हा मात्र मी म्हणालो, “आपण हे काय बोलता आहात?” तेव्हा ते भानावर आले आणि ‘अवर आर्मी’ हा शब्दप्रयोग त्यांनी केला.

या बैठकीत बोलताना मी म्हणालो की, “आपण ही लढाई जिंकली पाहिजे, एवढे केवळ एकच मला म्हणावयाचे आहे. त्यासाठी जे काही परिश्रम करावे लागतील ते करण्यासाठी सर्व लोकांनी तयार राहिले पाहिजे. पक्षबाजी नको. ‘युवर आर्मी’ असा शब्दप्रयोग करणे म्हणजे आपल्या देशाचे संरक्षण करणाऱ्या सैन्याला परके मानणे होय! आपल्यावर आक्रमण करणाऱ्याविरूध्द युध्द करून आपले

संरक्षण करावयाचे आहे, ही बाब अत्यंत स्पष्ट असतानाही 'लेट अस डिफाईन अवर वॉर एम्स' असे म्हणणे हे आश्चर्यजनक आहे. जे दुसऱ्यावर आक्रमण करतात त्यांनी ते 'डिफाईन' करावे. आम्हाला युध्दाचे हेतू काय, ते सांगण्याची गरज नाही. आपला 'एम'(हेतू) अत्यंत स्पष्ट आहे. तो आहे युध्दात आपल्या सन्मानाचे रक्षण करून आक्रमकाला योग्य धडा शिकविणे आणि विजय प्राप्त करणे. 'लेट अस डिफाईन अवर वॉर एम्स' वगैरे म्हणणे म्हणजे युध्दाच्या उत्साहात अडचणी उत्पन्न करणे होय."

"त्या बैठकीत उपस्थित असलेले लोक परस्परांपासून वेगळे, जणू काही वेगवेगळया देशांचे, राष्ट्रांचे किंवा वेगवेगळे हितसंबंध असलेले लोक आहेत आणि म्हणूनच परस्परांचे विरोधक बनून ते एकमेकांपुढे बसले आहेत. असेच मला वाटू लागले. त्यांच्यात समान असे काही सूत्र नाही, असेच वाटत होते, हे चित्र पाहिल्यावर असे म्हणावे लागेल की, जगातील वेगवेगळया देशांचे लोक राजकीय क्षेत्रात काम करताना ज्या काही सामंजस्यपूर्ण बाबी गृहीत धरीत असतात, त्या आपल्या देशात गृहीत धरणे जणू योग्य समजले जात नसावे. अशा या स्थितीत आपल्या संघकार्याचे किती महत्व आहे, हे समजावून सांगण्याची आवश्यकता नाही."

श्रीगुरूजींनी स्वत: च केलेल्या या निवेदनावरून १९६५ च्या युध्दकाळात त्यांनी स्वीकारलेल्या भूमिकेचे स्वरूप सहज ध्यानात येऊ शकेल. युध्द चालू असताना युध्दात सरकारला संघस्वयंसेवकांचे आणि सर्वसामान्य जनतेचे परिपूर्ण सहकार्य मिळेल आणि प्रत्यक्ष सीमेवरील लोकांचे मनोधैर्य उत्तमप्रकारे टिकून राहील, अशा प्रयत्न श्रीगुरूजींनी केला. संघस्वयंसेवकांनी लष्काराला सहकार्य देण्यात व जनता एकमुखाने जवानांच्या मागे सक्रिय उभी आहे असे दृश्य उभे करण्यात त्यांनी अतिशय उत्साहाने पुढाकार घेतला. युध्द ज्या प्रकारे चालविले जात होते आणि आपली सेनादले जी स्पृहणीय गुणवत्ता प्रकट करीत होती, त्यामुळेही श्रीगुरूजी फार प्रसन्न होते. शत्रुच्या मुलखात घुसून त्याला तडाखा हाणण्याचा निर्णय त्यांना लष्करी दृष्टया अत्यंत उचित वाटला. सगळया देशात आपल्या सेनेच्या विजयी मुसंडीमुळे उत्साहाची, देशभक्तीच्या उसळत्या भावनेची लाट पसरली होती. अमेरिका आणि ब्रिटन यांच्याकडून पाकिस्तानला मिळालेल्या रणगाडयांची आणि अन्य आधुनिक युध्दसाहित्याची आपल्या शूर व कल्पक जवानांनी जी वासलात लावली, तिच्या नवलकथा ज्याच्या त्याच्या तोंडी होत्या. १९६२ साली चीन बरोबरच्या युध्दात पत्काराव्या लागलेल्या नामुष्कीचा कलंक जवानांनी साफ धुवून काढला होता आणि पाकिस्तानचे पाश्चात्य साहाय्यकर्ते स्तिमित होऊन जावेत, एवढा पराक्रम गाजविला होता. फार काळानंतर ही रणक्षेत्रावरील विजयाची गौरवशाली अनुभूती आपला देश घेत असल्याने सर्वत्र चैतन्य दिसत होते. या सर्व गोष्टीबद्दल समाधान श्रीगुरूजींच्या या कालखंडातील भाषणात व्यक्त झालेले आढळून येते. सुदैवाने, पंतप्रधान श्री. लालबहादुर शास्त्री हे संघाला 'अस्पृश्य' मानणाऱ्या परंपरेतील नसल्यामुळे सीमाप्रदेशात जवानांची पिछाडी सांभाळण्याच्या कामी महत्वपूर्ण योगदान संघाचे स्वयंसेवक देऊ शकले. जनतेतील उत्साही आणि त्यागभावना जागवू शकले.

हे जरी असले तरी भारतीय जवानांची पाकिस्तानातील विजयी आगेकूच पाश्चात्य आणि रशियन दडपणाखाली दिल्लीतील शासनकर्त्यांनी रोखून धरली, तेव्हा श्रीगुरूजींना वाईट वाटले. भारताच्या द्वेषावर पोसल्या गेलेल्या पाकिस्तानचे कंबरडे कायमचे मोडण्याची चालून आलेली संधी आपण गमावू नये असे स्पष्ट प्रतिपादन त्यांनी केले. युध्दविरामाची घोषणा झाली तेव्हाही, पाकिस्तानला पुन्हा शस्त्रसज्ज करण्यासाठी हे मध्यंतर आहे असा इशारा त्यांनी दिला. भारताचे उद्दिष्ट

पाकिस्तानची युध्दक्षमता (वॉर पोटेन्शियल) नष्ट करण्याचे केवळ होते आणि पाकिस्तानी भूमीची अभिलाषा भारताला नाही, असे जे दिल्लीतून सांगण्यात आले, त्यावर श्रीगुरूजींनी केलेली टीका अत्यंत विदारक होती. त्यांनी म्हटले, "केवळ युध्दक्षमता नष्ट करण्याचे हे धोरण ठरविताना मनुष्यस्वभावाचा एक मूलभूत पैलू दृष्टिआड करण्यात आला आहे. एखादा मनुष्य हिंसक वा आक्रमक बनतो तो त्याच्यापाशी शस्त्रास्त्रे असतात म्हणून नव्हे, तर त्याच्या मनातील दुष्ट प्रवृत्ती त्याला त्या दिशेने प्रवृत्त करीत असते. म्हणून ती दुष्ट प्रवृत्ती कायम असेपर्यंत तो मनुष्य पुन: पुन्हा शस्त्रे जमवील आणि इतरांच्या हितावर निखारे ठेवण्यास प्रवृत्त होईल, हे उघड आहे. जगातील साऱ्या आक्रमक राष्ट्रांचा इतिहास चाळून पाहिला तर हीच गोष्ट प्रत्ययास येईल आता ही दुष्ट प्रवृत्ती कशी नष्ट करावयाची? दुष्ट प्रवृत्ती ही हातात पकडून नष्ट करता येईल अशी वस्तू नाही. दुष्ट प्रवृत्तींचा अविष्कार शेवटी माणसाच्या वा मनुष्यसमुहाच्या माध्यमातूनच होत असतो. त्यामुळे आपणास जर दुष्ट प्रवृत्तीचे उन्मुलन करावयाचे असेल, तर त्या प्रवृत्तीच्या आधाराचा - म्हणजे दुष्ट प्रवृत्तीच्या माणसांचा - नाश करणे अपरिहार्य आहे." शिवाय "पाकिस्तानचे लढाऊ बळ इंग्लंड - अमेरिकेवर अवलंबून आहे आणि या देशांचे 'वॉर पोटेन्शियल' नष्ट करणे भारताच्या शक्तीबाहेरचे आहे," याकडेही श्रीगुरूजींनी लक्ष वेधले.

परकीय भूमीची अभिलाषा भारताला नाही, या प्रकारच्या भाषेचा वापर पाकिस्तानच्या संदर्भात, श्रीगुरूजींनी निषिध्द ठरविला. त्यांनी स्पष्टपणे असे सांगितले की, "पाकिस्तानची म्हटली जाणारी भूमी हा अठरा वर्षांपूर्वीपर्यंत भारताचाच अभिन्न भाग होता. काश्मीरच्या एक तृतीयांश भागावर पाकिस्तानने अन्यायाने कब्जा केला होता व त्याचे आक्रमण नष्ट करणे म्हणजे आपलीच भूमी मिळविणे होय. संपूर्ण पाकिस्तान आपण मुक्त करू तेव्हाच आपला स्वातंत्र्यसंग्राम यशस्वीरीत्या पूर्ण झाला असे म्हणता येईल. या संबंधात जागतिक लोकमताचा अवास्तव बाऊ करण्यात अर्थ नाही." "किमानपक्षी भारतीय सेना जेथवर पाकिस्तानात शिरल्या आहेत, तेथेच युध्दविराम रेषा पक्की करावी आणि यूनोने काश्मीरला १९४८ साली लावला तोच न्याय येथेही लागू करावा," असेही प्रतिपादन श्रीगुरूजींनी आग्रहपूर्वक केले. यापैकी कोणताच सल्ला भारत सरकारने मानला नाही. आणि परकीय दडपण शास्त्रीजींच्या दृष्टीने दुर्निवार ठरले. शास्त्रीजींनी वाटाघाटीला ताश्कंदला जाण्याचे कारण नाही, असेच श्रीगुरूजींचे मत होते. पण शास्त्रीजी गेले, रशियन दडपणाखाली वाटाघाटी झाल्या व तथाकथित 'आझाद काश्मीर' मधून भारतीय सेना मागे घेण्याच्या प्रश्नावर घट्ट राहण्यातही ते सफल होऊ शकले नाहीत. विजयी जवानांचा एक प्रकारे अवसानघातच झाला. ताश्कंदवरून शास्त्रीजी सुखरूप परतले असते तर इतिहासाला कदाचित नवी कलाटणी मिळाली असती. पण शास्त्रीजींना ताश्कंदमध्येच रहस्यमय मृत्यू झाला व स्वतंत्र बाण्याचा आणि अस्सल स्वदेशी अंत:करणाचा नेता भारताने गमावला! रणांगणावर विजय मिळूनही वाटाघाटीच्या मेजावर त्या विजयाची माती कशी झाली, या इतिहासाची सगळीच उजळणी या ठिकाणी करण्याचे प्रयोजन नाही. ताश्कंदच्या पर्यवसानाने श्रीगुरूजींना अतोनात दु:ख झाले.

पाकिस्तानी आक्रमणाच्या काळात संपूर्ण देश एका महाकाय सामूहिक व्यक्तित्वाच्या रूपाने, एका विराट राष्ट्रपुरूषाच्या स्वरूपात, उभा राहिला हे दृश्य नि: संशय आनंददायक होते, आपल्या सुप्त राष्ट्रीय क्षमतेचा आश्वासक प्रत्यय आणून देणारे होते, पण गुरूजींच्या अंत:करणात पाल चुकचुकत होती. त्यांनी पृच्छा केली, "हे चित्र यापुढे असेच चिरकाल टिकून राहील, आपल्या समाजजीवनाला पोखरून काढणाऱ्या सर्व फुटीर प्रवृत्ती आणि दुर्गुण आता इतिहासजमा झाले आहेत. असे आपणास

खात्रीपूर्वक म्हणता येईल काय?"  असा संशय येण्यास मद्रासकडील हिंदीविरोधी आंदोलन, पंजाबमधील यादवीचक्र इत्यादी काही घटनांची उदाहरणे त्यांनी दिली आणि प्रश्नांचे अंतिम उत्तर सांगताना ते म्हणाले, "संकट दूर होताच पुन्हा पूर्वीच्या चाकोरीत जाऊन बसण्याची वृत्ती हे आपल्या विनाशाचे एक प्रमुख कारण असल्याचे आपल्या इतिहासातही नमूद आहे.  आपला समाज कुंभकर्णासारखा आहे.  म्हणून राष्ट्रीय भावनेची आणि एकात्मतेची मुळे, केवळ शत्रुच्या आक्रमणाच्या वेळी होणाऱ्या समाजजागृतीच्या तात्कालिक भावनेऐवजी, अधिक खोल व विधायक गोष्टीमध्ये रूजविली पाहिजेत.  अशा प्रकारच्या चिरस्थायी राष्ट्रीय एकात्मतेचे व भक्तीचे अधिष्ठान कोणते? विशुध्द राष्ट्रीयत्वाची धारणा हेच खऱ्या आणि शाश्वत प्रेरणेचे जन्मस्थान आहे.  सध्याच्या संकटकाळात आपल्या समाजाच्या ज्या अजेय सामर्थ्यांचे सुस्पष्ट दर्शन घडले आहे, त्याचा परिपूर्ण अविष्कार या प्रेरणेतूनच होईल."

तीन वर्षात जी दोन आक्रमणे आपल्यावर झाली, त्या निमित्ताने झालेल्या तात्कालिक जागृतीवर समाधान न मानता राष्ट्रजीवनाचा मूलभूत विचार श्रीगुरूजींनी सर्वत्र मांडला. श्रीगुरूजींच्या जीवनकाळात पाकिस्तानशी आणखी एक युध्दाचा प्रसंग उद्-भवावयाचा होता.  त्यासंबंधीचे विवेचन पुढे येईलच.

## १६. हिंदूसाठी जागतिक व्यासपीठ

१९४९ च्या जुलै महिन्यात संघबंदी उठल्यानंतरच्या काळात श्रीगुरूजींनी नव्या परिस्थितीत हिंदू संघटनेचा विचार सुस्थिर आणि परिपक्व करण्यासाठी केवढे भगीरथ प्रयत्न केले, ह्याचे आपण निरनिराळया प्रसंगाच्या अनुरोधाने अवलोकन केलेच आहे. संघ कार्यकर्त्यांचा अभ्यासवर्ग असो, गोहत्याबंदीसारखे राष्ट्रीय मानबिंदूच्या संरक्षणाचे आंदोलन असो, एखादा उत्सव प्रसंग असो की युध्दासारखा निकराचा प्रसंग असो, 'हिंदू' या शब्दाने अंत:करणात जागृत होणाऱ्या राष्ट्रीय स्वरुपज्ञानाकडे ते लक्ष वेधीत .हिंदू परंपरेचा अत्यंत प्रेरक व एकात्मतेला पोषक अर्थ उलगडून सांगत . राष्ट्रीय जीवनाच्या सर्वच क्षेत्रात हिंदू म्हणजेच मानवी कल्याणाच्या जीवनमूल्यांचा भक्कम आधार घेऊन रचना व्हावी म्हणजे राष्ट्र सर्वांगांनी तेजस्वी स्वरुपात उभे होईल, अशी त्यांची दृढ श्रध्दा होती . या धारणेने राष्ट्रजीवनाची विविध क्षेत्रे व्याप्त व्हावी, असा जाणीवपूर्वक प्रयत्न त्यांनी केला .शाखात्मक कामाच्या एक नव्या टप्प्यावर त्यांनी संघाला नेले.

आपणाला असे दिसते की संघाचे शाखात्मक काम नैसर्गिक रीत्या उत्क्रान्त होत गेलेले आहे. संघस्थानाबाहेर व्यापक रीत्या संघाचा विचार पोचविण्याची प्रक्रिया स्वाभाविकपणे घडत गेली आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी राजकीय पक्षासाठी काही कार्यकर्ते मागितले. श्रीगुरूजींनी ते दिले. संघ राजकारणात पडला नाही. नित्य शाखात्मक कार्यावरील त्यांचे लक्ष विचलित झाले नाही. पण संघाचा विचार घेऊन गेलेल्या लोकांनी राजकारणात राष्ट्रीय कणखरपणा आणि मूल्यनिष्ठा आणण्याचा प्रयत्न केला. श्रमिक क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, सहकार क्षेत्र, वनवासी क्षेत्र, वृत्तपत्रसृष्टी, नाना प्रकारची सेवाकार्ये यांत संघाचे स्वयंसेवक आपआपल्या रुचीनुसार गेले. त्या त्या ठिकाणी राष्ट्रीय भूमिका आणि संस्कार निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला. संघाची शिकवण एवढीच की, प्रत्येक स्वयंसेवक हा जीवनाच्या सर्व अवस्थांत संघ-विचारांचा वाहक असावा आणि आपल्या मूळ शक्तिकेंद्राशी त्याचा संपर्क राहावा. तो जाईल तेथे माणसे जोडण्याचा आणि त्यांना संघानुकूल बनविण्याचा त्याने प्रयत्न करावा. स्वत: अनुशासनहीन बनू नये. म्हणून, स्वयंसेवक जिथे काम करतो तिथे ते काम संघाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली राहावे, अशी मुळात कल्पना नसते. 'पांचजन्य' साप्ताहिकाच्या दि .२ जुलै १९५६ च्या अंकांत श्रीगुरुजींचा डॉ .श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या संबंधीचा एक लेख प्रसिध्द झाला आहे .या लेखात जनसंघाची स्थापना डॉ .श्यामाप्रसाद यांनी केली त्यावेळी काय बोलणे झाले, त्याचा स्पष्ट उल्लेख श्रीगुरुजींनी अधिकृतपणे केलेला आढळतो .राजकीय पक्ष आणि संघ यांच्या अन्योन्य संबंधाविषयी संभ्रम अनेकांच्या मनात असतो .श्रीगुरुजींचे निवेदन वाचल्यास तो संभ्रम राहणार नाही .श्रीगुरुजींनी लिहीले आहे:

“स्वाभाविकच त्यांना मला सावध करावे लागले की, रा .स्व .संघाला राजकारणात ओढता येणार नाही . संघ कोणत्याही राजकीय पक्षाच्या आधीन राहून कार्य करु शकत नाही .कारण कोणत्याही राजकीय पक्षाच्या साधनाच्या रुपात राहून कोणतीही संस्था राष्ट्रीय जीवनाच्या पुनरुत्थानाचे आपले लक्ष्य साध्य करण्याची वाटचाल करु शकणार नाही .त्यांनी ही स्थिती मान्य केली .तसा त्यांना अनुभवही आला .त्याचबरोबर त्यांनी असे मत व्यक्त केले की, नवा राजकीय पक्ष कोणत्याही संस्थेच्या आधीन राहू शकत नाही .रा .स्व .संघ आणि संकल्पित राजकीय पक्ष यांच्या संबंधाच्या मूळ आधारावर अशा रीतीने सहमत झाल्यावर या नव्या पक्षाचे लक्ष्य काय असावे हा दुसरा मुद्दा होता .रा .स्व .संघाबाबत

बोलायचे तर त्याचे लक्ष्य आणि त्याची कार्यपध्दती अगदी सुस्पष्ट होती .म्हणूनच संघाच्या स्वयंसेवकांचे सहकार्य नव्या पक्षाला अपेक्षित असेल तर या पक्षाचे आदर्श संघासारखेच असावयास हवेत, हे स्पष्टच होते; आणि पुढे या मुद्द्यावरही मतैक्य झाले."

संघाचे तरुण आणि प्रौढ स्वयंसेवक आज हजारो संस्थांतून काम करीत आहेत. काही संस्था किंवा 'मास ऑर्गनायझेशन' त्यांनी नव्याने सुरु केल्या असतील तर काही जुन्याच असतील .पण त्या कामाचा आणि संघाचा संबंध काय असा कोणी प्रश्न केला, तर श्रीगुरुजींच्या उपरोल्लेखित उताऱ्यांकडेच अंगुलीनिर्देश करावा लागेल .स्वयंसेवक कोठल्याही क्षेत्रात गेला आणि राष्ट्रीय प्रेरणांना अनुसरुन चांगले काम त्याने केले, तर श्रीगुरुजींना त्याचे फार कौतुक वाटत असे .डॉ .श्यामाप्रसादांचे सहकारी झालेले थोर विचारवंत पं .दीनदयाळ उपाध्याय किंवा भारतीय मजदूर संघाचे प्रतिभाशाली शिल्पकार श्री .दत्तोपंत ठेंगडी या दोन नावांचा वानगीदाखल उल्लेख केला तरी पुरे आहे. जशपुरचा वनवासी कल्याणाश्रम काढणारे श्री .बाळासाहेब देशपांडे किंवा विवेकानंद शिला स्मारकाचे भव्य आयोजन सफल करणारे श्री .एकनाथजी रानडे ही आणखी सहज जिभेवर येणारी दोन प्रमुख नावे .संघाचे स्वयंसेवक ज्या क्षेत्रात गेले त्या क्षेत्रातील परिस्थिती, तेथे काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था, त्यांची उद्दिष्टे आणि कार्यपध्दती व त्या क्षेत्राला संघानुकूल राष्ट्रीय ध्येयवाद देण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचे स्वरुप यांवर त्यांनी साधकबाधक विचार केला .अभ्यास केला .आणि आपल्या कल्पकतेने व प्रतिभेने मार्ग शोधला .प्रतिष्ठा संपादन केली .संघाच्या मूळ संकल्पनेचे, राष्ट्र उभारणीच्या उद्दिष्टाचे हे विकसनशील व्यावहारिक स्वरुप म्हणावे लागते .समाजातील प्रत्येक व्यक्ती संघस्थानावर येईल, असे डॉक्टरांनी किंवा गुरुजींनी कधीही म्हटले नाही .प्रत्येक व्यक्ती संस्कारित झाली पाहिजे, राष्ट्रभक्तिपूर्ण बनली पाहिजे व प्राचीन हिंदू परंपरेपासून प्रेरणा घेऊन तिच्या जीवनाची घडण व्हावयास पाहिजे, असे मात्र त्यांनी अवश्य म्हटले.

या सगळया नित्य वाढणाऱ्या व संघप्रेरणेनुसार चालणाऱ्या कामांकडे पाहण्याची संघाची भूमिका काय, हा प्रश्न अनेकांच्या मनात वारंवार उद्-भवतो. १९५० नंतर जसजसे निरनिराळया क्षेत्रात स्वयंसेवक गेले, तसतसे या कार्यांशी संघाच्या असलेल्या संबंधाचे नेमके स्वरुप काय, याची चर्चा वृत्तपत्रेही करु लागली. विशेषत: वृत्तपत्रांना देशातील राजकीय सत्तास्पर्धेत बातम्यांच्या दृष्टीने अधिक रुची असल्यामुळे भारतीय जनसंघ व संघ याबाबत ती वारंवार लिहीत असत. सध्या भाजप व संघ यासंबंधी लिहितात. यात राजकीय पक्ष ही संघाचीच राजकीय आघाडी (Front) असल्याची समजूत सामान्यत : डोकावते .त्यामुळे श्रीगुरुजींच्या काळात भारतीय जनसंघात संघाशी निष्ठा असलेला कार्यकर्त्यांचा गट व संघाचे नियंत्रण नको असलेला गट असा फरक केला जाई व बातम्या रंगविण्याचा प्रयत्न होई . म्हणून या प्रश्नावर श्रीगुरुजी वेळोवेळी जे बोलले किंवा जे मार्गदर्शन त्यांनी केले, त्यावर धावता दृष्टिक्षेप टाकणे उचित ठरेल.

भाषावार प्रांतरचनेपूर्वीच्या मध्यप्रदेशात मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल यांच्याशी श्रीगुरुजींचे घरगुती आणि जिव्हाळयाचे संबंध होते. त्यांना श्रीगुरुजींनी एका भेटीत स्पष्टपणे सांगितले होते, "लहान पोरांना खेळविण्यासाठी एवढी देशव्यापी संघटना आम्ही उभी केलेली नाही .या मागे आमचा विशिष्ट उद्देश अवश्य आहे .आपल्या राष्ट्रजीवनाच्या प्रत्येक अंगोपांगावर मुख्य उद्दिष्ट आहे व ते आम्ही कधीही लपवून ठेवलेले नाही .प्रत्येक प्रसंगी- Yes, We want to dominate every aspect of our

national life - अशा सडेतोड शब्दांत श्रीगुरुजी संघाची आकांक्षा मोठमोठया कार्यक्रमांतूनही व्यक्त करीत असत.

या संदर्भात, १९५४ साली सिंदी येथे कार्यकर्त्यांची जी प्रदीर्घ ऐतिहासिक बैठक पार पडली, तीत श्रीगुरुजींनी व्यक्त केलेले विचार मूलगामी आणि नेहमीसाठी मार्गदर्शक ठरणारे आहेत. दि. १४ मार्च रोजी रात्री झालेले हे भाषण आहे. या भाषणात शाखाकार्य व भिन्न भिन्न क्षेत्रातील नवी कामे यांचे जे नाते श्रीगुरुजींनी सांगितले आहे आणि शाखाकार्याच्या परिपूर्ण क्षमतेवर जो जबरदस्त विश्वास प्रकट केला आहे, त्याची स्मृती जरा धुसर झाल्यासारखी वाटते. म्हणून या भाषणातील महत्वाचा भाग येथे श्रीगुरुजींच्याच शब्दांत उद्-घृत करणे समयोचित ठरेल.

श्रीगुरुजी म्हणाले, “गेल्या काही वर्षांपासून संघकार्याबरोबरच आणखीही काही गोष्टी केल्या जात आहेत . उदाहरणार्थ, आपल्या प्रयत्नांनी वृत्तपत्रे, शिक्षणसंस्था, रुग्णालये वगैरे सुरु झाली आहेत . अनेक ठिकाणी सेवेचे कार्यही केले आहे . विचार येतो की हे सर्व कशासाठी केले? दैनंदिन शाखेच्या स्वरुपात जे कार्य चालते त्यात काही उणीव जाणवल्यामुळे या कामात पडलो काय? आपण तर म्हणत होतो की वृत्तपत्रीय प्रचाराशी आपल्याला काही करावयाचे नाही .तथाकथित विधायक कार्यावर आपला विश्वास नाही .मग या निरनिराळया प्रकारच्या कामांचा व आपल्या मूळ कार्याचा मेळ कसा घालावयाचा? सिध्दान्तरुपाने मी आवश्य म्हणेन की संघकार्य स्वतंत्र आणि सर्वांगपूर्ण आहे .त्यात काही अपूर्णता नाही व एखादी त्रृटी दूर करण्यासाठी या कामांची गरज आहे अशीही वस्तुस्थिती नाही . याच विश्वासाने आम्ही संघाचे कार्य करीत आहोत.

परंतू प्रश्न उपस्थित होतो की मग हे नवीन नवीन क्षेत्रांत पदार्पण का? याचे उत्तर हे की आम्हाला जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर प्रभाव निर्माण करावयाचा आहे. त्यासाठी त्या त्या क्षेत्रांत आक्रमण करावयाचे आहे. म्हणून नवे उपक्रम म्हणजे आपल्या कार्याच आक्रमक पाऊल आहे. कार्यात त्रृटी आहेत या पराभूत भावनेने या कामांना हात घालण्यात आलेला नाही. जर पराभूत मनोवृत्तीतूनच या कार्याचा जन्म झाला असे समजले जात असेल तर ही कामे करण्याची मुळीच गरज नाही. कारण पराभूत अंत:करण काहीही करु शकत नाही. सत्य हे आहे की पराभूततेतून या कामांचा प्रारंभ झालेलाच नाही.

जर आपण थोडे मागे वळून पाहिले तर ध्यानात येईल की संघाचे कार्य अत्यंत जोमाने विस्तारात होते, त्या काळात आम्ही वृत्तपत्रे सुरु करण्याचा विचार केला. संघावर बंदी येऊन संघकार्य खंडित झालेले नव्हते तेव्हा तर अशी अवस्था होती की जिथे उभे राहू तिथे शाखा निर्माण होत होती. हातात माती घेतली तरी तिचे सोने होत होते. तेव्हा कार्याची असफलता जाणवून वृत्तपत्रे सुरु केली, असे म्हणता येत नाही. उलट, कार्याच्या यशस्वितेचा विशिष्ट मर्यादेपर्यंत अनुभव घेऊनच अधिक आक्रमक होण्यासाठीच त्यांचा प्रारंभ केला. हिंदू हे आपले राष्ट्रस्वरुप आहे. याचे समर्थन व संरक्षण एवढीच आपल्या कार्याची दृष्टी नाही. तर याचा विकास व विस्तार हेच आमचे उद्दिष्ट आहे. आत्मसंरक्षण हे काही फार मोठे ध्येय मानता येत नाही. जरी आत्मसंरक्षण करावयाचे असेल तरी त्यासाठी सर्वोत्तम मार्ग आक्रमण हाच असतो. जीवनाच्या भिन्न भिन्न क्षेत्रांत संघाचा निर्णायक प्रभाव राहील. केवळ त्याच्या विचारांचा नाही तर प्रत्यक्ष कार्य आणि कार्यपध्दती यांचा ही आमची आक्रमणाची विचारधारा आहे. ती जीवनाच्या अनेकाविध क्षेत्रांत प्रकट करण्याचा आमचा हा धोरणात्मक निर्णय आहे.

वृत्तपत्र क्षेत्राचेच उदाहरण घ्या. कशा प्रकारे आदर्शहीन होऊन त्यांचे काम चालू आहे ! त्यांच्यात किती घाण भरलेली असते आणि त्याची पातळीदेखील किती खाली घसरलेली दिसते .चोहोबाजूंना प्रत्ययास येणाऱ्या या अपप्रवृत्तीवर आक्रमण करण्यासाठीच आम्ही त्या क्षेत्रात प्रवेश केला आहे .त्या क्षेत्रातील आमच्या कार्यकर्त्यांनी या दृष्टीने विचार केला पाहिजे .या कार्यकर्त्यांत अनेक प्रचारक आहेत व केवळ निर्वाहवेतन (Subsistance ways) घेऊन काम करणारी मंडळी आहेत .अनेकदा असे घडते की माणूस एखादे कार्य सुरु करतो व त्याचीच नशा त्याला चढते .बाकीच्या गोष्टी तो विसरुन जातो .मग, येनकेनप्रकारेण वृत्तपत्र चालविलेच पाहिजे, असा विचार करुन भल्या - बुऱ्या साऱ्या गोष्टी तो करीत सुटतो, आपली पातळी सोडतो .संघाच्या मूळ स्त्रोतापासून तुटून कधी कधी संघविरोधी प्रचारासाठी प्रवृत्त होतो ! पण हे केव्हाही योग्य नाही .आपल्याला आपला आदर्श, ध्येयवाद, जीवनाची पध्दती संघाच्या सर्वसामान्य कार्याला पोषक अशी राखूनच वृत्तपत्रे चालवावी लागतील .वृत्तपत्र चालविणे हेच आपले संघकार्य आहे असे गृहीत धरणेही योग्य होणार नाही .जर कोणी वृत्तपत्राचे संपादन करताना असे समजत असेल की माझे हेच एकमेव काम आहे, तर ते योग्य होईल काय, याचा विचार करा .एका दृष्टीने तर ते योग्य आहे .उदाहरणार्थ, कोणा स्वयंसेवकाला रक्षकाचे काम दिले असेल तर तो आपल्या ठिकाणीच पाय रोवून उभा राहतो .मग बौध्दिक वर्गात काय चालले आहे याचा त्याने विचार करण्याची आवश्यकता नसते .पण अशा प्रकारचा काही विशिष्ट संकेत मिळाला नसेल तर सर्व काम आपल्याला नित्य चालणाऱ्या संघाच्या कार्याकडे दुर्लक्ष न करताच करावे लागेल .ही संघकार्यात भर घालावयाची आहे , (addition) संघकार्याला हा पर्याय (substituion) नाही .आजारी माणसाला लंघन करावयास सांगितले जाऊ शकते किंवा आहार म्हणून काही अगदी पचनसुलभ पदार्थ त्याला दिला जाऊ शकतो . पण आरोग्य ठीक असलेल्या माणसाला जेवणाऐवजी केवळ तो पदार्थ देऊन भागत नाही . जेवणाबरोबर तो देणे इष्ट असते.

आपल्या विचारपरंपरेचा जो मूलस्त्रोत आहे, त्याच्याशी संबंधविच्छेद करुन जर कोणी म्हणेल की मी त्या कार्याचा प्रचार करीन, तर ते शक्य नाही. तो तर अयशस्वी होऊन उपहासाचाच विषय बनेल. मूलस्त्रेताशी जिवंत संबंध अत्यंत श्रध्देने ठेवावा लागेल आणि मग ज्या कोणत्या क्षेत्रांत योजना होईल तिथे संघकार्याला साजेशी उच्चता, श्रेष्ठता, पवित्रता आणि आदर्शवादिता प्रकट होईल अशाच प्रकारे काम करावे लागेल. उद्देश हा की त्या क्षेत्रांत आपण काही परिवर्तन घडवून आणू शकू आणि संघकार्यासंबंधी लोकांच्या मनात जो विश्वास निर्माण झाला आहे, तो अधिक पुष्ट करु शकू. यामुळेच इतरांनाही आपली पातळी उंचावणे अपरिहार्य वाटू लागेल. जर कोणी असे समजेल की या वृत्तपत्रांतून संघाचा प्रचार करावयाचा आहे, तर प्रवासाचे कार्यक्रम प्रसिध्द करण्याव्यतिरिक्त त्याला दुसरे काय करता येणार? संघाचे विचार काही नित्य बदलणारे नाहीत. हा आमचा समाज आहे, तो आम्हाला सामर्थ्यशाली बनवावयाचा आहे व त्यासाठी त्याला संघटित करावयाचे आहे, हे सत्य तर आपण वारंवार सांगत असतो. यात आणखी नावीन्य कुठून आणणार? अशा, प्रकारे, प्रचाराची गरज नाही हे कळल्यावर प्रश्न पडतो की एवढे कार्यकर्ते या कामाला का लावले? एवढे श्रम, पैसा आणि वेळ का खर्च केला जात आहे? हे करतो आहोत ते याच विश्वासाने की दैनंदिन काम उत्तमप्रकारे करीत असता व ते वाढवीत असतानांही पुढे पाऊल टाकून अन्य क्षेत्रांत प्रभाव निर्माण करू शकू आणि तेथे आदर्श प्रस्थापित करू टाकू.

एवढे ध्यानात घेतले तरी संघकार्याच्या प्रत्यक्ष संघकार्याव्यतिरिक्त अन्य कार्यांचे स्वरूप नीट प्रकारे ध्यानात येऊ शकेल. जनसंघाची निर्मिती संघकार्यातील अपुरेपणा दूर करण्यासाठी नाही अथवा त्याचे एवढे महत्वही नाही की संघकार्याची काहीशी उपेक्षा करून तेच काम केले जावे. ते चालविण्यामागची भूमिका हीच की, परस्परांतील ईर्षा आणि स्पर्धा यापासून मुक्त असलेल्या, स्नेहपूर्ण रीतीने चाललेल्या, उत्तम प्रकारे कार्य करणाऱ्या या राजकीय पक्षाद्वारे जीवनाचे शुध्द आदर्श व्यवहारात प्रकट करून त्या क्षेत्रावर संघटनेचे प्रभुत्व निर्माण करावे. हे प्रभुत्व अशा मर्यादेपर्यंत असावे की संघटनेच्या केवळ अंगुलीनिर्देशाने सगळे शासन योग्य मार्गावर चालू शकेल. संघाच्या स्वंयसेवकाकडून जसा व्यवहार अपेक्षित असतो, तसाच व्यवहार तेथे जे आपले कार्यकर्ते आहेत, त्यांच्याकडून घडावयास पाहिजे. कोणी क्षणभरही असे समजू नये की, चला, आता मी मोकळा झालो. इतर पुढाऱ्यांप्रमाणे आपला डिंडिम वाजवून नावलौकिक संपादन करीन आणि आरामात जीवन व्यतीत करीन ! त्यांनी तर राजकीय क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यचे महनीय कार्य अंगीकारलेले आहे .या मूळ निर्धाराचे विस्मरण होऊन जर राजकारणाच्या आकर्षाने आपले जीवनादर्श भ्रष्ट करण्याची चूक त्यांनी केली, तर फार मोठी हानी झाल्यावाचून राहणार नाही.

लोक विचारतात की या राजकीय कार्याचा संघाशी संबंध कशाप्रकारचा असेल? अगदी उघड आहे की कार्यकर्त्यांना ती ती क्षेत्रे पादाक्रांत करण्यासाठी पाठविण्यात आलेले असते. परदेशात पाठविण्यात आलेला राजदूत ज्या धोरणाने आपले काम करतो, व्यवहार करतो, त्याच धोरणाने या कार्यकर्त्यांनी काम केले पाहिजे. राजदूत परदेशात जाऊन व तेथे विवाहादी करून प्रपंच थाटत नाही, तसेच आपल्या राष्ट्राशी संपर्कही तो तुटू देत नाही. उलट, आपल्या राष्ट्राच्या आदर्शांची छाप त्या देशाकर कशी पडेल, याचाच सतत प्रयत्न तो करीत राहतो. राष्ट्राचे हित कसे होईल आणि ते अधिक सुरक्षित कसे बनेल, याची चिंता तो वाहत असतो. तो राष्ट्राचा प्रतिनिधी या नात्याने जात असतो आणि म्हणून आपल्या व्यवहाराच्या बाबतीत अत्यंत सवध असतो. आपल्या राष्ट्रसंबधी कमीपणाची भावना कुठे निर्माण होऊ नये याची फार काळजी घेतो. अन्यान्य क्षेत्रांत कामे करावी लागली तरीही संघकार्याच्या दैनिदिन उपासनेत खंड पडता कामा नये. संघाबरोबर अनेक राजकीय कार्यकर्त्यांचा संबंध आला आणि त्या सर्वांकडून आम्ही हीच अपेक्षा केली की, आमच्या दररोज चालणाऱ्या शाखांत त्यांनी हजेरी लावावी. आजही त्या भूमिकेत बदल झालेला नाही.

बाहेर वाटेल तेवढया गर्जना करा, पुढारीपणा मिरवा, पण दक्ष-आरम् करण्याची क्षमता गमावता उपयोगी नाही. स्वयंसेवकत्वाच्या भावनेने अगदी क्षुल्लक वाटणारे काम देखील करण्याची आपली सिध्दता पाहिजे व त्या प्रसंगी फोटोग्राफर शोधण्याची आवश्यकता वाटावयास नको. राष्ट्रभावना, प्रखर राष्ट्रभक्ती यांच्या संस्कारांची आणि या गुणांच्या उपासनेची आवश्यकता सदैव कायम असतेच. हाच तर आमच्या जीवनाचा आधार आहे. आपण कितीही राजकीय कार्य करीत असाल, तरी आपला संघकार्याशी संबंध तुटता कामा नये. उलट, याकडे लक्ष द्यावयास हवे की, विविध क्षेत्रांत आपण करीत असलेल्या कामाचा परिणाम म्हणून संघाच्या कार्याचा विस्तार सारखा वाढत आहे. वाढता वाढता अशी एक अवस्था आणावयाची आहे की, ज्यावेळी आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हेच हिंदू राष्ट्र आहे असे विश्वासपूर्वक म्हणू शकू. ज्यांना अनसंघाचे कार्य करण्यास सांगण्यात आले आहे, त्यांना जनसंघाचे कार्य करण्यासाठी नव्हे तर जनसंघाच्या माध्यमाने राजकीय क्षेत्रांवर संघाचा निर्णायक प्रभाव निर्माण करण्यासाठी पाठविलेले आहे. सेनापतीला मोहिमेवर पाठविल्यानंतर तो जे काही करतो

त्याचे श्रेय पाठविणाराला असते तसेच त्याचे पोषण आणि नियंत्रण करण्याचे कामही पाठविणाराचेच असते. अशाच प्रकारचा अन्योन्य संबंध असावयास पाहिजे. आम्ही कुठेही असू, पण आमचे जीवन संघटनेसाठी समर्पित आहे व आपण जेवढे हे स्वयंपूर्ण कार्य वाढवू तेवढया प्रमाणात आपले जीवनादर्श सर्व क्षेत्रांत प्रकट करण्यात समर्थ ठरू. हेच आपल्या जीवनाला व्यापून टाकणारे कार्य आहे आणि शाखा हे त्याचे मूळ आहे. शाखा असेल तर सारे काही आहे. बाकी पुष्कळ गोष्टी आहेत आणि शाखा नसेल तर काय होणार? कारण राष्ट्रभावना निर्माण करण्याचे चिरंतन कार्य आणि त्यासाठी जीवन समर्पित करण्याची प्रबळ प्रेरण अन्यत्र कुठे आहे?

जेवढे केले आहे त्यांत सर्व प्रकारची क्षेत्रे येऊन गेली अशातली गोष्ट नाही. आपल्याला पुढेही पुष्कळ काही करावयाचे आहे. मी तर अनेकदा गावोगाव चालणाऱ्या शाखांतील स्वयंसेवकांच्या बाबतीत हेच विचारतो की त्यांच्यांत इतर सहकाऱ्यांच्या तुलनेने अंत:करणातील भावना, देशपरिस्थितीचे ज्ञान, सगळयांना बरोबर घेऊन चालण्याची क्षमता तसेच नेतृत्वाची पात्रता हे गुण अधिक सरस आहेत की नाहीत? समाजजीवनाच्या आणखीही अनेक क्षेत्रांत आपल्याला चढाई करावयाची आहे. आज यासंबंधी काही संकेत मात्र प्राप्त झाले आहेत. जर समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांत आम्हाला संपूर्ण प्रभाव प्रस्थापित करावयाचा आहे तर सुसूत्र, कार्याची योग्य दृष्टी असणारे केवढे प्रचंड मनुष्यबळ आपल्याजवळ असावयास पाहिजे, याचा विचार करा. हे उदिष्ट दृष्टीपुढे ठेवूनच त्याच्या पुर्तीचे साधन या नात्याने आपण सर्व क्षेत्रांत काम करावयास पाहिजे.

कित्येकदा लोक असा प्रश्न विचारून जातात की, संघ सर्व क्षेत्रे प्रभावित (dominate) करू इच्छितो काय? मला उलट विचारावेसे वाटते की, काही लोकांना आपल्या डोक्यावर घेऊन त्यांचा जयजयकार करण्यासाठी व त्यांचे पाय चाटण्यासाठी संघटनेचा एवढा खटाटोप केला काय? आमचा विचार पराभवाचा नाही, चढाईचा आहे .जर यासंबंधात कोणाला शंका असेल तर त्याला प्रत्यक्ष अनुभव आणून दिला पाहिजे .आमचे संघकार्य सर्वांगपरिपूर्ण आहे .निरनिराळया क्षेत्रांत पाठविले गेलेले कार्यकर्ते एकेक क्षेत्र जिंकण्यासाठी पाठविलेल्या सेनापतीप्रमाणे आहेत .या कार्यकर्त्यांनी संघाच्या दैनंदिन कार्याबरोबर जिवंत संबंध राखून त्याग, तपस्या, परिश्रमशीलता आणि कौशल्य या आपल्या गुणवत्तेच्या बळावर प्रत्येक क्षेत्रांत नवा आदर्श निर्माण करून संघाच्या थोर ध्येयाची पूर्तता करावयाची आहे."

श्री. दत्तोपंत ठेगडी १९५० साली 'इंटक' मध्ये सहभागी झाले .त्यानंतर वेळोवेळी झालेल्या भेटीगाठीत श्रीगुरूजींचे पुढीलप्रमाणे मार्गदर्शन आपल्याला लाभले, असे दत्तोपंतांनी म्हटले आहे:

१) ज्या संस्थेत तुम्ही जात आहांत त्या संस्थेच्या अनुशासनाचे पूर्ण पालन करा. जेव्हा संस्थेचे अनुशासन आणि तुमची सदसद्-विवेकबुध्दी यांत संघर्ष उद्-भवेल, तेव्हा राजीनामा देणेचे चांगले. परंतू जोपर्यंत त्या संस्थेत आहात तोपर्यंत तेथले अनुशशासन मानलेच पाहिजे.

२) ट्रेड युनियन चळवळीच्या संबधात पू. गांधीजींच्या आणि मार्क्स या दोघांच्याही विचारांचा तौलनिक अभ्यास करा. काम आणि अभ्यास दोन्ही गोष्टी बरोबर सुरू राहाव्यात यासाठी आवश्यक ते मानसिक संतुलन प्राप्त करावयास हवे. अभ्यास न करण्याची सूट घेणे अनुचित आहे.

३) कम्युनिस्ट ट्रेड युनियन कार्यकर्त्यांच्या कार्यपध्दतीचाही प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात अभ्यास करा.

४) कार्यानिमित्त होणाऱ्या प्रवासात आपल्या मजूर कार्यकर्त्यांच्या घरीच मुक्काम करण्याची शक्यतो प्रथा ठेवा. गरीब लोकांच्या कुटुबांत जर आपण राहिलो नाही तर केवळ पुस्तके वाचून त्यांच्याशी मानसिक तादात्म्य निर्माण होऊ शकणार नाही.

५) तीस हजर मॅंगनीज कामगारांचे प्रतिनिधी म्हणून इंटकच्या जनरल कौन्सिलवर तुमची निवड झाली आहे. आता एका प्रश्नाचे सरळ उत्तर द्या. तुमची आई ज्या उत्कटतेने तुमच्यावर प्रेम करते तेवढयाच उत्कटतेने तुम्ही या तीस हजार मजुरांवर प्रेम करता का?

६) विणकर काँग्रेसच्या कामात साहाय्य द्या पण राजकीय लाभालाभ किंवा सौदेबाजी यांचा विचारही आपल्या मनाला शिवू देऊ नका. आपल्या संपर्कांचे क्षेत्र विस्तृत करणे आणि विणकरांच्या समस्यांच्या बाबतीत प्रत्यक्ष माहिती मिळविणे एवढाच आपला उद्देश असावा. विणकर हा एक आर्थिक घटक समजून चालावे. मग ते विणकर सवर्ण आहेत, हरिजन आहेत की मुसलमान आहेत, याचा विचार करू नये.

७) आर्थिक क्षेत्राच्या दृष्टीने शेडयुल्ड कास्ट्स् फेडरेशन म्हणजे अखिल भारतीय खेतीहर (भूमिहीन) मजदूर संघ होय. हे आर्थिक कॅरेक्टर जर लक्षात ठेवले तर बाकीच्या भूमिहीन मजूरांबरोबर मिसळण्याची इच्छा त्यांच्यात जागृत होईल आणि सामाजिक कटुतेची तीव्रताही कमी होईल.

एका विशिष्ट क्षेत्रातील कार्यकर्त्याला अगदी प्रारंभीच्या काळात केलेले हे मार्गदर्शन. पुढे कामाची क्षेत्रे वाढली, नवनवीन प्रश्न उपस्थित झाले तसे कितीतरी कार्यकर्ते श्रीगुरूजींच्या अनौपचारिक भेटीसाठी येत आणि त्यांच्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीत. येणारांत संघाचे स्वयंसेवकच असत असे नाही. भिन्न भिन्न क्षेत्रांत बराच काळ काम करणारी आणि वैतागून गेलेली ज्येष्ठ माणसेही असत.

श्रीगुरूजींच्या प्रवासात संघ कार्यकर्त्यांच्या होणाऱ्या बैठकीतून आणि विचारविनिमयातून विशेषत: राजकीय क्षेत्रातील कामाचे पडसाद अनेकदा उठत असत. त्या त्या प्रसंगी अनुरूप अशा सौम्य वा कठोर शब्दांत श्रीगुरूजी मतप्रदर्शन करीत. एक उदाहरण उल्लेखनीय आहे. १९६७ साली जून महिन्यात पंजाब प्रांताचे प्रमुख कार्यकर्ते आणि प्रचारक यांची एक बैठक झाली. या बैठकीचा समारोप करताना श्रीगुरूजींनी म्हटले की, नुकत्याच झालेल्या निवडणुकीनंतर उत्तर भारतात आपल्या काही मंडळी शासनात उच्च आणि महत्वाच्या पदावर आलेली आहेत. निरनिराळया कामांसाठी त्यांच्याकडे जाण्याची आपल्याला इच्छा होणे अगदी स्वाभाविक आहे. पण माझी अशी सूचना आहे की, कोणाही संघर्काकत्याने व्यक्तिगत आपल्या अथवा दुसऱ्याच्या कामासाठी त्यांच्याकडे मुळीच जाऊ नये. संघकार्य सर्वश्रेष्ठ आहे, सर्वोपरी आहे, परमेश्वरी कार्य आहे. त्याच्या कार्यकर्त्याने क्षुद्र गोष्टींसाठी राजकीय कार्यकर्त्यांपुढे हात पसरणे निंदनीय आहे. आणि आपल्या व्यक्तिगत कामांसाठी त्यांना गळ घालण्यामुळे त्यांचा प्रमाणिकपणा व नि:पक्षपातीपणा यांना झळ पोचण्याचाही संभव असतो. आपले कौशल्य, पात्रता आणि प्रमाणिकपणा यांना झळ पोचण्याचाही संभव असतो. आपले कौशल्य, पात्रता आणि प्रमाणिकपणा यांची प्रचिती जनतेला म्हणून आणून देण्याची पूर्ण सवड त्यांना मिळावयास पाहिजे. जर त्यात त्यांची उणीव राहिली तर होणारे परिणामही त्यांना भोगू दिले पाहिजेत.

राष्ट्रीय जिव्हाळयाच्या सर्व प्रश्नांवर- उदाहरणार्थ आसाम, नक्षलवादी, काश्मीर, फुटीर आंदोलने, विदेशांची नक्कल, राष्ट्रीय शिक्षण, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी - जनसंघाच्या निर्वाचित खासदारांनी अत्यंत कणखरपणे बोलणे आवश्यक आहे. असा सल्ला श्रीगुरूजी देत. प्रवासात ठिकठिकाणी

जनसंघाचे कार्यकर्ते भेटावयास येत, तेव्हाही प्रचलित समस्यांसंबंधी मार्गदर्शन आणि मतप्रदर्शन मोकळेपणाने ते करीत, अन्य क्षेत्रांत काम करणारांच्या मनाती संभ्रम दूर करून संघाच्या मूलभूत कार्याची व कार्यपध्दतीची जाणीव त्यांना करून देत. अशी जी प्रश्नोत्तरे ठिकठिकाणी स्वयंसेवकांच्या बैठकीतून झाली, त्यातील काही वानगीदाखल उद्-घृत करीत आहे. त्यावरून आजही स्वयंसेवकांना व कार्यकर्त्यांना पुष्कळ मार्गदर्शन होण्यासारखे आहे.

प्रश्न: विद्यार्थी परिषदेचे काम करताना आम्ही कोणत्या गोष्टीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे?

श्रीगुरूजी : शक्यतोवर या संस्थांना संघाचे 'रिक्रुटिंग सेंटर' मानावयास पाहिजे .विद्यार्थी परिषदेत काम करणाऱ्या स्वयंसेवकांनी आपल्या संपर्कात येणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि इतरांनाही निष्ठावान स्वयंसेवक बनविण्याचा प्रयत्न करावा.

प्रश्न : अन्यान्य क्षेत्रांत काम करताना केव्हा - केव्हा संघकार्याशी मेळ बसत नाही .अशावेळी काय करावे?

श्रीगुरूजी : जर आपणाला मूळ कार्याचे महत्व कळले असेल व ते इतरांना समजावून देण्याचा प्रयत्न आपण केला, तर विरोध टाळता येतो व समन्वय साधता येतो .We should capture all fields but we ourselve should not captives.

प्रश्न: इतर क्षेत्रांत काम करीत असल्यामुळे पुष्कळदा शाखेत जाता येत नाही.

श्रीगुरूजी : अनुपस्थित राहण्याची पाळी येऊ शकते .पण आपल्या अधिकाऱ्यांची अनुज्ञा घ्यावी व मग उचित काम करावे .पण कोणत्याही परिस्थितीत संघकार्याकडे दुर्लक्ष होता कामा नये .ते कार्य अविचल मानून इतर सर्व काम करावे .मग काम कोणतेही असो .सिनेमाचा किंवा नाटक कंपनीचा खेळही तो असू शकेल .पण काम करावे ते संघाचेच .अन्य क्षेत्रात काम करताना त्याचीच चटक लागून जाते व वाटते की, तिथे तर छान आराम आहे .आणि मग संघकार्यापासून दूर राहण्यासाठी निमित्ते शोधली जातात.

प्रश्न : कित्येकदा राष्ट्रीय समस्या निर्माण झाल्या म्हणजे शाखेत नियमितपणे जाणे कठीण होऊन जाते.

श्रीगुरूजी : राष्ट्राच्या बाबतीत आपण काही सांगण्याचे मुळीच कारण नाही .ती पात्रता अद्याप तुमच्यात नाही .राष्ट्राच्या बाबतीत बोलण्याचा अधिकार केवळ त्यांनाच आहे की, जे देशभर भ्रमण करतात आणि राष्ट्रीय प्रश्नांवर विचार करतात .मी व माझे सहकारी तिथे आहोत .ही मंडळी विचार करतील . ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांशी स्वत:हून राष्ट्रीय प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या भानगडीत पडू नये .राष्टाची गोष्ट देशव्यापी स्वरूपाची असते .ती आमच्यावर सोडून द्या .पण जर राष्ट्रीय समस्यांच्या बाबतीत कधीही काही आदेश आलाच तर तो डोळे मिटून मानवयास पाहिजे.

प्रश्न: आंदोलन करताना विद्यार्थी परिषदेने कोणता विचार करावा?

श्रीगुरूजी : आंदोलन करण्यापूर्वी आपल्याला तत्व निश्चित करावयास पाहिजे .अडचण ही आहे की, आपण अधिकारांकडे लक्ष देतो, कार्यकर्त्यांकडे नाही, कलकत्यात अमेरिकेने चालविलेल्या ट्रेड युनियन कॉलेजने प्रसिध्द केलेली एक पुस्तिका मला भारतीय मजदूर संघाच्या एका कार्यकर्त्याने दिली .त्या पुस्तकात सर्व गोष्टींची चर्चा आहे, पण कामगार कामाच्या तासात इमानदारीने काम करेल

असे मात्र कोठेही म्हटलेले नाही .आपला आधार तर कर्तव्य हाच आहे .आमच्या परंपरेने आपल्याला केवळ एकच अधिकार दिला आहे व तो म्हणे आपल्या कर्तव्याचे पालन करण्याचा. विद्यार्थ्यांनी गुरूजनांविषयी आदर दर्शवावा यासाठी कोणी कधी चळवळ केली आहे काय?

सार्वजनिक कार्यक्रमांची एक प्रकारची नशा चढते. पण असे कार्यक्रम चांगले झाले तरी त्यामुळे आपली शक्ती वाढली आहे, असे समजू नये. दारू पिण्याने तात्पुरता आवेश चढतो, पण शक्ती वाढत नाही.

१९६६ साली एप्रिल महिन्यात श्रीगुरूजी लाला हंसराजजी यांच्याबरोबर श्री. गुलझारीलाल नंदा यांना भेटावयास गेले होते. नंदाजींनी आक्षेप घेतला की, गुरूजी राजकीय विषयावर बोलतात. यावर श्रीगुरूजींनी उत्तर दिले, “आपल्या राष्ट्रीय एकात्मतेवर आघात करणारा जो कोणता विचार किंवा जे कोणते कार्य असेल, त्यावर टिका करणे माझे कर्तव्यच आहे .जर शासकीय कार्य राष्ट्रीय एकात्मतेला बाधक ठरणाऱ्या पध्दतीने चालत असेल, तर मी अवश्य त्यावर टीका करीन.”

अन्यान्य क्षेत्रांत काम करणाऱ्या आपल्या स्वयंसेवकांचा व्यवहार कसा असावा आणि अहंकारादि अवगुणांपासून त्यांनी दूर कसे राहावे, यासंबधी श्रीगुरूजी वारंवार बोलत असत. १९५४ मधील गोष्ट आहे. तिथे एका बैठकीत बोलताना श्रीगुरूजी म्हणाले, “अन्यान्य क्षेत्रांत काम करताना जेव्हा हार गळयात पडतात आणि जयजयकार ऐकावयाला मिळतो, तेव्हा कार्यकर्त्यांची छाती फुगून येते .त्याला वाटते, “मैं लीडर बन गया” मनाला मोह पाडणाऱ्या अहंकाराचे हे प्राथमिक स्वरूप असते .संघाचे म्हणणे आहे की, आपआपल्या क्षेत्रांत अवश्य नेतृत्व संपादन करा, पण थोर साधुसंतांपुढे अवश्य नतमस्तक झाले पाहिजे याचे स्मरण ठेवा .हाच आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाचा आदर्श आहे .सार्वजनिक जीवनात नाव कमवा पण संघाच्या परिवारात एक विनम्र स्वयंसेवक या नात्याने सदैव शिस्तीच्या मर्यादेत राहा .आपला व्यवहार संत आणि महात्मे यांच्या संबंधात अनुशासनहीन राहिला, तर त्यामुळे आपण राक्षस बनू, कंस आणि जरासंध याच कारणामुळे राक्षस प्रवृत्तीचे बनले . निरोगी समाजजीवनाचा स्वीकार त्यांनी केला नाही .निरोगी समाजजीवनात प्रत्येकाने शिस्त पाळली पाहिजे .म्हणजे आपल्या कर्तव्याचे स्मरण ठेवून योग्य प्रकारे वागले पाहिजे .यासाठी संघशाखेत सर्व स्वयंसेवकांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहणे आणि आपली दैनंदिन प्रार्थना करणे आवश्यक आहे.”

१९५४ मध्ये विदर्भात अकोला येथे बोलताना राजकीय क्षेत्रात पाऊल कसे घसरत जाते याचे विवेचन करताना श्रीगुरूजी म्हणाज. “आजकाल लोकांच्या डोक्यात निवडणूकीचे व सत्तास्पर्धेचे राजकारण शिरले आहे .या राजकारणाच्या प्रभावामुळे माणूस हा माणूस न राहता एक राजकीय पशू (political animal) बनू लागला आहे .राजकारणाचा आजचा अर्थ झाला आहे सतत तडजोडी आणि जुळवून घेणे . अशा स्थितीत ध्येयनिष्ठ जीवन जगणे राजकीय कार्यकर्त्यांला अशक्य वाटू लागते .श्रध्देय महात्माजींनी म्हटले होते की जर गोहत्या चालू राहिली तर अशा स्वातंत्र्याची इच्छा मला नाही . एवढया नि:संदिग्ध शब्दांत गाईसंबधी आपली श्रध्दा त्यांनी व्यक्त केली होती .पण राजकारण करताना पं .जवाहरलालजींनी म्हटले होते की तो मुसलमानांचा सुप्रतिष्ठी हक्क आहे .(Well established right) त्यामुळे कायद्याने गोहत्या थांबविता येणार नाही .मते मिळविण्यासाठी अधिकाधिक लोकांना अनुकूल करून घेण्याच्या धोरणाला प्राधान्य मिळते आणि आपली श्रध्दा व ध्येय यांना गौण स्थान प्राप्त होते .मतासाठी श्रध्दास्पद गोष्टींची अवहेलनाही राजकीय खेळात लोक सहन करतात .म्हणूनच आपल्या थोर पुढाऱ्यांनी ‘वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा’ असे म्हटले आहे.

राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवकांच्या प्रश्नांना श्रीगुरूजींनी मोठी नि:संदिग्ध आणि संघाची दृष्टी स्पष्ट करणारी उत्तरे वेळोवेळी दिल्याचे दिसते. "ज्यांना राजकीय क्षेत्राची आवड आहे त्यांनी त्या क्षेत्रात इमानदारीने काम करावे .स्वयंसेवकाची दृष्टी घेऊन आपण कोणत्याही क्षेत्रात काम करू शकतो." एवढे सांगितल्यावर 'स्वयंसेवकाची दृष्टी म्हणजे काय' याचा मूलभूत विचार त्यांनी सांगितला .ते म्हणाले, 'आपले संघकार्य या विचराने सुरू झाले नाही की लोकांना आम्ही जे करावेसे वाटते तेच आम्ही करावे .उलट, समाजजीवनात ज्या उणीवा आहे .आपल्या स्वत :च्या जीवनातून निर्भय हिंदू जीवनाचा आविष्कार करीत लोकांतही ते आदर्श संक्रांत करण्यासाठी संघ निर्माण झाला आहे .संघ लोकांच्या इच्छेनुसार चालणे यापेक्षा लोकांचे जीवन संघविचारांनी प्रभावित करणे व त्यात परिवर्तन घडवून आणणे हे आपले कार्य आहे .हेच खरे विधायक कार्य होय .या प्रकारच्या कामास वेळ अधिक लागतो .अगदी स्वभाविक आहे .माणसाच्या जीवनात योग्य परिवर्तन घडवून आणण्यासाठी वेळ तर लागणारच .जर काम लवकर व्हावे अशी आपली इच्छा असेल तर कार्यकर्त्यांची संख्या अधिक हवी आणि प्रत्येक कार्यकर्ता अधिक वेळ काम करणारा असावा."

भ्रष्टाचाराचा प्रश्न मोठा जटिल झाला आहे. त्यावर संघकार्य हाच तोडगा आहे. असे श्रीगुरूजी आग्रहपूर्वक सांगत. त्यांचे सुनिश्चित मार्गदर्शन असे : "सत्ताधाऱ्यांतील भ्रष्टता रोखण्याचे निर्णायक बळ केवळ सुसंघटित, शुध्द राष्ट्रभक्तीने ओतप्रोत लोकशक्तीतच असू शकते .तीच नियामक असते . पूर्वी ज्याला धर्म म्हणत त्याचेचे प्रकट रूप म्हणजे संघ .आम्हाला सत्ताभिलाषा नाही. संपूर्ण राष्ट्रजीवन सुखी, समृध्द करण्याची आमची इच्छा आहे .राजकीय स्पर्धेत एक गट बनवून भांडणे करीत बसण्यासाठी आमचे कार्य नाही .निग्रह - अनुग्रहक्षम प्रबल लोकशक्तीची निर्मिती हे आपले काम आहे."

विद्यार्थी आणि शिक्षण हा विषय तर श्रीगुरूजींच्या फार जिव्हाळयाचा होता. एकदा विद्यार्थ्यातील बेशिस्तीच्या समस्येचा अभ्यास करणाऱ्या एका उच्चस्तरीय समितीतर्फे एक प्रश्नावली त्यांच्याकडे पाठविण्यात आली होती. तिला लेखी उत्तर श्रीगुरुजींनी अतिशय आस्थापूर्वक पाठविले. या निमित्ताने शैक्षणिक पुनर्रचनेच्या प्रश्नावरील त्यांची मूलग्राही भूमिका स्पष्ट होऊन गेली. विद्यार्थ्यांच्या संघटनांनी महाविद्यालयीन स्तरावर विशेष काम करावे आणि राजकीय पक्ष व राजकारण्यांचा हस्तक्षेप यांपासून त्या मुक्त असाव्यात, असा सुस्पष्ट अभिप्राय श्रीगुरूजींच्या उत्तरात व्यक्त झाला आहे.

श्री. छगला हे केंद्रीय शिक्षणमंत्री असताना एकदा मुंबईत त्यांची व श्रीगुरूजींची भेट झाली होती. त्यावेळी शैक्षणिक सुधारणेची दिशा कोणती असावी, यासंबंधी उभयतांत चर्चा झाली. छगला हे शिक्षण घेऊन शाळा - कॉलेजातून बाहेर पडणाऱ्या तरूणांविषयी अत्यंत समाधानी होते. त्यांना श्रीगुरूजींनी सांगितले की, आपल्या देशाचा खरा इतिहास शिक्षण संस्थांतून शिकवला जात नाही. हे आदर्शहीनतेचे, केवळ पोटार्थी आणि स्वार्थी प्रवृत्तीचे मूळ कारण आहे. मातृभूमीविषयी गौरवाची भावना इतिहासाच्या योग्य अध्यापनाने निर्माण होऊ शकेल आणि पुनश्च गौरवशाली बनण्यासाठी त्यागपूर्वक परिश्रम करण्याची आकांक्षा तरूणांत निर्माण करता येईल, पण ज्या शासनाचे मंत्री तुम्ही आहात ते शासन अशा प्रकारे सत्य इतिहास शिकविण्याला अनुकूलता दर्शविणार नाही, असेही त्याच वेळी त्यांनी बजावून ठेवले. राष्ट्रीय शिस्त योजनेचे सूत्रधार श्री. जगन्नाथराव भोसले यांच्याशी श्रीगुरूजींची याच स्वरूपाची चर्चा झाली होती. आपल्याजवळ साधने आहेत, पैसा आहे, सरकारी पाठबळ आहे, तरीही जीव ओतून सातत्याने काम करणारी माणसे का मिळत नाहीत. जसा

जगन्नाथरावांना प्रश्न पडला होता. संघाजवळ साधने अपुरी आणि 'सॅक्शन' कोणतेही नाही, उलट सत्ताधाऱ्यांचा विरोध मात्र आह .असे असताना स्वार्थत्यागपूर्वक तपानुतपे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मोहोळ तो कसा जमवू शकतो, याचा उलगडा त्यांनी श्रीगुरूजींना विचारला होता . त्यांनाही श्रीगुरूजींनी सांगितले होते की मातृभूमीवरील विशुध्द भक्तीची भावना जागविल्याविना सद्-गुण अंगी बाणविण्याची आणि त्यागाची प्रेरणा तरूणांत निर्माण करता येणार नाही.

या दोन जबाबदार पुरूषांनी श्रीगुरूजींना केलेल्या प्रच्छा व श्रीगुरूजींनी त्यांना दिलेली उत्तरे यांच केवळ उदाहरणादाखल उल्लेख केला आहे. श्रीगुरूजींच्या देशव्यापी प्रवासामध्ये अनेक शिक्षणसंस्थांत जाण्याचे आणि शिक्षकांशी, शिक्षणाधिकाऱ्यांशी, पत्रकारांशी व इतरही जिज्ञासूंशी बोलण्याचे अनेक प्रसंग त्यांच्यावर आले. त्यातून हे स्पष्ट दिसते की भारतात प्रचलित असलेल्या शिक्षणपध्दतीविषयी व एकूणच शिक्षणविषयक शासकीय धोरणासंबंधी ते अत्यंत असमाधानी होते. निरनिराळया ठिकाणी त्यांनी केलेल्या शिक्षणविषयक मतप्रदर्शनांत सामन्यत: पुढील मुद्दे प्रामुख्याने असत :

१) सध्या दिल्या जाणाऱ्या शिक्षणात आधुनिक पाश्चात्य शिक्षणप्रणालीतील चांगले अंश नाहीत किंवा प्राचीन भारतीय पध्दतीतील भावात्मक आशय (positive content) देखील नाही .आपल्याला एक गौरवशाली प्राचीन इतिहास आहे .आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांत आपण उत्कृष्टता प्राप्त करून घेतलेली होती, हे देखील तरूण विद्यार्थ्याला ठाऊक नसते .विद्यार्थ्यांसमोर काहीही सकारात्मक किंव भावात्मक ध्येय ठेवले न गेल्यामुळे तो वेळ घालविण्यासाठी हीन स्वरूपांचे काही तरी वाचत राहतो, याचे आश्चर्य वाटू नये.

२) अगदी प्राथमिक स्तरापासूनच विद्यार्थ्यांवर योग्य आकांक्षा आणि दृष्टिकोन यांचा संस्कार घडविला पाहिजे. आपल्या अत्यंत थोर राष्ट्रपुरूषांची जीवने आणि ऐतिहासिक प्रसंग यांचे चित्रण करणारे विशाल प्राचीन आणि आधुनिक साहित्य - भांडार आपल्याला उपलब्ध आहे. त्याचा शिक्षकांनी अशा संस्कारांसाठी उपयोग केला पाहिजे. ऋषी आणि योगी यांच्या महान परंपरेत जन्मल्याचा अभिमान मुलांच्या चित्तात रूजविला पाहिजे. "आपण हिंदू म्हणून जगले पाहिजे, हिंदू दिसले पाहिजे आणि जगाने हिंदू म्हणून आपल्याला ओळखावे असा प्रयत्न केला पाहिजे .जेव्हा आपण आपल्या परंपरेचा गौरव मानू तेव्हाच जगाच्या दृष्टीनेही आपण गौरवाचा विषय ठरू .आपण कुणाची 'कार्बन कॉपी' बनावे ही जगाचीही आपल्यापासून अपेक्षा नाही .ज्यांची मुळेच उखडून टाकली गेली आहेत, अशा समाजाला भवितव्य नसते."

३) राष्ट्रभक्तीच्या भक्कम आधाराविना मानवता आणि आंतरराष्ट्रीयता यांची भाषा बोलणे म्हणजे दोहोंनाही मुकणे होय. आपल्या राष्ट्रीय तत्वज्ञानाचा आणि वाङ्मयाचा विचार केला तर दिसेल की त्यांनी मानवतेचे परमोच्च कल्याण स्वत:हून समवून घेतले आहे. म्हणून विद्यार्थ्यांना राष्ट्रीयत्वाचे पाठ देणे म्हणजे मानवी मूल्ये सदृढ बनविणेच होय.

४) 'कमवा आणि शिका' (Earn while you learn) असा प्रचार केला जातो .पण भारतीय विचार अगदी उलट आहे .आम्ही म्हणतो 'कमावत असतानाही शिका.' (Learn even while you earn) माणूस जीवनभर विद्यार्थी असतो, ही आमची संकल्पना आहे .जीवनध्येयाशी निगडित अशी ही गोष्ट आहे .परिस्थितीचा दुर्विलास असा आहे की पाश्चात्य जगत हळूहळू निखळ जडवादापासून अध्यात्मविचाराकडे वळत असनाता उच्च व श्रेष्ठ जीवनापासून आपण मात्र केवळ जडवादी जीवनाच्या दिशेने घसरत आहोत.

५)	उपासना संप्रदाय कोणताही असो, विद्यार्थ्यांना शम - दमादि षड्संपत्तीचे व यम-नियमांचे शिक्षण देण्यावर भर असला पाहिजे. तसेच चित्त एकाग्र करण्यासाठी योगाचेही कमी अधिक शिक्षण आवश्यक आहे. सध्याच्या शिक्षणप्रणालीत काही माहिती आणि भाकरी कमावण्याचे शिक्षण एवढेच केवळ दिले जाते.

६)	संस्कृत भाषेच्या शिक्षणाची दारूण उपेक्षा हे सध्याच्या शिक्षणप्रणालीचे एक मोठे न्युन आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या निर्मितीत संस्कृत भाषेचे जे योगदान आहे, त्याची नीटशी जाणच कुठे दिसत नाही. एकूणच स्वकीय भाषांविषयी प्रेमाचा अभाव आणि त्यांचा विकास घडवून आणण्याच्या उत्कट इच्छेचा अभाव सरकारी धोरणात दिसतो. संस्कृत ही मृत भाषा नसून जिवंत भाषा आहे, हे सत्य ध्यानात घेतले पाहिजे.

७)	हिंदू शिक्षणपध्दती माणसाच्या ठायी असलेल्या विविध गुणवत्तेचे आविष्करण घडवून आणण्यातच समाधान मानीत नाही, ती आणखी पुढे जाते. जीवन हे वासना आणि विकार यांचे केवळ एक गाठोडे नाही, तर आपल्यात जे एक शिवतत्व आहे, त्या तत्वाचे ज्ञान व त्याचे प्रकटीकरण हे हिंदू शिक्षणपध्दतीचे मूलभूत उदिष्ट मानलेले आहे.

शिक्षण आणि संस्कार या बाबतीत श्रीगुरूजींना दोन गोष्टी मोठया अनिष्ट आणि चिंताजनक वाटत असत. पहिली गोष्ट म्हणजे घरातील पालकांचे वागणे आणि दुसरी गोष्ट म्हणजे ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शाळांतून हिंदू बालकांच्या मनावर हिंदू परंपरेतील श्रेष्ठ विभूती किंवा देवदेवता यांच्यासंबंधी रूजविण्यात येणारी तिरस्काराची भावना. एका चांगल्या सुशिक्षित घरातील तरूण गृहिणी स्वयंपाकघरात तान्ह्या मुलाला जोजविताना अगदी अभद्र गाणे गात असल्याचे त्यांनी ऐकले होते. ही घटना सांगून ते पृच्छा करीत, “मुले आपल्या मातापित्यांचा असा अशिष्ट व्यवहार जर पाहत असतील व स्वाभाविकपणेच त्यांचे अनुकरण करीत असतील, तर नवी पिढी का नाही आपल्या जीवनादर्शापासून भ्रष्ट होणार?”

ख्रिस्ती शिक्षणसंस्थांच्या विकृत शिकणुकीचा दुष्परिणाम मुलांच्या मनावर कशा प्रकारे होतो, याचे एक उदाहरण श्रीगुरूजी देत असते. आठ नऊ वर्षाचा एक मुलगा होता. तो सुटीत घरी आला होता. जन्माष्टमीचा उपवास करण्यास त्याच्या आईवडिलांनी त्याला सांगितले तेव्हा तो म्हणाला, “अशा व्यभिचारी माणसाचा जन्मदिन तुम्ही का पाळता? आपण येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस का साजरा करू नये?” आठ नऊ वर्षांचा एक मुलगा आपल्या वडिलांना असे प्रश्न विचारील याची आपण कल्पना तरी करू शकतो काय? यावर हिंदू साधुसंतांनी सुसंस्कार प्रदान करणाऱ्या शिक्षणसंस्था सुरू करणे हा एक उपाय आहे .पण सरकारी धोरणामुळे त्या प्रयत्नांना ज्या मर्यादा पडतात, त्यामुळे श्रीगुरूजींना खेद व्हायचा, एकदा ते म्हणाले, “उत्तर प्रदेशात आणि अन्यत्रही अशा शिक्षणसंस्था काम करीत आहेत, पण त्यांना केवळ ऐहिक शिक्षण (secular) देण्यास भाग पाडण्यात येत आहे .विद्यार्थ्यात ऐहिकतेचेच वातावरण पुष्ट करण्यासाठीच उत्तेजन दिले जात आहे .आपल्या धार्मिक संस्था पुष्कळ आहेत .पण त्यांचा दृष्टिकोन भलताच उदार आहे .आम्हाला वाटते की, राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन काम करणे ही शिक्षणाची पहिली आवश्यकता आहे .दृष्टीकोनात विशालता नंतर येऊ शकेल .शिवाय, अगदी निवडक माणसेच अशा संस्था चालविण्यास उपयोगी ठरू शकतील .अन्यथा, थोडे अधिक पैस अन्यत्र मिळण्याच्या लोभाने माणसे संस्था सोडून जातील .सेवाभावी संस्था चालविण्यास उत्कट राष्ट्रभक्तीने

प्रेरित झालेली माणसेच पाहिजेत .पैसा उपलब्ध झाला तरी खरी चिंता कार्यकर्ते मिळण्यासंबधीचीच असते.”

श्रीगुरूजींच्या ज्ञानाचा आणि चिंतनाचा लाभ सर्वांनाच मिळत असे, श्रीगुरूजीपुढील प्रत्यक्ष कार्य मात्र संघाचेच होते. एकदा राष्ट्रजीवनाच्या अंगापांगात जी कामे चालतात त्यांच्याशी संघाचा संबंध व्यक्त करताना त्यांनी श्रीमद्भगवद्गीतेच्या ९ व्या अध्यायातील दोन श्लोक सांगितले होते. ते श्लोक असे :

मया ततमिदं सर्व जगदव्यक्तमूर्तिना ।

मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थित: ॥४॥

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम्।

भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावन:॥५॥

याचबरोबर

सर्वेन्द्रियगुणाभासं, सर्वेन्द्रियविवर्जितम्।

असक्तं सर्वभुच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥

हा गीतेच्या तेराव्या अध्ययातील १४ व श्लोकही ते उद्-घृत करीत. संघाचे हे ‘योगैश्वर्य’ ज्यांना आकलन होत नाही ते असमंजसपणाने संघावर हेत्वारोप करीत सुटतात .वस्तुस्थिती अशी आहे की, जीवनाच्या अन्यान्य क्षेत्रांवर राजकारणाचे ‘डॉमिनेशन’ असू नये, तर ‘धर्मा’ शी म्हणजे समाजधारणेच्या आणि मानवी संबंधांच्या शाश्वत नियमांशी राजकारणासह प्रत्येक क्षेत्र सुसंवादी असावे, असा श्रीगुरूजींचा आग्रह होता .संघाचा स्वयंसेवक कोठेही काम करो, राष्ट्रधर्माच्या जागृतीचे ‘मिशन’ त्याने विसरू नये, एवढीच त्यांची अपेक्षा होती .हे ‘मिशन’ पूर्ण करण्यासाठी जी व्यक्तिगत गुणवत्ता आवश्यक असते, ती संपादन करण्यात कुचराई करणे कामाला बाधक ठरते, ही गोष्ट स्वयंसेवकांच्या मनावर ते बिंबवीत . कोणत्याही संघबाह्य क्षेत्रात ते गुंतून पडत नसत.

परंतु संघाचे नित्य कार्य करीत असतानाही राष्ट्रीय महापुरूषांचे स्मरण करून देणारे प्रसंग व हिंदुत्वाचा अभिमान जागविणारी कामे यांत श्रीगुरूजी उत्साहाने भाग घेत. आध्यात्मिक सद्-गुणांच्या आधारावरच भारताचे पुनरूत्थान करता येईल, अशी त्यांची श्रध्दा असल्यामुळे आणि स्वत:ला त्या विषयाची मनापासून आवड असल्यामुळे विवेकानंद जन्मशताब्दी, विवेकानंद शिला स्मारक समितीची स्थापना, अरविंद जन्मशताब्दी इत्यादी कार्यांत आपले दायित्व त्यांनी पार पाडले. स्वामी विवेकानंद आणि त्यांचे सद्-गुरू श्री रामकृष्ण परमहंस यांच्यासंबंधी तर विलक्षण आत्मीयता त्यांना होती. स्वत: विवेकानंदांचे गुरूबंधू श्री स्वामी अखंडानंद यांच्याकडून दीक्षा मिळाल्यामुळे आणि रामकृष्ण आश्रमाशी दीर्घकाल निकटचा संबध आल्यामुळे हिंदूच्या आध्यात्मिक पुनरूत्थानाचे हे कार्य पुढे नेण्याची अतोनात तळमळ त्यांना होती. १९६३ मधील विवेकानंद जन्मशताब्दीच्या काळात स्वामी विवेकानंद यांचे जीवन आणि कार्य यांवर प्रचलित परिस्थितीच्या संदर्भात प्रकाश टाकणारी अनेक भाषणे त्यांनी केली. कन्याकुमारी नजीकच्या ज्या खडकावर विवेकानंदांना त्यांच्या जीवनकार्याचा साक्षात्कार झाला, तिथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्याच्या योजनेला चालना श्रीगुरूजींनीच दिली. श्री. एकनाथजींवर ती जबाबदारी त्यांनी सोपविली. सर्वांच्या सहकार्याने हे काम पूर्णतेला जाईपर्यंत त्यांचे त्यावर बारीक लक्ष होते. त्यांच्या संघातील बौध्दिक वर्गातही रामकृष्ण -

विवेकानंदांच्या जीवनातील अनेक उद्-बोधक प्रसंग ते सहजपणे सांगून जात. कोठेही गेले तरी साधुसंत आणि संप्रदायप्रमुख, महंत आणि मठाधीश इत्यादींना ते भेटत. हिंदू समाजाच्या परिस्थितीबाबत त्यांच्याशी चर्चा करीत आणि सगळयांनी अहंकार टाकून एकत्र येण्याची व युगानुकूल धर्मजागृती करण्याची आवश्यकता पटवून देत. कामकोटीचे शंकराचार्य म्हणजे आध्यात्मिक क्षेत्रातील फार थोर विभूती. त्यांचा श्रीगुरूजींवर अत्यंत लोभ. इतका की, श्रीगुरूजींचे मातापिता दर्शनार्थ गेले असता एकांत व मौन भंग करून त्यांनी जातीने त्यांची विचारपूस केली. पेजावर मठाचे श्रीविश्वेश्वर तीर्थ हे तर श्रीगुरूजींच्या प्रेरणेने प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात उतरले. आज पेजावर मठाधीश म्हणजे हिंदूतील जागृतीला चालना देणारी एक उपकारक शक्ती आहे. त्यांची आणि श्रीगुरूजींची पहिली भेट १९५३ साली झाली होती.

धार्मिक क्षेत्रातील श्रीगुरूजींच्या हालचाली व सर्व पंथ आणि संप्रदाय यांना एकत्र आणून धर्मजागृती घडवून आणण्याच्या कार्याची त्यांना जाणवलेली निकड यांतून एक कल्पना त्यांनी स्फुरली. ती व्यवहारात समूर्त करण्यासाठी संघाचे एक ज्येष्ठ प्रचारक श्री. शि. शं. तथा दादासाहेब आपटे यांच्या साह्याने त्यांनी प्रयत्न सुरू केले. या प्रयत्नांची परिणती म्हणून १९६४ साली जन्माष्टमीच्या मुहूर्तावर विश्व हिंदू परिषदेची निर्मिती करण्याचे ठरले. मुंबईला पवई येथे स्वामी चिन्मयानंद यांच्या सादीपनी आश्रमात प्राथमिक बैठक होऊन परिषदेच्या अस्थायी समितीची घोषणा करण्यात आली. शीखपंथीय नेते मा. तारासिंग व विदर्भातील लोकप्रिय संतपुरूष तुकडोजी महाराज हे या बैठकीला उपस्थित होते.

श्री. दादासाहेब आपटे यांची या कार्यासाठी योजना करताना, श्रीगुरूजीनी त्यांना काय सूचना दिल्या हे मुद्दाम पाहण्यासारखे आहे, ते म्हणाले, “देशविदेशात सर्वत्र अनेक हिंदू कुटुंबे राहत असतात .जगातील या सर्व हिंदूसाठी सांसकृतिक अधिष्ठान म्हणून एखाद्या संस्थेची भारतात स्थापना होणे अत्यंत आवश्यक आहे .भारतातील प्रमुख, प्रतिष्ठित, धर्म - संस्कृतीवर श्रध्दा असलेल्या सत्पुरूषांची आपण भेट घ्या .त्यांच्याशी विचारविनिमय करा .त्यांना या आपल्या नवीन संकल्पित कार्यासाठी अनुकूल बनवा .कोणाकोणाला भेटायचे याची नावे काढा .नावे ठरली म्हणजे मला भेटा .काही लोकांची नावे मीही अवश्य सुचवीन.

श्री. वि. घ. देशपांडे यांच्याशी बोलणे करा. विश्वातील हिंदूसाठी आवश्यक असलेले हे कार्य राजकारणापासून पूर्णत : अलिप्त असले पाहिजे आणि हिदूसभा किंवा अन्य कोणताही पक्ष यांच्य व्यासपीठाचा हे संकल्पित कार्य करताना, कोणत्याही परिस्थितीत, वापर करता कामा नये. या दोन अटी श्री. देशपांडे यांना मान्य असतील तरच त्यांचा आपल्या कामाला उपयोग होऊ शकेल.” अर्थात दादासाहेबांना हे सहकार्य संपादन करता आले नाही .कारण सांदीपानी आश्रमातील बैठक ठरल्याचे ठाऊक असूनही श्री .वि .घ .देशपांडे यांनी ‘विश्व हिंदू धर्म संमेलन’ या नावाने स्वतंत्रपणे काम सुरू केले . त्यासाठी हिंदू महासभेच्या ‘लेटर हेड्स’ वर पत्रव्यवहारही होऊ लगला .अर्थात सांदीपनी आश्रमातील बैठकीसाठी श्री .वि.घ .देशपांडे यांना निमंत्रित करण्यात आले नाही.

दिनांक २९ ऑगस्ट रोजी झालेल्या या बैठकीत नव्या संस्थेच्या संदर्भात तपशीलवार विचार झाला. संस्थेचे नाव काय असावे हा अर्थातच पहिला प्रश्न. ‘विश्व’ शब्दाबद्दल मतभेद नव्हताच .पण ‘सनातन’, ‘आर्य’, ‘धर्म’, ‘हिंदू’, ‘संमेलन’, ‘परिषद’ इत्यादी शब्द संस्थेच्या नावात असावे किंवा नसावे यासंबंधी मात्र मतभिन्नता व्यक्त झाली .याबाबतीत श्रध्देय श्री तुकडोजी महाराज यांनी प्रकट केलेला विचार सर्वांना मान्य झाला .त्यांनी म्हटले की, “भारतात आपण सनातन, हिंदू, आर्य इत्यादी नावांवरून

आपसात भांडतो .पण परदेशात तर आपण सारे हिंदू म्हणूनच ओळखले जातो .म्हणून 'विश्व हिन्दू' हा शब्दप्रयोगच ग्राह्य आहे." श्री संत तुकडोजी महाराज यांच्या या अभिप्रायाशी सर्वच जण सहमत झाले.

निरनिराळया मतप्रदर्शनाचे श्रवण श्रीगुरूजीं लक्षपूर्वक करीत होते. शेवटी सन्मान्य निमंत्रितांना उद्देशून ते म्हणाले, "जर संस्थेच्या नावात 'धर्म' या शब्दाचा अंतर्भाव आपण केला तर धर्माशी संबंधीत विषयांवरील विचार आणि त्यांची अंमलबजावणी एवढीच आपल्या कार्याची मर्यादा ठरेल .आपल्याला तर धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारही पुरूषार्थांचा व्यापक विचार आणि तद्-नुसार कार्यवाही अभिप्रेत आहे .हिंदू समाजजीवनाची सारी अंगोपांगे सुदृढ करून त्यांना हिंदू जीवनाच्या आदर्शांनी प्रेरित करण्याची आपली इच्छा आहे .म्हणून या आपल्या संकल्पित कार्याच्या नावात 'धर्म' हा शब्द असू नये .तसेच 'संमेलन' या शब्दाने स्थायी कार्याचा बोध होत नाही .म्हणून 'परिषद' शब्दच मला योग्य वाटतो.

श्रीगुरूजींच्या या विचारांना सर्वांनीच आनंदाने मान्यता दिली. त्यामुळे 'विश्व हिंदू परिषद' असे संकल्पित संस्थेचे नामकरण निश्चित झाले .जागतिक स्वरूपाचे आणि सर्व हिंदूंना आधारभूत ठरणारे हे कार्य सुरू करताना प्रत्येक लहानमोठया बाबीकडे श्रीगुरूजींचे केवढे बारकाईने लक्ष होते आणि आपल्या अंत : करणातील भाव इतर सहकाऱ्यांपर्यत पोचवून सर्वंना एकाच विचाराने प्रेरित करण्याची त्यांची क्षमता केवढी जबरदस्त होती, याचे प्रत्यंतर थोरथोर महानुभवांच्या या बैठकीवरून येऊन गेले.

परिषदेची विधिवत् स्थापना १९६६ साली कुंभमेळयाच्या प्रसंगी एक जागतिक हिंदू संमेलन तीर्थराज प्रयाग येथे भरवून करावी, असा सर्वसंमतीने निर्णय झाला. हिंदूच्या आधुनिक इतिहासात या घटनेचे महत्व अनन्यसाधारण आहे. कारण नाना मते, नाना संप्रदाय, नाना जाती - उपजाती, जगातील नाना देश यांत विखुरलेल्या आणि अभिसरणशुन्य बनलेल्या हिंदू समाजात एक समानतेचे व्यासपीठ विश्व हिंदू परिषदेच्या रूपाने उपलब्ध झाले. कोणत्याही देशाच्या, पंथाच्या, जातीच्या प्रातांच्या हिंदूंसाठी खुले असे हे समावेशक व्यासपीठ प्रयागला उभे झाले. दिनांक २२, २३ व २४ जानेवारी १९६६ रोजी भरलेले सगळया जगातील हिंदूंचे हे संमेलन अपूर्व उत्साहाने व हिंदू एकात्मतेची अनुभूती आणून देऊन पार पडले. या परिषदेपूर्वी श्री. दादासाहेब आपटे यांनी सर्वत्र प्रवास केला होता. ठिकठिकाणाचे धर्मगुरू, मठाधीश, महंत, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रांतील कार्यकर्ते इत्यादींच्या भेटी घेऊन परिषदेची कल्पना समजावून सांगितली होती. परिषद यशस्वी व्हावी यासाठी स्वत: श्रीगुरूजीदेखील प्रवासात निरनिराळया लोकांना भेटत होते. विश्व हिंदू परिषदेच्या मूळ कल्पनेचे श्रेय मात्र श्रीगुरूजींनी स्वत:कडे घेतले नाही. त्यांनी सांगितले की, जगातील समस्त हिंदूंच्या प्रतिनिधींची एक परिषद बोलावण्याची कल्पना मुळात हिंदू महासभेच्या एका नेत्याने पुढे मांडली होती. यावर श्रीगुरूजींचा अभिप्राय असा पडला की, असे संमेलन कोणत्याही राजकीय पक्षातर्फे आयोजित करण्यात येऊ नये. दैनंदिन राजकारणापासून अलिप्त असलेल्या आपल्या हिंदू समाजातील प्रमुख पुरूषांनी एक समिती तयार करून ते भरवावे. याच योजनेला मूर्त स्वरूप नंतर आले. परंतू ज्यांनी ही कल्पना सुचविली त्यांची अपेक्षाही नसेल, एवढी श्रीगुरूजींच्या प्रतिभेची झेप पुढे गेली. अशा परिषदेच्या निमित्ताने निर्माण होणाऱ्या व्यासपीठाचे स्वरूप तात्पुरते राहू नये. एक परिषद भरवून धन्यता मानण्यात येऊ नये, असे त्यांनी मनोमन ठरविले. सातत्याने करावयाच्या कार्याचे प्रारूपच जणू त्यांनी निश्चित केले व त्या दिशेने ते झडझडून कामाला लागले.

विश्व हिंदू परिषदेचे हे व्यासपीठ मोठे भाग्यवान म्हटले पाहिजे. कारण अनेक प्रकारची कामे संघाच्या आणि श्रीगुरूजींच्या प्रेरणेने देशात उभी झाली पण कार्याची प्रेरणाशक्ती आणि चैतन्यमूर्ती या नात्याने श्रीगुरूजी सदेह वावरले असतील तर ते या विश्व हिंदू परिषदेच्या व्यासपीठावरच! आणि ते देखिल एक नेता व उपदेशक म्हणून नव्हे तर विनम्र कार्यकर्ता या नात्याने .सांदीपनी आश्रमातील बैठकीत सगळयांच्या सोयी-गैरसोयीकडे त्यांनी जातीने लक्ष पुरविले .अतिशय आदराने व मोठेपणा देऊन निमंत्रितांना वागविले .प्रयागला समारोपाच्या भाषणात प्रारंभीच त्यांनी स्वत :संबधी जे उद्-गार काढले, त्यामुळे देश - विदेशांतील सहस्रावधी श्रोते गद्-गद होऊन गेले .श्रीगुरूजी म्हणाले, "वासतविक मी येथे येऊन काही बोलण्याचे प्रयोजन नव्हते .पण सुमारे दोन महिन्यांपूर्वी श्रीमत् द्वारकापीठाधीश्वर जगद्-गुरू श्री शंकराचार्य महाराजांनी मी येथे येऊन बोलले पाहिजे, अशी आज्ञा दिली .त्याच वेळी त्यांची क्षमा मागून मी म्हटले होते की, येथे मंडपात झाडलोट करणे हेच माझे खरे काम .मी तेच काम करीत राहीन .कारण मी एक स्वयंसेवक आहे .याहून काही करणे ही धृष्टता होईल .परंतु श्रीशंकराचार्य महाराजांच्या आज्ञेचे पालन करण्याखेरीज गत्यंतर नसल्यामुळे मी आपणा सर्व सज्जनांच्या सेवेसाठी येथे उभा राहिलो आहे." या उद्-गारांनी कोणाला पांडवांच्या राजसूय यज्ञात पत्रावळी काढणाऱ्या आणि भारतीय युध्दात अर्जुनाच्या घोडयांना खरारा करणाऱ्या 'माधवा' ची आठवण झाली असेल, तर त्यात नवल कोणते? या परिषदेच्या साऱ्या व्यवस्थेवर तर श्रीगुरूजींचे लक्ष होतेच, पण एकाच व्यासपीठावर ज्या जगद्-गुरूंना, धर्माचार्यांना, संतांना आणि महंतांना प्रयत्नपूर्वक आणले, त्यांच्यात सामंजस्य राखून कोणीही नाराज होणार नाही याची अतोनात दक्षता बाळगताना ते दिसत होते .एखाद्या प्रश्नावर किंवा ठरावावर थोडासाही मतभेद उत्पन्न झाल्यास श्रीगुरूजी अत्यंत विनयपूर्वक समन्वय निर्माण करीत .धर्मपीठांच्या मूर्धन्य आचार्यांच्या उपदेशावर यथोचित भाष्य करून भिन्न मतांतील समानतेचे अंत:स्थ सूत्र उलगडून दाखवीत .श्रीगुरूजींच्या या दक्षतेमुळे, आर्जवीपणामुळे, परिषदेला एक विधायक दिशा लाभली .युगानुकूल धर्मविचारांवर एकमताने ग्राह्यतेचा शिक्का मारला गेला, हे सर्वविदित आहे .अन्य कोणी पुरूष हे अवघड काम करू शकला असता की नाही, याची शंकाच आहे .जगभर विखुरलेल्या, आत्मविस्मृत आणि निष्प्रभ जीवन जगत असलेल्या, हिंदू धर्माचे जन्मस्थान असलेल्या भारताकडून आधार आणि मार्गदर्शन यांना दीर्घकाळ वंचित होऊन गेलेल्या परदेशीय तसेच हीनगंडाने ग्रासलेल्या भारतवासी हिंदूत एक तेजस्वी परिवर्तन घडवून आण्णयाची उत्कट तळमळ जर श्रीगुरूजींच्या ठायी नसती व या ईश्वरी कार्यात आपले 'मी' पण जर त्यांनी नि:शेष विलीन करून टाकले नसते, तर हे प्रयागचे संमेलन एवढे अपूर्व यश संपादन करतेच ना .'श्रीगुरूजी - समग्र दर्शन' ग्रंथाच्या ५ व्या खंडाला लिहिलेल्या प्रस्तावनेत इंदूरचे कै .पं . रामनारायणजी शास्त्री यांनी श्रीगुरूजींच्या या भूमिकेचे मोठे यथार्थ चित्रण केले आहे.

विश्व हिंदू परिषदेची स्थापना ही एक युगकारी घटना आहे. परिषद म्हणजे एक प्रकारे संघाच्या अवतारकार्याचे परिणामकारक आणि विश्वव्यापी प्रस्तुतीकरण (प्रोजेक्शन) होय, असे म्हणता येईल. ज्या कोणाला हिंदू पुनरूत्थानासाठी भारतात वा भारताबाहेर कोणतेही छोटेमोठे काम करावयाचे असेल, त्याच्यसाठी वैश्विक हिंदू परंपरेचे सूत्र ग्रहण करून काम करण्यास अमर्याद वाव परिषदेने उपलब्ध करून दिला. संघाच्याच पध्दतीने परिषदेचे काम चालले पाहिजे, असा आग्रह नव्हता. परिषदेने कोणते काम हाती घ्यावे, यासंबंधी काही मार्गदर्शन श्रीगुरूजींच्या प्रयाग येथील भाषणात आहे. सूत्ररूपाने त्याचे सार पुढीलप्रमाणे सांगता येईल :

१)	प्रदीर्घ गुलामी, आत्मविश्वासशून्यता, परानुकरण आणि हीनगंड यामुळे 'न हिन्दु : न यवन:' अशी संस्कारशून्य अवस्था प्राप्त झालेल्या आपल्या समाजाला हळूहळू धर्माच्या, आपल्या तत्वज्ञानाच्या आणि आचरण - परंपरेच्या श्रेष्ठत्वचा बोध घडवून पुन्हा धर्माच्या प्रतिष्ठापनेचा प्रयत्न करावा .प्रारंभ म्हणून अगदी न्युनतम असे संस्कार प्रदान करण्याची व्यवस्था व्हावी .आपल्या विद्वानांनी त्यांचे स्वरूप ठरवावे.

२)	परदेशातील हिंदू बांधवांत हिंदू राहण्याची उत्कट इच्छा आहे, पण, 'ज्ञान, संस्कार' इत्यादी मार्गांनी या भावनेची जोपासना होत नाही .संस्कार नसल्याने व्रात्यत्वाची अवस्था त्यांना आली आहे . या परदेशस्थ बांधवांसाठी आपल्याला संस्कार - जागृतीची व ज्ञानदानाची व्यवस्था करावी लागेल.

३)	आपल्या या मूळ भूमीत देखील आपण हिंदू म्हणून घेण्यास कचरतो. न्युनगंडाने आपण ग्रासले गेलो आहोत. मी हिंदू आहे, या भारताच्या पुण्यपरंपरांचे संरक्षण, संवर्धन आणि सर्व प्रकारे त्याचा प्रसार करणे हे माझे परमपवित्र कर्तव्य आहे आणि ते करण्यासाठी मी अग्रेसर होईन, असे बोलण्या - वागण्याचे धैर्य सर्वत्र निर्माण झाले पाहिजे. निरनिराळया देशांत राहणाऱ्या आपल्या हिंदू बांधवांना आधार वाटेल व मान ताठ ठेवून ते उभे राहू शकतील, असे जीवन प्रथम मायदेशामध्ये आकारास आणले पाहिजे. या दृष्टीने गोहत्याबंदी हे आवश्यक पाऊल ठरते. तसेच आपण सर्वांनी हा आधार निर्माण करण्याचे पहिले पाऊल म्हणून स्वाभिमानपूर्वक म्हणावे की आम्ही सर्व लोक हिंदू आहोत आणि हिंदू या नात्याने संपूर्ण जगात आम्ही वावरू.

४)	कोणत्याही संप्रदायाला आपला विरोध नाही. म्हणजे एवढेच की, जे काय करावयाचे ते प्रामाणिकपणे, चरित्र्यसंपन्न बनून आणि मानवतेवर प्रेम ठेवून करा. संप्रदायाच्या नावावर स्वार्थपुर्तीच्या मागे लागू नका. व्यभिचार आणि विनाश करू नका, हाच आपला आग्रह आहे. हिंदू धर्म सर्वसंग्राहक आहे.

५)	सनातन धर्म म्हणजे आपला महान, चिरंजीवी सिध्दांतमय आचारधर्म, आपल्या परंपरेत निर्माण झालेले बौध्द, जैन, शीख आदी सर्व पंथ त्यांच्या कक्षेत येतात, जैन संप्रदायाच्या एका ज्येष्ठ मुनींनी नि:संदिग्ध अभिप्राय व्यक्त केला की, 'जो स्वत:ला हिंदू म्हणविणार नाही तो मग जैन कसा राहील?' खरेच आहे .आपले सर्व संप्रदाय एकाच परंपरेतून निर्माण झालेले आहेत .या संप्रदायांत सर्व प्रकारचे सामंजस्य प्रस्थापित करून आपल्या समग्र समाजाचे वैभव संपादन करणे हे आपले कर्तव्य आहे.

६)	गिरिकंदरात राहणारे आपले बांधव जे आज दु:खी आहेत, ते आमच्याच दोषामुळे दु:खी आहेत. स्वत:ला समजदार म्हणविणाऱ्या हिंदू समाजातील उच्च समजल्या जाणाऱ्या वर्गामुळेच अपेक्षित राहिलेला आपला हा जो वन्य समाज आहे, ते आपलेच एक अभिन्न अंग आहे. त्याच्यावर इतक्या वर्षांपासून जो अन्याय झाला, त्याचे परिमार्जन करण्यासाठी जे जे आवश्यक असेल ते ते करण्याची आपली सिध्दता पाहिजे.

विश्व हिंदू परिषदेच्या यशस्वी अधिवेशनाच्या समारोपादाखल श्रीगुरूजींनी जी भावना व्यक्त केली, ती त्यांच्याच शब्दांत देणे योग्य. श्रीगुरूजी म्हणाले, "अडीच दिवसांचा हा प्रसंग सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे असे मी मानतो .आपणा सर्वांसाठी हा भाग्याचा क्षण आहे .इतक्या वर्षांपासून झोपलेले आपले भाग्य आता जागे झाले आहे .आता जगात उंच डंका वाजेल आणि पताकाही उंच

फडकेल .स्वामी विवेकानंदांसारख्या महापुरूषांनी सर्व जगात संचार करून असे म्हटले होते की जगाच्या मस्तकावर आमचा ध्वज उंच फडकेल .तो दिवस दूर नाही यात काहीच शंका नाही."

यानंतरच्या काळात गुजरात, महाराष्ट्र, आसाम, कर्नाटक वगैरे राज्यांत विश्व हिंदू परिषदेची प्रादेशिक संमेलने झाली आणि श्रीगुरूजी त्यात सहभागी झाले. आसामात जोरहट येथे मार्च १९७० मध्ये जे महासंमेलन झाले, त्यातील महिला विभागाच्या कार्यक्रमासाठी नागप्रदेशातील राणी गुडालियो या उपस्थित होत्या. मातृशक्तीने हिंदू समाजाला त्याचे संस्कारधन देण्यासाठी कशाप्रकारे प्रयत्नशील व्हावे, याबद्दल फार चांगले मार्गदर्शन श्रीगुरूजींनी या अधिवेशनात केले. मुख्य संमेलनात श्रीगुरूजींचे झोलेले भाषण या पूर्वोत्तर प्रदेशातील (आज आसाम, मेघालय, मिझोरम, नागालँड, मणिपुर, त्रिपुरा व अरूणाचल यांचा समावेश असलेले एकूण क्षेत्र) आगामी अशुभ घटनांची सूचना देणारे होते. तसेच या भागातील हिंदूंनी कशा प्रकारे पावले उचलून संकटांना प्रतिकार करावा, हेही त्यांनी सांगितले. मुस्लिम घुसखोराचे संकट वाढते आहे व आसामला मुस्लिम बहुसख्येचा प्रांत बनविण्याचा कट शिजत आहे असा इशारा देउन केंद्रातील एक मुस्लिम मतानुयायी गृहस्थाची या घुसखोरीला फुस असल्याचा आरोप श्रीगुरूजींनी यावेळी केला होता. संमेलनात 'मेघालय' या त्यावेळी नव्यानेच निर्माण करण्यात आलेल्या 'ख्रिस्ती' राज्यामुळे ओढवणाऱ्या संभाव्य आपत्तीबद्दलही ते बोलले .मेघालय निर्माण करू नका, असा सल्ला श्रीगुरूजींनी भारत सरकारला दिला होता .पण कोणाच्या तरी दबावाखाली येऊन हे राज्य निर्माण झाले .त्या राज्याचा अनुभव श्रीगुरूजींनी भाकित केल्याप्रमाणेच आला.

हिंदूंनी या संकटाला तोंड कसे द्यावे हे सांगताना काही ठोस मार्ग श्रीगुरूजींनी सांगितले : (१) जनगणनेत इस्लाम मतानुयायी त्यांची संख्या फुगवून सांगतात. तसे होणार नाही, हे पाहावे आणि प्रत्येक हिंदूने हिंदू म्हणूनच कटाक्षाने आपली नोंद करावी. ट्रायबल, विशिष्ट पंथ अथवा पहाडी जात या नावाने नोंद करू नये. (२) मेघाल्यातील पहाडी व वन्य क्षेत्रांत राहणाऱ्या सर्व हिंदूंनी एकत्रित येऊन आपले नेतृत्व निर्माण करावे. आमच्यात फुट पाडून अल्पसंख्य ख्रिश्चन समाज वरचढ ठेवण्याचे आणि मोठा करण्याचे जे कारस्थान आहे त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवून या प्रदेशाची सूत्रे पुन्हा आपण आपल्या हाती घेतली पाहिजेत. कठीण परिस्थितीचा निरास सूत्रबध्द हिंदू एकतेवर अवलंबून आहे. (३) विश्व हिंदू परिषदेच्या योजनेतून एका व्यक्तीने एक खेडे निवडावे व तेथे नित्य जाऊन साहाय्य, शिक्षण, धर्मजागृती, इत्यादी कामे चिकाटीने करावी. लोकांबरोबरच जेवणखाण करावे. शुध्द हृदयाने लोकांत मिळून-मिसळून जावे. (४) समाजाच्या श्रेष्ठ जीवनासाठी धनाचा सदुपयोग करण्याचा निधार असावा. अशा प्रकारे सर्वंकष प्रयत्न झाल्यास अहिंदू शक्ती परास्त होऊन भारतमातेचे एक सबल अंग या नात्याने आपला हा प्रदेश समर्थपणे उभा राहू शकेल, असा विश्वास श्रीगुरूजींनी व्यक्त केला. या कामाची हीच दिशा राहिलेली आहे व कार्याचे काही सुपरिणाम आज प्रत्यक्ष दिसत आहेत.

विश्व हिंदू परिषदेच्या समावेशक व्यासपीठाचा उपयोग हिंदू समाजातील निरनिराळया गटांत वाढलेला दुरावा दूर करूप स्नेहमय समरसतेची भावना जागविण्यात होताना दिसला की श्रीगुरूजींना मोठा आनंद होत असे. एकदा दक्षिणांचल प्रचारक व संघाचे सह-सरकार्यवाह श्री. यादवराव जोशी यांना असा प्रश्न विचारण्यात आला की, "श्रीगुरूजी ३३ वर्षे संघाचे सरसंघचालक होते .या त्यांच्या कार्यकालात त्यांना निरतिशय आनंद झाल्याचा एखादा प्रसंग सांगू शकाल का?"

यावर यादवरावांनी तत्काळ उत्तर दिले की, १९६९ साली उड्डपी येथे कर्नाटक प्रदेश विश्व हिंदू परिषदेचे दोने दिवसांचे संमेलन झाले होते. या संमेलनात सर्व धर्माचार्यांनी धर्मशास्त्रांत अस्पृश्यतेचे मुळीही

समर्थन नाही, सर्व हिंदू भाऊ भाऊ आहेत, कोणीही हिंदू पतित नाही, अशा आशयाचा ठराव एकमताने संमत केला. ठराव संमत झाला तेव्हा श्रीगुरूजींना आनंदाने भरते आले. ते उद्-गारले, "धन्य, धन्य! हा क्षण ऐतिहासिक आहे." त्याचे स्वागत प्रचंड जयघोषात आणि टाळयांच्या कडकडाटात व्हावे, अशी सूचना त्यांनी कामकाजाचे संचालन करणारे कार्यकर्ते श्री .सूर्यनारायण राव यांना केली .भाषणांचा क्रम अल्पकाळ खंडित झाला व न राहवून श्रीगुरूजीच उपस्थित समुदायाला उद्देशून म्हणाले, "टाळया पिटा, जयघोष करा!" श्रीगुरूजींनी स्वत :टाळया वाजविल्या .जयघोष केला .त्यांचा चेहरा त्यावेळी आनंदाने फुलून आला होता .अशा आनंदित अवस्थेत त्यांना कधी पाहिले नव्हते .मला वाटते की तो त्यांच्या संघजीवनातील विरळा आनंदाचा क्षण (finest hour) असावा, संमेलन आटोपल्यावर आम्ही विमानतळावर गेलो .तेव्हाही मला एका बाजूला नेऊन ते म्हणाले, "यादवराव, हे संमेलन आणि संमेलनातील कामकाज ऐतिहासिक महत्वाचे (momentous) म्हणावे लागेल .या संमेलनातील विचारविनिमय आणि भाषणे यांचा तपशील भारतातील आपल्या सर्व भाषांत प्रसिध्द झाला पहिजे . त्याच्या हजारो प्रती छापून त्या सर्वत्र प्रसृत करण्यात आल्या पाहिजेत." उड्डपीला "अस्पृश्यतेस धर्मात स्थान नाही" या आशयाचा जो नि:संदिग्ध ठराव विविध पंथांच्या धर्माचर्यांच्या आणि शंकराचार्यांच्या सहमतीने संमत झाला, तो संमत व्हावा म्हणून श्रीगुरूजी किमान ६-७ वर्षे सतत प्रयत्नशील होते .जैन, बौध्द, शीख धर्मगुरूंशी आणि धर्माचर्यांशी त्यांनी प्रदीर्घ चर्चा केली होती .ते सर्व प्रयत्न सफल झाल्याची साक्ष उड्डपी संमेलनाने पटविली .त्यांची नंतरची पत्रे आणि वक्तव्ये यांतही त्यांना झालेल्या अतीव समाधानाचे प्रतिबिंब उमटलेले आढळते.

श्रीगुरूजींच्या हयातीतच विश्व हिंदू परिषदेचे काम अनेक देशांत सुरू झाले होते. आता तर ते चांगलेच दृढमूल झाले आहे. व्यापारानिमित्त किंवा नोकरीधंद्यानिमित्त संघाचे अनेक तरूण आणि प्रौढ स्वयंसेवक परदेशांत जाऊन राहिले. कितीतरीजण तिकडेच स्थायिकही झाले. या सर्व स्वयंसेवकांचा कार्याशी संपर्क राहावा, एवढेच नव्हे तर त्या त्या देशांतील हिंदू लोकांनी संघाच्याच पध्दतीने अथवा अन्य कोणत्या प्रकारे संघटना करून हिंदू जीवनाचे सूत्र अखंड राखावे, असे श्रीगुरूजी सांगत. परदेशातील आपल्या बांधवांशी संपर्क राखण्याचे काम त्यांनी दिल्लीच्या संघकार्यालयतील ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. चमनलालजी यांच्यावर सोपविले. पत्रव्यवहारही नित्य चालूच असे. ब्रह्मदेशातून श्रीगुरूजींना भेटीचे निमंत्रणही आले होते. पण शासकीय नेत्यांची इच्छा आड आली व तो योग जुळून आला नाही. श्री. दादासाहेब आपटे मात्र जगातील ज्या राष्ट्रांत हिंदू जाऊन राहिले आहेत, तेथे संचार करून आले. नंतरच्या काळात श्री. लक्ष्मणराव भिडे नामक कार्यकर्त्याची खास नियुक्ती परतदेशात काम संघटित करण्यासाठी झाली. परदेशातील हिंदूबांधवांशी संस्कार सातत्य, हिंदू आदर्श व परदेशांचा प्रभाव इत्यादी विषयांवर झालेला श्रीगुरूजींचा पत्रव्यवहार फारच उद्बोधक आहे. परदेशात हिंदू जागृतीची जी कामे सुरू झाली, त्यासाठी प्रमुख माध्यम विश्व हिंदू परिषदेचेच होते. लंडन येथे १९७० मधील जन्माष्टमीला गोपालकृष्ण मंदिराचे उद्घाटन झाले त्यावेळी श्रीगुरूजींनी पाठविलेला विस्तृत संदेश म्हणजे विदेशातील हिंदूंना त्यांनी केलेल्या एकूण मार्गदर्शनाचे सारच होय. हा संदेश नागपूर येथे श्रीगुरूजींच्या आवाजात ध्वनिमुद्रित करून घेण्यात आला आणि कार्यक्रमाच्या वेळी लंडन येथे तो ऐकविण्यात आला. परदेशातील या वाढत्या कामाबरोबरच खुद्द भारतातही विधायक कामाची शेकडो केंद्रे उभी झाली आहेत. फेब्रुवारी १९८२ मधील राष्ट्रव्यापी हिंदू एकता आंदोलन विश्व हिंदू परिषदेच्याच नेतृत्वाने झाले. १९८१ साली प्रयागला दुसरे जागतिक संमेलन झाले व फार मोठा

प्रतिसाद त्या संमेलनाला मिळाला. १९६६ साली श्रीगुरूजींनी विश्व हिंदू परिषदेची स्थापना करून हिंदू जगताची केवढी गरज पूर्ण केली, याची साक्ष काळानेच पटविली आहे.

विश्व हिंदू परिषदेची किंवा अन्य संस्थात्मक व संघटनात्मक कामे श्रीगुरूजींच्या प्रेरणेने गतिशील झाली. त्यांचा व्याप वाढला, प्रभाव वाढला. परंतू श्रीगुरूजींचा अफाट पत्रव्यवहार नुसता चाळला तरी ध्यानात येते की, अगणित व्यक्तींना त्यांनी नाना प्रकारची धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्ये करण्यास प्रेरित केले. अनेकांच्या गुणांना व कार्यशक्तीला योग्य दिशा दिली. ग्रंथलेखक, ग्रंथालय चालविणारे, कवी, नियतकालिके काढणारे वा काढू इच्छिणारे, एखादे सेवाकार्य अंगावर घेण्याची इच्छा असलेले, अध्यात्माच्या दिशेने पावले टाकण्यास प्रवृत्त झालेले, भजनपुजन करणारे, सेवानिवृत्त, राजकारणी अशा कितीतरी व्यक्ती भेटून किंवा पत्रद्वारे श्रीगुरूजींच्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीत. सगळयांना ठाऊक होते की श्रीगुरूजी कोणी सत्ताधारी नाहीत. ते स्वत: अपरिग्रही प्रचारक असल्यामुळे काही देण्यास लौकिकदृष्टया ते असमर्थ आहेत. श्रीगुरूजींकडे लोक येत ते याच विश्वासाने की आपल्याला योग्य मार्गदर्शन मिळेल. श्रीगुरूजीही हिंदू समाजाचे व राष्ट्राचे हिताहित दृष्टीपुढे ठेवून कार्यातील पथ्यापथ्य मार्मिकपणे सांगत.

ब्रह्मदेशातील सर्वोच्च न्यायाल्याचे एक न्यायमूर्ती श्री. ऊ. छान ठुन हे डिसेंबर १९५८ ते जानेवारी १९५९ पर्यंत भारतात होते. 'वर्ल्ड ज्यूरीज कॉन्फरन्स' साठी प्रतिनिधी या नात्याने त्यांचे दिल्लीत आगमन झाले होते .श्रीगुरूजींना भेटावे .संघाची जवळून ओळख करून घ्यावी तसेच नवबौध्द मंडळींशीही बोलावे अशी त्यांची इच्छा होती .त्याप्रमाणे त्यांनी दिल्लीव्यतिरिक्त आग्रा, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर इत्यादि ठिकाणी प्रवास केला .श्रीगुरूजींशी सविस्तर चर्चा केली संघशाखा पाहिल्या .संघाच्या काही कार्यक्रमात त्यांची भाषणेही झाली .त्यांच्या विषयाचे सूत्र हे होते की, सनातन धर्म हा विशाल आहे .भगवान बुध्दानेही सनातन धर्मच उपदेशिला .या सनातन धर्माचा प्रकाश जगात पसरविण्याचे कार्य संघाने पुन्हा एकवार केले पाहिजे .आगामी काळात आग्नेय आशियात तरी सनातन धर्माचा संदेश प्रसृत करण्याचे कार्य रा .स्व .संघाकडून होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .श्रीगुरूजींच्या भेटीने त्यांना फार आनंद झाल्याचे दिसले.

मुंबईला संघाच्या मकरसंक्रमणोत्सव ते सहभागी झाले आणि श्रीगुरूजींचे भाषण त्यांनी लक्षपूर्वक श्रवण केले. व्यक्तिगत भेट रात्री श्रीगुरूजींच्या निवासस्थानी झाली. तिळगुळ देण्यात आला. 'आग्नेय धर्म संस्कृती यांचे रक्षण व प्रसार, त्यासाठी संघटनेची आवश्यकता, हिंदू व बौध्द लोकांनी एकत्र येऊन कार्य करण्याची गरज आणि संघाची क्षमता' या विषयावर मुख्यत्वे चर्चा झाली .मुंबई आणि नागपूर येथे नवबौध्दांतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जनसभांत ऊ छान ठुन यांची प्रकट भाषणे झाली .ते 'वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुध्दिस्टस्' या संस्थेचे अध्यक्ष असल्याने बौध्द मंडळींनी त्यांची भाषणे आयोजित केली होती .नागपूरला ऊ छान ठुन यांनी नवबौध्द मंडळींनी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना संघ कार्यकर्त्यांच्या शैलीने काम करण्याचा सल्ला दिला .संघ कार्यकर्त्यांचा मेळावा नागपूर संघचालकांच्या निवासस्थानी भरला होता .या कार्यकर्त्यांपुढे बोलताना त्यांनी संघकार्यावर आपला विश्वास व्यक्त केला आणि श्रीगुरूजींशी झालेल्या भेटीबद्दलही अत्यंत समाधानाचे उद्-गार त्यांनी काढले .मंद्रासलाही संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या एका स्वगतसमारंभात ते बोलले.

भारतातून लंकेकडे प्रस्थान करताना वृत्तपत्राच्या वार्ताहरांनी त्यांना भारत भेटीबद्दल काय वाटले व आपला संदेश काय असा प्रश्न विचारला असता त्यांनी जे सांगितले त्यावर श्रीगुरूजींशी झालेल्या चर्चेचा

व संघकार्याच्या जवळून घेतलेल्या दर्शनाचा परिणाम स्पष्ट जाणवत होता. ते म्हणाले. “भारतात येण्यापूर्वी माझी अशी समजूत होती की, पूर्वीच्या काळी भारतातून विदेशात धर्मप्रचारक जात असत, पण या शक्ती आता भारतात राहिलेली नाही .पण माझ्या भारत-भ्रमणात अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी भेटीचा योग आला .अनेक कार्यक्रम पाहण्याची व त्यात सहभागी होण्याची संधी लाभली .आता मी अशा निर्णयावर पोचलो आहे की भारतात ते सामर्थ्य आजही विद्यमान आहे .ज्यांनी आपले सर्वस्व समाजसेवेला वाहून टाकले आहे, अशा अनेक कार्यकर्त्यांशी माझी भेट झाली .विद्वत्ता आणि योग्यता यांत ते मुळीही कमी नाहीत .नि:स्वार्थ भावनेने त्यांनी स्वत:ला समाज आणि धर्म यांच्या सेवेत समर्पित करून टाकले आहे .जगासंबंधीचे आपले कर्तव्ये ते अवश्य पार पाडतील.”

नवबौध्द कार्यकर्त्यांना राजकीय उद्दिष्टांनी प्रेरित न होता संघाच्या सहकार्याने काम करण्यास सुचविणे आणि ‘सनातन धर्मा’ च्या कक्षेत बौध्दधर्माचे स्थान असल्याचे त्यांनी प्रतिपादन करणे हा श्रीगुरूजींच्या भेटीचाच सुपरिणाम होय, यात शंका नाही.

श्रीगुरूजी कधीकधी अप्रिय सत्यही बोलत. पण त्यांच्या अंत:करणातील अथांग स्नेहभाव मात्र सगळयांना जाणवत असे. संभ्रमात पडलेले लोक मनात येणारे नाना प्रकारचे प्रश्न मोकळेपणाने श्रीगुरूजींना विचारीत. कधी या पृच्छेत समाजस्थितीबद्दलची चिंता असे तर कधी वैयक्तिक आणि पारिवारिक अडचणींचा पाढा असे. पण अडचणी केवढयाही असल्या तरी निराशेचा सूर श्रीगुरूजींच्या पत्रांतून वा संभाषणातून आढळून आला नाही. सारी शक्ती एकवटून, अविश्रांत परिश्रम करून आणि सम विचारांचे लोक मिळवून अडचणीवर मात करता येईल असेच सांगत. या सर्व पत्रव्यवहारात भगवंतावरील त्यांची अपार श्रध्दा, मानसिक संतुलन व हिंदू जीवनधारेच्या अमरत्वाबद्दल उदंड विश्वास हे गुण ठायी ठायी प्रकट झालेले आहेत. संघकार्याच्या प्रचंड व्यापातून वेळ काढून समाजातील सत्प्रवृत्ती व सज्जनशक्ती यांना फुलविण्याचे हे जे कार्य त्यांनी भेटीगाठीतून व पत्रव्यवहारातून केले, ते खरोखर अजोड होय. कोणीही माणूस त्यांच्या दृष्टीने क्षुल्लक आणि उपेक्षणीय नव्हता. आणि कोणतेही सत्कार्य नगण्य नव्हते. ही सारी पत्रे श्रीगुरूजींच्या स्वत:च्या हस्ताक्षरात असत, त्यामुळे तर वाचणाराला अधिकच आत्मीयतेचा अनुभव येई व पत्रांचा अधिक परिणाम होई. पत्रव्यवहाराचा एवढा व्याप दक्षतेने सांभाळणारा अन्य कोणी नेता (गांधीजींचा अपवाद वगळता) दृष्टीपुढे येत नाही.

## १७. कर्करोगाच्या अशुभ छायेत

१९४० पासून १९७० पर्यंतच्या तीस वर्षांत श्रीगुरुजींनी स्वत:च्या प्रकृतीच्या कारणस्तव ऐन वेळी एखादा कार्यक्रम रद्द केला आहे, असे सहसा घडले नाही. उलट त्यांना कोणी बळजबरीने विश्रांती घ्यावयास लावली तर त्यांची प्रकृती बिघडू लागे. एकदा उत्तरप्रदेशतील कार्यकर्त्यांनी अशीच विश्रांती त्यांच्यावर सद्-भावनेने लादली आणि श्रीगुरुजींच्या शरीरात विकृती निर्माण होऊ लागल्या. तेव्हा श्रीगुरुजी म्हणाले, "बाबांनो, कार्य हेच या शरीराचे पोषण आहे. ते मिळाले नाही तर माझे शरीर विघटित होऊन जाईल." शारीरिक दुखणे शांतपणे सोसणे, कोणाला त्याची जाणीवही न होऊ देणे आणि कितीही ताप अंगात असला तरी कार्यक्रम सुव्यवस्थितपणे पार पाडणे, हा त्यांचा नित्यस्वभाव बनून गेला होता. एक प्रकारची अदम्य आंतरिक शक्ती त्यांच्या देहाकडून काम करवून घेत आहे असेच अनेकदा वाटावयाचे. श्रीगुरुजींचे शरीर किरकोळ, आहार अगदी माफक पण दिवसभर कामाचा रगाडा मात्र जबरदस्त. परंतु कंटाळा, थकवा यांचे नाव नाही. मुद्रा प्रसन्न, विनोदबुध्दी जागृत, स्मरणशक्ती आश्चर्यजनक. सगळीकडे अवधान, स्वत:च्या सुखदु:खाचा चुकूनही विचार नाही. इतरांच्या सुखदु:खाची नित्य चौकशी. शक्य तिथे तत्पर साहाय्य.

हेच सगळयांच्या अंगवळणी पडून गेलेले. तेव्हा शके १८९२ च्या वर्षप्रतिपदेला (दि. ७ एप्रिल १९७०) नागपुरात उपस्थित असूनही उत्सवात श्रीगुरुजींचे भाषण झाले नाही, प्रकृती बरी नसल्याने ते बालू शकले नाहीत, या घटनेने सगळयांची मने एकदम चरकली. अशुभाची पाल चुकचुकली. दिनांक ६ एप्रिल रोजी नागपुरला पोचण्यापूर्वी श्रीगुरुजी आसाम आणि केरळ या प्रांतांतील कार्यक्रमांना जाऊन आले होते. पण नागपूरला पोचले तेव्हा प्रकृती ठीक नव्हती. तोल जातो की काय असे वाटत होते. दि. २८ एप्रिलपासून देशातील एकूण १९ संघ शिक्षा वर्गांचा प्रदीर्घ दौरा सुरु व्हावयाचा होता. प्रत्येक वर्गात तीन भाषणे आणि स्वयंसेवकांच्या बैठकी. पण प्रवासाला निघायचेच हे श्रीगुरुजींचे पक्के ठरलेले होते. त्याप्रमाणे प्रवास सुरु झाला. यावेळीच असे ध्यानात आले की, त्यांच्या छातीवर एक गाठ आलेली होती. आणि तिचे अस्तित्व किमान ऑगस्ट १९६९ पासून तरी होतेच. कारण त्यावेळी एका जुन्या संन्यासी मित्राने त्यांना कडकडून स्नेहभराने आलिंगन दिले असता खिशातील फौंटनपेन या गाठीवर दाबले गेले आणि असह्य कळ उठली. एवढे सहनशील श्रीगुरुजी, पण त्यांनाही ती वेदना सहन करणे कठीण गेले. या गाठीवर लेप वगैरे जुजबी उपाय केले होते. यापूर्वीही गाठ आली होती. आणि होमिओपथीच्या उपचारांनी ती बरी झाली होती, ही माहिती याचवेळी प्रथम मिळाली त्यामुळे ही गाठ बरी होऊन जाईल असे वाटले. तसे झाले मात्र नाही. संघ शिक्षा वर्गाचा प्रवास चालू असतानाच दि. २ मे रोजी काखेत एक गाठ आली. हे लक्षण चांगले नव्हते. यावेळी श्रीगुरुजींचे वास्तव्य पुण्याच्या वर्गातच असल्यामुळे संघाचे एक कार्यकर्ते आणि श्रीगुरुजींच्या संबंधी प्रगाढ श्रध्दा बाळगणारे नामांकित धन्वंतरी डॉ. नामजोशी यांनी श्रीगुरुजींची काळजीपूर्वक तपासणी केली. कर्करोगाचा (कॅन्सर) संशय त्यांनी व्यक्त केला. तपासणीनंतर डॉ. नामजोशी अतिशय अस्वस्थ झाले होते. मुंबईला जाऊन ताबडतोब सर्वस्पर्शी तपासणी करुन घ्यावी, असा आग्रह त्यांनी धरला. पण श्रीगुरुजींचा निर्धार संघ शिक्षा वर्गांचा सगळा प्रवास ठरल्याप्रमाणे पूर्ण करण्याचा होता. तूर्त प्रकृतीकडे लक्ष देण्यास त्यांच्याजवळ वेळ नव्हता. म्हणून ते निश्चित कार्यक्रमानुसार पुण्याहून पुढच्या कार्यक्रमासाठी रवाना झाले. प्रवासात असतानाच ते दिनांक १८ मे रोजी मुंबईला आले तेव्हा टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे

ख्यातनाम कॅन्सरतज्ज्ञ डॉ. प्रफुल्ल देसाई यांच्याकडून श्रीगुरुजींची तपासणी करुन घेण्यात आली. त्यांनाही कॅन्सरच्या गाठी असाव्यात असाच संशय व्यक्त केला. हे निदान ऐकल्यानंतरही श्रीगुरुजी शांतच होते. रोग किती पसरला आहे व तो बरा होऊ शकेल काय, अशी पृच्छा त्यांनी केली. डॉ. देसाई यांनी सांगितले की, शस्त्रक्रियेच्या वेळीच ते कळू शकेल. शस्त्रक्रिया करवून न घेणे म्हणजे रोग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न न करता धोका पत्करणे होय. डॉक्टरांच्या म्हणण्यावर श्रीगुरुजींनी थोडा विचार केला व शस्त्रक्रिया करवून घेण्यास संमती दिली. पण वर्गाचा नियोजित प्रवास जूनअखेर संपल्यानंतरच शस्त्रक्रिया होईल, हे निक्षून सांगितले दि. १ जुलै हा शस्त्रक्रियेचा दिवसही याचवेळी ठरला.

संघ शिक्षा वर्गांचा प्रवास सुरु झाला. एकही कार्यक्रम कोठे चुकला नाही. भाषणे, चर्चा, भेटीगाठी, हास्यविनोद हा नित्यक्रम चालू राहिला. ज्याला कॅन्सरचे जीवघेणे दुखणे झाले आहे. ते ज्याला ठाऊक आहे, लवकरच शस्त्रक्रिया ज्याच्यावर व्हावयाची आहे, असा प्राय : काळाच्या कृष्णछायेतील हा माणूस आहे, अशी शंकाही कोणाला त्यांच्या वर्तनावरुन येण्यासारखी नव्हती. यावेळी बाहेरील वातावरण देखील खळबळीचे होते. काँग्रेसची फाळणी होऊन गेलेली होती. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हाती सत्तेची सूत्रे आली होती. संघाविरुध्द त्यांनी शस्त्र उपसले होते आणि संघावर बंदी घालण्याच्या भाषेने जोर धरला होता. ठिकठिकाणी मुसलमानांचे दंगे पेट घेत होते. संघाविरुध्द अपप्रचाराचे रान पेटविण्यात आले होते. स्वयंसेवकांपुढील आपल्या भाषणात श्रीगुरुजी अविचलित चित्ताने सगळया घटनांचा अन्वयार्थ समजावून सांगत होते. आपली संघटना अधिक विशाल, सदृढ व सबल करणे हेच या अपप्रचाराला योग्य उत्तर आहे असे ते स्वयंसेवकांच्या मनावर ठसवीत. पण प्रकटपणे कोणतीही प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली नाही. प्रवासाच्या ओघात दि. ११ जुन १९७० रोजी ते दिल्लीत आले. तिथे मात्र त्यांनी ठरविले की, या अप्रचाराला प्रतिटोला हाणावयाचा. म्हणून एक पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. देशातील तसेच विदेशी पत्रकारांनी या परिषदेला गर्दी केली होती. वातावरणात एक प्रकारची जिज्ञासा होती. या पत्रपरिषदेत श्रीगुरुजींनी प्रश्नांच्या माऱ्याला शांतपणे तोंड दिले आणि आवश्यक ते सर्व खुलासे केले. संघातील संभाव्य बंदीसंबंधीच्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी सांगितले की, “ज्यांना बंदी घालावीशी वाटते, त्यांच्या हिताचे पाऊल ठरावयाचे नाही.”

कबूल केल्याप्रमाणे संघ शिक्षा वर्गांचा प्रवास संपताच दिनांक २७ जून रोजी कलकत्त्याहून गुरुजी थेट मुंबईला आले. दि. २९ रोजी तपासणी होऊन दि. ३० ला श्रीगुरुजी टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी प्रविष्ट झाले. दि. १ रोजी ९-४५ वाजता त्यांना ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले. गाठीचा एक तुकडा तपासणीसाठी पाठविण्यात आला व कॅन्सरचा निष्कर्ष पक्का होताच डॉ. प्रफुल्ल देसाई यांनी कॅन्सरग्रस्त भाग काढून टाकण्याची शस्त्रक्रिया वेगाने सुरु केली. अपेक्षेपेक्षा कॅन्सरची व्याप्ती अधिक होती. सगळया गाठी समूळ काढून टाकण्यात आल्या. ऑपरेशन सुमारे तीन तास चालू होते. छातीची डावी बाजू तर ऑपरेशननंतर फासळयांच्या खोक्याला कातडीचे केवळ आवरण असावे, तशी दिसत होती. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास श्रीगुरुजींना त्यांच्या खोलीत आणण्यात आले. त्यावेळी ते अर्धवट गुंगीतच होते. ऑपरेशननंतर सर्वसामान्यत: रुग्णांना मळमळणे, असह्य वेदना होणे वगैरे जो त्रास होतो, तो गुरुजींना झाला नाही. दुपारी ३ वाजता त्यांनी चहा देखील घेतला. दुसऱ्या दिवशी ते जेवण घेऊ लागले. द्रव पदार्थ वाहून जाण्यासाठी लावलेल्या नळया तिसऱ्या दिवशी काढून टाकण्यात आल्या. भेटीगाठीसाठी लोक येऊ लागले. थोडयाच दिवसांत

ते रुग्णाल्यात हिंडून अन्य रोग्यांची चौकशी करु लागले आणि प्रार्थनेसाठी जवळच्याच शाखेत जाणे त्यांनी सुरु केले. दरवर्षी जुलैमध्ये नागपूरला भरणारी संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक दिंनाक १० ते १२ पर्यंत मुंबईलाच भरविण्यात आली. दि. ११ रोजी थोडा वेळ श्रीगुरुजी बैठकीत जाऊन आले. असा सुमारे तीन आठवडयांचा काळ गेला. शस्त्रक्रियेची जखम झपाटयाने भरुन निघत होती. रुग्णाल्यातील वास्तव्याचे प्रयोजन संपले होते. डॉक्टरमंडळी समाधान व्यक्त करीत होती.

दि. २६ जुलै रोजी श्रीगुरुजींनी रुग्णाल्याचा निरोप घेतला. येथेही त्यांनी माणसेच माणसे जोडली होती. डॉक्टर्स, सेवक, परिचारक, अन्य कर्मचारी या सगळयांच्या सुखदु:खाची वास्तपुस्त त्यांनी सतत केली होती. निरोपप्रसंगी सगळयांच्या डोळयांत पाणी तरळले. इतर रुग्णांनाही एक आप्त आणि आधार जात असल्यासारखे वाटले, डॉ. प्रफुल्ल देसाई हे काही तसे संघाशी संबंधित नव्हते. पण श्रीगुरुजींनी ज्या प्रकारे या शस्त्रक्रियेला सहजपणाने तोंड दिले ते पाहून ते स्तिमित झाले. त्यांना जे वाटले ते एका लेखात त्यांनी शब्दबध्द करुन ठेवले आहे. डॉ. देसाई लिहितात, “पासष्ट वर्षांचे त्यांचे वय लक्षात घेता, एवढया मोठया शस्त्रक्रियेला त्यांनी ज्या प्रकारे तोंड दिले ते अगदी अद्‌-भूत होते. दुसऱ्याच दिवशी ते हालचाल करु लागले. ते दवाखान्यात तीन आठवडे होते. त्या काळात ही व्यक्ती आणि तिचे मन यांचा अभ्यास करण्याची संधी मला मिळाली... आपल्या रोगाची व्यापकता आणि त्यातून बरे होण्याची शक्यता या संबंधीची संपूर्ण वस्तुस्थिती कळावी, अशी त्यांची इच्छा होती. मी त्यांना जे आहे ते सांगितले, तसेच ते किती दिवस जिवंत राहू शकतील हेही सांगितले.

“मी जे सांगितले ते ऐकून श्रीगुरुजी उद्‌-गारले, ‘वा, फारच छान. म्हणजे अजून बराच अवधी आहे आणि मलाही पुष्कळच (काम) संपवावयाचे आहे.’ डॉक्टरला सर्व प्रकारे सहकार्य देणारे ते असामान्य रुग्ण होते. अत्यंत निर्घृण अशा रोगाच्या सर्व शारीरिक आणि मानसिक वेदनांना ज्याने धैर्याने आणि तोल न गमावता तोंड दिले, आपल्या देशाविषयीच्या ज्याच्या धारणा आणि निष्ठा अत्यंत उत्कट होत्या, आणि त्यावर जो अखेरपर्यंत अविचल राहिला, कृश आणि अशक्त शरीरयष्टी असूनही प्रचंड अशा कार्यशक्तीचा जो धनी होता, ज्याची धडाडी आणि ज्याचे अनुशासन अजोड होते आणि ज्याने अनिष्ट नेमके हेरुन शुभशक्ती जागृत केली होती, असा हा एक असामान्य पुरुष होता. अशा थोर पुरुषाचा सहवास मला अल्पकाळ तरी लाभला, हे मी माझे परमभाग्य मानतो.” ऱ्हे

रुग्णाल्यातून बाहेर पडल्यानंतर सुमारे एक आठवडा श्रीगुरुजींचे मुंबईतच वास्तव्य होते. दि. ३ ऑगस्टला त्यांनी आगगाडीने नागपूरला प्रस्थान केले. श्रीगुरुजींवरील कॅन्सरच्या शस्त्रक्रियेची आणि त्यांच्या प्रकृतीतील सुधारणेची वार्ता सर्वदूर पोहोचली होतीच. कॅन्सरचे दुखणे श्रीगुरुजींना झाले आहे ही वार्ता कळल्यापासून सगळयांना जबरदस्त धक्का बसला होता. आता मात्र सर्वत्र अशी भावना पसरली की, संकट टळले आहे आणि मृत्यूच्या दाढेतून सुटून श्रीगुरुजी नागपूरला परतत आहेत. याबद्दलचा आनंद स्वयंसेवकांनी ठिकठिकाणी तऱ्हेतऱ्हेने व्यक्त केला. श्रीगुरुजींनी मुंबई सोडण्यापूर्वी तेथे सत्यनारायणपूजेचा भव्य सोहळा झाला व सुमारे वीस हजार लोक तीर्थप्रसादासाठी येऊन गेले. नागपूरच्या मार्गावरील बहुतेक स्टेशनांवर स्वयंसेवक आणि नागरिक मोठया संख्येने श्रीगुरुजींना डोळे भरुन पाहण्यासाठी आलेले होते. श्री. बाबासाहेब घटाटे यांच्या बंगल्यावर श्रीगुरुजी नागपूरला काही काळ राहिले. दि. १३ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन महोत्सव होता. या महोत्सवात श्रीगुरुजींनी उभ्याने सुमारे ४५ मिनिटे मोठे ओजस्वी भाषणे केले. दीडच महिन्यापूर्वी एका जिवावरच्या शस्त्रक्रियेला या

पुरुषाने तोंड दिले आहे हे कोणाला खरेही वाटू नये, असे ते दृश्य होते. दि. २२ ऑगस्टला मुंबई येथे डॉ. देसाई यांनी प्रकृतीची पुन्हा तपासणी केली व समाधान व्यक्त केले. मात्र दि. २१ व २२ असे दोन्ही दिवस श्रीगुरुजींच्या अंगात ताप होता. अंगावर ताप काढण्याची त्यांना सवय असल्याने त्याकडे फारसे लक्ष त्यांनी दिले नाही. दि. २२ ला सायंकाळी पूर्वयोजनेनुसार, गोरेगाव येथे स्वयंसेवकांचे एकत्रीकरण करण्यात आले होते व तेथे श्रीगुरुजी प्रार्थनेसाठी गेले. खारच्या रामकृष्ण आश्रमात मुक्काम होता. तेथे जवळच्याच शाखेत जाण्याची सूचना त्यांनी नाकारली. प्रार्थनेच्या वेळी त्यांचा तोल जात असल्याचे व ते भिंतीचा आधार शोधत असल्याचे ध्यानात येताच डॉ. आबाजी थत्ते व अन्य एका स्वयंसेवकाने त्यांना सांभाळले. प्रार्थनेनंतर तर ते बेशुध्दीतच होते. सगळयांना हादरा बसला. यावेळी लक्षात आले की काखेत एक मोठे छिद्र पडले आहे व त्यातून पाणी व पू वाहत आहे. या 'अल्सर'वर उपचार झाले. दि. २४ ला ताप उतरला. याच दिवशी इंदूरला जाण्याचा कार्यक्रम ठरला होता. प्रवास रद्द करण्याची सूचना अर्थातच पुढे आली. ती फेटाळून श्रीगुरुजी निघाले व दि. २५ ला इंदूरला पोहोचले.

इंदूर येथे सुप्रसिध्द आयुर्वेदतज्ज्ञ आणि प्रांतसंघचालक पं. रामनारायणजी शास्त्री यांच्या देखरेखीखाली ते एक महिना राहिले. त्यांचे गुरुबंधू श्री अमूर्तानंदजी महाराज सोबतीला होते. श्रीगुरुजींच्या डाव्या हाताची सूज कोणाच्याही चटकन ध्यानात येत होती. ज्या विवेकानंद शिला स्मारकाच्या कामाला श्रीगुरुजींनी चालना दिली होती ते स्मारक यशस्वीरीत्या पूर्णतेला गेले होते आणि कन्याकुमारी येथे राष्ट्रपती गिरी यांच्या हस्ते दि. ४ सप्टेंबर १९७० रोजी स्मारकाचे समारंभपूर्वक उद्-घाटन झाले. या प्रसंगी उपस्थित राहण्याची श्रीगुरुजींची फार इच्छा होती. पण ते अशक्य झाले. दि. २४ ऑगस्टला मुंबईला परतून त्यांनी डॉ. प्रफुल्ल देसाई यांना पुन्हा प्रकृती दाखविली. डॉक्टरांनी समाधान व्यक्त केले. हातावरील सूज हे ऑपरेशनच्या यशाचेच चिन्ह आहे, असा दिलासा दिला. शक्य तेव्हा मुंबईला येऊन तपासणी करुन घेत चला आणि जखमेचे ड्रेसिंग वगैरे नियमितपणे करा असे सांगितले. प्रवासादी नित्य कार्यक्रम बेताबेताने सुरु करण्यास संमती दिली. या संमतीचीच प्रतीक्षा श्रीगुरुजी करीत होते. आपल्याला यापुढे कामासाठी 'मुदत' राहील हे त्यांना कळले होते. त्यांना कामे संपविण्याची घाई झाली होती. काळाशी त्यांची अक्षरश : शर्यत सुरु झाली. इतर सर्वजण मात्र डॉक्टरी अभिप्रयाने हर्षित झाले होते व कार्यक्षेत्रातील श्रीगुरुजींच्या पुनरागमनाचा आनंद मानत होते.

श्रीगुरुजी दि. २९ सप्टेंबर रोजी नागपूरला आले आणि पत्रव्यवहार, शाखा, भेटीगाठी वगैरेंत नित्याप्रमाणे त्यांचा वेळ जाऊ लागला. प्रकृतीबद्दलच्या चौकशीला 'माझी प्रकृती चांगली आहे. चिंता करु नये' हे त्यांच आश्वासक उत्तर असे, या वेळच्या कितीतरी पत्रांत त्यांनी हेच वाक्य लिहिले आहे. या मुक्कामात नागपूरचा विजयादशमी महोत्सव सरदार पटेलांचे विश्वासू कार्यवाह (निवृत्त) श्री. व्ही. शंकर यांच्या अध्यक्षतेखाली दि. ९ व १० ऑक्टोबरला उत्साहात पार पडला. नेहमीच्या संकेतानुसार दोन्ही दिवशी श्रीगुरुजींनी भाषणे केली. या भाषणात परचक्राच्या संभाव्य संकटांचा इशारा त्यांनी दिला आणि अंतर्गतदृष्टया राष्ट्र बलवान करण्याची निकड प्रतिपादन केली. नागपूरची उर्वरित कामे उरकून दि. २३ रोजी त्यांनी प्रवासाचे प्रस्थान ठेवले. अतिशय शांत व प्रसन्न चित्ताने! तत्वज्ञान लोकांना सांगणे सोपे असते, पण स्वत:वर प्रसंग आला म्हणजे मी मी म्हणणारेही खचून जातात. श्रीगुरुजींनी मात्र त्यांचा सगळा आवडता वेदांत जीवनात उतरविलेला होता. शस्त्रक्रियेनंतर रुग्णालय सोडताना ते काय बोलले हे डॉ. देसाईनीच सांगितले आहे. डॉक्टरांना श्रीगुरुजी म्हणाले होते, "मर्त्य मानवाने आपल्या स्वास्थ्याची अनाठायी चिंता वाहत बसण्याचे कारण नाही. जे जीवजात आहे, ते नष्ट

होणारच. माणूस किती जगला यापेक्षा तो कसा जगला याला महत्व आहे. माझ्यासमोर एक कार्य आहे; म्हणून परमेश्वराला माझी अशी प्रार्थना आहे की, त्याने मला शेवटपर्यंत चांगले ठेवावे." यानंतर श्रीगुरुजींच्या जीवनाचे जे अंतिम पर्व सुरु झाले त्यात आपल्याला असे दिसेल की, मरणाचे समरण ठेवून एकेक क्षण त्यांनी 'कामे संपविण्यात' व्यतीत केला. ज्या शरीराकडून कामच होऊ शकणार नाही, अशा शरीरासंबंधी आसक्ती तर त्यांना कधी नव्हतीच.

शस्त्रक्रियेनंतर केवळ चार महिन्यांच्या आतच त्यांनी अंगीकारलेल्या पहिल्या प्रवासाचा धडाका पाहिला म्हणजे त्यांच्या 'घाई' ची कल्पना येते. दि. २३ ऑक्टोबर ते ७ डिसेंबर असा या प्रवासाचा काल होता. म्हणजे एकूण ४५ दिवस. या ४५ दिवसांतील ही भरारी पाहा. तीन दिवस मुंबई, तीन दिवस बंगलोरला प्रांत प्रचारकांची बैठक, तीन दिवस नाशिक, तीन दिवस पुणे, पुन्हा चार दिवस मुंबई, नागपुरला धावता मुक्काम व लगेच दिल्ली, मुंबईमार्गे कर्नाटकातील हुबळी व बंगलोर. आंध्रातील हैदराबाद. तीन दिवस विश्व हिंदू परिषदेच्या महाराष्ट्र प्रांतिक अधिवेशनासाठी पंढरपूर. सोलापूरवरुन मुंबई आणि परत नागपूर. या प्रवासात सर्वत्र बैठकी, प्रकट भाषणे, आखणी, उसंत नाहीच, दिल्लीच्या मुक्कामात दि. १२ नोव्हेंबर रोजी रामलीला मैदानावर दहा हजार गणवेशधारी स्वयंसेवकांच्या भव्य मेळाव्यात श्रीगुरुजींचे भाषण झाले. सायंकाळी सुमारे दीड हजार प्रतिष्ठित नागरिकांच्या समुदायात श्रीगुरुजींचे स्वागत झाले. श्रीगुरुजी कॅन्सरने आजारी आहेत व त्यांच्या अनुयायांत सरसंघचालक-पदासाठी स्पर्धा सुरु झाली आहे, अशा आशयाच्या सनसनाटी बातम्या विशेषत: कम्युनिस्ट मतप्रणालीच्या वृतपत्रांनी प्रसिध्द केल्या होत्या. प्रतिष्ठित नागरिकांशी बोलताना विनोदाने श्रीगुरूजी म्हणाले, "मी जिवंत आहे, संघविरोधकांच्या इच्छा फलद्रूप झाल्या नाहीत, याबद्दल मला खेद होत आहे." शस्त्रक्रियेनंतर झालेली श्रीगुरूजींची ही पहिलीच भेट दिल्लीकरांना मोठी आनंदमय वाटली. खूप लोक व्यक्तिश : श्रीगुरूजींना भेटून गेले. दिड महिन्याच्या प्रवासाचा हा आलेख सांगण्याचे प्रयोजन एवढेच की, त्यांच्या हालचालींचा झंझावती वेग ध्यानात यावा. डॉ. देसाई यांनी श्रीगुरूजींना नेमका किती काळ सांगितला होता कोणास ठाऊक. पण कोणती कामे पार पाडणे आवश्यक आहे याची योजना ठरवून तिचा अंमल ते जारीने करीत होते यात शंका नही. मार्च १९७३ पर्यंत ते अखंड कामात बुडून गेले हेते. ठरविलेले प्रवास शर्थीने पार पाडत होते. अपवाद झाला तो १९७२ च्या उत्तरार्धात. महाकोशल, महाराष्ट्र आणि विदर्भ या तीन प्रांतांचा प्रवास अशक्य झाला एवढाच. यावेळी उपचारांची प्रतिक्रीया म्हणून गळा दुखणे, खातापिता न येणे, बोलणेही कठीण होऊन बसणे वगैरे त्रास होता. या संबंधात महाराष्ट्राचे प्रांतसंचालक श्री. बाबाराव भिडे यांना लिहिलेल्या पत्रात श्रीगुरूजींनी म्हटले आहे, "तीन प्रांतांचा प्रवास राहून गेला. त्याची भरपाई कशी व केव्हा करता येईल हे पाहण्यास डॉ. आबा थत्ते यांना सांगितले आहे. इतर प्रांतांच्या प्रवासाची फेरआखणी करून या तीन प्रांतांसाठी वेळ काढावा लागेल." प्रवास रद्द झालेला श्रीगुरूजींना कधीच आवडत नसे. पण यावेळी नाईलाजच झाला होता.

योगायोग असा कि श्रीगुरूजी स्वत: काळाशी शर्यत खेळत होते. जीवनाचा प्रत्येक उर्वरित क्षण कामाला प्रचंड उठाव देण्यासाठी खर्च व्हावा म्हणून तळमळत होते. परंतू याच अवधीत देशभरातील अनेक जुने सहकारी आणि प्रिय व्यक्ति यांचा चिरवियोग सहन करण्याचे दु:खद प्रसंग त्यांच्यावर वारंवार येत गेले. आघातामागून आघात होत गेले. जुलै १९७० ते मार्च १९७३ या कालाखंडात मृत्यू पावलेल्या काही आप्तांची, कार्यकर्त्यांची आणि सुहृदांची ही नमावली पहा : तंजावरचे

एक प्रमुख कार्यकर्ते श्री. मुकूंदन, मध्यभारतातील श्री. छोटूभय्या सहस्त्रबुध्दे व श्री.दादा सोवनी, जबलपूरचे आप्त श्री. वासुदेवराव गोळवलकर, कलकत्त्याचे श्री. संजीव नंदी, सोलापूर जिल्हयातील सत्पुरूष बाबा महाराज आर्वीकर, खांडव्याचे श्री. भाऊसाहेब बेडेकर, रिपब्लिकन पक्षाचे नेते श्री. दादासाहेब गायकवाड, नागपुरचे श्रेष्ठ कार्यकर्ते पं. बच्छराजजी व्यास, जम्मूचे भीष्माचार्य पं. प्रेमनाथजी डोग्रा, मुंबईचे श्री. आबासाहेब हेळेकर, संघाचे फार जुने कार्यकर्ते व प्रचारक श्री. भय्याजी शहादाणी, नंदूरबारचे श्री.बाळासाहेब पत्की, नैरोबीचे श्री. मुल्कराज शर्मा, पंजाबचे दिवाण शांतीस्वरूप, खामगावचे जिल्हा संघचालक श्री. नानासाहेब भागवत, नागपूरचे प्रल्हादपंत आंबेकर, नाशिकचे श्री. रत्नपारखी, अमृतसरचे श्री. आत्मराम नंदा, इत्यादी.  याखेरीज ज्या कार्यकर्त्यांशी श्रीगुरूजींचा कौटुबिक जिव्हाळयाच संबंध होता, अशांच्या घरी कोणाची आई, कोणाचा मुलगा, कोणाचे वडील, कोणाची पत्नी वारल्याचे दु:खद प्रसंग तर कितीतरी.  या उभय स्वरूपाच्या मालिकांतील सर्वांत दारूण आघात श्री. बाबासाहेब आपटे यांच्या आकस्मिक मृत्यूचा.  रात्रीच्या वेळी शांतपणे अंथरूणावर झोपल्या झोपल्याच बाबासाहेबांनी परलोकचा प्रवास सुरू केला होता.  बाबासहेब म्हणजे संघाचे पहिले प्रचारक. गाढे व्यासंगी, महान कर्मयोगी, प्रारंभापासून डॉ. हेडगेवार यांच्याबरोबर कार्य केलेले ज्येष्ठ आणि अनुभवी कार्यकर्ते. देशभर त्यांचा संचार, बाबासाहेबांचा दि. २७ जुलै १९७२ रोजी मृत्यू झाला, त्यावेळी श्रीगुरूजी नागपुरात नव्हते.  ते इंदूरला होते आणि प्रयत्न करूनही अंत्यदर्शनासाठी येणे त्यांना शक्य झाले नाही.  हा आघात असहनीय असल्याचा उल्लेख श्रीगुरूजींच्या पत्रात आढळतो.  प्रत्यक्ष संघकार्यातील बाबासाहेब आपटे, भय्याजी शहादाणी, पं. बच्छराजजी व्यास असे मोहरे थोडया थोडया अंतराने हरपल्यामुळे होणारी वेदना अपुरी वाटली म्हणूनच की काय, संघाबाहेर धार्मिक क्षेत्रांत ज्यांच्यावर श्रीगुरूजींचे अकृत्रिम प्रेम होते, असे श्री. हनुमानप्रसादजी पोद्दारही याच अडीच वर्षांच्या काळात (मार्च १९७१) स्वर्गवासी झाले.  श्रीगुरूजी त्यांना भाई म्हणत.  भाईजी 'कल्याण' मासिक व गोरखपूरच्या गीता प्रेस या श्रेष्ठ सांस्कृतिक संस्थेचे चालक.  त्यांच्या मृत्यूने निर्माण झालेली पोकळी श्रीगुरूजींना फार जाणवली.

अशा सर्व मृत्यूंची दखल श्रीगुरूजींनी पत्रद्वारा अथवा प्रत्यक्ष कुटूंबियांना भेटून घेतली. सांत्वनपर आणि दु:खात सहभागी असल्याची पत्रे श्रीगुरूजींना शेकडयांनी लिहावी लागली.  स्वत:च स्वत:च्या आयुष्याचे दिवस मोजत कामाचा रगाडा उपशीत असताना आणि कार्याची मजबूत बांधणी करण्यासाठी धडपडत असताना हा एकेक दुर्धर आघात श्रीगुरूजींनी कसा सोसला असेल? असे वाटते की, आपल्या देहासंबंधी एक विलक्षण अलिप्तता त्यांच्या मनात वसत होती.  जे अटळपणे जायचेच आहे, त्या शरीरापासून ते आतून विलग झाले होते व केवळ एक साधन या नात्याने त्याचा जास्तीत जास्त कार्यपोषक वापर करून घेत होते.  पंजाब प्रांताचे सहसंघचालक श्री. धर्मवीरजी यांनी पत्राद्वारे श्रीगुरूजींच्या प्रकृतीची भावविवश शब्दांत चौकशी केली तेव्हा श्रीगुरूजींनी त्यांचे समाधान व्हावे म्हणून लिहिले. "आपले माझ्यावर जे अपार प्रेम आहे, त्यामुळे आपण काळजीत पडला आहात.  कृपा करून आपल्या या उत्कट भावनांवर संयम ठेवा आणि सगळी चिंता मनातून काढून टाका.  लवकरच मी प्रवासार्थ बाहेर पडू शकेन व आपल्या सुखद सहवासाचाही योग येईल."

याच काळात कोणत्या ना कोणत्या निमित्ताने अनेक तीर्थक्षेत्रे आणि देवस्थाने येथे श्रीगुरूजी जाऊन आले.  कितीतरी सत्पुरूषांच्या भेटी त्यांनी घेतल्या.  कर्करोगावरील शस्त्रक्रियेपूर्वी १९६८ साली बद्रीनारायणचा प्रवास तेथील संकीर्तन भवनाचे उद्घाटन करण्याच्या निमित्ताने त्यांनी केला होता.  या

प्रवासात प्रयागनजीक झूंसी येथील आश्रमाचे प्रमुख श्री. प्रभूदत्त ब्रम्हचारी हे श्रीगुरूजींबरोबर होते. ब्रह्मचारीजींचा श्रीगुरूजींवर अतिशय लोभ होता. त्यांचा श्रीगुरूजींशी पत्रव्यवहारही असे. अंतिम दिवसांत श्रीगुरूजींनी दि. ५ मे १९७३ रोजी ब्रह्मचारीजींना लिहिलेले पत्र अत्यंत हृदयंगम आहे. बद्रीनाथनारायणाच्या या प्रवासातच ब्रह्मकपाल येथे श्रीगुरूजींनी स्वत:चे श्राध्द स्वत:च्याच हातांनी उरकून घेतले होते. या प्रवासात श्रीगुरूजींच्या दृष्टीने अत्यंत आनंददायक लाभ म्हणजे ब्रह्मचारीजींच्या मुखातून त्यांना भागवत-कथेचा काही भाग ऐकावयास मिळाला होता. कथा ऐकताना त्यांचे डोळे प्रेमाश्रूंनी भरुन येत असत, अशी आठवण संघाचे सध्याचे सरसंघचालक श्री. रज्जूभय्या यांनी नोंद करून ठेवली आहे. १९७१ च्या ऑक्टोबरमधील महाराष्ट्र प्रदेश दौऱ्यात त्यांनी कोल्हापूर, तुळजापूर, जालन्याजवळील श्रीराम, वेरूळ येथील घृष्णेश्वर इत्यादी ठिकाणी देव-देवतांची दर्शने घेतली, तर स्वामी स्वरूपानंद, श्री. बाबामहाराज आर्वीकर, श्री. नाना महाराज तराणेकर आदी सत्पुरूषांची भेट घेतली. स्वामी स्वरूपानंद यांच्याशी झालेल्या भेटीनंतर श्रीगुरूजी अतिशय प्रसन्न होते आणि त्यांच्या मुखंडमंडलावर कृतार्थतेचे तेज प्रकटले होते, असे त्यावेळी त्यांच्या समवेत असलेली मंडळी सांगतात.

महाराष्ट्रातच नव्हे तर गोव्यात आणि अन्यत्रही अनेक देवस्थानांत ते गेले व ख्यातनाम संतपुरूषांना ते आवर्जून भेटले. पाँडिचेरी येथील अरविंदाश्रमात जाऊन माताजींचे दर्शन त्यांनी १९७२ च्या मार्चमध्ये दिनांक ११ रोजी घेतले. या दर्शनाचा अतिशय भावपूर्ण उल्लेख नंतर श्रीगुरूजींनी केलेला आहे. ही भेट अगदी नि:शब्द होती. एक लक्षणीय धार्मिक कार्यक्रम दिनांक २३ मार्च १९७२ रोजी कानपूरच्या दीनदयाळ स्मारक विद्यालयात झाला. तिथे सहा फुट उंचीच्या तांब्याच्या व उभ्या हनुमान मूर्तीची विधिवत् प्राणप्रतिष्ठा श्रीगुरूजींच्या हस्ते करण्यात आली. सोवळे नेसून मूर्तीची विधिवत् प्राणप्रतिष्ठा श्रीगुरूजींच्या हस्ते करण्यात आली. सोवळे नेसून आणि पूजा, होमहवनादी विंधीसह हा कार्यक्रम श्रीगुरूजींनी संपन्न केला. याच उत्सवात सायंकाळी त्यांचे 'परिपूर्ण मानव' या विषयावर फार संस्मरणीय भाषण झाले. हे भाषण ऐकून एक वयोवृद्ध गृहस्थ उद्-गारले, "मला आज ज्ञानाच्या महासागराचे दर्शन झाले." या वर्षी विजया एकादशीचा वाढदिवस दि. २१ मार्चला झाला. त्या दिवशी मद्रासला रामकृष्ण आश्रमातच ध्यान, नामस्मरण व प्रार्थना यांत त्यांनी तो घालविला. श्रीगुरूजी संघकार्यात पडल्यानंतर त्यांना एकांत असा मिळत नसे. समष्टिरूप भगवंताची अहर्निश अर्चना ते करीत. पण अखेरच्या दिवसात अनंताकडे त्यांची ओढ वाढली असावी. जे काम करण्याचा आदेश त्यांना मिळाला होता, ते काम त्यांनी सर्वस्व ओतून तत्वज्ञान आणि व्यवहार अशा दोन्ही परस्परपूरक अंगांनी खणखणीत नाण्यासारखे बनविले होते. आता शरीराची खोळ गळून पडण्याची वेळ समीप दिसू लागल्यानंतर कामाचा अंतिम झपाटा सुरू असताना भगवंतही त्यांना खुणावत असावा. देहाची पीडा असली तरी आत्मानंदाची त्यांची अनुभूती अविच्छिन्न होती, अशा कितीतरी खुणा त्यांच्या लिहिण्या-बोलण्यातून आपल्याला उपलब्ध होतात. योग संमेलनाला शुभचिंतन करणारे श्रीगुरूजींचे या सुमाराचे एक पत्र फार बोलके आहे. ते लिहितात, "सर्वाहून श्रेष्ठतम म्हणजे मन निर्विकार करण्याची, मनाला सर्व प्रकारे रिक्त करण्याची शक्ती प्राप्त झाली म्हणजे अंत:करण नित्य उत्साहपूर्ण, सक्षम राहून थकवा वा कंटाळा न येता उदंड कार्य करण्याची क्षमता येते व मानवी जीवनाचे देवदुर्लभ लक्ष्य प्राप्त होऊन अक्षय्य प्रसन्नता व अखंड आनंद यांची उपलब्धी होते." हे शब्द नि:संशय अनुभूतीतूनच आलेले आहेत. देहत्यागापूर्वी एक महिना त्यांनी श्री. प्रभूदत्त ब्रह्मचारी यांना लिहिलेल्या पत्राचा उल्लेख आधीच आला आहे. त्या पत्रातील काही वाक्ये त्यांच्या अखेरच्या दिवसंतील मानसिक अवस्थेवर उत्कृष्ट प्रकाश टाकतात. त्यांनी लिहिले आहे, "आपल्या मुखातून

भगवान श्रीकृष्णाचे लीलाचरित्र संपूर्ण ऐकण्याएवढे भाग्य माझे नाही. पण मनोमन भगवंताचे स्मरण करीत असतो. दुसरे काही काम नाही, हे माझे भाग्यच... आरामखुर्चीवर पडल्या पडल्या नामस्मरणाचा आनंद घेत असतो. नाहीतर 'प्रयाणकाले कफवातपित्तै:, कंठावरोधे स्मरणं कुतस्ते' अशा अवस्थेत जीवननौका बुडून जावयाची."

न बुध्दिभेद जनयेत् आज्ञानां कर्मसंगिनाम्' असे गीतावचन आहे. संघाच्या स्वयंसेवकांनी त्याचे स्मरण ठेवून सर्वत्र सद्-भावनांचे पोषण करावे, असे श्रीगुरूजींना वाटे. विशेषत: भगवद्-भक्ती ही व्यक्तीत आणि समाजात शुध्दपणाचा प्रादुर्भाव करू शकणारी मोठी शक्ती आहे, असा अभिप्राय त्यांनी वारंवार व्यक्त केलेला दिसतो. स्वयंसेवकांनी कोणाच्या ईश्वरभक्तीची टवाळी केलेली त्यांना आवडत नसे. आध्यात्मिकतेवर त्यांची विलक्षण श्रध्दा होती आणि हिंदू पुनरूत्थानाचा त्यांना तो शाश्वत आधार वाटत होता. अन्य कितीही मतभेद असले तरी कोणाच्या ईश्वरभक्तीसंबंधी एकदम अनुदार उद्-गार स्वयंसेवकाने काढल्यास ते नाराज होत. एका लहानशा घटनेवरून हे स्पष्ट होईल. १९७२ मध्ये उन्हाळयात संघ शिक्षा वर्गानिमित्त ते मदुरा येथे गेले होते. अनौपचारिक वार्तालापात कोणीतरी असा शेरा मारला की, श्रीमती गांधींचे तिरूपतीला जाऊन दर्शन घेणे म्हणजे मते मिळविण्यासाठी केलेला निव्वळ देखावा आहे. ही टीका 'अनुदार' (अन्चॅरिटेबल) आहे असे बजावून ते म्हणाले, "श्रीमती गांधींवर अशा प्रकारचे उदात्त संस्कार झाले आहेत. त्यांच्या आई श्रीमती कमला नेहरू या अत्यंत श्रध्दावान होत्या. त्या नित्यनेमाने बेलूर मठात जात असत व लहानग्या इंदिरेला त्या आपल्याबरोबर नेत असत. अनेक ज्येष्ठ स्वामींना ही गोष्ट माहित आहे. आपला समाज धर्मप्रवण आहे व श्रीमती गांधींनी तिरूपतीच्या मंदिरात जाऊन देवतेची परंपरागत पध्दतीने अर्चना केली. हे करून त्यांनी जनतेची आध्यात्मिक श्रध्दा दृढ करण्याचे लोकनेत्याचे कर्तव्यच बजावले." राजकीय स्पर्धेचा स्पर्शही न झालेल्या निर्वैर आणि निर्मळ अंत:करणातूनच असे उद्-गार निघू शकतात. पं. नेहरू परदेशाच्या प्रवासात इंदिरा गांधींना बरोबर नेतात हा आक्षेपही पूर्वी श्रीगुरूजींनी अनुदार ठरविल्याचे व अत्यंत सहृदयपणे पंडितजींच्या जीवनाचा विचार मांडल्याचे प्रसिध्दच आहे.

श्रीगुरूजींवरील शस्त्रक्रियेनंतरच्या या अडीच वर्षांच्या कालखंडात देशामध्ये मोठया ऐतिहासिक घटना घडल्या आणि त्यांचेही अवधान श्रीगुरूजींना सतत ठेवावे लागले. किंबहुना, त्यांच्या प्रत्येक प्रवासात सभोवारच्या राष्ट्रीय परिस्थितीचा स्पष्ट निर्देश करूनच ते कार्यकर्ते, स्वयंसेवक अथवा संघाबाहेरील नागरिक यांच्यापुढे संघाचा विचार मांडीत आणि संघकार्याची निकड पटवून देण्याचा प्रयत्न करीत. विशिष्ट हितसंबंधी गटाचा विरोध, टीका अथवा अपप्रचार यांमुळे विचलित न होता सर्वसामान्य हिंदू माणसातील सद्-भाव, मातृभूमीवरील भक्ती आणि परंपरेला शोभेशा गौरवाची आकांक्षा ते आपल्या वाणीने जागृत करीत. संघ - बंदीची भाषा बोलणारांना त्यांनी गप्प बसविले होते आणि अनेक अपक्ष विचारवंतांनी संघाचा कैवार घेऊन सरकारी धोरणाचे वाभाडे काढणारे मतप्रदर्शन केले होते, त्यांत भूतपूर्व सेनापती जनरल करिअप्पा, हिंदुस्थानी आंदोलनाचे मतप्रदर्शन केले होते, त्यांत भूतपूर्व सेनापती जनरल करिअप्पा, हिंदुस्थानी आंदोलनाचे श्री. मधू मेहता, फिनान्शिअल एक्सप्रेसचे श्री. गो.म. लाड प्रभृतींचा समावेश आहे. श्री लाड तर म्हणाले की, 'संघ म्हणजे शंभर नंबरी सोने आहे.' (R.S.S. is pure gold) बंदीचे राजकारण त्यावेळी अधिक पुढे जाऊ शकले नाही आणि डळमळीत बहुमत असलेल्या संसदेचे विसर्जन करून नव्या निवडणूकांची घोषणा डिसेंबर १९७०च्या प्रारंभी झाल्यानंतर तर तिकडेच संगळयांचे लक्ष लागले. या निवडणुकीत

इंदिराजींच्या पक्षाला नेत्रदिपक विजय मिळाला. विरोधी पक्ष दारूण पराभवाने सुन्न होऊन गेले. निवडणुकीतील राजकीय पक्षांच्या जयपराजयाचे सुखदु:ख श्रीगुरूजींना नव्हते. त्यांना मनापासुन खेद याच गोष्टीचा होता की, निवडणुकीतील प्रचार अत्यंत हीन पातळीवरून केला जातो, कटुता पराकोटीची वाढते. लाचलुचपतीला धरबंध राहत नाही. "याने राष्ट्राची शक्ती, नैतिकता व राष्ट्रभावना खच्ची होत असल्याने ही वागणूक निवडणुकीच्या स्वार्थापायी करणे, खरे म्हटले तर राष्ट्रदोह, देशद्रोह होय, याचा विचार करताना कोणी आढळत नाही." ही त्यांची व्यथा होती. अशा वातावरणाला अनुलक्षून संघकार्याची आवश्यकता पटवून देताना एका कार्यकर्त्याला त्यांनी लिहिले, "हे सगळे पाहून आपल्या जबाबदारीची जाणीव तीव्रतेने होते. हे विषाक्त वातावरण शुध्द करून देशाला एकसंध आणि समर्थ बनविण्याची क्षमता आपल्या संघकार्यातच आहे. म्हणून त्यात शक्तिसर्वस्व ओतून वातावरण निर्दोष बनविण्यासाठी घरोघर एकेक व्यक्तिपर्यंत पोहोचून शुध्द राष्ट्रीय भाव जागविण्याचे, तसेच सगळयांना एका सूत्रात गुंफून राष्ट्र शक्तिमान आणि उन्नत करण्यचे आपले काम जीव ओतून करणे अत्यंत आवश्यक आहे."

निवडणूकीचा गदरोळ शांत झाला त्यावेळी असे दिसत होते की, नव्या पाकिस्तानी संकटाची अभ्रे डोक्यावर गोळा होत आहेत. पाक लष्करशहा याह्याखान याने पूर्व पाकिस्तान (आताचा बांगला देश) पाशवी अत्याचारांचे थैमान चालू केले आणि परिणामत: हजारो विस्थापित भारताच्या आश्रयाला येऊ लागले. निर्वसितांचा दु:सह बोजा भारतावर निर्माण झाला. तो दिन-प्रतिदिन वाढतच गेला. अवामी लीगच्या सशस्त्र प्रतिकाराने यादवीसदृश परिस्थिती पूर्व पाकिस्तानात निर्माण झाली. हा गुंता अखेर रणांगणावरच सुटेल अशी शक्यता दिसू लागली होती. या पार्श्वभूमीवर संघ शिक्षा वर्गाचा प्रवास श्रीगुरूजींनी यावर्षी (१९७१) सुरू केला व त्यांच्या सर्व ठिकाणच्या भाषणांत पूर्वेकडील परिस्थितीचे पडसाद उमटल्याचे स्पष्ट दिसते. २८ जूनला प्रवास संपवून श्रीगुरूजी नागपूरला परतले, त्यावेळी तर परिस्थितींचे गांभीर्य चांगलेच वाढले होते. निर्वासितांची संख्या ३० लाखांपर्यंत गेली होती. तेव्हा संघाच्या प्रेरणेने पूर्वीच निर्माण झालेल्या 'वास्तुहारा सहायक समिती' तर्फे विस्तापितांसाठी शिबिरे, धान्य, वस्त्रे, वगैरेंची तरतूद राष्ट्रव्यापी पातळीवर करण्यात आली. दि. ८-९-१० जुलै १९७१ रोजी झालेल्या केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या बैठकीत बांगला देशाच्या परिस्थितीसंबंधी ठराव करण्यात आला. सरकारने आश्वासनांची पूर्ती करावी अशी मागणी या ठरावात करण्यात आला. लष्करी कारवाईने अवामी लीगला पाठिंबा द्यावा, पुर्व पाकिस्तान याह्याखानाच्या जोखडातून मुक्त करावे व विस्थापितांना त्यांच्या ठिकाणी परत पाठवावे, ही मागणी देशात जोर धरू लागली. श्रीगुरूजींनी सावध राहून शक्य असेल त्या मार्गाने आपल्या देशाचे संरक्षण करण्याच्या प्रयत्नात सहभागी होण्याचे आवाहन सर्व बंधूंना केले होते. त्यानुसार सर्व स्वयंसेवक सावध आणि आपआपल्या क्षेत्रांत जनतेच मनोबल टिकवून ठेवण्यासाठी दक्ष होते. ऑक्टोबरमध्ये पंजाबात केलेल्या प्रवासात श्रीगुरूजींना दिसले की, लोकांचे मनोधैर्य उत्तम आहे. स्वयंसेवक सर्व परिस्थितीची खडा न् खडा माहिती ठेवीत होते. सैन्य सुसज्ज होते.

अखेर ३ डिसेंबरला पाकिस्तानचे आक्रमण सुरू झाले. यावेळी नागपूरला तरूण स्वयंसेवकांचे शिबिर सुरू होते. तेथूनच श्रीगुरूजींनी स्वयंसेवकांना आणि समाजाला उद्देशून एक वक्तव्य प्रसारित केले. त्याच्या लक्षावधी प्रती स्वयंसेवकांनी घरोघर जाऊन वाटल्या आणि युध्दप्रयत्नांच्या संबंधात मोठी जागृती घडवून आणली. दि. ४ डिसेंबर १९७१ च्या या पत्रकात श्रीगुरूजींनी म्हटले : "युध्दाचा

काळ आहे. आक्रमक शत्रुसेना आपल्या सीमेवर येऊन धडकल्या आहेत. या संकटाचे गांभीर्य ओळखून सत्ताधारी व अन्य सर्व पक्षांच्या नेत्यांनी आपआपला पक्षीय दृष्टीकोन सोडून एकराष्ट्र - भावनेने प्रेरित होऊन एकत्रित यावे. या प्रकारे संघटितपणे आक्रमणाचा सामना करून आपल्या राष्ट्राला विजयी करावे, हे सर्व लोकांनी नीट समजावून घेतले पाहिजे. पक्षनिरपेक्ष दृष्टीने केवळ राष्ट्रहिताचेच सदैव चिंतन करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर्व स्वयंसेवकांनाही हेच आवाहन आहे." नागरिकांनी कशाप्रकारे युध्द प्रयत्नांत सहकार्य द्यावे यासंबंधी उपयक्त मार्गदर्शनही श्रीगुरूजींच्या या पत्रकात आढळते. प्रत्यक्ष युध्दाला तोंड लागल्यानंतर हे निवेदन आवश्यकच होते. पण तत्पूर्वीही, १९७० मधील विजयादशमीपासूनच नागरिकांना व स्वयंसेवकांना श्रीगुरूजी सावध करीत होते आणि एक राष्ट्र या नात्याने संघटित स्वरूपात उभे राहण्याचे आवाहन करीत होते. दि. १० ऑक्टोबरला नागपूरच्या विजयादशमी महोत्सवात, दि. २२ नोव्हेंबर रोजी दिल्लीला संघस्वयंसेवकांच्या मेळाव्यात, ८ जुलै १९७१ रोजी नागपूरच्या गुरूपोर्णिमा उत्सावात, दिनांक २४ ऑक्टोबर रोजी जम्मूच्या प्रकट सभेत, दि. २६ नोव्हेंबर रोजी जयपूरच्या सार्वजनिक कार्यक्रमात श्रीगुरूजींनी केलेली भाषणे पाहिली तरी परिस्थितीचा वेध त्यांनी किती अचूकपणे घेतला होता, याची कल्पना येईल. एक अंदाज असा आहे की युध्दप्रयत्नाला सहकार्य देण्याच्या कामी देशभरातील सुमारे दोन लक्ष स्वयंसेवक गुंतलेले होते. सैन्याची पिछाडी सांभाळण्याच्या कामी त्यांनी प्रयत्नांत कोणतीही कसूर ठेवली नाही.

३ डिसेंबरला सुरू झालेले युध्द, ढाक्यातील पाक सेनेच्या शरणागतीनंतर दि. १६ रोजी तडकाफडकी समाप्त झाले. या युध्दात भारतीय सेनाधिकाऱ्यांनी दाखविलेल्या स्वतंत्र प्रतिभेचे व त्यांनी यशस्वीपणे अंगीकारलेल्या रणनीतीचे श्रीगुरूजींना खरोखरच कौतुक वाटले. ज्या तडफेने ढाक्याचा पाडावा झाला. ती तडफ सगळया आधुनिक जगाला स्तिमित करून सोडणारी होती. आपल्या सेनादलांवर श्रीगुरूजींचा अपार विश्वास होता. अमेरिकेच्या सातव्या आरमाराने संघर्षात हस्तक्षेप केला असता तर काय झाले असते या संबंधी बोलताना श्रीगुरूजी नि:शंकपणे म्हणाले होते, "तर भारतीय सेनेच्या शस्त्राचा प्रहार किती प्रखर व प्रचंड आहे, याचा अनुभव अमेरिकेला आला असता." बांगला देश स्वतंत्र झाला या घटनेचे श्रीगुरूजींनी स्वागत आवश्य केले, पण हुरळून जाऊन बेसावध होणे हिताचे ठरणार नाही असा इशारा दूरदर्शीपणाने त्यांनी दिला. योगायोग असा की पाकिस्तानी सैन्याने बांगला देशात शरणागती पत्करल्याची वार्ता आली त्यावेळी श्रीगुरूजी बंगलौर येथे एका पत्रपरिषदेत बोलत होते. पत्रकारांनी युध्दासंबंधी व सभाव्य भावी घटनांसंबंधी श्रीगुरूजींवर तासभर प्रश्नांचा अखंड मारा केला. श्रीगुरूजींनी प्रसन्नपणे सगळया प्रश्नांना उत्तरे दिली. सारीच उत्तरे अगदी रोखठोक व नि:संदिग्ध होती. अन्यत्र एके ठिकाणी श्रीगुरूजींनी सांगितले की पाकिस्तानची दोन शकले झाली यात हर्षोन्माद होण्यासारखे काही नाही. इतिहास सांगतो की पूर्वी आपल्या देशात बहामनी राज्यांचे पाच तुकडे झाले होते. पण त्या सगळयांचाच रोख हिंदू सत्तेविरूध्द होता. १९७१ नंतर बांगला देशात कसकशी परिवर्तने झाली व तेथील लोकशाही आणि सेक्युलॅरिझम् यांचा मुडदा पाडून आज कोणत्या धोरणाने लष्करी हुकूमशहा पावले उचलीत आहेत हे आपण पाहतोच आहोत. तिकडील हिंदू निर्वासितांची आवक थांबलेली नाही. मुस्लिमांची घुसखोरीही चालू आहे. बांगला देशाचे युध्द यशस्वीरीत्या समाप्त झाल्यानंतर पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींना अभिनंदनाचे पत्र श्रीगुरूजींनी दि. २२ डिसेंबर रोजी पाठविले. या पत्रात त्यांनी शेवटी लिहिले होते. "देशाची एकात्मता, परिस्थितीचे यथार्थ मूल्यांकन, राष्ट्राच्या स्वभिमानाचे व गौरवाचे रक्षण करण्याचा सार्थ संकल्प याच प्रकारे सदैव असावा. केवळ संकटकाळातच नव्हे तर नित्य सर्व प्रकारची राष्ट्रोत्थानाची काम करताना या संकल्पाची

आवश्यकता आहे. आपल्या देशाची गौरवान्वि एकात्मशक्ती निर्माण करण्यातच रत असलेली राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय धोरणे ठरवाल, असा माझा विश्वास आहे. आपल्या नेतृत्वाखाली भारताच्या गौरवाची अशीच अभिवृध्दी होत राहो." श्रीगुरूजींच्या या पत्राला पतप्रधानांचे उत्तर जानेवारीच्या मध्यात आले. त्याला श्रीगुरूजींनी उत्तर पाठविले. मार्चमध्ये अ.भा. प्रतिनिधी सभेने युध्दातील विजयाबद्दल ठराव केला.

युध्दातील विजयाच्या पार्श्वभूमीवर १९७२ मधील विधानसभा निवडणुका इंदिराजींच्या पक्षाने लील्या जिंकल्या.

पश्चिम सीमेवर लष्कराला पूर्ण वाव मिळाला नाही असे युध्दबंदीनंतर श्रीगुरूजींचे मत हाते. पुढे १९७२ च्या जुलै महिन्यात पाकिस्तनशी जो 'सिमला करार' झाला, तो तर विजयाच्या उत्साहावर बोळा फिरविणारा ठरला. पाकिस्तानचा जिंकलेला सारा मुलूख या करारानुसार भारत सरकारने सोडून दिला. आझाद काश्मीरमधील मुलूख भारताचाच आहे व तेथून एक इंचही सेना मागे घेणार नाही अशी आवेशपूर्ण घोषणा संरक्षणमंत्र्यांनी केली होती. पण सिमल्याच्या वाटाघाटी परकीय दडपणाखाली झाल्या असाव्यात. रशिया व अमेरिका यांचे संयुक्त दडपण भारतावर आले असावे. १९६५ पेक्षाही मोठा विजय वास्तविक भारताने मिळविला होता आणि या विजयाचा लाभ त्याने वाटाघाटींच्या वेळी घेणे राष्ट्रहिताचे, गौरवाचे तसेच आपल्या शूर जवानांना त्यांचा पराक्रम कारणी लागल्याचे समाधान देणारे ठरले असते. पण सगळयाच प्रदेशातून सेना मागे घेण्यात आली. या करारावर श्रीगुरूजींनी अर्थातच टिका केली. युध्दबंदीची घोषणा होताना ज्या अपेक्षा होत्या त्यांपैकी कोणतीच अपेक्षा सफल झाली नाही. काश्मीरचा प्रश्नही खुलाच राहिला आणि पाकिस्तानची गुर्मीही कायम राहिली. एके ठिकाणी बोलताना श्रीगुरूजींनी 'शत्रु शेष ठेवू नये' या सूत्रानूसार भारत वागत नाही व पुन: पुन्हा देशाला संकटात पडावे लागते, याबद्दल सत्तारूढ राजकीय नेत्यांना दूषण दिले.

असा हा १९७१ च्या युध्दाचा मामला संपुष्टात आला. राष्ट्र एक करा, मातृभक्ती जागवा, समर्थ बना, हिंदू आदर्शवादच प्रेरणा देईल असा मंत्र उच्चारीत श्रीगुरूजींची भारतभ्रमंती या खळबळीच्या काळात सुरूच होती. वाढत्या विश्वासाने लोक श्रीगुरूजींची वाणी ऐकत होते. पण ती वाणी आता किती काळ ऐकावयाला मिळणार होती?

## १८. अंतिम मार्गदर्शन

श्रीगुरूजी प्रवास करीत होते. नागपुरला असले तरी काम अहर्निश चालू होते. मुंबईला वैद्यकीय तपासण्या अधूनमधून होतच होत्या. पण शरीरातील त्राण उत्तरोत्तर कमी होत चालले होते. एकीकडून डॉ. प्रफुल्ल देसाई ऍलोपाथीच्या मार्गाने तर दुसरीकडून पं. रामनारायण शास्त्री आयुर्वेदाच्या मार्गाने श्रीगुरूजींचे शरीरयंत्र कार्यक्षम राखण्यासाठी अटीतटीचा प्रयत्न करीत होते. १९७२ च्या जानेवारीत उत्तर प्रदेशचा दौरा चालू असताना प्रवासात उसंत अशी नव्हतीच. या दगदगीने त्यांना विलक्षण थकवा यायचा. मीरत ते अलीगड मोटारीने प्रवास चालू असता, “अरे, मला एवढे इकडून तिकडे नाचवता. काही विचार तर करा ”असे ते सोबतच्या कार्यकर्त्यांना म्हणून गेले. शरीराची शक्ती सारखी कमी होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. गोव्याच्या प्रवासतही ‘थकल्यासारखे वाटते’ असे उद्‍गार त्यांच्या तोंडून निघाले. दि. २५ जुलै ते १८ ऑगस्टपर्यंत त्यांना इंदूर येथे पं. रामनारायण शास्त्री यांच्याकडे राहून विश्रांती घ्यावी लागली. नंतर सप्टेंबर अखेर ते राजस्थानात गेले असता ४ ऑक्टोबर रोजी त्यांना ताप आला. पण तसाच अजमेरचा कार्यक्रम रेटून ते प्रथम जोधपूरला व नंतर जयपूरला गेले. तिथे मात्र प्रकृतीचे तंत्र खूपच बिघडले. कार्यकर्ते घाबरून गेले. झोप नाही, खोकला खूप, वारंवार शौच्याचा त्रास, विलक्षण थकवा असा प्रकार. दि. ९ ऑक्टोबरला तर अस्वस्थता आणखीच वाढली. ताप १०३ पर्यंत होताच. तरीही ठरलेली बैठक त्यानी रद्द करू दिली नाही. परंतू बोलणे अशक्य झाले. शब्दोच्चार धड होईना. अखेर प्रार्थना घेऊन बैठक आटोपण्यात आली. श्रीगुरूजींचा ताप १०५ पर्यंत चढला होता. यावेळी तेथील डॉक्टरांनी कार्यकर्त्यांवर रागावून, “तुम्ही त्यांच्या प्रकृतीवर असा अत्याचार का करता?” असा सवल केला. त्याचे उत्तर कोण काय देणार? सुदैवाने दि. १० रोजी ताप उतरला. आपल्या मनावरील व मेंदूवरील नियंत्रण सुटल्याचा हा आयुष्यातील पहिलाच अनुभव आहे, असे ते त्या दिवशी सकाळी चहा घेताना म्हणाले. पण त्यांचा तोल आता सावरला होता व प्रचारकांची सकाळची बैठक त्यांनी निर्विघ्नपणे पार पाडली. दोन दिवस विश्रांती घेण्याचा आग्रह डावलून नियोजित वेळी विमानाने मुंबईकडे रवाना झाले. निघताना जयपूरच्या संघचालकांना ते मिठीत घेऊन प्रेमभराने भेटले. सर्व कार्यकर्त्यांचाही निरोप घेतला. त्यानंतर पुन्हा काही श्रीगुरूजींचे पाय राजस्थानच्या भूमीला लागले नाहीत! जयपूरला आपल्याला बैठकीचा एक कार्यक्रम पार पाडता आला नाही, याची फार खंत श्रीगुरूजींना वाटली. ती त्यांनी पत्राद्वारे व्यक्त केली.

पण हे असे किती दिवस चालू शकणार होते? प्रवास करून, भेटीगाठी घेऊन कार्यकर्त्यांना आपले ह्रद्गत पुन:पुन्हा सांगावे अशी शक्ती राहिलेली नव्हती. उपलब्ध वेळेची डॉक्टरांनी सांगितलेली मर्यादा संपत आली होती. तेव्हा त्यांनी, हिंदू परंपरेनुसार, आपल्या सर्व प्रमुख कार्यकर्त्यांशी अखेरचे बोलून घ्यावयाचे ठरविले. त्यासाठी महाराष्ट्रात ठाणे येथे अखिल भारतातील कार्यकर्त्यांचा एक अभ्यासवर्ग घेण्यात आला. प्रत्यक्ष संघाचे काम करणारे प्रचारक, अधिकारी, यांच्या सोबतच राष्ट्रजीवनाच्या निरनिराळया क्षेत्रांत जबाबदारीचे काम करीत असलेल्या स्वयंसेवकांनाही या अभ्यावर्गासाठी निमंत्रित करण्यात आले होते. दि. २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबरपर्यंत हा वर्ग ठाणे येथील तत्वज्ञान विद्यापीठाच्या वास्तूत पार पडला. या वर्गासाठी आलेला प्रत्येक कार्यकर्ता श्रीगुरूजींच्या प्रकृतीची अवस्था पाहून चरकला आणि पुन्हा अशा प्रकारे त्यांचा सहवास मिळणे अवघड आहे, हे मनोमन समजून चुकला. ठाण्याचा वर्ग म्हणजे जणू गुरूने पार्थिव देहाचा त्याग करून अनंतत्वात विलीन होण्यापूर्वी शिष्यांना केलेला तत्वबोध, दिशाबोध आणि शिष्यांच्या समस्त शंकांचे

अंतिम निराकरण. संघाचा हिंदू - जीवनादर्शावर अधिष्ठित असलेला शाश्वत विचार श्रीगुरूजींनी या वर्गात अंगोपांगांनी स्पष्ट केला. आधुनिक म्हणविणाऱ्या विचारधारा आणि जागतिक परिस्थिती यांच्या संदर्भात हिंदू जीवन-विचाराचा कसदारपणा, तसेच मानवी कल्याणाची त्याची क्षमता याबद्दल त्यांनी कुठेही संदेह उरू दिला नाही. याच हिंदू आदर्शाच्या आधारावर प्रत्येक क्षेत्रात नव्या रचनेचे प्रारूप तयार करावे लागेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. एक प्रकारे, ठाण्याचा वर्ग म्हणजे श्रीगुरूजींनी संघाच्या कार्यकर्त्यांना दिलेले सैध्दांतिक वारसापत्रच म्हणता येईल. यात त्यांनी काही राखून म्हणून ठेवले नाही. ठाण्याच्या वर्गाचे अनन्य महत्व यातच समावलेले आहे.

या वर्गात पहिलाच प्रश्न असा उपस्थित करण्यात आला की, आपण "हिंदू हिंदू" चा सतत उद्-घोष का करावा? देशाची परिस्थिती आणि देशातील वातावरण पाहता आपण तो शब्द सोडून देऊ नये? 'भारतीय' किंवा अन्य कोणताही शब्द का स्वीकारू नये? संघावर संकुचितपणाचा आणि सांप्रदायिकतेचा जो आरोप केला जातो, तो तरी दूर होईल, असा विचार तेथे मांडला गेला. असा नेमका प्रश्न कोणी विचारला होता, असे नाही. परंतु, स्वयंसेवकांच्या मनात बाह्य वातावरणाच्या प्रभावाने असे प्रश्न येत होते. श्रीगुरूजींनीच तो प्रश्न उकरून काढला आणि त्याचा परामर्श घेताना ते म्हणाले, "हे खरे आहे की, 'हिंदू' च्या संबंधी अनेक प्रकारचे भ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. काही क्षेत्रांत, निरनिराळया प्रकारच्या स्वार्थासाठी, हिंदू म्हणजे मुस्लिमविरोधी, ख्रिश्चनविरोधी आणि काही ठिकाणी तर शीखविरोधी, जैनविरोधी, हरिजनविरोधी असा प्रचार केला जातो. हा प्रचार करणारे कोणत्याही माहितीच्या आधारे आपले मत मांडीत नसतात. धर्म, संस्कृती, इतिहास यांचे अध्ययन केल्यानंतर त्यांनी आपले मत सांगितलेले नसते. या देशात हिंदू विचारधारा आणि जीवनपध्दती, इस्लामी आणि इसाई पंथ जन्माला येण्यापूर्वीपासून अस्तित्वात आहेत. तेव्हा हिंदूचा अर्थ मुस्लिमविरोधी कसा झाला? शीख, जैनादी मते तर 'हिंदू' अंतर्गतच आहेत. स्वत:ला 'हिंदू' न म्हणण्याच्या त्यांच्या भावनेचा अर्थ, स्वत:चेच हातपाय कापून घेणे असा आहे. 'हिंदू' कोणाच्याही विरोधी नाही. हिंदू विचारप्रणाली पूर्णत: भावत्मक (positive) विचारप्रणाली आहे. ती निषेधात्मक(negative) नाही."

या देशातील राष्ट्रजीवनासाठी 'हिंदू' हून वेगळा पर्यायी शब्द वापरावा, असे काही लोक सुचवितात. त्यासंबंधी गुरूजी म्हणाले, "दुसरा पर्याय घेऊन मूळ अर्थ बदलेल काय? आर्यसमाजी म्हणतात की, 'आर्य' शब्दाचा वापर करा. परंतु 'आर्य' शब्दाचाही तोच अर्थ निघेल. काही लोक 'भारतीय' शब्द वापरावा असे सांगतात. परंतु भारत या शब्दाला कितीही आणि कसेही वाकविले तरी त्यातून दुसरा कोणताही अर्थ निघणार नाही. 'हिंदू' हाच अर्थ निघेल. मग नि:संदिग्धपणे 'हिंदू' शब्दाचा प्रयोग का न करावा? प्रचलित असलेला तो साधासुधा शब्द आहे. आपल्या राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीचा जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा तो हिंदू धर्म, हिंदू संस्कृती आणि हिंदू समाज यांचे संरक्षण करूनच होऊ शकते. याचा आग्रह सोडला, तर राष्ट्र म्हणून आपले काहीच वैशिष्टय शिल्लक राहत नाही. तो फक्त दोन पायांच्या प्राण्यांचा समूह राहील. राष्ट्र या नात्याने आपल्या अस्मितेचे जे समष्टिरूप प्रकट होते, त्याचा आधार हिंदू च आहे. कोणी व्यक्ती यासंबंधी मनात शंका धारण करील, तर त्याच्या वाणीत शक्ती राहणार नाही. म्हणून संपूर्ण निश्चयाने आपणास म्हणावयाचे आहे की, 'आम्ही हिंदू आहोत. हा आमचा धर्म, संस्कृती आणि समाज आहे. यांनीच आमचे राष्ट्र बनले आहे. याचे भव्य,

दिव्य, स्वतंत्र आणि समर्थ जीवन उभे करण्यासाठी आमचा जन्म झालेला आहे.' याबाबत तडजोडीचा विचारच होऊ शकत नाही."

संघकार्याचे स्वरूप समजावून सांगताना ते म्हणाले, "संघाचे कार्य सर्वव्यापी आहे. परंतू सर्वव्यापी म्हणजे काय? प्रकाश सर्वव्यापी आहे, म्हणून तोच सर्व काम करीत नाही. अंधार दूर करून तो मार्ग दाखवितो. हे समजून वागले पाहिजे म्हणजे गडबड होणार नाही. प्रत्येक कार्यात आपण संघ या नात्याने हस्तक्षेप करू लागलो तर जीवनाच्या प्रत्येक अंगासंबंधी आपल्याला एकेक प्रबंध तयार करावा लागेल. पण मग समाजाच्या संघटनेचे जे मूलगामी कार्य आहे, ते बंद पडेल, केवळ प्रबंध हाती राहतील. म्हणून आपण राष्ट्रजीवनाचा एक व्यापक सिध्दांत सांगितला. त्याच्या आधारावर प्रत्येक कार्याची रचना त्या त्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी केली पाहिजे."

भारतीय संस्कृतीच्या मूलभूत सिध्दांताची चर्चा करताना श्रीगुरूजी म्हणाले, "आपल्या येथे संपूर्ण समाजाला एका जीवमान शरीराच्या रूपात मानलेले आहे. सहस्त्रशीर्षा पुरूषः सहस्रपाद् - म्हणजे हजार डोकी, हजार डोळे, आणि हजार पाय असलेला पुरूष असे त्यांचे वर्णन केले आहे. मूळात हे परमेश्वराचे वर्णन आहे. पण आमच्याकरिता समाज हाच परमेश्वर आहे. हा विराट समाजपुरूष आहे. त्याची अनेक मुखे, अनेक हात, डोळे, पाय वगैरे आहेत. या विराट पुरूषाची आराधना करायला आपणास सांगितले आहे. याचबरोबर दुसरी एक गोष्ट सांगितलेली आहे ती ही की, या विराट समाजाचे घटक असलेल्या संपूर्ण मानवाच्या शरीरात एकच चैतन्य आहे. या चैतन्याला नाव कोणतेही द्या. त्याने फरक पडत नाही. मुख्य गोष्ट अनुभूतीची आहे. ती अनुभूती झाली पाहिजे. म्हणजे व्यवहार नीट होईल, आर्थिक दृष्टीने असलेली उपभोगाची सामग्री या विराट पुरूषाकरिता आहे, असा विचार करा. समाजरूपी विराट पुरूषाची कल्पना आणि त्यात भरून असलेल्या चिरंतन अस्तित्वाची अनुभूती ही आमच्या भारतीय चिंतनाची विशेषता आहे.

"चिंतनाची ही दिशा सोडून दिली, तर संपूर्ण मानवजातीच्या सुखाची समस्या दूर होणार नाही. एक सरळ प्रश्न विचारता येईल की, जे काही उपलब्ध आहे ते सर्वांना मिळावे, असा विचार का करावा? केवळ आपलाच विचार का करू नये? दुसऱ्याला सुख मिळो की दु:ख याची आपण काळजी करण्याचे कारण काय? त्याचा आपला संबंध कोणता? भारतबाह्य अन्य विचारप्रणालींच्या अनुसार आपण जर मानले की, आपण सर्व अलग अलग पंचमहाभूतांचे बनलेले पिंड आहोत, मी आणि इतर यांच्यात कसलाच आंतरिक संबंध नाही, तर मग दुसऱ्याच्या सुखदु:खाच्या अनुभूतीची भावना आपल्या मनात उत्पन्न होण्याचे कारण नाही."

इतर देशांतील विचारप्रणालींमधील अपूर्णता स्पष्ट करताना श्रीगुरूजी म्हणाले, "आधुनिक जगातील विचारप्रणालीही हेच सांगत असतात की, समाजाच्या संपूर्ण कल्याणाचा विचार केला पाहिजे. त्यांना विचारले पाहिजे की, समाजाच्या एकत्वाची त्यांची जी कल्पना आहे, तिचा आधार कोणता? व्यक्ती - व्यक्तीमधील परस्पर संबंधांचे नाते कोणते? त्यांचा परस्परांशी संबंध कसा व का आहे? दुसऱ्याच्या सुखदु:खाच्या समान अनुभूतीचा आधार कोणता? एकत्वाचा अनुभव देणारे ते सूत्र कोणते? भारतबाह्य विचारसरणींमध्ये या बाबतीत सिध्दांतरूप कसलाच विचार नाही. तेथे हेच मान्य केलेले आहे की, सर्वजण अलग अलग उत्पन्न झाले आहेत, एकाचा दुसऱ्याशी आंतरिक संबंध नाही. अशा परिस्थितीत एकाने दुसऱ्याच्या भल्याची चिंता का करावी? या विचारसरणीमध्ये 'समाज' या शब्दाचा उल्लेख असला, तरी समाज म्हणजे अनेक लोकांच्या स्वार्थांचे एकत्रीकरण, इथपर्यंतच त्यांची

दृष्टी मर्यादित आहे. स्वार्थाच्या पूर्तीसाठी परस्परांत समझोता झाला, एक कॉन्ट्रॅक्ट झाले, आणि समाज बनला. समाजाचे केवळ एवढेच स्वरूप त्यांच्यासमोर आहे. आंतरिक दृष्टीने सर्वांना जोडू शकणारे आणि सर्व मिळून एक सुखदु:ख व एक चैतन्य अनुभव प्राप्त करून देणारे सूत्र त्यांच्याजवळ नाही.

"ते सूत्र, आपणा सर्वांचे एक अस्तित्व आहे, या तथ्यात निहित आहे. शरीरे कितीही वेगवेगळी असोत, त्यांची संख्या कितीही असो, वरवर दिसणाऱ्या आवडीनिवडी कितीही भिन्न भिन्न असोत, सर्वांच्या अंतर्यामी एक चिरंतन अस्तित्व आहे. मूलगाती एकतेचे तेच प्रमुख कारण आहे. याच कारणास्तव आमच्या मनात परस्पर संबंधाचे भाव उत्पन्न होतात. आपण आपसांत द्वेष करतो, तो सुध्दा याच एकत्वाच्या आधारावर, ज्याच्याशी आपला काही संबंधच नाही त्याच्याशी कसा द्वेष करणार? हि साखळी विद्यमान नसेल, तर आपण ना कुणावर प्रेम करू शकत, ना कुणाचा द्वेष करू शकत! परस्पर संबंधाच्या बाबतीत जे कोणते भाव आपल्या मनात उत्पन्न होतात, त्याचे एकच सूत्र आहे. ते म्हणजे सर्वांचे मिळून एक अस्तित्व. वस्तुत : हेच तथ्य अंत: करणात ठसवून व्यावहारिक जगात आपण वागले पाहिजे."

ते पुढे म्हणाले, "या एकत्वाची अनुभूती हृदयात विराजमान झाल्याबरोबर आपल्या मनात विचार येईल की, ज्या सर्वांचे मिळून आपले एक अस्तित्व आहे, तो समान अस्तित्वाचा समाज सुखी व्हावा. या विचारातून मग असा निश्चय प्रकट होतो की, आपण अशी व्यवस्था निर्माण करू की ज्यामुळे सर्वांना समान 'स्वार्थ' राहील. म्हणजेच केवळ स्वत:च्याच स्वार्थसंग्रहाचा विचार सोडला पाहिजे. आपल्या संपूर्ण अस्तित्वाच्या विरूध्द आणि स्वत्वाच्या विपरीत असल्यामुळे स्वार्थसंग्रह हा आत्महत्येसारखा पापी विचार आहे. याकरिता, तो सोडून देण्यात हित आहे.

"हा सर्व विचार ज्या एका जीवनसिध्दांतात अंतर्भूत आहे, त्या जीवनप्रणालीचे नाव 'हिंदू' जीवनप्रणाली आहे. जगात अन्यत्र कोठेही इतका सखोल विचार करून चिरंतन अस्तित्वाच्या आधाराचा शोध घेतलेला नाही. हिंदुत्वाची ही विश्व मानवतेला देणगी आहे. या आधारावर संपूर्ण समाजाची धारणा होते. एकात्मतेचे हे सूत्र, व्यक्ती - व्यक्तीच्या अंत:करणात जागृत ठेवणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे.

"शेकडो वर्षांच्या इतिहासाने हे सिध्द करून दाखविले आहे की, याच विचारप्रणालीत स्थिरता आहे. जगात मानवकल्याणाच्या बाबतीत जे अनेकाविध विचार सध्या चालू आहेत, ते फार टिकायचे नाहीत. पूर्वानुभव असाच आहे की, जगातील परिस्थिती बदलताच, कालप्रवाहाच्या लाटांचे तडाखे बसताच, ते बदलतात व नष्ट होतात. हिदू जीवनपध्दतीचा हा विचार की, सर्वांमध्ये एकच सत्तत्व विराजमान आहे, तीच सर्वांना जोडणारी कडी आहे. सुखदु:खाचा अनुभव आणि तदनुसार एकात्मतेचा अनुभव देणारे तेच एक बंधन आहे. एकाच अस्तित्वाची भिन्न भिन्न रूपाने अभिव्यक्ती होत असल्यामुळे सर्वास आपापल्या आवडीप्रमाणे उत्तम जीवन जगण्यासाठी सोयी प्राप्त करून देणे आपले कर्तव्य आहे. हा स्थायी स्वरूपाचा विचार आहे. याच विचाराच्या आधारावर मनुष्य विचार करील की, संग्रह करू नये, जीवनावश्यकतेहून अधिक साधने आपल्याजवळ गोळा करू नयेत, जीवनावश्यकतेहून अधिकांवर आपला अधिकार नाही, समाजाचा अधिकार आहे. आपल्या बुध्दीने किंवा सामर्थ्याने आवश्यकतेहून अधिक प्राप्त केले, तर तेही समाजाच्या हिताचेच आहे. या धारणेला दृढ करणे हे हिंदू विचारांच्या जागृतीचे दुसरे नाव आहे.

"इतर ज्या राजनैतिक व आर्थिक व्यवस्था किंवा पध्दती दिसतात, त्यांचा याच निकषावर विचार केला पाहिजे, राजकीय अथवा आर्थिक कोणतीही व्यवस्था असो, समाजजीवनाच्या मूल रचनेचा हाच एकमेव समर्थ आधार आहे. आपण हा मूलभूत सिध्दांत सोडला, तो विसरून इकडेतिकडे भटकलो त्याचे परिणाम आपल्यासमोर आहेत. रोज आपल्याला दिसते की, दारिद्रय चोहीकडे पसरलेले आहे. काही लोक भ्रमाने या दैन्याचे आणि दारिद्रयाचे खापर हिंदू जीवनपध्दतीवर फोडतात. परंतु हे खरे नाही. सत्य हे आहे की, हिंदू जीवनपध्दतीच्या सिध्दांतांना आपण विसरल्यामुळे हे घडून आले आहे. ते सिध्दांत आचरणात न आणल्यामुळे ही दु:स्थिती आहे. स्पर्शास्पर्श आदी ज्या अनिष्ट गोष्टी आपल्याला दिसतात, त्या हिंदू जीवनपध्दतीचा परिणाम आहे, असे म्हणणे चूक आहे. हिंदू जीवनपध्दतीचा सिध्दांत विसरण्याचा व त्या सिध्दांतानुसारच आचरण करणे सोडून देण्याचा हा परिणाम आहे."

समाजव्यवस्थेचा विचार बुध्दिमंतांमधिल चर्चेचा आणि वादविवादाचा विषय आहे. संघाचे म्हणजेच हिंदूंचे या बाबतीत काय म्हणणे आहे, हे गुरूजींनी या वर्गात कार्यकर्त्यांसमोर सांगितले. ते म्हणाले, "ज्याला आधुनिक जीवन म्हणतात, ते जगातल्या काही देशांमध्ये आपल्याला प्रत्यक्ष दिसून येते. हे जीवन सुखपूर्ण आहे, असे मानले जाते. या जीवनप्रक्रियेकडे पाहिले तर आपल्याला काही गोष्टी स्पष्टपणे दिसतात. पहिली गोष्ट ही की, या सुखमयतेच्या मागे एक सतत स्पर्धा आहे. सुखोपभोगाची साधने मिळविण्याकरिता ते लोक एकमेकांशी स्पर्धा करीत आहेत. दुसरी गोष्ट अशी दिसून येते की, त्यांना 'परमिसिव्ह सोसायटी' हवी आहे. म्हणजे कुणावर कसलेच बंधन नको आहे. अनेकांना असे वाटते की, हे उन्नत समाजाचे लक्षण आहे. परंतु, आपण हे ओळखले पाहिजे की, 'परमिसिव्ह' विचारधारणेत 'समाज' नावाची वस्तूच समाप्त होते. उरते ती फक्त 'कॉन्ट्रॅक्ट थिअरी.' व्यक्तीला आपल्या जीवनात 'परमिसिव्हनेस' म्हणजे स्वच्छंदता प्राप्त व्हावी, कोणी त्यात बाधा उत्पन्न करू नये यासाठी ती करार करील. या करारामुळे मनुष्याचे सामुहिकीकरण घडून येते. 'समाज' म्हणजे काय? तर व्यक्तींनी केलेल्या करारांचा परिणाम!

या कराराबरोबर चालणारी दुसरी गोष्ट म्हणजे स्पर्धा, काही लोक असे म्हणतात की, निरोगी स्पर्धेमुळे प्रगती होते. परंतू मला असे वाटते की, स्पर्धा निरोगी राहू शकत नाही. सुरूवातीला स्पर्धेत थोडासा चांगुलपणा आढळला, तरी लवकरच तीत बिघाड उत्पन्न होतो. निरोगी स्पर्धा स्वत:ला चांगले करण्याची प्रेरणा देते, असे म्हणतात. परंतु, स्पर्धा सुरू झाल्याबरोबर स्वत:ला चांगले बनविण्यापेक्षा दुसऱ्याला वाईट करण्याचा विचार सुरू होतो. स्वत: उंच होण्यापेक्षा दुसऱ्याला खाली ओढण्याची स्पर्धा लागते. स्पर्धा शेवटी परस्पर-संघर्षात परिणत होते. आज जगात जे नाना प्रकारचे संघर्ष चालू आहेत, ते स्पर्धामूलक आहेत. दुसऱ्याचे सुख नष्ट करून स्वत: समृध्द होण्याची इच्छा, हेच या संघर्षाचे मूळ कारण आहे. पाश्चात्य देशात प्रचलित असलेल्या 'परमिसिव्हनेस' आणि 'कॉम्पिटिशन' यांनी मनुष्य सुखी होणे असंभवनीय आहे.

"म्हणून याबाबतीत मुळाशी जाऊन विचार केला पाहिजे. तो विचार असा की, मनुष्यजीवनाचे लक्ष्य कोणते? चैनबाजी, ऐषआराम करणे, हे मनुष्यजीवनाचे लक्ष्य आहे काय? साधारणत: सर्वांचे एकमत आहे की, सुखाची प्राप्ती हे मनुष्याचे लक्ष्य आहे. सुख क्षीण झाले, तर ते दु:खाचे कारण बनते. म्हणून मानवाची स्वाभाविक इच्छा आहे की, सुख चिरंतन असावे. असे सुखी जीवन त्याला मिळावे

की, जे कधी समाप्तच होणार नाही. चिरंतन सुखाची ही इच्छाच मनुष्याला ओढीत असते. आपले खरे स्वरूप ओळखून उत्तम, आनंदपूर्ण, चिरंतन जीवन मिळविण्याकरिता तो प्रयत्नशील असतो.

"मनुष्य शरीरधारी असल्यामुळे, शरीराच्या गरजांची पूर्ती त्याला करावीच लागते. या गरजांमध्येच अनेक प्रकारचे उपभोग येतात. या उपभोगांना अमान्य करून अथवा गरजांमध्येच अनेक प्रकारचे उपभोग येतात. या उपभोगांना अमान्य करून अथवा तिरस्कारून जगात चालायचे नाही, म्हणून विचारवंत पुरूषांनी म्हटले आहे की, शरीर व मन यांच्या उपभोगप्रवृत्तींना अमान्य करण्याची आवश्यकता नाही. इष्ट हेच आहे की, या प्रवृत्तींचे समाधान करण्यातच माणसाने स्वत:ला बुडवून घेऊ नये.

"सर्वांचे लक्ष्य सुखी होणे आहे. जगात कोणीच असे नसेल की, ज्याला सुख नको आहे. तसेच दिवस-दोन दिवस टिकणारे क्षणभंगुर सुख कोणालाच नको असते. प्रत्येक जीव स्थिर सुखाची कामना करतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे त्याला सुखाच्या अमरत्वाची इच्छा असते. सर्वांना अशी इच्छा असते, परंतू चिरंतन सुख म्हणजे काय हे समजण्याची योग्यता मात्र सर्वांच्या ठिकाणी नसते. आपल्या इंद्रियांच्या ज्या वासना असतात, त्या पूर्ण करण्यात खरे सुख आहे, असे समजून प्राणी त्या पूर्ण करण्याच्या मागे धावत असतात. मनुष्य सर्व प्राण्यांत विचारशील प्राणी आहे. तो इंद्रियांचे चोचले पुरविण्याकरिता इतर प्राण्यांपेक्षाही वेगवेगळे प्रयत्न करीत असतो. त्याचा पहिला प्रयत्न तर इतर प्राण्यांसारखा असतो. म्हणजे इंद्रियांची तृप्ती साधण्याचाच तो प्रयत्न करतो. परमेश्वराने इंद्रियांची रचनाच अशी केली आहे की, ती बाहेर धावत असतात, त्यामुळे, आत वळून खरे सुख बघण्याची त्यांची तयारी नसते, परंतु, विचार केल्यानंतर असे दिसून येईल की, सर्व इंद्रियजन्य सुखे दु:खान्त असतात. तेव्हा माणूस विचार करतो की, ज्याअर्थी माझ्यामध्ये चिरंतन शाश्वत सुखाची इच्छा आहे, त्याअर्थी ते कुठे ना कुठे असलेच पाहिले. ते बाहेर नसेल, तर आत ते असेल काय, असा प्रश्न त्याच्या ठिकाणी उत्पन्न होतो. तो बघतो की, चैनीच्या ज्या वस्तू आहेत, त्यांच्यापासून सुख मिळते. उपभोगाची इच्छा तृप्त होते. परंतू नंतर त्यालाच आढळून येते की, ही तृप्ती क्षणिक, अल्पकालिक होती. उपभोग जसजसा करीत जावे, तसतशी त्यांची अभिलाषा वाढत जाते आणि जेथे अभिलाषा आहे, कामना आहे, तेथे सुख कुठले? मग तो पुन्हा विचार करू लागतो की, अभिलाषांच्या तृप्तीपासूनही सुख मिळत नाही, तर ते सुख कुठे आहे?

"या संबंधात भारतीय विचारवंतांचे मत असे आहे की, सुख आपल्या आतच आहे. बाह्य वस्तूंत सुख नाही. त्या सुखाच्या निमित्तमात्र आहेत, ते सुख प्राप्त करून घेण्यासाठी काय केले पाहिजे? आपल्या पुर्वजांनी गंभीर चिंतन आणि आत्मानुभव यांच्या आधारे काही मार्गदर्शक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांनी एक पक्की गोष्ट सांगितली की, जे मन अस्वस्थ आणि अस्थिर आहे, त्याला कधीच सुखाचा अनुभव येणार नाही. त्याकरिता मन शांत हवे. मनावर जे नाना प्रकारचे तरंग उठतात, ते उठू देता कामा नये. पाण्यावर तरंग उठू लागले म्हणजे त्यात काहीच दिसत नाही. आपला चेहरासुध्दा दिसत नाही. तरंग थांबले की, पाणी स्थिर होते आणि त्यातले मग सर्व काही दिसू लागते. असेच मनाचेही आहे. मन स्थिर असेल, तर आपले मूळ स्वरूप दिसू शकते. मन अस्थिर असेल तर सुखाची अनुभूती असंभव आहे. म्हणून मन प्रथम शांत करणे जरूर आहे. आपल्या पूर्वजांनी स्वत:च्या अनुभवाच्या आधारावर हा निष्कर्ष काढलेला आहे.

“या आधारावर आपण विचार करावा की, प्रगतिशील म्हणविणाऱ्या ज्या देशांमध्ये स्पर्धा, ईष्या, द्वेष, कटुता आणि दुसऱ्याचे सुख पाहून उत्पन्न होणारी शत्रुता आहे, तेथे मनुष्याचे मन शांत व स्थिर होण्याची शक्यता तरी आहे काय? या स्थितीत वासनांची भरती - ओहोटी थांबू शकत नाही, मग सुख मिळणार कसे? म्हणून आपल्या भारतात आपल्याला असे शिक्षण दिले आहे की, दुसऱ्याचे ऐश्वर्य पाहून त्याची इर्ष्या करू नको. त्याचे अभिनंदन कर, तू स्वतंत्र रीतीने आपल्या प्रगतीचा प्रयत्न कर. परंतू त्याच्याशी स्पर्धा, ईष्या करण्याची गोष्टही मनात आणू नको. नाहीतर दुसऱ्याला दु:खी करून स्वत: सुखी बनण्याचा विचार मनात येईल. यामुळे मानवी शांतता प्राप्त होणार नाही. मनाला शांत ठेवावयाचे असेल, तर आजच्या तथाकथित प्रगतिशील जीवनासंबधी आपल्याला फार काळजीपूर्वक विचार केला पहिजे. मनुष्य शरीरधारी आहे, यात तर संशयच नाही. शरीराकरिता ऐहिक सुखोपभोग किती हवेत आणि ते कोणत्या पध्दतीने हवेत याचा विचार करताना डोळे मिटून बाहेरच्या लोकांच्या अनुकरण करण्याने भागायचे नाही. आपल्या पूर्वजांनी सांगितले आहे की, दुसऱ्याला दु:ख झाले असता मनात करूणा उत्पन्न झाली पाहिजे. त्या कारूण्यातून त्याला दु:ख-मुक्त करण्याचा प्रयत्न आपल्याकडून झाला पाहिजे. यातून एक विशेष प्रकारचा संतोष आणि सुख देणारी नि:स्तब्ध अवस्था प्राप्त होईल. ती स्पर्धेतून प्राप्त होणार नाही.

“ ‘परमिसिव्ह सोसायटी’ तर सर्व दृष्टींनी हानिकारक आहे. नियमविहीन अवस्थेचे वर्णन आपल्या पुराणांतही आहे. परंतु, अनुभव असा आला की, नियमहीनतेने अनाचार वाढला. म्हणून नियम तयार करून मनुष्याने वागावे, असे ठरविण्यात आले. ‘परमिसिव्ह सोसायटी’ ही गोष्ट अनाचार वढविणारी आणि माणसाला माणसाचा शत्रू बनविणारी आहे.

“म्हणून आपल्या येथे असे सांगण्यात आले की, अमर्याद उपभोगाची लालसा आणि तिच्या तृप्तीसाठी स्पर्धेची शर्यत यामुळे सुख मिळत नाही. त्यासाठी आपल्या जीवनात संयम असणे आवश्यक आहे. व्यक्ती म्हणून, तसेच समाज म्हणूनही संयम आवश्यक आहे. समाज म्हणून संयमशीलता आणणे सोपे काम नाही, पण ते आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या येथे चार पुरूषार्थांची कल्पना मांडली आहे. चार पुरूषार्थांची कल्पना संयमशील जीवनाच्या निर्मितीसाठी आहे. व्यक्ती व समाज या दोघांच्याही दृष्टीने कर्तव्याचा विचार करण्यात आला आहे. धर्माने दोन्ही नियंत्रित आहेत. धर्माने नियंत्रित राहूनच अर्थ व काम या पुरूषार्थांची आराधना करावी, म्हणजेच, उपभोग, सत्ता, धन, संपत्ती, ऐषआराम यांची साधना धर्माने नियंत्रित असावी आणि ते नियंत्रण प्रस्थापित करीत असतानाच, मोक्षाची इच्छा सतत राहावी की, आपल्याला आपल्या मूळ सुखमय स्वरूपाची अनुभूती होईल. ही इच्छा म्हणजेच चौथा पुरूषार्थ, मोक्ष, त्याला नाव कोणतेही द्या. त्याने अंतर पडत नाही. हा चौथा पुरूषार्थ, यासाठी आपल्यासमोर ठेवला आहे की, आपले मूळ स्वरूप प्राप्त करण्याची इच्छा सदैव कायम असावी. पहिल्या आणि चौथ्या पुरूषार्थाच्या नियंत्रणात सर्व जीवन चालावे. उपभोग, उपभोगाची साधने प्राप्त करणे, ऐषआराम, हे सारे या दोन पुरूषार्थांच्या नियंत्रणात असावे. नदीचे पाणी दोन तटांच्या मधून वाहते, तेव्हाच सर्व लोक त्या पाण्याचा उपयोग करू शकतात. ती तट फोडून वाहू लागली की, ती विध्वंसाचे कारण बनते. त्याचप्रमाणे उपभोगाची नदीही धर्म आणि मोक्ष या दो तटांच्या मधून वाहणेच सुखकारक आहे. म्हणून प्रथम आणि चतुर्थ पुरूषार्थ यांच्यामधून वाहणारी जीवनधारा निश्चित करून व्यक्तिगत आणि सामाजिक सर्व प्रकारच्या ऐहिक उपभोगांचा विचार केला पाहिजे आणि त्या अनुसरून सामाजिक व्यवस्था असली पाहिजे.

“ही कल्पनाच संपूर्ण मानवांना सुख देणारी आहे.  स्पर्धा आणि स्पर्धेमुळे उत्पन्न होणारी अनिष्टता थांबवून, सर्व प्रकारचे ऐहिक उपभोग प्राप्त होत असतानाही संयम ठेवून आणि अंतिम लक्ष्याचे ध्यान ठेवून, जीवन जगण्यातच खऱ्या अर्थाने मनुष्य सुखी होईल.  व्यक्तिगत जीवनात तसेच सामाजिक जीवनात त्याला संतोष आणि सुख मिळेल.

“हा विचार आपणांस मान्य असेल तर आपल्या समाजव्यवस्थेत उत्तम प्रकारे आपण तो प्रकट केला पाहिजे.  तो प्रकट करण्याचा प्रयत्न आपल्याला करावयाचा असेल तर आपण आजच्या परिस्थितीत रा. स्व. संघचे कार्य सर्व जगासमोर ठेवू शकू.”

## १९. महाप्रयाण

ठाण्याचा अभ्यासवर्ग चालू असताना श्रीगुरुजी दररोज मुंबईला डीप एक्स-रे उपचारासाठी टाटा रुग्णाल्यात जात असत. बैठकीत बोलताना घशाला वेदना होत. पण पुन्हा बोलण्याची संधी मिळणार नाही हे ठाऊक असल्याने त्यांनी वेदना गिळून आवश्यक ते सगळे बोलून टाकले. ठाण्याचा वर्ग संपल्यावर दि. ११ पर्यंत मुंबईलाच ते विश्रांतीसाठी राहिले. व नंतर ११ नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत नागपूरला त्यांचा मुक्काम होता. डीप एक्स-रे उपचारामुळे त्यांचा गळा भाजून निघाला होता. बोलणे किंवा अन्न ग्रहण करणे अवघड जात होते. डॉक्टर मंडळींनी 'मौन पाळा' असा सल्ला दिला. पण 'ते कसे शक्य आहे?' हा श्रीगुरुजींचा प्रतिप्रश्न होता. मंडळी सारखी भेटायला येत आणि त्यांची किमान चौकशी तरी करावीच लागे. तीन प्रांतांचे रद्द झालेले प्रवास याच काळातील होते. बसल्याबसल्या खूप पत्रे त्यांनी यावेळी लिहिली. डॉ. मुंजे जन्मशताब्दी समितीचे ते अध्यक्ष होते. स्वत:च्या स्वाक्षरीची पत्रके पाठवून यावेळी त्यांनी या कामाला चालना दिली. पुतळयाच्या उद्-घाटनसाठी येण्यास जनरल करिअप्पांना पत्राद्वारे निमंत्रण दिले.

घशाचा त्रास हळूहळू कमी झाला. खाणेपिणे होऊ लागले आणि मग पुन्हा प्रवासाची ओढ श्रीगुरुजींना लागली. डिसेंबर २ ते १३ दिनांकापर्यंत इंदूर येथे पं.रामनारायण शास्त्री यांच्याकडे, गुरुबंधू श्री अमृतानंदजी महाराज यांच्या सहवासात त्यांनी विश्रांती घेतली. विश्रांतीबरोबरच कोणती कामे लवकर उरकणे आवश्यक आहे, पूर्वी हात घातलेल्या कामांपैकी कोणती राहून गेलेली आहेत, याचा विचार त्यांनी केला. इंदूरला विश्रांती समाप्त करुन ते रतलामला गेले. बहिणीची व भाच्यांची भेट घेतली. नागपूरला परतून डॉ. मुंजे यांच्या पुतळयाच्या अनावरण समारंभात त्यांनी भाग घेतला. जनरल करिअप्पांबरोबर राहिले. करिअप्पांनी नागपूर सोडताच श्रीगुरुजी कर्णावती येथील शिबिरासाठी गेले आणि दि. २ रोजी क्षेत्रप्रचारकांच्या बैठकीसाठी नागपूरला परतले. दि. ८ नंतर महाकोसल, विदर्भ, हरियाणा, पंजाब, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र असा प्रवास व संघाचे आणि संघाबाहेरचे भरगच्च कार्यक्रम आटोपून दि. २० फेब्रुवारीला ते नागपूरला परतले.

पुढचा टप्पा बंगाल, आसाम व बिहार राज्यांचा, बंगालचा प्रवास आटोपताच एका विशेष कार्यक्रमासाठी श्री. प्रभूदत्त ब्रह्मचारी यांच्या आग्रहाखातर ते काशीला गेले. माघ वद्य एकादशीचा तो दिवस होता. श्रीगुरुजींच्यावाढदिवसानिमित्त बरेच प्रमुख कार्यकर्ते काशीला एकत्रित आले होते. श्री. प्रभुदत्ताजी ब्रह्मचारी आणि पं. राजेश्वरशास्त्री द्रविड यांच्या चरणी मस्तक ठेवून त्यांचा आशीर्वाद श्रीगुरुजींनी घेतला. श्री. माधवरावजी देशमुख यांनी श्रीगुरुजींच्या प्रकृती - स्वास्थ्यासाठी आयोजित केलेल्या रुद्रयागाची समाप्ती पूर्णाहुतीच्या वेळी दोन तासपर्यंत श्रीगुरुजींकडून करवून घेण्यात आलेल्या विधींनी झाली. पण या कार्यक्रमात विशेष रुची श्रीगुरुजींनी दाखविली नाही. प्रकृतीस्वास्थ्यासाठी असे काही उपक्रम त्यांना इत:पर निरर्थक वाटत असावेत. त्यावेळी जमलेले कार्यकर्ते श्रीगुरुजींच्या प्रकृतीकडे पाहून अधिकच चिंतित झाले. पुढचा प्रवास पूर्ण करण्याच्या निर्धाराने श्रीगुरुजी लगेचच निघाले. त्यांना थांबविण्याचे साहस कोणात नव्हते. प्रवास दुर्गम प्रदेशात व अवघड होता. पुन्हा प्रवास नाही, भेटीसाठी नाहीत. ठिकठिकाणी जाऊन कार्यासंबंधी बोलणे नाही, हे श्रीगुरुजींनी जाणले होतेच. या प्रवासाहून दि. १४ मार्चला ते नागपूरला आले. बस्, भ्रमंती संपली होती! पुन्हा नागपूरबाहेर त्यांचे

पाऊल काही पडले नाही! काळपुरुषाचा इशारा रांचीलाच मिळाला होता. तेथे श्वास लागल्यामुळे काही वेळ त्यांना आगगाडीच्या डब्यातच पडून राहावे लागले होते.

आता नागपूरला आल्यावर उपचारांची चिंता सभोवारची मंडळी करु लागली. उपचारांचा उपयोग नाही हे ठाऊक असूनही कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर डॉक्टरी प्रयत्नांना श्रीगुरुजींनी मान्यता दिली. डॉ. प्रफुल्ल देसाई यांच्या सल्ल्याने इंजेक्शन्स देण्यात आली. संघकार्याचा अखेरचा प्रवास जसा १४ मार्चला संपला तसे संघकार्यार्थ केलेले अखेरचे भाषणही दि. २५ मार्च ला होउन गेले. प्रसंग होता केंद्रीय कार्यकारी मंडळ व अ. भा. प्रतिनिधी सभा यांच्या बैठकीचा. त्यांनी भाषण बसूनच केले. अनेकांच्या डोळयांत अश्रू तरळत होते. श्रीगुरुजींचे हे भाषण ४० मिनिटांचे होते. या अंतिम भाषणात त्यांनी प्रतिनिधी सभेसाठी आलेल्या देशभरातील कार्यकर्त्यांना विश्वासपूर्वक सांगितले की, “जितके कार्य सदृढ प्रकारे चालेल आणि ते जितके आम्ही एकदिलाने करु तितके सर्वत्र आपल्याला यशच यश मिळत जाईल, यावर माझा अगदी पूर्ण भरवसा आहे.” हे भाषण संपल्यावर अनेक कार्यकर्ते भरल्या डोळयांनी श्रीगुरुजींच्या निकट आले. त्यांच्या भावना श्रीगुरुजींना जरुर कळल्या. पण आनंदाने हसून खेळून ते सगळयांशी बोलत राहिले. याच बैठकीच्या वेळी बहुधा भावी सरसंघचालकांच्या नियुक्तीसंबंधी त्यांनी प्रमुख ज्येष्ठ सहकाऱ्यांशी विचारविनिमय केला असावा आणि श्री. बाळासाहेब देवरस यांच्या नावाची निश्चितीही केली असावी.

दि. २६ मार्च रोजी श्रीगुरुजी कार्यालयालगतच्या मोहिते संघस्थानावर प्रार्थनेसाठी गेले होते. सरसंघचालक असताना अखंड ३३ वर्षे संघस्थानावरील त्यांची प्रार्थना सहसा चुकली नाही. दि. २६ ची संघस्थानावरील अखेरचीच प्रार्थना ठरली. दि. २७ पासून कार्यालयातील खोलीजवळच्या गच्चीवर उभे राहूनच प्रार्थना करणे त्यांना भाग पडले. क्षीणतेमुळे स्वत: अंघोळ करणेही दि. २६ पासूनच थांबले. अगदीच नाइलाज झाल्यावाचून अंघोळीसारखी सेवा त्यांनी कदापि इतरांकडून करुन घेतली नसती. दि. ३ एप्रिल १९७३ रोजी अमावास्या होती. तत्पूर्वी दि. २ रोजी त्यांनी स्वत:च्या हाताने तीन पत्रे लिहिली आणि ती कार्यालयाची व्यवस्था पाहणारे श्री. पांडूरंगपंत क्षीरसागर यांच्या स्वाधीन केली. प्रकृतीत चढउतार चालू होता. अलिप्तपणे श्रीगुरुजी सर्व औषधे घेत होते. कलकत्त्याचे स्वयंसेवक व दर १५ दिवसांनी नागपूरला येऊन श्रीगुरुजींची प्रकृती पाहणारे डॉ. सुजित धर यांना दि. २९ ला गुरुजी म्हणाले, “हे शरीर कशाला ठेवता? किती दिवस ठेवाल?” दि. ३० ला पुन्हा एक्स-रे काढला. तो डॉक्टरांना फार निर्दोष वाटला. आशा बळावली. या वेळी श्रीगुरुजीही जर प्रसन्न वाटत होते. नंतर काही दिवसांत चालणे, खोलीतल्या खोलीत फेऱ्या मारणे सुरु झाले. तोल जाणे थांबले. ही सुधारणा १९ मे पर्यंत टिकली आणि मग पुन्हा धाप लागण्याचा त्रास होऊ लागला. उत्कृष्ट औषधयोजना असल्याचे सगळे डॉक्टर आणि वैद्य यांचे एकमत होते. पण श्रीगुरुजींचे शरीर औषधांना प्रतिसाद देत नव्हते. कदाचित अंत:स्थ आत्मिक चैतन्य आता शरीरात बंदिस्त राहण्याला अनुत्सुक असावे.

नागपूरचा संघ शिक्षा वर्ग सुरु होऊन गेला होता. अन्य ठिकाणाचे वर्गही चालू होते. श्रीगुरुजी कोठेच जाऊ शकत नव्हते. अखेर दि. १९ पासून वर्गात आलेल्या तृतीय वर्षाच्या स्वयंसेवकांनी थोडा वेळ प्रांतश: श्रीगुरुजींना भेटावे, अशी योजना झाली. जेमतेम २०-२५ मिनिटांत बैठक आटोपती घेतली जाई. परिचय आणि फारच फार तर पाच मिनिटे श्रीगुरुजींचे बोलणे. देशाचे चित्र पालटून टाकण्यासाठी दृढ श्रध्देने संघकार्य करण्याचे तळमळीचे आवाहन. प्रत्येक स्वयंसेवक हेलावून जाई. दि. २६ पर्यंत विशेष त्रास श्रीगुरुजींना झाला नाही. पण मग श्वास लागणे वाढले. त्याचे कारण मात्र

कोणाला सापडेना. श्रीगुरुजींच्या प्रकृतीचे वृत्त सर्वदूर पसरल्याने भिन्नभिन्न क्षेत्रांतील अग्रगण्य मंडळी येऊन भेटून जात. त्यांत संघ कार्यकर्त्यांच्या व्यतिरिक्त अन्य नामवंत मंडळीही बरीच असत. श्रीगुरुजींसंबंधीच्या श्रध्देचा आणि सद्-भावनेचा प्रवाह सुप्त होता, तो जणू प्रकट होत होता. कोणी जवळ गेले की एखादे दुसरे वाक्य श्रीगुरुजी बोलायचे. चौकशी करायचे. श्रीगुरुजींना बरे वाटावे म्हणून या काळात देशभरात भगवंताला किती प्रकारे आळवले गेले असेल, किती लोकांनी जपजाप्य, व्रते केली असतील, याचा हिशेब लावणेच अशक्य! श्रीगुरुजी मात्र ठिकठिकाणच्या संघ शिक्षा वर्गांची माहिती स्मरणपूर्वक घेत.

दि. ३१ मे पासून श्वास अधिकच जड झाला. मोठे सूचक उद्-गार मुखातून निघू लागले. राष्ट्र सेविका समितीच्या संचालिका वं. मावशी केळकरांना दि. ३ जूनला ते म्हणाले, "माझी पूर्ण तयारी झाली आहे." दि. ४ जूनला रात्री श्री बाबूराव चौथाईवाल्यांनी तेल लावण्याकरता तेलाची बाटली उपडी केली. हातावर तेल घेतले. बाटलीत तेल उरले नव्हते. त्यांना म्हणाले, "ते संपले? ठीक, असत. बहुतेक वेळ उत्तरभिमुख खुर्चीवर अर्धेन्मीलित नेत्रांनी ते बसलेले असत. एखाद्या 'निजधामा' चे वेध लागलेल्या योग्यासारखे. दि. ४ ला अंथरुणावर न झोपता खुर्चीवरच बसून होते. शरीराची खोळ टाकून देण्यास दिवस त्यांच्या दृष्टीने जणू ठरलाच होता. ती खोळ निरुपयोगी झाली होती!

ज्येष्ठ शुध्द पंचमी. दि. ५ जून १९७३, सकाळी स्नान झाले. आसनावर बसून संध्या झाली. वास घेणे अवघड झाल्यामुळे डॉ. आबा थत्ते ऑक्सिजन देऊ लागले. तेव्हा म्हणाले, "अरे आबा, आज घंटी वाजते आहे." सकाळच्या वेळी हातापायाची नखे त्यांनी काढली. खुर्चीवर बसले तेव्हा कमंडलू उजवीकडे ठेवला. जणू प्रवासाला निघताना तो उजव्या हाताशी असावा म्हणून. एरवी कमडलू डावीकडे ठेवलेला असे. शरीर अस्वस्थ होते. खूप वेदना होत असाव्यात. लघुशंकेला डॉ. थत्ते यांच्या आधाराने गेले. स्वच्छ हातपाय धुतले. खूप वेळा चुळा भरल्या. भगवंताकडे जाताना शरीर स्वच्छ व पवित्र हवे ना! डॉक्टरांनी प्रकृती हाताबाहेर जात असल्याचे दुपारी सांगितले. श्री. बाळासाहेब देवरस यांना संदेश गेला. सायंकाळी खुर्चीवरुन उठू न देता बसूनच प्रार्थना म्हणण्यासाठी सांगण्यात आले. नंतर ७-३० वाजता चहा आला. तो त्यांनी नाकारला. रात्री आठ वाजता लघुशंकेसाठी श्री. बाबूराव चौथाईवाले यांच्या आधाराने स्नानगृहात गेले. हातपाय धुवून चुळा भरण्याचा सपाटा मांडला. ११ वेळा चुळ भरुन झाल्यावर बाबूरावांनी तांब्या दूर केला व त्यांना उठविले. पण बाहेर पडण्यासाठी वळताच श्रीगुरुजींनी मान बाबूरावांच्या खांद्यावर टाकली. एका हाताने श्रीगुरुजींना धरुन त्यांनी दार उघडले. श्रीगुरुजींचे पाऊल पुढे पडेना. श्रीगुरुजींच्या सेवेत असलेले विष्णुपंत मुठाळ धावून आले, दोघांनी उचलूनच त्यांना बाहेर आणले व खुर्चीवर बसविले. डोळे बंद, हालचाल बंद, केवळ मंद श्वास चालू.

डॉ. थत्ते धावले. डॉक्टर मंडळीना फोन गेले, डॉक्टर आले. त्यांनी 'कशाचाच काही उपयोग नाही, त्यांना शांतपणे जाऊ द्या' असा अभिप्राय दिला. हळूहळू श्वास आणखीच मंद झाला मुद्रा प्रसन्न दिसू लागली. रात्री ९ वाजून ५ मिनिटांनी एक जोराचा अंतिम श्वास बाहेर पडला. श्रीगुरुजींचा आत्मा देहाच्या बंदिवासातून मुक्त झाला! सभोवार कार्यकर्ते होते. त्यांना दु:खावेग अनावर होऊन गेला. त्यांनी श्रीगुरुजींचे पार्थिव शरीर खाली आणले. कार्यालयाच्या एका मोठया कक्षात नीट ठेवले.

श्रीगुरुजी गेले, ही वार्ता नागपुरात वाऱ्यासारखी पसरली. रेडिओनेही वृत्त दिल्याने देशभर सगळयांना कळली. रात्री ९ च्या सुमारास खूप गर्दी झाली. अंत्यदर्शनासाठी रांगा लागल्या. अंत्ययात्रा दुसऱ्या दिवशी सायंकाळी निघायची होती. तेही वृत रेडिओवरुन सर्वत्र कळले होते. परगावाहून

स्वयंसेवक मोठया संख्येने येऊ लागले. दि. ६ ला महालातील डॉ. हेडगेवार भवनाच्या परिसरात सहस्त्रावधी शोकमग्न स्त्रीपुरुषांचा तळच पडला होता.  श्री. बाळासाहेब देवरस दुपारी येऊन पोहोचले व त्यांनी सद्-गद होऊन अंत्यदर्शन घेतले.  श्रीगुरुजींच्या शरीरावर पुष्पहारांचा खच पडला होता. गीतापाठ चालू होता.

श्रीगुरुजींनी लिहून श्री. पांडुरंगपंत क्षीरसागर यांच्याजवळ दिलेल्या तीन पत्रे उघडण्यात आली. त्यांपैकी पहिल्या पत्रात बाळासाहेब देवरस यांच्याकडे संघकार्याची धुरा सोपविली असल्याचे श्रीगुरुजींनी लिहिले होते.  महाराष्ट्र प्रांत संचालक मा. बाबाराव भिडे यांनी ध्वनिक्षेपकावर गंभीर आवाजात ते पत्र वाचून दाखविले.  उर्वरीत दोन पत्रे श्री. बाळासाहेब देवरस यांनी वाचून दाखविली. त्यांपैकी एका पत्रात आपले स्मारक उभारु नये अशी अंतीम इच्छा व्यक्त केली होती तर दुसऱ्या पत्रात, आपल्याकडून जे कोणी कळत-नकळत दुखावले गेले असतील त्यांची हात जोडून क्षमा मागितली होती. आपले भाव व्यक्त करणारा तुकाराम महाराजांचा -

शेवटची विनवणी । संतजनी परिसावी

विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हासी॥

आता फार बोलो कायी । अवघे पायी विदित

तुका म्हणे पडतो पाया। करा छाया कृपेची ॥

हा अभंग लिहिला होता.  हे पत्र वाचताना श्री. बाळासाहेबांचा कंठ अवरुध्द होऊन गेला.  एका महान आत्म्याच्या त्या विनम्रतेने सगळेच लोक भारावून गेले.  बहुतेकांच्या डोळयांना अश्रूंच्या धारा लागल्या. हमसून हमसून रडणारे स्त्रीपुरुष तर कितीतरी.

मग नव्या सरसंघचालकांनी महायात्रेस निघालेल्या दिवंगत सरसंघचालकांना पुष्पहार अर्पण केला.  यावेळी त्यांचा शोकावेग अनावर होऊन गेला होता.

अंत्ययात्रा निघाली.  रामधुन आणि भारत माता की जय व 'श्रीगुरुजी अमर रहे' याच केवळ धीरगंभीर घोषणा.  अपार जनसागर या महायात्रेसाठी लोटला होता.  श्रीगुरुजींचा पार्थिव देह असलेल्या ट्रकखेरीज एकही वाहन या भव्य अंत्ययात्रेत नव्हते.  सुमारे तीन लक्ष लोक या यात्रेत असावेत. ५-४५ वाजता निघालेली अंत्ययात्रा ७-४५ वाजता रेशीमबाग मैदानावर पोहोचली.  आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्या स्मृतिमंदिराच्या जवळ पूर्वेच्या बाजूला चंदनाच्या चितेवर श्रीगुरुजींचे पार्थिव शरीर ठेवण्यात आले.  साऱ्या वातावरणावर उदास शोककळा पसरली होती. पुण्याचे श्री. वासुदेवराव गोळवलकर यांनी मंत्राग्नी दिला.  ज्वाला उफाळल्या व तीन तपांहून अधिक काळ संघासाठी अविरत झिजलेला तो देह त्यांनी कवेत घेतला.  याच वेळी भगवा ध्वज वर चढविण्यात आला.  संघाची प्रार्थना म्हणण्यात आली.  'भारतमाता की जय' ही घोषणा झाली व जनसागर पांगला.

## २०. कृतज्ञ राष्ट्राची श्रध्दांजली

श्रीगुरूजींच्या हयातील त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत वादग्रस्त ठरले होते, यात शंका नाही. कोणी त्यांना जातीय म्हटले, कोणी प्रतिगामी म्हटले, कोणी सत्तापिपासू म्हटले तर कोणी उत्पाती आणि हिंसाचारी म्हटले, मुसलमान व ख्रिश्चन यांचा द्वेष्टा अशीही त्यांची प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. पण त्यांचा पार्थिव देह कायमचा दृष्टिआड होताच सगळे वाद क्षणात विरून गेले, सगळे पूर्वग्रह एकदम बाजूला सरले आणि महान देशभक्त आणि राष्ट्राचा उपकारकर्ता म्हणून त्यांच्यावर शब्दसुमने श्रध्दांजलीपर लेखात बहुतेक सर्वच वृत्तपत्रांनी, शोकसभांतील वक्त्यांनी आणि त्यांच्या विरोधकांनीही उधळली. 'ब्लिट्झ' सारख्या ज्या 'गुलाबी' साप्ताहिकाने श्रीगुरूजींची प्रतिमा विकृत करण्याचा सतत प्रयत्न केला, त्याने देखील निर्मळपणे श्रीगुरूजींचे गुणविशेष गौरविले. 'ब्लिट्झ' ने लिहीले, "आपल्या धोरणांविषयीची त्यांची श्रध्दा दुबळी नव्हती. आपल्या ध्येयसिध्दीसाठी ते कोणत्याही प्रकारचा त्याग करावयास सदैव कटिबध्द असत आपले ध्येय साध्य करण्यात ते सफल ठरले. त्यांची विचारसरणी पुनरूत्थानवादी होती की जातीयतावादी होती, हा विषय विवाद्य आहे. पण ज्या एकनिष्ठ भक्तीने त्यांनी संघाचे संगोपन केले, त्याबद्दल कुणीही आक्षेप घेऊ शकणार नाही. त्यांचे वैयक्तिक जीवन संन्यस्त होते आणि त्यांची संघटनक्षमता अद्वितीय होती. त्यांच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारे व्यक्तिद्वेष नव्हते. आपल्या ध्येयाच्या वाटचालीत आळस कधी त्यांना शिवला नाही. त्यांच्या शब्दांत कधी दुबळेपणा डोकावला नाही. कपाळावर कधी थकल्याच्या आठ्या आढळल्या नाहीत. पूर्णपणे समर्पित अशा या जीवनाचे अनुकरण इतर राजकीय नेत्यांनी करावे हे उचित ठरले. याच गुणसंपदेमुळे ते आपल्या असंख्य अनुयायांत स्वत:विषयी पराकाष्ठेची आदरभावना निर्माण करू शकले."

वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांतून श्रीगुरूजींसंबंधी जे संपादकीय आणि अन्य लिखाण त्यांच्या मृत्यूनंतर आले, ते विपुल असल्याने त्या सगळयाचीच दखल येथे घेता येणे अशक्य आहे. एक अतिशय मार्मिक व समतोल गुणग्रहणात्मक लेख मायावती (उ.प्र.) येथून प्रसिध्द होणाऱ्या 'प्रबुध्द भारत' मासिकात प्रसिध्द झाला, त्याचा थोडा अंश येथे उद्-घृत केला तरी पुरे. बाकी एवढेच म्हणता येईल की, भारताच्या राष्ट्रीय पुनर्निर्माणाचे जे कार्य आयुष्यभर समर्थपणे आणि बाणेदारपणे श्रीगुरूजींनी केले, त्याची कृतज्ञ पावतीच मृत्यूनंतर एकूण वृत्तपत्रसृष्टीने त्यांना दिली. 'प्रबृध्द भारत' ने लिहिले आहे, "आपल्या जीवनकाळात श्री. गोळवलकर हे खूप विवादस्पद व्यक्तित्व होते. एकीकडे त्यांचे अनुयायी त्यांच्यावर अलोट प्रेम करीत होते, खूप आदर बाळगून होते, तर दुसरीकडे त्यांच्यावर टीका करणारे त्यांच्यासंबधी भयंकर घृणा प्रकट करीत असत. पण त्यांच्या मृत्यूनंतर आज आपल्याला काय आढळून येते? बहुधा त्यांनाही आश्चर्य वाटत असेल की, देहत्यागानंतर त्यांच्याविषयीचा वाद समाप्त होऊन राखेत मिसळून गेला आणि त्यांचे निर्मळ जीवन त्या राखेतून तेजस्वीपणे चमकून उठले. त्यांच्या स्मृतीला आज जी श्रध्दासुमने अर्पण केली जात आहेत, त्यांत अनेक श्रध्दासुमने तर अशा लोकांकडून अर्पण केली जात आहेत की, ज्यांच्याकडून तशी अपेक्षाही नव्हती. बिनधाग्याच्या या श्रध्दांजली - पुष्पहारातील अनेक पुष्पे निरनिराळया ठिकाणांहून स्वाभाविकरीत्या उमलून एकत्रित आली आहेत. त्यांत सुवास आहे आणि विविधताही आहे.

"गोळवलकरांचे जीवन हा एक उघड ग्रंथ आहे आणि तो कुणीही वाचू शकतो. काही मुद्द्यांवर आपण त्यांच्याशी सहमत होणार नाही, असे होऊ शकते. परंतू आज त्याचे तितकेसे महत्व उरलेले

नाही.  आज जर महत्व कशाला असेल तर ते याला आहे की, श्रीगुरूजींच्या रूपाने आपण सर्व असे एक जीवन बघतो आहोत, जे जीवन निष्कलंक, निस्वार्थी आणि निर्भय आहे.  ते स्वत:साठी जगले नाहीत तर संपूर्णपणे सर्वांसाठी जगले.  जगात किती लोकांच्या बाबतीत असे म्हणता येईल?

"राष्ट्राचे अस्तित्व आणि राष्ट्राचा सुव्यवस्थित विकास यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांचे संरक्षण झाले पाहिजे, हेच त्यांनी आपल्या वागण्याबोलण्यातून लोकांच्या मनावर बिंबविले, ही त्यांनी भारताची व भारतीय जनतेची केलेली खूप मोठी अशी सेवा होय.  ज्यावेळी जाणकार राजकीय नेते नदी-योजना, औद्योगीकरण, कुटुंबनियोजन, जीवनस्तर इत्यादींच्या गोष्टी करीत होते, त्यावेळी श्रीगुरूजी अनुशासन, शक्ती, निर्भयता, चरित्र्य, नि:स्वार्थ सेवा, सक्रिय देशभक्ती यांची शिकवण देत होते.  आणि या शिक्षणाखेरीज उपरोक्त आधुनिक उदिष्टे भारताला उज्ज्वल भविष्य कदापि प्रदान करू शकत नाहीत.  आज 'वॉटरगेट' वगैरेसारख्या भ्रष्टाचाराने आणि अनुशासनहीनतेने बरबटलेल्या वातावरणात ते संपूर्ण भारतात चरित्र्यवान, शिस्तबध्द व्यक्ती घडविण्याचे काम करीत होते, हे आणखी विशेष होय."

आपली संसद, राष्ट्रपती, पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी श्रीगुरूजींना श्रध्दांजली वाहण्याचे कर्तव्य पार पाडले याचा मुद्दाम उल्लेख करावयास पाहिजे.  संसदीय राजकारणात कधी श्रीगुरूजी पडले नाहीत.  पण त्यांची महत्ताच अशी होती की, कोणी त्यांची उपेक्षा करू शकत नव्हते.

प्रश्न असा पडतो की, श्रीगुरूजींच्या मतांत एवढे विवाद्य होते तरी काय? ती मते विवाद्य ठरविली तरी कोणी? आणि आज जर त्या मतांच्या विवाद्यपणाची धार बोथट झाली असेल तर ती कशामुळे? या प्रश्नांची उत्तरे काळानेच देऊन टाकली आहेत.  आपण लक्षपूर्वक ती ध्यानात घेतली तर जाणवेल की, भारतवर्षामध्ये एक आवश्यक मानसिक परिवर्तन प्रत्यक्षात घडवून आणून आणि त्या परिवर्तनामधील विचार सुप्रतिष्ठित करून या देशाला त्यांनी नष्टचर्यापासून वाचविले आहे.  तीन तपे अहर्निश झिजून आणि आपली आध्यात्मिक गुणवत्ता, विद्वत्ता, प्रखर बुध्दिमत्ता, अमोघ वक्कृत्व आणि समस्त शक्ती पणाला लावून भारतीय मन खऱ्या अर्थाने घडविण्याचे जे कार्य त्यांनी केले, ते अतुलनीय होय. जीवनातील त्यांची प्रत्येक हालचाल याच एकमेव उद्दिष्टाने प्रेरित झालेली होती.

पारंतंत्र्याच्या काळात ब्रिटीशांशी झगडायचे आहे, ही मोठी प्रेरणा होती.  त्याखाली कितीतरी गोष्टी सहज झाकल्या जात होत्या.  पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जो जबरदस्त प्रवाह निर्माण झाला तो हिंदूंच्या अहिंदूकरणाचा, म्हणजे हिंदूंच्या प्रत्यक्ष धर्मांतराच्या नव्हे, तर हिंदू हा शब्द लज्जास्पद वाटणे, हिंदूंचे जे आहे ते तुच्छ समजणे, देशाच्या अवनतीसाठी हिंदू संस्कृतीला दोष देणे, परदेशी आचार आणि विचार यांची अंधळी गुलामी पत्करण्याची प्रवृत्ती बळावणे, वरवर दिसणाऱ्या भेदांवर भर देऊन एकात्मतेचे हिंदुत्वरूपी खरे अंत:स्थ सूत्र नगण्य ठरविणे, राजकीय स्वार्थासाठी अहिंदू अल्पसंख्य समाजाचा अमर्याद अनुनय करणे, संस्कारांची परंपरा तुटणे इत्यादी गोष्टीनी हा प्रवाह बनलेला होता.  आजही तो नष्ट झालेला आहे असे नाही.  पण त्यावेळी आत्मावमानाची, संस्कार-भ्रष्टतेची, जे जे हिंदू त्याचा असमंजस उपहास करण्याची आणि जन्माने हिंदू असूनही स्वत:त हिदुत्वाचा एकही गुणविशेष शिल्लक न ठेवण्याची प्रवृत्ती, 'पुरोगामी' म्हणून प्रतिष्ठा पावली होती.  सेक्युलॅरिझम - म्हणजे संप्रदाय - निरपेक्षता - या शब्दाचा अर्थ हिंदुत्वाच्या अभिमानापासून तुटणे व हर हर न हिंदुर्न यवन: अशा त्रिशंकू अवस्थेप्रत पोचणे हा होऊ लागला होता.  हिंदू अस्मिता छिन्नविच्छन्न करण्याच्या या कामांत ख्रिस्ती मिशनरी, कम्युनिस्ट प्रचारक, समाजवादाचे अभिनिविष्ट पुरस्कर्ते, आधुनिक शिक्षण घेतलेले विद्वान आणि सत्तालोभी राजकारणी असे सारेच जण

भिन्न भिन्न हेतूंनी सहभागी झाले होते व निर्भयतेने, छातीठोकपणे या देशाच्या विशुध्द राष्ट्रीयत्वाचा उद्-घोष करणारा आणि हिंदू काळात असल्याचा अभिमान आपल्याला वाटावा एवढी ती परंपरा भव्योदात्त आहे, असे आत्मविश्वासाने सांगणारा अग्रणी सार्वजनिक जीवनात कोणी दिसत नव्हता. संघाची व्याप्ती फारच मर्यादित होती.

अशा परिस्थितीत, श्रीगुरूजी खंडित भारताच्या सार्वजनिक जीवमंचावर उभे झाले व ही सगळी लाट थोपविण्याचा, एवढेच नव्हे तर तिला हिंदुत्वाच्या अभिमानाची दिशा देण्याचा बराचस सफल प्रयत्न त्यांनी केला. देशात जी चालू होती ती अहिंदूकरण, अराष्ट्रीयीकरण आणि विघटीकरण (de-Hinduisation, de-natioalisation and disintegration) यांची अनर्थावह प्रक्रिया होय व तिच्या योगाने देशाचे नष्टचर्य ओढवेल, असे श्रीगुरूजी तळमळीने सांगत, पण त्यांच्या ओजस्वी प्रतिपादनात भावात्मक (positive) आवेश प्रामुख्याने असे, हिंदू परंपरेची अभिमानास्पद वैशिष्ट्ये, आधुनिक जगालाही दिशाबोध करून देण्याची तिची क्षमता, हिंदू जीवनादर्शांची अजोड उत्तुंगता आणि भारतवर्षाचे नियत जीवनकार्य (World Mission) यांचे इतके बिनतोड व परिणामकारक विवेचन ते करीत की, ऐकणारा भारावून जाई, त्याच्यातील स्वत्व जागृत होई. राष्ट्रीय पुनरूत्थानाचा हा जो मंत्र श्रीगुरूजींनी शहरोशहरी, खेडोपाडी आणि दुर्गम गिरिकंदरातही घुमविला, तो खरोखरच अमोघ होता. मुर्दाड होऊन गेलेल्या हिंदू मनातही चैतन्य फुंकणारा होता. आज केवळ ‘मी हिंदू आहे’ या अभिमानपूर्ण जाणिवेने देशात लक्षावधी लोक जम्मू - दिल्लीपासून कोचीन-कन्याकुमारीपर्यंत सहज एकत्र येऊ शकतात हे श्रीगुरूजींनी अहिंदूकरणाचा प्रतिकार करून हिंदूपणाच्या विधायक अभिमानाचा जो भाव जागृत केला, त्याचे दृश्य फल होय.

आद्य-सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांनी “आपले हे हिंदू राष्ट्र आहे” असे म्हटले, तर लोकांनी त्यांची गणना वेडयांत केली, देश १९४७ साली ब्रिटिशांच्या राजकीय गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतर संघाची ही हिंदू राष्ट्राची भाषा जातीय, प्रतिगामी, फुटीर व अंध पुनरूज्जीवनवादी असल्याचा प्रचार भल्याभल्यांनी केला. संघ नष्ट करून टाकण्याचे आडदांड प्रयत्न झाले. पण तीच भाषा सत्य, राष्ट्राला जीवनशक्ती पुरविणारी आणि देशाचे मस्तक जगात उन्नत करणारी आहे, असे हिमतीने म्हणणारांची प्रचंड मांदियाळी आणि देशाचे मस्तक जगात उन्नत करणारी आहे, असे हिमतीने म्हणणारांची प्रचंड मांदियाळी श्रीगुरूजींनी आसेतुहिमाचल आपल्याच जीवनकाळात उभी करून दाखविली. या कार्याचे माहात्म्य खरोखर शब्दातील आहे. हिंदू जातीयता आणि प्रतिगामिता हे दूषण देणारे शब्दच श्रीगुरूजींच्या जीवनकर्तृत्वाने गुळगुळीत, निरर्थक आणि आरोपकर्त्यांवरच बूमरँगप्रमाणे उलटणारे बनून गेले.

श्रीगुरूजींचे व्यक्तित्व विवाद्य बनविणारांनी असा प्रयत्न केला की, ते जणू जातिभेद, वर्णभेद व हिंदूंतील कालबाह्य रूढी आणि कर्मकांड यांचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. आधुनिक समाजरचना व समानतेच्या अकांक्षा यांची त्यांना ‘सनातनी’ अभिनिवेशामुळे काही जाणच नाही. ‘नवाकाळ’ मधील मजकुराने केवढे वादळ महाराष्ट्रात उठविले होते, याचे स्मरण या संदर्भात होण्यासारखे आहे. आजही अनेक हितसंबंधी लोक श्रीगुरूजींच्या विधानांची विकृत मोडतोड करून संघावर हेत्वारोप करीतच असतात. वास्तविक श्रीगुरूजींचे म्हणणे एवढेच होते की, माणसाचे मानसशास्त्र, त्याच्या शारीरिक, बौध्दिक, भावनिक व आध्यात्मिक गरजा आणि मानवी जीवनाचे चरम लक्ष्य यांचे अवधान ठेवून आपल्या पूर्वजांनी एक समाजरचना निर्माण केली. ती बराच काळ चालली. अत्यंत श्रेष्ठ व सुसंस्कृत

जीवन या देशात निर्माण झाले. काळाबरोबर जर ती रचना विकृत झाली आहे तर कालसुसंगत रचना उभी करण्याचे दायित्व आपण पार पाडलेच पाहिजे. 'युगानुकूल' या शब्दाचा वापर श्रीगुरूजी अत्यंत अन्वर्थकपणे करीत असत. गीतेनेही कर्मकांडाबाबत युगानुकूल क्रांतिकारक विचार पुढे मांडला, असे ते म्हणत असत. पूर्वजांवर घृणास्पद हेत्वारोप आज करू नका एवढे मात्र ते जरूर म्हणत. तेव्हा जुन्यालाच घट्ट चिकटून राहण्याच्या पक्षाचे ते होते, हा प्रचार म्हणजे निखालस बिनबुडाचा अपप्रचार होय, त्यांचा एवढा आग्रह अवश्य होता की, आपल्या हिंदू परंपरेने जी जीवनमुल्ये दिली आहेत व माणसाला अखंड आनंदानुभूतीचे जे मोक्षरूप लक्ष्य सांगितले आहे, त्यांचा शाश्वत आधार घेऊनच कोणतीही नवी रचना उभी करावी लागेल. ठाण्याच्या अभ्यासवर्गात समाजवाद, साम्यवाद, भांडवलवाद, लोकशाही इत्यादी सर्व आधुनिक समजल्या जाणाऱ्या वादांचे विश्लेषण करून हिंदू विचारच मानवाला सुखसमृध्दीपूर्ण जीवन कसा देऊ शकेल, याची निर्णायक मीमांसा त्यांनी केली आहे. अस्पृश्यतेच्या कल्पनेला तर त्यांनी कधीच थारा दिला नाही. परिपूर्ण मानवाची हिंदू कल्पना अत्यंत प्रभावी शब्दांत त्यांनी आधुनिक जगापुढे संपूर्ण निश्चयात्मक रीतीने ठेवली. आध्यात्मिक आधारावर मानवी संबंधांचा विचार ही भारताची मानरवतेला चिरंतन महत्वाची देणगी आहे व आजच्या जगाची समस्या अन्य कोठल्याही प्रकारे सुटू शकणार नाही या सिध्दांताबद्दल ते संपूर्णतया नि:शंक होते. हिंदूंची हीच मूलभूत प्रेरणा जागृत करण्यासाठी ते जीवनभर झटले.

ज्याची 'सर्वाभूती एकच आत्मा' अशी अनुभूती होती आणि ज्याच्या जीवनकार्याची तीच मंगल प्रेरणा होती, तो कोणाचा द्वेष कशाला करील? कोणाचे वाईट कशाला चिंतील? मुसलमान वा ख्रिस्ती यांच्यासंबधी प्रसंगविशेष कठोरपणाने श्रीगुरूजी आवश्य बोलले. पण मग हिंदू समाजाच्या आत्मविस्मृतीसंबंधी किंवा खुद्द संघ स्वयंसेवकांतील दोषासंबंधी देखील कठोर भाषेचा वापर त्यांनी केला नाही काय? द्वेष त्यांच्या मनात कोणासंबंधीच नव्हता. ख्रिस्त, महंमद, गौतम बुध्द प्रभृती सर्व संप्रदायनिर्मात्यांविषयी ते आदरानेच बोलत. त्यांच्या जीवनातील प्रसंग सांगत. त्यांची टीका असे ती विध्वंसक, पाशवी, असहिष्णु आणि राष्ट्रविघातक प्रवृत्तींवर. डॉ. जिलानी किंवा सरदार खुशवंतसिंग यांच्याबरोबर त्यांच्या झालेल्या मुलाखती प्रसिध्दच आहेत. 'मुस्लिम आणि ख्रिश्चन प्रॉब्लेम' किंवा 'मायनॉरिटीज प्रॉब्लेम' सोडविण्याचा त्यांच मार्ग आणि भीतिग्रस्ततेने व सत्तालोभाने तुष्टीकरणामागे लागलेल्यांचा मार्ग यांत मूलभूत अंतर होते. खिलाफत चळवळीच्या काळापासून करण्यात आलेल्या अनुनयात्मक प्रयत्नांची घातुकता देशविभाजनाने निर्णायकरीत्या सिध्द करून टाकली होती. श्रीगुरूजींचा मार्ग देशातील राष्ट्रीय म्हणजेच हिंदू जीवनप्रवाहात सगळयांनी सामील व्हावे, हा होता.

पंतप्रधान पं. नेहरू हे समिश्र संस्कृतीबद्दल बोलत असत. भारतातील संस्कृतीला केवळ हिंदू संस्कृती म्हटल्यास सगळयांना बरोबर घेऊन जाणे अवघड ठरेल, अशी त्यांची भावना होती. १९५७-५८ च्या सुमारास नेहरूंशी झालेल्या भेटीत गंगेच्या प्रवाहाचे उदाहरण देऊन श्रीगुरूजींनी संभाषणाच्या ओघात असे प्रतिपादन केले होते की, गंगेच्या प्रवाहात अनेक लहानमोठे जलौघ येऊन मिळतात, पण प्रवाह गंगेचाच राहतो. त्याचे नाव बदलत नाही. हिंदू संस्कृतीचा एक विराट प्रवाह आहे. त्यात अनेक मतमतांतरे आणि संप्रदाय समाविष्ट आहेत, ते हिंदू संस्कृतीपासून भिन्न मानता येत नाहीत. नेहरूंच्या उदार विचारांचे मूळ हिंदू संस्कृतीच आहे, असेही श्रीगुरूजींनी प्रसन्नपणे सांगितले. अशा मतभेदांमुळे थोडीही कटुता श्रीगुरूजींच्या चित्तात येत नसे, उलट, कार्यकर्त्यांना या भेटीचे वृत्त

सांगताना, 'नेहरू हिंदी फार शब्द बोलतात आणि मलाच उर्दु वा इंग्रजी शब्द मी कोठे वापरतो की काय, अशी धास्ती वाटत होती.' या प्रकारचा गुणग्रहणात्मक उल्लेख त्यांनी केला.

संघ हिंदूंचेच संघटन का करतो, या प्रश्नाला त्यांनी पुन:पुन्हा दिलेले उत्तर मार्मिक आहे. त्यांचे उत्तर असे की, आपले घर प्रथम आपण नीट केले पाहिजे. ती पहिली गरज आहे. इतरांना सामील करून घेण्याचा प्रश्न स्वाभाविक भावी विकासक्रमाचा (evoluyion) आहे. श्रीगुरूजींच्या निकट संपर्कात आलेले कोणीही ख्रिस्ती वा मुस्लिम बांधव त्यांच्यावर नाराज झाल्याचा किंवा श्रीगुरूजी 'फॅनॅटिक' असल्याचे (धर्मांध) असल्याचे उद्-गार त्यांनी काढल्याचा अनुभव नाही. उपासनापंथांच्या वैविध्यायर श्रीगुरूजींचा आक्षेप कधीच नव्हता. या दृष्टीने हिंदू खराखुरा 'सेक्युलर' असतो, हेच ते सांगत, इतरांनी तसेच व्हावे, असे ते प्रतिपादन करीत. मानवतेच्या कार्यात (विस्थापितांना, दुष्काळ-पिडितांना, महापुरात सापडलेल्यांना, भूकंपग्रस्तांना, दीनदु:खितांना किंवा रोग्यांना साहाय्य करताना) उपासनापंथाचा वेगळेपणा त्यांनी कधी मनात आणला, असे घडले नाही. सर्वार्थाने श्रीगुरूजींचे मन हे हिंदू होते. त्यांचे चरित्र्य हे अमूर्त हिंदू चरित्र्य होते. अशा उत्तुंग माणसाला हितसंबंधी बुध्दीने विवाद्य ठरविण्याचा प्रयत्न झाला तरी तो कसा टिकणार?

श्रीगुरूजींचे हिंदू अस्मितेच्या जागृतीने देशाचे पुनरूत्थान घडवून आणण्याचे जे प्रयत्न होते, त्यांचे सातत्याने विकृतीकरण कोणी केले असेल, तर ते मार्क्सवादी म्हणविणाऱ्या सांप्रदायिकांनी, वैचारिक आणि तात्विक पातळीवर या जडवादी संप्रदायाची गय श्रीगुरूजींनी कधीच केली नाही. मार्क्सवादी विचारधारेसबंधी श्रीगुरूजी कठोरतेने बोलत याला तसेच महत्वाचे कारण आहे. देशात इहवादी, समाजवादी किंवा परिस्थितीजन्य सामाजिक स्थितीपुरत्या उपाययोजना सुचविण्याएवढे त्यांचे क्षेत्र मर्यादित होते. धर्माची घराबाहेर लुडबूड नको, एवढेच फार तर ते म्हणत. रशियातून आलेला साम्यवादी विचार सांगणारांचा मात्र असा दावा होता की, त्यांचा विचार जागतिक आहे व सर्व सामाजिक दुखण्यांवर रामबाण आहे, मार्क्सवाद हे एक संपूर्ण जीवनदर्शन आहे. हे जीवनदर्शन स्वीकारणे याचा अर्थ भारताने आपली अध्यात्मावर आधारलेली जीवनमूल्ये सोडून देणे आणि मनुष्य हा केवळ आर्थिक प्राणी असल्याचे मान्य करणे, मार्क्सवादी सिध्दांत हा भारतीय जीवनदर्शनाच्या सर्वस्वी विपरीत आहे. राष्ट्राला परधार्जिणे बनविणारा आहे आणि तो येथे आल्यास हे हिंदू राष्ट्र राहणार नाही, असे श्रीगुरूजींचे ठाम मत होते. धर्मविरोधी, जडवादी, हिंसाचारी, हुकूमशाहीचे समर्थन करणारा असहिष्णु कसा गुदमरून जाईल, हे श्रीगुरूजींनी सडेतोडपणे देशभर सर्वत्र सांगितले. त्यांनी असेही पटवून दिले की खुद्द रशियातच साम्यवादाला अपयश आलेले आहे व त्याला फाटे फुटत आहेत. मानवी स्वभावधर्माला अनुसरून सवलती देणे कम्युनिस्ट देशांना भाग पडत आहे. राष्ट्रवादाचा आधार त्यांनाही सोडता आलेला नाही. दुसऱ्या महायुध्दांत रशियावर जर्मनीने चढाई केली तेव्हा राष्ट्रीय परंपरेचे आवाहनच जनतेत चेतना निर्माण करू शकले, हा दाखला ते देत. चीनचे १९६२ साली भारतावर आक्रमण झाले त्यावेळी प. बंगालमध्ये उठावाची योजना कम्युनिस्टांनी केली होती. ती अंमलात येऊ न शकल्यानेच चीनने एकतर्फी युध्दबंदी केली आणि कलकत्त्यापर्यंत मुसंडी मारण्याचा विचार सोडून दिला, अशी चीनच्या निर्णयाची उत्पत्ती त्यांनी सांगितली होती. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताने कोणत्याच सत्तागटात ओढले जाऊ नये व साम्यवाद तर आपल्याला रशियाच्या दावणीला बांधेल, असा इशारा ते देत.

आणखी असे की, समाजाची श्रमिक आणि इतर अशी संघर्षात्मक वर्गवारी हिंदू-दर्शनाच्या विरूध्द आहे. द्वेषभावना चेतवून सुखशांतिपूर्ण समाजधारणा होऊ शकत नाही. विचार संपूर्ण समाजाच्या सूखाचा एकाच वेळी करावा लागेल. विविधता अमान्य करून चालणार नाही. आणि ती मान्य करून प्रत्येक व्यक्तीच्या विकासास वाव देणारा हिंदू विचारच सर्वश्रेष्ठ आहे, असे मूलगामी आणि समर्थ प्रतिपादन मार्क्सवादाचे वाभाडे काढताना श्रीगुरूजींनी केले. प्रत्येकाच्या गरज भागल्या पाहिजेत,विषमतेची खाई कमी झाली पाहिजे आणि अनिर्बंध संचय करण्यावर मर्यादा घातली पाहिजे, हे मतभेदाचे मुद्दे त्यांनी मानलेच नाहीत. मार्क्सवाद भारतामध्ये निष्प्रभ करून सोडण्यात श्रीगुरूजींच्या तात्विक आणि राष्ट्रवादी चढाईचे योगदान नि:संशय मोलाचे आहे. तेव्हा कम्युनिस्टांनी श्रीगुरूजीसंबंधी आकस धरल्यास ते कम्युनिस्ट पोथीवादाशी सुसंगतच होय.

या विवाद्यतेचा आणखी एक खास पैलू आहे. स्वातंत्र्य लाभल्यानंतर आपल्या सगळया जीवनावरच झपाटयाने निवडणुकीच्या राजकारणाचा आणि निरर्गल सत्तास्पर्धेचा रंग चंढला. चुलीपर्यंत राजकारण शिरले. लहान लहान गावांतही तट पडले. लोकांना सरकारच्या तोंडाकडे पाहण्याची सवय लागली आणि स्वयंप्रेरणा क्रमंश: मंदावत गेली. कार्यकर्ते आणि पुढारी म्हणविणारांच्या दृष्टीने तर 'राजकारण - निरपेक्ष' असे काही उरलेच नाही, 'सेवा' देखिल मतसापेक्ष बनली. तेव्हा संघासारख्या संघटनेची मदत आपल्याला मिळावी, अशी इच्छा अनेकांच्या मनात स्वाभाविकपणेच निर्माण झाली. या काळातील श्रीगुरूजींच्या यशाची निर्विवाद थोरवी ही की त्यांनी सत्तास्पर्धेच्या राजकारणापासून संघाच्या संघटनेला कटाक्षाने अलिप्त राखले. असे अलिप्त राखले म्हणूनच संघ टिकला आणि वाढला. हिंदुराष्ट्राचा निर्भय पुरस्कार, तसेच त्यासंबधी तडजोडीपलीकडचा आग्रह आणि सत्तास्पर्धेच्या दैनंदिन राजकारणापासून अलिप्तता ही आद्यसरसंघचालकांची दोनप्रमुख सूत्रे होती, श्रीगुरूजींनी ती नुसती अबाधित राखली एवढेच नव्हे तर त्या सूत्रांवरील समर्थ भाष्यकाराचे काम त्यांनी अखंडपणे केले. अनेकांनी संघाशी भारतीय जनसंघाचा संबंध जोडण्याचा व संघ आणि जनसंघ एकरूप असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. श्रीगुरूजी स्वत: निवडणूकीस उभे राहणार अशीही आवई एखादेवेळी वृत्तपत्रांतून उठावयाची. पण श्रीगुरूजी प्रतिपादन करीत गेले की, दैनंदिन बदलत्या राजकारणाला जुंपलेली कोणतीही संघटना राष्ट्र उभारणीचे शाश्वत काम करू शकणार नाही. खुद्द जनसंघाच्या पुढाऱ्यांनाही त्यांनी बजावले होते की, रा. स्व. संघाचे स्वयंसेवक हे आपले अनुयायी किंवा सांगकामे - 'व्हालंटिअर्स' आहेत, ही कल्पना मनात असेल, तर ती साफ काढून टाका. संघाचे जे कोणी स्वयंसेवक अन्यान्य क्षेत्रांत असतील त्यांनी मात्र संघाचा विचार ध्यानात ठेवून व्यवहार केला पाहिजे.

श्रीगुरूजींचे काम मूलत: राष्ट्र उभारणीचे (नेशन बिल्डींग) होते. राजकारणी आणि राष्ट्र उभारणी करणारा असे दुहेरी स्वरूप त्यांचे नव्हते. त्यामुळे निर्भयपणे सत्य बोलायला आणि योग्य दिशा दाखविण्याला ते मोकळे होते. राजकीय दडपणाशी तडजोड श्रीगुरूजींनी कधीच केली नाही. राष्ट्राला हानिकारक धोरणांवर टीका करताना आणि राष्ट्राला हितकारक पर्याय सुचविताना काँग्रेस की जनसंघ, कम्युनिस्ट कामगार आंदोलन की भारतीय मजदूर संघ असा विचार ते मनाला कधीही स्पर्श करू देत नसत. पंजाबातील भाषिक तणावाच्या वेळी , हिंदीची खोटी नोंद न करता पंजाबी मातृभाषा असल्याचे प्रामाणिकपणे नोंदवा असे त्यांनी लोकांना सांगितले होते. ही भूमिका जनसंघाच्या भूमिकेशी जुळणारी नाही, हा विचार त्यांनी केला नाही. ज्यावेळी प्रमुख सत्ताधारी नेत्यांना भेटण्याचा प्रसंग येई, त्यावेळी राष्ट्रहिताचा विचार स्पष्टपणे पुढे ठेवण्याचे कर्तव्य ते करीत असत. कै. लालबहादुर

शास्त्री केंद्रात गृहमंत्री असताना एका भेटीत झालेले बोलणे उदाहरण म्हणून सांगता येईल. या भेटीपूर्वी शास्त्रीजींपुढे एक निदर्शन झाले होते. 'हिंदूनों जागे व्हा' असे फलक हाती घेतलेल्या हजारो लोकांनी आसामातील घुसखोरांच्या प्रश्न भेटीच्या वेळी उपस्थित झाला व शास्त्रीजींनी सरकारची एक अडचण पुढे ठेवली. अडचण अशी की, आसामात बेकायदा शिरकाव केलेले मुसलमान स्थानिक मुसलमानांत मिसळून जातात व त्यांना शोधून त्यांची परत पाठवणी करणे अवघड होऊन बसते. या अडचणीतून श्रीगुरुजींनी सरळ मार्ग सुचविला की, घुसखोरांना आश्रय देणारांची गय शासन करणार नाही, अशी स्पष्ट समज द्यावी. प्रसंगी त्यांना घालवून द्यावे. त्यांचा मतदानाचा अधिकार काढून घ्यावा. हा सल्ला श्रीगुरूजींनी दिला खरा पण त्यांनी शास्त्रीजींना असेही त्याचवेळी सांगितले की, तुम्ही हे काम करू शकणार नाही, करणार नाही. कारण तुमच्या पक्षाच्या निवडणूक गणितात बसणारी ही गोष्ट नाही. तसेच झाले, या प्रश्नाची उग्रता सतत वाढतच गेली. मुसलमानांसाठीही नागरी कायदा (सिव्हिल कोड) असावा, या मागणीसंबधी मतभिन्नता त्यांनी उघडपणे व्यक्त केली होती. भारतीय मजदूर संघाच्या नेत्याशी बोलताना त्यांनी 'कलेक्टिव्ह बार्गेनिंग इज हाय वे रॉबरी' असे फटकारले होते.

स्वत:ला आणि संघाच्या संघटनेला त्यांनी राजकारणापासून अलिप्त राखले व अभेदत्वाने संगळया राष्ट्राचा विचार पदोपदी केला म्हणून एकात्मतेच्या दिव्य साक्षात्काराने अनुप्रणित झालेली युवाशक्ती त्यांना उभी करता आली. ज्याला राष्ट्र उभे करायचे आहे, त्याला प्रथम माणसांचा विचार करावा लागतो. माणसांना भ्रष्ट करून खुर्ची कशी मिळविता येईल, याचा नव्हे! म्हणून श्रीगुरूजींनी आयुष्यभर नि:स्वार्थ, चरित्र्यसंपन्न, मातृभूमीच्या विशुध्द भक्तीने भारलेली आणि कल्याणकारी हिंदू गुणवत्तेने संपन्न अशी माणसे ठायीठायी उभी करण्याचा अविरत प्रयत्न केला. या घडणीसाठी मातृभूमी हे दैवत म्हणून सगळयांच्या पुढे ठेवले. हिंदू परंपरेतील उदात्त भावना फुलविल्या आणि स्वार्थी, भोगवादी वासनांच्या पंकातून बाहेर पडण्याचे पुरूषार्थी आवाहन केले. विजिगीषा जागविली. अन्यथा संघाचे शेकडो प्रचारक, तनमनधनाने संघकार्य करणारे हजारो गृहस्थाश्रमी, आणि विविध क्षेत्रांतील विधायक सेवाकार्य करणारे गुणी कार्यकर्ते आपल्या देशाला कसे दिसले असते? कोणाचा आधार लोकांना वाटला असता? श्रीगुरूजींची आपल्या मतलबी सत्ताकारणात अडचण होते, संघ कोणत्याही प्रलोभनांना वश होत नाही वा दहशतीला भीत नाही, म्हणून श्रीगुरूजींना व संघाला विवाद्य बनविणाऱ्या महाभागांची खरोखर धन्य म्हटली पाहिजे!

या महापुरूषाच्या अंत:करणातील मातृभक्तीची दिव्यता आणि हिंदू आदर्शवादाने त्यात आणलेली आभाळसारखी विशालता, त्यांना 'विवाद्य' बनविणारांना दिसू शकली नाही किंवा दिसूनही स्वार्थापोटी त्यांनी या गुणांकडे डोळेझाक केली, असेच म्हणावे लागते. मतभेद असले तरी 'वयं पंचाधिकं शतम्' हे या महान आत्म्याचे शब्द होते. गांधीजींच्या दुदैवी हत्येनंतर सूडबुध्दीचे पिसाट आघात संघावर झाला तेव्हा 'कोणत्याही परिस्थितीत शांत रहा' हा आदेश होता. संघबंदी उठल्यावर 'तेही आपलेच, विसरा व क्षमा करा' हे त्यांचे सांगणे. राष्ट्रावरील प्रत्येक संकटप्रसंगी सहकार्यासाठी कर्तव्यभावनेने त्यांचा हात पुढे, सेवा मूक, त्याची जाहिरातबाजी नाही. किंमत वसूल करणे नाही. या संबंधात एक मोठा उद्-बोधक प्रसंग ग्वाल्हेर येथे घडला. मे १९७२ चा हा प्रसंग, 'राष्ट्रीय सुरक्षा मोर्चेपर' नामक एक पुस्तक श्रीगुरूजींना सप्रेम भेटीदाखल देण्यात आले. भारत - पाक युध्दाच्या काळात रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांनी केलेल्या कार्याची माहिती या पुस्तकात संग्रहित केली होती. पुस्तक चाळून श्रीगुरूजी म्हणाले, "या प्रकारच्या पुस्तकाचा स्वीकार मी करणार नाही. जर एखाद्या मुलाने

आपल्या आईची सेव केल्याबद्दल बातमी छापतो म्हटले तर ते श्रेयस्कर मानता येईल काय? स्वयंसेवकांनी भारतमातेच्या सेवेसाठी जे काही केले, ते तर त्यांचे स्वाभाविक कर्तव्यच होते. तेव्हा त्याचा प्रचार का करावा?" भारत विभाजनाच्या वेळी आणि देशावरील अन्य संकटसमयी संघाच्या स्वयंसेवकांनी मोलाची कामगिरी केली, बलिदानही केले. मी मी म्हणणारांना साहाय्याचा हात दिला. पण यांपैकी कोणत्याही सेवेचे भांडवल कधी श्रीगुरूजींनी केले नाही. इतरांनी संघाच्या कामाची दखल घेतली असेल, नसेल; लष्करी अधिकाऱ्यांनी संघाचे पुष्कळ कौतुक केले. त्यांना 'स्वयंसेवकांनी जे केले ते रोज कबड्डी (हुतुतू) खेळून' असे साधे उत्तर श्रीगुरूजींनी देऊन टाकले. श्रीगुरूजींच्या राष्ट्रभावनेची व समाजप्रीतीची पुरेपूर सत्वपरीक्षा काळाने घेतली आणि तीत ते जणू प्रावीण्य (destinction) मिळवून उत्तीर्ण झाले. येथेपर्यंत की, 'ज्या समाजासाठी मी काम करतो त्या समाजालाच मी नको असेन, तर त्यांच्यापासून लांब पळून मी काय करू?' असा हृदय पिळवटून टाकणारा प्रश्न, अगदी आणीबाणीचा प्रसंग व्यक्तिगत सुरक्षिततेच्या दृष्टीने उद्-भवला असता शांतपणे त्यांनी अस्वस्थ कार्यकर्त्यांपूढे टाकला! हिंदुत्वाने राजकीय भांडवल करण्याची श्रीगुरूजींना कधी इच्छाच झाली नाही. उलट, विश्व हिंदू परिषद कोणत्याही राजकीय पक्षातर्फे बोलवू नये, असाच विचार त्यांनी केला. 'काँग्रेसमध्ये या' हे पटेलांचे निमंत्रण त्यांनी संपूर्णपणे उपेक्षिले. संघाच्या स्वयंसेवकांनाही आधी संघ आणि मग इतर गोष्टी असेच मार्गदर्शन त्यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्रीगुरूजी आणि स्वातंत्र्यानंतर अखंडपणे सत्तेवर राहिलेले काँग्रेस शासन यांच्यात मोकळेपणाचे, सामंजस्याचे, आणि परस्परपूरकत्वाचे संबंध राहिले नाहीत, हे देशाचे मोठेच दुदैव. याला सन्मान्य अपवाद एकच आणि तो म्हणजे फारच अल्पकाळ पंतप्रधानपदी राहिलेल्या श्री. लालबहादुर शास्त्री यांचा. श्रीगुरूजींना भेटण्यात शास्त्रीजींना संकोच वाटत नसे. १९६५ मधील युध्दाच्या प्रसंगी त्यांनी श्रीगुरूजींना आग्रहपूर्वक दिल्लीला बोलावून घेतेले होते आणि श्रीगुरूजींनी सर्वपक्षीय बैठकीत संपूर्ण सहकार्याचे आश्वासन शास्त्रीजींना दिले होते. तसे गृहमंत्री सरदार पटेल यांच्याशी श्रीगुरूजींचे संबंध चांगले होते व पटेलांच्या अंत:करणात श्रीगुरूजीसंबंधी फार सद्-भावना होती. शास्त्री किंवा पटेल यांच्याशी त्यांचे अगदी मतैक्य थोडेच होते? १९४९ मध्ये संघबंदी उठल्यानंतर त्यांनी जो प्रवास केला, त्यात कितीतरी भिन्नभिन्न मतांच्या लोकाग्रणींना ते भेटले. यांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. गोपालस्वामी आयंगार, श्री. काकासाहेब गाडगीळ, डॉ. राजेंद्रप्रसाद, श्री. पुरूषोत्तमदासजी टंडन, डॉ. रघुवीर, श्री. जयनारायण सिंह, डॉ. एम. के. दार प्रभृतींची नावे सहज डोळयांत भरतात. विशिष्ट सुखदु:खाच्या प्रसंगात पत्रे लिहितानाही मतभेदांचा विचार त्यांच्या मनाला स्पर्श करीत नसे, संघस्वयंसेवकांच्या परिवारात एखादी दु:खद घटना घडली असता ज्या सहज आत्मीयतेने ते पत्र लिहीत, तेवढयाच सहज सहसंवेदनेने त्यांनी श्री. फिरोझ गांधी यांच्या मृत्यूनंतर पं. नेहरू यांना पत्र लिहिले. देशसेवेची प्रमाणिक भावना असली पाहिजे आणि मन निर्मळ असेल, तर सहकार्यासाठी काहीना काही भूमिका उपलब्ध होऊ शकते, असे ते मानत. पंतप्रधान पं. नेहरू यांनी संघविरोधी प्रचार खूप केला व त्यांच्या कन्या श्रीमती इंदिरा गांधी यांनीही सत्तेवर आल्यानंतर संघाला झोडपण्याच्या बाबतीत पित्याला मागे टाकण्याचा प्रयत्न केला. स्वाभिमान आणि निर्णयस्वातंत्र्य गमावून सत्ताधाऱ्यांशी श्रीगुरूजी कधी बालेले नाहीत. १९४८ मधील संघबंदीच्या वेळी सरकारशी केलेला पत्रव्यवहार याची साक्षी देईल. कोणाचीच स्वार्थी खुशामतखोरी त्यांनी केली नाही. पण त्यांच्यासारख्या नेत्याची पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्याशी प्रत्यक्ष भेट होण्याचा साधा योग कधी येऊ नये, याला काय म्हणावे? इंदिराजींचा विषय निघाला असता श्रीगुरूजी सदैव औदार्यानेच

बोलले आहेत.  एकदा लोकसभेत बोलताना जनसंघनेते श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी 'दॅट वुमन' असा शब्दप्रयोग केला होता.  त्यावर श्रीगुरूजी फार नाराज झाले होते.  मातृशक्तीसंबंधी अशाप्रकारे बोलणे त्यांना कधीच रूचत नसे.  इंदिराजींच्या संबंधातीलच श्रीगुरूजी यांनी १९७१ मधील युध्दानंतर केलेला एक उल्लेख म्हणजे त्यांच्या भावनेचे हृदय उदाहरण आहे. प्रसंग होता ४ फेब्रुवारी १९७३ रोजी बंगलोर येथील विशाल जनसमुदायापुढील भाषणाचा.  श्रीगुरूजींनी, "आमच्या समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष पंतप्रधान" असा इंदिराजींचा उल्लेख करून म्हटले, "त्या आणि इतर लोक यांना असे म्हणावे लागले की, आमची ५ हजार वर्षांची जुनी परंपरा आहे आणि आम्ही कुणाच्या धमक्यांपुढे नमणार नाही.  आम्हीही हेच म्हणतो. ... संघाचे सदस्यत्व पुरूषापुरतेच मर्यादित आहे. पण आमच्या पंतप्रधान एकदम असे बोलल्या की, जणू काही त्या संघाच्या घटकच आहेत.  माझ्या मते पंतप्रधान असल्याने पुरूष किंवा स्त्री असा प्रश्नच नाही.  आपली माता ही केवळ एक महिलाच नसते तर त्याहून फार श्रेष्ठ असते.  या पृथ्वीतलावर ते एक विशाल व्यक्तित्व असते. आपल्यासाठी ती शक्तीचा मूलस्त्रोत असते...... या विशिष्ट पदाबद्दल माझ्या मनात अत्यंत आदरभाव आहे.  त्याच आदरभावाने मी आता बोललो आहे.  तात्पर्य असे की, ज्या भावनांचे प्रतिपादन करून, त्या भावना समाजात जागृत करण्याचा संघ गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहे, त्याच भावना पंतप्रधानांनी व्यक्त केल्या. पंतप्रधानांच्या या उद्‌-गारांनी मी फारच आनंदित झालो." श्रीगुरूजी स्त्रियांना भेटत नाहीत व त्यांच्याशी बोलत नाहीत अशी मद्रास येथील एका भगिनीची कल्पना होती.  त्यासंबधी बोलताना श्रीगुरूजी म्हणाले, "त्यांचे म्हणणे खरेच आहे, मी कोणत्याही स्त्रीला भेटत नाही व बोलत नाही ही वस्तुस्थिती आहे.  मी भेटतो व बोलतो स्त्रीमधून अभिव्यक्त होणाऱ्या मातृत्वाशी." अशा अंत: करणाने सांस्कृतिक उत्थानाचे केलेले अवाहन भारतातील जनतेच्या हृदयाला जाऊन भिडाले आणि हिंदू जीवनाकडे पाहण्याची यथार्थ दृष्टी लोकंना हळूहळू प्राप्त होऊ लागली, तर ते स्वाभाविकच नव्हे काय?

श्रीगुरूजी जनसभांत बोलत आणि त्यांचा शब्द प्रभावी असे.  पण राष्ट्रनिर्मितीचे त्यांचे मुख्य उपकरण म्हणजे राष्ट्रीय स्वंसेवक संघ, त्याचा कार्यकर्ता आणि स्वयंसेवक. संघाचे अभ्यासवर्ग, संघ शिक्षा वर्ग, आणि स्वयंसेवकांचे मेळावे यांत श्रीगुरूजींनी केलेली विपुल भाषणे उपलब्ध आहेत. त्यांपैकी बहुतेक भाषणांत संघाच्या कार्यकर्त्यात कोणते गुण असावे आणि त्या गुणांचे महत्व आपल्या परंपरेत का मानले गेले आहे याचे विवेचन श्रीगुरूजींनी केलेले आढळते.  कार्यकर्ता गुणसंपन्न असला तरच चांगले काम होऊ शकते, असे त्यांचे सूत्र होते.  'पोलिटिकल' किंवा 'रिऍक्शनरी' हिंदू असण्यात भूषण नाही.  हिंदू परंपरेने जी गुणसंपदा भूषणावह मानली आहे, ती आपल्या ठायी आपण बाणवून खरे हिंदू बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.  अशा स्वयंसेवकांचा प्रभावशाली संघ ही संघाची प्रतिमा त्यांना अभिप्रेत होती.  समष्टिरूप परमेश्वर आणि जगन्मातेचे स्वरूप असलेली मातृभूमी यांच्यासंबंधी विशुध्द भक्तिभाव म्हणजे सगळया सदगुणांची जननी असे ते मानत.  हिंदू जीवनधारेसंबंधी योग्य ज्ञान त्यांना कार्यकर्त्यांत हवे असे. नंतर व्यक्ती या नात्याने कार्यकर्ता निरहंकारी, विनम्र, परिश्रमशील, निर्भय, इतरांच्या सुखदु:खांशी समरस होणारा, शरीरबलाने युक्त, बहुतांना राजी राखणारा पण तत्वाच्या बाबतीत दृढ, विश्वासर्ह, स्नेहशील, सत्चारित्र व नेतृत्वास पात्र असला पाहिजे, असे त्यांना वाटे.  आपल्या प्राचीन परंपरेतील अनेक उदाहरणे देऊन आणि गोष्टी सांगून या गुणांचे महत्व ते स्वयंसेवकांच्या मनावर बिंबवीत.

आपल्या भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात होऊन गेलेल्या अनेकानेक थोर पुरूषांच्या जीवनकथा म्हणजे संस्कारांचे एक समृध्द भांडार आहे, असे श्रीगुरूजी म्हणत. लहानपणापासून अशा चरित्रांचे अफाट वाचन झाले असल्याने व प्रत्येक प्रसंगाचा योग्य बोध ग्रहण करण्याची तीक्ष्ण बुध्दिमत्ता लाभलेली असल्याने या कथांचा भरपूर वापर श्रीगुरूजींच्या भाषणात आढळतो. श्रीगुरूजींनी सांगितलेल्या या गोष्टींचे काही संग्रह देखील प्रसिध्द झाले आहेत. श्रीगुरूजींचे वक्तृत्व हा तर श्रोत्यांच्या दृष्टीने आगळाच अनुभव असे. त्यांतील तर्कशुध्दता, ओजस्वीपणा, भावोत्कटता आणि उदात्त सदगुणांना आवाहन यांचा विलक्षण संगम श्रोत्यांवर परिणाम करून जात असे. लक्षावधी लोक मंत्रमुग्ध होऊन राष्ट्रीय समस्यांना भिडणारे व एक नवी दृष्टी देणारे हे अमोघ वक्तृत्व श्रवण करीत असत.

इंदूर आणि ठाणे या दोन्ही वर्गात कार्यकर्त्यांना अंतर्मुख होऊन आपल्या गुणदोषांचा विचार करण्यास त्यांनी सांगितले. समाजात वावरणारा संधाचा स्वयंसेवक आत्मविश्वासाने संपन्न आणि हिंदू गुणवत्तेचा आविष्कार करणारा असल्यास संघाचा प्रभाव आपोआप वाढत जातो, असे ते सांगत. हे केवळ परोपदेशे पांडित्य नव्हते. स्वत: चे जीवन त्या मुशीत त्यांनी घडविले होते. हिंदू अस्मितेचे ते प्रतीक बनले होते.

श्रीगुरूजींना ‘विवाद्य’ ठरविणारांचे शब्द हवेत विरून गेले आहेत आणि ज्या थोर सत्यांचा निर्भय पुरस्कार श्रीगुरूजींनी केला ती सत्ये आज ना उद्या प्रस्थापित झालेली दिसणार आहेत. त्याबरोबरच श्रीगुरूजींचे कृतज्ञ स्मरणही भावी पिढयांना होत राहणार आहे.

## २१. स्नेहसूत्री गुंफिले

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक या नात्याने श्रीगुरूजींना जे यश लाभले, ते नि:संशय अलौकिक आहे. पण या यशाचे नेमके मर्म कोणते? त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वाने त्याला यश दिले काय? त्यांचे अपार ज्ञानभांडार लक्षावधी भारतवासीयांच्या अंत:करणाची पकड घेण्यासाठी कारणीभूत ठरले काय? त्यांच्यावर अध्यात्माची झाक होती म्हणून लोक त्यांच्या भजनी लागले काय? विचार केला म्हणजे जाणवते की, यापैकी एक वा अनेक गुण असलेली कितीतरी माणसे आपल्या समाजात आहेत वा होऊन गेली. हिंदुत्वाचा कडवा अभिमान बाळगणे वा हिंदू राष्ट्रवाद बोलणे यांतही विशेष नावीन्य नव्हते. मग श्रीगुरूजींवर लोकांचा एवढा जीव का जडला? जे उत्तर आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्या यशासंबंधात मिळते तेच श्रीगुरूजींच्या संबंधातही निष्पन्न होते.

एका वाक्यात सांगायचे तर श्रीगुरूजींनी स्नेहाचे अमृतसिंचन सर्वत्र केले, आणि त्यांच्या संपर्कात आलेल्या सर्वांनी उलट श्रीगुरूजींना प्रेम दिले, भक्तिभाव दिला, श्रध्देचा विषय त्यांना बनविले. श्रीगुरूजींचा मूळ कल एकांताकडे. हिमालयाच्या शांत गिरिकुहरात जाऊन बसण्यात एकेकाळी त्यांना आनंद वाटला असता. पण सद्-गुरूंची इच्छा कळली, डॉक्टरांच्याकडून संघकार्याचा वसा घेतला आणि त्यांनी एकांताकडे, योगसाधनेतील विशिष्ट व्यक्तिगत आनंदानुभूतीतच डुंबून राहण्याच्या इच्छेकडे जी पाठ फिरविली ती कायमचीच. मग समष्टी हाच त्यांचा भगवंत बनला, मातृभूमी हेच आराध्यदैवत झाले आणि संपर्कात येणाऱ्या प्रत्येक समाजबांधवाला ते चिंदशाच्या रूपानेच पाहू लागले. त्याला भक्तिभावाने सेव्य मानू लागले. भक्तीच्या आणि साधनेच्या 'आत्मनिवेदन' किंवा 'सर्वस्व समर्पण' या पायरीवर ते पोचले होतेच .ते समर्पण आता मातृभूमीच्या चरणी झाले .आत्मनिवेदन झाले म्हणजे भक्त भगवंतापासून वेगळा रहातच नाही .श्रीगुरूजीही समाजापासून वेगळे उरलेच नाहीत .त्यांना एकदा 'धर्मयुग' साप्ताहिकाने स्वाक्षरी केलेला संदेश मागितला होता .उत्सफूर्तपणे त्यांनी तीनच शब्द लिहिले - 'मैं नही, तुही!' माणूस स्वत:ला जेव्हा मिटवून टाकतो, आराध्याशी जेव्हा समरसून जातो, अहंकारासकट सगळे काही समर्पण करून मोकळा होतो, तेव्हा तो आभाळाएवढा बनतो .मग त्याला स्वत:साठी काहीच नको असते .ईश्वराचेच काम तो करीत राहतो .स्वार्थ लोपल्याने कामक्रोधादी विकारांना तो बळी पडत नाही .निर्भय, निर्वैर बनतो आणि मुख्य म्हणजे प्रेम आणि करूणा यांच्या विशाल, अथांग सागराचे रूप त्याच्या अंत:करणाला प्राप्त होते .'पुढा स्नेह पाझरे, मागुता येती अक्षरे' असे या अवस्थेचे वर्णन श्रीज्ञानेश्वरांनी केले आहे.

याच अवस्थेचा प्रत्यय श्रीगुरूजींच्या जीवनात येतो. पूर्वी विद्वत्तेचा थोडाफार अहंकार होता, आणि वाणीही प्रसंगी तिखट असे, हे त्यांनीच स्वत:संबंधी बोलताना म्हटले आहे. नाना प्रमाणे देऊन वादात इतरांना जिंकण्याची खुमखुमी त्यांना असे. पण ते जेव्हा डॉक्टरांपुढे नमले आणि कुशल ध्येयवादी संघटक या नात्याने डॉक्टरांचे गुण त्यांनी अतिशय जवळून पाहिले, तेव्हा प्रयत्नपूर्वक आपला स्वभाव त्यांनी बदलला. 'स्वभावो दुरतिक्रम:' हे मत डॉक्टरांनी खोटे ठरविले आणि श्रीगुरूजींनीही खोटे ठरविले .हे दोघेही महापुरूष स्वत:च्या बाबतीत अत्यंत कठोर होते .आपल्या देहाचे लाड त्यांनी कधी केले नाहीत .दुखण्यांना जुमानल नाही, श्रमांची तमा बाळगली नाही . श्रीगुरूजींनी तर कॅन्सरवरील शस्त्रक्रियेनंतरदेखील शरीराला भगवंताच्या थोर कार्यासाठी निष्ठुरपणे राबविले .पण इतरांच्या बाबतीत 'मृदूनि कुसुमादपि' ही त्यांची अवस्था .'ऐसी कळवळयाची जाती ।

लाभविण करी प्रीती' ही त्यांच्या दिव्य प्रेमाची पायरी .श्रीगुरूजींनी माणसे कशी जोडली, याचे उत्तर या पायरीवरील त्यांच्या निर्मळ अंत:करणात आणि दैनंदिन जीवनात गवसेल .माणसांना ते घडवू शकले कारण त्यांनी लोकांच्या हृदयात प्रवेश केला .तर्क आणि बुध्दी यांच्या सीमा लंघून ते पलीकडे गेले आणि एकेकाच्या हृदयातील ईश्वरभाव, श्रध्दा आणि समस्त सुप्त सच्छक्ती यांना त्यांनी जाग आणली.

म्हणून म्हणायचे की, श्रीगुरूजींनी माणसे जिंकली ती अतूट स्नेहसूत्रात त्यांना बांधून. सतत ३३ वर्षे ते भारतवर्षाचा प्रतिवर्षी किमान दोनदा प्रवास करीत होते. नवनवीन लोकांना भेटत होते. व्यक्तिगत भेटी व परिचय यांच्यावर त्यांचा भर फार. नुसत्या व्याख्यानांनी माणसे घडत नाहीत, नुसत्या वादविवादाने ती कार्यप्रवृत्त होत नाहीत. तिथे हवा असतो संपर्क. चालता बोलता आदर्श. हृदयाला हात घालू शकणारा अनासक्त स्नेहपुंज. श्रीगुरूजींची ज्यांची भेट होई, त्यांना एकदम स्नेहाच्या शीतल, प्रसन्न, आश्वासक छायेत आल्यासारखे वाटे. सुमारे पाऊणशे वेळा काश्मीर ते कन्याकुमारी आणि मुंबई ते गोहाटी केलेल्या प्रवासात अगणित घरी त्यांनी मुक्काम केला असेल. कारण आलिशान अथवा कोठल्याच प्रकारच्या हॉटेलमध्ये ते कधी उतरले नाहीत. हे प्रत्येक घर श्रीगुरूजींचे झाले. त्या घराला श्रीगुरूजींचे स्मरण व श्रीगुरूजींना त्या घराचे स्मरण. लहान बालकांपासून तो वडीलधाऱ्यांपर्यंत सगळयांना श्रीगुरूजी अशी विलक्षण आपुलकी द्यायचे. एवढा विद्वान, स्वत:चा प्रपंच नसलेला आणि एका विशाल संघटनेचा हा नेता लहानांबरोबर लहान होऊन निर्व्याजपणे त्यांच्याशी खेळायचा, शुष्क तत्वचर्चा अडगळीत पडायची आणि सुखदु:खाची चौकशी प्रेमाने व्हायची. तेव्हाही वाणीत अकृत्रिम माधुर्य, खेळकरपणा, कधी कधी खटयाळपणाही! बडे पाहूणे आले आहेत म्हणून घरात कधी ताण नाही, दडपण नाही. आपल्यामुळे कोणाला त्रास होऊ नये. अडचण वाटू नये, म्हणून दक्ष. गरिबाची झोपडी आणि श्रीमंताचा प्रासाद त्यांना सारखेच. दोन्ही ठिकाणी राहण्याचे प्रसंग त्यांच्यावर आले.

एकदा श्रीगुरूजी मध्यप्रदेशात नर्मदा तटाकी असलेल्या मोहीपूर नामक वनवासी खेडयात गेले होते. त्यांचे गुरूबंधू श्री. अमृतानंद महाराज यांचा तिथे आश्रम होता. आश्रम म्हणजे साधीसुधी कुटी, तिथे श्रीगुरूजी थांबले. भोजनाची वेळ झाली. इंदूरहून पं. रामनारायण शास्त्री यांनी भोजनाचे उत्तमोत्तम पदार्थ आणले होते. मेवामिठाईही त्यात होती. पण श्री. अमृतानंदजी महाराज म्हणाले की, इथे ग्रामवासीयांचेच आतिथ्य स्वीकारले पाहिजे. ती सूचना श्रीगुरूजींनी ताबडतोब मान्य केली. पं. शास्त्री यांच्याबरोबरचे खाद्यपदार्थ ग्रामस्थांच्या सुपूर्त करण्यास त्यांनी सांगितले. एका ग्रामस्थाच्या घरी पंगत बसली. गोमयाने स्वच्छ सारवलेल्या अंगणात जमिनीवरच सारे मांडी घालून बसले. श्रीगुरूजी मोठया प्रेमाने त्या वनवासी बंधूकडील अगदी साध्यासुध्या जेवणाचा आस्वाद घेत होते. पत्राळीवरील पदार्थांची प्रशंसा करीत होते. त्यांच्या सोबतच्या इतर 'स्वादभक्तांना' मात्र ते अन्न घशाखाली उतरवे ना !इतरांची पोटे भरली की नाही कोणास ठाऊक, पण श्रीगुरूजी मात्र तृप्त दिसत होते .विदुराघरच्या कण्या किंवा शबरीची बोरे मोठया आवडीने सेवन करून संतुष्ट होणाऱ्या श्रीकृष्णासारखे आणि रामचंद्रासारखे !आणि त्या गावाचा श्रीगुरूजींनी निरोप घेतला तेव्हा सगळया ग्रामस्थांच्या डोळयात वियोगाचे अश्रू उभे राहिले होते.

संपर्कात येणाऱ्यांचया ठायी असा स्नेह जागविणारी विलक्षण आत्मीयता ही श्रीगुरूजींची मोठी शक्ती होती. हेच त्यांच्या अफाट लोकसंग्रहाचे साधेसुधे माध्यम होते. अस्सल स्वदेशी. एकात्मतेच्या प्रत्यक्ष अनुभूतीतून सिध्द झालेले. सर्व दिखाऊ भेदांना क्षणात उल्लंघून जाणारे. जबलपूरला

श्रीगुरूजींचे एक मित्र साम्यवादी दलात होते. त्यांच्याकडे का उतरता, या प्रश्नाच्या उत्तरदाखल श्रीगुरूजी म्हणाले, "तो माझा जुना मित्र आहे .ज्यावेळी मीही संघात नव्हतो आणि तोही कम्युनिस्ट नव्हता, तेव्हाचा त्याच्याशी दृढ संबंध आहे .तेव्हा स्नेह कधीही तोडू नये .आणि माणसाला उपरती होऊन बदल होतच असतो .उद्या तोही संघाचाच विचार करू लागेल, यात मला शंका नाही."

मतभेद असले तरी एकमेकांसंबंधी शत्रुतेचा वा कटुतेचा भाव नसावा असे श्रीगुरूजी सांगत व तसाच त्यांचा व्यवहारही असे. एकदा लाल किल्ल्याच्या मैदानावर सरदार पटेल जयंती समारंभाची सभा होती. डॉ. राधाकृष्णन् हे सभेचे अध्यक्ष होते. या सभेत श्रीगुरूजींचे भाषण झाले, अन्य वक्त्यापैकी डॉ. राममनोहर लोहिया हे एक होते. कार्यक्रम संपल्यावर लोहियांशी त्यांची भेट झाली तेव्हा त्यांना श्रीगुरूजींनी दोन्ही बाहूंत कवटाळून स्नेहपूर्ण आलिंगन दिले. मग तशाच स्नेहाळ शब्दांत त्यांच्या गप्पागोष्टी झाल्या. दोन जानी दोस्त फार दिवसांनी एकमेकांना भेटत असल्याचे वाटावे, असेच ते दृश्य होते. "आपल्याला भेटण्याची पुष्कळ दिवसांची इच्छा आज पूर्ण होत आहे" असे म्हणून आणि हातांत हात घालून दोघांनी मार्गक्रमण केले .हे दुश्य पाहून लोकांना पराकाष्ठेचे आश्चर्य वाटत होते .कारण श्रीगुरूजी आणि डॉ .लोहिया यांची मते व विचार एकमेकांशी जुळत नाहीत .लोहियाजी म्हणाले, "श्रीगुरूजीसंबंधी मी अगदीच चुकीची समजूत करून घेतली होती .पण आता त्यांची प्रत्यक्ष भेट झाल्यानंतर मला मोठा आनंद होत आहे.." करपत्रीजी महाराजांचे उदाहरणही असेच लक्षणीय आहे .करपात्री महाराज हे संघाचे आणि संघविचारांचे कठोर टिकाकार होते .पण विश्व हिंदू परिषदेच्या कार्यात त्यांचे सहकार्य श्रीगुरूजींनी संपादन केले .जेव्हा केव्हा महाराजांची भेट होत असे, तेव्हा त्या काषायवस्त्रधारी संन्याशाला श्रीगुरूजी साष्टांग दंडवत घालत असत.

अशी मतभेदांच्या वर झेपावणारी, स्नेहसंबंधांना जिवापाड जपणारी श्रीगुरूजींची व्यवहारनीती. तत्व आणि व्यवहार त्यांच्या जीवनात एकरूप होऊन गेल्याचे आपल्याला प्रत्यक्ष दिसते. 'वसुधैव कुटुंबकम्' अशी विशाल भावना केवळ तत्वज्ञानाच्या ग्रंथात राहिली नव्हती तर क्षणोक्षणीच्या आचरणात प्रतिबिंबित झाली होती.

एकदा त्यांच्या भेटीसाठी आलेल्या एका दांपत्याच्या लहान मुलाच्या प्रकृतीची चौकशी त्यांनी केली आणि त्याचे ऑपरेशन जर्मनीत झाले होते ना? असा प्रश्न केला. कोणीतरी श्रीगुरूजींना विचारले की, 'आपण एवढया बारीकसारीक गोष्टींचे स्मरण कसे ठेवता?' यावर श्रीगुरूजींनी दिलेले उत्तर सहसा कल्पनेत न येणारे .आपल्या अद्-भूत समरणशक्तीची बढाई त्यांना मारता आली असती .पण अगदी सहजगत्या ते म्हणाले, "माझ्या कुटुंबातील अशा या घटना मी कसा विसरेन? मग त्या कितीही जुन्या झाल्या असल्या तरी काय झाले? या उत्तरातील 'माझे कुटूंब' या शब्दप्रयोगाने सगळयांना श्रीगुरूजींचे यथार्थ दर्शन घडवून टाकले .प्रत्येक परिवार हा त्यांचा परिवार होता आणि सर्वत्र त्यांचा जिव्हाळा होता .त्या प्रेमाचा, जिव्हाळयाचा आणि आत्मीयतेचा थांग कोणालाच कधी लागला नाही .त्या महासागरात जातपात, प्रांत, पक्ष, पंथ इत्यादी सारे भेद बुडून गेल्याचा अनुभव नित्य येई व कोणाच्याही मनात उरे तो प्रेमाचा आणि श्रध्देचा भाव .श्रीगुरूजींच्या जीवनाचे हे अंग एवढे हृद्य, एवढे विलोभनीय आणि एवढे बोधप्रद आहे की, शब्दांनी न मिळणारे पाठ त्यांतून संगळयांना आपोआप मिळून जात .श्रीगुरूजी उतरले असतील तिथे अथवा तेथील परिसरात कोणी आजारी असल्यास औषधोपचारासंबंधी ते आस्थेने विचारपूस करीत .श्रीगुरूजींचे स्वत:चे होमिओपाथीचे ज्ञान चांगले होते .ते सहज एखादे औषधही सुचवायचे .श्रीगुरूजींचा मुक्काम असला की त्या घरात प्रसन्नता कशी

ओसंडत असावयाची .श्रीगुरूजी म्हणजे आपल्याच घरातील एक वडीलधारा, वत्सल, सगळयांना आधारभूत वाटणारा माणूस अशी प्रत्येक कुटुंबीयाची भावना होऊन जावयाची .खरे तर प्रत्येक गावच्या संघचालकाने हीच भूमिका पार पाडावी, म्हणजे कोठेही ताणतणाव न येता, स्नेहाने ओथंबलेल्या वातावरणात, स्वयंसेवकांचा सुसंस्कारित विकास होत, संघाचे काम द्रुतगतीने वाढेल, असे त्यांना वाटे.

श्रीगुरूजींच्या संबंधातील ही एक आठवण आहे. एका गावाच्या वयोवृध्द आणि सुप्रतिष्ठित गृहस्थांना त्यांनी संचालकपद स्वीकारण्याची विनंती केली. त्या गृहस्थांनी स्वाभाविकपणेच विचारले. "संघचालक या नात्याने माझ्याकडून कोणत्या अपेक्षा आहेत? त्यावर पुढील प्रमाणे प्रश्नोत्तरे झाली.

श्रीगुरूजी - असे समाज की, आपण एका संयुक्त कुटुंबाचे प्रमुख आहात. आपल्या कुटुंबात मुले, मुली, नातू आहेत. तर कुटुंबप्रमुख या नात्याने आपले काम कोणते असेल?

उत्तर - मी त्या सर्वांच्या पालनपोषणाकडे लक्ष देईन.

श्रीगुरूजी - आपण त्यांना आपापसात भांडू द्याल काय?

उत्तर - नाही, नाही मी त्यांना आपसात कधीच भांडू देणार नाही.

श्रीगुरूजी - आपल्या कुटुंबातील मुले, मुली, खूप शिकून सवरून चांगली व्हावीत, याकडे आपण लक्ष द्याल की नाही?

उत्तर - त्या सर्वांच्या शिक्षणाकडे मी अवश्य लक्ष पुरवीन.

श्रीगुरूजी -त्या सर्वांच्या जीवनांत स्थैर्य प्राप्त व्हावे, याकडेही आपण लक्ष द्याल ना?

उत्तर- होय, त्याकडेही मी लक्ष देईन.

श्रीगुरूजी - ती सर्व मुले सद्-गुणी व्हावीत याकडे आपण लक्ष द्याल की नाही?

उत्तर - होय, ते माझे कर्तव्यच आहे.

श्रीगुरूजी - संघ-कुटुंबाचा प्रतिपाल करण्यासाठीही आपणाला हेच सारे करावे लागेल.

हा संवाद मोठा बोलका आहे. संघ-कुटुंबाचा प्रमुख या नात्याने कोणत्या नैतिक जबाबदाऱ्या श्रीगुरूजींनी मानलेल्या होत्या. यावर त्यातून उत्कृष्ट प्रकाश पडतो. संघातील अधिकारपद म्हणजे ही जबाबदारी, कुटुंबप्रमुखाप्रमाणे सगळयांकडे प्रेमाने लक्ष देत, त्यांचा विकास घडवीत, कुटुंबाची भरभराट घडवून आणण्याचे काम. कुटूंबात सुसंवाद, आनंद, प्रसन्नता, जिव्हाळा राखण्याचे काम. इथे वेळ आणि कष्ट याचा हिशोब नाही. माणसे जोडण्याचा आणि संघपरिवारासाठी काम करण्याची ओढ त्यांच्या मनात निर्माण करण्याचा हाच सहज आत्मीयतेने झिजण्याचा मार्ग आपल्या सुखदु:खांत वाटेकरी होतो, यासारखे मोठे समाधान माणसाला दुसरे नसते. वितंडवाद घालत न बसता आपल्या स्निग्ध व दक्ष व्यवहाराने हे समाधान जो लोकांना देतो, तो लोकांची अंत:करणे जिंकतो. हे काम श्रीगुरूजींनी किती जीव ओतून केले हे पाहिले, म्हणजे स्तिमित व्हावे लागते. कोणाच्या कुटुंबात काही दु:खद प्रकार घडल्यास सांत्वनाची पत्रे लिहिणे, शक्य असल्यास त्या घरी प्रत्यक्ष जाऊन येणे, रूग्णांना भेटणे व धीर देणे, आनंदाच्या प्रसंगी लोकांच्या आनंदात सहभागी होणे, अडचणी निवारण

करण्यासारख्या असल्यास त्या तत्परतेने दूर करणे, निरोप पोचविणे अशी कामे ते सहजस्वभाव म्हणून करीत.

समाजाची भक्ती, समाजपुरूषाची सेवा यांसारख्या शब्दांत केवढा विलक्षण आशय श्रीगुरूजींनी भरला होता, हे यावरून ध्यानात येईल. उपकारकर्त्यांचा अविर्भाव त्यांनी कधी आणला नाही. गोरगरीब, दु:खी, पीडित यांच्या रूपाने भगवंत आपल्याला सेवेची संधी देतो आहे; ती संधी मिळाल्याबद्दल आपण परमेश्वराचे ऋणी राहिले पाहिजे, हाच त्यांचा रामकृष्ण परमहंसांनी शिकविलेला भाव. श्रीगुरूजींचे विचार आणि त्यांचा व्यवहार पाहिला की स्वामी विवेकानंदांचे संघटित, धर्मजागृत, आधुनिक भैतिक ज्ञानविज्ञान पचवून अध्यात्माच्या पायावर खंबीरपणे उभ्या असलेल्या समर्थ भारताचे स्वप्न साकार करण्यासाठीच श्रीगुरूजीची नियतिने योजना केली होती की काय असे वाटू लागते. तोच व्यवहारिक वेदांत, तीच जिवंत देवांची सेवा, धर्मज्ञान झोपडी-झोपडीपर्यंत नेण्याचा तोच खटाटोप आणि भारताच्या नियत जीवन-कर्तव्याचा तोच बोध. निर्विकल्पाकडून सगुणाकडे वळलेला तसाच जीवनप्रवाह. तीच योगारूढ अवस्था आणि तशीच बुध्दीची धारणाशक्ती. तेच वैराग्य, तोच ज्वलंत स्वाभिमान आणि ‘शक्ती’ संकल्पनेवर तोच भर .तोच साधेपणा आणि तीच तेजस्विता व प्रसन्नता .तोच उद्दाम आत्मविश्वास आणि अमृतपुत्रांना तेच धीरंगभीर आवाहन !फरक एवढाच की, संन्याशाची भगवी वस्त्रे अंगावर नव्हती तर संपूर्ण समाजाला हिंदू अस्मितेच्या एका सूत्रात गुंफुन संघटित स्वरूपात उभा करण्याची आकांक्षा बाळगणारा होता .सर्वस्पर्शी होता .उत्कट भक्ती असेल, भगवंताच्या प्रेमासाठी वाटेल ती संकटे सोसण्याची प्रल्हादासारखी सिध्दता असेल, परिपूर्ण समर्पण आणि शरणागती असेल तर देव प्रसन्न झालाच पाहिजे, ही त्यांची अनुभूतिजन्य श्रध्दा .भक्ती म्हणजे सुळावरची पोळी, कंटाळला, थकला, उतावीळ झाला, डगमगला, त्याने भगवत्-प्राप्तीची आशा सोडावी . ‘उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत’ हा मानवी जीवनातील पुरूषार्थ .त्या पुरूषार्थाने प्रेरित श्रीगुरूजींचे जीवन होते .हा भक्तिभाव आणि पुरूषार्थ कार्यकर्त्यांच्या जीवनात आला, तर समष्टिरूप भगवंत प्रसन्न झालाच पाहिजे, ही त्यांची निस्संदिग्ध ग्वाही.

म्हणून परिस्थितीचे रडगाणे त्यांना निरर्थक वाटे. काम होत नाही म्हणून समष्टिरूप भगवंताला दूषणे देणे हे ते महापाप समजत. समाजच वाईट आहे असे कुणी म्हटले तर ते म्हणत, “बाबा रे, या समाजासाठी काम तुझ्या हातून होणे नाही .जरा अंतर्मुख हो व स्वत:कडे बघ.” अशीच तक्रार करणाऱ्या एका स्वयंसेवकाला त्यांनी येशू ख्रिस्ताला क्रूसावर क्रूर प्रकारे मारण्यात आले, त्या प्रसंगाचे उदाहरण देऊन पत्रात लिहीले, “तो क्रूस स्वत:च्या खांद्यावर घेऊन येशूला वधस्थळी जावे लागले .वाटेत अनेकांनी त्याला दगड मारले .त्याचा अपमान केला .तेव्हा तो परमेश्वर - चरणी प्रार्थना करताना इतकेच म्हणाला की, ‘भगवंता, त्यांना क्षमा कर .आपण काय करीत आहोत हे त्यांना कळत नाही.’ हीच वृत्ती ठेवून आपल्या भोवतीच्या टीकाकारांकडे पाहावे व आपण त्यांच्यासंबंधीचा स्नेह आणि आपुलकी कधी कमी होऊ देऊ नये.” आणखी एका पत्रात श्रीगुरूजींनी लिहिले आहे, “अनेक लोकांशी भेटत असताना प्रत्यक्ष परमश्रेवराची लाज, शरम काढणे किती उचित आहे, याचा विचार करावा .अशी मनाची स्थिती बरी नाही .ती सोडून श्री परमेश्वरावर - त्याच्या चिरंतन चांगुलपणावर , पुर्ण श्रध्दा व समाजासंबंधी खरी आपलेपणाची भावना नित्य हृदयात बाळगली तर निर्दोष काम करता येईल.”

श्रीगुरूजींची जीवदृष्टी संपूर्णत: आध्यात्मिक होती. सभोवारच्या सृष्टीतील चैतन्याचा वेध घेणारी होती. त्यांच्या दृष्टीने क्षुद्र किंवा तुच्छ असे काहीही नव्हते. ज्या ज्या गोष्टींनी आपले जीवन उभे होते, त्या सर्व गोष्टीविषयी कृतज्ञतेची भावना त्यांच्या ठायी होती आणि ही कृतज्ञता त्यांच्या कृतीतून व्यक्त होत असे. एकदा ते पंजाबात दौऱ्यावर असतानाची गोष्ट. एक दिवस सकाळी बाहेर जाण्यासाठी ते त्यांच्या खोलीतून बाहेर पडले. स्वयंसेवक त्यांच्या प्रतीक्षेत उभे होते. श्रीगुरूजींची पादत्राणे दाराबाहेर होती. त्यांनी चपला पायांत घालण्यापूर्वी त्या चपलांना दोन्ही हात जोडून नमस्कार केला. स्वयंसेवक स्तिमित होऊन पाहत होते. तेव्हा श्रीगुरूजींच म्हणाले, "अरे, या चपला माझे रक्षण नाही का करीत? बिचाऱ्या स्वत :झिजतात आणि माझी सेवा करतात .मला मोठी कृतज्ञता वाटते .म्हणून चंपला पायांत घालण्यापूर्वी मी त्यांना नमस्कार करतो .वस्तू छोटया वाटत असतील, पण त्यांचेही महत्व असते." जिथे साध्या चपलेसंबंधी श्रीगुरूजींना एवढी कृतज्ञता वाटत असे, तिथे आपले सारे जीवन चालविणाऱ्या परमेश्वरापुढे ते संपूर्ण शरणागत झाले असले तर त्यात नवल ते काय? प्रत्येक घटनेत ते ईश्वराची इच्छा पाहत .गोष्ट अप्रिय असली तरी परमेश्वराची इच्छा आपल्या कल्याणाचीच असली पाहिजे, या त्यांच्या श्रध्देला कधीही तडा गेला नाही.

याचे एक अत्यंत बोधप्रद उदाहरण सांगण्यासारखे आहे. मद्रास येथील एका संस्थेचे काही काम विशिष्ट मुदतीत करून देण्याचे श्रीगुरूजींनी मान्य केले होते. या कामासंबधी आवश्यक त्या सूचना श्रीगुरूजींनी स्थानिक कार्यकर्त्यांना दिल्या व ते पुढील प्रवासासाठी निघून गेले. पुढे या संस्थेतर्फे श्रीगुरूजींना पत्र गेले की, मुदत टळून गेली तरी काम काही झालेले नाही. श्रीगुरूजींच्या लेखी दिलेल्या शब्दांचे मोल फार होते. त्यामुळे त्यांची एक सर्वस्वी विश्वासार्ह प्रतिमा सर्वत्र निर्माण झाली होती. लोकांचा अनुभव दिलेला शब्द गुरूजी पाळतात असाच होता. त्यांचे प्रवास, बैठका, सभा, भेटीगाठी इत्यादी गुंतागुतीचे कार्यक्रम कित्येक महिने आधी ठरत असत. प्रत्येक कार्यक्रम ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळी होत असे. श्रीगुरूजी वेळेवर पोचतील की नाही, कार्यक्रम होईल की नाही, अशी शंका देखील कोणाच्या मनात येत नसे. हे सांभाळण्यासाठी प्रसंगी श्रीगुरूजींना किती आटापिटा करावा लागत असे, याची वाटेल तेवढी उदाहरणे ठिकठिकाणचे कार्यकर्ते सांगतील. केव्हा केव्हा तर अत्यंत प्रतिकूल वातावरणात कितीतरी अंतर धोक्याच्या मार्गावरून पायी जाण्याचा विक्रम त्यांनी केलेला आहे. सभोवर प्रक्षोभ उसळलेला असता किंवा निसर्गाने रौद्र रूप धारण केले असता अतिशय शांतपणे ते बोलले आहेत व निर्भयतेने पुढे गेलेले आहेत.

तेव्हा ठरल्याप्रमाणे काम झाले नाही याचे श्रीगुरूजींना वाईट वाटणे अगदी स्वाभाविक होते. त्यांनी चौकशी केली व त्यांच्या ध्यानात आले की, स्थानिक कार्यकर्त्यांनी या कामाच्या बाबतीत जरा हेळसांड केलेली आहे. पण त्यांनी या संस्थेच्या प्रमुखांना जे पत्र लिहिले त्यांत कार्यकर्त्यांवर दोषारोप करून स्वत:चा बचाव त्यांनी केलेला नव्हता. त्यांचे हे पत्र त्यांच्या व्यक्तिमत्वाची स्तिमित करणारी उंची दर्शविणारे आहे. त्यांनी लिहिले की, "वेळेवर काम झाले नाही ह खरे आहे .त्यासाठी क्षमाप्रार्थी आहे." हा झाला औपचारिक भाग .पण नंतर त्यांनी आणखी लिहिले, "माझा शब्द खरा झाला नाही यांतही ईश्वरी योजना असावी .कदाचित असे असावे की, आपण बोलल्याप्रमाणे करो असा अहंकार माझ्या ठायी निर्माण होण्याची संभावना परमेश्वराला वाटली असावी .म्हणून, ती शक्यता निर्मूल करण्यासाठी हे अपयश परमेश्वराने मला दिले असावे." आपल्या एखाद्या अपयशाकडे या दृष्टीने किती नेते पाहू शकतील? ज्याला एखाद्या महान ध्येयाची साधना करावयाची असते, त्याने स्वार्थ आणि

अहंकार या अवगुणांना बळी पडण्यापासून अतोनात सावध राहावयास हवे असते, तसे श्रीगुरूजी स्वत : सावध होते आणि कार्यकर्त्यांना - विशेषत :प्रचारकांना सावध राखण्याचा प्रयत्न बैठकी, चर्चा, प्रश्नोत्तर याद्वारे करीत होते .पत्रव्यवहाराचाही उपयोग या दृष्टीने त्यांनी करून घेतल्याचे आपल्या निदर्शनाला येते.

श्रीगुरूजींनी संघाच्या व्यासपीठावरून ध्यानधारणा, व्यक्तिगत उपासना किंवा धार्मिक कर्मकांड यांचे स्तोम माजविले नाही, हे खरे आहे. पण हेही खरे आहे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य ही त्यांनी माणसाला व्यक्तिगत जीवनातही अंतिम साफल्याच्या पायरीवर नेणारी एक प्रेरक स्वरूपाची परिपूर्ण साधनाच मानली. भक्तिपंथाचाच गौरव त्यांनी वाढविला. ते आग्रहपुर्वक म्हणत की, संघाचे कार्य ही एक परिपूर्ण साधना आहे. जो शाखेचे काम तनमनधनपूर्वक, स्वत:ला विसरून करील त्याला आणखी वेगळी साधना करण्याची गरज नाही. 'शाखा यही मेरा भगवान है' अशा स्वरूपाचे त्यांचे सहज निघालेले उद्-गार पाहिले, दैवत या नात्याने मातृभूमीचे त्यांनी केलेले भावपूर्ण वर्णन ऐकले किंवा समष्टिरूप भगवंताच्या निष्काम व नि:स्वार्थ भक्तीचा त्यांनी वर्णिलेला महिमा श्रवण केला, म्हणजे संघकार्याशी अध्यात्म त्यांनी कसे एकरूप मानले होते, याची कल्पना येते.

तृतीय सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांच्या देहवसानानंतर विचारवंत म्हणविणाऱ्या काही लोकांनी असे मतप्रदर्शन केले की, संघसंस्थापक डॉ. हेडगेवार, द्वितीय सरसंघचालक श्रीगुरूजी आणि तृतीय सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांच्या भूमिका वेगवेगळया होत्या. डॉक्टरांचा भर राजकीय जागृतीवर होता, तर श्रीगुरूजींनी संघविचारांना आध्यात्मिक रंग देण्याचा प्रयत्न केला. श्री. बाळासाहेबांनी सामाजिक ऐक्य, समरतसा यांचा आग्रह ऐहिक भूमिकेवरून धरला. त्या दिशेने संघटनेला नेले. पण थोडा विचार केला तर दिसून येईल की, अशा प्रकारची मांडणी ही सर्वस्वी वस्तुस्थितीला सोडून आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, संघकर्याचे राजकीय, आध्यात्मिक आणि सामाजिक आयाम संघाच्या अगदी स्थापनेपासूनच अभिप्रेत होते आणि गेल्या ७० वर्षाच्या काळात संघ त्यापासून कधीही दूर गेलेला नाही.

श्रीगुरूजींच्या बाबतीत विचार केला तर असे दिसते की, यापैकी कोणतेही अंग त्यांनी उपेक्षिले नाही. १९४७ पूर्वी आणि नंतरही श्रीगुरूजींच्या सार्वजनीक भाषणांत राष्ट्रनेते म्हणविणाऱ्यांच्या राजकीय धोरणांची चर्चा आपल्याला सतत आढळते. मुस्लिम अनुनय, काश्मीरचा प्रश्न, ईशान्य भारताच्या ख्रिस्तीकरणाचे उद्योग, राज्यकर्त्यांकडून होणारे फुटीरतेचे पोषण, विस्थापितांची उपेक्षा, युध्दकाळातील धोरणे व करार आणि तह, मातृभूमीविषयी भक्तिभावाचा अभाव, चरित्र्यभ्रष्टता, राजकारण्यांची मूल्यहीनता व असंस्कृतपणा इत्यादींवर त्यांनी सतत टीका केलेली आहे. राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता पुष्ट करण्याचा 'हिंदू' विचार खणखणीतपणे पुढे मांडलेला आहे .राष्ट्रीय स्वत्व म्हणजेच हिंदुत्व आणि स्वातंत्र्य व राष्ट्रउभारणी यांचा मेळ त्यांना अतिशय जिव्हाळयाचा वाटत होता .वेळोवेळी त्यांची पत्रकारांशी, संघ कार्यकर्त्यांशी वा संघाबाहेरील पुढारी व कार्यकर्ते यांच्याशी झालेली प्रश्नोत्तरे वाचली तर कितीतरी राजकीय प्रश्नांवर निर्भीड उत्तरे त्यांनी दिलेली आढळतात .आंतरराष्ट्रीय राजकारण किंवा आर्थिक समस्या यासंबधीही ते बोलले आहेत.

विशेष म्हणजे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी संघानुकूल विचारांचा राजकीय पक्ष (भारतीय जनसंघ) काढण्याचे ठरविले तेव्हा संघाचे दोन अतिशय गुणी कार्यकर्ते त्यांनी डॉ. श्यामाप्रसादांना दिले. राजकीय क्षेत्रातही राष्ट्रवादी संघविचाराचा प्रभाव निर्णायक स्वरूपापर्यंत पोचला पाहिजे, ही त्यांची

इच्छा त्यांनी लपवून ठेवलेली नव्हती. परंतु त्यांचे असे निश्चित मत होते की, केवळ राजकारणाच्या माध्यमातून देश उभा करता येणार नाही. हिंदू राष्ट्र आपल्या सांस्कृतिक वैभवासहित पुन्हा जगाच्या गुरूस्थानी आरूढ व्हावयाचे असेल, तर जीवनाचे प्रत्येक क्षेत्र हिंदू जीवनमूल्यांचा अविष्कार करणारे बनले पाहिजे. सारी धोरणे आणि व्यवहार यांची समान मूल्यांच्या अधिष्ठानावर फेरआखणी झाली पाहिजे. संघाच्या शाखांत जे संस्कार केले जातात, त्याच संस्कारांनी संपूर्ण समाजजीवन प्रभावित झाले पाहिजे.

या पक्रियेत जसा राजकारणाचा समावेश होतो, तसाच समाजघटकांच्या परस्परांशी असलेल्या व्यवहाराचाही समावेश होतो. म्हणजे सामाजिक जीवनातील आदर्शाभिमुख सुधारणा हा राष्ट्रउभारणीच्या कार्याचा एक अविभाज्य भाग ठरतो. सेवाकार्यांचे संघाला जे महत्व वाटते तेही याच दृष्टीने. म्हणून सामाजिक आणि सेवाकार्यांच्या अंगाची उपेक्षा श्रीगुरूजींनी मुळीही केली नाही. कितीतरी सामाजिक विचारांना व कार्यांना त्यांनी चालना दिली. आज संघाच्या प्रेरणेने जी अनेक सेवाकार्ये चाललेली आपल्याला दिसतात, त्यांच्यापैकी बहुतेक श्रीगुरूजींच्या काळातच, त्यांच्याच प्रेरणेने, सुरू झालेली आहेत. ज्यांनी समग्र समाजजीवन दृष्टीपुढे ठेवून कार्य केले अशा थोर विभूतींत गांधीजी आणि श्रीगुरूजी या दोघांचे स्थान अनन्य असल्याचे श्री. यादवराव जोशी आवर्जून सांगत असत. गांधीजींनी सामाजिक जीवनातील परिवर्तनासाठी स्वदेशी विचारांवर आधारलेल्या अनेक अखिल भारतीय संस्था सुरू केल्या. शैक्षणिक सुधारणेवरही त्यांचा भर होता. श्रीगुरूजींनी विश्व हिंदू परिषद, अ.भा. विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, वनवासी कल्याण आश्रम, कुष्ठरोग निवारण संघ इत्यादी कितीतरी संस्थांना प्रेरणा दिली व त्यांचे मार्गदर्शन केले हे आपण जाणतोच. ही सारी कामे आज चांगली वाढली आहेत व आणखी विस्तारत आहेत. वनवासी बांधवांच्या ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून होणाऱ्या कपटपूर्ण धर्मांतराचा प्रश्न श्रीगुरूजींना फार व्यथित करत असे. जशपूरच्या वनवासी कल्याण आश्रमाच्या निर्मितीसाठी श्रीगुरूजींनीच आपल्याला प्रेरणा दिली व धर्मांतराच्या कारणांनाच लगाम घालण्यास सांगितले, असे या आरमाचे संस्थापक श्री. बाळासाहेब देशपांडे नेहमी सांगत असत. चांपा येथील कुष्ठरोग निवारण कार्याची प्रेरणाही श्रीगुरूजींचीच होती, हे सर्वविदित आहे.

अध्यात्म, धर्म आणि संस्कृती हा तर संघकार्याच्या ध्येयधोरणाचा एक आवश्यक भाग अगदी पहिल्या दिवसापासूनच राहिलेला आहे. संघाची प्रतिज्ञा आणि प्रार्थना या दोहोंतही या उद्दिष्टाचे स्वच्छ प्रतिबिंब आपल्याला आढळते. 'विधायास्य धर्मस्य संरक्षणम्' , समुत्कर्ष नि:श्रयसस्यैकमुग्रम् या प्रार्थनेतीलच ओळी आहेत. प्रतिज्ञेतही हिंदू धर्म, हिंदू संस्कृती यांचे रक्षण करून हिंदू राष्ट्राला स्वातंत्र्य हवेच, पण ते धर्म आणि संस्कृती यांच्या रक्षणासह असावे व स्वतंत्र देश 'परमवैभवशाली' व्हावा अशीही त्याची आकांक्षा आहे .सुसंघटित, समर्थ आणि स्नेहपूर्ण व परिश्रमशील समाजजीवनच देश परमवैभवशाली बनवू शकेल .त्यासाठी राष्ट्रभक्तीची प्रबळ प्रेरणा जागृत असावी लागते.

निष्कर्ष असा निघतो की, अमुक सरसंघचालकांनी अमुक गोष्टी गौण मानल्या व तमुक गोष्टी पुढे रेटल्या, ही मांडणीची पध्दतीच असमंजसपणाची आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक या तिन्ही अंगानी राष्ट्रजीवन परिपुष्ट करणारे असे संघाचे कार्य प्रारंभापासूनच राहिलेले आहे व आजही ते तसेच आहे.

श्रीगुरूजींची अखंड कार्यमग्नता, त्यांची प्रसन्नता, चैतन्यमयता व हिंदू समाजासंबंधीचे अंथांग प्रेम याचा पुष्कळदा चमत्कार वाटावयाचा. या चमत्काराचा थोडासा उलगडा एकदा

श्रीगुरुजीनीच केला. प्रसंग घडला तो काशीला. तिथे डॉ. पी. के. बॅनर्जी यांच्याकडून श्रीगुरूजींनी दात काढवून घेतले. त्यानंतर डॉ. बॅनर्जी यांनी श्रीगुरूजींना काही दिवस संपूर्ण विश्रांती घेण्यास सांगितले. सोबतच्या कार्यकर्त्यांनाही समजावले की, यांना विश्रांती मिळेल याकडे लक्ष द्या.

कार्यकर्त्यांची मनापासून इच्छा की, श्रीगुरूजींची प्रकृती राहावी. या इच्छेपोटीच त्यांनी दुसऱ्या दिवसापासून श्रीगुरूजींच्या बैठकी, भेटीगाठी, बोलणे इत्यादी सर्व गोष्टी बंद केल्या. त्यांना संपूर्ण विश्रांती लाभेल अशी चोख व्यवस्था केली. पण घडले ते विपरीतच. दिवसभराच्या विश्रांतीने श्रीगुरूजींना रात्री स्वस्थ वाटणे तर दूरच राहिले, जोराचा खोकला सुरू झाला. तोंड व डोळे खोकून खोकून लाल झाले. पहाटेच्या वेळी तर हा त्रास खूपच वाढला. सभोवारचे कार्यकर्ते काळजीत पडले. खोकल्याचा हा उपद्रव थांबविण्यासाठी काय करावे हे त्यांना कळेना. होणारे कष्टही पहावतना.

त्यांची ती अवस्था असहायपणे अवलोकन करणाऱ्या कार्यकर्त्यांना श्रीगुरूजी म्हणाले "तुम्हा सर्व लोकांची जी इच्छा आहे, तिचेच पालन मी करतो आहे ना!" स्वयंसेवकांना काही कळेना .ते अगदी रडवेले झाले .तेव्हा श्रीगुरूजीच म्हणाले, "तुम्हाला ठाऊक नाही, पण शरीर तर केव्हाच संपलेलं आहे . या स्थूल देहात रोगाविना अन्य काहीही नाही .संघकार्य वाढविण्याची तिव्र इच्छा आणि कार्याचा संकल्प, रात्रदिवस स्वयंसेवकांशी आणि कार्यकर्त्यांशी कार्याबद्दल बोलणे तसेच कार्यक्रमांत सहभागी होणे हेच माझे जीवन आहे .जीवनच कार्यक्रममय होऊन गेले आहे .अशा प्रकारच्या दिनचर्येनेच माझे हे पार्थिव शरीर एकत्र बांधून ठेवले आहे .ते तसे स्वस्थ आहे आणि सर्व कार्यक्रम पार पाडण्याएवढे सक्षमही आहे .पण आता जेव्हा तुम्ही - माझ्यावरील तुमच्या प्रेमाखातर का होईना -सर्व कार्यक्रम बंद केले, कार्यकर्त्यांना भेटणे व त्यांच्याशी बोलणे थांबविले, तर शरीर आपल्या स्वाभाविक रोगजर्जर अवस्थेकडे येत आहे .जर माझे स्वास्थ्य तुम्हाला हवे असेल, तर माझी स्वाभाविक दिनचर्या पुनश्च सुरू होईल, अशी व्यवस्था करा."

सारे जण ऐकत होते. श्रीगुरूजींनी केलेले रहस्योद्घाटन, सगळयांच्या अंत:करणांना स्पर्शून गेले होते. श्रीगुरूजींना आराम वाटण्यासाठी काय करावयास हवे हे कळले होते. लगेचच संगळे निर्बंध दूर करण्यात आले. स्वयंसेवक आणि कार्यकर्ते पूर्वीप्रमाणे भेटींसाठी येऊ लागले. बैठकी रंगू लागल्या. श्रीगुरूजी स्वत: हसू लागले व इतरांना हसवू लागले. खोकला कुठे पळाला ते कळलेच नाही.!

कशी ती कोणास ठाऊक, पण स्वयंसेवक, कार्यकर्ते आणि प्रचारक मंडळी यांची मानसिकता श्रीगुरूजींना नेमकी कळत असे व तदनुसारच बैठकीतील प्रश्नोत्तरांना दिशा ते मोठया कौशल्याने देत असत. एकदा उत्तर प्रदेशात जौनपूर येथे प्रचारकांची एक बैठक चालू होती. त्या बैठकीत प्रत्येक प्रचारकाला श्रीगुरूजींनी एक प्रश्न विचारण्याचा सपाटा लावला होता. प्रश्न होता : "तुझा विवाह झालेला आहे काय?" सगळे जण बचुकळयात पडले की, असा प्रश्न श्रीगुरूजी का विचारताहेत? शिवाय, जर उत्तर विवाह झाला आहे असे आले तर आणखी प्रश्न विचारले जात, मुलंबाळे आहे काय? पत्नी कुठं असते? वगैरे.

उत्तरे ऐकत असता ध्यानात आले की, बहुतांश प्रचारक विवाहित आहेत. मुलंबाळं मात्र नव्हती. पण पत्नी घरीच अथवा माहेरी होती. बालविवाहाच्या प्रथेमुळे अशी परिस्थिती उद्-भवली होती हे उघडच होते. पण या प्रश्नोत्तरांतून जी वस्तुस्थिती प्रथमच प्रकाशात आली, तिचा बैठकीतील वातावरणावर विलक्षण परिणाम झाला. संभव असा आहे की, आम्ही विवाह न करता संघकार्याला वाहून घेतले, आम्ही फार मोठा त्याग करीत आहोत, असा भाव काही अविवाहित प्रचारकांच्या

मनामध्ये निर्माण झाला असावा, हे गुरूजींनी जाणले असावे. या प्रश्नोत्तरानंतर तो अहंकार, चूरचूर होऊन गेला असेल तर नवल नाही. हे सगळे प्रचारक एकमेकांना भेटणारे, ओळखणारे - पण विवाहित प्रचारकांनी विवाह व पत्नी यांच्याबद्दल कधी अवाक्षर काढले नाही. आणि हे रहस्य इतरांना कधी कळले नाही. तारूण्यसुलभ उपभोग सहज घेणे शक्य असताना ज्वलंत ध्येयनिष्ठेपायी त्याकडे पाठ फिरवून कार्यात झोकून देणारे प्रचारक केवढे थोर ! घरी वा माहेरी एकाकी जीवन कंठून पतीला राष्ट्रकार्यासाठी मोकळीक देणाऱ्या त्या वीरांगनांचा महिमा किती वर्णावा? सगळयांचीच मने या कर्तव्यतत्पर राष्ट्रभक्तांविषयीच्या श्रध्देने आणि अभिमानाने भरून आली. श्रीगुरूजींना हवा तो परिणाम घडून आला.

तुकाराम महाराजांनी विष्णुदासांचा, म्हणजे ईश्वरचरणी संपूर्णत: शरणागत झालेल्या भक्तांचा, एक विशेष गुण सांगताना म्हटले आहे, 'मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास कठिण वज्रास भेदू ऐसे.' श्रीगुरूजींच्या जीवनात या गुणाचा आढळ सतत होत असे .श्रीगुरूजींच्या मातोश्री ताई सांगत असत ."मधू प्राथमिक शाळेच्या चौथ्या इयत्तेत असताना 'केवढे क्रौर्य हे!' ही कविता त्याच्या वाचनात आली .शिकाऱ्याने विध्द केलेल्या पक्षिणीचे 'क्षणोक्षणी पडे उठे परि बळे उडे बापुडी' असे अत्यंत करूण वर्णन कवीने केले आहे .ते वाचताना मधूच्या डोळयांतून आश्रुधारा वाहत .एवढे कोमल त्यांचे अंत:करण होते." पण १९४२ साली संघाच्या कामासाठी घरदार सोडून तरूण स्वयंसेवकांनी प्रचारक म्हणून बाहेर पडावे .अशी हाक देण्यात आली .'नाऊ ऑर नेव्हर' असे निकाराचे आवाहन मा . बाळासाहेब देवरसांनी ओजस्वीपणे केले .त्याच वर्षी संघ शिक्षा वर्गात बोलताना श्रीगुरूजीही अत्यंत कठोरपणे म्हणाले की, "आय् हॅव कम टु टेक चिल्ड्रेन फ्रॉम दि लॅप्स ऑफ देअर फादर्स." मुळात दोन हजार वर्षापूर्वी येशू ख्रिस्ताने उच्चारलेले हे वाक्य .पण संघाच्या संदर्भात श्रीगुरूजींनी उच्चारले, आशय हा की, मातापित्यांची माया त्यागून मुलांनी संघकार्यात झोकून द्यावे, घरदार सोडून देशाच्या निरनिराळया भागांत जावे, यासाठी त्यांना मी प्रवृत्त करीत आहे .अशा प्रकारे बाहेर पडलेल्या काही मुलांच्या माता रडल्या, श्रीगुरूजींकडे आपल्या मुलांची पदर पसरून भीक त्यांनी मागीतली .पण 'बाबारे, घरी परत जा' असे त्यांनी कोणाला सांगितले नाही .स्वत:च्या बाबतीतही ते असेच कठोर होते .रूग्णशय्येवरील मातेला सोडून संघकार्यासाठी प्रवासाला ते मन घट्ट करून जात असत . परमेश्वरावर त्यांनी सगळे काही सोपवून दिले होते .पण अंत:करणातील कोमल भाव इतरांचे कष्ट पाहून अपरिहार्यपणे जागा होत असे.

राष्ट्र उभारणीचे काम म्हणजे मूलत: माणसे जोडण्याचे, स्वेच्छेने स्वीकारलेल्या अनुशासन त्यांना आणण्याचे, त्यांना घडविण्याचे आणि राष्ट्रासाठी समर्पणास त्यांना प्रवृत्त करण्याचे काम असते. ते काम करताना तात्कालिकाकडे, सवंगतेकडे बघून धावाधाव करण्याचा मोह टाळावा लागतो. श्रीगुरूजींनी संघाला ध्येयसाधना एकाग्रपणे करता यावी म्हणून त्याला जसे दैनंदिन सत्तेच्या राजकारणापासून दूर ठेवले, तसेच वारंवार भुरळ घालणाऱ्या, आकृष्ट करणाऱ्या आंदोलनात्मक राजकारणापासूनही संघाला अलग राखले. श्रीगुरूजींच्या अमदानीत संघाने संघ या नात्याने अंगावर घेऊन केलेली आंदोलने केवळ दोनच. एक पहिल्या बंदीकाळातील सत्याग्रह - आंदोलन आणि दुसरे १९५२ मधील गोहत्याविरोधी आंदोलन. बाकी जेवढी कामे संघ स्वयंसेवकांनी केली ती समाजाचा घटक या नात्याने, संघाबाहेर असलेल्या समाजबांधवांच्या बरोबर राहून. त्यात वेगळेपणाचा अभिनिवेश नव्हता की, श्रेयाचा हपाप नव्हता. तात्कालिक उत्तेजना येऊन संघटनेसारखे काम करता येत नाही आणि ती उत्तेजना संपली की पूर्वीपेक्षाही अधिक शैथिल्य येते. कार्यावर लक्षच राहत नाही व

नाना विकल्प चित्तात निर्माण होतात. म्हणून जो 'नेशन बिल्डर' असतो, त्याला दूरदृष्टीने विचार करावा लागतो .नैमित्तिक कामाच्या पायी नित्य कामाची हानी होणार नाही किंवा त्याचे महत्व गौण ठरणार नाही, अशी काळजी घ्यावी लागते .संघाचे संगोपन करताना डॉक्टरांनी ही काळजी घेतली आणि श्रीगुरूजींनीही बेसावध पाऊल कधी उचलले नाही .१९४८ मध्ये अगदी अपरिहार्य म्हणूप संघर्ष केला, पण त्याचे परिणाम दिर्घकाळ संघटनेला नंतर सोसावे लागले, असे उद्-गार एकदा त्यांनी काढले होते.

शिवाय, माणसे घडविताना त्यांची क्षमता हळूहळू वाढवावी लागते, याची जाण त्यांना उत्तम प्रकारे होती. ते स्वयंसेवकांना नेहमी सांगत की, एकदम खूप मोठे काही करून दाखविण्याची भाषा व्यर्थ आहे. वेळ आली म्हणजे करून दाखवू ही प्रौढी पोकळ असते. प्रथम अगदी साध्या आणि लहान लहान गोष्टी व्यवस्थितपणे करण्याची सवय अंगी बाणविली पाहिजे. शारीरिक शिक्षणासंबंधी विचार करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांनी म्हटले होते की, प्रत्येक स्वयंसेवक दक्ष, आरम आणि स्वस्थ या आज्ञांचे काटेकोर पालन करतो अशी स्थिती वर्षभरात तुम्ही सर्वत्र निर्माण केली तरी ती फार मोठी कामगिरी ठरेल. श्रीगुरूजी स्वत: कुठेही वावरताना छोटया छोटया गोष्टींबाबत देखिल अतिशय दक्ष असत. वेळेची बंधने काटेकोरपणे पाळणे, जेवताना पानात काही न टाकणे, स्वच्छ साधा भारतीय पोशाख करणे, एक दिवसही संघाची प्रार्थना चुकू न देणे, ठरलेल्या मिनिटाला भाषण संपविणे, सत्पुरूष आणि वडिलधारी माणसे यांना चरणस्पर्शासह नमस्कार करावयास न चुकणे, एकही पत्र अनुत्तरित न राहू देणे इत्यादी गोष्टी दिसावयास अगदी लहान दिसतात. पण त्यांचा असा व्यवहारच त्यांच्यासंबंधी आदरबुध्दी वाढविण्यास आणि त्यांच्या शब्दाला वजन आणून देण्यास कारणीभूत ठरला होता. मोठमोठया गोष्टी करण्याची पाळी काही रोज येत नाही. पण प्रसंग येईल तेव्हा पात्रता कमी पडू नये म्हणून नित्याच्या सवयी उत्तम असल्या पाहिजेत, हा त्याचा आग्रह होता. स्वत:चे वागणे त्यांनी या आग्रहाशी संपूर्णत: सुसंगत राखले होते.

बोलल्यासारिखे चालणे । स्वये करूनि बोलणे।

तयांची वचने प्रमाणे । मानिती जने ॥

ही समर्थांची उक्ती श्रीगुरूजींच्या व्यवहाराचे मर्म प्रकट करणारी आहे.

अशी निर्मळ, स्नेहल आणि विशाल जीवनदृष्टी असल्यामुळे सभोवारच्या परिस्थितीत आणि माणसांत जे जे चांगले दिसले, जे जे समाजहिताचे वाटेल, त्याचे गुणग्रहण करण्यास ते अगदी तत्पर असत आणि विशिष्ट माणसाच्या गुणवत्तेवरील त्याचे भाष्य मोठे मर्मग्राही असे. खुद्द त्या पुरूषाचे अनुयायी देखील त्यांच्या थोरवीचे रहस्य एवढया उत्तम रितीने उलगडून दाखवू शकले असते की नाही, याची शंका आहे. ठळक उदाहरण म्हणून गांधीजींचे घेता येईल. गांधीजींच्या जीवनकाळात श्रीगुरूजी गांधीजींना अनेकवार भेटले होते. देशविभाजनाच्या भयानक वातावरणात गांधीजींनी स्वयंसेवकांपुढे भाषणही केले होते. एकदा प्रार्थनोत्तर भाषणात गांधीजींनी श्रीगुरूजींचा गौरवपर उल्लेखही केला होता. गांधीजींच्या नानविध गुणांची उत्कृष्ट जाण श्रीगुरूजींना होती. राजकीय व्यासपीठावरून प्रचार करणारे मात्र म्हणत असत की, संघ गांधीजींचा द्वेष्टा आहे. १९४८ साली तर गांधीहत्येच्या कटात सामील असल्याच्या आरोपावरून श्रीगुरूजींना प्रत्यक्ष अटकच करण्यात आली. हा आरोप सरकारने नंतर मागे घेतला ही गोष्ट निराळी. पण आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्या मनात गांधीजींसंबंधी कधीच

आकस नव्हता. गांधीजींच्या आंदोलनात ते दोनदा सामील झाले होते. खिलाफत - आंदोलनासंबंधी मतभेद मात्र जरूर होते. श्रीगुरूजींनाही गांधीजींची किंवा नेहरूंची मुस्लीम अनुनयात्मक धोरणे नि:संशय नापसंत होती. या धोरणांविरूध्द प्रकटपणे ते बोलले. पण गांधी - नेहरूंच्या लोकोत्तर गुणांचेही मुक्तकंठाने गान त्यांनी केलेले आहे. गांधीजीवनावरील आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघात नित्य म्हटल्या जाणाऱ्या प्रात:स्मरणात गांधीजींच्या नावाचा केलेला समावेश यावरील त्यांचे भाष्य उत्कृष्ट आहे. ते जाणून घेण्यासाठी, श्रीगुरूजींनी दि. ६ ऑक्टोंबर १९६९ रोजी सांगली येथे स्टेशनचौकातील महात्मा गांधी जन्मशताब्दीच्या सभेत केलेले भाषण कोणीही नजरेखालून घालावे. हिंदू जीवनमूल्यांवरील गांधीजींची प्रगाढ श्रध्दा व हिंदू धर्माच्या उज्ज्वल भविष्यासंबंधी त्यांचा ठाम विश्वास, त्यांचा सत्याचा आग्रह, दीनदु:खितांची सेवा करण्याची त्यांची शिकवण, त्यागबुध्दीचे त्यांनी मानलेले महत्व, नि:स्वार्थ सेवेचा त्यांचा आदर्श, भूतमात्रावर त्यांचे असलेले प्रेम आणि त्यांच्या विचारांतील व वागणुकीतील अस्सल स्वदेशी बाणा इत्यादी कितीतरी गुणांकडे श्रीगुरूजींनी लक्ष वेधले. ते तर असेही म्हणाले की रामकृष्ण-विवेकानंद यांनी जे शिकविले त्याचे प्रत्यक्ष आचरण गांधीजी करीत होते.

केवळ गांधीजींच्या बाबतीत नव्हे तर इतर कितीतरी समकालीन नेत्यासंबंधी गौरवपर उल्लेख त्यांनी प्रसंगविशेषी केले आहेत. दिवंगतांना भाषणे वा लेख यांतून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली आहे. वानगीदाखल काही नावे सांगायची तर डॉ. राजेंद्रप्रसाद, सरदार पटेल, पं. नेहरू, स्वा. सावरकर, डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी, पं. दीनदयाळ उपाध्याय, पं. सातवळेकर, श्री. लालबहादूर शास्त्री, श्री. हनुमानप्रसाद पोद्दार, चक्रवर्ती राजगोपालाचारी वगैरे सांगता येतील, या आणि अन्य नेत्यांच्या, तसेच संघातील कितीतरी सहकाऱ्यांच्या संबंधात श्रीगुरूजींनी जे लिहिले किंवा ते जे बोलले, त्यांत पराकाष्ठेचा जिव्हाळा आहे. मूलग्राही गुणान्वेषण आहे. मोठया माणसांच्या बाबतीत असे म्हणतात की, इतरांचा राईएवढा गुणदेखील ते पर्वताएवढा करून सांगतात आणि स्वत:चा पर्वताएवढा मोठेपणा राईएवढा क्षुद्र समजतात. स्वत:संबधी बोलताना श्रीगुरूजींनी आपल्या योग्यतेचा टेंभा कधीही मिरविला नाही. संघकार्याचे सगळे श्रेय त्यांनी सहजपणे आपल्या सहकाऱ्यांच्या पदरात बांधून टाकले. स्वयंसेवकत्व हेच स्वत:चे भूषण मानले. आपल्या सगळया सहकाऱ्यांना त्यांनी सदैव आदराने आणि प्रेमाने वागविले. सगळयांना राजी राखले. देशभर विखुरलेल्या कार्यकर्त्यांची, शेकडो प्रचारकांची आणि समाजात अतिशय सुप्रतिष्ठित असलेल्या संघचालकांची तीव्र आणि ज्येष्ठ मंडळींची प्रचंड 'टीम' सांभाळणे व सगळ्यांची कार्यप्रेरणा तीव्र करणे ही सामान्य गोष्ट नव्हे .आपल्या व्यक्तिगत संपर्कातून त्यांनी हे घडवून आणले.

श्रीगुरूजींच्या व्यक्तिमत्वातील एका वैशिष्टयाचा ओझरता उल्लेख पूर्वी केलेलाच आहे तो म्हणजे त्यांची सर्वगामी बुध्दिमत्ता, अनंत विषयांचे त्यांना असलेले ज्ञान आणि त्या ज्ञानाचा अद्ययावतपणा. संगीत, रागदारी आणि घोष (बॅन्ड) विभागाच्या वादनाला भारतीय संगीताची सुरावट देण्याचा उपक्रम यांतील त्यांची गती पाहून प्रत्यक्ष घोष शिकविणारेही स्तिमित होऊन गेले. त्यांच्या चौफेर बुध्दीची चमक त्यांच्या पत्रव्यवहारावरून सहज ध्यानात येते. आणि मुख्य म्हणजे एखाद्या विषयावर ते जे मत मांडीत त्यात 'ओरिजिनॅलिटी' असे .त्याला शास्त्रीय आधार असे त्यांची अपूर्व स्मरणशक्ती प्रसिध्दच आहे .पण त्यांचे पाठांतर सांगण्याची त्यांची हातोटी फार परिणामकारक ठरत असे .प्रजननशास्त्र आणि 'सायबर नॅटिक्स', ज्योतिष खगोलशास्त्र, भुर्गभशास्त्र आणि प्रावरणशास्त्र

(इकॉलॉजी), अंतराळ आणि अणुविज्ञान यांसारखे अनेक विषय सहजपणे त्यांच्या बोलण्यात येऊन जात. त्यांचे बरेवाईट निष्कर्ष ते सांगत. संघ, धर्म, आणि संस्कृती एवढयापुरतेच त्यांचे चिंतन मर्यादित आहे असे समजून वैज्ञानिक, सामाजिक, आर्थिक विषयासंबंधी त्यांना काही सांगू पाहणारांना आश्चर्याचा अशा वेळी धक्काच बसत असे.

निरनिराळया शास्त्र - शाखांच्या बाबतीत त्यांचे ज्ञान किती सखोल आणि अद्ययावत होते, हे दर्शविणारी त्यांची एक आठवण विद्यमान सरसंचालक मा. रज्जूभय्या यांनी सांगीतली ती फार बोलकी आहे. एकदा अलाहबाद विद्यापीठात श्रीगुरूजींचा एक कार्यक्रम होता. या कार्यक्रमासाठी निरनिराळया ज्ञानशाखांच्या विद्वान प्राध्यापकांना निमंत्रित करण्यात आले होते. एकेका टेबलाभोवती एकेका 'फॅकल्टी' च्या प्राध्यापकांनी बसून थोडा वेळ श्रीगुरूजींशी बोलावे अशी योजना होती .त्याप्रमाणे कार्यक्रम पार पडला .त्यानंतर श्रीगुरूजींनी एम्.एस्सी .पदवी कोणत्या ज्ञानशाखेत घेतली असावी याबद्दल या सर्व प्राध्यापकांत चर्चा सुरू झाली .प्रत्येक ज्ञानशाखेतील प्राध्यापक म्हणू लागले की, आमच्याच 'फॅकल्टी' चे असले पाहिजेत !कारण चर्चेत प्रत्येकच शाखांत श्रीगुरूजींची तज्ज्ञता प्रत्ययास आली होती .अगदी आधुनिकांतले आधुनिक ग्रंथ व सिध्दांत यासंबंधी ते बोलले होते .अखेर जेव्हा त्यांना अधिकृतपणे सांगण्यात आले की, प्राणिशास्त्र (झूलॉजी) हा त्यांचा विषय होता तेव्हा सगळयांना मोठा अचंबा वाटला .असाच अनुभव कितीतरी विषयांसंबधी त्यांच्याशी बोलताना अनेकांना यावयाचा .मग चर्चा वैद्यकशास्त्राची असो, वंशशास्त्राची असो की, मंत्रशास्त्राची असो.

वैज्ञानिक प्रगतीची पूरेपूर कल्पना असूनही त्यांची एक भूमिका मात्र अगदी ठाम होती, ती ही की, विज्ञानाने धर्मानुकूल झाले पाहिजे, धर्माशी 'ऍडजेस्ट' करून घेतले पाहिजे .कारण धर्माचे आधारभूत सिध्दांत शाश्वत असतात .वैज्ञानिक संशोधनांचे निष्कर्ष बदलत असतात .विज्ञान मानवाला भौतिक सुखसाधने देऊ शकेल .त्यांचा वापर माणसाने खुशाल करावा .पण विज्ञानाबरोबर धर्माने बदलले पाहिजे, ही अपेक्षा मात्र चुकीची होय .धर्मप्रवण जीवन हेच खरे मनुष्यजीवन होय., धर्म आणि मोक्ष यांच्या मर्यादांतूनच अर्थ आणि काम हे पुरूषार्थावर आधारलेला 'संपूर्ण मानवा' चा विचार ही भारताची जगताला फार मोलाची देणगी आहे, आणि आधुनिक समस्याग्रस्त जगात हा विचार प्रसृत होण्याची आवश्यकता आहे .म्हणून हिंदूंनी 'जगदगुरूपद' भूषविण्याची पात्रता प्रथम संपादन केली पाहिजे, असा मोठा भव्य ध्येयवाद त्यांनी पुढे ठेवला होता .त्यांच्या सर्वगामी आणि सर्वस्पर्शी बुध्दीचा, अफाट व्यासंगाचा आणि ईश्वरदत्त प्रतिभेचा सगळा विलास भौतिक सुखवादासाठी नाही, तर हिंदू जीवनादर्शांच्या व्यावहारिक पुष्टीसाठी घडून आला.

या दृष्टीने समाजात वातावरण निर्माण व्हावे म्हणून कितीतरी माणसे व संस्था यांना त्यांनी जवळ केले. कितीतरी कामांना चालना दिली. कै. म.म. बाळशास्त्री हरदास यांच्या व्याख्यानमाला, पुण्याचे श्री. विश्वनाथ नरवणे यांचे कोशकार्य, डॉ. श्री. भा.वर्णेकरांचे संस्कृत भाषा प्रचाराचे उपक्रम, श्री. हनुमान प्रसादजी पोद्दार यांच्या 'गीता प्रेस' ची धर्मसेवा, सुधीर फडके यांची संगीतसाधना, गो.नी . दांडेकरांचे सद्-भावपोषक ललितलेखन, अमरेन्द्र गाडगीळांचे सांस्कृतिक प्रकाशनकार्य, चांपा येथील महारोगी कुष्ठधामाची रूग्णसेवा, ठिकठिकाणच्या संस्कारक्षम शिक्षणसंस्था या सगळयांमागे श्रीगुरूजी आपुलकीने व आस्थेने उभे राहिले .दिल्लीच्या पं .दीनदयाळ संशोधन संस्थेचे कार्य, नैसर्गिक व मानवनिर्मित अनेक आपत्तींत देशबांधवांना साहाय्य करण्यासाठी देशाच्या अनेक भागांत स्थापन झालेल्या समित्या आणि प्रतिष्ठाने, तसेच राष्ट्रीय महापुरूषांच्या) उदा .अरविंद आणि

विवेकानंद (जन्मशताब्दीची कामे यांची प्रेरक शक्ती म्हणून ते उभे झाले .डॉ .मुंजे स्मारक समितीचे काम त्यांच्याच प्रत्यक्ष पुढाकाराने पुर्णतेस गेले .सांस्कृतिक पुनरूत्थानाचा विचार आणि त्याचा विविध प्रकार प्रसार यांची अशी सांगड त्यांनी घातली होती .पण संघाचे कार्य हे राष्ट्रवृक्षाच्या मुळांना पाणी घालण्याचे मुलगामी कार्य आहे .आणि ते जर नीट झाले तर शाखा, पल्लव, फुले व फळे यांना बहर येईल, असेच ते सांगत .संस्थात्मक वा आंदोलनात्मक आनुषंगिक कामे करण्यासाठी संघकार्याची उपेक्षा त्यांना रूचत नसे .एकेक विषय घेऊन काम करणाऱ्यांना त्यांनी उत्तेजन जरूर दिले, परंतू समाजापुढील अनेकविध समस्यांच्या अंतिम निराकरणाची त्यांची भुमिका काय होती, ते एका संस्कृतप्रेमी कार्यकर्त्याला उद्देशून लिहिलेल्या पत्रात त्यांनी सांगून टाकले आहे .ते लिहितात, "आज आधुनिकतेच्या व प्रगतिशीलतेच्या फसव्या नावाखाली येथील पवित्र भावनांचे निखंदन करण्यात सर्व लोकनेते म्हणविणारे परमपुरूषार्थ मानीत आहेत .अशा अवस्थेत शिकण्याशिकविण्यासंबंधी जे शासकीय धोरण दिसते ते अपेक्षितच आहे .यात उचित परिवर्तन करावयाचे ते एकेक विषय घेऊन चळवळ करण्याने होईल किंवा कसे, याचा विचार व्हावा .खरे म्हणजे 'मूले कुठार: ' या न्यायाने जीवनात बोकाळलेल्या अराष्ट्रीय परमुखापेक्षी वृत्ती समूळ नष्ट करून जनसाधारणाची शुध्द राष्ट्रभक्तिपूर्ण सुसंघटित शक्ती उभी करणे व तिच्या द्वारे जीवनातील सर्व प्रवाह शुध्द करणे इकडे लक्ष देणे आवश्यक वाटते .मूलसिंचनाने शाखा-पल्लवांची जोपासना होते .जनसामान्यांची भावशुध्दी व संघटित परिणामकारक स्थिती सर्व समस्यांचे समाधान करण्यास समर्थ होऊ शकेल .तोवर वेगवेगळे प्रयत्नही चालूच ठेवले पाहिजेत .पण लक्ष मुख्य अधिष्ठानभूत शक्तिनिर्मितीकडे ठेवून प्रयत्नरत असले पाहिजे."

यात श्रीगुरूजींनी जीवनभर केलेल्या सर्व भगीरथ उद्योगाची दिशा स्पष्ट झाली आहे. हाच त्यांच्या जीवनाचा संदेश आहे. एवढे खरे की, स्वातंत्र्यकाळातील मूल्यहीन, सत्तालोलुप आणि भोगवादी राजकीय वातावरणाच्या प्रभावामुळे, तसेच हिसंबंधी गोटातून झालेल्या सातत्यपूर्ण अपप्रचार मोहिमेमुळे हा संदेश अद्याप राष्ट्राने पर्याप्त प्रमाणात ग्रहण केलेला नाही. पण डॉ. हेडगेवार आणि श्रीगुरूजी या दोघांनी मिळून सुमारे ५० वर्षे केलेल्या खडतर तपस्येनंतर राष्ट्र संघनेत्यांकडे आशेने व अपेक्षेने पाहू लागले आहे. परिवर्तनाची प्रसादचिन्हे दृग्गोचर होत आहेत. आज ना उद्या इष्ट परिवर्तन घडून आलेले अवश्य दिसेल. या परिवर्तनाला प्रेरक ठरलेली एक अदम्य ऋषिशक्ती या नात्याने श्रीगुरूजींची योग्यता कृतज्ञतापूर्वक सर्वमान्य होईल. तोवर, ज्यांना श्रीगुरूजींचा जीवनसंदेश कळला व पटला, त्यांनी प्रयत्नांची शर्थ करून आणि आवश्यक ते मनुष्यबळ ओतून प्रभावी संघटित शक्ती राष्ट्रव्यापी स्वरूपात उभी करण्याचे कार्य पुढे आणि पुढेच नेले पाहिजे, प्रेम, भक्ती, सेवा, त्याग आणि समर्पण हा संघाचा मार्ग आहे, याचे सतत स्मरण ठेवले पाहिजे.

***